टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत समाजशास्त्र विभागास

विद्यावाचस्पती (पीएच. डी.) साठी सादर करावयाचा शोधप्रबंध

शोधप्रबंधाचा विषय

# ''बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या''


**संशोधक**

**श्री. विठ्ठल कल्लापा दळवी**

एम.ए.,एम.फिल.

सहाय्यक प्राध्यापक

समाजशास्त्र विभाग

कला महाविद्यालय, कोवाड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

**मार्गदर्शक**

**डॉ. प्रभाकर भरमू द्राक्षे**

एम.ए.,पीएच.डी.

प्रभारी प्राचार्य

डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर


मे, २०१३

# प्रतिज्ञापत्र

मी श्री. विठ्ठल कल्लापा दळवी असे लिहून देतो की, ''बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या'' या शोधप्रबंधातील सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलित केली असून तिचा योग्य त्या ठिकाणी तसा उल्लेख केलेला आहे. सदर माहितीचा या शोधप्रबंधाव्यतिरिक्त अन्यत्र कोठेही उपयोग केलेला नाही.

संशोधक

**श्री. विठ्ठल कल्लापा दळवी**
सहाय्यक प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग
कला महाविद्यालय, कोवाड,
ता. चंदगड, जि. कोल्हापूर

स्थळ : कोवाड
दिनांक :

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत ‘समाजशास्त्र’ या विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी श्री. विठ्ठल कल्लापा दळवी यांनी ‘‘बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या’’ या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत.

मार्गदर्शक

**डॉ. प्रभाकर भरमू द्राक्षे**
प्रभारी प्राचार्य
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

स्थळ : पुणे
दिनांक :

# ऋणनिर्देश

१ नोव्हेंबर १९५६ रोजी भाषावार प्रांतरचनेनुसार बेळगाव, निपाणी, खानापूर, बिदर, भालकीसह संपूर्ण सीमाभागातील मराठी बहुभाषिक गावे कर्नाटकाला (त्यावेळच्या म्हैसूर राज्याला) जोडण्यात आली. तेव्हापासून सीमाभागातील मराठी भाषिक आपल्यावरील अन्यायाविरोधात लोकशाहीमार्गाने लढताना दिसत आहेत. त्यासाठी वेळोवेळी मोर्चे, सत्याग्रह, आंदोलने, काळा दिन इ. सारखे मार्ग अवलंबून कर्नाटक, महाराष्ट्र तसेच केंद्र सरकारचे लक्ष या प्रश्नाकडे वेधून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. सीमाभागात मराठी भाषिकांची संघटना म्हणून महाराष्ट्र एकीकरण समिती दरवर्षी १ नोव्हेंबर हा 'काळा दिवस' मानून हरताळ पाळते. पण या मराठी भाषिकांच्या अन्यायाबाबत कोणीही शासन पुढे येऊन विचार करताना दिसत नाही. उलट कर्नाटक सरकार या ना त्या माध्यमातून सीमाभागावर आपलाच अधिकार आहे हे दाखवू पाहते आहे. त्यासाठी राज्याची भाषा कन्नडची सक्ती शाळा–महाविद्यालयापासून ते सरकारी, खाजगी कार्यालये, दुकानांचे फलक, बसवरील फलक, विमा, पोस्ट, वीज इ. मधील सर्व कागदपत्रे कन्नडमधून ठेवून मराठी भाषिकांची अस्मिता, भाषा, संस्कृती नष्ट करून त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणत आहे. इतकेच नव्हेतर आज घर, जमीन, सातबारा उतारे इ. कागदपत्रेही कन्नडमधूनच असून मराठी भाषिकांची कित्येक वर्षे सत्ता असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था, संघटना, महानगरपालिका यामधील कागदपत्रे, विविध ठराव, परिपत्रके हीसुद्धा कन्नडमध्येच ठेवण्याचे बंधन कर्नाटक सरकारकडून जाणीवपूर्वक होत आहे. तर मराठी भाषिक महापौरांनी महानगरपालिकेत मराठी भाषिकांचा सीमाभाग महाराष्ट्रात समाविष्ट करावा असा एकमताने ठराव केला म्हणून आणि १ नोव्हेंबरला 'काळ्या दिनात' महापौर व उपमहापौर सहभागी झाल्या म्हणून त्यांच्यावर कारवाई करून दोनवेळा महानगरपालिकाच बरखास्तीकरण करून कर्नाटक सरकारने लोकशाहीवरती घाला घालण्याचे काम केले आहे. तर बेळगावला उपराजधानीचा दर्जा देऊन बेळगाववर आपलाच हक्क आहे हे दाखविण्यासाठी पुणे–बेंगलोर महामार्गावर हलगा येथे भव्य विधानसौध बांधून मराठी भाषिकांच्या जखमेवर मीठ चोळणे आणि त्यांच्या संस्कृतीचा ऱ्हास करणे त्यांच्यावर अन्याय, अत्याचार करून देशोधडीला लावणे यासाठी विविध मार्ग कर्नाटक सरकार अवलंबित आहे. त्यामुळे सीमाभागातील मराठी भाषिक

हे केंद्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या शिफारशीनुसार अल्पसंख्याक असूनही कर्नाटक सरकारने त्यांना त्यांच्या हक्क, अधिकार, सुविधापासून आजतागायत पूर्णपणे वंचित ठेवले आहे. परिणामी मराठी भाषिकांना आज अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यांना जीवन जगणे अवघड बनले आहे.

मी सीमालगत भागाजवळील रहिवाशी असल्याने सीमाभागातील मराठी भाषिकांचे जीवन, त्यांची संस्कृती, कर्नाटक सरकारची कन्नड सक्ती, त्यांचे मराठी भाषिकांवर होणारे दूरगामी परिणाम, त्यामुळे मराठी भाषिकांना भेडसावणाऱ्या अनेक सामाजिक समस्या यावर संशोधनात्मक अभ्यास झाला नसल्याने बेळगाव जिल्ह्यातील मराठी बहुभाषिक तालुके असलेल्या बेळगाव, खानापूर, चिक्कोडी, अथणी व हुक्केरी या तालुक्यामध्ये मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्यांचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून संशोधनात्मक अभ्यास केला. त्यासाठी मला वेळोवेळी अनेकांनी बहुमोल असे मार्गदर्शन करून सहकार्य केले त्यांचे ऋणनिर्देश मानने हे मी माझे कर्तव्य मानतो.

माझे मार्गदर्शक डॉ. प्रभाकर बी. द्राक्षे, प्रभारी प्राचार्य, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज यांनी संशोधन विषयातील बारकावे जाणून देऊन संशोधनाच्या प्रत्येक टप्प्यात आपला बहुमोल वेळ देऊन मित्रत्वाच्या नात्याने हा प्रबंध पूर्ण होण्यासाठी मार्गदर्शपर मदत केली त्याबद्दल मी त्यांचा शतश: ऋणी आहे. त्याचबरोबर सर्वोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. डी. व्ही. तोगले, सचिव मा. श्री. एम. व्ही. पाटील व उपाध्यक्ष मा. श्री. के. बी. पाटील यांच्या सहकार्यातूनच हे संशोधनकार्य यशस्वी होण्यास मदत झाली आहे. तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठ समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. विशाल जाधव यांचेही वेळोवेळी सहकार्य लाभले त्यामुळे त्यांचाही मी आभारी आहे.

माझ्या महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील आणि विद्यमान प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, मला संशोधनविषय निवडीपासून ते संशोधन पूर्ण होईपर्यंत काळ–वेळ याचा विचार न करता संशोधनकार्यात सदैव पाठीशी राहून मला मदत करणारे माझे सहकारी प्रा. डॉ. दिपक रा. पाटील व प्रा. एस. एन. कांबळे यांचाही मी सदैव ऋणी आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीचे पदाधिकारी, माजी आमदार, माजी महापौर, दैनिक तरूण भारत, बेळगावचे व्यवस्थापक श्री. जगदीश कुंटे तसेच बेळगाव जिल्ह्यातील शासकीय कार्यालयातील पदाधिकारी, कर्मचारी या

सर्वांनी संशोधनासाठी आवश्यक ती माहिती देवून सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

तसेच कला महाविद्यालयातील माझे सर्व सहकारी प्राध्यापक मित्र, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीसुद्धा वेळोवेळी सहकार्य केले. त्या सर्वांचे मी आभार मानतो.

सदर संशोधनासाठी पुढील ग्रंथालयांनी मला सहकार्य केले.

१. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय, पुणे
२. बॅ. जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, पुणे
३. बॅ. खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
४. धारवाड विद्यापीठ ग्रंथालय, धारवाड
५. डॉ. घाळी कॉलेज ग्रंथालय, गडहिंग्लज
६. शिवराज महाविद्यालय ग्रंथालय, गडहिंग्लज
७. कला महाविद्यालय ग्रंथालय, कोवाड
८. सार्वजनिक वाचनालय, बेळगाव
९. सेंट्रल लायब्ररी, बेळगाव
१०. दैनिक तरूण भारत ग्रंथालय, बेळगाव

वरील ग्रंथालयांचे ग्रंथपाल व त्यांचे सहकारी यांच्या उत्तम सहकार्यामुळेच माझ्या संशोधनाला चालना मिळाली. त्यामुळे त्यांचेही मी मन:पूर्वक आभार मानतो.

अपार कष्ट करून माझे शैक्षणिक स्वप्न पूर्ण करून मला स्वावलंबी बनविणारे माझे आई–वडील, भाऊ तसेच पत्नी, कन्या विजया व वनश्री आणि माझे सर्व नातेवाईक यांचेही सहकार्य या कामी लाखमोलाचे ठरले.

सदर प्रबंधाचे सुबक टंकलेखन करणारे श्री. एस. एस. पसारे, कोल्हापूर व विष्णू खाडे, कागल आणि प्रा. ए. के. कांबळे यांचाही मी मन:पूर्वक आभारी आहे.

**श्री. विठ्ठल कल्लापा दळवी**
संशोधक

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे शीर्षक व उपशीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ | |
| | प्रतिज्ञा पत्र | |
| | प्रमाणपत्र | |
| | ऋणनिर्देश | |
| | अनुक्रमणिका | |
| | सारणी अनुक्रमणिका | |
| पहिले | संयुक्त महाराष्ट्र व महाराष्ट्र–कर्नाटक सीमावाद | १ – ८० |
| दुसरे | बेळगाव जिल्हा | ८१ – १३९ |
| तिसरे | संशोधन पद्धती | १४० – १८२ |
| चौथे | मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या | १८३ – २५० |
| पाचवे | माहिती संकलन व विश्लेषण | २५१ – ३२१ |
| सहावे | निष्कर्ष, सूचना व शिफारशी | ३२२ – ३३० |
| | संदर्भ सूची | ३३१ – ३४३ |
| | परिशिष्टे<br>परिशिष्ट – १: महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक<br>परिशिष्ट – २ : कर्नाटक शासनाची परिपत्रके<br>परिशिष्ट – ३ : सीमाभागातील भौगोलिक प्रदेश दर्शविणारे नकाशे<br>परिशिष्ट – ४: संशोधनाला अनुसरून घेण्यात आलेली छायाचित्रे<br>परिशिष्ट – ५ : अनौपचारिक मुलाखती नावे<br>परिशिष्ट – ६ : मुलाखत अनुसूची | ३४४ – ३७६<br>३४४<br>३५५<br>३६६<br>३६८<br>३७२<br>३७३ |

# सारणी अनुक्रमणिका


| सारणी क्रमांक | सारणीचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १.१ | सीमाभागातील ८६५ खेडी व नगरे यांची जिल्हा व तालुकावार विभागणी | २८ |
| १.२ | महाराष्ट्र शासनाने हक्क सांगितलेल्या मराठी भाषिक प्रदेशातील भाषिक प्रमाण | ३३ |
| १.३ | १९५७ च्या विधानसभा निवडणुकीतील मतदान | ३४ |
| १.४ | महाजन यांनी महाराष्ट्राला देऊ केलेली गावे | ५२ |
| १.५ | महाजन यांनी महाराष्ट्राकडून कर्नाटकाला देऊ केलेली गावे | ५२ |
| १.६ | महाजन यांनी महाराष्ट्राला नाकारलेली गावे | ५३ |
| २.१ | बेळगाव जिल्ह्याचे तालुकावार भौगोलिक क्षेत्रफळ, शहरे व गावे तसेच जिल्ह्याच्या ठिकाणापासूनचे अंतर | ८८ |
| २.२ | बेळगाव जिल्हा जनगणना २००१ व २०११ ची तुलना | ९३ |
| २.३ | बेळगाव जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्येची माहिती (२००१ च्या जनगणनेनुसार) | ९५ |
| २.४ | बेळगाव ग्रामीण व शहरी लोकसंख्येची तुलना | ९६ |
| २.५ | साक्षरता प्रमाण | ९९ |
| २.६ | बेळगाव जिल्ह्यातील कनिष्ठ प्राथमिक शाळांची माहिती | १०६ |
| २.७ | बेळगाव जिल्ह्यातील वरिष्ठ प्राथमिक शाळांची माहिती | १०६ |
| २.८ | बेळगाव जिल्ह्यातील माध्यमिक विद्यालयांची माहिती | १०७ |
| २.९ | बेळगाव जिल्ह्यातील उच्च माध्यमिक विद्यालयांची माहिती | १०७ |
| २.१० | सरकारी पदवी महाविद्यालये | १०९ |
| २.११ | खाजगी पदवी महाविद्यालये | १०९ |

| सारणी क्रमांक | सारणीचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २.१२ | सरकारी वैद्यकीय महाविद्यालये | ११० |
| २.१३ | अभियांत्रिकी महाविद्यालये | ११० |
| २.१४ | बेळगाव जिल्हा – उद्योगांची संख्या | ११४ |
| २.१५ | बेळगाव जिल्ह्यातील तालुकानिहाय साखर कारखाने | ११६ |
| २.१६ | दुग्ध संस्था | ११९ |
| २.१७ | सार्वजनिक वाचनालयाची प्रगती | १२४ |
| २.१८ | बेळगाव जिल्हा लोकसभा व राज्यसभा सदस्य | १३० |
| २.१९ | बेळगाव जिल्हा विधानसभा सदस्य | १३१ |
| २.२० | ग्रामपंचायतींची संख्या | १३५ |
| २.२१ | तालुका पंचायत प्रतिनिधी संख्या | १३६ |
| २.२२ | जिल्हा पंचायत प्रतिनिधी संख्या | १३६ |
| ३.१ | निवडलेली खेडी | १६८ |
| ३.२ | निवडलेली गावे | १६९ |
| ३.३ | वयोगट नमुना निवड | १७१ |
| ३.४ | लिंग गटनमुना निवड | १७२ |
| ३.५ | शिक्षण गट नमुना निवड | १७२ |
| ३.६ | व्यवसाय गटनमुना निवड | १७२ |
| ३.७ | मासिकउत्पन्न गट नमुना निवड | १७३ |
| ५.१ | भाषा आत्मसात | २५२ |
| ५..२ | घरामधील बोलीभाषा | २५३ |

| सारणी क्रमांक | सारणीचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ५.३ | गावाचे भाषिक प्रमाण | २५५ |
| ५.४ | वृत्तपत्रासंदर्भातील माहिती | २५६ |
| ५.५ | वृत्तपत्राची भाषा | २५७ |
| ५.६ | सीमाप्रश्नासंदर्भात माहिती देणारी मराठी वृत्तपत्रे | २५९ |
| ५.७ | नातेसंबंध | २६० |
| ५.८ | निमंत्रण पत्रिका | २६२ |
| ५.९ | लग्नकार्यातील विधी | २६३ |
| ५.१० | सार्वजनिक कार्यक्रमामध्ये भाषेचा प्रभाव | २६५ |
| ५.११ | सार्वजनिक कार्यक्रमामध्ये भाषिक भेदभाव | २६६ |
| ५.१२ | भाषेच्या आधारावर तंटे | २६७ |
| ५.१३ | तरूण मंडळे व भाषिक मुद्दा | २६९ |
| ५.१४ | महाराष्ट्रीयन संस्कृतीविषयी जवळीकता | २७० |
| ५.१५ | मराठी साहित्य संमेलनातील सहभाग | २७२ |
| ५.१६ | सीमाप्रश्नासंदर्भात माहिती | २७३ |
| ५.१७ | गावच्या विकासासाठी भाषिक लोक एकत्र | २७५ |
| ५.१८ | गावातील संस्थांमधील कागदपत्रांची भाषा | २७६ |
| ५.१९ | शेतीशी संबंधित कागदपत्रांची भाषा | २७८ |
| ५.२० | सीमाप्रश्नासंदर्भातील लढ्यातील सहभाग | २७९ |
| ५.२१ | वारकरी संप्रदाय | २८१ |
| ५.२२ | शाळेचे माध्यम | २८२ |

| सारणी क्रमांक | सारणीचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ५.२३ | मुलांच्या शाळेचे माध्यम | २८३ |
| ५.२४ | शैक्षणिक सोयी सवलती | २८५ |
| ५.२५ | मुलींचे उच्च शिक्षण | २८६ |
| ५.२६ | पुरेसा शिक्षक वर्ग | २८८ |
| ५.२७ | पुरेशी विद्यार्थी संख्या | २८९ |
| ५.२८ | महाराष्ट्र संस्कृती | २९१ |
| ५.२९ | कर्नाटक सरकारचे धोरण | २९२ |
| ५.३० | शाळा इमारत बांधकाम व दुरूस्ती | २९४ |
| ५.३१ | सीमाभागातील शाळांसाठी महाराष्ट्र सरकारचे आर्थिक सहाय्य | २९५ |
| ५.३२ | कन्नड विषयाची सक्ती | २९६ |
| ५.३३ | मराठी माध्यमाची पाठ्यपुस्तके | २९८ |
| ५.३४ | स्थानिक निवडणुकीत भाषिक मुद्दयाचा प्रभाव | २९९ |
| ५.३५ | राजकीय पक्ष/संघटना – भाषिक वापर | ३०१ |
| ५.३६ | स्थानिक संस्थांमधील भाषिक प्रभाव | ३०२ |
| ५.३७ | स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सहकार्य | ३०४ |
| ५.३८ | पक्ष प्रचारासाठी भाषा | ३०५ |
| ५.३९ | मराठी भाषिक संघटना | ३०७ |
| ५.४० | सरकारी कार्यक्रमातील सहभाग | ३०८ |
| ५.४१ | कर्नाटक सरकारचे मराठी भाषाविषयक धोरण | ३१० |
| ५.४२ | कर्नाटक सरकारचा दृष्टिकोन | ३११ |

| सारणी क्रमांक | सारणीचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ५.४३ | बेळगाव महानगरपालिका बरखास्तीकरण | ३१३ |
| ५.४४ | सीमालढ्यामध्ये महिलांचा सहभाग | ३१४ |
| ५.४५ | भाषिक मुद्दा | ३१६ |
| ५.४६ | महाराष्ट्रात जाण्याची मानसिकता | ३१७ |
| ५.४७ | पोलीस स्टेशनमध्ये भाषिक समस्या जाणवते का? | ३१९ |
| ५.४८ | महसूल विभागात भाषिक समस्या जाणवतात का? | ३२० |

# आलेख अनुक्रमणिका


| आलेख क्रमांक | आलेखाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ५.१ | भाषा आत्मसात | २५२ |
| ५..२ | घरामधील बोलीभाषा | २५४ |
| ५.३ | गावाचे भाषिक प्रमाण | २५५ |
| ५.४ | वृत्तपत्रासंदर्भातील माहिती | २५६ |
| ५.५ | वृत्तपत्राची भाषा | २५८ |
| ५.६ | सीमाप्रश्नासंदर्भात माहिती देणारी मराठी वृत्तपत्रे | २५९ |
| ५.७ | नातेसंबंध | २६१ |
| ५.८ | निमंत्रण पत्रिका | २६२ |
| ५.९ | लग्नकार्यातील विधी | २६४ |
| ५.१० | सार्वजनिक कार्यक्रमामध्ये भाषेचा प्रभाव | २६५ |
| ५.११ | सार्वजनिक कार्यक्रमामध्ये भाषिक भेदभाव | २६६ |
| ५.१२ | भाषेच्या आधारावर तंटे | २६८ |
| ५.१३ | तरूण मंडळे व भाषिक मुद्दा | २६९ |
| ५.१४ | महाराष्ट्रीयन संस्कृतीविषयी जवळीकता | २७१ |
| ५.१५ | मराठी साहित्य संमेलनातील सहभाग | २७२ |
| ५.१६ | सीमाप्रश्नासंदर्भात माहिती | २७४ |
| ५.१७ | गावच्या विकासासाठी भाषिक लोक एकत्र | २७५ |
| ५.१८ | गावातील संस्थांमधील कागदपत्रांची भाषा | २७७ |
| ५.१९ | शेतीशी संबंधित कागदपत्रांची भाषा | २७८ |

| आलेख क्रमांक | आलेखाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ५.२० | सीमाप्रश्नासंदर्भातील लढ्यातील सहभाग | २८० |
| ५.२१ | वारकरी संप्रदाय | २८१ |
| ५.२२ | शाळेचे माध्यम | २८२ |
| ५.२३ | मुलांच्या शाळेचे माध्यम | २८४ |
| ५.२४ | शैक्षणिक सोयी सवलती | २८५ |
| ५.२५ | मुलींचे उच्च शिक्षण | २८७ |
| ५.२६ | पुरेसा शिक्षक वर्ग | २८८ |
| ५.२७ | पुरेशी विद्यार्थी संख्या | २९० |
| ५.२८ | महाराष्ट्र संस्कृती | २९१ |
| ५.२९ | कर्नाटक सरकारचे धोरण | २९३ |
| ५.३० | शाळा इमारत बांधकाम व दुरूस्ती | २९४ |
| ५.३१ | सीमाभागातील शाळांसाठी महाराष्ट्र सरकारचे आर्थिक सहाय्य | २९५ |
| ५.३२ | कन्नड विषयाची सक्ती | २९७ |
| ५.३३ | मराठी माध्यमाची पाठ्यपुस्तके | २९८ |
| ५.३४ | स्थानिक निवडणुकीत भाषिक मुद्दयाचा प्रभाव | ३०० |
| ५.३५ | राजकीय पक्ष/संघटना – भाषिक वापर | ३०१ |
| ५.३६ | स्थानिक संस्थांमधील भाषिक प्रभाव | ३०३ |
| ५.३७ | स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सहकार्य | ३०४ |
| ५.३८ | पक्ष प्रचारासाठी भाषा | ३०६ |
| ५.३९ | मराठी भाषिक संघटना | ३०७ |

| आलेख क्रमांक | आलेखाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ५.४० | सरकारी कार्यक्रमातील सहभाग | ३०९ |
| ५.४१ | कर्नाटक सरकारचे मराठी भाषाविषयक धोरण | ३१० |
| ५.४२ | कर्नाटक सरकारचा दृष्टिकोन | ३१२ |
| ५.४३ | बेळगाव महानगरपालिका बरखास्तीकरण | ३१३ |
| ५.४४ | सीमालढ्यामध्ये महिलांचा सहभाग | ३१५ |
| ५.४५ | भाषिक मुद्दा | ३१६ |
| ५.४६ | महाराष्ट्रात जाण्याची मानसिकता | ३१८ |
| ५.४७ | पोलीस स्टेशनमध्ये भाषिक समस्या जाणवते का? | ३१९ |
| ५.४८ | महसूल विभागात भाषिक समस्या जाणवतात का? | ३२० |

प्रकरण पहिले

# संयुक्त महाराष्ट्र व महाराष्ट्र–कर्नाटक सीमावाद

### प्रकरण पहिले

# संयुक्त महाराष्ट्र व महाराष्ट्र–कर्नाटक सीमावाद

## अ) संयुक्त महाराष्ट्र


१.१ प्रस्तावना

१.२ स्वराज्य स्थापना

१.३ इंग्रजी राजवट

१.४ बंगालची फाळणी

१.५ कलकत्ता काँग्रेस

१.६ पूर्व बंगाल व आसाम

१.७ संयुक्त महाराष्ट्र

१.८ संयुक्त महाराष्ट्राची मागणी

१.९ संयुक्त महाराष्ट्र सभा

१.१० बेळगाव मराठी साहित्य संमेलन

१.११ संयुक्त महाराष्ट्र परिषद

१.१२ दार कमिशन

१.१३ जे. व्ही. पी. समिती

१.१४ नागपूर करार

१.१५ राज्य पुनर्रचना आयोग

१.१६ महाद्विभाषिक राज्याचा निर्णय

१.१७ संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती

## ब) सीमावाद


१.१८ सीमावाद

१.१८.१ बेळगाव नगरपालिकेचा ठराव

१.१८.२ महाराष्ट्र एकीकरण समितीचे निवेदन

१.१८.३ महाराष्ट्राचा दावा

१.१८.४ संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील हुतात्मे

१.१८.५ सत्याग्रह आंदोलन

१.१८.६ दिल्लीत बेळगावचे शिष्टमंडळ

१.१८.७ म्हैसूर राज्याची स्थापना

१.१८.८ कर्नाटकची भूमिका

१.१८.९ निजलिंगाप्पांची ग्वाही

१.१८.१० सत्याग्रहाचे दुसरे पर्व

१.१८.११ साराबंदी

१.१८.११.१ येळ्ळूर साराबंदी

१.१८.१२ पुणे मोर्चा

१.१८.१३ महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांचे उपोषण

१.१८.१४ महाजन आयोग

१.१८.१५ शिवसेनेचे हुतात्मे

१.१८.१६ नाथ पै यांचे राज्य सीमा मंडळ विधेयक

१.१८.१७ केंद्र सरकारचा खुलासा

१.१८.१८ कन्नडसक्ती

१.१८.१८.१ १९८६ ची कन्नडसक्ती

१.१८.१९ सीमा परिषद, खानापूर

१.१८.२० आमदार व्ही. वाय. चव्हाण यांचा निर्धार

१.१८.२१ महापौरांचे उपोषण

१.१८.२२ सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात दाखल

१.१८.२३ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

१.१८.२४ लोकप्रतिनिधींवर हल्ला

१.१८.२५ महामेळावा

१.१८.२६ महानगरपालिका बरखास्तीकरण

१.१८.२७ महाराष्ट्र विधीमंडळाचा ठराव

१.१८.२८ महाराष्ट्र सरकारचे निवेदन

१.१८.२९ विधानसौध

१.१८.३० समारोप

# प्रकरण पहिले

# संयुक्त महाराष्ट्र व महाराष्ट्र–कर्नाटक सीमावाद

## १.१ प्रस्तावना

स्वातंत्र्यानंतर भारतीय संघराज्यातील एक स्वतंत्र घटकराज्य म्हणून महाराष्ट्राची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्राच्या स्थापनेमागे अनेक प्रेरणा, संस्कृती, सामाजिक जीवन, भाषा इ. घटक कारणीभूत ठरलेले आपणास पहायला मिळतात. अखंड हिंदुस्थानचे प्राकृतिक मानचित्र पाहिले तर आर्यापथ आणि दक्षिणापथ असे दोन नैसर्गिक व सांस्कृतिक विभाग स्पष्टपणे दिसतात. विंध्य सातपुड्याच्या पर्वतरांगा आणि नर्मदा नदी ही या दोन्ही विभागांना अलग करणारी नैसर्गिक सीमारेषा आहेत. आर्य संस्कृतीचा जन्म सप्तसिंधुच्या प्रदेशात झाला. त्यानंतर ही संस्कृती गंगा, यमुनेच्या तीराने उत्तर भारतात पसरली. या विभागाला आर्यावर्त असे नाव पडले. त्यामुळे वैदिक वाङ्मयामध्ये दक्षिणापथाचा उल्लेख क्वचितच काही ठिकाणी येतो. नाणेघाटातील शिलालेखात गौतमीपुत्र सातकरणीचा दक्षिणा पथपथी असे म्हटले जाते. ही संज्ञा महाराष्ट्राहून अधिक व्यापक प्रदेश दाखविणारी आहे. दक्षिणापथ हे नावदेखील हळूहळू दक्षिणेकडे सरकले असावे, कारण चाणक्याने अश्म, अपरान्त यांच्याबरोबर दक्षिणापथ असा स्वतंत्र उल्लेख केला आहे.

बौद्ध वाङ्मयात 'राष्ट्रीक' आणि 'महारठ' हे महाराष्ट्राशी संबंधित शब्द पहिल्यांदा आले आहेत. सम्राट अशोकाने आणि त्यानंतर मोगली पुत्ततिसने दक्षिणेकडे बौद्ध धर्मप्रचारक पाठवले होते. हे प्रचारक जेथे गेले त्यामध्ये 'राष्ट्रीक' किंवा 'महारठ' असे प्रदेशनाम आले आहे. अशोकाचा नातू संप्रत्ती याने आपले गुप्तहेर भिक्षुच्या वेशात जागोजागी पाठविले होते. त्यामध्ये मरहट्ठ असे नाव आहे. यावरून बौद्धकाळात 'महाराष्ट्र' असे देशनाम अस्तित्वात आले असावे.[1] 'महावंश' या बौद्धग्रंथामध्ये महारठ या प्रदेशाचा नि:संदिग्ध उल्लेख आहे. सम्राट शालीवाहनाने महाराष्ट्री या भाषेला राजभाषा बनवले होते. या कालखंडात महाराष्ट्री भाषा अत्यंत समृद्ध झाली आणि अनेक महत्त्वाचे ग्रंथ त्या भाषेत लिहिले गेले. म्हणून वररूचीने आपल्या 'प्राकृतप्रकाश' या व्याकरणविषयक ग्रंथात महाराष्ट्राला

अग्रस्थान दिले आहे. त्यावरून पहिल्या शतकातील महाराष्ट्राचे महत्त्व तर लक्षात येतेच पण भूप्रदेशावरून भाषांना नाव मिळण्याची प्रक्रिया सुरू झाली असावी असे दिसते.

पुराणातील 'महाराष्ट्र' हा शब्द 'महारठ्ठ' किंवा 'मरहट्ट' याचे संस्कृतीकरण आहे. महारठी किंवा रठी म्हणजे रथी–महारथी असा संबंध अनेकांनी लावला आहे. काहीनी तर राठोड, महाराठोड याच्याशीही त्याचा संबंध जोडला आहे. राजवाड्यांनी तर महारठी थेट मगधातून आले अशीही एक कल्पना मांडली आहे. इ. स. पूर्व १०० च्या शिलालेखात 'महारठी गणकइरो' असा शब्द आला आहे. त्याचा अर्थ महाराठ्ठाचा रहिवासी किंवा महारठ्ठ गणाचा सदस्य असा होणे अधिक योग्य ठरेल. सातवाहन सम्राट हे ब्राह्मण असल्यामुळे महारठी हा शिलालेखातील उल्लेख त्यांच्या नजिकच्या आप्तांचा असावा असेही म्हटले गेलेले आहे. पण महाराणी नायनिकेने स्वत:चा उल्लेख महारठींनी असा केला असल्यामुळे हे ब्राह्मणही स्वत:ला महारठीच मानतात असे दिसते. महारठ्ठचे संस्कृत रूप महाराष्ट्र त्यामुळे महारठ्ठापासून मऱ्हाट वा महाराष्ट्र हे नाव रूढ झाले. रठ्ठ म्हणजे रास्टिक – राष्ट्रक या देशात राहणारे लोक. कार्ले भार्जे येथील शिलालेखात 'महारठि महारठिनी' असे उल्लेख येतात. श्री. व्यंकटेश केतकर, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते, महाराष्ट्राचा रहिवासी असा अर्थ. 'महाराष्ट्र' या नावाची व्युत्पत्ती – 'महारांचे राष्ट्र' अशी मोल्सवर्थच्या कोशात आढळते. मऱ्हाटी संस्कृतीकार शं. बा. जोशींनी या नामचर्चेत महाराष्ट्राचे मूळ नाव 'मरहट्ट' मानले आणि त्यासाठी त्यांनी ज्ञानेश्वरी, महानुभावीय वाङ्मयाचा आधार घेतला. त्यानुसार 'मऱ्हाटा – मरहट्ट' असे नाव असून त्याचा अर्थ मर–झाड, हट्ट प्रदेश – झाडांचा प्रदेश, जंगलमय प्रांत असा होतो. तत्कालिन महाराष्ट्राचे स्वरूप काहीसे असेच होते. त्यामुळे मरहट्ट – मरहाट–महारठ्ठ – महाराष्ट्र अशी नावाची स्थित्यंतरे झाली असावीत.[२]

महाराष्ट्रात यादव राजहंस इ. स. ८६० ते १३१८ दरम्यान सत्तेवरती होता. त्यांची राज्यभाषा मराठी होती व महाराष्ट्र ही त्यांची कर्मभूमी होती. यादवानंतर बहामनी, सुलतान, निजामशाही, आदिलशाही, इमादशाही, फरिदशाही, कुतुबशाही यांनी कमीअधिक प्रमाणात राज्य केले. यादवकाळ संपल्यानंतर जी परकीय राज्ये आली त्यांनी मराठ्यांच्या अस्तित्वावरच घाला

घातला. राज्यकर्त्यांची भाषा, संस्कृती, धर्म, राज्यपद्धती वेगवेगळी असल्याने त्यांनी महाराष्ट्रातील गावांना स्वभाषीय नावे देणे, कापरांचा नाश करणे, मठमंदिरांचा नाश करणे, स्त्रियांना गुलाम करणे, लोकांना बाटविणे, कर लादणे या गोष्टी मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्राला रसातळाला नेणाऱ्या ठरल्या.

मात्र या काळात भक्ती चळवळीने महाराष्ट्राची अस्मिता जागी ठेवण्याचे कार्य केले. महाराष्ट्रीयन सतांनी, स्वधर्म, स्वसंस्कृती, स्वभाषा याविषयीचा अभिमान जागृत ठेवण्याचे कार्य केले. आर्थिक दुराग्रह, जातिभेद, कर्मठपणा यावर कोरडे ओढले. संत ज्ञानेश्वर, नामदेव यांनी पंढरपूरच्या वाळवंटात समतेचा ध्वज उंच धरला. त्या झेंड्याखाली सर्व जनता भक्तिमार्गात न्हाऊन निघाली. १६ व्या शतकात वारकरी पंथाला अधिक महत्त्वाचे स्थान मिळवून दिले ते संत एकनाथांनी. विचार आणि आचार यात विसंगती नसणारे संत म्हणजे एकनाथ, वारकरी पंथाच्या तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहारातील आदर्श म्हणजे नाथांचे ‘चरित्र व चारित्र्य’ अशा शब्दांत ह. श्री. शेणोलीकर यांनी एकनाथांचा गौरव केला.[३] तर त्यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा पुढे नेण्याचे काम संत तुकारामांनी केले. ‘धर्माचे पालन/करणे पाखंड खंडण’ अशी भूमिका त्यांनी घेतली. चारित्र्य, भूतदया, सदाचार, नीती यांचा प्रसार आयुष्यभर त्यांनी अभंगातून केला. संत रामदास, नामदेव आदी संतांनी आपल्या टाळ, मृदंग, अभंग, वाणी यातून महाराष्ट्र धर्म वाढविण्यावर भर दिला. या सर्व संतांच्या कार्याबाबत प्रा. गं. बा. सरदार ‘संत वाङ्‌मयाची सामाजिक फलश्रुती’ या ग्रंथात लिहितात, ‘ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्राला तत्त्वज्ञान दिले, नामदेवांनी नामशक्तीचा उद्‌बोध केला, एकनाथांनी तत्त्व आणि तपशील, विचार आणि आचार यांचा मिलाफ घडवून आणला, ज्ञानाशिवाय भक्तीला डोळसपणा नाही. आचाराशिवाय तिच्यातील जडता नाहीशी होत नाही, परंतु या तिन्ही प्रवृत्ती एकवटून त्यांची सामाजिक नीतिमत्तेत परिणती झाल्याशिवाय मानवी जीवनाला पूर्णत्व नाही. म्हणूनच ज्ञानेश्वरांपासून ते संत रामदासांपर्यंत सारेच ‘महाराष्ट्र धर्माचे प्रवक्ते’ म्हणून ओळखले गेले.

## १.२ स्वराज्य स्थापना

काटक, कणखर आणि रांगड्या मराठ्यांची मूळ भूमी महाराष्ट्र आहे. मराठ्यांचा स्वभाव आणि जीवनविषयक दृष्टिकोन घडविण्यात महाराष्ट्राची भौगोलिक वैशिष्ट्ये व हवामान यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विंध्याचल आणि सातपुडा पर्वतरांगा यांनी महाराष्ट्राला मध्य आणि उत्तर भारतापासून वेगळे केले आहे. मराठ्यांची मुख्य भूमी ही नर्मदा आणि कृष्णा नदी यांच्यामधील प्रदेशांत पश्चिम किनाऱ्यालगतचा दमण ते कारवारचा प्रदेश, वऱ्हाडचा प्रदेश, कोकण, गोदावरी नदीचे खोरे आणि कृष्णा नदीचे खोरे यांचा समावेश होतो. पश्चिमेकडे अरबी समुद्रामुळे महाराष्ट्र इतरांपासून तुटलेला आहे. तेव्हा हा पश्चिमेकडील समुद्र, पूर्वेकडील नापीक पठारी प्रदेश आणि इतर बाजूंना डोंगर यामुळे महाराष्ट्राला व येथील लोकांना सामान्यपणे बाहेरील आक्रमणांपासून संरक्षण मिळाले आहे.

शिवकालापर्यंत महाराष्ट्रात घडणाऱ्या राजकीय घडामोडींमध्ये मराठी माणसाला एकत्र आणण्याची कल्पना कधीच निर्माण झाली नाही. मराठी प्रदेश निरनिराळ्या मुसलमानी अधिपत्याखाली विभागलेला होता. मराठी माणसांवर मोगली परकीय सत्तेचे अत्याचार चालू होते. मोगलांच्या अत्याचाराने त्रस्त झालेल्या मराठी प्रजेची सुटका करण्यासाठीच जणू शिवाजी महाराजांचा जन्म झाला.

शिवाजी महाराजांचा जेथे जन्म झाला तो प्रदेश 'मावळचा प्रदेश' म्हणून ओळखला जातो. या प्रदेशात राहणारे कोळी आणि मावळे हे चांगले लढवय्ये म्हणून प्रसिद्ध होते. या सर्वांना शिवाजीने एकत्र करून मोगली जुलमी राजवटीविरोधात लढाया करण्यास सुरूवात केली. शिवाजी महाराजांनी आपल्या असामान्य व्यक्तिमत्त्वाने आणि पराक्रमाने एकेक किल्ले जिंकत मराठ्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण केले. अशा या स्वतंत्र मराठ्यांच्या राज्याच्या राजाचा राज्याभिषेक सोहळा मोठ्या थाटामाटात वैभवशाली पद्धतीने १६ जून १६७४ रोजी 'रायगड' येथे पार पाडला आणि त्यांनी यावेळी ''महाराजा छत्रपती'' हे बिरूद धारण केले. त्याचबरोबर त्यांनी यामधून एका सार्वभौम हिंदू राज्याच्या स्थापनेची उद्घोषणा केली. जे राज्य प्रामुख्याने औरंगजेबाच्या धार्मिक असहिष्णूतेच्या धोरणाची

प्रतिक्रिया म्हणून अस्तित्वात आले होते. या संधीचा उपयोग शिवाजी महाराजांनी मराठा शासन आणि प्रशासनाला आकार देण्यासाठी केला.[४] तर शिवाजी महाराजांच्या वारसांनी औरंगजेबाच्या बलाढ्य सेनेशी टक्कर देण्यात अनेक वर्षे घालविली. सातारचे छत्रपती नामधारी बनले व त्यांच्या नावाने हुकमत गाजवणाऱ्या पुण्याच्या पेशव्यांनी अटकेपार झेंडा लावला. उत्तरेकडच्या मोगलांच्या आणि दक्षिणेकडील मुसलमानांच्या दुहीचा फायदा घेऊन थोरल्या बाजीरावांनी दिल्लीचं तख्तं हादरवून टाकले. पण दिल्लीवर सत्ता मात्र प्रस्थापित केली नाही. दुसऱ्या पानिपतच्या युद्धातील पराभवानंतर मराठ्यांचे राज्य कधीच सावरले गेले नाही.

## १.३ इंग्रजी राजवट

पेशवाईच्या अस्तानंतर कंपनीच्या राजवटीत महाराष्ट्र हा विशाल 'मुंबई राज्याचा' भाग बनला. माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन हा त्याकाळी मुंबई राज्यात आयुक्त होता. नंतर तो गव्हर्नर बनला. त्यावेळी महाराष्ट्राची खानदेश, पुणे, अहमदनगर यासारख्या मोठ्या जिल्ह्यांत विभागणी करण्यात आली.[५]

या काळात ईस्ट इंडिया कंपनीच्या क्लाईव्ह व वॉरेन हेस्टिंग्ज या धूर्त व महत्त्वाकांक्षी अधिकाऱ्यांनी केवळ व्यापार करण्याच्या उद्देशाने हिंदुस्थानात येऊन इथल्या अस्थिर राजकीय परिस्थितीचा अन् मराठा व मोगल राज्यांच्या व सरदारांच्या आपआपसातल्या दुहीचा फायदा घेऊन इथल्या राजकारणात ढवळाढवळ करण्यास सुरूवात केली. पण मराठी माणसांनी यांच्या कुटनीतीला वेळोवेळी प्रखरतेने झुंज दिली. परंतु अखेर १८१८ ला पेशवाईचा अस्त होऊन हिंदुस्थानवर इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली अन् खंडित स्वरूपात असलेला हिंदुस्थान प्रथमच एकाच राजकीय सत्तेच्या अधिपत्याखाली आला. त्यावेळेला त्यांच्या देशात अनेक लहानमोठे सशस्त्र उठाव झाले. त्यापैकी सर्वात मोठा उठाव म्हणजे १८५७ चा क्रांतिकारक लढा होय. या लढ्यात मराठे सरदारांनी प्रामुख्याने भाग घेतला. ब्रिटीश साम्राज्य उलथवून टाकण्यासाठी जात, पात, धर्म, प्रांत हे सर्व भेदभाव विसरून लोक एकत्र आले. वासुदेव बळवंत फडके यांनी तर ३०० ब्राह्मण, महार, मांग, कोळी, मुसलमान यांना हाताशी धरून १८७९ च्या सुमारास सशस्त्र उठाव केला. पण यश आले

नाही. ब्रिटीशांनी हिंदुस्थानचे अनेक प्रदेश पादाक्रांत केले. स्वत:च्या राजकीय सोयीनुसार हिंदुस्थानचे विभाग पाडले. बंगालचा अपवाद सोडला तर इतर अनेक प्रांतात अनेक भाषांची खिचडी झाली.

इंग्रजांनी चालवलेली राजकीय दडपशाही, हिंदू लोकांना मिळणारी दुय्यम वागणूक, प्रशासनात हिंदू लोकांना पुरेसे प्रतिनिधीत्व न मिळणे, शेतकऱ्यांची दु:स्थिती यामुळे लोकांच्या मनात इंग्रजाविषयी असंतोष प्रकट होऊ लागला. या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी दादाभाई नौरोजी, डॉ. भाऊदाजी लाड, काशीनाथपंत तेलंग, फिरोजशहा मेहता, न्यायमूर्ती रानडे, गोपालकृष्ण गोखले, लोकमान्य टिळक यासारख्या महान व्यक्तिंनी संघटना उभ्या केल्या. लोकमान्य टिळकांनी तर 'केसरी' या वृत्तपत्रातून इंग्रजाकडून होत असलेले अन्याय, अत्याचार, कटकारस्थाने यांना वाचा फोडून हिंदुस्थानातील जनतेला एकत्र आणण्याचे काम केले. यापैकीच एक म्हणजे १८९४ सालचा 'सार्वजनिक गणेशोत्सव' होय. त्यानंतर १८९६ पासून गणेशोत्सवाबरोबरच शिवउत्सवास सुरूवात झाली. हे उत्सव खऱ्या अर्थाने मराठी भाषिकांच्या सांस्कृतिक जीवनाचे वैशिष्ट्य बनले.[६]

## १.४ बंगालची फाळणी

१६ ऑक्टोबर १९०५ रोजी हिंदुस्थानचा व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन याने बंगाल या एकभाषिक प्रांताची फाळणी केली. याला ब्रिटीशांची 'फोडा अन् झोडा' ही कूटनीती कारणीभूत ठरली. यावेळी सारा बंगाल पेटून उठला. संपूर्ण प्रांतात निषेधाच्या शेकडो सभा भरल्या. समान भाषा व संस्कृती याने हिंदू व मुस्लिम समाज बांधला गेला होता. त्यावेळी खऱ्या अर्थाने दोन्ही समाजांनी मिळून भाषेसाठी केलेला हा हिंदुस्थानातील पहिला लढा होता.

या फाळणीच्या निषेधार्थ टिळक पेटून उठले. टिळकांच्या जहाल राजकारणाला वेग आला होता. १९०५ – १९२० हा कालखंड म्हणजे टिळकांच्या जहाल नेतृत्वाचाच प्रभाव होता. हा कालखंड 'टिळकयुग' म्हणून ओळखला जात होता. १९०६ साली टिळकांनी बनारस काँग्रेसपुढे आपली स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य यांची सांगड घातलेले 'राष्ट्रीय शिक्षण' हे मातृभाषेतून दिले पाहिजे, सरकारी कामकाज त्या त्या मातृभाषेतून चालले पाहिजे, त्यासाठी त्या भाषेचे राज्य – स्वराज्य असले पाहिजे असे टिळकांनी आवर्जून सांगितले. टिळकांचे त्यावेळचे हे

विचार म्हणजे एकभाषी राज्याची पूर्वसूत्रीच होती, तर काँग्रेसअंतर्गत 'काँग्रेस डेमॉक्रॅटिक पार्टी' या पक्षाच्या जाहीरनाम्याच्या मसुद्यात 'भारतासाठी एक राष्ट्रभाषा विकसित करावी आणि हिंदुस्थानातील प्रांतांची 'भाषेच्या आधारावर पुनर्रचना करावी' अशी सूचना करण्यात आली आहे.[७]

१९२० मध्ये टिळकांच्या मृत्यूनंतर 'राष्ट्रीय सभेची' स्वातंत्र्यलढ्याची सूत्रे ही गांधीजींच्या हाती आली. १९२० ची असहकाराची चळवळ १९३० चे सविनय कायदेभंग आंदोलन, १९४० चे वैयक्तिक सत्याग्रहाचे सत्र व १९४२ ची 'चले जाव' ची चळवळ हे मोठे लढे गांधीजींच्या नेतृत्वाखालीच लढले गेले. भारतीय स्वातंत्र्यलढ्याची चळवळ सुरू असतानाच भारतामध्ये ब्रिटीश राजवटीतच भाषावार प्रांतरचनेची बीजे रुजू लागली होती.

## १.५ कलकत्ता काँग्रेस

डॉ. सीतारामय्या यांनी १९१७ साली कलकत्ता अधिवेशनात आंध्रचा प्रांत स्वतंत्र करण्याचा ठराव मांडला. तो काँग्रेसने संमत केला आणि काँग्रेसची फेरउभारणी भाषा या तत्त्वावर केली. त्याचा परिणाम काँग्रेस प्रत्येक राज्यात प्रांतिक भाषेच्या मदतीने पोहचली. १० ऑगस्ट १९२८ रोजी 'नेहरू कमिशनने' अहवाल सादर केला. त्यामध्ये 'वर्कर्स ॲन्ड पीझन्ट पार्टी पक्षाने' भाषावार राज्याची मागणी करून महाराष्ट्र प्रांताची मागणी नेहरूंकडे केली.

## १.६ पूर्व बंगाल व आसाम

भारतात राज्यपुनर्रचना घडवून आणण्यामागे एक विकसित होत गेलेली प्रक्रिया असून, ती काही ऐतिहासिक कारणांमधून निर्माण झाली आहे. जेव्हा हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलने आसामच्या चीफ कमिशनरच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली असलेला प्रदेश आणि फोर्ट विल्यम इलाक्यातील बंगाल डिव्हीजनचा एक भाग असणारे काही जिल्हे यांचा समावेश असणारा पूर्व बंगाल व आसाम प्रांत ऑक्टोबर १९०५ मध्ये निर्माण केला. तेव्हा म्हणजेच या शतकाच्या प्रारंभी या प्रक्रियेला सुरुवात झाली असल्याचे दिसून येते. याचवेळी गव्हर्नर जनरलने असेही घोषित केले होते की, मध्यप्रांताचा एक भाग असलेला एक संबळपूर जिल्हा (चंद्रपूर–पदमपूर जमिनदारी आणि फुलझार जमिनदारी सोडून) फोर्ट विल्यम इलाक्यातील बंगाल डिव्हीजनमध्ये समाविष्ट करण्यात

आला आहे. पूर्व बंगाल आणि आसाम हा नवीन प्रांत राजकीय कारणांमुळे निर्माण करण्यात आला होता. तरी मध्यप्रांतातील काही ओरिसा भाषिक प्रदेश बंगालमध्ये घालताना भाषिक तत्त्वांचा आधार घेण्यात आला होता.[८]

सात वर्षानंतर बंगालची फाळणी रद्द करण्यात आली आणि बंगाल, बिहार व ओरिसा आणि आसाम असे नवीन प्रांत स्थापन करण्यात आले. ओरिसाखेरीज इतर प्रांतांचे पुनर्रवाटप भाषिक तत्त्वांवर करण्यात आले होते. प्रांताचे पुनर्रवाटप करण्याच्या प्रश्नावर विचार करण्यास नेमलेल्या 'नेहरू समितीने' १९२८ मध्ये भाषावार प्रांतारचनेला मान्यता दिली. ओरिसा प्रांत निर्माण करण्यासाठी १९३१ मध्ये भारत सरकारने नेमलेल्या 'ओडोनेल समितीनेही' इतर घटकांबरोबर भाषेचाही विचार केला होता. राज्यकारभाराच्या दृष्टीने सोयीस्कर स्वायत्त प्रांत, त्याचे स्वरूप कसे असावे म्हणजे कोणत्या तत्त्वावर त्याची रचना करावी यासाठी १९२१ चा काँग्रेस ठराव, नेहरू कमिशन व सायमन कमिशन यांच्या शिफारशी या सर्वांनी भारतीय प्रांतांची राज्यघटक या नात्याची रचना 'भौगोलिक, आर्थिक व मुख्यत: लोकेच्छेला धरून भाषातत्त्वावर' व्हावी असे सांगितले होते.

ब्रिटीश राज्यकर्त्यांनी प्रथमत: केलेली प्रांतरचना त्यांच्या प्रशासनाचाच विचार करून केली होती. इतर गोष्टी म्हणजेच भौगोलिक सलगता, एकच भाषा, वंश, संस्कृती यांचा फारसा विचार झालेला नव्हता. अशी प्रांतरचना बदलली पाहिजे असा विचार ब्रिटीश राज्यकर्त्यांमध्ये २० व्या शतकाच्या सुरूवातीस सुरू झाल्याचे दिसले. उदाहरणार्थ, लॉर्ड हॉर्डिंज यांनी १९११ मध्ये यासंदर्भात आपले मत असे स्पष्ट केले आहे. ''बंगाल प्रांतातील हिंदी बोलणाऱ्या लोकांचा राज्यव्यवस्थेच्या दृष्टीने बंगाल्यांपासून त्यांना फोडून त्यांचा एक अलग प्रांत करणे अत्यंत जरूर आहे. आजपर्यंत यामुळे हिंदी बोलणाऱ्यांची कुचंबणा झाली आहे.'' असे मत प्रदर्शित करून हॉर्डिज पुढे म्हणतो, ''हिंदी लोकांना आपली उन्नती करून घेण्यासाठी ज्या सवलती देणे आवश्यक आहे त्यातील सर्वात जास्त महत्त्वाची सवलत म्हणजे त्यांच्यामध्ये स्थानिक देशाभिमान जागृत करणे ही

होय. हे उद्दिष्ट साधण्यासाठी वंश आणि भाषा या पायावर नवीन नकाशे तयार करवून त्याप्रमाणे प्रांतरचना केली पाहिजे.[९]

माँटेग्यू–चेम्सफोर्ड रिपोर्टमध्ये भाषावार प्रांतरचनेचे महत्त्व पुढील शब्दात स्पष्ट केले आहे. राज्यकारभारासाठी पाडलेले विभाग आकाराने लहान व एकभाषिकांचे व एका वंशाच्या लोकांचे असे जर बनविण्यात आले असते तर राज्यकारभाराच्या दृष्टीने सरकारचे काम बरेच सुलभ झाले असते ही गोष्ट नि:संशय खरी आहे.

## १.७ संयुक्त महाराष्ट्र

इंग्रजाविरूद्ध स्वातंत्र्यासाठी लढत असतानाच स्वातंत्र्यानंतर देशातील प्रांतरचना कशी असावी याबाबत लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, मोतीलाल नेहरू यासारख्या नेत्यांनी वेळोवेळी भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार केला होता. मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य असावे अशी पहिली मागणी सांगलीचे शंकर रामचंद्र शेंडे यांनी १९३३ च्या नागपूर साहित्य संमेलनात केली होती. तर दत्तो वामन पोतदार यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणी संदर्भात 'महाराष्ट्राचा एक सुभा करा' या शीर्षकांच्या १९३८ सालच्या लेखात म्हटले आहे, ''मुंबई महाराष्ट्र, गोमंतकी महाराष्ट्र, निजामी महाराष्ट्र, विदर्भी महाराष्ट्र, मध्यप्रांती महाराष्ट्र व वसाहती महाराष्ट्र असा महाराष्ट्र सहा ठिकाणी वाटला गेला आहे. काशी, बडोदे, इंदूर, धार, देवास, उज्जमिनी प्रभृती स्थळी बराच महाराष्ट्रीय समाज आहे, तसाच कराचीसही आहे. या समाजाला प्रत्यक्ष प्रांतकक्षेत वाव मिळणे अर्थातच शक्य नाही.''

## १.८ संयुक्त महाराष्ट्राची मागणी

सर्व मराठी भाषिक प्रदेश आणि जनतेचे एकत्रीकरण करून त्यांचे 'संयुक्त महाराष्ट्र राज्य' स्थापन करावे अशी मागणी स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून होती. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली १९३७ साली मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषिकांच्या महाराष्ट्र राज्याची मागणी करण्यात आली.

तसेच १५ ऑक्टोबर १९३८ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाने 'वऱ्हाडसह महाराष्ट्राचा एकभाषी प्रांत त्वरित बनवावा', अशी मागणी केली होती. त्यानंतर लगेचच १९३९ मध्ये नगर येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात या मागणीचा पुनरूच्चार करण्यात आला आणि मराठी भाषा प्रदेशांचा मिळून जो प्रांत बनेल त्याला 'संयुक्त महाराष्ट्र' असे नाव देण्यात यावे, येथे प्रथमच 'संयुक्त महाराष्ट्र' हा शब्दप्रयोग वापरण्यात आला.[१०]

## १.९ संयुक्त महाराष्ट्र सभा

१९४० साली श्री. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे 'संयुक्त महाराष्ट्र सभा' ही संघटना स्थापन झाली तर २४ मे १९४० रोजी डॉ. तु. ज. केदार यांच्या नेतृत्वाखाली 'महाराष्ट्र एकीकरण परिषद' भरविण्यात आली तर १९४३ साली मुंबई येथे भरलेल्या मराठी पत्रकार परिषदेत ज. स. करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली 'स्वतंत्र विदर्भ राज्याची' मागणी व 'संयुक्त महाराष्ट्र सभेची महाराष्ट्र निर्मितीची मागणी' असे दोन ठराव मंजूर करण्यात आले. त्याचवर्षी अमरावती येथे डॉ. मुकुंद जयकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या महाविदर्भ परिषदेत महाविदर्भ राज्याच्या मागणीचा पुनरूच्चार करण्यात आला. त्याचबरोबर महाराष्ट्र एकीकरणास सहकार्यही करण्याचा ठराव मान्य करण्यात आला. हा महाविदर्भाच्या मागणीचा ठराव महाराष्ट्र एकीकरणास पूरक होता. कारण या ठरावात असे म्हटले होते की, 'अमरावती, अकोला, नागपूर, भंडारा व चांदा यांच्या सरहद्दीवरील मराठी भाषिक भाग तसेच सिंदवाडा, बैतुल, खांडवा, बालाघाट या हिंदी भाषिक भागातील मराठी भाषिक भाग त्या त्या जिल्ह्यातून वेगळा करून तो सलग मराठी भाषिक प्रदेशात घालावा.'

## १.१० बेळगाव मराठी साहित्य संमेलन

१२ मे १९४६ रोजी बेळगाव येथे गजाननराव त्र्यंबक माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र साहित्य संमेलन भरले. संयुक्त महाराष्ट्राचे ते पुरस्कर्ते असल्याने या अध्यक्षपदाचा फायदा घेऊन त्यांनी 'लालित्य', 'साहित्य' यांच्या विवेचनाच्या पारंपरिक चाकोरीला फाटा देऊन, काळाचे औचित्य लक्षात घेऊन त्यांनी 'महाराष्ट्र एकीकरणावर' भर दिला व आपले संबंध भाषण संयुक्त महाराष्ट्राच्या महामंगल घोषाने महत्तम करून टाकले. या संमेलनात 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन

करण्यात आली. या समितीत सर्वश्री दत्तो वामन पोतदार, शंकरराव देव, केशवराव जेधे, श्री. शं. नेवरे व ग. त्र्यं. माडखोलकर (समितीचे आमंत्रक) हे या समितीचे सदस्य होते. बेळगावच्या या साहित्य संमेलनात पुढील महत्त्वाचे दोन ठराव मंजूर करण्यात आले.

१. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होईपर्यंतच्या काळात ''भाषिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नती होण्यासाठी'' हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा तसेच गोमंतक या प्रदेशांना 'संपूर्ण प्रादेशिक स्वायत्तता' असावी.

२. संयुक्त महाराष्ट्राचे संयोजन व प्रांतरचना यांचा विचार करताना त्यांच्या चतु:सीमेवरील बेळगाव, कारवार, गुलबर्गा, आदिलाबाद, बिदर, छिंदवाडा, बालाघाट, बैनूर, निमाळ वगैरे जिल्ह्यात 'मिश्र वस्ती' त्यातील कायम रहिवासी जनतेच्या मताचा कौल खेडेवार प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने घेऊन तो भाग कोणत्या प्रांतात घालावयाचे ते ठरवावे.[११] समिती स्थापन झाल्याबरोबरच पंधरा दिवसातच समितीची पहिली सभा २६ मे १९४६ रोजी पुणे येथे भरली आणि मुंबईमध्ये दोन महिन्याच्या आत परिषद बोलाविण्याचा ठराव केला.

## १.११ संयुक्त महाराष्ट्र परिषद

१९४६ साली शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती' करण्याच्या उद्देशाने 'संयुक्त महाराष्ट्र परिषद' स्थापन करण्यात आली होती. ही परिषद १९५५ पर्यंत कार्यरत होती. या परिषदेने मुंबईसह महाराष्ट्र, सीमाप्रश्न, भाषिक अल्पसंख्याक यासंबंधीच्या अनेक ठरावांचा पाठपुरावा केला होता. त्याचबरोबर या परिषदेसमोर अनेक उद्देश होते. त्यामध्ये

१. भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार महाराष्ट्रात जे अजून मराठी भाषिकांचे स्वतंत्र प्रदेश समाविष्ट झालेले नाहीत त्यांना महाराष्ट्र राज्यात जोडून घेणे.

२. लोकशाही व समाजवादी महाराष्ट्र प्रस्थापित करणे.

३. राजकीय, आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित करून महाराष्ट्राच्या समाजजीवनाची सहकारी तत्त्वावर उभारणी करणे.

४. संयुक्त महाराष्ट्र परिषदेने पुरस्कृत केलेला कार्यक्रम राबविणे.

तर २८ जुलै १९४६ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र एकीकरण परिषद भरली. या परिषदेत पुढील ठराव मंजूर करण्यात आले.

१. सर्व सलग मराठी भाषिक प्रदेशांचा एक प्रांत त्वरित स्थापन करणे.

२. मराठी प्रदेशातील ब्रिटीश मुंबई, ब्रिटीश वऱ्हाड, हैद्राबाद आणि पोर्तुगीज अंमलाखालील गोमंतक अशा मराठी भाषिक तुटक विभागांचा विचार करणे.[१२]

## १.१२ दार कमिशन

भाषावार प्रांतरचनेला काँग्रेस आणि काँग्रेसेत्तर पक्षांनी 'नेहरू अहवालात' एकमुखी संमती दिली. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यपूर्वकाळात काँग्रेस अंतर्गत नेमस्त, जहाल, सर्वोदयवादी, समाजवादी, प्रतियोगवादी, क्रांतिकारी आदी सर्व प्रवृत्तींच्या गटांनी आणि पक्षांनी भाषावार प्रांतरचनेला निरपराध पाठिंबा दिला. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाल्यानंतर 'सार्वभौम घटना परिषदे'त घटकराज्याचा प्रश्न उपस्थित झाला. पंतप्रधान पंडित नेहरूंनी 'भाषावार प्रादेशिक पुनर्घटना हे आपल्या सरकारचे ब्रीद आहे' अशी घोषणा परिषदेत केली आणि घटनेला अनुसरूनच परिषदेने भाषावार प्रांतरचनेचा आराखडा तयार करण्यासाठी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली ७ जून १९४८ रोजी 'दार आयोगा'ची स्थापना केली. या आयोगाला सहाय्य करण्यासाठी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, वऱ्हाड, कर्नाटक, आंध्र, तामिळनाडू आणि केरळ या प्रांतांच्या प्रतिनिधींची समिती नेमण्यात आली.[१३] या समितीने आपल्या अहवालामध्ये भाषावार प्रांतरचनेची कल्पनाच फेटाळून लावली. याच्याहीपुढे जाऊन भाषावार प्रांतरचना ही राष्ट्राचा घात करणारी आहे असा एकदम निर्णय घेऊन तिला कायमची मूठमाती देऊन टाकली. तर याच 'दार कमिशनने' संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीबद्दल विषारी फुत्कार काढले. त्यामध्ये, 'मराठी भाषेचा सलग राज्यघटक निर्माण करण्यास भारतीय संघराज्याच्या सुरक्षितपणाला धोका आहे' असे नमूद केले.

दार कमिशनकडून मराठी भाषिकांना ज्या अपेक्षा होत्या त्या अपेक्षा कधीच गळून पडल्या. सगळीकडून कडाडून विरोधच होत राहिला. मराठी भाषिकांनी तर महाराष्ट्राचे दुश्मन 'दार आयोग' या शब्दात टीका केली. अखेर महाराष्ट्र काँगेस कमिटीने या अहवालाचा निषेध केला आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य ताबडतोब बनविण्यात यावे असा ठराव मंजूर केला.

## १.१३ जेव्हीपी समिती

८ ऑगस्ट १९४७ रोजी दार कमिशनसमोर महाराष्ट्राची मागणी मांडणे आणि वऱ्हाड नागपूरच्या मनात संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसंदर्भात कोणतीही शंका नाही हे दाखविण्यासाठी अकोला करार करण्यात आला. त्यावर १७ प्रमुख नेत्यांच्या स्वाक्षऱ्या होत्या. यामध्ये जर संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करणे अशक्य झाले तर असा करार झालेला आहे की, आमचेकडून महाविदर्भ हा स्वतंत्र प्रांत निर्माण करण्याचे सर्व प्रयत्न करण्यात येतील. हा करार म्हणजे 'गनिमी कावा' पद्धतीचा करार होता.

भाषावार प्रांतरचना प्रत्यक्षात यायची असेल तर महात्मा गांधी, पंडित नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेलांच्या भूमिकेत वेगळेपणाच नव्हे तर परस्परविरोधही होता. गांधीजी चालवत असलेल्या 'हरिजन'च्या ३० नोव्हेंबर १९४७ च्या अंकात श्रीमन्नारायण अग्रवाल यांच्या पत्रात 'प्रांताची भाषावार पुनर्रचना करणे' सुराज्य स्थापनेसाठी आवश्यक असल्याचे काँग्रेस १९२० पासून म्हणत आली असल्याची आठवण त्यांनी करून दिली आणि भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न संविधान सभेनेही खुंटीवर टांगून ठेवल्याबद्दल टीकाही केली. या पत्रात काही महत्त्वाचे मुद्दे नमूद केले आहेत. भाषावार प्रांतरचना केल्याशिवाय शाळांतून व महाविद्यालयातून त्या त्या प्रांतिय भाषेत शिक्षण देणे शक्य होणार नाही. त्याशिवाय इंग्रजी भाषेने बेकायदेशीररित्या बळकावलेल्या स्थानांवरून तिला हटवताही येणार नाही. भाषावार प्रांतरचना करण्यात दिरंगाई केल्यास आंतरप्रांतीय हेवेदावे वाढतील. हा प्रश्न सोडवण्यास उशीर झाल्यास त्याचे दुष्परिणाम होतील. जे करणे योग्य आहे ते विनाविलंब केले जावे या श्रीमन्नारायण यांच्या सूचनेला पुष्टी देत गांधीजीनी लिहिले, ''कोणत्याही दृष्टीकोनातून पाहिले तरी प्रांतांची पुनर्रचना भाषावार करणे इष्ट असल्यामुळे दिरंगाई करणे टाळावे.

मात्र सभोवतालचे वातावरण मन खिन्न करणारे असताना प्रांतांची पुनर्रचना भाषेच्या आधारे करण्यास काहीजण नाखूष असतील तर तेही कदाचित समर्थनीय ठरते.'' असेही गांधीजींनी म्हटले आहे.[१४]

यावरून गांधीजींची भाषावार प्रांतरचनेविषयी ठाम भूमिका होती असे म्हणता येणार नाही.

दार आयोगाचा अहवाल काँग्रेसने अमान्य केल्याने भाषावार प्रांतरचनेसंदर्भात पुन्हा विचार करण्यासाठी जयपूर काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष पट्टाभी सीतारामय्या, जयरामदास दौलतराम, नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल या तिघांची मिळून समिती नेमली. या समितीतील सदस्यांच्या नावाच्या अध्याक्षरावरून जयरामदास दौलतराम, वल्लभभाई पटेल व पट्टाभी सीताराम कमिटीला जेव्हीपी कमिटी असे संबोधण्यात येते.

जे. व्ही. पी. समितीने आपल्या अहवालात पुढील शिफारशी केल्या.

१. भाषावार प्रांतरचना करणे काँग्रेसला तत्त्वत: मान्य आहे, पण तसे करण्याची आजची वेळ नाही, तसे करणे शक्य झाल्यास आंध्र प्रांत निर्माण केला जाईल.

२. कर्नाटकाविषयी आम्हाला सहानुभूती असून मधल्या अडचणींचे निवारण होताच तो प्रांत बनेल.

३. श्रावणकोर, कोचीनचा मिळून केरळ प्रांत निर्माण केला जाईल.

४. मराठी भाषिकांना महाराष्ट्र प्रांत पाहिजेच असेल तर तो यथावकाश होईल, परंतु त्यात मुंबईचा समावेश होणार नाही.

५. एकट्या वऱ्हाड प्रदेशाचा स्वतंत्र प्रांत होणार नाही.

या समितीने १९४९ मध्ये निर्णय दिला. त्यामध्ये, ''भाषावार प्रांतरचना ही योजना देशाच्या राजकीय प्रगतीत भयंकर अडथळे उत्पन्न करणारी आहे. सध्याच्या परिस्थितीत या योजनेची अंमलबजावणी करणे राष्ट्रहिताचे होणार नाही. देशात सध्या फुटीरपणाची, विघटनेची वृत्ती बळावत आहे. अशावेळी जर भाषावार योजना आपण आणली तर आत्यंतिक त्याग आणि पराक्रम करून मिळविलेले स्वातंत्र्य आपणास गमावण्याची पाळी येईल. शांततेचा नि स्थिरतेचा काळ येऊ दया – मग नवीन सरहद्दी आणि नवीन प्रांत आपण बनवू.''

जे. व्ही. पी. समितीकडून महाराष्ट्रीयांच्या काही अपेक्षा होत्या. पण त्या अपेक्षांचा भंग झाला. या समितीने आपल्या अहवालात, 'स्वतंत्र महाराष्ट्राचा विचार सध्या नको, पुढे बघू. पण स्वतंत्र महाराष्ट्र जरी झाला तरी त्यात मुंबईचा समावेश मात्र कदापि होणार नाही' यावर 'नवयुग'मधून आचार्य अत्रे यांनी या खोडसाळ निर्णयाचे वाभाडे काढले. ''मुंबई हा महाराष्ट्राचा जीव की प्राण आहे. तो गमवायला महाराष्ट्र कधीही तयार होणार नाही. मुंबई शहर भांडवल्यांच्या घशात घालून महाराष्ट्र आपले स्वातंत्र्य विकत घेऊ इच्छित नाही. मुंबई हे महाराष्ट्राच्या कपाळाचे कुंकू आहे. वैधव्य पतकरल्यावाचून जर महाराष्ट्राला स्वातंत्र्य मिळणार नसेल तर आग लागो त्या तसल्या अमंगळ स्वातंत्र्याला!''[१५]

८ ऑक्टोबर १९४९ रोजी जे. व्ही. पी. समितीच्या निर्णयानुसार तेलंगणाशिवाय आंध्रराज्य स्थापन करण्याचा निर्णय काँग्रेस वर्किंग कमिटीने घेतला. त्याचदरम्यान वर्किंग कमिटीने महाराष्ट्र काँग्रेस व कर्नाटक काँग्रेस आपसातील सीमावाद मिटवून नव्या राज्यांच्या निर्मितीला तयार आहात काय अशी विचारणा करण्यात आली. कारवार, बेळगाव, निपाणी, संकेश्वर, जत, चंदगड, शहापूर, खानापूर, इचलकंरजी, मिरज, कुरूंदवाड, गडहिंग्लज, हल्याळ, मंगळवेढे, सोलापूर, अक्कलकोट अशा १६ गावासंबंधीचा सीमावाद सोडवून संयुक्त महाराष्ट्र राज्य (मुंबई वगळून) निर्माण करण्यास पाचारण करण्यात आले. परंतु यासंबंधी कोणतीही तडजोड न होता सीमावादाचे घोंगडे भिजत पडले, ते आजतागायत तसेच आहे.[१६]

यानंतर अनेकवेळा यासंदर्भात अधिवेशने, परिषदा, ठराव केले. पण संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा प्रश्न सुटला नाही.

## १.१४ नागपूर करार

'नागपूर करार' म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अत्यंत महत्त्वाची घटना होय. या करारामुळे 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र' या घोषणेने चळवळीस संपूर्ण महाराष्ट्राचा एकमुखी पाठिंबा मिळाला. महाराष्ट्रातील निरनिराळ्या प्रदेशांचा मागासलेपणा विचारात घेऊन त्या प्रदेशांच्या सर्वांगीण विकासावर जास्तीत जास्त भर दिला जाईल असे स्पष्ट करणारा मूलभूत स्वरूपाचा करार करावा ही

नागपूर कराराच्या निर्मितीमागील भूमिका होती आणि त्यातूनच नागपूर करार अस्तित्वात आला. मध्यप्रदेशातील काँग्रेस नेत्यांबरोबर शंकरराव देव, भाऊसाहेब हिरे इ. नी वाटाघाटी करून २८ सप्टेंबर १९५३ रोजी नागपूर करार घडवून आणला.[१७] ''त्यात मुंबई, मध्यप्रदेश व हैद्राबाद राज्यातील सर्व सलग मराठी भाषिक लोकांचे राज्य बनवण्यात यावे. मुंबई ही त्याची राजधानी राहील.'' असे महत्त्वाचे कलम होते. करारावर विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील स. का. पाटील, भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, रामराव देशमुख, शेषराव वानखेडे, पी. आर. देशमुख, देवकीनंदन नारायण, पंढरीनाथ पाटील, गोपाळराव खेडकर आणि नानासाहेब कुंटे या काँग्रेस नेत्यानीच सह्या केलेल्या होत्या.[१८]

## १.१५ राज्य पुनर्रचना आयोग

भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाची कोंडी फुटली ती आंध्रप्रदेशातील श्री. पोट्टी श्रीरामूल्लू या गांधीवादी कार्यकर्त्याने आंध्रप्रदेशाच्या मागणीसाठी ५८ दिवसांचे उपोषण केले व त्यातच ते मरण पावले. त्यांच्या निधनानंतर मद्रास राज्याच्या तेलगू भाषिक विभागात दंगली उसळल्या. अखेर आंध्रराज्याच्या निर्मितीबाबत पंतप्रधान जवाहरलाल नेहरूनी १९ डिसेंबर १९५२ रोजी लोकसभेत निवेदन केले आणि १ ऑक्टोबर १९५३ रोजी आंध्रप्रदेश राज्याची निर्मिती झाली. आंध्र राज्याची स्थापना झाल्यानंतर भारत सरकारने भारतीय संघराज्यातील राज्यांच्या पुनर्रचनेच्या संपूर्ण प्रश्नांचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याकरिता 'राज्य पुनर्रचना आयोगाची' नियुक्ती २२ डिसेंबर १९५३ रोजी न्यायमूर्ती फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली केली. या आयोगात राज्यसभेचे सदस्य पं. ह्दयनाथ कुंझरू आणि भारताचे इजिप्तमधील राजदूत कवलव माधव पण्णीकर हे दोन सदस्य नियुक्त करण्यात आले होते.

आयोगाची नियुक्ती झाल्यावर दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षेतेखाली काँग्रेस प्रक्षासह सर्वपक्षीय अशी संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन झाली होती. तिने राज्यरचना प्रश्नाचा व्यापक दृष्टीने विचार करून आपल्या सूत्राचा अवलंब करावा हे सुचविले होते. त्यांचे सूत्र केवळ महाराष्ट्रापुरते नव्हते तर भाषिक राज्ये बनविताना ते सर्व ठिकाणी लागू करावे असे त्यांचे म्हणणे होते. भाषिक राज्ये

निर्माण केली तरी प्रत्येक राज्यात प्रादेशिक भाषेखेरीज दुसरी भाषा बोलणारे लोक राहणारच, परंतु ते जितके कमी राहतील तितके श्रेयस्कर, त्यासाठी खेडे हे घटक, भाषिक बहुसंख्या आणि सलगता हे निकष वापरून सीमारेषा काढल्या तर ते युक्त होईल. या सूत्रासच 'पाटसकर सूत्र' म्हणून संबोधले गेले. सीमा आखताना हेच सूत्र वापरणे शास्त्रशुद्ध ठरेल आणि मग हितसंबंधीयांचे दबाव तापदायक ठरणार नाहीत.[१८]

३० सप्टेंबर १९५५ रोजी बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकी यांचा समावेश म्हैसूर (कर्नाटक) करणारा आणि मुंबई द्विभाषिक राज्याची निर्मिती करणारा राज्यपुनर्रचना समितीचा अहवाल केंद्र सरकारला सादर केला. १६ जानेवारी १९५६ रोजी राज्यपुनर्रचना समितीच्या शिफारशी स्वीकारल्याचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आकाशवाणीवरून जाहीर केले त्यामुळे सीमाभागात संतापाचा उद्रेक झाला. १ नोव्हेंबर १९५६ रोजी मराठी भाषिकांच्या सीमाभागासह म्हैसूर राज्याची स्थापना झाली.

## १.१६ महाद्विभाषिक राज्याचा निर्णय

९ ऑगस्ट १९५६ रोजी संसदेने महाद्विभाषिक राज्याचा कायदा पास केला. महाराष्ट्र आणि गुजरात यांच्या इच्छेविरूद्ध महाद्विभाषिक राज्य लादण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्र आणि गुजरात दोन्ही राज्यात महाद्विभाषिक राज्याविरोधी उग्र व भयंकर स्वरूपाची निदर्शने सुरू झाली. महाराष्ट्रामध्ये 'संयुक्त महाराष्ट्र समिती'ने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे नेतृत्व केले. मुंबई द्विभाषिक राज्य निर्माण करण्याच्या निर्णयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढील मत मांडले. ''एक राज्य, एक भाषा हे देशकालातीत तत्त्व असून ते वेळोवेळी वापरलं गेलं आहे. आणि जेव्हा ते पाळलं गेलं नाही तेव्हा काय होतं याचं उदाहरण जुन्या ऑस्ट्रीयन किंवा तुर्क साम्राज्यामध्ये मिळते. ते म्हणतात,

The present state of Bombay is the best illustration of the failure of democracy in a mixed state. I am amazed at the suggestion made by the State Reorganization Commission that the present Bombay State should be continued as it is to enable us to gain experience of how a mixed state flourishes. With Bombay as a mixed state for the last 20 years, with the intense enmity between the Maharashtyrians and Gujaratis, only a

thoughtless or an absent minded person could put forth such a senseless proposal.[20]

## १.१७ संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती

६ फेब्रुवारी १९५६ रोजी पुणे येथील टिळक स्मारक मंदिरात केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त महाराष्ट्र समितीची' स्थापना झाली. नागपूर ते गोवा या सर्व मराठी भाषा प्रदेशातून सुमारे ३०० कार्यकर्ते आले होते. डॉ. धनंजय गाडगीळ, दा. वि. गोखले, य. कृ. सोवनी ही त्यामध्ये प्रमुख माणसे होती. एस. एम. जोशी हे मेळाव्याचे निमंत्रक होते. बॅ. जयकर, शंकरराव किर्लोस्कर यांचे सुयश चिंतणारे संदेश आले होते. ''मुंबई, विदर्भ, मराठवाडा, बेळगाव, कारवार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झालाच पाहिजे.'' या निर्धाराने संयुक्त महाराष्ट्र समितीने आपल्या कार्याला सुरूवात केली. या समितीत प्रजासमाजवादी पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, लाल निशाण गट, लोहियावादी गट, हिंदू महासभा इ. विरोधी राजकीय पक्ष त्यात सामील झाले होते.[२१]

साथी एस. एस. जोशी (संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस), भाई श्रीपाद अमृत डांगे, सेनापती बापट, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, क्रांतिसिंह नाना पाटील, ना. ग. गोरे, लालजी पेंडसे, डॉ. त्र्यं. श. नरवणे, दाजिबा देसाई, दादासाहेब गायकवाड, जयंतराव टिळक, यशवंतराव मोहिते, केशवराव जेधे, उद्धवराव पाटील, भाऊसाहेब राऊत, माधवराव बागल, नौशीर भरूचा, बी. टी. रणदिवे, आचार्य दोंदे, दत्ता देशमुख, आनंदराव चव्हाण, दि. ना. पाटील, रघुनाथराव खाडिलकर, अप्पा पेंडसे, चिंतामणराव देशमुख, कॉ. अहिल्याबाई रांगणेकर, कोल्हटकर, रेड्डी पती–पत्नी, दुर्गा भागवत इ. नेत्यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीला नेतृत्व आणि समर्थन लाभले होते. विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि जनता असा संपूर्ण मराठी भाषिक समाज संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या आंदोलनात समाविष्ट करून घेण्याचे अलौकिक, अनन्यसाधारण कार्य या नेत्यांनी केलेले आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या कार्यात काही नियतकालिके व वृत्तपत्रे यांचे योगदान मोलाचे होते. केशव सीताराम ठाकरे यांचे 'प्रबोधन', आचार्य अत्रे यांचे 'नवयुग'

आणि 'मराठा' आणि वालचंद कोठारींचा 'प्रभात' ही नियतकालिके व वृत्तपत्रे संयुक्त महाराष्ट्र समितीची मुखपत्रे म्हणून काम करीत होती.

या सर्वांमुळेच संयुक्त महाराष्ट्राचा लढा पेटला. मोर्चा, घेराव, अश्रूधूर, आंदोलने, १०५ हुतात्म्यांचे बलिदान आणि ग्रामपंचायती ते लोकसभेच्या निवडणूका या सर्व मार्गांनी लढा पेटत राहिला. सर्वत्र मराठी जनसागर उसळत होता, गर्जत होता व आक्राळविक्राळ रूपही धारण करीत होता. त्यामुळेच शेवटी २८ मार्च १९६० रोजी लोकसभेत द्वैभाषिक भंगाचे विधेयक मांडण्यात आले आणि ते चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले. यावेळी महाराष्ट्र–कर्नाटक, महाराष्ट्र–आंध्रप्रदेश यांच्या सीमेवरील प्रदेशापैकी बहुसंख्य मराठी भाषिक असलेला प्रदेश महाराष्ट्रात यावा म्हणून संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांनी आणि एस. एम. जोशींनी खूप प्रयत्न केले. पण त्यांना यश आले नाही. २१ एप्रिल १९६० रोजी लोकसभेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे विधेयक संमत झाले. २३ एप्रिल १९६० रोजी राज्यसभेने या विधेयकास मान्यता दिली आणि अखेर मराठी जनतेचे स्वप्न साकार झाले. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. या ऐतिहासिक क्षणी पंतप्रधानांचे आभार मानताना मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणाले, ''भारत राहिला तरच महाराष्ट्र राहणार आहे. भारताचे प्रतिक सह्याद्री आहे. हिमालयावर संकट आले तर त्याच्या संरक्षणासाठी हा सह्याद्री काळ्या फत्तराची छाती पुढे करून पुढे येईल याची मी पंतप्रधानांना खात्री देतो.''[२२]

त्या दिवशी संपूर्ण महाराष्ट्र आनंदात न्हावून गेला. 'महाराष्ट्र' या नावाने प्रचंड हलकल्लोळ उडवून दिला. लोक आनंदाने बेहोश आणि बेभान झाले. त्या सायंकाळी श्री. सिलम यांच्या अध्यक्षतेखाली व वसंत देसाई यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे 'मंगलाचरण' सुरू झाले. लता मंगेशकर यांनी 'यदा यदाहि धर्मस्य गानिर्भवति भारत' हा गीतामंत्र व 'माझा मराठिचा बोल कौतुके' ही ज्ञानेश्वरीतील ओवी म्हटली. तर लता–उषा आणि मीना मंगेशकर या भगिनींनी 'बहु असोत सुंदर संपन्न की महा' हे महाराष्ट्र गीत गावून हा 'महाराष्ट्र दिन' सोन्याचा दिवस म्हणून साजरा केला.

## ब) सीमावाद

## १.१८ सीमावाद

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तरी डांग जिल्हा गुजरातमध्ये घालण्यात आला. तसेच बेळगाव, कारवार, बिदर, भालकीसह ३५ लाख लोकसंख्येचा प्रदेश कर्नाटकमध्येच राहिला. तेथील मराठी भाषिकांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीबरोबर आपला समावेश महाराष्ट्रामध्ये करण्यात यावा यासाठी लोकशाही मार्गाने विविध ठराव, सत्याग्रह, उपोषण, सभा, संमेलने इ. मार्गाने गेली ५८ वर्षे सातत्याने मराठी जनता निर्धाराने लढते आहे. भाषिक मुक्ततेसाठी इतका काळ चाललेला हा लढा म्हणजे स्वतंत्र भारताच्या इतिहासातील किंबहुना जगाच्या इतिहासातील एकमेव उदाहरण म्हणावे लागेल. या लढ्याचा संक्षिप्त इतिहास पुढीलप्रमाणे –

### १.१८.१ बेळगाव नगरपालिकेचा ठराव

बेळगाव नगरपालिकेची स्थापना १८५१ मध्ये पंच कमिटी म्हणून झाली. तेव्हापासून आजतागायत नगरपालिकेवर मराठी भाषिकांचीच सत्ता होती व संपूर्ण दप्तर हे मराठीत असून महानगरपालिकेने वेळोवेळी ठराव करून संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यापैकीय एक १९४८ चा ठराव. हा ठराव पालिका बैठकीत प्रचंड बहुमताने संमत केला तो पुढीलप्रमाणे –

**बेळगाव बरो नगरपालिका**
**सर्वसाधारण सभेचा प्रस्ताव**

**क्रमांक ९२ तारीख २४–८–१९४८**

**विषय** – बेळगाव शहराचा महाराष्ट्रात समावेश करण्याबाबत नगरसेवकांचा प्रस्ताव

**प्रस्ताव मांडणारे** – आर. एन. डोंगरे

**अनुमोदक** – एन. डी. कित्तूर

**प्रस्ताव** – हा विषय विचारार्थ घेण्याचा अधिकार नगरपालिकेला आहे का? असा हरकतीचा मुद्दा व्ही. एस. विरूपाक्षी यांनी उपस्थित केला.

नगरपालिकेने या विषयावर मतप्रदर्शन करण्यास कोणतीही कायदेशीर आडकाठी नाही, असे सभाध्यक्षांनी जाहीर केले.

अ) बेळगाव नगरपालिका जिल्हा हद्दीतील बहुसंख्य नागरिकांची मातृभाषा मराठीच असल्याने तसेच बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे माध्यमही मराठीच असल्याने तसेच शहरातील सर्व व्यवहार व व्यावसायिक पत्रव्यवहार बहुतांशी मराठीतूनच चालत असल्याने ही नगरपालिका भारतीय प्रशासन, भारतीय घटना समिती व सीमा आयोग यांना विनंती करते की, बेळगाव नगरपालिका भागाचा समावेश संयुक्त महाराष्ट्रात करण्यात यावा.

**स्थगन प्रस्ताव**

**मांडणारे** – आर. एम. मुगोळी

**अनुमोदक** – व्ही. एस. विरूपाक्षी

सरकारने सीमा आयोगाची स्थापना करेपर्यंत या विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात यावी, असा प्रस्ताव मांडण्यात आला.

स्थगन प्रस्तावावर मतदान घेण्यात आले.

प्रस्तावाच्या बाजूने दोन तर विरोधात १८ मते पडली.

स्थगन प्रस्ताव बहुमताने फेटाळण्यात आला.

यानंतर मूळ प्रस्तावावरील मतदानाची नोंद करण्यात आली.

मूळ प्रस्तावाच्या बाजूने १७ तर विरोधात २ मते पडली.

अशाप्रकारे मूळ प्रस्ताव बहुमताने संमत झाल्याचे जाहीर करण्यात आले.[२३]

२० जून १९५४ रोजी फाजल अली कमिशन बेळगावला आहे. बेळगावच्या कलेक्टर कचेरीत सीमा प्रश्नासंदर्भात ते विविध संघटनांशी चर्चा करणार होते. त्यादिवशी बेळगावात वातावरण तंग होते. त्यामुळे परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी १४४ कलम पुकारण्यात आले. महाराष्ट्र एकीकरण समिती, वाङ्मय चर्चामंडळ इ. नी. फाझल अली कमिटीची भेट घेऊन निवेदन दिले. त्याचदिवशी बेळगाव नगरपालिकेने सभा बोलाविली. या बैठकीत बेळगाव शहराचा समावेश महाराष्ट्रात करण्यात यावा असा ठराव पास करण्यात आला. नगरसेवक वैजनाथ शिंदे यांनी हा ठराव मांडला. ४४ नगरसेवकांपैकी ३६ सभासद उपस्थित होते. हा ठराव २८ विरूद्ध ८ मतांनी पास झाला. सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष एन. पी. साळुंखे होते.[२४]

महाराष्ट्र एकीकरण समितीच्यावतीने बा. र. सुंठणकर, डॉ. कोवाडकर, दाजिबा देसाई, प्रा. रेगे यांनी तसेच शेतकरी कामगार पक्षातर्फे आमदार व्ही. एस. पाटील, नरसिंगराव पाटील याशिवाय भुजंगराव दळवी, जीवनराव याळगी वगैरेंनी मराठी भाषिकांची बाजू मांडली.

### १.१८.२ महाराष्ट्र एकीकरण समितीचे निवेदन

फाझल अली आयोगासमोर महाराष्ट्र एकीकरण परिषदेने मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्रामंध्ये सामील करण्यासाठी आयोगाला निवेदन सादर केले होते. त्याविषयीचा तपशील पुढीलप्रमाणे –

**पाच लक्ष मराठी भाषिक**

बेळगाव जिल्ह्यामध्ये ११ पैकी चंदगड, खानापूर, बेळगाव, हुक्केरी, चिक्कोडी, अथणी व रायबाग (महाल) या सात तालुक्यातील सुमारे ५०० खेड्यांतून (क्षेत्रफळ सुमारे २००० चौरस मैल) प्रत्यक्ष मराठी वस्ती पसरलेली आहे. बाकीचे चार तालुके पूर्णपणे कन्नड आहेत. वरील ७ पैकी हुक्केरी व रायबाग या दोन तालुक्यातील बहुसंख्य खेडी कन्नड आहेत. अथणी तालुक्यापैकी कृष्णा आग्रही दुआबातील २५–३० खेडी मराठी आहेत. चिक्कोडी तालुक्यात ६६ खेडी मराठी तर अथणी तालुक्यात ३४ खेडी कन्नड आहेत. बेळगाव तालुक्यातील १३७ पैकी १०० आणि खानापूर तालुक्यातील २२२ पैकी १९६ खेडी मराठी आहेत. चंदगड तालुक्यातील सगळीच १३० खेडी मराठी असल्याने कमिशनचा नाईलाज झाला म्हणून चंदगड तालुका हा महाराष्ट्राला जोडला हे स्पष्ट

आहे. बेळगाव व खानापूर या तालुक्यातील मराठी खेड्यांचे प्रमाण लक्षात घेता हे दोन्ही तालुके चंदगडप्रमाणेच महाराष्ट्राला जोडणे न्याय्य होते.

बहुसंख्य मराठी विद्यार्थ्यांमुळे वरील तालुक्यातील माध्यमिक शाळांचे शिक्षणाचे माध्यम मराठी आहे. येथील सर्व नागरिकांची व्यवहाराची भाषाही मराठी आहे. या तालुक्यातील बहुतेक ग्रामपंचायतींची दप्तरेही मराठीतच आहेत. खेड्यातील पोलीस पाटील, वतनदार मराठी भाषक असून ते बहुतेक सारे मराठा आहेत.

बेळगावचा मराठी भाग सांस्कृतिक, सामाजिक, वाङ्मयीन, धार्मिक आणि ऐतिहासिक अशा साऱ्या दृष्टींनी महाराष्ट्राशी निगडीत आहे. लोकांच्या चालीरीती व रूढी महाराष्ट्रीयच आहेत. तेव्हा त्यांना महाराष्ट्रापासून कोणत्याही परिस्थितीत अलग करणे जुलूम आहे. तालुके व खेडी या दृष्टीने हा विचार झाला. आता केवळ बेळगाव शहरापुरता विचार केल्यास त्यास कोणत्याही तराजूने कन्नड ठरविता येणार नाही. (म्हणून राज्य पुनर्रचना समितीने राज्यकारभाराची सोय ही सबब पुढे केली आहे, हे येथे लक्षात घेतले पाहिजे.) बेळगाव नगरपालिकेचे सुरूवातीपासूनचे गेल्या शंभर वर्षांचे मराठी दप्तर याची ग्वाही देत आहे.

**बेळगावची आकडेवारी**

बेळगाव व शहापूर मिळून आता एकच शहर बनले आहे. तेव्हा त्यांचा एकत्र विचार करता संयुक्त बेळगावची लोकसंख्या १ लक्ष १ हजार ११० आहे. त्यातले मराठी मातृभाषा असणारे ५५ हजार २९० म्हणजे ५४.७ टक्के आहेत तर कन्नड बोलणारे अवघे २४ हजार १३२ म्हणजे २४.८ टक्केच आहेत. शेकडेवारीची तुलना करताना एकप्रकारे हातचलाखी केली जात असते. जेथे 'कन्नड का मराठी' असा वादाचा मुद्दा उपस्थित होतो तेथे मराठी भाषक ५४.७ टक्के तर कन्नड भाषिक २४.८ टक्के म्हणजे मराठी भाषकांच्या निम्म्याहून कन्नड भाषिक कमी आहेत. हे प्रमाण लक्षात घेतले पाहिजे. इतर समाजात उर्दू–हिंदी बोलणारे १५.५ टक्के व अवांतर भाषक ६ टक्के असले तरी त्यांचा समावेश कन्नडच्या बाजूला का म्हणून करावयाचा? वस्तुस्थिती तर याहून अगदीच उलट आहे. जे मुसलमान आपली भाषा उर्दू असे सांगतात ते आपल्या मुलांना दुसरी भाषा

म्हणून मराठीच शिकवितात. याच कारणास्तव त्यांच्या शाळांना 'उर्दू–मराठी शाळा' असे संबोधले जाते. 'उर्दू–कन्नड' हे नाव प्रचारात नाही. अर्थात उर्दू भाषकांचे वजन मराठीच्याच पारड्यात टाकले पाहिजे व तसे केल्यास मराठी भाषकांची शेकडेवारी ७० टक्के होते ही गोष्ट धडधडीत दिसत असता राज्य पुनर्रचना समितीने डोळ्यावर कातडे ओढून बेळगावला कर्नाटकचा भाग ठरविले आहे.

**शाळा–कॉलेज व विद्यार्थी**

बेळगाव शहरातल्या प्राथमिक शाळा डिस्ट्रीक्ट लोकल बोर्डाच्या ताब्यात देऊन त्याच्यांवर अन्याय करण्यात आला होता. त्याविरूद्ध बरीच चळवळ झाल्यावर १ मार्च १९४९ पासून त्या शाळा बेळगाव नगरपालिकेच्या ताब्यात देण्यात आल्या. त्यापैकी २९ शाळा मराठी, ११ कन्नड आणि १० उर्दू–मराठी असून त्यात अनुक्रमे १०३४५, ३०१० व १७४० विद्यार्थी होते. एकूण १५०९५ पैकी ३०१० म्हणजे एकपंचमांशहूनही कमी कन्नड विद्यार्थी कन्नड शाळेत असता राज्य पुनर्रचना समिती बेळगाव शहरास कर्नाटकात लोटीत आहे.

दुय्यम व उच्च शिक्षण संस्थातल्या विद्यार्थ्यांचे आकडेही हेच दर्शवितात. हायस्कूलमध्ये मराठी विद्यार्थी ३६०९ तर कन्नड विद्यार्थी १७८६ आहेत. कॉलेजातील मराठी विद्यार्थ्यांची संख्या १४०० तर कन्नड विद्यार्थ्यांची संख्या ८०० आहे. येथील राणी पार्वतीदेवी कॉलेज तर मराठी भाषिकांचे म्हणून स्थापिले गेले असून हे कर्नाटक विद्यापीठाला जोडण्याचा अत्याचार मुंबई सरकारने केला आहे. त्याविरूद्ध कितीही तक्रारी केल्या तरी अद्यापि दाद मिळाली नाही. आता तर राज्य पुनर्रचना कमिशनने बेळगावच कर्नाटकात घालून या अन्यायाची परमावधी गाठली आहे.

बेळगाव नगरपालिकेची स्थापना १८५२ मध्ये पंचकमिटी म्हणून झाली. तेव्हापासून आजतागायत नगरपालिकेचे दप्तर मराठीत असून वेळोवेळी ठराव करून संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट होण्याची इच्छा व्यक्त केली होती. या लोकनियुक्त स्थानिक स्वराज्य संस्थेतील सदस्य संख्या ४४ असून त्यापैकी ३३ सदस्य मराठी भाषक होते. कन्नड सदस्यांची संख्या अवघी ७ आहे व राहिलेले ४ मुस्लिम सदस्य उर्दू–मराठी भाषक होते.[२५]

## घरे व गल्ल्यांची नावे

म्युनिसिपल हद्दीतील एकूण १०२१२ घरांपैकी ५५०७ घरे मराठी भाषिकांची तर १९६६ घरे कन्नड भाषिकांची होती. मुस्लिम लोकांच्या घरांची संख्या १४५२ व इतर भाषकांच्या घरांची संख्या २८७ होती. म्युनिसिपालिटीच्या मतदारांच्या याद्या दोन्ही भाषांत उपलब्ध होती. १९४२ ते १९५४ या अवधीत ज्या याद्या खपल्या त्यामध्ये ९६४ याद्या मराठी तर अवघ्या ७६ कन्नड होत्या. शॉप ॲक्टखाली म्युनिसिपालिटीत नोंदविण्यात आलेल्या दुकानांपैकी ८० टक्के दुकाने मराठी भाषकांची व राहिलेली कन्नड भाषकांची, मुस्लिम व मारवाडी वगैरेंची होती. चव्हाट, गोंधळी, पाटील, पांगूळ, बापट, कडोलकर, केळकर, नार्वेकर, बिचू, खडेबाजार ही शहरातील गल्ल्यांची नावे व खिंड, बाग, वेस, गल्ली, खुंट, चौक हे गल्ल्यांच्या नावापुढील शब्द मराठी भाषेचे निदर्शक आहेत.[२६]

## व्यापारी संस्था

बेळगावचा व्यापार प्रामुख्याने मराठी भागाशीच चालतो ही गोष्ट बेळगावात आयात होणाऱ्या मालाच्या जकातीच्या पावत्या पाहिल्यास सहज समजून येणारी आहे. जेथे व्यापार व उद्योगधंदे यांच्या सुमारे २० संस्था असून त्यांचे सारे व्यवहार मराठीतूनच चालतात. फक्त दोनच संस्था मराठीबरोबर कानडीचा वापर करतात. सर्वात महत्त्वाच्या व सरकारमान्य बेळगाव मर्चंटस् असोसिएशनमध्ये एकूण २४४ सभासद असून त्यापैकी फक्त ७० कन्नड भाषक आहेत. या संस्थेची मॅनेजिंग कमिटीची नुकतीच निवडणूक झाली, तीत मराठी भाषकांनी १६ जागा जिंकल्या व अवघ्या ५ जागांवर कन्नड भाषक निवडून आले.

## वर्तमानपत्रे

शहरात सध्या अर्धसाप्ताहिक ‘तरूण भारत’ (२७ वर्षे चालू) व साप्ताहिके ‘बेळगाव समाचार (९३ वर्षे चालू), ‘चिकित्सक’ (७१ वर्षे चालू), ‘राष्ट्रवीर (३५ वर्षे चालू), ‘लोकमत (३ वर्षे चालू) आणि ‘क्रांति’ आणि ‘जिनविजय’ (५३ वर्षे चालू) अशी सहा मराठी पत्रे चालू आहेत. तर कन्नड पत्रे ‘संदेश’ (१७ वर्षे चालू) व ‘जनजिवाळ’ (८ वर्षे चालू) अशी दोन आहेत.

हुबळीचे 'संयुक्त कर्नाटक' हे कन्नड दैनिक प्रथम बेळगावातच सुरू झाले. परंतु येथे आवश्यक कन्नड वातावरण न लाभल्याने त्याला स्थलांतर करावे लागले. ही गोष्ट येथे नमूद करण्याजोगी आहे.

येथे वरील स्थानिक वृत्तपत्रांखेरीज बाहेरच्या मराठी दैनिक पत्रांच्या ५००० प्रती खपतात तर बाहेरच्या कन्नड पत्रांचा खप १००० आहे. शहरात एकूण १० वाचनालये असून त्यापैकी ७ पूर्णतया मराठी, २ द्विभाषिक व फक्त १ वाचनालय पूर्णपणे कन्नड आहे. वरील सर्व गोष्टींचा विचार केल्यास बेळगाव शहर महाराष्ट्राचा अविभाज्य भाग आहे ही गोष्ट कोणताही नि:पक्षपाती मनुष्य नाकारू शकणार नाही.

**जिल्ह्यातील प्राथमिक शाळा**

शैक्षणिकदृष्ट्या बेळगाव शहराचा विचार झाला तसाच तालुक्यांचा विचार केल्यास त्यातूनही मराठी शिक्षणाचे प्राबल्य दिसून येते. ते मोडून काढण्याचा खटाटोप आज चालू आहे. आजमितीला खानापूर, बेळगाव या तालुक्यात मराठी शाळांची व त्यातील विद्यार्थ्यांची संख्या कन्नड शाळांच्या व त्यातील विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा कितीतरी अधिक आहे. खानापूर तालुकयात डिस्ट्रीक्ट स्कूल बोर्डाच्या व खाजगी शिक्षण संस्थांच्या मिळून १११ मराठी शाळा आहेत. त्यातील विद्यार्थ्यांची संख्या ५९७० आहे. कन्नड शाळा ४२ असून त्यातील विद्यार्थ्यांची संख्या ३५०६ आहे. शिवाय उर्दू–मराठी शाळा ४ असून त्यांची विद्यार्थी संख्या ४७० आहे. उर्दू–कन्नड शाळांची विद्यार्थी संख्या १५४ आहे. बेळ्ळारी तालुक्यात डिस्ट्रीक्ट स्कूल बोर्डाच्या व खाजगी शिक्षण संस्थांच्या मिळून ६० हून अधिक मराठी शाळा असून विद्यार्थ्यांची संख्या ९००६ आहे तर कन्नड शाळा अवघ्या ३३ असून विद्यार्थ्यांची संख्या ४८६३ आहे. चिक्कोडी तालुक्यात तर डिस्ट्रीक्ट लोकल बोर्डाने प्राथमिक शिक्षणाच्या सोयीसाठी दोन भाग पाडले आहेत. त्यापैकी निपाणी–संकेश्वर भागाला मराठी भाग व इतर भागाला कन्नड असे संबोधण्यात येते. निपाणी विभागात ९८ मराठी शाळा असून १३०२७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तर कन्नड शाळा २७ असून त्यातून ४२३२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. चिक्कोडी भागात १९ मराठी व ४२ कन्नड शाळा असून त्यातील विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे २७९७ व ७०१० आहे.

खानापूर तालुक्यात २२२ खेडी असून त्यापैकी १९३ (लोकसंख्या ७८१४६) मराठी भाषिक आहेत. १९६ पैकी १७६ खेडयातील ७० टक्के लोक आणि राहिलेल्या खेड्यांतील ५४ टक्के लोक मराठी भाषक आहेत. खानापूर, नंदगड ही या तालुक्यातील महत्त्वाची मराठी गावे आहेत. बेळगाव तालुक्यात १३७ खेडी असून त्यात ६ शहरे आहेत. ही ६ शहरे व ९४ खेडी मराठी भाषक असून त्यांची लोकसंख्या २,३५,७२४ आहे.

हुक्केरी तालुक्यातील १२१ पैकी ३७ खेडी (लोकसंख्या ५६,९०४) मराठी आहेत. ग्रामपंचायतीच्या दप्तर प्रकरणामुळे सर्वतोमुखी झालेला संकेश्वर हा गाव याच तालुक्यात आहे. येथील लोकसंख्या १३१९० असून त्यापैकी ७,६०५ मराठी भाषक, १११२ उर्दू–मराठी भाषक आणि राहिलेले ४४७७ कन्नड भाषक आहेत. येथे मराठी २ व उर्दू–मराठी २ अशा प्राथमिक शाळा असून त्यातील विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे ११६७ व ३२५ आहे. कन्नड शाळा २ असून त्यातील विद्यार्थ्यांची संख्या फक्त ५७५ आहे. येथील पहिली मराठी शाळा १–१०–१८५६ मध्ये उघडण्यात आली तर कन्नड शाळा अलिकडेच काही वर्षापूर्वी उघडलेली आहे. येथील सरकारी कागदपत्रे व ग्रामपंचायतींचे दप्तर प्रारंभापासून मराठी आहे.

चिक्कोडी तालुक्यातील एकूण १०० पैकी ६६ खेडी मराठी भाषक (लोकसंख्या २,२५,७२४) आहेत. चिक्कोडी हा गाव बहुसंख्य मराठी भाषक असून तेथील सारे व्यवहार मराठीतूनच चालतात. कोल्हापूर, सांगली, मिरज व सातारा यांच्याशी चिकोडीचे निकटचे संबंध आहेत. अथणी तालुक्यातील ८९ पैकी ४४ खेडी (लोकसंख्या ५२०७) मराठी भाषक आहेत.[२७]

महाराष्ट्र एकीकरण समितीचे हे निवेदन कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर त्याला उत्तर म्हणून दिलेले असले तरी त्यातील सर्व माहिती कमिशनला सादर केलेली होती.

### १.१८.३ महाराष्ट्राचा दावा

महाराष्ट्राने हक्क सांगितलेला सीमेवरील भाग खेडे हा घटक, भौगोलिक सलगता, सापेक्ष बहुमत आणि जनतेची इच्छा या तत्त्वांच्या आधारावर महाराष्ट्र शासनाने म्हैसूर (कर्नाटक) राज्यातील बेळगाव, कारवार, बिदर व गुलबर्गा या जिल्ह्यातील ८६५ खेडी व नगरे यांची जिल्हा व तालुकावार विभागणी पुढीलप्रमाणे –[२८]

**सारणी क्रमांक १.१**

**सीमाभागातील ८६५ खेडी व नगरे यांची जिल्हा व तालुकावार विभागणी**

| अ. नं. | जिल्हा | तालुका | गावांची संख्या | एकूण गावांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | बेळगाव | अथणी | ९ | |
| २ | | बेळगाव | १०० | |
| ३ | | खानापूर | २०६ | |
| ४ | | चिक्कोडी | ४८ | |
| ५ | | हुक्केरी | २२ | |
| | **एकूण** | **५** | | **३८५** |
| १ | कारवार | कारवार | ५० | |
| २ | | सुपा | १२६ | |
| ३ | | हल्ल्याळ | १२३ | |
| | **एकूण** | **३** | | **२९९** |
| १ | बिदर | संतपूर (औबाद) | ८१ | |
| २ | | भालकी व बसवकल्यण | ६३ | |
| ३ | | हुमनाबाद | ३० | |
| ४ | | आळंद | ७ | |
| | **एकूण** | **४** | | **१८१** |
| | **एकूण सर्व** | | | **८६५** |

संदर्भ : परिपत्रक, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, १० जुलै २००८

खेडे हा घटक, भौगोलिक सलगता, सापेक्ष बहुमत व जनतेची इच्छा या ज्या तत्त्वांच्या आधारे महाराष्ट्र शासनाने सीमेवरील मराठी भाषिक प्रदेशावर दावा सांगितला आहे त्या तत्त्वांचे महत्त्व पुढीलप्रमाणे –

### १. खेडे हा घटक

आपल्या देशात खेडे हा घटक नेहमीच सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा भाग राहिला आहे. ब्रिटीश राजवटीपूर्वी बहुतांशी खेडी ही स्वायत्त होती. हल्लीच्या लोकशाही प्रशासनात खेड्यांना परत पूर्वीचे स्थान मिळाले आहे. प्रशासन आणि विकासकार्याचे ते एक मूलभूत घटक बनले आहेत. खेड्याला सांस्कृतिक, सामाजिक, प्रशासनीक, नियोजनात्मक आणि विकासविषयक अशा प्रत्येक दृष्टिकोनातून महत्त्व आहे. त्यामुळे दोन राज्यातील सीमा ठरविण्याच्या दृष्टीने खेडे हा घटक सर्वात योग्य आहे. देशातील ८०% लोकसंख्या खेड्यातील असल्यामुळे राष्ट्रीय ऐक्याचा व भावनिक एकात्मतेचा पाया भरभक्कम करण्यासाठी खेडूत संतुष्ट असला पाहिजे. ज्या राज्याची भाषा त्याला समजते त्या राज्यात त्याचे खेडे समाविष्ट केल्यास त्याची सोय अधिक चांगल्या रीतीने होईल. अशारीतीने खेड्याला घटक मानल्याने फक्त त्याची दुरावस्था दूर होणार नसून सीमेवर राहणाऱ्या जास्तीत जास्त लोकांची सोय होणार आहे आणि हेच सीमा सूसूत्रीकरणाचे मान्य करण्यात आलेले उद्दिष्ट्य आहे.

### २. भौगोलिक संलग्नता

भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्राचे सह्याद्री पर्वताच्या रांगेमुळे दोन भाग पडले आहेत. समुद्रकिनारा व सह्याद्री यामधील भागाला कोकण म्हणून ओळखण्यात येते व घाटापलीकडील इतर भागाला देश समजण्यात येते. उत्तरेकडील दमणगंगेपासून दक्षिणेकडील गंगावली नदीपर्यंत कोकण प्रदेश पसरला आहे. दक्षिण रत्नागिरी व कारवार यांच्यामधील भागास गोवा म्हणण्यात येते. हा भाग पोर्तुगीजांनी १६ व्या शतकाच्या प्रारंभीस काबीज केला होता. उत्तर कॅनरा जिल्ह्यातील कारवार, सुपे व हल्याळ तालुक्यांचा कोकणी–मराठी प्रदेश हा डोंगराळ प्रदेश असून त्यामध्ये दांडेलीच्या वनराजीचा समावेश होतो. हा प्रदेश कोकणचा भाग आहे हे संशयातीत आहे. मात्र हा भाग बेळगाव जिल्ह्याचा संपूर्ण मराठी

भाषिक भाग व उत्तर कॅनरा जिल्ह्याचा मराठी कोकणी भाग हा एक एकसंघ व सलग प्रदेश आहे. म्हैसूर शासनाचे असे म्हणणे की (कारवार, सुपे व हल्याळ हे तीन तालुके ज्या जिल्ह्याचे भाग आहेत असा) उत्तर कॅनरा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर नाही. तो म्हैसूर राज्याचा भाग आहे व म्हणून महाराष्ट्राला सीमाविषयक फेररचनेच्या कोणत्याही योजनेत वरील भाग समाविष्ट करून घेणेत यावा असा दावा सांगता येणार नाही. महाराष्ट्र शासनाची मागणी संपूर्ण उत्तर कॅनरा जिल्हा महाराष्ट्रात समाविष्ट करण्याबद्दल नसून कारवार, सुपे व हल्याळ या तालुकयातील केवळ मराठी भाषिक प्रदेश समाविष्ट करण्यासंबंधी आहे हे प्रथमत:च निदर्शनास आणले आहे. तसेच म्हैसूर शासनाचे असे म्हणणे आहे की, उत्तरेस गोवा व बेळगाव जिल्हा, पूर्वेस धारवाड इ. जिल्हे यांनी उत्तर कॅनरा सीमित झाला आहे. उत्तर कॅनरा जिल्हा हा उत्तरेस गोवा व बेळगाव जिल्ह्यांनी वेढलेला आहे. ही वस्तुस्थिती मान्य करूनही बेळगाव व खानापूर तालुक्याचा भाग बदली करून देण्याबाबतच्या महाराष्ट्राच्या मागणीचा निर्देश करण्याचे म्हैसूर शासनाने सोयीस्करपणे इथे टाळलेले आहे हे दाखवून देणे रास्त ठरेल. बेळगाव व उत्तर कॅनरा जिल्ह्याच्या नकाशाकडे सहज दृष्टी टाकली तरी असे दिसून येईल की, एका बाजूने सध्याचे महाराष्ट्र राज्य व दुसऱ्या बाजूने उत्तर कॅनरा जिल्ह्याचे सुपे, हल्याळ व कारवार हे तालुके यांच्याशी बेळगाव जिल्ह्याची भौगोलिकदृष्ट्या संलग्नता आहे.

### ३. सापेक्ष बहुसंख्या

हे नाव भाषिक टक्केवारीसंबंधीचे असून ते वादग्रस्त प्रदेशातील एखाद्या घटकाचा समावेश दोहोंपैकी कोणत्या राज्यात करावा हे ठरविण्यासाठी स्वीकारलेले आहे. पुनर्रचित राज्याची स्थूलरचना करण्यासाठी जिल्हा हा घटक म्हणून धरताना राज्य पुनर्रचना आयोगाने सर्वसाधारपणे सापेक्ष बहुसंख्येचे तत्त्व स्विकारले. मात्र जेथे एखाद्या जिल्ह्याहून लहान असलेल्या घटकात त्या जिल्ह्यातील बहुसंख्याक भाषिक गटाऐवजी अन्य भाषिक गटाचे आधिक्य निदान ७०% असेल, अशा ठिकाणी हे तत्त्व सोडून देण्यात आले. त्यामध्ये बेळगाव जिल्ह्यातील चंदगड तालुका. राज्याची पुनर्रचना नि:संशयपणे भाषिक एकजिनसीपणाच्या तत्त्वावर करण्यात आली आहे. तर सीमेच्या

दुसऱ्या बाजूकडील प्रमुख भाषिक गटात राहावे लागल्यामुळे ज्यांची गैरसोय होईल अशा सीमेवरील व्यक्तींची संख्या कमीतकमी राहील अशा प्रकारे प्रादेशिक फेररचना करणे सकृतदर्शनी इष्ट होईल.

### ४. जनतेची इच्छा

आपल्या देशात लोकशाही राज्यात सीमांच्या पुनर्रचनेच्या कोणत्याही योजनेत लोकांच्या इच्छेला सर्वाधिक महत्त्व आहे. वास्तविक ब्रिटीशांच्या राजवटीमध्ये लोकांच्या इच्छेला प्रशासनात कोणतेही स्थान नव्हते. १९१८ च्या सुमारास प्रथमच काहीशा स्वरूपात लोकमान्य शासनाची सुरूवात करण्यात आली. त्यानंतर प्रांतांच्या पुनर्रचनेच्या प्रश्नावर विचार करणाऱ्या निरनिराळ्या आयोगांनी, समित्यांनी व इतर प्राधिकरणांनी अशा प्रकारच्या कोणत्याही पुनर्रचनेच्यावेळी 'जनतेच्या इच्छे'ला महत्त्वाचे स्थान दिले याचे दाखले पुढीलप्रमाणे –

भारत सरकार अधिनियम, १९१९ च्या कलम ४२–अ अन्वये संबंधित स्थानिक विधानमंडळाचे मत घेऊन नवीन प्रांत निर्माण करण्याचे प्राधिकार गव्हर्नर जनरलला देण्यात आले.

१९२८ च्या नेहरू समितीच्या अहवालामध्ये ''आम्ही मोठ्या प्रमाणावरील स्वयंनिर्णयाबाबत बोलत असल्याने लहान प्रदेशाला तीच गोष्ट तत्त्वत: नाकारू शकत नाही. मात्र त्यामुळे इतर कोणत्याही महत्त्वाच्या तत्त्वाला बाधा येता कामा नये....अशा बाबतीत वस्तुस्थितीपेक्षा भावनांना बहुधा अधिक महत्त्व असते.''

१९३१ च्या ओडोनेल समितीने सीमांच्यासंबंधी आपला अहवाल तयार करताना भाषा, वंश, इ. सारख्या निरनिराळ्या घटकांचा विचार केला. परंतु या सर्व घटकांपेक्षाही ''रहिवाशांच्या स्पष्टपणे व्यक्त होणाऱ्या इच्छेला फार मोठे प्राथमिक महत्त्व आहे.'' असे मत स्पष्ट केले.

१९४८ साली कर्नाटक प्रांतिक काँग्रेस समिती व कर्नाटक एकीकरण महासमिती यांनी ''भाषावार प्रांत व कर्नाटक समस्या'' या शीर्षकाचे तपशीलवार निवेदन प्रसिद्ध केले. या निवेदनाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष, बिहारचे भूतपूर्व राज्यपाल श्री. आर. आर. दिवाकर हे होते व भूतपूर्व केंद्रीय आरोग्यमंत्री श्री. डी. पी. करमरकर हे या समितीचे सदस्य होते. यांनी या निवेदनातसुद्धा नेहरू समितीचे मत उद्‌धृत करून त्याला मान्यता दिली होती. तर १९४९ मध्ये जे. व्ही. पी. समिती

म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काँग्रेसच्या भाषावार प्रांतरचना समितीने आपल्या अहवालात संबंधित लोकांच्या इच्छेलाच अधिक महत्त्व दिले होते हे पुढील मुद्द्यांवरून लक्षात येते.

''आम्ही वर काहीही म्हटले असले तरीसुद्धा जर जनतेच्या भावना आग्रही व अनिवार्य स्वरूपाच्या असतील तर जनतेच्या मागण्या पूर्ण करण्याची व्यवहार्यता, त्यातून उद्‌भवणाऱ्या गोष्टी व परिणाम यासह तपासून पाहिली पाहिजे.''

''आम्ही नवीन प्रांतरचनेचे काम काही काळासाठी लांबणीवर टाकू म्हणजे त्यामुळे ह्या कालावधीत आम्हाला अधिक महत्त्वाच्या इतर बाबींवर लक्ष केंद्रीत करता येईल आणि या प्रश्नामुळे आम्ही आमचे चित्त विचलित होऊ देणार नाही. तथापि, जर जनतेच्या भावना आग्रही व अनिवार्य स्वरूपाच्या असतील तर लोकशाहीवादी म्हणून संपूर्ण भारताचे हित व आम्ही वर नमूद केलेल्या काही अटी याविषयीच्या काही मर्यादांच्या अधिन राहून आम्हाला जनतेच्या भावनांपुढे नमते घेतले पाहिजे.''

१९५५ च्या राज्य पुनर्रचना आयोगाने आपल्या अहवालात, ''लोकशाहीप्रधान देशामध्ये, अगदी लहान प्रदेशामधील लोकांनासुद्धा त्यांच्या इच्छा पूर्णपणे विचारात घेतल्या जाव्यात अशी मागणी करण्याचा हक्क आहे, हे नाकारता येणार नाही.''[२९]

१९५१ च्या जनगणनेच्या आधारे महाराष्ट्र शासनाने सांगितलेल्या प्रदेशावरती (नगरे व खेडी) मराठी भाषिक बहुसंख्य असल्याचे पुढील सारणीवरून दिसून येते.

### सारणी क्रमांक १.२

### महाराष्ट्र शासनाने हक्क सांगितलेल्या मराठी भाषिक प्रदेशातील भाषिक प्रमाण

| जिल्हा | तालुका | एकूण लोकसंख्या | भाषिक टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मराठी | कन्नड | इतर |
| १. बेळगाव | बेळगाव | २२०३८९ | ६१ | २३ | १६ |
| | खानापूर | ६८५२२ | ७७ | १२ | ११ |
| | अथणी | २०८५८ | ६१ | ३३ | ६ |
| | चिकोडी | १०७८५६ | ७३ | १७ | १० |
| | हुक्केरी | १५०९४ | ८० | १५ | ५ |
| २. कारवार | कारवार | ६७१०७ | ७८* | १५ | ७ |
| | सुपे | १७४५१ | ८४* | ६ | १० |
| | हल्याळ | १३१२२ | ६७* | १७ | १६ |
| ३. बिदर | हुमनाबाद | २२३०३ | ६३ | १६ | २१ |
| | भालकी | ४७८७९ | ५९ | ३० | ११ |
| | संतपूर | ४६६६९ | ६० | २६ | १४ |
| ४. गुलबर्गा | आळंद | ४९७८ | ६८ | २४ | ८ |
| एकूण | | ६५२२२८ | | | |

* यामध्ये कोकणीचा समावेश आहे

संदर्भ : महाराष्ट्र–म्हैसूर–केरळ सीमावाद निवेदन–१९६७

वरील सारणीवरून सीमाभागात मराठी भाषिक लोकांचे प्रमाण कितीतरी पटीने अधिक असून त्यांनी महाराष्ट्रात जाण्यासाठी हरतऱ्हेने लोकशाही मार्गांचा अवलंब केला आहे. १९५७ पासून कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीमध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीने मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्रात विलीन करावा या एकाच मुद्द्यावरती निवडणुका लढविल्या व त्या सातत्याने जिंकल्याही. १९५७ च्या विधानसभा निवडणुकीतील मतदान पुढील सारणीत मांडले आहे.

## सारणी क्रमांक १.३

## १९५७ च्या विधानसभा निवडणुकीतील मतदान

| अ. नं. | मतदारसंघ | लोकसंख्या | मतदान | मतदान | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | समिती | काँग्रेस | समिती | काँग्रेस |
| १ | बेळगाव शहर | १,०१,११० | ५३,५२० | २२,१२७ | १५,९१५ | ५८.२ | ४१.८ |
| २ | बेळगाव दक्षिण | ९०,०६६ (मागणी केलेल्या गावात) | ४२,४९३ | १८,०१३ | १२,०६३ | ५९.९ | ४०.०<br>६४.१ |
| ३ | बेळगाव उत्तर | ९०,०५० (मागणी केलेल्या गावात) | ४७,२१७ | १७,४४६ | १५,५४६ | ५२.८ | ४७.२<br>७०.३ |
| ४ | खानापूर | ६९,८७२ (मागणी केलेल्या गावात) | ५४,८५७ | २९,४७१ | १२,८२१ | ६७.० | ३२.६<br>८२.० |
| ५ | निपाणी | ८८,३१६ | ४३,३६१ | २६,०६४ | ७,७३७ | ७६.६ | २३.४ |
| ६ | सदलगा | ८६,८१७ (मागणी केलेल्या गावात) | ४६,९२८ | १७,७१७ | १७,५२९ | ५१.० | ४९.०<br>५१.८ |
| ७ | कारवार<br>१९६२<br>१९६७ | समितीचे उमेदवार प्रचंड मतांनी विजयी | | २०,५१७<br>२३,००९ | १२,७५२<br>१३,७६९ | ६१.६<br>६५.० | ३८.४<br>३५.० |
| ८ | भालकी १ | | | | | | |
| ९ | भालकी २ | | | | | | |
| १० | हलसूर | | | | | | |

संदर्भ : मराठी शब्दसोहळा, बेळगाव सहकार दर्शन, पृ. ३८

वरील मतदार संघात काही कानडी खेड्यांचा समावेश असूनही समितीचे उमेदवार विजयी झाले.[३०]

## बेळगाव शहर व बेळगाव तालुका

### शहर

बेळगाव शहर हे नेहमीच बहुसंख्य मराठी भाषिक शहर म्हणून राहिलेले आहे. बेळगावची पहिली पंचसमिती १८५१ मध्ये स्थापन झाली व नगरपालिकेची स्थापना १८५३ मध्ये झाली. पंचसमितीचे १८५१ पासूनचे अभिलेख, त्याचप्रमाणे नगरपालिकेचे १८५३ पासूनचे अभिलेख नेहमी मराठीमध्येच ठेवण्यात आलेले आहेत. बेळगाव येथे सन १८३० मध्ये सुरू झालेली पहिली प्राथमिक शाळा मराठी शाळा होती. सन १८५३ मध्ये राज्यपुनर्रचना होण्यापूर्वी बेळगाव शहरात २९ मराठी प्राथमिक शाळा, ११ कन्नड व १० उर्दू–मराठी प्राथमिक शाळा होत्या. त्याचप्रमाणे मराठी माध्यम असलेल्या सात माध्यमिक शाळा, कन्नड माध्यम असलेली एक आणि मराठी व कन्नड अशी दोन्ही माध्यमे असलेल्या सहा शाळा होत्या.

### तालुका

बेळगाव हा जिल्हा असल्याने एकूण १० तालुक्यांचा समावेश बेळगाव जिल्ह्यात आहे. या तालुक्यामध्ये १४६ खेड्यांचा व ७ नगरांचा समावेश होतो. या सात नगरांपैकी चार नगरे बेळगाव शहरात येतात. या तालुक्याचे एकूण क्षेत्र ३९४.४ चौ. मैल असून त्याची एकूण लोकसंख्या २८०६९३ आहे. त्या लोकसंख्येपैकी जवळजवळ अर्धी म्हणजे ४९.८ टक्के लोकसंख्या मराठी भाषिक असून ३५.५ टक्के लोकसंख्या कन्नड भाषिक आहे. या १५३ खेड्यांपैकी व नगरांपैकी बेळगावसह जवळजवळ १०० खेड्यांवर व नगरांवर महाराष्ट्र शासनाने आपला हक्क सांगितला आहे. त्याचे एकूण क्षेत्रफळ २२० चौ. मैल असून लोकसंख्या २२०३८९ आहे. त्यापैकी ६१ टक्के लोक मराठी भाषिक, २३ टक्के कन्नड भाषिक व १६ टक्के इतर लोक आहेत. यावरून महाराष्ट्राने हक्क सांगितलेल्या १०० खेड्यांपैकी व नगरांपैकी प्रत्येक खेड्यात व शहरात सर्वात मोठा एकमेव भाषिक गट मराठी भाषिकांचा आहे. याला अपवाद म्हणजे फक्त कन्नड भाषिक परिवेष्टित खेडी. हा प्रदेश महाराष्ट्र राज्यातील रत्नागिरी, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांना लागून आहे. या वादगस्त सीमाप्रदेशातील लोकांनी हा प्रदेश महाराष्ट्र राज्यात समाविष्ट करण्याच्या बाजूने वारंवार आपली इच्छा

व्यक्त केली आहे. १९५६ नंतर घेतलेल्या सर्व निवडणुकांमध्ये हा प्रदेश महाराष्ट्रात घालण्यात अनुकूल असलेले उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून आले असून त्यांनी हा प्रदेश म्हैसूरमध्ये ठेवावा अशा मतांच्या उमेदवारांचा साफ पराभव केलेला आहे.

**खानापूर तालुका**

खानापूर तालुक्यामध्ये खानापूर व नंदगड या शहरांसह २५७ खेडी आहेत. या तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ ६७५.२ चौरस मैल आहे व एकूण लोकसंख्या ९९७९० आहे. यापैकी खानापूर व नंदगड या दोन्ही शहरांसह २०६ खेड्यांवर महाराष्ट्र शासनाने हक्क सांगितला आहे. या प्रदेशाचे क्षेत्रफळ ५८७.१ चौरस मैल व लोकसंख्या ६८५२२ असून त्यामध्ये ७७% मराठी भाषिक, १२% कन्नड भाषिक व ११% इतर भाषिक आहेत. महाराष्ट्र शासनाने हक्क सांगितलेली २०६ खेडी व शहरे यापैकी परावृत्त प्रदेश निर्माण करणारी कन्नड भाषिक खेडी सोडल्यास प्रत्येक खेड्यात व शहरात मराठी भाषा बोलणाऱ्यांचा सर्वात मोठा गट आहे असे दिसून येते. हा प्रदेश महाराष्ट्र राज्यातील रत्नागिरी व कोल्हापूर जिल्ह्यांना लागून आहे. वादग्रस्त सीमाभागातील लोकांनी हा प्रदेश महाराष्ट्र राज्यात घालण्याच्या बाजूने आपली इच्छा वारंवार प्रदर्शित केली आहे. १९५६ नंतर झालेल्या सर्व निवडणुकांमध्ये हा प्रदेश महाराष्ट्र राज्यात विलीन करण्याच्या बाजूने असलेले उमेदवार, म्हैसूर राज्यात राहण्याच्या बाजूने असलेल्या उमेदवारांपेक्षा प्रचंड बहुमताने निवडून आले आहेत.

**हुक्केरी व अथणी तालुके**

हुक्केरी तालुक्यात १२२ खेडी असून त्याचे क्षेत्रफळ ३८२.४ चौरस मैल आहे. त्यापैकी ३०.६ चौरस मैल क्षेत्र असलेल्या १८ खेड्यांतील लोकसंख्या १३००० आहे. त्यात ८० टक्के लोक मराठी भाषिक, १५ टक्के कन्नड भाषिक व ५ टक्के इतर आहेत. ह्या १८ खेड्यांवर महाराष्ट्र सरकारने मालकी हक्क सांगितला आहे. ह्या १८ खेडयांपैकी ९ खेडी निपाणी भागात येतात व हा प्रदेश महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्याला लागून आहे.

अथणी तालुक्यात ८९ खेडी असून त्याचे क्षेत्रफळ ७४४.४ चौरस मैल आहे. ह्यापैकी १० खेड्यांचे क्षेत्रफळ ८५.७ चौरस मैल असून लोकसंख्या २९८५८ आहे व त्यात ६१ टक्के मराठी भाषिक, ३३ टक्के कन्नड भाषिक व ६ टक्के इतर आहेत. यावर महाराष्ट्र राज्याने हक्क सांगितला आहे. ही खेडी महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यास लागून आहेत. हुक्केरी तालुक्यातील १८ खेडी व अथणी तालुक्यातील १० खेडी यात मराठी भाषिक लोकांचा सर्वात मोठा एकभाषिक गट आहे. ह्या खेड्यांमधील बऱ्याचशा ग्रामपंचायतीनी वेळोवेळी ठराव संमत करून आपली खेडी महाराष्ट्रात विलीन व्हावीत अशी इच्छा दाखविली आहे. या प्रदेशातील लोकांनी त्यांच्या भावना सभा व मिरवणुकीद्वारादेखील स्पष्ट केल्या आहेत.[३१]

**चिक्कोडी तालुका**

या तालुक्यातील निपाणी शहर आणि बहुसंख्य मराठी भाषिक असलेली ४२ खेडी यांचा समावेश होतो. या प्रदेशाचा विस्तार सुमारे १७५ चौरस मैल आहे. मराठी भाषिकांची लोकसंख्या सुमारे ११६००० आणि कन्नड भाषिकांची लोकसंख्या सुमारे २१००० आहे. या प्रदेशाच्या दक्षिणेला कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुका, पश्चिमेला कागल तालुका, उत्तरेला कोल्हापूर जिल्ह्यातील कागल व हातकणंगले तालुके आणि पूर्वेला बेळगाव जिल्ह्यातील चिक्कोडी व हुक्केरी तालुके येतात. सह्याद्रीच्या पूर्वेकडील उतारावर हा प्रदेश पसरला आहे व हा भाग कोकणाला जोडणाऱ्या फोंडा घाटाच्या वर आहे. या भागातून पुणे–बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग जातो आणि या मार्गामुळे हा प्रदेश उत्तरेला कोल्हापूर आणि महाराष्ट्र राज्यातील इतर प्रदेशाला आणि दक्षिणेला बेळगाव व म्हैसूर राज्यातील उत्तरेकडील प्रदेशाला जोडला जातो. चिक्कोडी तालुक्यातील निपाणी हे शहर बेळगाव जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. १९५१ च्या जनगणनेनुसार या शहरात ६६.६ टक्के मराठी भाषिक आणि १५.५ टक्के कन्नड भाषिक होते. हे शहर राष्ट्रीय महामार्गावर कोल्हापूरच्या दक्षिणेला सुमारे २५ मैलांवर आणि बेळगावच्या उत्तरेला सुमारे ४५ मैलांवर आहे. येथे तंबाखूची प्रसिद्ध बाजारपेठ असून येथील तंबाखू भारताच्या निरनिराळ्या भागात आणि पाकिस्तान, ब्रह्मदेश, सिलोन आणि लंडन येथे निर्यात केला जातो तर तंबाखूखेरीज ज्वारी, मिरच्या,

भुईमूग, गूळ आणि विड्याची पाने यांचीही येथे बाजारपेठ आहे. निपाणी शहरापासून फक्त एक मैलावर महाराष्ट्राची सीमा आहे. या सीमेवर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर, निपाणी असून या महाविद्यालयात या भागातील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत. भूतपूर्व कोल्हापूर संस्थानाचा प्रदेश याच शहराच्या प्रभावाखाली येत असल्यामुळे ते महाराष्ट्र संस्कृतीचे एक महत्त्वाचे केंद्र आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निपाणी भागाचा एक स्वतंत्र तालुका स्थापन करण्यासंबंधीचा प्रस्ताव विचाराधीन होता. वेगवेगळ्या प्रांतांची भाषावार पुनर्रचना करण्यात येणार होती. जर या भागाचा एक तालुका बनला असता तर राज्य पुनर्रचना आयोगाला या भागाचा मुंबई राज्यात समावेश करावा लागला असता. कारण निपाणी भागातील मराठी भाषिकांची टक्केवारी सुमारे ७३ टक्के होती. तर कन्नड भाषिकांची संख्या १५ टक्के होती. यामुळे कन्नड भाषा बोलणाऱ्या लोकांपैकी बरेचसे लोक द्वैभाषिक आहेत व सर्व सामान्य लोक व व्यापारी व्यवहारात मराठीचा वापर करतात. गावातील दप्तरही मराठी भाषेतच ठेवण्यात आले होते तर नगरपालिकेचे अभिलेख, कार्यवृत्त व कामकाज १८५४ मध्ये स्थापनेपासून मराठीत ठेवण्यात आले होते. सर्व दुकाने, संस्था व व्यापारी संस्था आपल्या हिशोबात व दैनंदिन व्यवहारात मराठीचाच वापर करतात. दुकानांचे व भागिदारी संस्थांचे फलक हे मराठीतच आहेत.

### १.१८.४ संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील हुतात्मे

३० सप्टेंबर १९५५ रोजी बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर,भालकी यांचा समावेश (कर्नाटक) म्हैसूर राज्यात करणारा राज्यपुनर्रचना समितीचा अहवाल केंद्र सरकारला सादर झाला. तो अहवाल १० ऑक्टोबर १९५५ रोजी प्रसिद्ध झाला. बेळगाव, कारवार, निपाणीसह सर्व मराठी भाषिकांचा समावेश कर्नाटकात झाला असल्याचे जाहीर केले. आणि मराठी भाषिकांच्या आशाआकांक्षा धुळीला मिळाल्या. परिणाम बेळगाव शहरात कडकडीत हरताळ पाळण्यात आला. सायंकाळी आमदार भुजंगराव दळवी यांच्या अध्यक्षतेखाली युनियन जिमखान्यावर निषेधाची सभा

झाली. मराठी जनतेने १००० तारा व १ लाख २७ हजार नागरिकांच्या सह्यांचा अर्ज पंतप्रधानांकडे पाठवून आपला निषेध नोंदविला.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पुणे येथे भरलेल्या २१ ऑक्टोबर १९५५ च्या सभेत बाबुराव ठाकूर, डॉ. कोवाडकर, पुंडलिकजी, कारवारचे आनंदराव मुजुमदार, हल्याळचे श्रीपतराव देशपांडे, देवचंदजी शाह यांनी काँग्रेस श्रेष्ठींची भेट घेऊन सीमाभाग महाराष्ट्रात विलीन करण्याची मागणी केली. तथापि सीमाभागातील जनतेच्या लोकेच्छांचा विचार न करता १६ जानेवारी १९५६ रोजी पंडित नेहरूंनी आकाशवाणीवरून समितीचा अहवाल स्वीकारल्याचे जाहीर केले. त्यामुळे सीमाभागात प्रचंड असंतोष उसळला, बेळगाव–धारवाड, बेळगाव–वेंगुर्ला, बेळगाव–कारवार या रस्त्यावर मोठमोठी झाडे तोडून मराठी भाषिकांनी रस्ते रोखले. बेळगाव शहरात ठिकठिकाणी निदर्शकांवरती जो गोळीबार केला त्यात पुढील चार हुतात्मे झाले.[३२]

१. महादेव रामप्पा बारीगडी
२. लक्ष्मण गोविंद रानडे
३. मधू बापू बांदेकर
४. मारुती बुधाप्पा बेन्नाळकर (कंग्राळी)

### १.१८.५ सत्याग्रह आंदोलन

पोलीसांची दडपशाही, संचारबंदीचा अंमल, सभा, मिरवणुकांवरील बंदी यामुळे सीमाभागातील जनतेच्या मनात प्रक्षोभ धुमसत होता. या प्रक्षोभाला विधायक वळण लावण्यासाठी गांधीप्रणित अहिंसक सत्याग्रहाचा मार्ग अवलंबण्याचे संयुक्त महाराष्ट्र समितीने ठरविले.

केसरीचे संपादक व लोकमान्य टिळकांचे नातू जयवंतराव टिळक यांच्या नेतृत्वाखाली बेळगावच्या हुतात्मा चौकात ९ मार्च १९५६ रोजी ११ वाजता सत्याग्रहास सुरूवात केली. त्यामध्ये बेळगावचे उपनगराध्यक्ष जयंतराव भोसले होते. त्याचबरोबर कुसुम जगताप, गुणवंता चव्हाण, सुशिला नार्वेकर, रूक्मिणी हसबे, सोमाण्णा चौगले, नागुबाई कणबरकर, कल्लव्वा किल्लेकर इ. महिलांनीही उत्स्फूर्त नेतृत्व केले. सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते, शांतता पसरली होती. परंतु एखाद्या सशस्त्र

जमावाला सामना करावयाचा आहे अशा आवेशात पोलीस तयार होते. असे असूनही सर्व स्तरातील सुमारे ६००० लोक अपूर्व उत्साहाने सत्याग्रहात उडी घेत होते. अशा प्रकारे अतिशय संयमाने हा सत्याग्रह सुरू होता. लोकांचाही प्रचंड पाठिंबा सत्याग्रहींना मिळत होता. असे असताना ३० मार्चपासून पोलीसांकडून प्रक्षोभक कृत्ये घडून येऊ लागली. श्री. छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमा जप्त करू लागले. लोकांनी केलेली सजावट उध्वस्त करू लागले. तरीसुद्धा सत्याग्रहाच्या आंदोलनातील जोर कमी न होता वाढतच होता. वाढत्या उत्साहाने व संख्येने खेड्यापाड्यातून शेकडो लोक सत्याग्रहात सामील होण्यासाठी येऊ लागले. सत्याग्रहींना वाटत असलेली संयुक्त महाराष्ट्राविषयीची तळमळ वाटेल ती किंमत देऊन आपल्यावरील अन्याय दूर करण्याचा दृढ निर्धार, पराकाष्ठेची उत्कंठा आणि आत्मक्लेष सोसण्याची तयारी आणि सत्याग्रहींना देण्यात आलेल्या जबर शिक्षा ही बेळगावच्या सत्याग्रहाची वैशिष्ट्ये होती. मुंबईतील आणि महाराष्ट्रातील अन्य ठिकाणी एखाद दुसरा दिवस, फारतर आठवडा दोन आठवड्याच्या शिक्षा देण्यात येत असत. तर बेळगाव येथे ती शिक्षा महिन्यापासून अकरा महिन्यांपर्यंत दीर्घ मुदतीची शिक्षा सत्याग्रहींना ठोठावण्यात आल्या. त्यामुळे तरी हे आंदोलन थांबेल अशी अधिकाऱ्यांची अपेक्षा असावी. याबाबतीतही सत्याग्रहींनी अधिकाऱ्यांचा भ्रमनिरास केला.

पंडित नेहरू, गोविंद वल्लभ पंत यांनी दिलेली आश्वासने आणि सीमाप्रश्न सोडविण्यासाठी विभागीय मंडळांना आवश्यक ते अधिकार देण्याचा आणि म्हैसूर राज्याचा पश्चिम विभागात समावेश करण्याचा भारत सरकारचा निर्णय लक्षात घेऊन महाराष्ट्र एकीकरण समितीने ऑगस्ट १९५६ च्या अखेरीस सत्याग्रह स्थगित करण्याचा निर्णय घेतला. तरी आपली मागणी सोडली नव्हती किंवा चळवळ मागे घेतली नव्हती.

### १.१८.६ दिल्लीत बेळगावचे शिष्टमंडळ

राज्य पुनर्रचना बील जुलै १९५६ मध्ये संसदेत आले त्यावेळी महाराष्ट्र एकीकरण समितीचे एक शिष्टमंडळ दिल्लीला गेले. या शिष्टमंडळात बेळगाव, निपाणी, कारवार भागातील नेतेमंडळी होती. लोकसभेच्या अनेक सभासदांना आकडेवारी व नकाशाच्या मदतीने सीमाभागाचा प्रश्न समजावून

पटवून दिला गेला आणि अनेकांची सहानुभूती शिष्टमंडळाने मिळविली. या प्रचाराचा परिणाम लोकसभेतील चर्चेच्यावेळी दिसून आला. लोकसभेत बेळगाव–कारवारच्या सीमेच्या प्रश्नाचा दादासाहेब आळतेकर, इंदिराबाई मायदेव, व्यंकटराव पवार, माजी केंद्रीय मंत्री चिंतामणराव देशमुख तर राज्यसभेत मामासाहेब देवगिरीकर, डॉ. सीताबाई परमानंद, आचार्य काका कालेलकर, प्रा. काणे, बरकत अल्लीखान वगैरेंनी मराठी भाषिकांची बाजू कशी न्याय्य आहे हे दाखवून दिले.

पंडित नेहरू, पंडित गोविंद वल्लभ पंत यांना ज्यावेळी शिष्टमंडळ भेटले त्यावेळी पंडित नेहरू म्हणाले, 'तुमची बाजू बळकट आहे याची मला जाणीव आहे. आता सर्व मोठे प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहेत. थोडे स्थिरस्थावर होताच आपल्या प्रश्नाचा आम्ही शांततेच्या वातावरणात फेरविचार करू तर संसदेत पंडित वल्लभ पंत यांनी द्विभाषिक मुंबई राज्य व म्हैसूर राज्य यांच्या सीमेबद्दल काही विशिष्ट प्रश्न सोडवायचे आहेत असे लोकसभेत सांगितले.

### १.१८.७ म्हैसूर राज्याची स्थापना

१ नोव्हेंबर १९५६ रोजी मराठी भाषिक सीमाभागासह म्हैसूर राज्याची स्थापना झाली. ६ लाख मराठी भाषिकांचा दारूण मनोभंग करण्यात आला. या घटनेचा तीव्र निषेध करण्यासाठी सीमाभागात कडकडीत हरताळ पाळण्यात आला. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या आदेशाप्रमाणे प्रचंड मूक मिरवणूक निघाली. डोक्यावर ना टोपी ना रूमाल, दंडाला काळ्या फिती लावल्या होत्या. तोंडातून एकही शब्द निघत नव्हता. ही मिरवणूक जेव्हा खडेबाजारात आली तेव्हा त्यामध्ये जवळजवळ ५०,००० लोक सामील झाले होते. याच मिरवणुकीचे पुढे जाहीर सभेत रूपांतर झाले. अध्यक्षस्थानी बा. र. सुंठणकर होते. त्यांनी ''आमच्या मागणीमागे आम्ही एकजुटीचे प्रचंड सामर्थ्य उभे केले आहे. म्हैसूर राज्यात आम्हाला डांबण्यात आले आहे. पण हा अन्याय आहे. आम्ही कधीच सहन करणार नाही, अन्याय दूर होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही हा आमचा निर्धार आहे.'' अशी प्रातिनिधिक स्वरूपाची भावना अध्यक्षीय भाषणात मांडली. तेव्हापासून आजपर्यंत दरवर्षी १ नोव्हेंबर हा दिवस 'काळा दिन' म्हणून कडकडीत बंद पाळून पाळण्यात येतो. यादिवशी कितीतरी

मराठी भाषिकांचा पेहराव पूर्णपणे काळ्या कपड्यांचा असतो. लहान मुले पतंगसुद्धा यादिवशी काळाच उडवितात.

### १.१८.८ कर्नाटकची भूमिका

कर्नाटक प्रांतिक काँग्रेस कमिटीने भाषिक राज्यातील सीमा निश्चित करण्यासाठी एप्रिल १९५४ मध्ये पुढील ठराव संमत करून तो राज्य पुनर्रचना समितीला सादर केला.

भौगोलिक सलगता, खेडे हा घटक व भाषिक बहुमत या तत्त्वाधारे दोन राज्यातील सीमा निश्चित कराव्यात. हे करत असताना एखाद्या गावामध्ये वाद निर्माण झाल्यास तो त्यावेळी दोन्ही राज्यांचे एकेक प्रतिनिधी व तिसरा एक प्रतिनिधी अशा तिघांनी मिळून त्या गावाबाबत निर्णय घ्यावा. असा ठराव राज्य पुनर्रचना समितीला सादर केला. परंतु राज्य पुनर्रचना मंडळाने कर्नाटकाला बेळगाव, कारवार, बिदर जिल्ह्यातील बराच मोठा मराठी भूप्रदेश दिल्याने कर्नाटक सरकारने आपल्या भूमिकेत बदल केला. त्यामध्ये –

१. राज्य पुनर्रचना अंतिम असल्याने सीमावाद शिल्लक नाही.

२. जैसे थे परिस्थिती ठेवण्यात यावी.

३. सध्याच्या सीमेच्या दोन्ही बाजूस १० मैल रूंदीच्या पट्टयात किरकोळ फेरबदल करावा.

४. तालुका हा घटक व ७० टक्के लोकसंख्या या तत्त्वानुसार सीमा निश्चित करावी.

    अ) अक्कलकोट तालुका – कानडी लोकसंख्या ५६.९ टक्के

    ब) दक्षिण सोलापूर तालुका – कानडी लोकसंख्या ४३.३ टक्के

    क) सोलापूर शहरासह संपूर्ण कानडी उत्तर सोलापूर तालुका – कानडी लोकसंख्या ११.८ टक्के

    ड) जत तालुका – कानडी लोकसंख्या ३७.७ टक्के

इ) चंदगड तालुका कानडी लोकसंख्या ४.३ टक्के

वरीलप्रमाणे कर्नाटक सरकारने ४ थ्या सूत्रानुसार महाराष्ट्रातील तालुक्यांची मागणी केली तर सद्यस्थितीत कर्नाटक सरकार महाजन अहवालाची तंतोतंत मागणी करत आहे.[३३]

यावरून कर्नाटक सरकारने वेळोवेळी आपली भूमिका बदललेली दिसून येते. आजरोजी सीमाप्रश्नावर तोडगा काढायचा असेल तर तो महाजन अहवालाप्रमाणेच काढण्यावर ठाम असल्याचे दिसून येते.

### १.१८.९ निजलिंगाप्पांची ग्वाही

कानडी भाषिक राज्याची निर्मिती झाली असली तरी अद्याप बराच मोठा कानडी भाषिक प्रदेश म्हैसूरबाहेर आहे तो म्हैसूर राज्यात आला पाहिजे व त्याचबरोबर बराच मराठी प्रदेश म्हैसूर राज्यात समाविष्ट करण्यात आला आहे ताबडतोब तो प्रदेश मराठी राज्यात समाविष्ट करण्यास माझी मुळीच हरकत नाही. तथापि जोपर्यंत मराठी भाषिक म्हैसूर राज्यात आहेत, तोपर्यंत त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे ही माझ्या सरकारची जबाबदारी आहे असे आश्वासन २४–१२–१९५६ रोजी म्हैसूरचे पहिले मुख्यमंत्री श्री. एस. निजलिंगप्पा यांनी म्हैसूर विधानसभेत दिले.[३४]

### १.१८.१० सत्याग्रहाचे दुसरे पर्व

१ नोव्हेंबर १९५८ रोजी सत्याग्रहाच्या दुसऱ्या पर्वाला सुरूवात झाली. या पहिल्या तुकडीचे नेतृत्व भाई माधवराव बागल यांनी केले. या तुकडीत गजाननराव भातकांडे, श्रीमती विमलाबाई बागल, जयवंतराव भोसले, खासदार बाबासाहेब भोसले, पांडुरंगराव वाटवे, कॉ. दत्ता कानडे, बाबुराव चौगुले, जगन्नाथ पाटील, राजाराम हलगेकर, अरूण मुढे, सहदेव मासेकर आदींचा समावेश होता तर निपाणीच्या सत्याग्रहाचे नेतृत्व भाऊ लिमये यांनी केले होते. या तुकडीत मालतीबाई शिंदे, मालतीबाई तुळपुळे, बाळूबाई सखाराम पाटील, हणमंतराव बाबासाहेब घोरपडे, श्रीमती हारूताई, रामजी पाटील, दत्तात्रय पाटील, कुशाप्पा नरसाप्पा आदी सत्याग्रहींचा समावेश होता. तर खानापूर येथे झालेल्या सत्याग्रह तुकडीचे नेतृत्व आमदार डी. एस. खांडेकर यांनी केले होते. या तुकडीत जोतिबा सुर्वे, शंकरराव माळी, नानासाहेब सौंदेकर, श्रीमती ताराबाई गाडगीळ, कृष्णाजी घानाप्पा रेमाणी, आकोबा

धर्मा कांबळे, अप्पा जोती पाटील आदी सत्याग्रहींचा समावेश होता. सत्काराला बंदी घातल्यामुळे नगरपालिकेच्या हद्दीबाहेर स्मशानभूमीच्या पलीकडे सत्कार करावा लागला. या सत्कार सभेला ४० हजारांचा जनसमुदाय जमला होता. या सत्याग्रह पर्वात जवळजवळ १६,००० सत्याग्रहींनी भाग घेतला. या सत्याग्रहींना ४ महिन्यापासून ९ महिन्यापर्यंत शिक्षा ठोठावण्यात आल्या. त्यांना बेल्लारी, हिंडलगा, येरवडा, नाशिक, अहमदाबाद, पुणे आदी तुरूंगात ठेवण्यात आले होते. पहिल्या तुकडीचे नेतृत्व केलेले माधवराव बागल यांना ३ महिन्यांची साधी कैद व ५० रुपये दंड करण्यात आला व दंड न भरल्यास १५ दिवसांची शिक्षा भोगावी लागेल असा निर्णय झाला.[३५]

### १.१८.११ साराबंदी

महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्नासाठी चळवळीचे अनेक मार्ग हाताळण्यात आले. संपापासून सत्याग्रहापर्यंत, बहिष्कारापासून निषेध मोर्चापर्यंत, शिष्टमंडळापासून ते हौतात्म्य पत्करण्यापर्यंत तसेच साराबंदीपासून ते आमरण उपोषणापर्यंत. सीमालढ्यासाठी साराबंदीचा लढा हा एक दैदिप्यमान इतिहास आहे. बेळगाव, कारवार, निपाणी, खानापूर, भालकी हा भाग महाराष्ट्रात सामील करून घेण्यासाठी लोकशाही मार्गाने अनेक चळवळी झाल्या. परंतु त्यामध्ये यश आले नाही. शेवटी महाराष्ट्र एकीकरण समितीने आंदोलनाचा निर्णय घेतला. बेळगाव, कारवार, खानापूर, निपाणी, भालकी या पाच केंद्रावर १ नोव्हेंबर १९५८ पासून सत्याग्रह सुरू केला. या सत्याग्रहात ११ हजार सत्याग्रहींनी भाग घेतला. याचाच भाग म्हणून समितीतर्फे लोकसभेवर १७ डिसेंबर १९५८ रोजी २५०० सत्याग्रहींचा सत्याग्रही मोर्चा गेला होता. पण तरीही मध्यवर्ती सरकारने काहीच हालचाल न केल्याने ३ जानेवारी १९५९ रोजी सीमालढा प्रखर करण्यासाठी साराबंदीचा आदेश दिला. या आदेशाप्रमाणे खेडी निवडण्यासाठी दोन पथ्ये पाळावयाच्या सूचना केल्या.

१. साराबंदीच्या लढ्यातून कानडी व मराठी भाषिक जनतेत संघर्ष होता कामा नये.

२. साराबंदीचा निर्णय गावच्या जनतेने घेतला पाहिजे.

वरील पथ्ये स्वीकारून ज्या खेड्यातून ८० टक्क्यांपेक्षा जास्त मराठी भाषिक आहेत व ज्या खेड्यांतून साराबंदीचा निर्णय तेथील बहुसंख्य खातेदारांनी घेतला अशी खेडी निवडली आणि १९ व २० मार्च १९५९ रोजी सीमालढा बैठकीत साराबंदीचा अंतिम निर्णय घेण्यात आला.[३६]

साराबंदी म्हणजे सामुदायिक सत्याग्रही प्रतिकाराचा लढा असे म्हटले आहे. सरहद्दीचा प्रश्न सुटेपर्यंत शेतकरी सरकारचा सारा भरणार नाही म्हणजे सरकारच्या मूलभूत जमिनीच्या कायद्यालाच हे आव्हान होते. याचा परिणाम साराबंदी शेतकरी व सरकार यांच्यातील संबंध अधिकच विकोपाला गेले. कर्नाटकचे जत्ती सरकार यांनी पोलिसांकरवी हा लढा मोडीत काढण्यासाठी लाठीमार केला. निरपराध लोकांना कसायाप्रमाणे झोडपून काढले, लाथाबुक्क्यांनी मारणे, बंदुकीच्या दस्स्त्याने मारणे, तोंडावर थुंकणे, बुटांनी तुडविणे, यातून बालक, पुरुष, स्त्रिया, वृद्ध कोणीही सुटले नाहीत. परंतु येळ्ळूरच्या शेतकऱ्यांनी प्रसंगी आपले प्राण गेले तरी बेहत्तर पण सारा भरणार नाही असे जत्ती सरकारला आव्हान दिले. सरकारने सारा वसूल करण्यासाठी लॅन्ड रेव्हिन्यू कोडच्या १४८ कलम वापरूनही जर शेतकरी सारा भरत नसतील तर त्या शेतकऱ्यांच्या घरातील मालमत्तांची जप्ती करणे, शेतातील पिकांची जप्ती करणे, जमीन सरकारजमा करणे, शेतकऱ्यास अटक करणे इ. गोष्टी कलम १५० खाली करण्यास सुरूवात केली. तरीही शेतकरी डगमगला नाही. शूर शेतकऱ्यांनी एकीच्या जोरावर हा हल्ला स्वाभिमानाने परतवून लावला.

### १.१८.११.१ येळ्ळूर साराबंदी

साराबंदीचा लढा गाजला तो येळ्ळूर भूमीत. हा लढा सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा आहे. जनतेने जिद्दीने लढविलेला हा लढा आहे. कारण या लढ्यात कर्नाटक सरकारने जेवढी म्हणून राक्षसी कृत्ये करता येतील तेवढी केली आहेत.

८ फेब्रुवारी १९६० रोजी येळ्ळूर येथे साराबंदीचा लढा झाला त्यावेळी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात पाचजण जखमी झाले. त्यामध्ये भरमाण्णा मुकुंद शहापूरकर, मारूती विष्णू बसरीकट्टी, केदारी नागो गोरल, रामजी आप्पाण्णा पाटील व बसवंत नागोजी धामणेकर हे होत. या लढ्यामध्ये महिलांनीही मोठी साथ दिली होती. लक्ष्मीयात्रा होणार असल्याने प्रत्येकाच्या घरात मिरची पावडर

तयार होती. एका बाजूने महिलांनी हातात तिखटाच्या बरण्या घेऊन पोलिसांच्या डोळ्यात तिखट फेकण्याचे काम केले तर युवकांनी दगड फेकण्याचे काम केले. पैलवांनानी तर अनेक पोलिसांना उचलून फेकले होते.

येळ्ळूर पाठोपाठ १० मार्च १९६० रोजी डी. एस. पी. ल्युईस व डेप्युटी कमिशनर शेषाद्री दहा मोटारी भरून लष्करी पोलीस, एक बुलडोझर, एक वायरलेस गाडी एवढा लवाजमा घेऊन बेळगावहून खानापूर भागात गेले. तेथे शिंदोळी, करंबाळ, जळगे, रांगूरेवाडी, नालवाडी, बेडवाड, गणेबैल, काडिनेग, एपान, नंदगड, भोषीवाड या साराबंदीत सहभागी झालेल्या गावांवर धाड टाकून अनेक पोती भात व इतर महत्त्वाचे साहित्य जप्त केले. याला गावकऱ्यांनी प्रतिकार करताच ल्युईस आपले रौद्र रूप धारण करत होते. खानापूरमध्ये आजही या मागणीच्या निषेधार्थ हरताळ पाळण्यात येतो. ल्यूईस हा कर्नाटक सरकारच्या इशाऱ्यावर चालणारा होता. काहीही झाले तरी, कितीही मुडदे पडले तरीसुद्धा सारा जमा करायचाच या ईर्षेने तो पेटून उठला होता. या ल्युईसने गर्लगुंजीत जे नरकासूराचे थैमान घातले होते त्यासंदर्भात बेळगावच्या महाराष्ट्र एकीकरण समितीचे अध्यक्ष श्री. बा. रं. सुंठणकर यांनी संसद व विधिमंडळाच्या सदस्यांना उद्देशून एक निवेदन प्रसिद्ध केले. त्यामध्ये गर्लगुंजी खेड्यात क्रूरकर्मा ल्युईस याने जे सैतानी थैमान घातले त्याचे वर्णन दिले आहे. ते ''आज बेळगावच्या डी. एस. पी. ल्यूईसने खानापूर तालुक्यातील गर्लगुंजी या गावावर धाड टाकली. चौदा गाड्यांत २७० पोलीस त्याने बरोबर घेतले होते. काही अंतरावर गाड्या उभ्या ठेवून तो पोलीसांना घेऊन गेला व गावाला वेढा दिला. शेषाद्री, परेरा व पाटील बरोबर होते. रस्त्याने मारझोड करीत ते पंचायतीच्या इमारतीत शिरले. पोस्ट ऑफीसपण तिथेच होते. या दोन्ही ठिकाणची कपाटे फोडली. घरमालकाने हरकत घेतली पण ती जुमानली नाही. नंतर ते दवाखान्याकडे वळले. डॉ. पाटील यावेळी दवाखान्यात शिरत होते. त्यांच्या तोंडावर एका पोलीसाने 'तू पुढारी आहेस, सारा देत नाहीस काय?' असे म्हणून ठोसा लगावला, तोंडातून रक्त येऊ लागले तेव्हा बरगड्यात ठोसे मारले, डॉक्टरही कोलमडून पडले. त्यांना घरात ओढत नेऊन 'चहा कर' म्हणून सांगितले. ते म्हणाले, ''माझ्याजवळ सामान नाही.' तेव्हा घरात शिरून मारहाण करून सामानाची नासधूस केली. नंतर सापडेल त्याला हाणामारी सुरू केली. नंतर ते एका घराशी गेले.

बालकाला मारहाण केली व बायकांना दमदाटी करून सारा मागू लागले. त्यांनी तो नाकारला तेव्हा 'बऱ्या बोलाने पैसा देऊन टाक, नाहीतर तुझ्या पोराला ठार मारू' अशी डेप्युटी सुपरिटेंडेंट पाटील यांनी धमकी दिली. मुलाला आडवा घालून पोलीस बडवीतच होते. हे राक्षस त्याला ठार मारणार, अशा भीतीने बाईने सारा भरला तर एका पाऊणशे वर्षाच्या म्हाताऱ्याला ओट्यावर बसवायचे व खाली लोटून दयायचे, पुन्हा बसवायचे, पुन्हा लोटायचे असा क्रम चालविला. तर आंधळ्याला लाथाबुक्क्यांनी मारले. महिलांना अश्लिल शिव्या देणे, मारबडव करणे व त्यांच्याकडून सारा वसूल करून घेणे सुरू केले. पण धोंडुबाई पाटलिणीने मात्र साफ नकार दिला. तिने परेराला ठणकावून सांगितले, 'खबरदार, घाणेरडे बोलू नका, कायद्याने काय करायचे असेल ते करा' असे बाईने सुनावले 'छाती असेल तर घाल गोळी' असे म्हटल्याने पोलीसांची बंदूकच खाली आली.[३७]

साराबंदी लढा यशस्वी होण्यासाठी तीन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या.

१. गावची अभेद्य एकजूट

२. शिस्त

३. शांतता

वरील तीन हत्यारांचा वापर साराबंदी करण्यासाठी सीमावासीयांनी केला. पण कर्नाटक सरकारने हे मोडीत काढण्यासाठी नवीन षडयंत्रे वापरली. त्यामध्ये –

१. प्रलोभने

२. गावागावात अविश्वास पसरविणे

३. स्थानिक सरकारी नोकरांना जनतेच्या विरूद्ध उभे करणे

४. घबराट पसरविणे

पण जनता डगमगली नाही. शेवटी सामुदायिक आमिष दाखविण्यासाठी सरकारने विकासकार्याचा उपयोग करण्याचे ठरविले. त्यामध्ये बसुर्ते या गावाची १९ वर्षे लोंबकळत पडलेली एक लक्ष नव्याण्णव हजारांची बंधाऱ्याची योजना मंजूर करण्याचे आमिष दाखविले. पण गावकऱ्यांनी ती नाकारली. शेवटी सरकारने आपले निकराचे शस्त्र बाहेर काढले, लँड रेव्हिन्यू कोड कलम १४८

प्रमाणे हजारो शेतकऱ्यांना नोटीसा लागू करण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त करण्याचा प्रयत्न प्रथम कारवार जिल्ह्यात किन्नर गावी झाला. दुसरा प्रयत्न कमालनगर व लखनगाव (जि. बिदर, ता. संतपूर) या दोन गावी झाले. त्यालाही सामुदायिक सत्याग्रही प्रतिकाराच्या मार्गाने परतवून लावले.[३८]

एकंदरीत एकूण ९५ ते ९८ टक्के शेतकऱ्यांनी साराबंदी लढा यशस्वी करून महाराष्ट्राविषयीचा ताठ बाणा दाखवून दिला होता.

### १.१८.१२ पुणे मोर्चा

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ भाई दाजिबा देसाई यांच्या नेतृत्वाखाली लढण्यास सुरूवात झाली. ४ जुलै १९६० रोजी बेळगाव सीमाभागातील १००० सत्याग्रही बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशा गगनभेदी घोषणा देत पुणे स्टेशनवरती उतरल्या. त्यामध्ये कारवार, भालकी, मुंबईपर्यंतचे सत्याग्रही दाखल झाले. पुण्यात काँग्रेस महासमितीचे अधिवेशन भरले होते. त्या अधिवेशनाला पंडित नेहरूंपासून सारे काँग्रेसचे पुढारी उपस्थित होते. पंडित नेहरूंना निवेदन देण्यासाठी शनिवारवाड्यापुढे ३००० सत्याग्रही व जवळजवळ २०,००० प्रेक्षक जमा झाले होते. सत्याग्रहींमध्ये १०० महिलाही सहभागी झाल्या होत्या. या मोर्चाचे नेतृत्व संयुक्त महाराष्ट्राचे सरचिटणीस भाई दाजिबा देसाई, आचार्य अत्रे, क्रांतिसिंह नाना पाटील इ. नी स्वीकारले होते. शिवाजी महाराजांच्या जयजयकारात काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनाकडे मोर्चा पुण्याच्या प्रमुख रस्त्याकडेने पुढे जाऊ लागला. मोर्चाबरोबर शाहिर आमिर शेख यांचे कलापथक लोकांना हुरूप देत होते. रस्त्याच्या बाजूने हजारो लोक शुभेच्छा देत होते. संभाजी पुलापर्यंत मोर्चा आला असता दाजिबा देसाई, दत्ता देशमुख आणि नाना पाटील या मंडळीना पोलीसांनी कडे करून अटक केली. त्यामागून आलेल्या १०० सत्याग्रहींच्या तुकडीलाही अटक करण्यात आली. त्यामध्ये बेळगावचे नगराध्यक्ष लगाडे होते. बाकीचे सत्याग्रही रस्त्यातच बैठक मारून बसले. त्यामुळे त्या सत्याग्रहींनाही अटक करण्यात आली आणि तुरूंगाकडे रवानगी करण्यात आली.[३९]

कर्नाटकचे तत्कालिन मुख्यमंत्री ब. दा. जत्ती यांनी १ मे १९६० रोजी सीमाप्रश्न संपलेला नाही हे मान्य करून चौसदस्यीय समितीची नेमणूक करण्याची तयारी दर्शविली होती. त्या पार्श्वभूमीवरतीच ५ जून १९६० रोजी चौसदस्यीय समितीची नेमणूक करण्यात आली. पण या समितीचे कार्य पुढे जाऊ शकले नाही.

भारताचे तत्कालिन उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनीही महाराष्ट्र एकीकरण समितीच्या शिष्टमंडळास फेब्रुवारी १९६१ मध्ये सीमाप्रश्न हा महत्त्वाचा असल्याचे निर्विवादपणे मान्य केले होते. एकंदरीत कर्नाटक सरकार आणि केंद्र सरकार यांना मराठी भाषिक जनता कन्नड भाषिक राज्यामध्ये असल्याचे मान्य होते. पण प्रश्न सोडविण्यासाठी मात्र उपाययोजना करण्यास तयार नव्हते. मे १९६४ मध्ये केंद्रीय गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांनी म्हैसूर राज्याच्या मुख्यमंत्र्याबरोबर सीमाप्रश्नासंदर्भात आठ तास चर्चा केली. परंतु फलनिष्पत्ती मात्र शून्य.

### १.१८.१३ महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांचे उपोषण

महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांनी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या मुंबईत होणाऱ्या सभेच्यावेळी उपोषणास बसण्याचा निर्णय घेतला होता. सीमाभागातील महाराष्ट्र एकीकरण समितीच्या सातही आमदारांनी विधानसभा सभासदत्वाचे राजीनामे देऊ केले होते. त्यावेळी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्यांना सबुरीचा सल्ला दिला आणि समितीच्या नेत्यांना दिल्लीला भेटीस बोलावले. बॅ. नाथ पै यांच्या नेतृत्वाखाली १६ मे १९६५ रोजी महाराष्ट्र एकीकरणाच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची भेट घेतली. खासदार नाथ पै यांनी सीमावासीयांची कैफियत प्रभावीपणे पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधीसमोर मांडली. श्रीमती इंदिरा गांधी यांनी सहानुभूतीने प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. दिल्लीच्या भेटीत नाथ पै यांच्यासमवेत शिष्टमंडळाने गृहमंत्री आणि काँग्रेसच्या अन्य ज्येष्ठ नेत्यांचीही भेट घेतली. सर्वांची सहानुभूती दिसून आली. पण ताबडतोबीने काही निष्पन्न होण्याची शक्यता दिसून आली नाही. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या मुंबईच्या सभेच्यावेळी उपोषणाचा कार्यक्रम करण्याचे निश्चित झाले.[४०]

२० मे १९६६ रोजी मुंबईत अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक होती. काँग्रेस श्रेष्ठींचे सीमाप्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र एकीकरण समितीचे बेळगावचे नेते बा. रं. सुंठणकर, बळवंतराव सायनाक, पुंडलिक कातगडे यांनी महाराष्ट्राचे तत्कालिन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या 'वर्षा' या निवासस्थानाजवळ बेमुदत उपोषणास बसण्याचे ठरवले. तिघेही ज्यावेळी सेनापती बापटांचा आशिर्वाद घेण्यासाठी त्यांना भेटावयास गेले त्याचक्षणी सेनापती बापटांनीदेखील त्या तिघांसह प्राणांतिक उपोषण करण्याचा निर्धार केला. पंच्याहत्तरी उलटून गेलेल्या सेनापती बापट यांनी महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांबरोबर प्राणांतिक उपोषण सुरू करताच सर्वत्र खळबळ माजली. भौगोलिक सलगता, भाषिक बहुसंख्या, खेडे घटक आणि लोकेच्छा लक्षात घेऊन, तसेच १९५१ च्या जनगणना अहवालाच्या आधारे निश्चित कालमर्यादेत सीमाप्रश्न सोडवण्यासाठी यंत्रणा उभी करावी अशी उपोषणकर्त्यांची मागणी होती. सेनापती बापट यांचे वय व त्यांचा निग्रही स्वभाव लक्षात घेता आंध्रातील 'पोट्टी श्रीरामूल्लू' प्रकरणाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येणार नव्हती, त्या शक्यतेच्या कल्पनेनेच काँग्रेस नेत्यांची पाचावर धारण बसली. दि. २२ मे १९६६ रोजी स्वत: पंतप्रधान इंदिरा गांधीनी उपोषणस्थळी सेनापती बापट यांची भेट घेतली व सीमाप्रश्न सोडविण्याचे आश्वासन देऊन उपोषण थांबविण्याची विनंती केली. तथापि यासंदर्भात ठोस निर्णयाची अंमलबजावणी होईपर्यंत उपोषण थांबवण्यास सेनापतींनी नकार दिला. अखेर २३ मे १९६६ रोजी काँग्रेस कार्यकारिणीने ठराव करून सीमाप्रश्न सोडवण्यासाठी एकसदस्यीय आयोग नेमण्याची केंद्र सरकारकडे शिफारस केली. ही शिफारस केल्यानंतरही सेनापतींनी उपोषण सोडले नाही. त्यांना इंदिरा गांधीकडून स्पष्ट आश्वासन हवे होते. केवळ काँग्रेस कार्यकारिणीच्या शिफारशीवर विसंबून राहण्यासारखी परिस्थिती नव्हती. अखेर बॅ. नाथ पै यांनी सेनापती बापट यांच्यावतीने इंदिरा गांधीशी चर्चा केली व सीमाप्रश्नासंदर्भात एक महिन्याच्या आत आयोग नेमण्याचे आश्वासन पंतप्रधानांनी दिल्यानंतर सेनापती बापट व त्यांच्या सहकाऱ्यांनी सहा दिवस चाललेले उपोषण सोडण्याचा निर्णय घेतला.[४१]

### १.१८.१४ महाजन आयोग

२५ ऑक्टोबर १९६६ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्याशाधीय मेहेरचंद महाजन यांच्या एकसदस्य आयोगाची नेमणूक केली. न्या. महाजनांनी सीमाभागाची प्रत्यक्ष फिरून पाहणी केली. त्यांना २२४० निवेदने देण्यात आली. ७५७२ व्यक्तींच्या साक्षी झाल्या. महाराष्ट्राची बाजू ॲ. अशोक सेन यांनी मांडली. बेळगाव भागाची बाजू मांडण्याकरिता ॲड. व्ही. एस. पाटील, बॅरिस्टर तिळवे, ॲड. ना. य. चिमडे यांची नेमणूक करण्यात आली होती. न्या. महाजन यांनी १९६ पानांचा पाच भागातील अहवाल केंद्र सरकारला २५ ऑगस्ट १९६७ रोजी सादर केला. या अहवालामध्ये जास्तीत जास्त फायदयाचे माप म्हैसूरच्या पदरात कसे पडेल याची दक्षता न्या. महाजन यांनी घेतल्याचे जाणवते. महाजन यांचा अहवाल केंद्रीय गृहमंत्र्यांनी संसदेत दाखल करून घेतला. मात्र त्यावर चर्चा होऊ दिली नाही.

खेडे हे घटक, भौगोलिक संलग्नता, लोकांच्या इच्छा हा महाजनांनी 'पाटसकर अहवाल' मोडीत काढला. पुन्हा ''बेळगावातील सामान्य मराठी भाषिकाला मराठी भाषेचा ज्वर नाही, तो ज्वर राजकीय कार्यकर्त्यांनी चढलेला आहे'' असा पूर्वग्रहदूषित शेरा मारला.[४२]

न्या. महाजन यांनी आपल्या अहवालात २२७ खेड्यांचा १३६८ चौरस मैलांचा ३,४९,४३९ लोकसंख्येचा महाराष्ट्राचा प्रदेश म्हैसूरला दिलेला आहे. महाराष्ट्राचे अक्कलकोट शहर आणि जत तालुक्यातली ४४ खेडी, दक्षिण सोलापुरातली ६५ खेडी आणि गडहिंग्लज तालुक्यातली १५ खेडी म्हैसूरच्या घशात पडणारा महाराष्ट्राने एकंदर ८१४ खेडी मागितली होती. त्यापैकी फक्त २६४ खेडी आणि निपाणी, खानापूर, नंदगड ही गावे असा ६३६ चौरस मैलांचा आणि २,३१,००० लोकसंख्येचा प्रदेश महाराष्ट्राला मिळणार आहे. हल्याळ, सुपे, आणि ५४ गावे यामध्ये बहुसंख्य मराठी भाषिक राहतात ही गोष्ट महाजनांनी कबूल केली आहे. पण ह्या भागात सुंदर जंगल आहे म्हणून ते म्हैसूरातच राहिले पाहिजे असा त्यांनी निर्णय दिला. तसेच कासारगोंडमध्ये कन्नड उमेदवार निवडून आला म्हणून ते कर्नाटकला जोडतात तर बेळगावमध्ये बहुसंख्येने मराठी उमेदवार निवडून येत असताना ते त्याला 'राजकीय चाल' म्हणतात.

न्या. महाजन यांनी ८३६७२ मराठी भाषिकांच्या सोयीसाठी ९०,००० अमराठी नागरिकांना एकभाषिक मराठी राज्यात डांबणे मला न्याय्य आणि समतोलपणाचे वाटत नाही. पण ४६७९३ कन्नड भाषिकांच्या सोयीसाठी १,२७,००० बिगर कन्नड नागरिकांना एकभाषिक म्हैसूर राज्यात डांबणे त्यांना न्याय्य आणि समतोलपणाचे वाटले. 'बेळगावमधील ४६ टक्के (१९६१ मधील आकडे) एका भाषिक गटाचे लोक (मराठी) स्वत:बरोबर ५४ टक्के अन्य भाषिक लोक खेचून नेऊ शकत नाहीत तर कन्नड गटाचे २६ टक्के लोक स्वत:बरोबर इतर ७४ लोकांना कसे खेचून नेऊ शकतात याचे स्पष्टीकरण महाजन देऊ शकत नाहीत.[४३]

पुढील कोष्टकातील आकडेवारीवरून महाजन अहवाल कसा पक्षपातीपणे कर्नाटकची बाजू मांडत होता हे लक्षात येईल.

**सारणी क्रमांक १.४**

**महाजन यांनी महाराष्ट्राला देऊ केलेली गावे**

| **तालुका** | **गावे** | **एकूण लोकसंख्या** | **मराठी टक्केवारी** |
|---|---|---|---|
| निपाणी | ४१ | १०७८५६ | ७३.० |
| हुक्केरी | ०९ | ९२२९ | ९०.५ |
| बेळगाव | ६२ | ७५३०३ | ८०.६ |
| खानापूर | १५२ | ७८६८५ | ८०.५ |
| एकूण | २६४ | २७१००० | |

बेळगाव सहकार दर्शन – मराठी शब्द सोहळा, दिवाळी विशेषांक, २०१२

**सारणी क्रमांक १.५**

**महाजन यांनी महाराष्ट्राकडून कर्नाटकाला देऊ केलेली गावे**

| **तालुका** | **गावे** | **एकूण लोकसंख्या** | **मराठी टक्केवारी** |
|---|---|---|---|
| अक्कलकोट | संपूर्ण तालुका | १५३२३ | ५६.९ |
| जत | ४४ | ६५२०७ | ६९.१ |
| दक्षिण सोलापूर | ६५ | ८८८३९ | ५१.४ |
| गडहिंग्लज | १५ | २००६० | ५७.६ |
| एकूण | १२४ | १८९४२९ | – |

बेळगाव सहकार दर्शन – मराठी शब्द सोहळा, दिवाळी विशेषांक, २०१२

**सारणी क्रमांक १.६**

**महाजन यांनी महाराष्ट्राला नाकारलेली गावे**

| **तालुका** | **गावे** | **मराठी** | **कन्नड** | **इतर** |
|---|---|---|---|---|
| बेळगाव | शहर | ५१.२० | २५.२० | २३.६० |
| बेळगाव तालुका | ०९ | ९६.१६ | – | – |
| हुक्केरी | ०९ | ८०.०० | – | – |
| अथणी | १० | ६१.०० | ३३.०० | ६.०० |
| खानापूर | ५० | ८६.७० | – | – |
| कारवार | ५० | ७८.०० | १५.०० | ७.०० |
| सुपा | १३१ | ८४.०० | ६.०० | १०.०० |
| हल्याळ | १२० | ६७.०० | ३७.०० | १६.०० |
| हुमनाबाद | २८ | ६३.०० | १६.०० | २१.०० |
| भालकी | ४९ | ५९.०० | ३०.०० | ११.०० |
| संतपूर | ६२ | ६०.०० | २६.०० | २४.०० |
| आळंद | १० | ६८.०० | २४.०० | ८.०० |

पोवार एस. एन., दैनिक तरूण भारत, बेळगाव

महाजन यांच्या अन्यायी अहवालाचा पंचनामा बॅ. अ. रा. अंतुले यांनी महाजन अहवाल अनकव्हर्ड (Mahajan Report Uncovered) या ग्रंथात केलेला आहे.

महाजन यांनी हा तंटा सोडविण्यासाठी स्वत:च निश्चित केलेली तत्त्वे व सूत्रे पुढीलप्रमाणे –

१. सीमातंटा हा भाषिक एकजिनसीपणा लक्षात घेऊन सोडविला पाहिजे. परंतु दळणवळण, भौगोलिक परिस्थिती, आर्थिक बाबी, वाहतुकीची सुलभता या बाबीही आयोग विचारात घेईल.

२. जेथे एखाद्या साधारण आकाराच्या भौगोलिक पट्ट्यात एखाद्या भाषिकांची संख्या अधिक आहे व किमान वीस हजार लोकसंख्या आहे, असा प्रदेश त्याच्या लगतच्या एकभाषिक राज्यात घालण्यासंबंधी विचार करण्यात येईल.

३. सन १९६१ ची खानेसुमारी आधारभूत धरण्यात येईल.

४. ओसाड गावांच्या बाबतीत प्रत्येक गावाची भौगोलिक व इतर परिस्थितीचा तेथील जमिनीच्या मालकीचे स्वरूप लक्षात घेऊन विचार करण्यात येईल.[४४]

१९६७ साली न्या. महाजनांनी आपला अहवाल गृहखात्यास सादर केला. परंतु या अहवालाच्या शिफारशीमुळे प्रश्नावर सहमती होऊ शकली नाही. न्या. महाजन यांनी आपण तयार केलेली तत्त्वेही एकाच पद्धतीने लागू केली नाहीत. अनेक विसंगतींनी भरलेला आणि कर्नाटकाचा पक्षपाती असा हा अहवाल आहे. महाजन अहवालातील सर्व शिफारशी जशाच्या तशा स्वीकाराव्या असे कर्नाटकास वाटते, म्हणून त्यांनी अहवालास मान्यता दिली. १६ डिसेंबर १९७० रोजी दुपारी १ वाजता सरकारने महाजन अहवाल लोकसभेपुढे चर्चेसाठी ठेवला. लोकसभेतील सदस्य आपल्या बाजूने वळवून घेण्यासाठी कर्नाटकच्या प्रतिनिधींनी खूप प्रयत्न केले. सुंदर नक्षीदार अशा चंदनी चकत्या सदस्यांना वाटण्यात आल्या होत्या. सीमाप्रश्नावर चर्चा करताना त्याचा उल्लेख बॅ. नाथ पै यांनी आपल्या भाषणात केला होता. ते म्हणाले, ''खुशबूचे वातावरण आहे. सुवासिक चंदनी चकत्यांचा वास घेता घेता महाजन अहवालाची दुर्गंधी दूर करूया.''[४५]

### १.१८.१५ शिवसेनेचे हुतात्मे

नोव्हेंबर १९६८ मध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे बेळगाव येथे जाऊन आले आणि त्याच दरम्यान दादरच्या शिवाजी पार्क मैदानावर झालेल्या सभेत सीमाप्रश्न ठराविक मुदतीत न सुटल्यास पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, कर्नाटकाचे (तत्कालिन म्हैसूर राज्य) मुख्यमंत्री आणि काँग्रेस अध्यक्ष यांना त्यांनी मुंबईत प्रवेशबंदी जाहीर केली. दि. २९ डिसेंबर १९६८ रोजी कामगार मैदानावर झालेल्या एका सभेत बोलताना ही बंदी दि. २६ जानेवारी १९६९ पासून आपण लागू करणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. दि. २७ जानेवारी १९६९ रोजी तत्कालिन केंद्रीय मंत्री यशवंतराव चव्हाण यांची गाडी शिवसैनिकांनी माहीम येथे अडवण्याचा निकराचा प्रयत्न केला. त्यावेळी शिवसैनिकांवर लाठीहल्ला करण्यात आला. ही वादळापूर्वीची नांदी होती.

या पार्श्वभूमीवर दि. ७ फेब्रुवारी १९६९ रोजी उपपंतप्रधान मोरारजी देसाई मुंबईत येणार होते, शिवसैनिकांनी सीमाप्रश्नासंदर्भात मोरारजींना माहीम नाक्याजवळ एक निवेदन दयावे असे ठरले. तथापि मोरारजींची गाडी नियोजित स्थळी न थांबता पुढे जात आहे हे दिसल्यानंतर एका शिवसैनिकाने गाडीपुढे स्वत:ला झोकून दिले. त्याला चिरडून मोरारजींची गाडी भरधाव वेगाने पुढे निघून गेली. मोरारजी म्हणजे संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील खलनायक. यापेक्षा त्यांच्याकडून वेगळी अपेक्षा करणे व्यर्थ होते. मोरारजींच्या या खूनशी वर्तनाने ठिणगी पडली व मुंबईत दंगल भडकली. या दंगलीने भीषण स्वरूप धारण केले. दादर, नायगाव, परळ, चिंचपोकळी, लालबाग, भायखळा, भोईवाडा सर्वत्र शिवसैनिकांच्या प्रक्षोभाचा उद्रेक झाला. दि. ७ फेब्रुवारीच्या मध्यरात्रीला मुंबईतल्या सगळ्या सभा, मोर्चे, मिरवणुका यावर बंदी घालण्यात आली. शिवसेनेच्या दत्ताजी साळवींनी बंदीहुकूम मोडून भोईवाडा येथे सभा घेण्याचा प्रयत्न करताच त्यांना अटक करण्यात आली. दि. ९ फेब्रुवारी १९६९ रोजी प्रत्यक्ष शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे याबरोबरच मनोहर जोशी व दत्ताजी साळवी यांनाही अटक करण्यात आली. त्यामुळे दंगलीचा वणवा पुन्हा सर्वत्र भडकला. कुलाब्याच्या दांडीपासून दहिसर–मुलुंडपर्यंत पसरलेल्या अवघ्या मुंबापुरीत प्रक्षोभ निर्माण झाला. शिवाजी पार्क, सिटी लाईट येथील पोलीस चौक्यांची होळी झाली. पोलीस आयुक्त मोडक यांच्या गाडीवर तुफान दगडफेक करण्यात आली. तीन पोलीस अधिकारी आणि तीस पोलीस जबर जखमी झाले. सर्वत्र संचारबंदी जारी करण्यात आली. लष्कराला पाचारण करण्यात आले. यावेळी झालेल्या गोळीबारात ६७ शिवसैनिकांना हौतात्म्य पत्करावे लागले. दंगल आटोक्यात येत नसल्यामुळे अखेरचा उपाय म्हणून शिवसेनाप्रमुखांनी जनतेला शांततेचे आवाहन करावे अशी राज्य सरकारतर्फे त्यांना विनंती करण्यात आली. यावेळी शिवसेनाप्रमुख येरवडा कारागृहात स्थानबद्ध होते. त्यांनी शिवसैनिकांना आवाहन केले. त्यानंतर जनजीवन पूर्वपदावर यायला सुरूवात झाली.[४६]

### १.१८.१६ नाथ पै यांचे राज्य सीमा मंडळ विधेयक

पण महाजन कमिशनला कुठलीही मार्गदर्शक तत्त्वे दिली नसल्याने महाजन कमिशनचा अहवाल महाराष्ट्राच्या विरोधात गेला आणि सीमा समस्या अधिक जटील बनली. त्यानंतर झालेल्या लोकसभेच्या निवडणुका, काँग्रेस पक्षाचे झालेले विभाजन, बांगलादेशाची लढाई आणि १९७१ च्या जानेवारीत लोकसभा बरखास्त करून इंदिरा गांधींनी घेतलेली लोकसभेची मध्यावधी निवडणूक अशा धकाधकीच्या राजकीय वातावरणात सीमाप्रश्न रेंगाळत राहिला. पण बॅ. नाथ पै यांनी मात्र सीमाप्रश्नाचा पाठपुरावा सोडला नाही. नाथ पै यांची लोकशाहीवर श्रद्धा होती. लोकशाहीत लोकसभा सार्वभौम असते. राज्यांच्या सीमासारख्या वादग्रस्त समस्या कटूता टाळून शांततेच्या व सनदशीर मार्गांनी मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे कायदे करून सोडविले पाहिजेत असे त्यांचे मत होते. यासंदर्भात नाथ पै यांनी १९६९ साली एक अशासकीय विधेयक लोकसभेत सादर केले होते. या विधेयकामागील उद्देश नाथ पै यांनी पुढील शब्दात व्यक्त केला होता. ''राज्य पुनर्रचना झाल्यावरही सीमा अनिर्णित राहिल्यामुळे राज्याराज्यात सीमाप्रश्नावरून तंटे वाढत आहेत. त्यातून निर्माण होणाऱ्या कटुतेमुळे राष्ट्राच्या ऐक्याला धोका निर्माण झाला आहे. राष्ट्राचे ऐक्य टिकविण्यासाठी, त्याचप्रमाणे जनतेचा लोकशाहीवरील विश्वास दृढ करण्यासाठी असे सर्व तंटे तातडीने सोडविले पाहिजेत. निश्चित आणि सर्वमान्य तत्त्वांच्या अभावी असे तंटे अजूनपर्यंत मिटू शकले नाहीत, या विधेयकाद्वारे अशी मार्गदर्शक तत्त्वे मांडण्यात येत आहेत.''

नाथ पै यांचे महत्त्वपूर्ण विधेयक पुढीलप्रमाणे होते.

भारतीय प्रजासत्ताकाच्या विसाव्या वर्षी संसद पुढील कायदा करीत आहे.

१. (अ) ''राज्य सीमा मंडळ कायदा १९६९'' या नावाने हा कायदा ओळखला जाईल.

(ब) हा कायदा ताबडतोब अंमलात येईल.

२. राष्ट्रपती राज्य सीमा मंडळाची नियुक्ती करतील. या मंडळाचे अध्यक्ष वरिष्ठ न्यायालयाचे न्यायाधीश राहतील, शिवाय मंडळाचे आणखी दोन सदस्य असतील. मात्र ते केंद्र वा राज्य सरकारचे नोकर असता कामा नयेत.

३. खाली नमूद केलेल्या कसोट्यांच्या अधीन राहून मंडळ प्रत्येक सीमा तंटा सोडवील/मिटवील.

अ) खेडे हा घटक मानण्यात यावा.

ब) भाषिक बहुमत आणि ते नसल्यास सापेक्ष बहुमत निर्णायक मानण्यात यावे.

क) वरील दोन कसोट्या लागू करताना प्रदेशांची भौगोलिक सलगता विचारात घेण्यात यावी.

सीमाप्रश्नांच्या बाबतीत बॅ. नाथ पै यांनी सुचविलेल्या मार्गांचा अवलंब केला असता तर उभय पक्षातील कटुता टाळून हा प्रश्न यापूर्वीच सामोपचाराने सोडविता आला असता. पण हितसंबंधीयांच्या दबावाखाली अगर अन्य अनाकलनीय कारणाने भारत सरकारची हा प्रश्न सोडविण्याची मानसिकता दिसून येत नाही, हे सीमाभागातील मराठी भाषिकांचे आणि महाराष्ट्राचेही दुर्दैव म्हणायला हवे.[४७]

महाजन अहवालातील विसंगती व पक्षपातीपणा दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या लक्षात आला. त्यामुळे १९६७ साली महाजन अहवाल सादर होऊनही लोकसभेच्या पटलावर ठेवण्यात आला नाही. १९ फेब्रुवारी १९७० रोजी इंदिरा गांधी यांनी महाजन अहवालात महाराष्ट्राला दिलेल्या २६४ खेड्यांबरोबरच २३३ जादा गावे आणि बेळगाव शहराचा दक्षिण भाग महाराष्ट्राकडे तर मंगळवेढा तालुक्यातील ८ गावे महाराष्ट्रातून कर्नाटकाकडे बदली करावीत अशा तात्पुरत्या प्रस्तावाची सूचना केली. पण यावर महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यामध्ये चर्चा घडून आली नाही.

१९७० च्या मार्चमध्ये लोकसभेत असे निवेदन केले गेले की, एका राज्यातून दुसऱ्या राज्यात प्रदेश घालण्याच्या महाजन अहवालाच्या काही निश्चित शिफारशींच्या अंमलबजावणीबरोबरच काही ठिकाणी थोडी अदलाबदल करावी लागेल की ज्यायोगे सीमाप्रश्न सुटण्यास मदत होईल. यानुसारच १९७४ साली काही योजना पुढे आल्या. या योजनांचा तपशीलही त्यावेळचे गृहमंत्री उमाशंकर दीक्षित यांनी त्यावेळच्या महाराष्ट्र–कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांना दिला होता. ज्या योजना पुढे आल्या त्या पुढील तत्त्वानुसार होत्या.

१. एका राज्यातील सीमाप्रदेश दुसऱ्या राज्यात समाविष्ट करण्यासंबंधी महाजन अहवालातील निश्चित शिफारशींचा स्वीकार करण्यात यावा.
२. महाजन आयोगाने सोडलेला पण ५५ टक्क्यांहून अधिक मराठी किंवा कन्नड भूभाग कर्नाटकातून महाराष्ट्रात किंवा महाराष्ट्रातून कर्नाटकात घालावा.
३. हे तत्त्व अंमलात आणताना जवळची शहरे किंवा खेडी जेथे मराठी किंवा कन्नड बहुसंख्य आहेत त्याचा विचार करावा.

१९७४ च्या या योजनेप्रमाणे कर्नाटकातून ६१७ खेडी महाराष्ट्रास तर २६३ खेडी कर्नाटकास मिळतील. जनता सरकारच्या राजवटीतही त्यावेळचे गृहमंत्री एच. एम. पटेल यांनी असाच तोडगा काढला होता. परंतु या योजनांची अंमलबजावणी झालीच नाही.

### १.१८.१७ केंद्र सरकारचा खुलासा

प्रसिद्ध 'द हिंदू' या दैनिकामध्ये महाराष्ट्र व कनार्टक यांच्यातील सीमावादाबाबतच्या महाजन अहवालावर पुनर्विचार करण्यास पंतप्रधान राजीव गांधी यांनी साफ नकार दिला. महाजन आयोगाने आपला अहवाल दिला आहे. आता यावर पुनर्विचार कसा होऊ शकतो असा प्रतिप्रश्न त्यांनी पत्रकारांना केला. काँग्रेस आयच्या 'जवाहर भवन' इमारतीचा पायाभरणी समारंभ केल्यानंतर त्यांनी वक्तव्य केले होते. २७ मे १९८६ रोजी आलेल्या बातमीच्या आधारे कर्नाटकचे तत्कालिन मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांनी लागलीच मंत्रिमंडळाची बैठक बोलावून राजीव गांधी यांच्या अभिनंदनाचा ठराव संमत केला आणि राजीव गांधी यांना पुढीलप्रमाणे अभिनंदन पत्र पाठविले.[४८]

**मुख्यमंत्री**

सीएम २५९ डीओआय ८६
बेंगलूर
मे २८, १९८६

प्रिय पंतप्रधान

कर्नाटक व महाराष्ट्र यांच्यातील सीमावादाबाबत महाजन आयोगाने दिलेल्या अहवालासंबंधी आपण काल केलेल्या विधानामुळे मला आनंद झाला असून मी त्याबाबत कृतज्ञता व्यक्त करतो. सीमाप्रश्नाची पार्श्वभूमी व सद्यस्थितीबाबत आपण योग्य विधान केले आहे. निकालात निघालेला मुद्दा पुन्हा उकरून काढण्याबाबत आपण व्यक्त केलेली चिंता योग्य असून, मी त्याचे मन:पूर्वक स्वागत केले आहे.

सीमाभागात सध्या स्थिती अत्यंत शांततापूर्ण असून, आम्ही ती तशीच टिकवून धरू. आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाची माहिती मी आपल्याला कळवित आहे. बैठकीत मंजूर झालेला प्रस्ताव पुढीलप्रमाणे –

''महाजन आयोगाने बेळगाव मुद्याबाबत सर्वकंष अभ्यास करूनच अहवाल दिला आहे व या अहवालाचे पावित्र्य राखले पाहिजे, या पंतप्रधानांच्या विधानाचे मंत्रिमंडळ स्वागत करीत आहे. तसेच एकदा निर्णय झाल्यानंतर हा मुद्दा पुन्हा उकरून काढला जाऊ नये या आपल्या विचारांशी मंत्रिमंडळ सहमत आहे. कर्नाटक सरकारने घेतलेल्या भूमिकेचे पंतप्रधानांनी समर्थन केल्याबद्दल मंत्रिमंडळ त्यांच्याप्रती कृतज्ञ आहे.''

शुभेच्छा!

आपला विश्वासू,
सही/–
**(रामकृष्ण हेगडे)**

**श्री. राजीव गांधी**
पंतप्रधान, भारत
नवी दिल्ली

मात्र पंतप्रधानांनी आपले हे वक्तव्य महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्नासंदर्भात नव्हते याचा खुलासा करणारे पत्र तत्कालिन मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांना पुढीलप्रमाणे पाठविले.

**पंतप्रधान** नवी दिल्ली

२ जुलै १९८६

प्रिय श्री. हेगडे,

कर्नाटक मंत्रिमंडळाने बेळगाव मुद्याबाबत मंजूर केलेल्या ठरावाबाबतच्या आपल्या पत्राला मी उत्तर पाठविले नसल्याचे माझ्या लक्षात आले.

कठीण समस्यांवर तोडगा निघावा आणि अशा प्रश्नाच्या सखोल अभ्यासाचा फायदा संपूर्ण देशाला व्हावा, याकरिता आयोगांची निर्मिती करण्यात येते. त्यामुळे आयोगांच्या अहवालांवर निराळ्या पद्धतीने विचार करावा लागतो. २७ मे रोजी नवी दिल्ली येथील पक्ष कार्यालयात काही पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मी हाच मुद्दा स्पष्ट केला होता. मी कोणत्याही विशिष्ट अहवालाचा उल्लेख केलेला नव्हता.

लोकांच्या मागणीनुसार स्थापन करण्यात आलेल्या आयोगांच्या निष्कर्षांचा मान राखण्यात आला नाही, तर समस्येची सोडवणूक करणाऱ्या हत्याराची धार बोथट केल्यासारखे होईल. मात्र त्याचवेळी आयोगांनी सर्व समस्या सोडवाव्यात, अशी अपेक्षा करणेही योग्य ठरणार नाही. आयोगाचे निष्कर्ष हे लोकशाही पद्धतीने चर्चा किंवा देण्या–घेण्याच्या मार्गाने प्रश्न सोडविण्याचा पर्याय होऊ शकत नाहीत.

कर्नाटक–महाराष्ट्र सीमावाद दीर्घकाळ रेंगाळत आहे, महाजन अहवालानंतरही काही प्रस्ताव संसदेसमोर मांडण्यात आले आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही. त्यामुळे सीमावाद सोडविण्यासाठी दोन्ही राज्यांनी एकत्र बसून तोडगा काढणे हेच आदर्श ठरेल.

आपला विश्वासू,
सही/–
**(राजीव गांधी)**

**श्री. रामकृष्ण हेगडे**
मुख्यमंत्री, कर्नाटक राज्य,
बेंगळूर

१३ ऑक्टोबर १९७७ रोजी श्री. गोपाळराव पाटील आणि श्री. मष्णूराव पाटील यांनी कन्नडसक्तीविरुद्ध बेळगावच्या सरकारी कचेरीच्या आवारात नऊ दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले होते. तसेच ८ नोव्हेंबर १९७७ रोजी आणि १ मे १९७८ रोजी बेळगाव येथे भव्य सीमापरिषद भरली. कोल्हापूरची सीमापरिषद बाळासाहेब ठाकरे, बाबुराव ठाकूर आणि उदयसिंगराव गायकवाड यांच्या भाषणाने गाजली. सीमाप्रश्न सुटावा यासाठी महिलाही मागे राहिल्या नाहीत. त्यांनी डिसेंबर

१९८३ मध्ये दिल्लीमध्ये मोर्चा काढला. तर ९ ऑगस्ट १९८५ च्या क्रांतिदिनी भौगोलिक सलगता, भाषिक बहुसंख्याक आणि खेडे हा घटक या तत्त्वानुसार महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्न सोडवला जावा या मागणीसाठी दिल्लीच्या बोट क्लबवर एकीकरण समितीच्या ५०० कार्यकर्त्यांनी धरणे धरली.

### १.१८.१८ कन्नड सक्ती

१ जून १९८६ ला कर्नाटक सरकारने सर्वच क्षेत्रात कन्नड सक्ती केली. त्याचा परिणाम संपूर्ण सीमाभागात हाहाकार माजला. खानापूर तालुक्यामध्येही कन्नड सक्ती विरोधात उत्स्फूर्तपणे सत्याग्रह झाला. ५ जून १९८६ रोजी पुण्याचे तत्कालिन महापौर दत्ता एकबोटे यांच्या नेतृत्वाखाली राजा शिवछत्रपती चौकात सत्याग्रह झाला होता. या सत्याग्रहापूर्वीच महापौर दत्ता एकबोटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना अटक करण्यासाठी कर्नाटक पोलीसांनी बरेच प्रयत्न केले. खानापूर तालुक्यात चारही बाजूंनी नाकेबंदी केली गेली. तथापि कर्नाटकी पोलिसांच्या हातावर तुरी देऊन खानापूर तालुक्यातील काही मराठी भाषकांनी महापौर दत्ता एकबोटे यांना शिताफीने राजा शिवछत्रपती चौकात आणून सोडले व सत्याग्रह यशस्वी केला. या आंदोलनाच्या काळात खानापूर तालुक्यातील समिती कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवरायांच्या गनिमी काव्याप्रमाणे कार्य करून आंदोलन यशस्वी केले. त्यावेळी काही कार्यकर्त्यांना पोलीसांच्या लाठ्या झेलाव्या लागल्या. पण कार्यकर्त्यांनी लाठ्याकाठ्यांची तमा न बाळगता निदर्शने करून लढा दिला.[४९] कन्नड सक्तीविरूद्ध उसळलेल्या आंदोलनाचे परिणाम बेळगाव, खानापूरसह नवी दिल्लीतही उमटले. तेथेही अनेक आंदोलने करण्यात आली.

#### १.१८.१८.१ १९८६ ची कन्नड सक्ती

कर्नाटक राज्य सरकारने राज्यातील भाषा प्रश्नांचा विचार करण्यासाठी व्ही. के. गोकाक यांची एक समिती नेमली. या गोकाक समितीने जो अहवाल सादर केला तो केवळ मराठीच नव्हेतर उर्दू, गुजराथी, तामिळ, तेलगू, कोकणी अशा सर्वच भाषांवर अन्यायकारक ठरला. या अहवालानुसार प्रत्येक विद्यार्थ्याला राज्यभाषा कन्नड ही आलीच पाहिजे अशी सक्ती करण्यात आली होती. मराठी भाषिक विद्यार्थ्याला पूर्वी हिंदी हा विषय घेता येत असे आता त्याला हिंदीऐवजी कन्नड विषय सक्तीचा करण्यात आला. कर्नाटकचे त्यावेळचे मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांनी एक आदेश काढून

१ जून १९८६ पासून हे नवे भाषाविषयक धोरण अंमलात येईल असे जाहीर केले. या धोरणानुसार इयत्ता चौथीपासून कन्नड भाषा शिकण्यास मराठी विद्यार्थ्यास भाग पाडले. रामकृष्ण हेगडे यांनी अतिशय चलाखीपणे हा डाव टाकला होता. विद्यार्थ्यांची एक पिढी लिहायला–वाचायला शिकली तर आपोआपच भाषिक लढ्याची धार बोथट होईल असा विचार त्यांनी केला होता. मराठी भाषिक जनतेने हा डाव ओळखला आणि या कन्नड सक्ती विरोधात मोठा उठाव झाला. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन एस. एम. जोशी पुन्हा लढ्यात सामील झाले. बाळासाहेब ठाकरे, शरद पवार यांनीही त्याची दखल घेऊन संयुक्त सीमा समितीची स्थापना केली. त्यातूनच ५ मे १९८६ रोजी कोल्हापूरात विराट सीमापरिषद झाली. या परिषदेला महाराष्ट्र व सीमाभागातील सुमारे ३ लाख मराठी भाषिक हजर होते. १ जून १९८६ रोजी आपण बेळगावात सत्याग्रह करू अशी घोषणा महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली. ३० मे रोजी ते बेळगावात दाखल झाले. शंभर कार्यकर्त्यांची तुकडी घेऊन त्यांनी कित्तूर चन्नम्मा सर्कल येथे १४४ कलम मोडून सत्याग्रह केला. हा सत्याग्रह पाहण्यासाठी हजारो लोक तेथे उपस्थित होते. सत्याग्रह करताच पोलीसांनी शरद पवार यांना अटक केली. इतरही काही सत्याग्रहींना ताब्यात घेतले. लोकांना पांगवण्यासाठी लाठीमार सुरू केला. शरद पवार लाठीमारात जखमी झाले अशी बातमी पसरताच वातावरण कमालीचे तापले व दगडफेकीस सुरूवात झाली. दगडफेक करणाऱ्या जमावावर अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडून पोलीसांनी त्यांना पांगविण्याचा प्रयत्न केला. या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी निघालेल्या साथी एस. एम. जोशी व भाई एन. डी. पाटील यांना निपाणी येथे अटक करण्यात आली. शरद पवार यांना हिडकल धरणावरील डाकबंगल्यात सायंकाळपर्यंत ठेवून रात्री त्यांना सांगली येथे नेण्यात आले व त्यांची तेथे मुक्तता करण्यात आली तर एन. डी. पाटील व एस. एम. जोशी यांना बेळगावात आणून त्यांची मुक्तता करण्यात आली.[५०]

५ जून रोजी मुंबईचे महापौर छगन भुजबळ यांनी ६५ सत्याग्रहींची तुकडी घेऊन वेष पालटून बेळगावात अवतरले. नंतर मोटारीतून हुतात्मा चौकात आले. याप्रसंगी सत्याग्रहींना पोलीसांनी ताब्यात घेतले व जमावावर अत्यंत क्रूरपणे लाठीहल्ला आणि गोळीबार केला. बेळगावात सुरू

असलेल्या या कन्नडसक्तीविरोधी आंदोलनात आठ जणांना हौतात्म्य पत्करावे लागले. ते पुढीलप्रमाणे –[५१]

१. कु. मोहन पाटील, खुळगा, हिंडलगा, बेळगाव

२. श्री. भरमाणी कदम, सुळगा, हिंडलगा, बेळगाव

३. श्री. परशुराम लाळगे, सुळगा, हिंडलगा, बेळगाव

४. श्री. भावकू चव्हाण, बेळगुंदी, बेळगाव

५. श्री. कल्लाप्पा उचगांवकर, बेळगुंदी, बेळगाव

६. श्री. मारूती गावडा, बेळगुंदी, बेळगाव

७. श्री. शंकर बनकर, जुने बेळगाव

८. कु. विद्या बाळकृष्ण शिंदोळकर, वडगांव, बेळगाव

कन्नडसक्तीमुळे बहुसंख्याक मराठी भाषिक असणाऱ्या सीमाभागातील सरकारी कचेऱ्यांतील कागदपत्रे, मालमत्तेचे दाखले, वीज बीले, रेशनकार्डे, बस, रेल्वे आरक्षण फॉर्म, विद्यार्थ्यांना लागणाऱ्या अर्जांचे नमुने केवळ कन्नड भाषेतच उपलब्ध असतात. मराठी शिक्षण संस्था, सामाजिक, सांस्कृतिक संस्था यांचा सरकारी कार्यालयाशी होणारा पत्रव्यवहार आणि त्यांच्या कामकाजाची नोंद कन्नड भाषेतूनच व्हायला हवी असा दंडकच कर्नाटक शासनाने घातला आहे. इतकेच नव्हेतर कर्नाटक राज्य परिवहन मंडळाच्या बसेसवरील व स्थानकावरील सर्व फलक कन्नडमध्येच आहेत तर खाजगी उद्योगधंद्यांचे फलकही कन्नडमध्येच असावेत असा आदेश काढला. सीमाभागातील मराठी शाळांचे फलक, कागदपत्रे, निकाल, प्रगतीपुस्तक इ. कन्नड भाषेतच लिहायला सांगून कर्नाटक सरकारने अन्यायाची परिसीमा गाठली आहे. मराठी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या मराठी पाठ्यपुस्तकातील राष्ट्रगीतसुद्धा कन्नड लिपीत छापण्याचे कारस्थान केले आहे. तसेच परराज्यातून शिक्षणासाठी आलेल्यांनाही कन्नडसक्तीला तोंड दयावे लागत आहे. यापूर्वी आठवी ते दहावीपर्यंत मध्येच कोणत्याही वर्गात प्रवेश घेताना त्यांना संबंधित राज्यात राज्यभाषा विषयाची सक्ती नव्हती. कर्नाटकातही अशा विद्यार्थ्यांना कन्नडऐवजी पर्यायी इंग्रजी विषय घेण्याची मुभा होती. पण आता या

विद्यार्थ्यांना कन्नड विषय सक्तीचा करण्यात आला आहे. अशा विद्यार्थ्यांना कन्नड विषयात १५ गुणांचे महत्त्व दिले जात आहे.

नोव्हेंबर १९८६ मध्ये एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, मधु दंडवते, डॉ. दत्ता सांमत या सीमानेत्यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ पंतप्रधानांना भेटून सीमाभागात सार्वमत घेण्याची सूचना करणारे निवेदन दिले.

### १.१८.१९ सीमापरिषद, खानापूर

कन्नडसक्तीच्या आंदोलनानंतर सीमालढ्याला थोडी शिथिलता आली. त्यामुळे मराठी मावळ्यांनी चळवळीसाठी नेत्यांना तगादा लावला. परिणामी लढ्याचा पुढील मार्ग ठरविण्यासाठी बेळगाव येथे सीमापरिषद भरविण्याचा निर्णय समिती नेत्यांनी घेतला. या परिषदेसाठी ५ मार्च १९८८ ही तारीख निश्चित करण्यात येऊन परिषदेच्या प्रचारास प्रारंभ झाला. त्यासाठी महाराष्ट्रातील नेतेमंडळीनांही निमंत्रित करण्यात आले. पण सीमापरिषदेला केवळ दोन दिवस बाकी असतानाच कर्नाटक शासनाने बेळगाव येथे सीमापरिषद घेण्यास परवानगी नाकारली. अशावेळी खानापूर तालुका महाराष्ट्र एकीकरण समितीने सीमापरिषदेची जबाबदारी स्वत: स्वीकारून शासनाच्या परवानगीने केवळ ४८ तासातच खानापूर तालुक्याने पूर्ण तयारीनिशी ही सीमापरिषद यशस्वी करून दाखविली. या सीमापरिषदेचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री कै. मधु दंडवते यांच्या हस्ते झाले होते. त्यावेळी शिवसेनेच्यावतीने मनोहर जोशी, छगन भुजबळ, दत्ताजी नलवडे, सुधीर जोशी यासारख्या नेत्यांनी हजेरी लावली होती. परिषदेत सीमाप्रश्नासाठी मुंबई येथे बेमुदत धरणे आंदोलनास सुरूवात होऊन जवळजवळ ५३८ दिवस हे आंदोलन चालले.[५२]

२८ सप्टेंबर १९८८ रोजी जिल्हा परिषद व कोर्ट कचेऱ्यातून मिळणारी सर्व कागदपत्रे कानडीत असल्याच्या निषेधार्थ बेळगाव तालुका, खानापूर तालुक्यातील कार्यकर्त्यांसह महाराष्ट्र एकीकरण समितीचा जिल्हाधिकारी कचेरीवर भव्य मोर्चा काढण्यात आला.

### १.१८.२० आमदार व्ही. वाय. चव्हाण यांचा निर्धार

१९८९ च्या कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीवेळी महाराष्ट्र एकीकरण समितीचे उमेदवार श्री. व्ही. वाय. चव्हाण यांनी तीन वर्षात सीमाप्रश्न सुटला नाहीतर आपण आत्मदहन करू असे जनतेला रक्ताने लिहून दिले. त्यावेळी ते विजयी झाले. दिलेल्या वचनाप्रमाणे १७ जानेवारी १९९३ रोजी हुतात्मा दिनादिवशी आत्मदहन करण्याचा निर्णय जाहीर केला. परंतु त्या दरम्यान मुंबईत बॉम्बस्फोट होऊन दंगल माजल्याने त्यांनी आत्मदहन करू नये म्हणून वरिष्ठ नेत्यांचे श्री. चव्हाण यांना फोन येऊ लागले. परंतु दिलेल्या वचनाप्रमाणे आत्मदहन करायचेच म्हणून श्री. चव्हाण अज्ञातस्थळी निघून गेले. त्यावेळी स्मारकाच्या परिसरात पाच हजारपेक्षा जास्त जमाव जमला होता. श्री. चव्हाण वेशांतर करून त्याठिकाणी आले पण कार्यकर्त्यांनी लागलीच त्यांना घेरून त्यांच्याकडील पेट्रोल कॅन, लायटर आदि साहित्य हिसकावून घेतले. त्यामुळे श्री. चव्हाणांचा संकल्प तडीस गेला नाही.[५३]

### १.१८.२१ महापौरांचे उपोषण

महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्नी केंद्राने लक्ष घालून या प्रकरणावर तोडगा काढावा यासाठी केंद्राचे लक्ष वेधून घेण्यासाठी १९९६ मध्ये बेळगाव महानगरपालिकेच्या महापौर विजयालक्ष्मी चोपडे यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत उपोषण करण्यात आले. परंतु त्यावेळी केंद्रात पंतप्रधान म्हणून कर्नाटकचे एच. डी. देवेगौडा असल्याने त्यांनी मराठी द्वेषापोटी या उपोषणकर्त्या महिला महापौरांना साधे सौजन्यही दाखविण्याचे धाडस केले नाही. उलट ‘लेट हर डाय’ असे वक्तव्य करून आपला मराठीद्वेष दाखवून दिला. त्यामुळे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व महाराष्ट्राच्या नेत्यांनी महापौरांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. त्यानुसार चोपडी यांनी उपोषण मागे घेतले.

### १.१८.२२ सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात दाखल

सीमाप्रश्नासाठी लोकशाही मार्गाने अनेक चळवळी झाल्या. तरीदेखील सीमाप्रश्न न सुटल्याने या प्रश्नासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याचा मतप्रवाह पुढे येऊ लागला. १९९५ साली खानापूर तालुका महाराष्ट्र एकीकरण समितीने सीमाप्रश्नासाठी सर्वोच्च न्यायालयात

याचिका दाखल करावी अशा आशयाचा ठराव सर्वप्रथम पास केला. त्याला मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीनेही जोड देऊन त्याचा पाठपुरावा केला व वेळोवेळी महाराष्ट्र शासनाला निवेदने दिली. तत्कालिन मुख्यमंत्री मनोहर जोशी, शरद पवार, एन. डी. पाटील, प्रा. मधु दंडवते, राम कापसे यांची सर्वपक्षीय उच्चाधिकार समिती या प्रश्नासंदर्भात नियुक्त करण्याचा निर्णयदेखील दि. १४ नोव्हेंबर १९९६ रोजी घेण्यात आला. दि. २ जुलै १९९७ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड यांनी महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्न प्रकरणी महाराष्ट्राची भूमिका मजबूत असून या मुद्दयावर सर्वोच्च न्यायालयात जाण्यास हरकत नाही असा सल्ला दिला. दि. २५ नोव्हेंबर १९९७ रोजी महाराष्ट्र व कर्नाटकच्या तत्कालिन मुख्यमंत्र्यांची (मनोहर जोशी व जे. एस. पटेल) संयुक्त पत्रकार परिषद झाली व त्यातही सीमाप्रश्न सामंजस्याने सोडवण्याचे सूतोवाच या मुख्यमंत्री महोदयांनी केले.[५४]

### १.१८.२३ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

इ. स. २००० मध्ये बेळगाव येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले होते. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने मराठी भाषिक जनता उल्हासित झाली होती. संमेलनात सीमाप्रश्नाबाबत चर्चा व ठराव होईल असे वाटत होते. संमेलनाध्यक्ष डॉ. य. दि. फडके यांनी सीमाभाग महाराष्ट्रात समाविष्ट होण्याबाबत विचार मांडले. संमेलनात तशा आशयाचा ठरावही संमत करण्यात आला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे या संमेलनात उद्घाटक म्हणून उपस्थित होते. संमेलनात सीमाप्रश्न सोडविण्यासाठी सर्वपक्षीय व्यासपीठ निर्माण करून केंद्र शासनावर दबाव वाढवावा तसेच सदर प्रश्नाची कायदेशीर बाजू तपासून तो सर्वोच्च न्यायालयात उपस्थित करण्याचा विचार करावा असे ठरले. त्यानुसार मा. विलासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक सर्वपक्षीय समिती स्थापन करण्यात आली. सन २००० मध्ये विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी यांची भेट घेऊन सीमाप्रश्न सोडविण्यासंबंधी चर्चा केली. त्यावर मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी सीमाप्रश्न सामोपचाराने सुटत नसेल तर तो सर्वोच्च न्यायालयासमोर मांडण्याची भूमिका घेतली. महाराष्ट्राचे

माजी मुख्यमंत्री व शिवसेना नेते श्री. मनोहर जोशी यांनी सीमाप्रश्न सोडविण्यासाठी सीमाभाग काहीकाळ केंद्रशासित करावा असे सुचविले तर महाराष्ट्र एकीकरण समितीचे ज्येष्ठ नेते मा. श्री. एन. डी. पाटील यांनी सीमाभाग महाराष्ट्रात समाविष्ट करावा यासंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे त्यामुळे सध्या सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.[५५]

तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या काळापासून ते आजतागायत कर्नाटक सरकार या प्रश्नावर वाटाघाटीसाठी कधीही एकत्र आले नाही. वास्तविक हा प्रश्न दोन्ही बाजूंनी मतैक्यांनी सोडवावा अशी महाराष्ट्रातील जनतेची अपेक्षा होती. मात्र कर्नाटक सरकारने वारंवार याकडे पाठ फिरवल्याने नाईलाजास्तव न्यायालयात धाव घेणे अनिवार्य ठरले असे एन. डी. पाटील म्हणाले. सध्या हा प्रश्न न्यायालयात असून यासंबंधी २९ मार्च २००४ ला दावा दाखल केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला वारंवार सांगूनही केंद्र सरकारने आपले म्हणणे सादर केले नाही. सर्वोच्च न्यायालयाकडून अखेर ८ ऑगस्ट २००५ ला त्यांना ४ आठवड्यांची मुदत देऊन समज देण्यात आली. ही मुदत संपून ५२ आठवडे उलटले तरीही निदिस्त केंद्र सरकारला अजूनही जाग आलेली नाही.

२४ ऑगस्ट २००६ रोजी केंद्र सरकारतर्फे सर्वोच्च न्यायालयामध्ये एक प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले. या प्रतिज्ञापत्रामध्ये सर्वच परिच्छेद महाराष्ट्राच्या विरोधात होते. त्यामुळे महाराष्ट्रात विशेषत: सीमाभागातील जनतेत असंतोष व प्रक्षोभ निर्माण झाला. त्यामुळे या वादग्रस्त प्रतिज्ञापत्राबाबत केंद्र सरकारने घुमजाव केले व माघार घेतली.[५६]

### १.१८.२४ लोकप्रतिनिधींवर हल्ला

सीमाप्रश्नी लोकशाही मार्गाने मराठी भाषिक आपला लढा लढतच होते. पण कर्नाटक पोलीस हे लढे प्रत्येकवेळी बदडवून मोडून काढण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु सीमावासीय मागे हटले नाहीत. आपल्या हक्कासाठी त्यांनी जीवाची तमा न बाळगता धैर्याने येणाऱ्या प्रसंगाला सामोरे जाणेच पसंत केले. १९७३ मध्ये प्रक्षुब्ध जमावाला पांगवतेवेळी आमदार व्ही. एस. पाटील या वयोवृद्ध समिती नेत्यावर पोलीसांनी लाठ्या चालवून त्यांचे डोके फोडले. आमदार बळवंतराव सायनाक

यांच्यावर हल्ला केल्याने त्यांच्या हाताचे हाड मोडले. आमदार निळकंठराव सरदेसाई यांच्या डोकीत प्रहार करून रक्तबंबाळ केले. इतकेच नाहीतर नगराध्यक्षा डॉ. इंदिराबाई खाडे यांच्यावर लाठी चालवून त्यांच्याही हाताचे हाड मोडले. लोकप्रतिनिधींवर कर्नाटक पोलीसांचा हा हल्ला म्हणजे लोकशाहीवरच केलेला हा हल्ला म्हणावा लागेल.

२७ ऑक्टोबर २००५ च्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सीमाप्रश्नाचा ठराव मांडून मंजूर केला. हा ठराव काही कानडी संघटनांना चांगला झोंबला. त्याच्या रागातूनच ११ नोव्हेंबर २००५ रोजी बेंगळूर येथे आमदार भवनात महापौर विजय मोरे, माजी महापौर शिवाजी सुंठकर व माजी आमदार बी. आय. पाटील यांच्यावर कर्नाटक रक्षण वेदिकेच्या कन्नड कार्यकर्त्यांनी बेंगळूरमध्ये भ्याड हल्ला करून महापौरांचे कपडे फाडून त्यांच्यावर काळा रंग टाकला व त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यांच्या मदतीस गेलेल्या शिवाजी सुंठकर व बी. आय. पाटील यांनाही मारहाण करून त्यांनाही काळे फासण्यात आले. विशेष म्हणजे कडेकोट पोलीस बंदोबस्तात असलेल्या आमदार भवनात हा प्रकार घडल्याने पोलीसांची भूमिकाही पक्षपाती असल्याचे दिसून येते. त्यामुळे सीमाभागात संतापाची लाट उसळली. या घटनेचा सर्वच स्तरातून निषेध करण्यासाठी १२ नोव्हेंबर रोजी मराठी भाषिकांनी काढलेल्या मोर्चावर पोलीसांनी अमानुष लाठीहल्ला केला. यामध्ये शेकडो मराठी भाषिकांची डोकी फुटली. कित्येकजण रक्तबंबाळ झाले. अनेक निरपराध कार्यकर्त्यांवर खोटे खटले दाखल करण्यात आले. एवढ्यावरच कर्नाटक सरकार थांबले नसून दि. २९ नोव्हेंबरला धरमसिंग सरकारने बेळगाव महानगरपालिकाच बरखास्त केली.

महाराष्ट्र एकीकरण समितीच्या आमदारांना धक्काबुक्की करण्याचे प्रकार लोकशाहीच्या गाभाऱ्यामध्ये बेंगलोरमध्ये वारंवार घडतात. २८ सप्टेंबर २००६ रोजी विधीमंडळाच्या संयुक्त अधिवेशनात राज्यपालांचे भाषण सुरू असतानाच महाराष्ट्र एकीकरण समितीच्या आमदार मनोहर किणीकर व आमदार दिंगबर पाटील यांना वाटाळ नागराज व नेते नरेंद्र बाबू यांनी धक्काबुक्की केली. सीमाभागातील समस्त मराठी जनतेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या आमदारांना जर धक्काबुक्की होत असेल तर सर्वसामान्य मराठी जनतेची काय अवस्था होत असेल हे यावरून लक्षात येते. विधीमंडळामध्ये

लोकांच्या समस्या सोडविण्याच्या चर्चा होण्याऐवजी मराठी भाषिकांवरील कन्नडसक्ती, बेळगाव महानगरपालिका बरखास्त करणे, महानगरपालिकेवरील भगवा ध्वज काढणे, बेळगावचे बेळगावी करणे, सीमावासींयांचा विरोध डावलून बेळगावला उपराजधानीचा दर्जा देऊन विधीमंडळाचे अधिवेशन भरविणे, विधानसौध बांधणे याविषयीची चर्चा सतत घडते.[५७] महाराष्ट्र सरकारने सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात दाखल केल्यामुळे सीमालढ्याला काहीकाळ मरगळ आली होती. पण सीमाभागावर कर्नाटकचा दावा कायम करण्यासाठी कर्नाटक सरकारने अनेक क्लुप्त्या लढविल्या.

### १.१८.२५ महामेळावा

सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असतानादेखील बेळगावला उपराजधानीचा दर्जा देऊन विधीमंडळाचे अधिवेशन भरविण्याचा कर्नाटक सरकारच्या कटकारस्थानाचा विरोध करण्यासाठी विधीमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच २५ सप्टेंबर २००६ रोजी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांच्या उपस्थितीत मराठी भाषिकांनी महामेळावा घेतला. त्यामध्ये भगवे झेंडे, भगवे फेटे, शिवराज्याभिषेक देखावा, शिवाजी महाराजांचा जयघोष यामुळे सीमाबांधवाच्या मराठी मनाची साक्ष देत लाखोंच्या संख्येने उपस्थित असणाऱ्या सीमावासियांनी ''रहेंगे तो महाराष्ट्र में, नहीं तो जेल में'' असा जयघोष केला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी महाराष्ट्रातील १० कोटी जनता सीमाबांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याचे निःसंदिग्ध ग्वाही दिली आणि 'जय महाराष्ट्र' च्या घोषणेने आसमंत दुमदुमला. संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न आता लवकरच साकारणार असा आश्वासक दिलासा या विराट महामेळाव्याने सीमावासियांना मिळाला.[५८]

याच महामेळाव्यापासून सीमाभागातील तरूणवर्ग जोमाने कामाला लागला. कर्नाटक सरकारच्या अन्यायी, पक्षपाती धोरणांना मूठमाती देण्यासाठी सर्व तरूणांनी लागलीच दुसऱ्या महिन्यात दि. २६ ऑक्टोबर २००६ रोजी खानापूर येथे युवा मेळावा आयोजित केला. या मेळाव्याला मिळणारा प्रचंड प्रतिसाद पाहून कर्नाटक सरकार पिसाळले आणि महामेळाव्यात

अनेक विघ्ने आणायचे प्रयत्न केले. पण समस्त मराठी भाषिक डगमगले नाहीत. आजही ते तेवढ्याच ताकदीने आपल्या न्याय्य हक्कांसाठी लोकशाही मार्गाने लढताहेत. लढ्याला उग्र रूप येईल या भीतीने भाग घेतलेल्या कार्यकर्त्यांची पोलीसांनी धरपकड करून त्यांच्यावर खोट्या केसेस दाखल केल्या. २००९ मध्ये प्रा. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली सीमापरिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परंतु कर्नाटक सरकारने या परिषदेवर बंदी घातली होती. पण अनेक कार्यकर्त्यांनी बंदीहुकुम मोडून स्वत:ला अटक करून घेतली.

### १.१८.२६ महानगरपालिका बरखास्तीकरण

१८५२ साली बेळगाव नगरपालिकेची स्थापना पंचकमिटी म्हणून झाली. तेव्हापासून आजतागायत नगरपालिकेचे दप्तर मराठीत असून तिने वेळोवेळी ठराव करून संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. तर १९८४ पासून लोकशाही मार्गाने निवडून आलेले बेळगाव महानगरपालिकेतील सदस्य हे बहुसंख्य मराठी भाषिक आहेत. या कारणामुळे नोव्हेंबर २००५ मध्ये तत्कालिन मुख्यमंत्री धरमसिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारने बेळगाव महानगरपालिका बरखास्त केली होती. तर १ नोव्हेंबर २०११ रोजी मराठी भाषिकांनी काढलेल्या भव्य मोर्चामध्ये महापौर मंदा बाळेकुंद्री आणि उपमहापौर रेणू किल्लेदार सामील झाल्या. ही बाब कन्नड रक्षण वेदिकेला रूचली नाही. त्यांनी महापालिकेत घुसून कार्यालयाची मोडतोड केली. या अत्याचाराच्या विरोधात बेळगावात कडकडीत बंद पाळण्यात आला. हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी मराठी महापौर असलेली बेळगाव महापालिका १५ डिसेंबर २०११ रोजी कर्नाटक सरकारने बरखास्त केली. म्युनिसिपल कायदा १९७६ च्या कलम ९९ / १ अन्वये ही कारवाई केली गेली आणि महापालिकेवर प्रशासकाची नियुक्ती केली. कर्नाटक सरकारच्या या निर्णयाविरूद्ध मराठी नगरसेवकांनी उच्च न्यायालयाच्या धारवाड खंडपीठाकडे दावा दाखल केला. त्यावर १९ जून रोजी निर्णय देताना ही बरखास्ती रद्द ठरवली होती. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २५ जून रोजी ५७ नगरसेवकांना आपले म्हणणे मांडण्यची संधी देण्यात आली. त्यानुसार प्रत्येक नगरसेवकांनी आपले मत मांडून राज्य सरकारच्या कारणे दाखवा नोटीशीला उत्तरही दिले. पण यानंतरही कर्नाटक

सरकारने महापालिकेचे कामकाज संथगतीने आणि कर्नाटकविरोधी असल्याचे आरोप करत पुन्हा ही महानगरपालिका बरखास्त केली. कर्नाटक सरकारच्या या अन्यायकारक व नियमबाह्य कृतीमुळे सीमाभाग व संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली.[५९]

### १.१८.२७ महाराष्ट्र विधीमंडळाचा ठराव

सीमावासीय भागातील मराठी बांधवांच्या स्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या कर्नाटक सरकारच्या निषेधाचा ठराव महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने मंजूर केला. तसेच सीमाप्रश्न न्यायप्रविष्ट असेपर्यंत सीमावर्तीय भाग केंद्रशासित प्रदेश म्हणून जाहीर करावा अशी मागणी नागपूर येथे डिसेंबर २०११ मध्ये झालेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये केली.[६०]

### १.१८.२८ महाराष्ट्र सरकारचे निवेदन

कर्नाटक सरकारकडून वारंवार होणाऱ्या सीमावासीयांवरील अन्यायाबाबतचे निवेदन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्याकडे दिले. तसेच महाराष्ट्राच्या विधीमंडळाने ''सीमाभाग केंद्रशासित करावा'' या एकमताने केलेल्या ठरावाची प्रत पंतप्रधानांना डिसेंबर २०११ मध्ये देऊन केंद्र सरकारने याप्रश्नी तातडीने लक्ष घालावे अशी मागणी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या शिष्टमंडळाने केली.[६१]

### १.१८.२९ विधानसौध

कर्नाटक सरकारने बेळगावसह सीमाभागावर आपलाच हक्क आहे हे दाखविण्यासाठी अनेक षडयंत्रे रचली आहेत. त्यामध्ये बेळगावला उपराजधानीचा दर्जा देऊन आपली बेळगाववरील पकड घट्ट करण्यासाठी म्हणून बेळगावपासून सुमारे १० कि. मी. अंतरावर पुणे–बेंगलोर महागार्मावर हलगा येथे ३९१ कोटी रुपये खर्च करून प्रशस्त अशा विधानसौधची उभारणी करून भारताचे राष्ट्रपती मा. प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते दि. ५ डिसेंबर २०१२ रोजी त्याचे उद्‌घाटन केले. याचा परिणाम सीमाभागातील समस्त मराठी भाषिकांच्या जखमेवर मीठ चोळण्यात झाला. त्यामुळे मराठी भाषिक महाराष्ट्र एकीकरण समितीने त्याविरोधात विधानसौध उद्‌घाटनादिवशीच भव्य सीमा महामेळावा

भरवून आपली ताकद कर्नाटक सरकारला दाखवून दिली. या विधानसौधामध्ये कर्नाटक सरकारने डिसेंबर २०१२ मध्ये हिवाळी अधिवेशनही भरविले होते.

### १.१८.३० समारोप

१९५६ ला सीमालढ्याची सुरूवात झाली व त्यानंतर पुढीलवर्षी म्हणजेच १९५७ मध्ये कर्नाटक विधानसभेची निवडणूक जाहीर झाली. तेव्हापासून विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सीमाभागामध्ये लढविण्याचा निर्णय महाराष्ट्र एकीकरण समितीने घेतला. संपूर्ण सीमाभागाचे महाराष्ट्रामध्ये विलीनीकरण करण्यात यावे या एकाच मुद्दयावर या निवडणुका लढवून महाराष्ट्र एकीकरण समितीने घवघवीश यश संपादन केले. १९०९ पासूनचे सलग ३७ नगराध्यक्ष आणि नंतर १९८४ साली महानगरपालिकेचा दर्जा मिळाल्यापासून आजपर्यंतचे सलग १९ महापौर मराठीच आहेत. तसेच कर्नाटक विधीमंडळाच्या निवडणुकीमध्येही ७ ते ८ आमदार महाराष्ट्र एकीकरण समितीचे असत. यावरून मराठी भाषिकांची महाराष्ट्रामध्ये जाण्याची इच्छा मतपेटीद्वारे वारंवार दिसून आली आहे. पण अलिकडच्या काही वर्षात महाराष्ट्र एकीकरण समितीच्या संघटनेमध्ये झालेली दुफळी, राजकीय पक्षांची पोटनीती यामुळे अलिकडच्या काही वर्षात महाराष्ट्र एकीकरण समितीच्या आमदारांची संख्या खालावलेली दिसून येते.

बेळगाव, खानापूर, अथणी, चिक्कोडी आणि हुक्केरी या तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ग्रामपंचायत, तालुका पंचायत आणि जिल्हा पंचायत या निवडणुकांमध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीचे सुरूवातीपासूनच निर्विवाद वर्चस्व पहायला मिळते. त्यामुळेच या स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज व इतिवृत्त कन्नडमध्ये ठेवण्यास मराठी भाषिक सदस्यांनी वारंवार विरोध केल्याचे दिसून येते. सीमाप्रश्नाचा लढा लोकशाही मार्गाने १९५६ पासून गेली ५८ वर्षे तेवत ठेवण्याचे काम अनेकांनी केले. त्यामध्ये वृत्तपत्रे, सीमाभागातील ग्रामीण साहित्य संमेलने, अनेक नेते व सर्वसामान्य मराठी भाषिकांचा समावेश आहे.

सीमाप्रश्न तेवत ठेवण्यामध्ये वृत्तपत्रांचे योगदान अतिशय मोलाचे आहे. सीमाप्रश्नाच्या अनुषंगाने सीमाभागातील जनतेवर जे जे अन्याय, अत्याचार झाले त्याला वेळोवेळी अत्यंत परखडपणे मराठी वृत्तपत्रांनी वाचा फोडलेली आहे. त्यामध्ये दैनिक तरूण भारत, दैनिक पुढारी, दैनिक सकाळ, दैनिक रणझुंझार, दैनिक स्वतंत्र प्रगती, साप्ताहिक राष्ट्रवीर इ. चे कार्य उल्लेखनीय आहे. कै. बाबूराव ठाकूरांचा दैनिक तरूण भारत तर सीमाभागातील मराठी जनतेचे मुखपत्र आहे. या दैनिकाने वेळोवेळी सीप्रश्नासंदर्भात लेख, पुरवण्या, कन्नडीगांचा अत्याचार यावर प्रकाश टाकला आहे. काहीवेळा पत्रकारांना दमदाटी, मारहाणही झाली, पण त्यांनी आपला मराठा बाणा सोडला नाही.

बेळगावात भरलेल्या तीन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाद्वारे १९२९ मध्ये शि. म. परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली १९४६ मध्ये ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य संमेलन भरविण्यात आले. या संमेलनामध्ये संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा जन्म झाला आणि बेळगावच्या महाराष्ट्र एकीकरण समितीचीही स्थापना झाली. य. दि. फडके यांच्या अध्यक्षतेखाली २००० मध्ये मराठी साहित्य संमेलन भरले आणि हा प्रश्न संमेलनाला उपस्थित असलेल्या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यावा अशी सूचनाही केली.

या साहित्य संमेलनांची परंपरा दरवर्षी सीमाभागातील कडोली, उचगांव, कुद्रेमनी, येळ्ळूर, नंदगड इ. गावामध्ये जपली असून त्यामध्ये मराठी भाषा, संस्कृती, साहित्य याविषयी मराठी भाषिक रसिकांमध्ये चर्चा होऊन सीमाप्रश्नाबाबत ठरावही संमत केले जातात.

या सीमालढ्याचे नेतृत्व आचार्य अत्रे, एस. एम. जोशी, दाजिबा देसाई, चिंतामणराव देशमुख, सेनापती बापट, बॅ. नाथ पै, बाळासाहेब ठाकरे, मधु दंडवते, शरद पवार, छगन भुजबळ, एन. डी. पाटील, अमर शेख, आण्णाभाऊ साठे यासारख्या शाहिरांचेही योगदान मोलाचे असून ज्ञानेश महाराव यांनीही या प्रश्नाची परखड चिकित्सा केली असून सीमावासीयांच्या अन्यायाला इंदिरा संत, भीमराव गस्ती, महादेव मोरे, एल. आर. चौगले इ. साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून वाचा फोडली आहे. तर राज्य, देशपातळीवरच्या नेत्यांनी कमीअधिक प्रमाणात प्रयत्न केले असून महाराष्ट्र एकीकरण समितीच्या माध्यमातून सीमाभागाकडे मराठी बांधव महाराष्ट्रात जाण्यासाठी अर्ज, विनंत्या,

शिष्टमंडळे, निषेध, निदर्शने, मोर्चे, हरताळ,निवडणुका, सत्याग्रह, उपोषण, मेळावे यासारख्या लोकशाही मार्गांनी कर्नाटक सरकारच्या हुकुमशाहीला, जुलुमाला, अत्याचाराला तोंड देत आहेत. आजरोजी महाराष्ट्र एकीकरण समितीचे नेतृत्व हे डॉ. एन. डी. पाटील यांच्या मार्गदर्शनाने होत असून त्यामध्ये सीमाभागातील नेते मा. वसंत पाटील, दिगंबर पाटील, मनोहर किणीकर, किरण ठाकूर, बी. आय. पाटील, मालोजीराव अष्टेकर, विजय मोरे इ. जण करीत आहेत.

## संदर्भ सूची


१. सहस्त्रबुद्धे, पु. ग., महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००३, पृ. ३०

२. दीक्षित दुर्गा, महाराष्ट्र संस्कृतिकोष, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, ३ जुलै, २००९, पृ. ४

३. राऊत गणेश व राऊत ज्योती, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, इ. स. १८१८ ते १९६०, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, चौथी आवृत्ती, डिसेंबर २००९, पृ. ५

४. मेहता, जे. एल. अनुवादक देशपांडे, व. तु., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास, खंड दुसरा, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, द्वितीय आवृत्ती, २ ऑक्टोबर २००७, पृ. ५९५

५. खतीब, के. ए., महाराष्ट्राचा भूगोल, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, चौथी आवृत्ती, पृ. ३०

६. तत्रैव, पृ. १३, १४

७. देशपांडे मीना, हुतात्मा, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे(प.), प्रथमावृत्ती, १ मे २०१०, पृ. १६

८. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र–म्हैसूर–केरळ सीमावाद आयोगास सादर केलेले महाराष्ट्र–म्हैसूर सीमावादविषयक निवेदन, १९६७, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, पृ. ६

९. देव, शं. दा. (प्रकाशक), संयुक्त महाराष्ट्राची माहिती, संयुक्त महाराष्ट्र परिषद प्रकाशन, १९४८, पृ. २

१०. दीक्षित दुर्गा, महाराष्ट्र संस्कृतिकोष, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, ३ जुलै, २००९, पृ. ५७

११. पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मयगृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, ५ मे २०१०, पृ. ११, १२

१२. पाटील, बी. बी., महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २००८, पृ. ६

१३. देशपांडे मीना, हुतात्मा, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे(प.), प्रथमावृत्ती, १ मे २०१०, पृ. २२

१४. साने रविकिरण, लढा संयुक्त महाराष्ट्राचा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर २००९, पृ. ४०, ४१

१५. अत्रे आचार्य (आत्मवृत्त), कऱ्हेचे पाणी ४, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, सातवी आवृत्ती, १ एप्रिल २००९, पृ. १८५

१६. पाटील, बी. बी., महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २००८, पृ. ८

१७. फडके, य. दि., केशवराव जेधे, श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १२ नोव्हेंबर १९८२, पृ. २५१

१८. कुलकर्णी भीमराव (संपादक), अस्मिता महाराष्ट्राची, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९७१, पृ. १५५

१९. जोशी, एस. एम., सीमा सत्याग्रह आणि राष्ट्रीय एकात्मता, साधना प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १ ऑगस्ट १९८६, पृ. ७, ८

२०. http://satarkar.wordpress.com भाषावार प्रांतरचनेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाग–३

२१. पाटील, बी. बी., महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २००८, पृ. १५

२२. ठाकूर, योगेंद्र, शिवसेना–समज–गैरसमज, आमोद प्रकाशन, मुंबई, नवीन आवृत्ती, ११ नोव्हेंबर २०११, पृ. २५

२३. दैनिक तरूण भारत, बेळगाव, मंगळवार, १ नोव्हेंबर २००५

२४. मेणसे कृष्णा, असा घडलो, असा लढलो!, लोकवाङ्मयगृह, मुंबई, पहिली आवृत्ती, १९ ऑगस्ट २००३, पृ. ९२

२५. पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मयगृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, ५ मे २०१०, पृ. १०९, ११०

२६. दैनिक तरूण भारत, बेळगाव, बेळगावचा धगधगता सीमाप्रश्न पुरवणी, शुक्रवार, २५ सप्टेंबर २००९, पृ. १०

२७. पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मयगृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, ५ मे २०१०, पृ. १११,११२

२८. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मकसी–१००७/प्र.क्र.३६/फा.३६, मंत्रालय, मुंबई, १० जुलै २००८

२९. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र–म्हैसूर–केरळ सीमावाद आयोगास सादर केलेले महाराष्ट्र–म्हैसूर सीमावादविषयक निवेदन, १९६७, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, पृ. २७

३०. बेळगाव सहकार दर्शन, मराठी शब्द सोहळा, दिवाळी विशेषांक, बेळगाव, पृ. ३५

३१. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र–म्हैसूर–केरळ सीमावाद आयोगास सादर केलेले महाराष्ट्र–म्हैसूर सीमावादविषयक निवेदन, १९६७, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, पृ. १२८

३२. दैनिक तरूण भारत, बेळगाव, मंगळवार दि. १ नोव्हेंबर २००५, पृ. ४

३३. बेळगाव सहकार दर्शन, मराठी शब्दसोहळा, दिवाळी विशेषाक, बेळगाव, पृ. ३१

३४. संग्राम, सीमाभागात ब्रिटीशराज – सीमालढा विशेष, असा आहे सीमाप्रश्न, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती कार्यालय, मुंबई, वर्ष १ ले, अंक ११, फेब्रुवारी २०१२, पृ. ९

३५. चौगुले, एल. आर., असा लढा असे लढवय्ये, राज्ञी प्रकाशन, टिळकवाडी–बेळगाव, २७/४/२०००, पृ. ९६

३६. पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मयगृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, ५ मे २०१०, पृ. ४४८

३७. तत्रैव, पृ. ४६८, ४७०

३८. तत्रैव, पृ. ४५०

३९. चौगुले, एल. आर., असा लढा असे लढवय्ये, राज्ञी प्रकाशन, टिळकवाडी–बेळगाव, २७/४/२०००, पृ. ८३

४०. मठकर, जयानंद, महाराष्ट्राचे शिल्पकार बॅ. नाथ पै, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीयावृत्ती, सप्टेंबर २००८, पृ. ६३

४१. मांगले महेश, लढा संयुक्त महाराष्ट्राचा, पुणे, प्रथमावृत्ती, २००३, पृ. १२७, १२८

४२. महाराव ज्ञानेश, उठावा महाराष्ट्र देश, पुष्प प्रकाशन लि., पुणे, प्रथमावृत्ती, १ नोव्हेंबर २००१, पृ. ४२

४३. दैनिक तरूण भारत, बेळगाव, धगधगता सीमाप्रश्न, बेळगाव पुरवणी, शुक्रवार दि. २५ सप्टेंबर २००९

४४. दैनिक तरूण भारत, बेळगाव, सोमवार दि. २५ सप्टेंबर २००६.

४५. मठकर, जयानंद, महाराष्ट्राचे शिल्पकार बॅ. नाथ पै, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीयावृत्ती, सप्टेंबर २००८, पृ. ६८

४६. मांगले महेश, लढा संयुक्त महाराष्ट्राचा, पुणे, प्रथमावृत्ती, २००३, पृ. १८०, १८२

४७. मठकर, जयानंद, महाराष्ट्राचे शिल्पकार बॅ. नाथ पै, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीयावृत्ती, सप्टेंबर २००८, पृ. ६६, ६७

४८. दैनिक तरूण भारत, बेळगाव, मंगळवार, १ नोव्हेंबर २००५

४९. दैनिक तरूण भारत, बेळगाव, महाराष्ट्र एकीकरण समिती युवा महामेळावा विशेष, गुरूवार २६ ऑक्टोबर २००६, पृ. ४

५०. मेणसे कृष्णा, असा घडलो, असा लढलो!, लोकवाङ्मयगृह, मुंबई, पहिली आवृत्ती, १९ ऑगस्ट २००३, पृ. २०३

५१. संग्राम, सीमाभागात ब्रिटीशराज – सीमालढा विशेष, असा आहे सीमाप्रश्न, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती कार्यालय, मुंबई, वर्ष १ ले, अंक ११, फेब्रुवारी २०१२, पृ. १३

५२. दैनिक तरूण भारत, बेळगाव, महाराष्ट्र एकीकरण समिती युवा महामेळावा विशेष, गुरूवार २६ ऑक्टोबर २००६

५३. माजी आमदार श्री. व्ही. वाय. चव्हाण यांची प्रकट मुलाखत श्री. महादेव मरगाळे, माजी आमदार श्री. व्ही. वाय. चव्हाण अमृतमहोत्सव गौरव विशेषांक, पृ. ४०

५४. मांगले महेश, लढा संयुक्त महाराष्ट्राचा, पुणे, प्रथमावृत्ती, २००३, पृ. १३५, १३६

५५. खांदवे एकनाथ, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, आरती प्रकाशन, कर्जत, जि. अहमदनगर, दुसरी आवृत्ती, २२ सप्टेंबर २०१०, पृ. ५९

५६. दैनिक तरूण भारत, बेळगाव, डॉ. एन. डी. पाटील मुलाखत, बुधवार २१ नोव्हेंबर २००६

५७. दैनिक तरूण भारत, बेळगाव, शनिवार १२ नोव्हेंबर २००५

५८. दैनिक तरूण भारत, बेळगाव, २६ नोव्हेंबर २००६

५९. दैनिक तरूण भारत, बेळगाव,, शुक्रवार, १३ जुलै २०१२

६०. दैनिक सकाळ, कोल्हापूर, १७ डिसेंबर २०१३

६१. दैनिक तरूण भारत, बेळगाव, रविवार १ जानेवारी २०१२

प्रकरण दुसरे

# बेळगाव जिल्हा

# प्रकरण दुसरे

# बेळगाव जिल्हा


२.१ प्रास्ताविक

२.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.३ बेळगाव जिल्हा पुनर्रचना

२.४ जिल्हा प्रशासन

२.५ बेळगाव जिल्ह्याचे भौगोलिक स्थान

- २.५.१ हवामान
- २.५.२ नदया
  - २.५.२.१ कृष्णा नदी
  - २.५.२.२ घटप्रभा नदी
  - २.५.२.३ मलप्रभा नदी
- २.५.३ पर्जन्यमान
- २.५.४ वनसंपदा

२.६ लोकसंख्या

- २.६.१ लोकसंख्येची वैशिष्ट्ये
- २.६.२ साक्षरता

२.७ समाजरचना

२.८ आरोग्य

२.९ शिक्षण

- २.९.१ शालेय शिक्षण
- २.९.२ उच्च शिक्षण

२.१० आर्थिक स्थिती
२.१०.१ उद्योगधंदे
२.१०.२ साखर कारखाने
२.१०.३ बँका
२.११ शेती
२.११.१ दुग्धव्यवसाय
२.१२ पर्यटन
२.१३ वृत्तपत्रे
२.१४ वाचनालय
२.१५ मराठी साहित्य संमेलन
२.१६ दळणवळण
२.१६.१ रस्ते
२.१६.२ रेल्वे
२.१६.३ विमानतळ
२.१७ मराठा लाईट इन्फन्ट्री
२.१८ राजकीय माहिती
२.१८.१ स्थानिक स्वराज्य संस्था
२.१८.१.१ बेळगाव महानगरपालिका
२.१८.१.२ ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था
२.१९ विधानसौध
२.२० समारोप

# प्रकरण दुसरे

# बेळगाव जिल्हा

## २.१ प्रास्ताविक

कर्नाटक राज्यामध्ये बेंगलोर नंतर बेळगाव जिल्ह्याला अनेक अर्थाने महत्त्वपूर्ण स्थान आहे. कर्नाटक राज्याच्या विकासामध्ये बेळगाव जिल्ह्याचे योगदान मोठे आहे. बेंगलोर नंतर दोन नंबरचे शहर म्हणून बेळगाव ओळखले जाते. बेळगाव जिल्ह्यात एकूण १० तालुके असून प्रत्येक तालुक्याचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. बेळगाव जिल्ह्याला आज आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैद्यकीय तसेच कृषी, सहकार, उद्योगधंदे, क्रीडा, पर्यटन, तीर्थक्षेत्र इ. मुळे देशात एक वेगळे स्थान आहे. त्यामुळे या जिल्ह्याचा सर्वांगपूर्ण अभ्यास करीत असताना या जिल्हयाची पुनर्रचना, ऐतिहासिक पार्श्वभूमी, जिल्ह्याचे भौगोलिक स्थान त्यामध्ये हवामान, पर्जन्यमान, नदया, वनसंपदा, लोकसंख्या, भाषिक रचना, त्याचबरोबर महाराष्ट्र–कर्नाटक सीमावाद, सीमावादाचा मराठी भाषिकांवर होणारा परिणाम इ. बाबींवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे.

## २.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी

बेळगाव हे दक्षिण महाराष्ट्र आणि उत्तर–पश्चिमी कर्नाटक या सीमाभागातील मार्कंडेय नदी किनाऱ्यावरील एक सुंदर शहर आहे. बेळगाव समुद्रसपाटीपासून २५०० फूट (७६२ मीटर) उंचीवर वसले आहे. कदाचित बेळगावचे जुने नाव वेणुग्राम (बांबूचे खेडे) असावे. १२ व्या शतकाच्या उत्तरार्धात रट्टांनी त्यांची राजधानी सौंदती येथून बेळगाव येथे हलविली. बेळगाव येथे १०० एकर परिसराचा एक किल्ला आहे. या किल्ल्यात रट्टांचा अधिकारी बिचीराजा याने १२०४ मध्ये कमलबस्ती या सुंदर वास्तूची निर्मिती केली. कमलबस्ती वास्तूच्या आत छतास सुंदर कमळ असून नेमीनाथ तीर्थकर यांची प्रतिमा आहे. या किल्ल्यात काही जैन मंदिरे, मारूती मंदिरे आहेत. चालुक्य बांधकामाचे वैशिष्ट्य सर्वत्र आढळते. शहापूर या शहराचा विभाग सांगली राज्याचा आणि वडगाव हे छोटे कुरूंदवाड या राज्यात होते. वडगावजवळ सातवाहनकालीन बुद्ध अवशेष मिळाले. या भागात मराठी बोलली जाणारी प्रमुख भाषा असून कन्नड ही शासकीय भाषा असली तरी

महानगरपालिकेचे काम दोन्ही भाषांत चालते. बेळगाव हे क्षेत्र कर्नाटक राज्यात असले तरी स्थानिक जनता आणि महाराष्ट्र राज्य व समस्त मराठी मंडळीची इच्छा हे क्षेत्र महाराष्ट्र राज्यात असावे अशी आहे.

इ. स. ११६० च्या सुमारास गोवा प्रांतावर कदंबाचे राज्य होते. या कदंबाच्या एका लेखात 'वेळुग्राम' या नावाचा उल्लेख सापडतो. त्यावरून 'वेळूग्राम' म्हणजे 'बेळगाव' या शहरावर प्रथम कदंब राजाची सत्ता असावी.

इ. स. १२०८ ते १२५० या दरम्यान बेळगाववर राष्ट्रकूट वंशीय राजे राज्य करीत होते. श्रीकृष्णाच्या यादव वंशातून आपली उत्पत्ती झाली असे हे राष्ट्रकूट वंशीय लोक मानतात. ते आपल्याला 'रट्टे' किंवा 'महारट्टे' म्हणवीत असत. त्यावरूनच 'महारट्टे' या शब्दाचे अपभ्रंशरूप 'मराठे' असे झाले असावे असे म्हणतात. रट्ट, रट्टे, महारट्टे हे शब्द रथ, रथी, महारथी या शब्दाचे अपभ्रंश रूप शब्द असावेत. या रट्टांच्या महामंडलेश्वरांनी आपली राजधानी 'वेणुग्राम' येथे आणली असा बोध हण्णेगेरी येथील शिलालेखावरून होतो. हे रट्ट बेळगावचे स्वतंत्र राजे होते.

इ. स. १२५० ते १३२७ या काळात बेळगाव शहर देवगिरीच्या यादवांच्या अंमलाखाली आले. यांच्या अमदानीत विद्या, कला यांची वाढ झाली. इ. स. १३२७ ते १४७२ या काळात दिल्लीचा सुलतान महमंद तुघलक याने दक्षिण भारतावर स्वारी केली. हुक्केरी व रायबाग येथे त्याने आपले दोन सरदार नेमले. मात्र बेळगावचा किल्ला व त्याच्या सभोवतालचा भूभाग विजयनगरच्या साम्राज्यातील एका हिंदू सरदाराच्याच ताब्यात राहिला. इ. स. १४७२ मध्ये गुलबर्ग्याचा महमंदशहा बहामनी बेळगाव शहरावर चाल करून आला. त्यावेळी बेळगावला विक्रमराय नावाचा हिंदू राजा होता. राजा विक्रमराय याने किल्ल्याचे रक्षण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण त्यात त्याला यश आले नाही.

इ. स. १५१० ते ११ मध्ये अल्फान्सो अल्बुकर्कने गोवा प्रांतावर स्वारी करून तो जिंकला आणि ठिकठिकाणी मुसलमानांच्यावरही विजय मिळविला. परंतु विजापूरचा बादशहा ईस्माईल आदिलशहाने खुश्रुतुर्क नावाच्या शियापंथीय इराणी सरदाराला बेळगावची सनद देऊन त्याला

पाठविले. खुश्रुतुर्क उर्फ आसदखान याने इ. स. १५४९ पर्यंत बेळगाव शहराचा कारभार उत्तमरीतीने चालविला. इ. स. १५५० मध्ये शेरखानाने शहापूर येथे शहापेठ नावाची एक पेठ वसविली असे सांगतात. बेळगाव शहर व किल्लाभाग याचीही हीच बाजारपेठ होती.

''दक्षिण प्रांती आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही ही पराक्रमी संस्थाने तसेच मोंगल सुभा एक एक लक्ष स्वाराचा. या विरहित गोवेकर फिरंगी, इंग्रज, वलंदेज, रामनगरकर, पाळेगार, सौंदे, बिदनूर असे जागोजागी अनेक पुंड माजले तरी त्यांचा बंदोबस्त आवश्यक!'' म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिणची मोहीम हाती घेतली होती. बेळगाव शहापूर घेऊन ते हुबळीस गेले. (जाता जाता त्यांनी येथून खूप संपत्ती संपादन केली.) बेळगाव आणि बेळगाव सभोवतालचा टापू आपल्या कक्षेत कायम राहावा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक लहानमोठे गडकोट व ठाणी बांधली. पारगड, भीमगड, वल्लभगड, राजहंसगड, महिपालगड, कलानंदीगड, पवित्रगड, परसगड हे सर्व गड त्यापैकीच होत.[१] इ. स. १६७४ मध्ये फोंडाघाटमार्गे गेल्यावर स्वारी करण्यास जात असताना छत्रपती संभाजी महाराज यांचा एक रात्र मुक्काम शंभू जंती मंदिरात (गोगटे रंगमंदिरानजिक असलेले) होता.

इ. स. १६८६ मध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकीर्दीतच दिल्लीच्या औरंगजेब बादशहाने दक्षिणेला स्वारी सुरू केली. औरंगजेबाचा दुसरा मुलगा अझमशहा याने मराठ्यांचा पराभव करून बेळगाव किल्ला घेतला आणि विजापूरची आदिलशाही पूर्णपणे बुडविली. त्याच्यामुळे काही काळ बेळगावला 'अझमनगर' हे नाव प्राप्त झाले. बेळगावचा किल्लेदार म्हणून मुस्ताफा नावाच्या माणसाची नेमणूक झाली. त्याने किल्ल्यापुरत्याच भागाला 'मुस्ताफाबाद' हे नाव देण्याचा प्रयत्न केला. पण तो फसला आणि पुन्हा बेळगावचे नाव बेळगाव हेच राहिले.

इ. स. १७१९ मध्ये साताऱ्याचे छत्रपती शाहू महाराज यांचे पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांनी सैन्यासह दिल्लीस जाऊन बादशहाला मदत केली. तेव्हा बादशहाने त्यांच्याकडे स्वराज्याची सनद व दक्षिणेतील चौथाई व सरदेमुखी वसुलीचे हक्क दिले. म्हणून साताऱ्याचे छत्रपती शाहू महाराजांना बेळगावच्या चौथाई व सरदेमुखी वसुलीचे हक्क मिळाले. इ. स. १७२० मध्ये बाळाजी

विश्वनाथांचा मृत्यू झाला. ही संधी साधून हैद्राबादच्या निजामउल्मुल्काने बेळगावचा किल्ला व अथणी परगणा आपल्या हाती घेतला. त्यानंतर पुन्हा इ. स. १७५६ ला पेशव्यांनी बेळगावचा किल्ला आपल्या अंमलाखाली आणला. मग तेव्हापासून इ. स. १८१८ पर्यंत किल्ला पेशव्यांच्याच हाती राहिला. इ. स. १८१८ मध्ये पेशव्यांच्या बरोबर लढाई करून इंग्रजांना हा किल्ला मिळवावा लागला. ही लढाई तीन आठवडे चालली होती. बेळगाव किल्ला व शहर जिंकल्यानंतर इंग्रजांनी त्याचा समावेश प्रथम धारवाड जिल्ह्यात केला. पण नंतर या शहराचे मध्यवर्ती स्थान लक्षात घेऊन इ. स. १८३६ ते १८३८ या दोन वर्षात बेळगाव हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण करून त्याचा एक स्वतंत्र जिल्हा बनविण्यात आला.[२]

इ. स. १८५८ पर्यंत ईस्ट इंडिया कंपनीच्या हाती सर्व राज्यकारभार होता. कंपनी सरकारची सत्ता होती. तेवढ्या अवधीत तेथे काही महत्त्वाच्या सुधारणा केल्या. त्या अशा इ. स. १८४८ साली येथील कलेक्टर इन्विराईटी याने 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' म्हणून 'नगर वाचनालय' स्थापन केले. सुरूवातीस ८५ वर्गणीदार होते. या वाचनालयात इंग्रजी, मराठी व गुजराथी अशी १३ वर्तमानपत्रे वाचावयास मिळत होती. अभ्यासू वाचकांसाठी १०३६ पुस्तके होती.

इ. स. १८५१ मध्ये बेळगाव नगरपालिका स्थापन झाली. तिचे घरपट्टीचे उत्पन्न तेव्हा ४०८ रुपये होते. इ. स. १८५२ मध्ये बेळगावची पहिली खानेसुमारी झाली. त्यावेळी शहर, लष्कर व शहापूर यासह एकूण लोकसंख्या सुमारे तीस हजार होती. इ. स. १८५८ नंतर ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा कारभार संपुष्टात येऊन येथे इंग्लंडच्या ब्रिटीश सरकारचा कारभार सुरू झाला. तेव्हा बेळगाव जिल्ह्याचा समावेश मुंबई इलाख्यात करण्यात आला.

इ. स. १९४७ साली ब्रिटीश सरकारची हिंदुस्थानातील सत्ताच संपुष्टात आली. तरीसुद्धा सन १९५६ पर्यंत बेळगाव जिल्हा मुंबई इलाख्यातच राहिला. (राज्याच्या फेररचनेनंतर या जिल्ह्याचा समावेश म्हैसूर (कर्नाटक) राज्यात करण्यात आला.)

## २.३ बेळगाव जिल्हा पुनर्रचना

ब्रिटीशांनी धारवाड जिल्ह्यातून बेळगाव शहराचे मध्यवर्ती स्थान लक्षात घेऊन १८३६ मध्ये बेळगाव जिल्हा बनवण्यात आला. त्यावेळी बागलकोट, बदामी आणि हांगुन्ड या तालुक्यांचा समावेश करण्यात आला. पण पुढे नवीन कनडगी म्हणजेच सध्याचे विजापूर या जिल्ह्याची १८६४ मध्ये स्थापना करताना वरील तालुके या नवीन जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आले. १८४८ मध्ये निपाणी जहागीर बेळगाव जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आली. त्याचबरोबर चिंचणी व कागवाडचे जहागीर अनुक्रमे १८३९ व १८५७ मध्ये बेळगाव जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आले. तसेच शिरोळ पेट्यातील कटकोळ ठाणे सध्याच्या बेळगाव जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आले. १८३६ मध्ये बेळगाव जिल्ह्यामध्ये अथणी, चिक्कोडी, गोकाक, पारसगड, संपगाव, पाछापूर व खानापूर हे तालुके होते. १९०८ मध्ये चिक्कोडी महालला तालुक्याचा दर्जा दिला. त्यानंतर चंदगड तालुकासुद्धा निर्माण करण्यात आला. त्यानंतर सांगली, मिरज आणि ज्युनिअर मिरज, जत, कुरूंदवाड, ज्युनिअर कुरूंदवाड, जमखंडी, कोल्हापूर संस्थानातील व रामदुर्ग यातील काही भाग घेऊन १९४९ ला रायबाग आणि रामदुर्ग हे दोन तालुके निर्माण करण्यात आले. त्यामुळे बेळगाव जिल्ह्यातील तालुक्यांची एकूण संख्या ११ झाली. चंदगड तालुका (१३० गावे) १९५६ च्या राज्यपुनर्रचना आयोगानुसार महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आला. त्यामुळे बेळगाव जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या १० झाली.[3] त्यामध्ये अथणी, बेळगाव, चिक्कोडी, गोकाक, हुक्केरी, खानापूर, सौंदत्ती (पारसगड), रामदुर्ग, बैलहोंगल (संपगाव) व रायबाग हे तालुके असून बेळगाव जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १३,४५४ चौरस किमी आहे. हे क्षेत्रफळ राज्याच्या क्षेत्रफळाच्या ६.९९ टक्के असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने बेळगाव जिल्ह्याचा पाचवा क्रमांक लागतो. बेळगाव जिल्ह्यामध्ये अथणी तालुका भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा म्हणजेच १९९५ चौरस किमी असून सर्वात लहान तालुका रायबाग असून त्याचे क्षेत्रफळ ९५८.८ चौरस किमी आहे.




## २.४ जिल्हा प्रशासन

भारतात जिल्हा हा प्रशासनाचा एक प्रमुख घटक मानला जातो. सार्वजनिक कार्याचे सर्वसाधारण व्यवस्थापन करणारा घटक म्हणजे जिल्हा प्रशासन होय. ऑक्सफर्ड शब्दकोषानुसार जिल्हा म्हणजे असा भूभाग की, ज्या ठिकाणी विशिष्ट प्रकारचे प्रशासकीय कार्य होत असते. 'जे प्रशासन लोकप्रशासनाचा एक भाग म्हणून जिल्ह्याच्या विशिष्ट भूभागात कार्य करीत असते. त्या प्रशासनाला जिल्हा प्रशासन म्हणतात.' भारतात जिल्हा हा क्षेत्रीय प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाचा

घटक असून भौगोलिकदृष्ट्या प्रशासकीय सोयीसाठी जिल्हा हा योग्य भूभाग आहे. प्रत्येक जिल्ह्यात साधारणत: ८ ते १० तालुके असतात.[४]

जिल्ह्याच्या प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने बेळगाव जिल्ह्यातील दहा तालुक्यांची तीन महसूल विभागामध्ये विभागणी केली आहे. त्यामध्ये –

**१. बेळगाव उपविभाग**

यामध्ये बेळगाव, खानापूर आणि हुक्केरी तालुके असून त्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ३७७८ चौरस किमी आहे.

**२. बैलहोंगल उपविभाग**

या उपविभागामध्ये बैलहोंगल, गोकाक, सौंदत्ती व रामदुर्ग तालुके असून त्यांचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ५४५८ चौरस किमी इतके आहे.

**३. चिक्कोडी उपविभाग**

यामध्ये चिक्कोडी, अथणी, रायबाग या तालुक्यांचा समावेश असून त्यांचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ४२२३ चौरस किमी आहे.

बेळगाव जिल्ह्याचे तालुकावार भौगोलिक क्षेत्रफळ, शहरे व गावे तसेच जिल्ह्याच्या ठिकाणापासूनचे अंतर पुढील सारणीत मांडले आहे.

### सारणी क्रमांक २.१

### बेळगाव जिल्ह्याचे तालुकावार भौगोलिक क्षेत्रफळ, शहरे व गावे तसेच जिल्ह्याच्या ठिकाणापासूनचे अंतर[५]

| तालुका | भौगोलिक क्षेत्रफळ | जिल्ह्यामध्ये तालुक्याचे शेकडा क्षेत्र | शहरांची संख्या | वसलेल्या गावांची संख्या | वस्ती विरहित गांवाची संख्या | बेळगावपासूनचे अंतर किमी. |
|---|---|---|---|---|---|---|
| अथणी | १९९५.७ | १४.८७ | १ | ८९ | – | १६० |
| बेळगाव | १०३७.३ | ७.७३ | ३ | १२४ | १ | ० |
| चिक्कोडी | १२६९.५ | ९.४६ | ३ | १२६ | ५ | ८५ |
| गोकाक | १५३९.९ | ११.४७ | ४ | १०० | – | ७० |
| हुक्केरी | ९९१.५ | ७.३९ | २ | १११ | – | ६५ |
| खानापूर | १७४९.३ | १३.०३ | २ | २१९ | ८ | ३२ |
| सौंदली | १५८०.९ | ११.७८ | १ | १११ | ४ | ९५ |
| रामदुर्ग | १२१५.७ | ९.०६ | १ | १०३ | – | ११० |
| रायबाग | ९५८.८ | ७.१४ | २ | ५३ | – | १०० |
| बैलहोंगल | ११२२.४ | ८.३६ | १ | १२४ | १ | ४५ |
| एकूण | १३४१५ | १००.१९ | २० | ११४२ | १९ | |

Source : Gazetteer of India, Karnataka State, Belgaum District

## २.५ बेळगाव जिल्ह्याचे भौगोलिक स्थान

बेळगाव जिल्ह्याच्या पूर्वेला विजापूर जिल्हा, दक्षिणेला धारवाड आणि उत्तर कन्नडा आणि पश्चिमेला गोवा आणि महाराष्ट्र राज्य. महाराष्ट्र राज्यातील सिंधुदुर्ग हा पूर्व–पश्चिम बाजूंनी, कोल्हापूर पश्चिम आणि उत्तर आणि सांगली हा जिल्हा बेळगाव जिल्ह्याच्या उत्तर दिशेला आहे. हा जिल्हा राज्याच्या उत्तर–पश्चिम विभागात आहे. त्याचे स्थान १५°२३' ते १६°५८' उत्तर अक्षांश आणि ७४°५' ते ७५°२८' पूर्व रेखांश यामधील भूभाग व्यापलेला आहे. जिल्ह्याचा बहुतांशी पश्चिम आणि दक्षिण भाग सह्याद्री रांगाशी संलग्नित आहे. बेळगाव जिल्ह्याचे क्षेत्रफळ १३,४५४ चौरस किमी असून ते राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ६.९९ टक्के आहे. भौगोलिक क्षेत्रफळाचा विचार करता बेळगाव

जिल्ह्याचा राज्यात पाचवा क्रमांक आहे. त्याची दक्षिणोत्तर लांबी सुमारे १६० किमी आणि पूर्व–पश्चिम रूंदी सुमारे ८० ते १३० किमी आहे. बेळगाव जिल्ह्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ७५१ मीटर (२४५३ फूट) आहे.

१९८३ साली काळी नदी प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील एकूण क्षेत्रफळाच्या ३६ चौरस किमी भूभाग उत्तर कन्नडा जिल्ह्यामध्ये हस्तांतर करण्यात आला.

बेळगाव जिल्ह्यात एकूण १० तालुके असून भौगोलिक क्षेत्रफळाचा विचार करता अथणी हा तालुका सर्वात मोठा असून त्याचे क्षेत्रफळ १९९५ चौरस किमी आहे. तर सर्वात लहान तालुका रायबाग असून त्याचे क्षेत्रफळ ९५८.८ चौरस किमी आहे. बेळगाव जिल्ह्यामध्ये २० शहरे व ११४२ गावे आहेत तर १९ गावे वस्तीविरहित आहेत. बेळगाव तालुक्यातील धामणे आणि कुद्रेमनी ही दोन गावे बेळगाव जिल्ह्याशी भौगोलिकदृष्ट्या संलग्नित नसून त्यांच्या सभोवतालचा भाग महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्याने व्यापलेला आहे.

### २.५.१ हवामान

कर्नाटक राज्यामध्ये हवामानाच्या दृष्टीने बेळगाव जिल्ह्याचे हवामान आल्हाददायक आहे. सौम्य उन्हाळा, सौम्य हिवाळा अशी येथील परिस्थिती आढळते. हिवाळ्यात नोव्हेंबर ते फेब्रुवारीमध्ये सरासरी तापमान ७२° ते ७५° फॅरनहिट इतके असते. तसेच हवा कोरडी असते. उन्हाळ्यात मार्च ते मे सरासरी तापमान ८१° ते ८६° फॅरनहिट इतके असते.

### २.५.२ नदया

बेळगाव जिल्ह्यामध्ये महत्त्वाच्या तीन नदया असून त्यामध्ये उत्तर भागात कृष्णा नदी, मध्यवर्ती भागामध्ये घटप्रभा नदी तर दक्षिणेकडे मलप्रभा नदी आहे.

#### २.५.२.१ कृष्णा नदी

बेळगाव जिल्हा हा कृष्णा खोरेचा भाग आहे. उत्तर भागातून वाहणाऱ्या कृष्णा नदीचा उगम महाराष्ट्र राज्यातील पश्चिम घाटातील महादेव रांगामध्ये झाला आहे. कृष्णा नदीची एकूण लांबी

१४०० किमी असून त्यापैकी ७० किमीचा प्रवाह बेळगाव जिल्ह्यामध्ये आहे. या नदीमुळेच बेळगाव जिल्ह्यातील चिक्कोडी आणि अथणी या तालुक्यांच्या नैसर्गिक सीमा सीमित झालेल्या असून मान्सूनमध्ये ही नदी दुथडी भरून वाहते. तसेच काहीवेळा नदीकडच्या गावांना पुराचा फटका बसतो. तसेच अलमट्टी धरणाच्या बॅकवॉटरमुळे नदीकाठची शेती व गावे पाण्याखाली जात असल्यामुळे या भागातील लोकांचे जनजीवन विस्कळीत होते.

### २.५.२.२ घटप्रभा नदी

बेळगाव जिल्ह्यातील दुसरी महत्त्वाची नदी म्हणून घटप्रभा असून या नदीचा उगम पश्चिम घाटातील सुंदरगड या ठिकाणी झाला. महाराष्ट्र राज्यातून ५९ किमी प्रवाहीत झाल्यानंतर ही नदी महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांची १० किमी लांबीची सीमारेषा निश्चित करते. सिद्धीहाळ गावाजवळ या नदीचे बेळगाव जिल्ह्यामध्ये आगमन होत असून याच ठिकाणी दक्षिणेकडून आलेल्या ताम्रपर्णी नदीशी संगम होऊन ती चिक्कोडी तालुकयातून प्रवाहीत होते. त्याचबरोबर चिक्कोडी तालुक्यामध्ये हिरण्यकेशी नदीशी संगम होऊन ती गोकाक तालुक्यात प्रवाहीत होऊन गोकाक तालुक्याची सीमारेषा बनते. या नदीवरचा ५३ मीटर उंचीचा गोकाकचा प्रसिद्ध धबधबा पर्यटकांचे लक्ष वेधून घेतो. या नदीला मार्कंडेय नदीसुद्धा येऊन मिळते. बेळगाव जिल्ह्यात प्रसिद्ध असलेले हिडकल धरण हे याच नदीवर बांधण्यात आले आहे. सदर नदी बेळगाव जिल्ह्यातून ७० किमी वाहते व कित्तापूर विजापूर जिल्ह्यात प्रवाहीत होते.

### २.५.२.३ मलप्रभा नदी

या नदीचा उगम खानापूर तालुक्यातील कणकुंबी येथे झाला आहे. ही नदी खानापूर, सांपगाव, पारसगड आणि रामदुर्ग या तालुक्यातून वाहते. या नदीला धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान आहे. या प्रमुख नदयाबरोबर मार्कंडेय नदी बेळगाव, हुक्केरी आणि गोकाक तालुक्यातील महत्त्वपूर्ण नदी असून ती घटप्रभा नदीला मिळते तर दूधगंगा नदी कोल्हापूर आणि बेळगाव जिल्ह्याची २० किमीची सीमारेषा निश्चित करते. ती पुढे कृष्णा नदीला येडूर येथे मिळते.[६]

याचबरोबर बेळगाव जिल्ह्यातील वाहणाऱ्या नदया म्हणून महादाई, तरवा, हिरण्यकेशी, हिरेहल्ला, वेदगंगा आणि अग्रणी या नदया आहेत.

### २.५.३ पर्जन्यमान

बेळगाव जिल्ह्यातील वार्षिक सरासरी पर्जन्यमान ७८४.७ मिमी आहे. जिल्ह्याच्या वार्षिक पर्जन्यमानात प्रादेशिक असमानता दिसते. जिल्ह्यातील दक्षिण–पश्चिम भाग जो पश्चिम घाटाशी संबंधित आहे तेथे सर्वात जास्त पर्जन्यवृष्टी सुमारे १६८३.६ मि. मी. होते. तर याउलट रायबाग भागामध्ये सर्वात कमी पर्जन्यवृष्टी होत असून त्याचे प्रमाण सुमारे ५०९.५ मि. मी. आहे. एकूण पर्जन्यवृष्टीपैकी ६८ टक्के पाऊस हा मान्सून महिन्यातील जून ते सप्टेंबर यामध्ये पडतो. खानापूर तालुक्यामध्ये सुमारे २००० मि. मी., बेळगाव तालुक्यामध्ये सुमारे १५०० मि. मी. बैलहोंगल, अथणी, चिक्कोडी, हुक्केरी या तालुक्यातील वार्षिक पर्जन्यमान सरासरी ७०० मि. मी. ते ९०० मि. मी. च्या दरम्यान असते. रायबाग, सौंदत्ती या तालुक्यामध्ये ६०० मिमी ते ७५० मिमी च्या दरम्यान असते. तर रामदुर्गमध्ये ४०० मि. मी. ते ५५० मि. मी. च्या दरम्यान असते. बेळगाव जिल्ह्यामध्ये सर्वात कमी पर्जन्यमान गोकाक तालुक्यामध्ये ३५० मिमी ते ४५० मिमी. च्या दरम्यान आहे.

### २.५.४ वनसंपदा

जिल्ह्यात मुख्यत: अधिक पर्जन्यमान असलेल्या बेळगाव आणि खानापूर तालुक्यामध्ये चंदन, शिसम, किंजळ, पानवाघूळ, सागवान, खैर, बांबू, हिरडा, जांभूळ इ. विविध प्रकारची वृक्षसंपदा असून कमी पर्जन्यमानाच्या तालुकयात बाभळी, बोरी, तडवळसारखी खुरटी व काटेरी झुडपे आढळून येतात. त्याचप्रमाणे जिल्ह्यात कुडा, वाकेरे, भरंग, बायडींग, साथवी, धावरी, बिबा, भुईकोहला इ. औषधी वनस्पती आढळतात. जिल्ह्यातील १३ लाख ४४ हजार ३८२ हेक्टर जमिनीपैकी वनक्षेत्राखाली १ लाख ९० हजार ४२४ हेक्टर जमिन असून वनक्षेत्राची एकूण भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी १४.१६ इतकी आहे. बेळगाव जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने खानापूर तालुक्यामध्ये वनक्षेत्र जवळजवळ तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या ५२.७९ टक्के असून त्यानंतर

बेळगाव तालुक्यातील वनक्षेत्राचे प्रमाण २१.८३ टक्के आहे. अथणी, चिक्कोडी आणि रायबाग तालुक्यात वनक्षेत्राचे प्रमाण अत्यल्प असून त्या तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्राशी अनुक्रमे .०४ टक्के, .४ टक्के आणि २.७६ टक्के आहे.

## २.६ लोकसंख्या

एका ठराविक ठिकाणी समूह करून राहणाऱ्या लोकांची संख्या म्हणजे लोकसंख्या. लोकसंख्येचा विचार करत असताना लोकसंख्येची घनता, साक्षरता, स्त्री–पुरुष प्रमाण, शहरी व ग्रामीण लोकसंख्या या सर्व गोष्टींचा समावेश होतो.

लोकसंख्येची घनता म्हणजे दर चौरस कि. मी. वर राहणाऱ्या लोकांची संख्या होय. १ मार्च २००१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्येची घनता ही दर चौरस कि. मी. वर ३२४ इतकी होती. स्त्री–पुरुष प्रमाण म्हणजे दर हजार पुरुषांमागे असणारे स्त्रियांचे प्रमाण होय. २००१ च्या जनगणनेनुसार दर हजार पुरुषांमागे भारतात स्त्रियांचे प्रमाण हे ९७२ इतके होते. ज्यांना एखादी भाषा समजून घेऊन लिहिता वाचता येते आणि ज्यांचे वय ७ वर्षे आणि त्यापेक्षा अधिक आहे अशांना साक्षर संबोधले जाते. भारतातील साक्षरतेचा विचार करता २००१ मध्ये हे प्रमाण ६४.८४% इतके होते. त्यामध्ये ७५.२६% पुरुष व ५३.६७% स्त्रिया साक्षर होत्या. शहरी व ग्रामीण भागातील लोकसंख्येचा विचार करता २००१ मध्ये ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण हे ७२.२% तर शहरी भागात २७.८% लोक राहत होते.[७]

२००१ च्या जनगणनेनुसार बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या ४२ लाख १४ हजार ५०५ आहे. त्यामध्ये पुरुष २१,५०,०९० तर स्त्रिया २०,६४,४१५ आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता ३१४ असून लिंग गुणोत्तर प्रमाण ९६० आहे. तर एकूण लोकसंख्येपैकी २४.०२ टक्के लोक शहरी भागात आणि ७५.९८ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. या जिल्ह्याची तालुकावार विभागणी पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**बेळगाव जिल्हा जनगणना २००१ व २०११ ची तुलना**

बेळगाव जिल्ह्याची एकूण लोकसंख्या त्यामध्ये पुरुष–स्त्रिया, घनता, लिंग गुणोत्तर प्रमाण, सरासरी साक्षरता इ. निकषाआधारेचे वर्गीकरण २००१ च्या जनगणनेनुसार पाहिल्यानंतर २००१ व २०११ ची जनगणना यांचे तुलनात्मक चित्र पुढीलप्रमाणे –

**सारणी क्रमांक २.२**

**बेळगाव जिल्हा जनगणना २००१ व २०११ ची तुलना**

| अ. नं. | तपशील | २००१ | २०११ |
|---|---|---|---|
| १ | एकूण लोकसंख्या | ४२१४५०५ | ४७७८४३९ |
| २ | पुरुष | २१५००९० | २४२७१०४ |
| ३ | स्त्रिया | २०६४४१५ | २३५१३३५ |
| ४ | लोकसंख्या वृद्धीदर | १७.६१% | १३.३८% |
| ५ | क्षेत्रफळ चौ. किमी | १३४१५ | १३४१५ |
| ६ | लोकसंख्येची घनता | ३१४ | ३५६ |
| ७ | कर्नाटक राज्याच्या तुलनेत बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या | ७.९७ | ७.८२ |
| ८ | लिंग गुणोत्तर (दर हजारी) | ९६० | ९६९ |
| ९ | बाल लिंग गुणोत्तर (० ते ६) | ९२१ | ९३१ |
| १० | सरासरी साक्षरता | ६४.२० | ७३.९४ |
| ११ | पुरुष साक्षरता | ७५.७० | ८२.९० |
| १२ | स्त्री साक्षरता | ५२.३२ | ६४.७४ |
| १३ | ६ वर्षाखालील मुलांची संख्या | ६२४०३१ | ६०५५२४ |
| १४ | शेकडा प्रमाण | १४.८१ | १२.६७ |
| १५ | मुलांचे शेकडा प्रमाण | १५.११ | १२.९२ |
| १६ | मुलींचे शेकडा प्रमाण | १४.४९ | १२.४२ |
| १७ | मुले | ३२४८१६ | ३१३५९९ |
| १८ | मुली | २९९२१५ | २९१९२५ |

संदर्भ : www.census.2011.co.in

वरील सारणीवरून बेळगाव जिल्ह्याची २०११ ची लोकसंख्या विचारात घेतल्यास त्यामध्ये ५,६३,९३४ ने वाढलेली दिसून येते. त्यामध्ये पुरुष २,७७,०१४ तर स्त्रिया २,८६,९२० ने वाढलेल्या दिसून येतात. यावरून स्त्रियांचे प्रमाण वाढल्याचे जाणवते. मात्र २००१ च्या तुलनेत लोकसंख्या वृद्धीदर ४.२३% ने घटला आहे. लोकसंख्येची घनता २००१ ला ३१४ ती ३५६ ने वाढलेली असून दर हजारी लिंग गुणोत्तराचे प्रमाण ९ ने वाढल्याचे दिसून येते. तसेच २००१ च्या तुलनेत सरासरी साक्षरतेचे प्रमाण ९.७३% ने वाढलेले असून त्यामध्ये पुरुष साक्षरता प्रमाण ७.२% नी वाढले तर स्त्री साक्षरता प्रमाण १२.४२ ने वाढले आहे. यावरून कर्नाटक सरकारचे साक्षरतेचे धोरण पूर्णत्वाच्या दिशेने चालल्याचे दिसते.

तसेच २००१ च्या तुलनेत ६ वर्षाखालील मुलांची संख्या १८५०७ (२.१४%) ने घटलेली असून त्यामध्ये मुलांचे शेकडा प्रमाण २.१०% ने तर मुलींचे प्रमाण शेकडा २.०७ ने घटल्याचे दिसून येते.

## सारणी क्रमांक २.३

### बेळगाव जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्येची माहिती (२००१ च्या जनगणनेनुसार)

| अ. नं. | तालुका | एकूण लोकसंख्या | स्त्री | पुरुष | ग्रामीण | | एकूण | शहरी | | एकूण | लिंग गुणोत्तर | घनता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | स्त्री | पुरुष | | स्त्री | पुरुष | | | |
| १ | अथणी | ४६१८६२ | २२४९८४ | २३६८७८ | २०४८५१ | २१६०६१ | ४२०९१२ | २०१३३ | २०८१७ | ४०९५० | ९४९ | २३१ |
| २ | बैलहोंगल | ३५६२८६ | १७५४७९ | १८०८०७ | १५४१२२ | १५८९३९ | ३१३०६१ | २१३५७ | २१८६८ | ४३२२५ | ९६९ | ३१८ |
| ३ | बेळगाव | ८१५५८१ | ३९६९७२ | ४१८६०९ | १५२१३१ | १५६९७० | ३०९१०१ | २४४८४१ | २६१६३९ | ५०६४८० | ९४६ | ७८६ |
| ४ | चिक्कोडी | ५६७६०१ | २७६६५८ | २९०९४३ | २२१८९८ | २३४५९७ | ४५६४९५ | ५४७६० | ५६३४६ | १११००६ | ९५० | ४४२ |
| ५ | गोकाक | ५२६०९२ | २५९४६२ | २६६६३० | १९९०१५ | २०२९९१ | ४०२००६ | ६१४४७ | ६३६३९ | १२५०८६ | ९७२ | ३४२ |
| ६ | हुक्केरी | ३५७१९३ | १७५६१४ | १८१५७९ | १५००६१ | १५४७०४ | ३०४७६५ | २५५५३ | २६८७५ | ५२४२८ | ९६७ | ३६० |
| ७ | खानापूर | २४३१८५ | १२१०७४ | १२२१११ | १०९८९२ | ११०४५३ | २२०३४५ | १११८२ | ११६५८ | २२८४० | ९८९ | १३९ |
| ८ | रायबाग | ३४७६०० | १६८७७५ | १७८८२५ | १५१६०८ | १६०२२० | ३११८२८ | १७१६७ | १८६०५ | ३५७७२ | ९४३ | ३६२ |
| ९ | रामदुर्ग | २२७४१२ | ११२१२६ | ११५२८६ | ९३९७९ | ९६७८४ | १९०७६३ | १८१४७ | १८५०२ | ३६६४९ | ९७१ | १८७ |
| १० | सौंदली | ३११६९३ | १५३२७१ | १५८४२२ | १३४५०१ | १३९०३७ | २७३५३८ | १८७७० | १९३८५ | ३८१५५ | ९६७ | १९७ |
| | **एकूण** | **४२१४५०५** | **२०६४४१५** | **२१५००९०** | **१५७१०५८** | **१६३०७५६** | **३२०१११४** | **४९३३५७** | **५१९३३४** | **१०१२६९१** | **९६०** | **३१४** |

संदर्भ : बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या–२०१०–११, पृ. १,३,५.

वरील सारणीवरून एकूण नागरी लोकसंख्येपैकी सुमारे ५० टक्के लोकसंख्या बेळगाव तालुक्यातील असून २३.३२ टक्के लोकसंख्या चिक्कोडी व गोकाक तालुक्यात आहे. तर उर्वरीत २८ टक्के लोकसंख्या इतर सात तालुक्यामध्ये विभागलेली आहे. लोकसंख्येची सर्वात जास्त घनता बेळगाव तालुक्यात (७८६) तर सर्वात कमी घनता खानापूर तालुक्यात (१३९) आहे.

स्त्री–पुरुष लिंग गुणोत्तराचे जिल्ह्याचे सरासरी प्रमाण ९६० इतके असून सर्वात अधिक प्रमाण खानापूर तालुक्यात ९८९ आणि सर्वात कमी प्रमाण रायबाग तालुक्यात ९४३ इतके आहे.

लोकसंख्येच्या बाबतीमध्ये सर्वात मोठा तालुका म्हणून बेळगाव असून एकूण बेळगाव जिल्ह्यातील लोकसंख्येपैकी जवळजवळ (८१५५८१) १९.३५ टक्के लोकसंख्या ही बेळगाव तालुक्यात आहे. तर सर्वात कमी लोकसंख्या रामदुर्ग तालुक्याची असून जिल्ह्याच्या लोकसंख्येपैकी ५.३९ टक्के (२२७४१२) आहे.

**सारणी क्रमांक २.४**

**बेळगाव ग्रामीण व शहरी लोकसंख्येची तुलना**

| अ. नं. | माहिती | ग्रामीण | शहरी |
|---|---|---|---|
| १ | एकूण लोकसंख्या | ३२०१८१४ | १०१२६९१ |
| २ | टक्केवारी | ७५.९७ | २४.०३ |
| ३ | पुरुष लोकसंख्या | १६३०७५६ | ५१९३३४ |
| ४ | स्त्री लोकसंख्या | १५७१०५८ | ४९३३५७ |
| ५ | लिंग गुणोत्तर | ९६७ | ९७४ |
| ६ | बाल लिंग गुणोत्तर (० ते ६) | ९३२ | ९२६ |
| ७ | ६ वर्षाखालील मुलांची संख्या | ४७२३९८ | १३३१२६ |
| ८ | मुले | २४४४८२ | ६९११७ |
| ९ | मुली | २२७९१६ | ६४००९ |
| १० | टक्केवारी | १३.२४ | ११.०० |
| ११ | मुलांची टक्केवारी | १३.४८ | ११.२७ |
| १२ | मुलींची टक्केवारी | १३.०० | १०.७१ |

संदर्भ : www.population.belgaum.com

### २.६.१ लोकसंख्येची वैशिष्ट्ये

बेळगाव जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ४२,१४,५०५ असून त्यापैकी ग्रामीण भागातील लोकसंख्या ३२,०१,८१४ इतकी असून उर्वरीत लोकसंख्या १०,१२,६९१ शहरी भागात राहते.

#### लोकसंख्या प्रमाण

लोकसंख्येच्या बाबतीमध्ये सर्वात मोठा तालुका बेळगाव असून एकूण बेळगाव जिल्ह्याच्या लोकसंख्येपैकी १९.३५ टक्के म्हणजेच ८,१५,५८१ इतकी लोकसंख्या बेळगाव तालुक्यात आहे तर सर्वात कमी लोकसंख्या रामदुर्ग तालुक्याची असून जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ५.३९ टक्के म्हणजेच २,२७,४१२ इतकी आहे.

#### नागरी प्रमाण

जिल्ह्याच्या १०,१२,६९१ या एकूण नागरी लोकसंख्येपैकी ४,९३,३५७ इतक्या स्त्रिया असून पुरुष संख्या ५,१९,३६४ इतके आहे. एकूण नागरी लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्या बेळगाव तालुक्यातील असून २३.३२ टक्के लोकसंख्या चिक्कोडी व गोकाक तालुक्यात आहे तर उर्वरीत २८ टक्के लोकसंख्या इतर सात तालुक्यांमध्ये विभागलेली आहे.

#### घनता

शहरीकरणाच्या प्रभावामुळे बेळगाव व चिक्कोडी या तालुक्यामध्ये लोकसंख्येची घनता अनुक्रमे ७८६ व ४४२ इतकी आहे तर सर्वात कमी घनता ग्रामीण वस्ती अधिक असणाऱ्या खानापूर तालुक्यात १३९ इतकी आहे.

### लिंग गुणोत्तर

स्त्री–पुरुष लिंग गुणोत्तराचे जिल्ह्याचे सरासरी प्रमाण ९६० असून त्यामध्ये ग्रामीण भागामध्ये त्याचे प्रमाण ९६७ तर शहरी भागामध्ये ९७४ इतके आहे. लिंग गुणोत्तराचे सर्वात अधिक प्रमाण खानापूर तालुक्यात ९८९ आहे तर सर्वात कमी प्रमाण रायबाग तालुक्यात ९४३ इतके आहे.

### २.६.२ साक्षरता

साक्षरता हा घटक देशाच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे देशातील प्रत्येक नागरीक शिक्षणाने साक्षर झाला पाहिजे यासाठी केंद्र आणि राज्य सरकार प्रयत्नशील असते. त्याचबरोबर शिक्षण हा मानवाचा मूलभूत हक्क असल्याने आज तळागाळातील सर्व लोकांपर्यंत शिक्षणाची गंगोत्री पोहचली असून त्याद्वारे एकूण साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. बेळगाव जिल्ह्यातील साक्षरता प्रमाणसुद्धा वाढत असल्याचे पुढील सारणीतून दिसून येते.

## सारणी क्रमांक २.५

## साक्षरता प्रमाण

| अ. नं. | तालुका | ग्रामीण | | एकूण | शहरी | | एकूण | एकूण पुरुष | एकूण स्त्रिया | एकूण | टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | | पुरुष | स्त्रिया | | | | | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १ | अथणी | १२९२७८ | ८३०८५ | २१२३६३ | १५४२१ | ११७२३ | २७१४४ | १४४६९९ | ९४८०८ | २३९५०७ | ७२.५४ | ४९.०० | ६१.४ |
| २ | बैलहोंगल | ९८७७१ | ६३२२५ | १६१९९६ | १६४३२ | १२८३० | २९२६२ | ११५२०३ | ७६०५५ | १९१२५८ | ७५.४४ | ५०.९९ | ६३.३७ |
| ३ | बेळगाव | १०११६५ | ६७८६३ | १६९०२८ | २११६५१ | १७१७६२ | ३८३४१३ | ३१२८१६ | २३९६२५ | ५५२४४१ | ८६.४६ | ६९.७१ | ७८.३१ |
| ४ | चिक्कोडी | १५६९२९ | १०१५९३ | २५८५२२ | ४३२१६ | ३३५४० | ७६७५६ | २००१४५ | १३५१३३ | ३३५२७८ | ८१.५६ | ५६.६३ | ६८.८३ |
| ५ | गोकाक | १०८७९५ | ६०६०५ | १६९४०० | ४३७३८ | ३२१९२ | ७५९३० | १५२५३३ | ९२७९७ | २४५३३० | ६८.७ | ४२.८४ | ५५.९ |
| ६ | हुक्केरी | ९५५२४ | ५९५५७ | १५५०८१ | १९७२६ | १४६४८ | ३४३७४ | ११५२५० | ७४२०५ | १८९४५५ | ७४.६९ | ४९.१५ | ६२.०९ |
| ७ | खानापूर | ७१९८९ | ४८५४२ | १२०५३१ | ९३०१ | ७४२८ | १६७२९ | ८१२९० | ५६०२० | १३७३१० | ७८.०६ | ५३.८६ | ६५.९९ |
| ८ | रायबाग | ८६६१५ | ५३१४३ | १३९७५८ | १२२२० | ९०५७ | २१२७७ | ९८८३५ | ६२२०० | १६१०३५ | ६६.६२ | ४४.१४ | ५५.६८ |
| ९ | रामदुर्ग | ५३५२० | २८३५६ | ८१८७६ | १३४२१ | ९६४२ | २३०६३ | ६६९४१ | ३७९९८ | १०४९३९ | ६९.४२ | ४०.३६ | ५५.०५ |
| १० | सौंदली | ८०६२१ | ४५२९६ | १२५९१७ | १३४१५ | ९४४४ | २२८५९ | ९४०३६ | ५४७४० | १४८७७६ | ७१.६५ | ६०.०० | ५६.६८ |
| | **एकूण** | **९८३२०७** | **६११२६५** | **१५९४४७२** | **३९८५४१** | **३१२२६६** | **७१०८०७** | **१३८१७७८** | **९२३५८१** | **२३०५२५९** | **७५.७०** | **५२.३०** | **६४.२०** |

संदर्भ : बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या–२०१०–११, पृ. ६

बेळगाव जिल्ह्यामध्ये एकूण साक्षरतेचे प्रमाण ६४.२० टक्के (२३०५२५९) इतके असून यामध्ये पुरुषांचे प्रमाण ७५.७० टक्के (१३८१७७८) तर स्त्रियांचे प्रमाण ५२.३० टक्के (९२३५८१) इतके आहे. सर्वात अधिक साक्षर असणारा तालुका बेळगाव असून त्याचे प्रमाण ७८.३१ टक्के (५५२४४१) तर सर्वात कमी साक्षरता असणारा तालुका रामदुर्ग असून त्याचे प्रमाण ५५.०५ टक्के (१०४९३९) आहे. ग्रामीण भागामध्ये साक्षरतेचे अधिक प्रमाण चिक्कोडी तालुक्यात ६६.२९ टक्के (२५८५२२) इतके आहे तर ग्रामीण भागात कमी साक्षरतेचा तालुका गोकाक असून त्याचे प्रमाण ५१.०३ टक्के (१६९४००) इतके आहे. शहरी भागामध्ये साक्षरतेचे सर्वाधिक प्रमाण बेळगाव तालुक्याचे असून त्याचे प्रमाण ८६.६१ टक्के (३८३४१३) इतके आहे तर कमी साक्षरतेचा शहरी तालुका रायबाग असून त्याचे प्रमाण ६९.९१ टक्के (२१२७७) इतके आहे. बेळगाव जिल्ह्यामध्ये स्त्रियांच्या साक्षरतेचे सर्वाधिक प्रमाण बेळगाव तालुक्यामध्ये असून त्याचे शेकडा प्रमाण ६९.७१ (२३९६२५) असून सर्वात कमी प्रमाण रामदुर्ग तालुक्यात असून त्याचे शेकडा प्रमाण ४०.३८ (३७९९८) आहे.

## २.७ समाजरचना

भारताचा विचार करता एकूण लोकसंख्येपैकी ७२ टक्क्यांहून अधिक लोक शेती व्यवसाय करत असून बेळगाव जिल्ह्यातही प्रामुख्याने शेती व्यवसाय दिसून येतो. बेळगाव जिल्ह्यामध्ये एकूण १० तालुके असून प्रत्येक तालुक्यातील जवळपास ७५ ते ८० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागातच राहते. त्यामुळे बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण समाजरचनेचा विचार करणे आवश्यक ठरते. तेथील लोकांचा मुख्यत: शेती व्यवसाय करणारा शेतकरी वर्ग, कला कुसरीची कामे करणाऱ्या व सेवा करणाऱ्या बलुतेदार व अलुतेदार जाती, भटकंती करून जीवन जगणाऱ्या भटक्या जमाती येथे आढळून येतात.

बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण समाजजीवनाचा वेध घेताना येथील बलुतेदारी पद्धतीचा विचार करणे अपरिहार्य ठरते. कारण बलुतेदारी पद्धती ग्रामीण समाजजीवनाचा एक अविभाज्य अंग बनली होती. या जिल्ह्यात मराठा, कुणबी हा वर्ग मोठ्या प्रमाणात शेती व्यवसाय करतो. मराठा वा कुणबी

यांच्याव्यतिरिक्त जो वर्ग बिगरशेतीची कामे करतो त्यांना ‘अडाणी’ असे संबोधले जाते. या अडाण्यांमधील ज्या जाती शेतकऱ्यांची कामे करतात त्यांना ‘बलुतेदार’ असे म्हटले जाते. त्यामध्ये महार, मांग, लोहार, सुतार, कुंभार, चांभार, परीट, न्हावी, जोशी, गुरव, मुल्लाणी, कोळी यांचा समावेश होतो तर ज्या जाती तुलनेने कमी महत्त्वाची कामे करतात त्यांना ‘अलुतेदार’ म्हणतात. त्यामध्ये तेली, तांबोळी, साळी, माळी, जंगम, कळवंत, सोनार, चौगला, तराळ, ठाकर, घडशी, डवऱ्या, भोई, शिंपी, धनमट, गोंधळी, गोसावी, वाजंत्री इ. चा समावेश होतो. या बलुतेदार व अलुतेदार यांचे व्यवसाय जातीनुसार असून आजही बेळगाव ग्रामीण भागात या बलुतेदारी पद्धतीचे अस्तित्व असलेले दिसून येते. यावरच तेथील ग्रामीण समाजरचना आधारलेली आहे. ही समाजरचना महाराष्ट्रीयन ग्रामीण समाजरचनेशी मिळतीजुळती असल्याचे दिसून येते तर खेड्यांची वस्तीरचनाही महाराष्ट्राप्रमाणेच जातीनुरूप असलेली दिसून येते.[८]

बेळगाव जिल्ह्यातील मराठी सीमाभाग सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, वाङ्मयीन व ऐतिहासिक अशा साऱ्या दृष्टींनी महाराष्ट्राशी निगडीत आहे. येथील लाखो लोक ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, रामदास आदी मराठी संतांचे भक्त आहेत. पंढरपूरचा विठोबा ही येथील लोकांची आराध्य दैवते आहेत. दरवर्षी येथून हजारो वारकरी व उपासक पंढरपूरच्या यात्रेस जातात. तर सीमाभागातील गावामध्ये असलेली धार्मिक दैवते ही महाराष्ट्राशीच निगडीत असलेली दिसून येतात. यामधून होणारी भजन, कीर्तने ही मराठी भाषेतूनच होतात. धार्मिक सण, समारंभ, विवाह हे महाराष्ट्रीय पद्धतीनेच साजरे करतात तर शिवजयंती, गणेशोत्सव इ. कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरे करतात. बेळगाव, खानापूरमधील बहुसंख्य गावांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटो प्रतिमांना स्थान आहे. यावरून सीमावासीयांचे महाराष्ट्रीयन अस्मितेचे जवळीकतेचे वेळोवेळी दर्शन होते.

भाषिक समस्येमुळे आणि महाराष्ट्रीयन संस्कृतीच्या प्रभावामुळे सीमावासीय लोक नातेसंबंध जोडताना चंदगड, कागल, गडहिंग्लज, शिरोळ यासह कोल्हापूर जिल्ह्यातील अन्य तालुक्यांना महत्त्व देतात, तर विवाहावेळी केल्या जाणाऱ्या धार्मिक विधी या मराठी भाषेतूनच केल्या जातात आणि त्यावर महाराष्ट्रीयन संस्कृतीचा प्रभाव असून महात्मा फुले, शाहू, आंबेडकर यांच्या सामाजिक

सुधारणांचा प्रभावही जाणवतो. बेळगाव भागात हे काम गुरुवर्य शामराव देसाई, न्या. भुजंगराव दळवी, व्ही. एस. पाटील, रावबहाद्दर एम. एम. लाड, बर्हिजी शिरोळकर आदी सत्यशोधक विचारांच्या कार्यकर्त्यांनी केले. सत्यशोधक विचारांच्या प्रसाराबरोबरच शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन व सावकारशाहीच्या जोखडातून शेतकऱ्यांची मुक्ती इ. कार्येही त्यांनी यशस्वीरित्या केली. त्यांच्या विचारांचा प्रभाव सीमाभागातील मराठी भाषिकांवर पडलेला दिसून येतो.

बेळगाव भागातील समाजरचना तंतोतंत महाराष्ट्रातील समाजरचनेप्रमाणेच आहे. या भागात ब्राह्मण, मराठे व हरिजन ह्या प्रमुख जाती असून मुसलमान, जैन व लिंगायत ह्या अल्पसंख्याक जमाती आहेत. महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे आढळून येणारी कदम, गायकवाड, जाधव, चव्हाण, देशमुख इ. आडनावे बेळगाव भागात सर्वत्र आढळून येतात. जीवनाच्या सर्व क्षेत्रात ते मराठीचा वापर करतात. फक्त काही जैन व लिंगायत कुटुंबे घरी कन्नड भाषा बोलतात. परंतु त्यांच्या सामाजिक व्यवहाराची भाषा मराठीच आहे. या भागातील सामाजिक रूढी, धार्मिक समजुती, धार्मिक कार्ये व सण–समारंभ महाराष्ट्राप्रमाणेच आहेत. बेळगाव भागातील लोकांची कुलदैवते व पवित्र ठिकाणे महाराष्ट्रातच आहेत. कोल्हापूरची महालक्ष्मी, जोतिबा, तुळजापूरची भवानीमाता, पंढरपूरचा विठोबा, नरसिंहवाडीचा दत्त व जेजुरीचा खंडोबा या दैवतांचे येथील लोक भक्त आहेत. कर्नाटकात लक्ष्मी ह्या देवतेची देवळे क्वचितच आढळतात. परंतु हीच देवळे बेळगाव व ममदापूर, लखनपूर, लाट इ. आजूबाजूच्या ठिकाणी आढळून येतात. या भागातील मुसलमानही शाळेत उर्दू शिकत असले तरी महाराष्ट्रातील मुसलमानांप्रमाणे ते मराठी भाषिकच आहेत. अल्पसंख्य असणारे ख्रिश्चन लोकही मराठी भाषाच बोलतात.

## २.८ आरोग्य

बेळगाव जिल्हा आरोग्यविषयक सुविधाबाबत परिपूर्ण असून विशेषत: बेळगाव शहरात या सुविधांची उपलब्धता आहे. या आरोग्यविषयक सुविधांचा लाभ फक्त बेळगाव जिल्ह्यातील लोकांपुरताच नसून संपूर्ण कर्नाटक राज्य आणि सीमाभागातील लोक घेत आहेत.

स्वातंत्र्यपूर्वकाळापासूनच बेळगाव जिल्ह्यात विविध रोगांवर इलाज करणारे दवाखाने असल्याचे दिसून येतात, तर जिल्ह्याच्या अनेक तालुक्यांमध्ये अशा सुविधा उपलब्ध असलेल्या दिसून येतात.

आज बेळगावमध्ये के. एल. ई. हॉस्पीटल हे आशिया खंडातील सर्वात मोठे दोन नंबरचे हॉस्पीटल असून यामध्ये रूग्णांना आधुनिक सुविधा आणि उपचार पद्धती पुरविण्यात येते तर अलिकडेच कॅन्सर हॉस्पीटलचीसुद्धा उभारणी केलेली आहे. तसेच ए. एम. शेख होमिओपॅथी आणि मेडिकल कॉलेज असून त्यामधून दरवर्षी असंख्य नव्याने डॉक्टर्स बाहेर पडतात व रूग्णांची सेवा करतात. विश्वनाथ डेन्टल हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर हे बेळगावमध्येच आहे. याव्यतिरिक्त अनेक वैद्यकीय संस्था बेळगाव जिल्ह्याच्या विविध विभागात कार्यरत असून त्या पुढीलप्रमाणे –

१. बेळगाव जिल्हा रूग्णालय (१८५९) – अलिकडच्या काळात रूग्णालयाला सिव्हील हॉस्पीटल असे संबोधण्यात येते. या रूग्णालयात बेळगाव जिल्ह्यासह आजूबाजूच्या सीमावर्ती भागातील रूग्ण येतात. या रूग्णालयाला बेळगावमधील जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज संलग्नित असून येथे सर्व प्रकारच्या आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध आहेत.

२. जनरल हॉस्पीटल, गोकाक (१८६५)

३. कर्नाटक आरोग्य संस्था, घटप्रभा (१९३५)

४. जनरल हॉस्पीटल, सौंदत्ती (१८७५)

५. जनरल हॉस्पीटल, चिक्कोडी (१८८२)

६. जिल्हा टी. बी. सेंटर, बेळगाव (१९७२)

७. महात्मा गांधी हॉस्पीटल, निपाणी, चिक्कोडी (१९५८)

८. एम्लॉईज स्टेट इन्श्युरन्स हॉस्पीटल (१९६३)

९. वॅसीन इन्स्टिट्यूट, बेळगाव (१९०४)

१०. मिशन हॉस्पीटल, संकेश्वर (१९२३)

११. लिप्रोसी हॉस्पीटल, हिंडलगा, बेळगाव (१९१२)

वरीलप्रमाणे वेगवेगळी हॉस्पीटल्स बेळगाव जिल्ह्यात कार्यरत असून यामार्फत अत्याधुनिक वैद्यकीय सेवा पुरविली जाते.

## २.९ शिक्षण

अपेक्षित परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षणाचा उपयोग करावा लागतो. पण त्याचबरोबर घडणाऱ्या परिवर्तनाला सामोरे जाण्यासाठीही शिक्षणाचाच आधार घ्यावा लागतो. काळाच्या प्रवाहात अनेक भल्याबुऱ्या घटना आणि घडामोडी अव्याहतपणे घडतच असतात. त्यामुळे परिवर्तनाचा प्रवाह सतत चालूच असतो आणि ज्या काही घटना घडामोडी घडत असतात त्या व्यक्तिंच्या आणि राष्ट्राच्या जीवनात नवीन अवस्था, नवीन परिस्थिती आणि नवनवीन आव्हाने निर्माण करीत असतात. ती आव्हाने निर्माण करीत असतात. ती आव्हाने पेलण्यासाठी आवश्यक असणारी मानसिक शक्ती शिक्षणातून आपल्याला प्राप्त होऊ शकते. आवश्यक ज्ञान आणि मानसिक शक्ती प्राप्त केल्याशिवाय प्रतिकूल बदलावर मात करता येत नाही. तसेच अनेक बदल असे असतात की ते आपल्याभोवती चक्रव्यूह निर्माण करतात. त्यातून बाहेर पडण्यासाठी व पुढचा मार्ग आक्रमण करण्यासाठी बौद्धिक शक्तीची गरज असते. त्यासाठी शिक्षण आवश्यक ठरते.

ब्रिटीशांनी राज्यसत्तेला स्थैर्य आणल्यानंतर त्यांनी लोकशिक्षणाच्या कार्याला अग्रक्रम दिला. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी इ. स. १८३२ मध्ये पहिली इंग्रजी शाळा काढली. 'लंडन मिशनचे इंग्रजी हायस्कूल' असे प्रथम या शाळेचे नाव होते. रेव्हंड जे. टेलर यांनी ही शाळा सुरू केली होती. सुरूवातीला फक्त ३० मुली या शाळेमध्ये होत्या. सध्या या शाळेला 'बेननस्मिथ हायस्कूल' म्हणून ओळखले जाते. इ. स. १८५० मध्ये दक्षिणेकडील संस्थानिक व जहागिरदार यांच्या मुलांच्यासाठी 'सरदार हायस्कूल, बेळगाव' या नावाने पहिली सरकारी शाळा बेळगावला निघाली. ही शाळा चालविण्यासाठी येणारा वार्षिक खर्च संस्थानिक व जहागिरदार यांच्याकडून वसूल केला जाई. इ. स. १८५२ मध्ये 'सेंट मेरी हायस्कूल' सुरू झाले. त्यात फक्त इंग्लिश व इतर युरोपियन मुला–मुलींना प्रवेश असे. इ. स. १८६१ मध्ये सुरू झालेली रियासत गल्लीतील शाळा क्रमांक २२

ही 'मराठी माध्यमाची' सर्वात जुनी शाळा आहे. १८६३ मध्ये प्रौढ पोलीसांच्यासाठी एक शाळा सुरू केली. त्यामध्ये ५३ पोलीस प्रशिक्षण घेत होते. या शाळानंतर बेळगाव शहर आणि जिल्ह्यामध्ये कन्नड व इंग्रजी, मराठी, उर्दू माध्यम असलेल्या शाळांच्या संख्याही वाढल्या.

## २.९.१ शालेय शिक्षण

शिक्षण ही मानवाची एक मूलभूत गरज असून त्यावरच मानवाचा विकास अवलंबून आहे. शिक्षणाने मानवी मनाचा विकास होतो. बौद्धिक विकास होतो. शिक्षणातून चांगले आदर्श संस्कार व्यक्तिमत्वावर बिंबवले जातात. शिक्षणातूनच मानवी अर्भकाचे सामाजिक मानवात रूपांतर होत असते. त्यामुळे आज जन्माला येणाऱ्या प्रत्येक बालकाला लहानपणापासूनच शिक्षण देणे सक्तीचे बनले असून त्यासाठी सरकारने शहराबरोबरच ग्रामीण खेड्यातील वाड्यावस्त्यापर्यंत शिक्षणाची सोय उपलब्ध केली आहे. आपल्या देशात ज्या अनेक सामाजिक चळवळी झालेल्या आहेत त्यामध्ये शिक्षणाला प्रमुख स्थान आहे. जीवनातील उच्चस्तर शिखरावर चढण्यासाठी शिक्षणाचा 'दोर' म्हणून वापर करता येतो. तसेच विद्या नावाची घोरपड आपल्याजवळ नसेल तर समाजजीवनातला कुठलाही गड सर करता येणार नाही. ही गोष्ट अनेक समाजसुधारकांनी लोकांच्या मनावर बिंबवून ठेवलेली आहे.[९] त्यामुळे बेळगाव जिल्ह्यामध्येही अगदी कनिष्ठ स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंतची सोय सरकारने केली आहे. त्याची ठळक आकडेवारी पुढील सारणीत मांडली आहे.

## सारणी क्रमांक २.६

## बेळगाव जिल्ह्यातील कनिष्ठ प्राथमिक शाळांची माहिती

| अ. नं. | तालुका | कनिष्ठ प्राथमिक शाळा | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | अथणी | २६० | ५७९२९ |
| २ | बैलहोंगल | १०६ | ४६५५ |
| ३ | बेळगाव | १८५ | १२४११ |
| ४ | चिक्कोडी | २१२ | ६२२०३ |
| ५ | गोकाक | २१० | ६१२१० |
| ६ | हुक्केरी | १०४ | ३५३३४ |
| ७ | खानापूर | १९५ | ६१८७ |
| ८ | रायबाग | १९९ | ४५१२५ |
| ९ | रामदुर्ग | ११७ | ६०३८ |
| १० | सौंदत्ती | १२२ | ६२९३ |
| | **एकूण** | **१७१०** | **२९७३८५** |

संदर्भ : बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या–२०१०–११, पृ. १३३

## सारणी क्रमांक २.७

## बेळगाव जिल्ह्यातील वरिष्ठ प्राथमिक शाळांची माहिती

| अ. नं. | तालुका | वरिष्ठ प्राथमिक शाळा | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | अथणी | ३०० | २००१६ |
| २ | बैलहोंगल | १९७ | ४२७६१ |
| ३ | बेळगाव | ४०३ | १००३०० |
| ४ | चिक्कोडी | ३६१ | २६८८६ |
| ५ | गोकाक | ३४० | २१४४८ |
| ६ | हुक्केरी | २२५ | १३९९२ |
| ७ | खानापूर | १७२ | २४५५६ |
| ८ | रायबाग | २१२ | १६१५१ |
| ९ | रामदुर्ग | १३३ | २९१८९ |
| १० | सौंदत्ती | १५८ | ३८७९९ |
| | **एकूण** | **२५०१** | **३३४०९८** |

संदर्भ : बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या–२०१०–११, पृ. १३२, १३४

## सारणी क्रमांक २.८

## बेळगाव जिल्ह्यातील माध्यमिक विद्यालयांची माहिती

| अ. नं. | तालुका | माध्यमिक विद्यालये | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | अथणी | ८९ | २१०७१ |
| २ | बैलहोंगल | ८४ | ११४७० |
| ३ | बेळगाव | १८६ | ३०२६२ |
| ४ | चिक्कोडी | ९२ | ३३९९४ |
| ५ | गोकाक | ८७ | २५६२८ |
| ६ | हुक्केरी | ५९ | ६६१७ |
| ७ | खानापूर | ५२ | ९०६७ |
| ८ | रायबाग | ६७ | २०१३२ |
| ९ | रामदुर्ग | ४३ | ६९०३ |
| १० | सौंदत्ती | ६३ | ८५०६ |
| | **एकूण** | **८२२** | **१७३६५०** |

संदर्भ : बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या–२०१०–११, पृ. १३५

## सारणी क्रमांक २.९

## बेळगाव जिल्ह्यातील उच्च माध्यमिक विद्यालयांची माहिती

| अ. नं. | तालुका | उच्च माध्यमिक विद्यालये | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | अथणी | २६ | ७५५३ |
| २ | बैलहोंगल | २३ | ६८९८ |
| ३ | बेळगाव | ४६ | १६५६३ |
| ४ | चिक्कोडी | २५ | ८०५४ |
| ५ | गोकाक | २८ | १२०८५ |
| ६ | हुक्केरी | २१ | ६३२० |
| ७ | खानापूर | १४ | ३०४१ |
| ८ | रायबाग | २३ | ५८२० |
| ९ | रामदुर्ग | १४ | ४०३५ |
| १० | सौंदत्ती | १९ | २३२५ |
| | **एकूण** | **२३९** | **७४६९४** |

संदर्भ : बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या–२०१०–११, पृ. १३८

वरील कोष्टकावरून बेळगाव जिल्ह्यात एकूण कनिष्ठ प्राथमिक शाळांची संख्या १७१० असून विद्यार्थ्यांची संख्या २,९७,३८५ इतकी असून त्यामध्ये १,५६,८३५ मुले आहेत तर वरिष्ठ प्राथमिक शाळांची संख्या २५०१ इतकी असून एकूण विद्यार्थी संख्या ३,३४,०९८ इतकी आहे. त्यामध्ये मुलांची संख्या १,७४,४५५ इतकी आहे. माध्यमिक शाळांची संख्या ८२२ असून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १,७३,६५० आहे. त्यामध्ये मुलींची संख्या ८१,१११ इतकी आहे तर पदवीपूर्व महाविद्यालयांची एकूण संख्या २३९ असून विद्यार्थ्यांची संख्या ७४,६९४ इतकी आहे.

वरील आकडेवारीवरून बेळगाव जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामध्ये कनिष्ठ प्राथमिक शाळांपासून ते उच्च माध्यमिक शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्याचा परिणाम जिल्ह्याचे सरासरी साक्षरता प्रमाण वाढण्यास मदत होत आहे.

### २.९.२ उच्च शिक्षण

बेळगाव जिल्ह्यातील अनेक नामांकित शैक्षणिक संस्थामध्ये राज्याबरोबरच परराज्यातील तसेच परदेशातीलही असंख्य विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी बेळगाव जिल्ह्यामध्ये विशेषत: बेळगाव शहरामध्ये येत आहेत. पारंपरिक पदवी शिक्षणाबरोबरच अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यावसायिक शिक्षणाची सोय विविध शैक्षणिक संस्थामधून केली जाते. त्यामुळे असंख्य विद्यार्थी येथून शिक्षण घेऊन देशाच्याच नाहीतर जगाच्या कानाकोपऱ्यात विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत असल्याचे दिसून येते.

बेळगाव जिल्ह्यातील महाविद्यालये व विद्यार्थ्यांची संख्या पुढील सारणीतून मांडलेली आहे.

## सारणी क्रमांक २.१०

## सरकारी पदवी महाविद्यालये

| अ. नं. | तालुका | संस्था | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | अथणी | ४ | ८७१ |
| २ | बैलहोंगल | २ | ३३२ |
| ३ | बेळगाव | ४ | ७३९ |
| ४ | चिक्कोडी | २ | ७९३ |
| ५ | गोकाक | २ | ६८४ |
| ६ | हुक्केरी | २ | ३२१ |
| ७ | खानापूर | १ | २२७ |
| ८ | रायबाग | १ | ५०९ |
| ९ | रामदुर्ग | १ | ३१६ |
| १० | सौंदत्ती | २ | ३३३ |
| | **एकूण** | **२१** | **५१२५** |

संदर्भ : बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या–२०१०–११, पृ.१३९

## सारणी क्रमांक २.११

## खाजगी पदवी महाविद्यालये

| अ. नं. | तालुका | संस्था | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | अथणी | १८ | २८६८ |
| २ | बैलहोंगल | १० | १५०४ |
| ३ | बेळगाव | ५४ | ११८३२ |
| ४ | चिक्कोडी | १७ | २९४४ |
| ५ | गोकाक | १७ | ३६३५ |
| ६ | हुक्केरी | १४ | १८८४ |
| ७ | खानापूर | २ | ३८७ |
| ८ | रायबाग | १४ | २४१५ |
| ९ | रामदुर्ग | ५ | ११५१ |
| १० | सौंदत्ती | ४ | ९३० |
| | **एकूण** | **१५५** | **२९५५०** |

संदर्भ : बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या–२०१०–११, पृ.१४०

## सारणी क्रमांक २.१२

## सरकारी वैद्यकीय महाविद्यालये

| अ. नं. | तालुका | संस्था | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | अथणी | – | – |
| २ | बैलहोंगल | – | – |
| ३ | बेळगाव | २ | ५७२ |
| ४ | चिक्कोडी | – | – |
| ५ | गोकाक | – | – |
| ६ | हुक्केरी | – | – |
| ७ | खानापूर | – | – |
| ८ | रायबाग | – | – |
| ९ | रामदुर्ग | – | – |
| १० | सौंदत्ती | – | – |
| | **एकूण** | **२** | **५७२** |

www.belgaum.nic.in

## सारणी क्रमांक २.१३

## अभियांत्रिकी महाविद्यालये

| अ. नं. | तालुका | संस्था | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | अथणी | – | – |
| २ | बैलहोंगल | – | – |
| ३ | बेळगाव | ७ | ७४११ |
| ४ | चिक्कोडी | – | – |
| ५ | गोकाक | २ | ५४७ |
| ६ | हुक्केरी | १ | १०७६ |
| ७ | खानापूर | – | – |
| ८ | रायबाग | – | – |
| ९ | रामदुर्ग | – | – |
| १० | सौंदत्ती | – | – |
| | **एकूण** | **१०** | **९०३४** |

www.belgaum.nic.in

(खाजगी अभियांत्रिकी व वैद्यकीय विद्यार्थी संख्या माहिती उपलब्ध नाही.)

२०१०–११ मध्ये बेळगाव जिल्ह्यामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ३४६७५ इतकी असून हे विद्यार्थी २१ सरकारी व १५५ खाजगी महाविद्यालयामध्ये शिक्षण घेतात. कर्नाटक विद्यापीठ धारवाडचे पदव्युत्तर शिक्षण विभाग बेळगावजवळील भुतरामहट्टी येथे सुरू असून जिल्ह्यातील अनेक ग्रामीण, गरीब विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय झाली आहे. तसेच कर्नाटक व कर्नाटक राज्याबाहेरील अनेक छोट्या मोठ्या खाजगी शैक्षणिक संस्था अस्तित्वात असून त्यांचीही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

बेळगाव हे उच्च शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र असून बेळगाव जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासामध्ये भर घालणाऱ्या प्रथितयश शिक्षणसंस्था पुढीलप्रमाणे –

**१. विश्वेश्वरय्या तंत्रनिकेतन विद्यापीठ**

सदर विद्यापीठ १९९८ मध्ये मच्छे बेळगाव येथे स्थापन झाले असून या विद्यापीठाशी २०८ पेक्षा अधिक महाविद्यालये संलग्नित आहेत. दरवर्षी यामधून ६७००० पेक्षा अधिक विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडतात. बेळगावच्या शैक्षणिक विकासामध्ये एक महत्त्वपूर्ण स्थान या विद्यापीठाने मिळविले आहे.

**२. कर्नाटक लिंगायत एज्युकेशन सोसायटी (के. एल. ई. एस.)**

ही सोसायटी सात लोकांनी एकत्र येऊन स्थापन केल्याने या सोसायटीला 'सप्तर्षी' या नावाने ओळखले जाते. या सोसायटीची स्थापना १९१६ ला झाली. या सोसायटी अंतर्गत वैद्यकीय, दंतवैद्यकीय, नर्सिंग, इंजिनिअरिंग, माहिती तंत्रज्ञान, हॉटेल व्यवस्थापन, पर्यटन, फॅशन डिझायनिंग, बिझनेस व्यवस्थापन, कृषी महाविद्यालये, तंत्रनिकेतन महाविद्यालये, संगणकीय शिक्षण तसेच कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये इत्यादी २०७ संस्था या अंतर्गत येतात. सध्या या सोसायटीचे चेअरमन श्री. प्रभाकर कोरे आहेत.

३. कर्नाटक लॉ सोसायटी

या सोसायटीची स्थापना १९३९ साली स्वातंत्र्यसैनिक आणि प्रसिद्ध वकिलांनी मिळून स्थापन केली. या सोसायटीच्या उत्तर कर्नाटकात ११ शिक्षणसंस्था असून यामधून सुमारे २०,००० विद्यार्थी उच्च शिक्षण घेतात.

## २.१० आर्थिक स्थिती

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशात असणाऱ्या उद्योगांवर अवलंबून असतो. त्यामुळे भारतामध्येसुद्धा जेवढ्या अधिक प्रमाणात औद्योगिकीकरणात वाढ होईल तेवढा देशाचा विकास होण्यास मदत होणार आहे. भारताच्या आर्थिक वाढीची १९५१ पासून तुलनात्मक आकडेवारी विचारात घेतल्यास सरासरी वार्षिक वाढीचा दर पन्नाशीच्या दशकात ३.९ टक्के, साठीच्या दशकात ३.७ टक्के, सत्तरीच्या दशकात ३.२ टक्के होता. म्हणजे हा दर नियोजनाच्या पहिल्या तीस वर्षात कमी होता आणि नंतर तो आणखी कमी होत गेला. त्यामुळे याची चेष्टा पुढे 'हिंदू रेट ऑफ ग्रोथ' अशी झाली. नव्वदीच्या दशकात १९९२–९३ ते १९९६–९७ मध्ये तो ६.७ टक्के झाला. या काळातच देशाने सुधारणा कार्यक्रम स्वीकारला. तेथून पुढे वाढत जाऊन तो १९९७–९८ ते २००३–०४ मध्ये थोडा कमी झाला. त्यानंतर मात्र वाढतच राहिला.[१०]

बेळगाव हे उत्तर कर्नाटकातील एक महत्त्वाचे औद्योगिक शहर आहे. एकंदरीत विचार केला असता राज्यामध्ये बेंगलोर नंतर बेळगावचा निर्यातीमध्ये दुसरा क्रमांक लागतो. भाजीपाला, मासे, फळे, लाकूड व्यवसाय, मांस उत्पादन, खाणकाम, व्यापार यांच्या व्यापारासाठी हे ठिकाण महत्त्वाचे मानले जाते. बेळगावचा व्यापार जवळपास ८० टक्के प्रामुख्याने महाराष्ट्र मुलुखाशी व कोकणी प्रदेशाशी चालतो. रत्नागिरी, गोवा, कारवार इ. प्रदेश व्यापार आणि दैनंदिन गरजांच्या पूर्ततेसाठी बेळगाववर विसंबून आहेत. अलिकडच्या काळात बॉक्साईटवरती चालणाऱ्या 'इंडियन ॲल्युमिनिअम कंपनी'ने प्रकल्प उभारला आहे. सध्या हा उद्योग 'बिर्ला उद्योग'समूहाकडे आहे. तसेच बैलहोंगल शहरापाशी युरेनिअमचे साठे आढळल्यामुळे बेळगावला विशेष महत्त्व प्राप्त होत आहे.

बेळगावमध्ये विविध व्यापार आणि उद्योगधंदे यांच्या सुमारे २० संस्था असून त्यांचे सर्व व्यवहार मराठीतून चालतात. फक्त दोनच संस्था मराठीबरोबर कन्नड भाषेचा वापर करतात. सरकारमान्य बेळगाव मर्चंट असोसिएशनमध्ये २४४ सभासद आहेत. त्यापैकी फक्त ७० कन्नड भाषिक आहेत. चिक्कोडी तालुक्यातील निपाणी भाग तंबाखूच्या व्यापारासाठी प्रसिद्ध असून तेथे दरसाल सुमारे १० कोटी रूपयांचा तंबाखूचा व्यापार चालतो. हा व्यापार मुख्यत: उत्तर भारतातील प्रमुख बाजारपेठांशी संबंधित आहे.

याशिवाय बेळगाव शहर फौंड्री उद्योगासाठी नावारूपाला येत आहे. जवळपास २०० फौंड्री उद्योगातून ७०,००० टन माल उत्पादित केला जातो. जो खास करून वाहन उद्योग क्षेत्राशी संबंधित आहे. तसेच या शहराला राज्यातील प्रमुख वस्त्रोद्योग नगरी शहर म्हणूनही ओळखले जाते. बेळगावमधल्या वडगाव, खासबाग, शहापूर इ. भागात हातमाग असून त्यावरती सुमारे ३०,००० लोक उपजीविका करतात.

याबरोबरच क्रेस्ट या कंपनीचा पुणे–बेंगलोर हायवे मार्गावर सुमारे ३०० एकर जागेमध्ये 'सेझ प्रकल्प' आहे.

### २.१०.१ उद्योगधंदे

जिल्हा उद्योग केंद्रामध्ये ३१ मार्च २०११ च्या नोंदणीनुसार बेळगाव जिल्ह्यामध्ये एकूण ३५४१३ उद्योगधंदयांची नोंदणी असून त्यामध्ये पेपर प्रिंटींग, रबर आणि प्लॅस्टिक, टेक्सटाईल, लेदर, मेकॅनिकल, इंजिनिअरिंग, अन्नप्रक्रिया, केमिकल्स, ऑटोमोबाईल्स इ. उद्योग असून त्यामधील काही महत्त्वाच्या उद्योगांची तालुकानिहाय संख्या पुढील सारणीत दर्शविण्यात आली आहे.

### सारणी क्रमांक २.१४

### बेळगाव जिल्हा – उद्योगांची संख्या[११]

| अ. नं. | तालुका | रेडिमेड गारमेंटस् | टेक्सटाईल | रासायनिक | अभियांत्रिकी | इतर | एकूण | कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अथणी | – | – | १ | – | ९ | १० | ५१४६ |
| २ | बैलहोंगल | – | १२ | १ | १ | ३ | १७ | ३०४० |
| ३ | बेळगाव | ३ | २३ | १० | १७८ | ३३० | ५४४ | ३३००८ |
| ४ | चिक्कोडी | १ | १ | – | ३ | ५१ | ५६ | ५९४० |
| ५ | गोकाक | – | २९ | २ | ३ | १५ | ४९ | १०९८८ |
| ६ | हुक्केरी | – | – | ५ | २ | ५ | १२ | ३८४० |
| ७ | खानापूर | – | – | – | १ | ७ | ८ | १२३५ |
| ८ | रायबाग | – | – | – | – | ३ | ३ | ५७० |
| ९ | रामदुर्ग | – | – | – | १ | ३ | ४ | ४० |
| १० | सौंदत्ती | – | ६ | – | १ | २ | ९ | १७०० |
| | **एकूण** | ०४ | ७१ | १९ | १९० | ४२८ | ७१२ | ६५९०७ |

www.advantagekarnataka.com

वरील कोष्टकावरून बेळगाव जिल्ह्यातील उद्योगांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यामधून ६५९०७ घटकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. यामध्ये अधिकाधिक उद्योग हे बेळगाव शहरामध्येच स्थापन झाले असून त्यामध्ये गारमेंटस्, टेक्सटाईल, मेकॅनिकल, इंजिनिअरिंग, केमिकल्स मिल इ. उद्योग असून त्यातून ६५९०७ लोकांना प्रत्यक्ष रोजगार प्राप्त झाला असून अप्रत्यक्षरित्या या उद्योगांवरती हजारो लोकांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. परंतु असे असले तरी एकूण लोकसंख्येच्या तुलनेने बेळगाव जिल्ह्यातील उद्योगांची संख्या कमीच असून सदर उद्योगामध्ये काम करणारे कर्मचारी, कामगार हे कन्नड भाषिकच आहेत. तसेच बरेच उद्योग हे बेळगाव जिल्ह्यातील कन्नड बहुभाषिक प्रदेशामध्येच उभारले असून सीमाभागातील ग्रामीण मराठी भाषिकांचे तालुके मात्र अशा उद्योगापासून पूर्णपणे वंचित असल्याने तेथील अनेक युवक बेकार आहेत तर बेकारीमुळे व्यसनाधिनतेचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. एकंदरीत सीमाभागातील

मराठी भाषिकांची आर्थिक परिस्थिती हलाखीची बनत असून त्याचा परिणाम सामाजिक परिस्थितीवर होत आहे.

### २.१०.२ साखर कारखाने

भारतामध्ये ऊस हे महत्त्वाचे नगदी पीक असून सुमारे ३३.७९ लाख हेक्टर क्षेत्रावर हे पीक घेतले जाते. या पिकाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा प्रभाव पडतो. ग्रामीण भागात तर शैक्षणिक, औद्योगिक, सामाजिक व आर्थिक विकास घडून येण्यास साखर उद्योगाची भूमिका महत्त्वाची आहे. जगातील एकूण ८४ देशात भारताचा साखर उत्पादनात पहिला क्रमांक लागतो. भारतातील संपूर्ण साखर उद्योग हा देशांतर्गत ऊस उत्पादनावर अवलंबून आहे. भारत देशात १९०३ साली एक कारखाना होता. ती संख्या १९८९–९० मध्ये ३७७ वर गेली व साखर उत्पादन १०९.८८ लाख टनापर्यंत गेले तर १९९० मध्ये भारतात ४०० साखर कारखाने होते आणि ३० कारखान्यांना मंजूरी मिळाली होती. साखर उद्योगातून उप उत्पादनेसुद्धा मोठ्या प्रमाणात होत असते. त्यामुळे साखर उद्योग म्हणजे ग्रामीण भागाची आर्थिक व सामाजिक विकासाची केंद्रे असून शेतीमालावर प्रक्रिया करणारा हा एकमेव प्रगतीशील कृषीउद्योग आहे.[१२]

बेळगाव जिल्ह्याचा मुख्य व्यवसाय शेती असून प्रामुख्याने ऊस हे पीक शेतकऱ्यांकडून उत्पादीत केले जाते. सुपीक शेतजमीन व कष्टाळू शेतकऱ्यांमुळे तसेच जलसिंचनाच्या सुविधांमुळे ऊस या नगदी पिकाकडे शेतकऱ्यांचा कल आहे. त्यामुळेच ऊसावर प्रक्रिया करणारे साखर कारखाने बेळगाव तालुक्याचा अपवाद वगळता सर्वच तालुक्यामध्ये आहेत. त्यांची एकूण संख्या १८ आहे. सर्वसाधारणपणे दरवर्षी ८३ लाख ४६ हजार ४४८ मेट्रीक टन ऊस गाळप होतो. बेळगाव जिल्ह्यातील साखर कारखान्यांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्रमांक २.१५**

**बेळगाव जिल्ह्यातील तालुकानिहाय साखर कारखाने**

| अ. नं. | तालुका | संख्या | एकूण |
|---|---|---|---|
| १ | अथणी | २ | २ |
| २ | बैलहोंगल | २ | २ |
| ३ | बेळगाव | – | – |
| ४ | चिक्कोडी | ३ | ३ |
| ५ | गोकाक | ३ | ३ |
| ६ | हुक्केरी | २ | २ |
| ७ | खानापूर | १ | १ |
| ८ | रायबाग | २ | २ |
| ९ | रामदुर्ग | २ | २ |
| १० | सौंदत्ती | १ | १ |
| | **एकूण** | १८ | १८ |

www.ibnlive.in.com/sugarfactoriesinbelgaum

साखर कारखानदारीमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली असून सर्वसाधारण शेतकऱ्याचा आत्मविश्वास उंचावला आहे. साखर कारखान्यांचा विशेषत: सहकारी साखर कारखान्यांचा गावपातळीपासून ते जिल्ह्याच्या राजकारणावर प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. एकंदरीत जिल्ह्याच्या अर्थकारणात साखर कारखान्यांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे.

### २.१०.३ बँका

इ. स. १८६४ मध्ये बेळगावच्या किल्ला भागात एका पारशी गृहस्थाच्या व्यवस्थापनाखाली मुंबई बँकेची शाखा सुरू झाली. त्याचवर्षी ''रॉयल बँक ऑफ इंडियाची'' एक शाखा बेळगाव शहरात सुंठणकरांच्या वाड्यात सुरू झाली. त्यामुळे त्याचा परिणाम खाजगी व्यापारी पेढ्यांच्या देवघेवीवर होऊन सामान्य जनतेची सोय झाली. सध्या बेळगाव जिल्ह्यामध्ये २५७ राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखा आहेत. तर ११४ ग्रामीण बँकांच्या शाखा असून जिल्ह्यामध्ये महत्त्वपूर्ण आर्थिक क्षेत्रामध्ये कामगिरी

असणारी जिल्हा बँक आहे. या बँकेच्या शाखा सर्वच तालुक्यात असून तिची संख्या ८२ आहे. तसेच शेती व्यवसायाशी संबंधित ७७० सोसायट्या असून ७ लाख ४० हजार ४०४ सभासद आहेत तर उर्वरीत ६४२ बिगरशेतीशी संबंधित सोसायट्या असून ३,५५,३१० इतके सभासद आहेत. तसेच अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकांची संख्या बेळगाव जिल्ह्यात एकूण ३६ इतकी आहे.

यावरून बेळगाव जिल्ह्याची आर्थिक पकड ही मजबूत असून त्याचा परिणाम येथील विविध उद्योग, व्यवसाय, पर्यटन, कारखाने, शिक्षण, रोजगार इ. वर होत आहे. बेळगाव हे कर्नाटक राज्यातील शहर असून मुंबई आणि बेंगळूर या दोन मोठ्या शहरांच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. तसेच विमान, रेल्वेसारख्या वाहतुकीच्या सेवा, कर्नाटक सरकारने नव्याने बांधलेले विधानसौध, विविध परिषदा, साहित्य संमेलने, उत्सव इ. मुळे या बँकातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होण्यास मदत होत आहे.

## २.११ शेती

भारतात ब्रिटीश राजवटीपूर्वी शेती हा परंपरागत आणि मोठ्या प्रमाणावर केला जाणारा व्यवसाय होता. शेती उत्पादनावर आधारीत लघु आणि कुटीर उद्योगामुळे खेडी ही काही बाबतीत स्वयंपूर्ण होती. ब्रिटीशांच्या आगमनानंतर त्यांनी येथील शेती उत्पादीत कच्चा माल ब्रिटनमध्ये नेऊन त्यावर प्रक्रिया करून पक्का माल भारतात आणून विकण्याचे धोरण अंमलात आणल्यामुळे येथील लघु आणि कुटीर उद्योग कमी झाले. परंतु भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर म्हणजे १९५१ पासून सुरू झालेल्या पंचवार्षिक योजनांमध्ये शेतीक्षेत्राला प्राधान्यक्रम दिला. तेव्हापासून आजतागायत भारतीय लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा असून याच व्यवसायाशी भारतीय अर्थव्यवस्था निगडीत आहे.[१३]

बेळगाव जिल्हा हा कर्नाटकामध्ये कृषी क्षेत्रामध्ये प्रगतीशील म्हणून ओळखला जातो. उपलब्ध लागवडीयोग्य जमिनीपैकी $^{१}/_{५}$ भाग जलसिंचनाखाली आहे. बेळगाव जिल्ह्यात ६८८ तलावापासून २९,००० हेक्टर जमीन ओलिताखाली आणली आहे. येथे १८६० पासून कापसाचे उत्पादन घेतले जाते. तसेच निपाणी या भागात तंबाखूचे पीक व संकेश्वर भागात मिरचीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. तांदूळ, ज्वारी, गहू इ. पिकांचे पूर्वीपासूनच उत्पादन घेतले जात आहे.

केळी, आंबा तसेच द्राक्षे इ. फळांचे उत्पादन १७ व्या शतकाच्या शेवटच्या दशकापासून घेतले जाते. त्यामुळेच इ. स. १६९५ मध्ये जमेली कॅरेरी या इटालियन प्रवाशाने आपल्या डायरीत नोंद करताना बेळगाव शहरात गोड, रूचकर व भारी किंमतीची द्राक्षे खायला मिळाली अशी नोंद केली आहे. तर आदिलशहाच्या काळात हुक्केरी शहराला फुलांचे शहर असे संबोधले जाई.

बेळगाव जिल्ह्याचे वैशिष्ट्य असे की, अनेक प्रकारचे ग्रामीण जीवन जगणारी आणि विविध तऱ्हेच्या जीवन जाणिवा असलेल्या विविध परंपरा, उद्योग, व्यवसाय यांनी समृद्ध असलेला हा जिल्हा आहे. या जिल्ह्याच्या आर्थिक विकासाची नाळ शेती व्यवसायाशी जुळली आहे. शेतजमीन, उपलब्ध जलसिंचनाच्या सुविधा आणि कष्टाळू शेतकऱ्यांमुळे उत्पादनक्षमता चांगली आहे. ऊस, भाजीपाला, तंबाखू, मिरची, बटाटे, रताळे इ. नगदी पिकांमुळे जिल्ह्याची आर्थिक स्थिती बळकट झाली असून त्याचा परिणाम लोकांचे जीवनमान सुधारले आहे.

### २.११.१ दुग्ध व्यवसाय

बेळगाव जिल्ह्यामध्ये शेती हा मुख्य व्यवसाय असून या व्यवसायाला पूरक म्हणून दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. जिल्ह्यातील सर्वच तालुके हे ग्रामीण असून अगदी शेतमजूरापासून ते बागायतदार शेतकऱ्यापर्यंत सर्वजण या व्यवसायाशी निगडीत आहेत. या जिल्ह्यातील तालुकानिहाय दुग्ध व्यवसायाची माहिती पुढील सारणीत मांडण्यात आली आहे.

## सारणी क्रमांक २.१६

## दुग्ध संस्था[१४]

| तालुका | दूधसंस्था | एकूण सदस्य | | एकूण | दूध संकलन (लिटरमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | | |
| अथणी | ३७ | २३१५ | ७८५ | ३१०० | २११०७४८ |
| बैलहोंगल | ७५ | १२००० | १५०० | १३५०० | ४२६९७५८ |
| बेळगाव | ३७ | ८२९० | १११० | ९४०० | १६०४२१८ |
| चिक्कोडी | ६५ | १३०० | १०१०० | ११४०० | १०८६७९५ |
| गोकाक | ६६ | ८३४० | १३२० | ९६६० | ५९७२७३९ |
| हुक्केरी | ३४ | ४४२० | ६८० | ५१०० | ११९३५२० |
| खानापूर | ५५ | ६३०० | ११०० | ७४०० | २९५६०२५ |
| रायबाग | ४८ | ५१४० | ९६० | ६१०० | ३८२२०९१ |
| रामदुर्ग | ५२ | ७०६५ | १०४० | ८१०५ | ३६३७४६६ |
| सौंदली | ४४ | ३५४० | ८८० | ४४२० | २३४५३७४ |
| **एकूण** | **५१३** | **५८७१०** | **१९४७५** | **७८१८५** | **२८९९८७३४** |

संदर्भ : बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या–२०१०–११, पृ. १२३

बेळगाव जिल्ह्यामध्ये ऊस शेतीनंतर पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसायाकडे पाहिले जाते. बेळगावमधील सर्वच तालुक्यामध्ये दूध संकलन करणाऱ्या एकूण ५१३ संस्था असून त्यामध्ये ७८१८५ स्त्री–पुरुष सभासद आहेत. या संस्थातून वार्षिक सुमारे २,८९,९८,७३४ लिटर इतके दूध संकलन केले जाते. गावपातळीवरचे दूध संकलन जिल्हा पातळीवरील बेळगाव जिल्हा सहकारी दूध उत्पादक सोसायटी युनियन, बेळगाव, श्रीकृष्ण दूध केंद्र, शहापूर, बेळगाव तसेच गोकाक व रामदुर्ग येथील शीतकरण केंद्राला पाठविले जाते. त्याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्यातील गोकुळ, वारणा व सह्याद्री या दूध संघानाही बेळगाव जिल्ह्यातून दूधपुरवठा केला जातो. या व्यवसायामुळे बेळगावातील ग्रमीण शेतकऱ्याची आर्थिक व सामाजिक परिस्थिती विकासाला हातभार लागला आहे.

## २.१२ पर्यटन

कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्याला सुमारे १००० वर्षापासूनची समृद्ध परंपरा लाभलेली आहे. ही भूमी ऐतिहासिक वास्तू आणि धार्मिक स्थळांनी युक्त आहे. बेळगाव हे शहर बेंगलोरपासून ५०२ किमी तर पणजीपासून फक्त १५४ किमी अंतरावर आहे. तसेच बेळगाव हे शहर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ ने जोडले आहे. आणि विमानसेवा व रेल्वेमार्गांनीही ते जोडले गेले आहे. इ. स. १८८९ मध्ये बेळगावला मद्रास आणि सदर्न मराठा रेल्वेचा फाटा आला तेव्हापासून व्यापारी, राजकीय त्याचबरोबर पर्यटनाच्या दृष्टीने बेळगावचे महत्त्व वाढत गेले. पश्चिम घाटाच्या डोंगरदऱ्यात वसलेले हे शहर थंड अणि आल्हाददायक हवेचे ठिकाण म्हणूनही ओळखले जात असून या शहराला 'गरीबांचे महाबळेश्वर' म्हणून त्याची ओळख आहे. तसेच येथून जवळच जांबोटी, सिंधुदुर्ग, आंबोली यासारखी निसर्गरम्य आणि जंगले असलेली ठिकाणे आहेत.

बेळगाव तालुक्यातील देसूर या ठिकाणी दोन 'गोल्फ कोर्स' आहेत तर गिर्यारोहणासाठी 'राजहंस किल्ला' प्रसिद्ध आहे. जगप्रसिद्ध आणि येळ्ळूरजवळील आशियातील एकमेव असे 'कमांडो ट्रेनिंग सेंटर' हे बेळगाव शहरामध्येच आहे. तसेच 'मराठा लाईट इन्फंन्ट्री' रेजिमेंटचे सेंटर म्हणून ओळखले जाते. याशिवाय शहरातील कपिलेश्वर मंदिर हे 'दक्षिण काशी' म्हणून ओळखले जाते. कणबर्गी येथील रामतीर्थ मंदिर, पंत बाळेकुंद्री आणि सुळेभावी येथील लक्ष्मी मंदिर यामुळे बेळगाव हे धार्मिक केंद्र बनले आहे.

हुक्केरी तालुक्यामध्ये 'हिरेमठ' आणि 'आडावी सिद्धेश्वर मठ' हे ऐतिहासिक मठ आहेत. याच तालुक्यात हिडकल धरण आहे. तर शंकरलिंग हे महत्त्वाचे मंदिर संकेश्वर नदीच्या काठी असून हुक्केरी शहराला 'फुलांचे शहर' म्हणून ओळखले जाते. खानापूर तालुका हा बेळगाव जिल्ह्यातील महत्त्वाचे पर्यटन स्थळ म्हणून ओळखला जातो. या तालुक्यातील नंदगड येथे स्वातंत्र्यवीर संगोळी रायाण्णा यांना ब्रिटीशांकडून फाशी देण्यात आली, तर हंडीभडंगनाथ येथे ४०० वर्षापूर्वीचे मंदिर आहे. 'नागरथाळी' हा निसर्गाच्या सान्निध्यातील धबधबा पर्यटकांचे लक्ष वेधून घेतो. कसमलगी येथे २००५ साली जैनांचे तेरावे तीर्थकार यांचे ११ व्या शतकातील शिल्प सापडले आहे. बैलहोंगल

शहरामध्ये राणी चन्नम्मा यांची समाधी, कमलनारायण, नरसिंगमा मंदिर इ. मंदिरे आहेत. सौंदत्तीमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'रेणूका' (यल्लम्मा) चे मंदिर आहे. तसेच सोगल सोमनाथचे मंदिर आहे. मलप्रभा नदीवरती नवीलतीर्थ हा बहुउद्देशीय प्रकल्प आहे. तर रामदुर्ग येथे प्रसिद्ध 'रामदुर्ग' आणि 'तोरगल' किल्ला आहे. रायबाग तालुक्यातील सोमनाथ मंदिर हे चालुक्य कालिन शैलीसाठी प्रसिद्ध असून कृष्णा नदीच्या काठी मायाक्कादेवी चिंचली हे प्रसिद्ध मंदिर आहे.[१५]

बेळगाव शहरापासून ६५ किमी अंतरावर पर्यटकांचे लक्ष वेधून घेणारा गोकाक धबधबा असून हे शहर हस्तकला आणि खेळणी यासाठी प्रसिद्ध आहे. चिक्कोडी तालुक्यामध्ये तवंदी घाटामध्ये 'स्तवनिधी' हे जैनांचे श्रद्धास्थान असून अरण्यसिद्धेश्वर शिव हनुमान आणि कल्मेश्वर ही केरूर येथील प्रसिद्ध मंदिरे आहेत. तर अथणी हे कोल्हापूरी चप्पल बनविण्यासाठी प्रसिद्ध असून हे व्यापारासाठी प्रसिद्ध शहर म्हणून ओळखले जाते.

## २.१३ बेळगावमधील वृत्तपत्रे

भारतात मुद्रणकलेचा शोध सोळाव्या शतकात लागला. तेव्हाच भारतीय वृत्तपत्रसृष्टीचे बीजारोपण झाले. वृत्तपत्रे व मुद्रणकला यांचा घनिष्ठ संबंध असल्याने मुद्रणकला विकसित होऊन तिचा प्रसार झाला नसता तर कदाचित वृत्तपत्रांना आजचे महत्त्वाचे स्थान लाभले नसते. मुद्रणपूर्व काळात त्या कलेचा विशेष प्रसार होण्यासाठी बातमी देणारी व प्रसारीत करणारी बातमीपत्रांसारखी साधने अस्तित्वात आली होती. पण वृत्तपत्रांचे प्रमुख कार्य जे बातम्या मिळवून देणे, त्याचा प्रसार करणे वा त्यावर मतप्रदर्शन करणे हे सुलभतेने व झटपट होऊ लागले व जास्तीत जास्त लोकांना वृत्तपत्रे उपलब्ध होऊ लागली ती मुद्रणाची जोड मिळाल्यानंतरच. त्यातूनच मुद्रणाचा प्रसार सार्वत्रिक झाल्यावर वृत्तपत्रे अस्तित्वात येऊन अठराव्या व एकोणिसाव्या शतकात वृत्तपत्रांचे एक वेगळे अस्तित्वच निर्माण झाले.[१६]

स्वातंत्र्योत्तर काळात भाषावार राज्यरचनेमुळे प्रत्येक राज्यात स्थानिक भाषेला महत्त्व व प्रतिष्ठा मिळाली. साहजिकच राज्यांच्या भाषेतील वृत्तपत्रांना अधिक वाव व प्रतिष्ठा मिळू लागली. त्यामध्ये मराठीसह विविध भाषेतील वृत्तपत्रे होती.

मराठी वृत्तपत्राचा जन्म सन १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी चालू केलेल्या 'दर्पण' या वृत्तपत्रापासून झाला. त्यानंतर अवघ्या ३१ वर्षानंतर म्हणजे ४ जुलै १८६३ रोजी 'बेळगाव समाचार' हे वृत्तपत्र सुरु झाले. हे पत्र दर सोमवारी निघत असे. हे वृत्तपत्र भिकाजीपंत सामंत यांनी सुरू केले. सन १८७६ मध्ये आबाजीराव रामचंद्र सावंत यांनी 'रामतत्त्व' छापखाना काढून अनेक जुन्या काव्य व संस्कृत ग्रंथांची छपाई या छापखान्याने करून छपाई प्रकाशन क्षेत्रात उत्तम लौकिक संपादन केला आहे. 'चिकित्सक' साप्ताहिक सुरू केले. ५ मे १८८१ ला बेळगावमध्ये 'कर्नाटक मित्र' हे पत्र सुरू केले. (नेटिव ओपिनियन) याच सुमारास 'ज्ञानबोधक' नावाचे पत्र सुरू होते. रामचंद्र जोगळेकर यांनी 'धारवाड वृत्त' नावाचे साप्ताहिक सन १८७३ च्या सप्टेंबरमध्ये चालू केले. कर्नाटक महाराष्ट्राच्या सीमेला असलेल्या मुधोळ संस्थानात सन १८७६ मध्ये 'सन्मार्गदर्शक' नावाचे पत्र सुरू झाले. अशाप्रकारे बेळगाव हे फार पूर्वीपासूनच मराठी वृत्तपत्रांचे एक प्रमुख केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे.

सध्या सीमाभाग, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक व गोवा या भागात अत्यंत लोकप्रिय झालेले 'दैनिक तरूण भारत' कै. बाबूराव ठाकूर यांनी मासिकरूपाने १९१९ साली सुरू केले. मग ते द्विसाप्ताहिक झाले आणि साप्ताहिकातून दैनिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले. आता श्री. किरण ठाकूर यांच्या संपादकत्वाखाली बेळगावसह, गोवा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, सातारा अशा सात आवृत्त्या प्रसिद्ध करून आपला एक वेगळा ठसा वृत्तपत्रक्षेत्रामध्ये उमटविला आहे. सीमाभागातील जनतेवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम दैनिक तरूण भारतने केल्याने सीमाभागाचे मुखपत्र म्हणून 'तरूण भारत' ला ओळखले जाते. मराठी भाषा व संस्कृती संवर्धनाच्या उद्देशाने जनार्दन नाथाजी पोवार यांनी 'स्वतंत्र प्रगती' दैनिक सुरू केले. तसेच 'दैनिक रणझुंझार' ने सीमाभागातील नागरिकांच्या हक्कांची पाठराखण केली. अंधश्रद्धा, भोंदूगिरी, भ्रष्टाचार इ. वर प्रगल्भपणे

कृष्णा मुचंडी यांच्या ‘बेळगाव वार्ता’ या दैनिकाने निर्भयपणे जनजागृती केली. ‘वीरवाणी’ या साप्ताहिकाने राष्ट्रीय विचारसरणीला पूरक आणि पोषक असे काम केले. ‘दैनिक वार्ता’, साप्ताहिक ‘बेळगाव गर्जना’, ‘बेळगाव एक्सप्रेस’, ‘विशाल महाराष्ट्र’, ‘सत्याग्रही जनभारत’, ‘जयहिंद’, ‘दौलत’, ‘युगवार्ता’, ‘सावली’, ‘चंद्रव्यूह’, ‘लोकमत’, ‘प्रागतिक’, ‘जनविजय’ इ. नियतकालिके या भागात सुरू झाली आणि काही अस्तगंतही झाली. सध्या दैनिक तरूण भारत, साप्ताहिक बेळगाव समाचार, चिकित्सक, राष्ट्रवीर, लोकमत आणि ‘पाक्षिक प्रागतिक’ आणि ‘जनविजय’ अशी सहा मराठी पत्रे चालू आहेत तर कन्नड पत्रे ‘संदेश’, ‘जनजीवाळ’ अशी दोन वर्तमानपत्रे सुरू आहेत. हुबळीचे ‘संयुक्त कर्नाटक’ हे कन्नड दैनिक प्रथम बेळगावातच सुरू झाले होते. परंतु येथे आवश्यक ते कन्नड वातावरण न लाभल्याने त्याला स्थलांतर करावे लागते ही गोष्ट येथे नमूद करण्यासारखी आहे.

वरील स्थानिक वृत्तपत्राखेरीज दैनिक लोकमत, दैनिक सकाळ, दैनिक पुढारी इ. मराठी दैनिकांच्याही आवृत्त्या बेळगावमधून निघतात आणि त्यांना वाचकांचाही प्रतिसाद लाभतो. अगदी अलिकडच्या काळात ‘दि न्यू इंडियन एक्सप्रेस’ या इंग्रजी दैनिकाची आवृत्तीही येथून निघू लागली आहे तर काही कन्नड आणि उर्दू दैनिकेही निघत आहेत.

## २.१४ वाचनालय

बेळगावमध्ये इ. स. १८४८ मध्ये तत्कालिन कलेक्टर इन्वीराईटी यांच्या पुढाकाराने सार्वजनिक नगर वाचनालयाची सुरूवात झाली. त्यावेळी वाचनालयाचे नाव ‘नेटिव्ह जनरल लायब्ररी’ असे देण्यात आले होते. या वाचनालयाचे सुरूवातीला ८५ वर्गणीदार होते आणि ग्रंथ विभागात एकूण १०३६ पुस्तके होती. त्याचबरोबर इंग्रजी, मराठी व गुजराथी अशी ३० नियतकालिके व वृत्तपत्रे होती. हे वाचनालय अधिक जोमाने वाढविण्यासाठी आनंद भास्कर, न्यायाधीश ओक, नामदार बेळवी इ. चे योगदान मोठे होते. २८, २९ व ३० एप्रिल २००० रोजी ७३ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे आयोजन याच वाचनालयाच्यावतीने करण्यात आले होते.

बेळगाव शहरात आज हे वाचनालय 'सार्वजनिक वाचनालय' म्हणून प्रसिद्ध असून शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी स्वत:च्या इमारतीत समृद्ध उभे असून या इमारतीवरील घड्याळाचे काटे संपूर्ण लोकांचे लक्ष वेधून घेतात. तर हे वाचनालय म्हणजे सीमाभागातील मराठी भाषिकांच्या अस्मितेचा केंदबिंदू मानला जातो. आजरोजी या वाचनालयाची प्रगती पुढील सारणीवरून नजरेत भरते.

**सारणी क्रमांक २.१७**

**सार्वजनिक वाचनालयाची प्रगती**[१७]

| वर्गणीदार सभासद संख्या | ग्रंथांची संख्या | दैनिके | साप्ताहिके | नियतकालिके |
|---|---|---|---|---|
| ग्रंथ विभाग ३८४<br>नियतकालिके विभाग १७०<br>बाल विभाग ५२<br>दिवाळी अंक योजना ६२<br>आजीव सभासद ४०९ | मराठी ४५,२०९<br>हिंदी २,२६८<br>कन्नड १३,१६६<br>इंग्रजी १०,१०५ | मराठी १३<br>हिंदी १<br>कन्नड १०<br>इंग्रजी ५ | मराठी १०<br>कन्नड १ | मराठी ३१<br>हिंदी ७<br>कन्नड १२<br>इंग्रजी २५ |
| **एकूण १०७७** | **७०,७४८** | **२९** | **११** | **७५** |

संदर्भ : सार्वजनिक वाचनालय बेळगाव परिपत्रक २०१२

वरील कोष्टकावरून सार्वजनिक वाचनालयाची प्रगती उल्लेखनीय असून सुरूवातीला केवळ ८५ वर्गणीदार व १०३६ पुस्तके असणारे वाचनालय आज १०७७ वर्गणीदार व ७०,७४८ इतकी विविध भाषेतील ग्रंथांची संख्या असून या वाचनालयाचे बहुतांशी वाचक हे मराठीच आहेत. या वाचनालयाचे कार्यकारी मंडळ १५ मराठी भाषिक लोकांचे असून सध्या तेथे ८ कर्मचारी काम करत आहेत. या वाचनालयामार्फत दरवर्षी विविध विषयावर व्याख्यानमाला, चर्चासत्रे आयोजित केली जात असून साहित्य पुरस्कारांची परंपरा घडविणारे वाचनालय म्हणून ते आजही प्रसिद्ध आहे.[१७] त्याचबरोबर ते एक प्रमुख सांस्कृतिक केंद्रही मानले जाते. तर शहापूरच्या कोरे गल्लीतले श्री सरस्वती ग्रंथालय १३२ वर्षे जुने आहे. त्याचबरोबर वाङ्मय मंडळाचेही वाचनालय बेळगावात आहे. बेळगाव जिल्ह्याचा विचार करता जिल्ह्यात एकूण ५३० वाचनालये आहेत.

## २.१५ साहित्य संमेलन

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. साहित्यातूनच समाजाचे प्रतिबिंब उमटत असते. साहित्यातून त्या समाजाचे विविध पैलूंवर प्रकाश पाडण्याचे काम साहित्यिक करतात. आपल्या लेखणीतून त्या विशिष्ट परिस्थितीवर भाष्य करतात. आपले मत, विचार, प्रतिक्रिया, भावना इत्यादी साहित्याद्वारे समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम करतात. समाजातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय इत्यादी पैलूंविषयी परखड मते मांडून त्याकडे समाजाचे घटक असलेल्या व्यक्ति, समूह, संस्था, संघटना यांचे लक्ष वेधून घेतात. तसेच एखाद्या अनिष्ठ परिस्थितीवर वस्तुनिष्ठपणे आपले विचार मांडून त्या परिस्थितीत बदल करण्यासाठी सर्व घटकांपर्यंत ती परिस्थिती आपल्या साहित्याद्वारे पोहोचवितात. त्यासाठी वेळोवेळी चर्चा, सभा, संमेलने आयोजित करून वाचकांनाही त्यामध्ये सहभागी करून घेत असतात. साहित्यातूनच त्या त्या समाजाची भाषा, संस्कृतीचे रक्षण व संवर्धन होत असते.

अशाच प्रकारची साहित्य संमलने सीमाभागात वारंवार आयोजित केली जात असून त्याद्वारे मराठी भाषा, संस्कृती तिचे अस्मिता जपण्याचे काम यातून होत असलेले दिसून येते. ही साहित्य संमेलने पुढीलप्रमाणे –

### अ) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने

आजपर्यंत बेळगाव शहराने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे तीनवेळा यजमानपद भूषविले आहे.

### १. मे १९२९

२७ व २८ मे १९२९ या दिवशी बेळगावमध्ये शिवराम महादेव परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले. याचवेळी कर्नाटक एकीकरण सभेने त्यांच्या चौथ्या परिषदेचे आयोजन बेळगाव येथे केल्याने बेळगाव शहरातील दोन भाषिक गटामध्ये तंग वातावरण निर्माण झाले. त्यामधून अत्यंत कटू वाद सुरू होऊन दोन्ही बाजूकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करण्यात आले.

## २. मे १९४६

१२ मे १९४६ रोजी बेळगाव येथे ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले. त्यांनी पारंपरिक भाषण पद्धतीला फाटा देऊन काळाचे औचित्य लक्षात घेऊन महाराष्ट्र एकीकरणावर भर दिला व आपले संबंध भाषण संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे केले. तसेच या साहित्य संमेलनामध्ये मुंबई, मध्य प्रांत, वऱ्हाड, मराठवाडा व गोमंतक यांच्या सरहद्दीवरचे मराठी भाषिक प्रदेशसुद्धा संयुक्त महाराष्ट्रात सामील करण्याचा ठराव करण्यात आला आणि संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्यात आली. दत्तो वामन पोतदार, शंकरराव देव, केशवराव जेधे, श्री. शं. नवरे हे समितीचे सभासद होते व समितीचे आमंत्रक म्हणून श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी काम करावे असे ठरले. यामुळेच महाराष्ट्रात सर्वपक्षीय संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यात आली.

## ३. एप्रिल २०००

एप्रिल २००० मध्ये महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत य. दि. फडके यांच्या अध्यक्षतेखाली तिसरे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले. यामध्ये त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सीमाप्रश्नाचा ऊहापोह घेतला आणि शेवटचा पर्याय म्हणून हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयामध्ये नेण्यासंदर्भात सूचना केली. साहित्य संमेलनामध्ये उपस्थित असलेल्या महाराष्ट्राचे तत्कालिन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी हा विषय गांभीर्याने घेतला. सध्या महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहे.

महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्नासंदर्भात महाराष्ट्र राज्याच्या अस्तित्वानंतर ठाणे येथे भरलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. रा. श्री. जोग यांनी आपल्या भाषणात पुढील विचार मार्मिकपणे मांडले. ''नियतीचा दुर्विलास असा की ज्या बेळगावमध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेची घोषणा साहित्य संमेलनाने केली ते बेळगावच खिल राहिलेले आहे. न्याय, तत्त्व, लोकमत इ. सर्व दृष्टींनी ते महाराष्ट्रात येणे व राहणे योग्य असतानाही केवळ राजकारणातील डावपेचामुळे ते महाराष्ट्रास दुरावले आहे. आम्हां साहित्यिकांना राजकारण कळत नसेल पण एवढे खास समजू शकते की, एका सरळ

आणि न्याय्य गोष्टीबाबत राजकारणी लोकांनी एवढा प्रचंड घोळ आणि गोंधळ घालून ठेवला आहे की त्याला राजकारणाच्या इतिहासातही तोड सापडणार नाही.''[१८]

### ब) ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

या साहित्य संमेलनाच्या परंपरेतूनच सीमाभागामध्ये विशेषत: कडोली, येळ्ळूर, उचगाव, सांबरा, बेळगुंदी, निलजी, नंदगड, कुद्रेमनी या गावामध्ये दरवर्षी ग्रामीण मराठी साहित्य संमेलने आयोजित करून त्यामध्ये बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकी यासह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशा पद्धतीचे ठराव संमत केले जातात. मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी स्वाभिमान साहित्याद्वारे टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. सीमाभागातील मराठी भाषिक जनता अत्यंत उत्साहाने अशा साहित्य संमेलनामध्ये सहभागी होऊन मराठी भाषा, संस्कृतीविषयीची जवळीकता प्रकट करते. ही ग्रामीण साहित्य संमेलने विशेषत: रविवारच्या सुट्टीच्या दिवशी आयोजित केली जातात. अशा साहित्य संमेलनांना लहान बालकांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील स्त्री–पुरुषांचा सहभाग असलेला दिसून येतो. यातून मराठी साहित्याची परंपरा टिकवून ठेवणे, भाषेचे संवर्धन करणे, नवीन पिढीला मराठी भाषेची आवड निर्माण करून देणे आणि मराठी भाषेला अत्युच्च शिखरावर नेऊन पोहचविणे अशा हेतूनी ही मराठी साहित्य संमेलने आयोजित केली जातात. यामुळे सीमाभागातील मराठी भाषिकांना मराठी भाषेतील अनेक नामवंत कवी, साहित्यिकांच्या विचारांचा आस्वाद घेता येतो. अशा संमेलनामुळे मराठी भाषिक चळवळीला नवसंजीवनी मिळण्यास मदत झाली आहे.

## २.१६ दळणवळण

बेळगाव जिल्हा महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा या राज्यांच्या सीमेवर असून बेळगाव हे शैक्षणिक, वैद्यकीय, औद्योगिकदृष्ट्या ब्रिटीश कालखंडापासून अत्यंत महत्त्वाचे केंद्र असल्याने दळणवळणाच्या दृष्टीने महामार्ग, रेल्वे आणि विमानतळ याद्वारे इतर महत्त्वाच्या शहरांशी ते जोडले आहे.

### २.१६.१ रस्ते

बेळगाव शहर अनेक ग्रामीण तालुके आणि खेडी, नगरे यांनी मिळून बनलेले असले तरी वाहतुकीच्या आणि दळणवळणाच्या सुविधांमुळे बेळगावचे नाव आज देशविदेशात प्रसिद्ध आहे. दळणवळणामुळे विमानसेवा, रेल्वेसेवा याबरोबरच सर्व शहरांना जोडणारे सुसज्ज रस्ते आहेत. खेडी आणि नगरे या सर्वांचे एक मध्यवर्ती केंद्र म्हणून या शहराकडे पाहिले जाते. बेळगाव शहरामध्ये पूर्व दिशेला एक मध्यवर्ती एस. टी. स्टँड असून तेथून २४ तास गाड्यांची सेवा कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात इ. राज्यांमध्ये आहे तर बेळगाव शहर परिवहन मंडळामार्फत नगरे व खेडी यांच्यासाठी गाड्यांची सुविधा असून इतर अनेक खाजगी बससेवा, रिक्षा इ. वाहने आहेत. त्यामुळे बेळगावला येणाऱ्या आणि येथून जाणाऱ्या प्रवाशांची सोय चांगल्या पद्धतीने होते. बेळगाव हे मुंबई आणि बेंगलोर या दोन विकसित शहरांच्या मध्यभागी असल्याने या शहराला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे.

### २.१६.२ रेल्वेसेवा

बेळगाव शहरात सुसज्ज असे सर्वसोयींनीयुक्त रेल्वे स्टेशन आहे. दक्षिण भारतातील अनेक महत्त्वाच्या शहरांना ही रेल्वेसेवा जोडलेली आहे. येथून पुणे, मुंबई, जोधपूर, अजमेर, अहमदाबाद, हैद्राबाद, दिल्ली, इराणकुलम इ. शहरांना रेल्वेसेवा जोडली आहे. येथून दर १२ तासांना बेळगाव–बेंगलोर आणि मुंबई रेल्वेसेवा असून दररोज येथून निजामुद्दीन (दिल्ली) एक्सप्रेस निघते. त्यामुळे बेळगाव आज देशाबरोबरच विदेशातील पर्यटकांना, व्यापारी, उद्योजकांना एक चालना देणारे शहर म्हणून ओळखले जात आहे.

### २.१६.३ विमानतळ

बेळगाव विमानतळ हे उत्तर कर्नाटकातील कित्येक दशकातील एकमेव विमानतळ आहे. हे विमानतळ सांबरा येथे असून बेळगाव शहरापासून १० किमी अंतरावर आहे. बेळगाव हे मुंबई व बेंगलोरशी विमान वाहतुकीद्वारे जोडले गेलेले आहे. येथे नागरी विमानतळाबरोबरच भारतीय हवाई दलाचे एक प्रशिक्षण केंद्रही आहे. या विमानतळावरून दररोज बेळगाव ते बेंगलोर विमानसेवा कार्यरत असून याचा फायदा असंख्य प्रवाशी, महनीय व्यक्ती, व्यापारी, राजकारणी, उद्योजक यांना होत

असून त्यामुळे बेळगावच्या पर्यनाला गती येऊन आर्थिक विकासाला हातभार लागला आहे तर अनेक लोकांची सोय झालेली आहे.

## २.१७ मराठा लाईट इन्फन्ट्री

हे रेजिमेंटल सेंटर ६ मार्च १८०० रोजी लेफ्टनंट ई. एम. वुड यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे उभे करण्यात आले. आणि त्याला 'सेकंड बटालियन' हे नाव देण्यात आले. 'बॉम्बे नेटिव्ह इन्फन्ट्री'च्या सातव्या रेजिमेन्टने सिदासीर लढाईचा विजयदिन २ मे १८२४ रोजी साजरा केला तेव्हा त्या बटालियनला '१४ रेजिमेन्ट बॉम्बे नेटिव्ह इन्फन्ट्री' असे नाव देण्यात आले आणि हीच बटालियन पहिल्यांदा इ. स. १८३२ ला लेफ्टनंट कर्नल इ. एम. वुड च्या कमांडखाली अंबोली जवळच्या 'महादेवगड' जिंकण्यासाठी बेळगावला आणली. या वुडच्या कंमाडाखाली आलेल्या बेळगावच्या 'सेकंड बटालियन'ने सर्वांचा बंदोबस्त केला. बेळगाव शहर, सभोवतालचा डोंगरी प्रदेश, मुंबई–गोवा व धारवाड या भागांच्या मध्यवर्ती असलेले ठिकाण, व्यापार केंद्र, मराठी भाषा इ. गोष्टी लक्षात घेऊन बेळगावला 'मराठा लाईट इन्फन्ट्री' चे रेजिमेंटल सेंटर कायमचे स्थापन करण्यात आले. मराठा सैनिक चपळ, काटक, जलदगतीचा (मिनिटाला १४० पावले टाकणारा) म्हणून या रेजिमेंटला ''मराठा लाईट इन्फन्ट्री रेजिमेंट'' हे नाव दिले.[१९]

मराठा ही लढवय्या जात आहे ही इतिहासप्रसिद्ध वस्तुस्थिती आहे. राज्यकर्ते कोणीही असोत, त्यांनी ह्या जातीमधून मोठ्या प्रमाणावर सैन्य भरती केलेली आढळून येते. बेळगाव ते सातारा, बेळगाव ते रत्नागिरी व बेळगाव ते कारवार यामधील पट्ट्यात सर्व ठिकाणी ही लढवय्या जात दाटीवाटीने पसरलेली आहे. अशाप्रकारे आजूबाजूच्या मराठी प्रदेशातून मराठी सैनिकांची भरती करण्यासाठी बेळगाव हे एक सोयीचे मध्यवर्ती ठिकाण बनून राहिलेले आहे. मराठा लाईट इन्फन्ट्रीचे केंद्र म्हणून बेळगावची निवड करण्यामागे हे कारण आहे. त्याचप्रमाणे जवानांच्या मुलांकरिता एक लष्करी शाळासुद्धा ह्याच केंद्राच्या ठिकाणी स्थापन केली आहे.

## २.१८ राजकीय माहिती

स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये म्हैसूर संस्थान मुंबई इलाख्यामध्ये होते. म्हैसूर संस्थान अत्यंत नावाजलेले व प्रतिथयश संस्थान म्हणून ओळखले जात असे. स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीमध्ये म्हैसूर राज्यही मागे नव्हते. भाषावार प्रांतरचनेच्या मागणीमुळे स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्येही कन्नड भाषिकांचे स्वतंत्र राज्य असावे ही मागणी पुढे आली होती. स्वातंत्र्यानंतर १ नोव्हेंबर १९५६ रोजी स्वतंत्र म्हैसूर राज्याची निर्मिती झाली. कन्नड भाषेच्या आधारावर निर्माण झालेल्या म्हैसूर राज्यामध्ये अनेक मराठी भाषिक गावांचा समावेश झाला. त्यातूनच मराठी भाषिकांनी 'महाराष्ट्र एकीकरण समिती' नावाची संघटना स्थापन करून ग्रामपंचायतीपासून ते विधानसभेपर्यंतच्या सर्व निवडणुका लढविल्या व जिंकल्याही. त्यामुळे २००८ पर्यंत बेळगाव जिल्ह्यातील मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्र एकीकरण समितीचा बालेकिल्ला समजला जाऊ लागला. महाराष्ट्र एकीकरण समितीचा प्रभाव जसा मराठी भाषिकांवरती होता तसाच प्रभाव सत्तास्पर्धेच्या राजकारणामध्ये राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, निधर्मी जनता दल इ. राजकीय पक्षानीही बेळगाव जिल्ह्यामध्ये निर्माण केला आहे. २००८ च्या लोकसभा, राज्यसभा व विधानसभा निवडणुकीतील सदस्य पुढीलप्रमाणे[२०]

**सारणी क्रमांक २.१८**

**बेळगाव जिल्हा लोकसभा व राज्यसभा सदस्य**

| अ. नं. | नाव | मतदारसंघ | पक्ष |
|---|---|---|---|
| १ | श्री. रमेश व्ही. कत्ती | चिक्कोडी | भाजप |
| २ | श्री. सुरेश सी. अंगडी | बेळगाव | भाजप |
| ३ | श्री. अनंतकंमार हेगडे | उत्तर कन्नड | भाजप |
| ४ | श्री. प्रभाकर कोरे | राज्यसभा सदस्य | भाजप |

www.belgaum.nic.in

## सारणी क्रमांक २.१९

## बेळगाव जिल्हा विधानसभा सदस्य

| अ. नं. | नाव | मतदारसंघ | पक्ष |
|---|---|---|---|
| १ | श्री. काकासाहेब पांडुरंग पाटील | निपाणी | राष्ट्रीय काँग्रेस |
| २ | श्री. प्रकाश बबन्ना हुक्केरी | चिक्कोडी सदलगा | राष्ट्रीय काँगेस |
| ३ | श्री. लक्ष्मण संगाप्पा सवद | अथणी | भाजप |
| ४ | श्री. भरमगौंडा अलगौंडा कागे | कागवाड | भाजप |
| ५ | श्री. शमा भिमा घाटगे | कुडची | राष्ट्रीय काँग्रेस |
| ६ | श्री. दुर्योधन महालिंगाप्पा ऐहोळे | रायबाग | भाजप |
| ७ | श्री. उमेश विश्वनाथ कत्ती | हुक्केरी | निजद |
| ८ | श्री. भालचंद्र लक्ष्मणराव जारकीहोळी | अरभावी | निजद |
| ९ | श्री. रमेश लक्ष्मणराव जारकीहोळी | गोकाक | राष्ट्रीय काँग्रेस |
| १० | श्री. सतिश लक्ष्मणराव जारकीहोळी | यमकनर्डी | राष्ट्रीय काँग्रेस |
| ११ | श्री. किरण नरूद्दीन सेठ | उत्तर बेळगाव | राष्ट्रीय काँग्रेस |
| १२ | श्री. अभय पाटील | दक्षिण बेळगाव | भाजप |
| १३ | श्री. संजय पाटील | ग्रामीण बेळगाव | भाजप |
| १४ | श्री. प्रल्हाद रेमाणी | खानापूर | भाजप |
| १५ | श्री. सुरेश शिवरूद्रय्या मारीहाळ | कित्तूर | भाजप |
| १६ | श्री. विरूपाक्षी चनाप्पा मेटगुड | बैलहोंगल | भाजप |
| १७ | श्री. विश्वनाथ चंद्रशेखर ममानी | सौंदत्ती | भाजप |
| १८ | श्री. अशोक महादेवाप्पा मट्टाण | रामदुर्ग | राष्ट्रीय काँग्रेस |

www.partyanalyst.com/district

लोकसभा, राज्यसभा व विधानसभेच्या राजकारणाबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थातील जिल्हा पंचायत, तालुका पंचायत आणि ग्रामपंचायतीमध्येही राष्ट्रीय, राज्यस्तरीय राजकीय पक्षाबरोबरच महाराष्ट्र एकीकरण समितीमध्ये सत्तास्पर्धेसाठी संघर्ष असतो. २००८ मधील निवडणुकीमध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीला आपला प्रभाव विधानसभेच्या निवडणुकीमध्ये दाखविता आला नसला तरी मराठी भाषिक भागामध्ये महानगरपालिका, जिल्हा, तालुका व ग्रामपातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीचा प्रभाव जाणवतो.

### २.१८.१ स्थानिक स्वराज्य संस्था

स्थानिक स्वराज्य संस्थांना वैधानिक दर्जा असल्याने अशा संस्थांची निर्मिती राज्याच्या कायदयाद्वारे करण्यात आलेली असते. संबंधित देशातील मध्यवर्ती शासन किंवा तेथील घटकराज्याचे शासन खास कायदा करून निरनिराळ्या प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करते. शासनाच्या अशा कायदयात या संस्थांची रचना, अधिकार, कामे, उत्पन्नाची साधने इ. गोष्टींचा तपशील नमूद करण्यात आलेला असतो. स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त झालेल्या वैधानिक दर्जामुळे त्यांना एक प्रकारचे स्थैर्य प्राप्त होते.[२१]

स्थानिक स्वराज्य संस्था या शासनसंस्थेचाच एक प्रकार किंवा भाग असतो. मर्यादित कार्यक्षेत्र हे प्रमुख लक्षण समजले जाते. कार्यक्षेत्र मर्यादित असले तरी त्याची उपयुक्तता खूपच मोठी आहे. विशेषत: लोकशाही व्यवस्थेत तर त्यांचे महत्त्व वादातीत आहे. लोकशाही व्यवस्थेला मजबुती प्रदान करणाऱ्या घटकांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे.

### २.१८.१.१ बेळगाव महानगरपालिका

बेळगाव शहरातील बेळगाव महानगरपालिकेमध्ये नगरपालिकेच्या स्थापनेपासून मराठी भाषिकांचेच वर्चस्व आहे. बेळगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष व महापौर पुढीलप्रमाणे[२२]

## बेळगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष

| अ. नं. | नगराध्यक्षांचे नाव | अ. नं. | नगराध्यक्षांचे नाव |
|---|---|---|---|
| १ | व्ही. आर. नातू | २२ | व्ही. एन. मिसाळ |
| २ | आर. जी. खोत | २३ | पी. डी. तिळवे |
| ३ | ए. जी. मिलर | २४ | जी. एम. भातकांडे |
| ४ | अदशीर नवरोज | २५ | बी. बी. पोतदार |
| ५ | डी. व्ही. बेळवी | २६ | एच. ए. सावंत |
| ६ | अदशीर नवरोज | २७ | शांताबाई नरगुंदकर |
| ७ | ए. पी. चौगुले | २८ | एन. पी. साळुंखे |
| ८ | बी. के. दळवी | २९ | के. एम. खन्नुकर |
| ९ | बी. के. दळवी | ३० | जी. एम. भातकांडे |
| १० | बी. के. दळवी | ३१ | जी. एम. भातकांडे |
| ११ | बी. बी. पोतदार | ३२ | ए. जी. याळगी |
| १२ | बी. के. दळवी | ३३ | जे. के. लगाडे |
| १३ | बी. बी. पोतदार | ३४ | शिवाजीराव कदम |
| १४ | ए. ए. धीवालै | ३५ | प्रशासक |
| १५ | एन. जे. काळे | ३६ | इंदिराबाई खाडे |
| १६ | एम. एम. लाड | ३७ | शिवाजीराव काकतकर |
| १७ | बी. बी. पोतदार | ३८ | प्रशासक |
| १८ | बी. बी. पोतदार | ३९ | प्रशासक |
| १९ | एम. एम. लाड | ४० | प्रशासक |
| २० | बी. बी. पोतदार | ४१ | प्रशासक |
| २१ | आय. ए. धारवाडकर | | |

**१९८४ पासूनचे बेळगाव महानगरपालिकेचे महापौर**

| अ. नं. | महापौरांचे नाव | अ. नं. | महापौरांचे नाव |
|---|---|---|---|
| १ | सुभाष रामचंद्र जाधव | १३ | संभाजी पाटील |
| २ | मालोजी शांताराम अष्टेकर | १४ | शिवाजी सुंठकर |
| ३ | शरद रामचंद्र जोशी | १५ | वंदना बेळगुंदकर |
| ४ | नागेश नागाप्पा सातेरी | १६ | नीलिमा चव्हाण |
| ५ | नागेंद्र बाळाराम हैबती | १७ | संभाजी पाटील |
| ६ | संभाजी पाटील | १८ | वंदना बेळगुंदकर |
| ७ | सिद्दनगौडा पाटील (अपवाद) | १९ | विजय मोरे |
| ८ | संभाजी पाटील | २० | प्रशांता बुडकी |
| ९ | रमेश कुडची | २१ | यल्लाप्पा कुरबर |
| १० | विजयालक्ष्मी चोपडे | २२ | एन. बी. निर्वाणी |
| ११ | गोविंद राऊत | २३ | मंदा बाळेकुंद्री |
| १२ | आप्पासाहेब पुजारी | | |

## २.१८.१.२ ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था

ग्रामपंचायत हे समाजसंघटनामधील प्राथमिक व पायाभूत संघटन आहे. भारतीय घटनेच्या ४० व्या कलमानुसार त्याचे संघटन व कार्यप्रवणता याबाबतीत राज्य शासनाला मार्गदर्शक तत्त्वांनी बांधलेले आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे. खेड्यातील लोकांना राजकीय प्रक्रियेत सामावून घेतल्याशिवाय भारतीय लोकशाही बळकट होणार नाही. खेड्यातील लोकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा व राजकीय सत्ता प्रदान करण्याचा एक मार्ग म्हणून ग्रामपंचायतीकडे पाहिले जाते. ग्रामपंचायत ही गावपातळीवरील प्रमुख व महत्त्वाची संस्था असून ग्रामीण जनतेच्या प्रत्यक्ष संपर्कात असणारी आणि तिच्या जास्तीत जास्त जवळ पोहचणारी स्थानिक संस्था म्हणून तिचा निर्देश केला जातो. त्याचबरोबर तालुका पंचायत व जिल्हा पंचायत या स्थानिक स्वराज्य संस्था तालुका व जिल्हा ग्रामीण पातळीवर विकासात्मक कामे पार पाडतात. या त्रिस्तरीय पंचायत राज्य

व्यवस्थेचे कामकाज हे लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दिशेने चालत असून यामुळे ग्रामीण भागातील तळागाळातील लोकांच्या सहभागातून समाजविकास साधला जातो. या संस्थातील प्रतिनिधींची निवड ही प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे होत असून त्यासाठी त्या त्या संवर्गातून अनुसूचित जाती, जमाती व इतर मागास तसेच महिलांनाही आरक्षण दिले जाते.

कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यामध्ये एकूण १० तालुके असून सदर तालुक्यांमध्ये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या पुढील सारणीत मांडण्यात आली आहे.

**सारणी क्रमांक २.२०**

**ग्रामपंचायतींची संख्या**

| **अ. नं.** | **तालुक्याचे नाव** | **ग्रामपंचायत संख्या** |
|---|---|---|
| १ | अथणी | ५१ |
| २ | बैलहोंगल | ५१ |
| ३ | बेळगाव | ५४ |
| ४ | चिक्कोडी | ६५ |
| ५ | गोकाक | ५१ |
| ६ | हुक्केरी | ५१ |
| ७ | खानापूर | ५१ |
| ८ | रायबाग | ३३ |
| ९ | रामदुर्ग | ३५ |
| १० | सौंदत्ती | ४३ |
| | **एकूण** | **४८५** |

http://:zpbelgaum.kar.nic.in

बेळगाव जिल्ह्यातील तालुका पंचायतीमधील निवडून दयावयाच्या प्रतिनिधींची संख्या पुढीलप्रमाणे –

## सारणी क्रमांक २.२१

## तालुका पंचायत प्रतिनिधी संख्या

| अ. नं. | तालुक्याचे नाव | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | अथणी | ४३ |
| २ | बैलहोंगल | ३२ |
| ३ | बेळगाव | ४० |
| ४ | चिक्कोडी | ४६ |
| ५ | गोकाक | ४१ |
| ६ | हुक्केरी | ३१ |
| ७ | खानापूर | २३ |
| ८ | रायबाग | ३२ |
| ९ | रामदुर्ग | २० |
| १० | सौंदत्ती | २८ |
| | एकूण | ३३६ |

संदर्भ : http://zpdavangere.kar.in

बेळगाव जिल्ह्यातील जिल्हा पंचायतीमधील सदस्य संख्या पुढीलप्रमाणे –

## सारणी क्रमांक २.२२

## जिल्हा पंचायत प्रतिनिधी संख्या

| अ. नं. | तालुक्याचे नाव | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | अथणी | ११ |
| २ | बैलहोंगल | ८ |
| ३ | बेळगाव | १० |
| ४ | चिक्कोडी | १२ |
| ५ | गोकाक | ११ |
| ६ | हुक्केरी | ८ |
| ७ | खानापूर | ६ |
| ८ | रायबाग | ८ |
| ९ | रामदुर्ग | ५ |
| १० | सौंदत्ती | ७ |
| | **एकूण** | **८६** |

http://:zpdavangere.kar.in

## २.१९ विधानसौध

कर्नाटक सरकारने बेळगावला उपराजधानीचा दर्जा देऊन बेळगाव शहरापासून सुमारे १० किमी अंतरावरती बेंगलोर–पुणे राष्ट्रीय महामार्गावर हलगा येथे ३९१ कोटी रुपये खर्च करून विधानसौधची उभारणी केली आहे. ११ ऑक्टोबर २०१२ रोजी भारताचे राष्ट्रपती मा. प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते या विधानसौधचे उद्‌घाटन करण्यात आले. दरवर्षी विधानसौधचे एक अधिवेशन बेळगाव येथे होणार आहे. या विधानसौधमुळे बेळगावच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक इ. सर्वच बाबतीत विकासाला गती मिळण्यास मदत होणार आहे. कर्नाटक राज्यामध्ये बेंगळूर पाठोपाठ बेळगाव हे दोन नंबरचे शहर आहे.

## २.२० समारोप

बेळगाव जिल्ह्याच्या वरील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय इ. माहितीवरून 'बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या' या संशोधन विषयाशी संबंधित माहितीसाठी वरील महत्त्वपूर्ण संदर्भ उपयोगी ठरणार आहेत. कारण संशोधनाचे अभ्यासक्षेत्र हे बेळगाव जिल्हयातील मराठी बहुभाषिक ५ तालुक्याशी संबंधित आहे. त्यामुळे मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करीत असताना मराठी–कानडी संबंध, समाजरचना, संस्कृती, सांस्कृतिक देवाणघेवाण, नातेसंबंध इ. बाबतची परिपूर्ण माहिती संशोधकाला यातून उपलब्ध झाली आहे.

## संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| १. | वेणूनाद, स्मरणिका, | ४३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बेळगाव, २८ एप्रिल २०००, पृ. १५१ |
| २. | तत्रैव, पृ. १५१, १५२ | |
| ३. | महाराष्ट्र शासन, | महाराष्ट्र–म्हैसूर–केरळ सीमावाद आयोगास सादर केलेले महाराष्ट्र–म्हैसूर सीमावादविषयक निवेदन, १९६७, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, पृ. ६७ |
| ४. | पाटील, बी. बी., | महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, डिसेंबर २०११, पृ. १ |
| ५. | Kamath, Suryanath | U., Gazzetter of India, Karnataka State, Belgaum District, Government of Karnataka Publication, 1987, p. 4 |
| ६. | तत्रैव, | पृ. १४, १५ |
| ७. | INDIA 2009. | A Reference Journal compiled by Research, Reference & Training Division, Ministry of Information & Boradcasting, Government of India, p. 6 |
| ८. | वेणूवाद, स्मरणिका, | ४३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बेळगाव, २८ एप्रिल २०००, पृ. पृ. १५४ |
| ९. | वाघमारे, जनार्दन, | आजचे शिक्षण : स्वप्न आणि वास्तव, सुरेश एजन्सी, पुणे–२, पहिली आवृत्ती, २६ जानेवारी १९९३, पृ. ११ |
| १०. | साठे, मधुसुदन, | भारताच्या आर्थिक समस्या, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २००८, पृ. १०९ |

११. www.advantagekarnataka.com

१२. दर्डा राजेंद्र, गव्हाणे सुधीर, पाटील प्रताप, भंडारे यशवंत, सहकारी साखर उद्योगाची चार दशके, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, जानेवारी १९९६, पृ. ६

१३. कायंदे–पाटील, गंगाधर, वि., शेतीचे अर्थशास्त्र, कृषी अर्थशास्त्र, शेतीचे अर्थशास्त्र : सिद्धांत आणि धोरण, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, ५ जानेवारी २००७, पृ. २.१

१४. जिल्हा पंचायत बेळगाव, बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या २०१०–११, बेळगाव जिल्हा संख्या संग्रहन अधिकारी, जिल्हा पंचायत बेळगाव, पृ. १२३

१५. www.belgaumdistrict.com.in

१६. लेले, रा. के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००४, पृ. १६

१७. सार्वजनिक वाचनालय बेळगाव परिपत्रक २०११–१२

१८. फडके, य. दि., अध्यक्षीय भाषण, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, ७३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बेळगाव, २८ एप्रिल २०००, पृ. ३

१९. वेणूनाद, स्मरणिका, ४३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बेळगाव, २८ एप्रिल २०००, पृ. १६४

२०. www.belgaum.nic.in

२१. पाटील, बी. बी., महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, ‘के’सागर पब्लिकेशन्स, पुणे, दुसरी आवृत्ती, २००६, पृ. १३

२२. www.belgaum.nic.in

प्रकरण तिसरे

# संशोधन पद्धती

## प्रकरण तिसरे

# संशोधन पद्धती


३.१ प्रस्तावना

३.२ संशोधनाच्या व्याख्या

३.३ सामाजिक संशोधनाची वैशिष्ट्ये

३.४ सामाजिक संशोधनाचे प्रकार

३.५ संशोधन अभ्यास विषय

३.६ संशोधन विषयाची व्याप्ती

३.७ पूर्वाभ्यास

३.८ विषय निवड

३.९ सैद्धांतिक मांडणी

 ३.९.१ सामाजिक समस्याविषयक सैद्धांतिक दृष्टिकोन

 ३.९.२ प्रस्तुत अध्ययनासाठी लेबलिंग दृष्टिकोनाची उपयुक्तता

३.१० संशोधनाचे महत्त्व

३.११ संशोधनाची उद्दिष्ट्ये

३.१२ संशोधनाची गृहितके

३.१३ संशोधन पद्धती

३.१४ नमुना निवड

३.१५ पूर्वचाचणी

३.१६ घटक निवड

३.१७ तथ्य संकलन

३.१८ तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन

 ३.१८.१ सांकेतिकीकरण

 ३.१८.२ वर्गीकरण

 ३.१८.३ सारणीकरण

३.१९ समारोप

# प्रकरण तिसरे
# संशोधन पद्धती

## ३.१ प्रस्तावना

जिज्ञासा हा मानवाचा मूळ स्वभाव आहे. नैसर्गिक घटनांच्या प्रती मानवाच्या मनात असलेली कुतूहलाची भावना सातत्याने अतृप्ततेची व जिज्ञासाची राहिलेली आहे. मानवाच्या प्राथमिक अवस्थेपासूनच सूर्य, चंद्र, अग्नी, ऊन, पाऊस, जन्म, मृत्यू, भूकंप इ. घटना मानवाकरिता आश्चर्यकारक व रहस्यमय स्वरूपाच्या होत्या. या घटनांचे स्वरूप जाणून घेण्याकरिता मानव सतत प्रयत्नशील राहिला. आपली जिज्ञासा तृप्त करण्याकरिता प्रारंभिक ज्ञानप्राप्तीत त्याने सातत्याने भर घातली. सुरूवातीचे त्याचे ज्ञान सर्वसाधारण असले तरी कालांतराने त्याचे स्वरूप संघटित होत जाऊन नैसर्गिक घटनांची उकल तो करू लागला. आदिमकाळात नैसर्गिक घटनांचा संबंध मानवाने जादूशी लावला. तद्नंतर त्याचा संबंध दैवी इच्छाशी लावला गेला. यातूनच नवनवीन कल्पना आणि धारणा यातून मानवाने सैद्धांतिक विचारधारेकडे आपली वाटचाल सुरू केली. यातूनच निगमनात्मक तर्कशास्त्र उदयास आले. परंतु नंतरच्या काळात त्या विचारधारेतही परिवर्तन होऊन पुढे इंद्रिय अनुभववादाची विचारधारा पुढे आली. यातूनच एक नवीन बौद्धिक चेतना तसेच जागृती मानवी संशोधनातंर्गत येवून निसर्गवादी विचारधारेचा (Naturalistic Approach) उदय झाला. कोपरनिकसने १५४३ मध्ये Theory of Planetary Movement चा सिद्धांत मांडला. याच काळात न्यूटन, गॅलिलिओ इ. वैज्ञानिकांनी वैज्ञानिक सिद्धांतांची मांडणी केली. हा काळ वैज्ञानिक पद्धतीचा कालखंड समजला जातो. याच काळात डार्विनच्या विकासवादी सिद्धांताने मानवी चिंतन आणि अन्वेषण या पद्धतीला एक नवीन दिशा प्रदान केली आणि गृहितकांवर आधारित निगमनात्मक पद्धतीचा विकास झाला. याच विचारधारेने प्रभावित होऊन ऑगस्त कॉम्तने सामाजिकशास्त्राच्या अभ्यासात प्रत्यक्षवादाची मांडणी केली तर ईमाइल दरखीम याने सामाजिकशास्त्रात विषयपरत्वे अभ्यास पद्धती प्राधान्यक्रमाने आणली.[१]

संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य घटक आहे. मानवी जीवनात संशोधनाचे महत्त्व फार मोठे आहे. वर्तमान ज्ञानात नवीन ज्ञानाची भर टाकणे हे संशोधनाचे मूलभूत कार्य आहे. अविरत संशोधन आणि त्यावर आधारित निष्कर्ष याद्वारे समाज उन्नत अवस्थेत पोहचण्यास मदत होते आणि याचद्वारे भविष्यकाळात समाजाची उन्नती होण्यासही मदत होते. सर्व प्रकारची संशोधने ही प्रामुख्याने समाज जीवनाशी संबंधित असतात. मानवी जीवनातील, व्यवहारातील आणि सृष्टीतील विविध समस्या सोडविण्यासाठी सातत्याने संशोधन करणे आवश्यक असते. सत्य शोधून काढणे हा संशोधनाचा उद्देश आहे. समाजामध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि नैतिक स्वरूपाच्या घटना सातत्याने घडत असतात. त्यात निश्चित असा कार्यकारण संबंध असतो. परंतु आपल्याला तो माहीत नसतो. त्यातील कार्य आणि कारणभाव यांच्यातील अन्योन्य संबंधाचे विश्लेषण करून त्याचा शोध घेणे हा सामाजिक संशोधनाचा उद्देश आहे. आपल्या अनुभवाच्या कक्षेत येणाऱ्या कोणत्याही घटनेसंबंधी असे का? हा प्रश्न आपल्या मनात येणे आणि त्यामुळे आपण अस्वस्थ होणे हीच संशोधनाची पहिली पायरी आहे. या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करणे, त्या विषयासंबंधी संपूर्ण माहिती आणि आकडेवारीचे संकलन करणे, संकलित माहितीचे शास्त्रशुद्ध विश्लेषण करणे, त्याची पद्धतशीर मांडणी करणे, त्याचे निर्वचन करणे, त्याची कारणमीमांसा करणे आणि त्याचे उत्तर शोधणे या सर्व प्रक्रियांचा शास्त्रीय सामाजिक संशोधनात समावेश होतो.[२]

## ३.२ संशोधनाच्या व्याख्या (Definitions of Research)

संशोधनाच्या व्याख्येच्या स्वरूपात सर्वमान्य स्वरूपाची एकच व्याख्या आढळत नाही. अभ्यास विषयाकडे संशोधनाच्या विषयाकडे, प्रक्रियेकडे व संशोधनाच्या उद्दिष्टांकडे प्रत्येक अभ्यासकाचा पाहण्याचा दृष्टीकोन वेगवेगळा असल्यामुळे संशोधनाच्या व्याख्येबाबत एकमत आढळत नाही.

### १. वेबस्टर

वेबस्टरच्या शब्दकोषात, ''संशोधन म्हणजे तथ्ये वा तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परिक्षण किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पद्धतशीर केलेले परिश्रम.''

## २. एस. स्लेसिंजर आणि एम. स्टीफेनसन

''ज्ञानाच्या कक्षा विस्तारीत करणे, त्याची अचूकता तपासणे आणि सिद्धांताच्या मांडणीसाठी किंवा कलेच्या व्यावहारिक उपयोगासाठी हे ज्ञान कितपत उपयोगी पडते हे पाहण्यासाठी शास्त्रीय पद्धती शोधून काढणे, त्याचे विश्लेषण करणे आणि सामाजिक जीवनाच्या संकल्पना मांडण्याची व्यवस्थित पद्धत म्हणजे सामाजिक संशोधन होय.''

## 3. P. V. Young

"We may define social research as the systematic method of discovering new facts of verifying old facts, their sequences interrelationships, casual explanations and the natural laws which govern them."[3]

वरील सर्व व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की, सामाजिक संशोधन ही मानवाच्या सामाजिक जीवनाच्या विविध पैलूंची अध्ययन करण्याची एक वैज्ञानिक पद्धती आहे. जिचा उद्देश सामाजिक घटना किंवा समस्याच्या संदर्भात नवीन ज्ञानाची प्राप्ती करणे हा आहे. सामाजिक संबंधाच्या आधारावर समाजाची निर्मिती झाली आहे म्हणून जर समाज किंवा सामाजिक जीवनाच्या संबंधात कोणत्याही घटनेच्या संदर्भात वास्तविक ज्ञान प्राप्त करायचे असेल तर त्यामध्ये अंतर्भूत संबंधाच्या विषयाबाबत ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, सामाजिक संशोधन ही सामाजिक जीवन, अंतर्भूत प्रक्रिया व नियमांची एक वैज्ञानिक संशोधन पद्धती आहे.

## ३.३ सामाजिक संशोधनाची वैशिष्ट्ये[४]

वरील व्याख्यांच्या आधारे सामाजिक संशोधनाची काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

१. सामाजिक संशोधन हे सामाजिक जीवनाबाबत नवीन माहिती शोधण्यासाठी हाती घेतले जाते. यामध्ये जुन्या माहितीचे परिक्षण केले जाते. तसेच उपलब्ध असलेल्या ज्ञानातील परस्परसंबंध स्पष्ट केला जातो.

२. सामाजिक संशोधन ही सतत चालणारी पद्धतशीर आणि वैज्ञानिक प्रक्रिया आहे. यामध्ये सामाजिक जीवनपद्धतीच्या नवीन माहितीचा शोध घेऊन वर्तमान ज्ञानाची कक्षा वाढविली जाते.

३. सामाजिक संशोधनामध्ये सामाजिक घटनांच्या (समूह, गट, संस्कृती, धर्म, समाज, परंपरा, मनोवृत्ती) अभ्यास करताना नवीन माहिती, सिद्धांत व संकल्पना मांडल्या जातात.

४. सामाजिक संशोधनाद्वारे कार्यकारण संबंध तपासला जातो. कार्यकारण संबंध म्हणजे दोन वेगवेगळ्या घटनांचा परस्पराशी असलेला संबंध होय. उदा. शिक्षणाचे प्रमाण वाढल्यास व्यक्तीची विचार करण्याची क्रिया बदलते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, ''ज्ञान हा तिसरा डोळा आहे असे म्हटले.'' ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' हा परस्पर कार्यकारण संबंध आहे. ''बालविवाहामुळे लोकसंख्यावाढीचे प्रमाण वाढते.'' ''बालविवाह हे कुपोषित बालकाच्या जन्मास कारणीभूत ठरतात.'' ''शिक्षणप्रसार झाल्यास कुटुंब नियोजनाचे महत्त्व सांगण्याची गरज पडत नाही.'' इ.

## ३.४ सामाजिक संशोधनाचे प्रकार[५] (Types of Social Research)

संशोधनाचे स्वरूप, उद्देश आणि संशोधकाचा दृष्टीकोन या आधारावर सामाजिक संशोधनाचे मुख्य दोन प्रकार आहेत. ते पुढीलप्रमाणे –

### १. मौलिक अथवा शुद्ध संशोधन

हे मूलभूत स्वरूपाचे संशोधन होय. यालाच सैद्धांतिक संशोधन असेही म्हटले जाते. केवळ ज्ञानसाधना हाच या संशोधनाचा एकमेव उद्देश असतो. सत्याचा शोध घेणे या संशोधनाचे प्रमुख ध्येय असते. टी. एच. हक्सले हे या सिद्धांताचे कट्टर समर्थक होते. नवीन ज्ञान प्राप्त करणे, ज्ञानात भर टाकणे अथवा त्याची वृद्धी करणे, उपलब्ध ज्ञानाचे पुनर्परीक्षण करून त्याचे शुद्धीकरण करणे हा प्रमुख हेतू असतो. केवळ नवीन ज्ञान प्राप्त करून, जुन्या ज्ञानात भर घालून नवीन

सिद्धांताची मांडणी मौलिक संशोधनात केली जाते. म्हणूनच नवीन सिद्धांताचा शोध घेणे व पारंपरिक सिद्धांतात विकास घडवून आणणे असे दोन प्रकारे मौलिक संशोधन केले जाते.

### २. व्यावहारिक अथवा क्रियाभिमुख संशोधन (Practical or Applied Research)

रॉबर्ट लिंड यांनी या पद्धतीचा पुरस्कार केला आहे. ज्या संशोधनाचा उद्देश व्यावहारिक उपयोगासाठी ज्ञान प्राप्त करणे हा असतो त्यास व्यावहारिक संशोधन असे म्हणतात. तसेच सामाजिक संशोधन अध्ययनाच्या निष्कर्षांना क्रियात्मक रूप देण्याच्या कोणत्याही तात्कालिक किंवा भावी योजनांशी संबंधित असते तेव्हा त्यास क्रियाभिमुख संशोधन असे म्हणतात. व्यावहारिक आणि क्रियाभिमुख हे दोन शब्द एकमेकांशी मिळतेजुळते आहेत. कारण कोणत्याही सामाजिक जीवनाच्या समस्या अथवा घटनांना व्यावहारिक तसेच क्रियात्मक महत्त्व असते. मिळवलेल्या ज्ञानाचे मानवी जीवनाच्या कल्याणासाठी व्यावहारिक उपयोग करावा हे या पद्धतीचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

शुद्ध व क्रियाभिमुख संशोधन हे दोन्ही एकमेकांस परस्पर पूरक स्वरूपाची आहेत. कारण नवीन ज्ञान तथ्ये व जुन्या तथ्यांचा व ज्ञानाचा पडताळा करून पाहण्याकडे जसे एक संशोधन भर देते त्याच ठिकाणी क्रियाभिमुख संशोधन ज्ञानाचा व्यावहारिक पातळीवर वापर करण्यावर भर देतो. तत्त्व आणि व्यवहार यात सांगड घालणे समाजाच्या दृष्टीने एक काळाची गरज म्हणून ओळखावी लागेल. तत्त्वज्ञानाला व्यवहाराची जोड मिळत असेल तर तत्त्वज्ञान समाजपयोगी पडत असते. म्हणून शुद्ध व क्रियाभिमुख संशोधन ही एकमेकांस पूरक ठरणारी असतात. यावर आधुनिक काळात भर देण्यात येत आहे.

## ३.५ संशोधन अभ्यास विषय

प्रस्तुत प्रबंधाचा विषय **''बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या''** हा आहे.

## ३.६ संशोधन विषयाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधन विषयाची भौगोलिक व्याप्ती बेळगाव जिल्ह्यातील बेळगाव, खानापूर, चिक्कोडी, हुक्केरी व अथणी या तालुक्यापुरतीच मर्यादित असून विषय विषयक व्याप्ती ही या तालुक्यातील मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या अभ्यासण्यापुरतीच मर्यादित आहे.

## ३.७ पूर्वाभ्यास (Review of Literature)

'बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या' या विषयावर संशोधनात्मकदृष्ट्या प्रकाश टाकत असताना या विषयाचा पूर्वाभ्यास अभ्यासणे संशोधकाला आवश्यक आहे. कारण भारत हे बहुभाषिक राष्ट्र असून घटकराज्यांची निर्मिती करताना भाषा हा घटक आधारभूत मानला आहे. भारतामध्ये भाषेच्या आधारावर घटकराज्ये निर्माण झाल्यामुळे आणि मुळातच भारतीय संस्कृती बहुभाषिक असल्याने अनेक राज्यातील सीमावर्ती भागामध्ये भाषिक अल्पसंख्याक निर्माण झाले आणि त्यातूनच अनेक सीमावाद निर्माण झाले. त्यामध्ये आंध्र व मद्रास (तामिळनाडू), राजस्थान व मध्यप्रदेश, महाराष्ट्र व गुजरात, बिहार व उत्तरप्रदेश, पंजाब व हरियाना आणि महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यातंर्गत बेळगाव, कारवार, निपाणी यासह सुमारे ८६५ खेडी व १६ नगरे आणि १९५१ च्या जनगणनेनुसार या प्रदेशातून ६.७५ लाख लोकसंख्येचा मराठी भाषिक प्रदेश कर्नाटकमध्ये राहिला. महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यातंर्गत असणाऱ्या या सीमावादावर अनेक शासकीय समित्या, आयोग नेमण्यात आले होते. या समित्यांचे व आयोगांचे रिपोर्ट व अहवाल या अभ्यासामध्ये महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. तसेच अनेक विचारवंतानीही या प्रश्नांवर अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. त्यामध्ये

'लोकशाही समाजवादाचे राजकारण – श्री. एस. एम. जोशींच्या जीवन आणि कार्याचा चिकित्सक अभ्यास'[६] यामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही स्वातंत्र्यपूर्व कालखंडात म्हणजेच ''महाराष्ट्राची अस्मिता'' छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडापासून ते अकोला करार, दार आयोग, जेव्हीपी समितीच्या अहवालावर प्रकाश टाकण्यात आला आहे. महात्मा गांधी, सरदार पटेल, पंडित नेहरू इ. ची भाषिक प्रांतरचनेसंदर्भातील भूमिका मांडली आहे. त्यासाठी मराठी

भाषिकांची प्रयत्नांची एकजूट, सातत्य तसेच एस. एम. जोशी यासारख्या बलदंड व्यक्तिमत्त्वांचे प्रयत्न उपयोगात आल्याचे दिसून आले.

त्याचबरोबर 'कर्नाटक राज्य पुनर्बांधणीतील प्रशासकीय समस्या'[७] धारवाड विद्यापीठ (राज्यशास्त्र, ऑगस्ट १९७७) या पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेल्या शोधप्रबंधामध्ये कुलकर्णी आर. आर. यांनी बेळगावसह कर्नाटक राज्याची निर्मिती केल्यामुळे प्रशासकीय ज्या समस्या आल्या त्या समस्यांचा ऊहापोह केला आहे. तसेच सीमाप्रश्नासंदर्भात विविध समित्या त्यामध्ये दार आयोग, जेव्हीपी समिती, महाजन समितीचा अहवाल, त्यावर सीमावासीयांनी दिलेल्या तीव्र प्रतिक्रिया मांडण्यात आल्या आहेत. १९५१ आणि १९६१ च्या जनगणनेनुसार मराठी भाषिकांची असणारी लोकसंख्या याचे कोष्टकाद्वारे सूत्रबद्धरित्या विवेचन करण्यात आले आहे.

'शिवसेनेची निर्मिती, वाढ, स्वरूप, यशापयश आणि भारतीय राजकारणातील शिवसेनेचे भवितव्य यांचा विश्लेषणात्मक अभ्यास'[८] या मुंबई विद्यापीठाच्या कला शाखेतील राज्यशास्त्र विषयाच्या पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेल्या प्रबंधामध्ये शिवसेनेची सीमाप्रश्नासंदर्भातील भूमिका, महाराष्ट्र एकीकरण समितीच्या माध्यमातून शिवसेनेने वेळोवेळी केलेली आंदोलने, सत्याग्रह, सीमालढ्यासाठी शिवसेनेने दिलेले हुतात्मे, महाजन समितीवरील आक्षेप, विरोधी पक्ष म्हणून वेळोवेळी विधानपरिषदेत सीमाप्रश्नासंदर्भात मांडण्यात आलेली बाजू इ. गोष्टींवर प्रकाश टाकला आहे.

''कन्नड–मराठी सांस्कृतिक अनुबंधाच्या अनुषंगाने सीमाभागातील मराठी साहित्याचा अभ्यास''[९] यामध्ये सीमावाद निर्मिती, भाषावार प्रांतरचना, राज्यपुनर्रचना मंडळ, कर्नाटक–महाराष्ट्र सीमावाद, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, सीमावादाचे भाषिक, राजकीय, सामाजिक, मानसशास्त्रीय तसेच साहित्यावरील परिणाम, मराठी सीमाबांधवांची न्याय्य बाजू, कर्नाटक सरकारची भूमिका, केंद्र सरकारची भूमिका, सीमाप्रश्नाच्या सोडवणूकीसाठी मराठी भाषिकांचे प्रयत्न इ. घटनावंर संशोधनात्मक अध्ययन केले आहे.

'महाराष्ट्राचे महामंथन'[१०] या लालजी पेंडसे यांच्या पुस्तकामध्ये १ मे १९६० रोजी जे महाराष्ट्र राज्य भारताच्या नकाशावर कोरले गेले त्यामध्ये बेळगाव, कारवार, बिदर, भालकी, संतपूर हा सुमारे २० लाख मराठी भाषिकांचा मुलूख समाविष्ट करण्यात आला नाही. या मराठी भाषिकांना त्यांच्या मायबोलीच्या महाराष्ट्र राज्यात अंतर्भूत करण्याऐवजी त्यांना गेली ५५ वर्षे त्यांच्या इच्छेविरूद्ध कर्नाटकात डांबून ठेवण्यात आले. त्यांची अवस्था 'ना घर का ना घाट का' अशी आहे. १ मे रोजी महाराष्ट्रात 'महाराष्ट्र दिन' साजरा केला जातो तर कर्नाटकात डांबल्या गेलेल्या मराठी माणसांना १ नोव्हेंबर कर्नाटक राज्य स्थापनेचा दिवस हा 'काळा दिन' म्हणूनच पाळावा लागतो. अशा अवस्थेत या सीमाभागातील मराठी भाषिकांची अवस्था, त्यांना भेडसावणारे विविध प्रश्न, त्यांना स्वत:च्या अस्तित्वासाठी करावा लागणारा संघर्ष, कन्नडीगांकडून मिळत असणारी हीन वागणूक, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील १०६ हुतात्मे, सत्ताधाऱ्यांचे स्वार्थी राजकारण, त्यामुळे भिजत पडलेला सीमाप्रश्न, विविध साहित्य संमेलने, त्यातील ठराव, महाराष्ट्र एकीकरण समितीची स्थापना, कार्ये, प्रयत्न इ. गोष्टींचा ऊहापोह यामध्ये पेंडसे यांनी केला आहे.

तर '२० व्या शतकातील महाराष्ट्र'[११] खंड सातवा या य. दि. फडके यांच्या पुस्तकात संयुक्त महाराष्ट्र चळवळ १९४८ ते १९५६ या कालावधीत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र या भारतीय संघराज्यातील एकभाषी घटकराज्यांच्या निर्मितीसाठी मराठी भाषिकांनी केलेल्या आंदोलनाचे वर्णन, विवेचन व विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर भाषावार प्रांतरचना आणि संविधान सभा, काँग्रेस श्रेष्ठींचे प्रांताबाबतचे धोरण, गांधी, नेहरू आणि सरदार पटेल यांचा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राला विरोध, दार आयोग, जेव्हीपी समिती तसेच यशवंतराव चव्हाणांची भूमिका, महाराष्ट्राने हक्क सांगितलेला सीमेवरील भाग आकडेवारीसह नमूद करण्यात आला आहे. राज्यपुनर्रचना आयोगाची स्थापना, आयोगाच्या सीमाप्रश्नासंबंधीच्या शिफारशी यावर प्रकाश टाकला आहे. 'कऱ्हेचे पाणी' या आचार्य अत्रे यांच्या आत्मवृत्तामध्ये संयुक्त महाराष्ट्राचे रणशिंग, महाद्विभाषिक राज्य, संयुक्त महाराष्ट्र समितीची पहिली निवडणूक जिंकून मुंबईवर महाराष्ट्राचा झेंडा, मुंबई महाराष्ट्राला मिळाली पण बेळगाव, निपाणी, कारवार, भालकी हा भाग मात्र कर्नाटक राज्यातच राहिला यामध्ये षडयंत्र काय? यावर चिंतनात्मक लेखन केले.

अ‍ॅड. राम आपटे यांच्या ‘महाराष्ट्र–कर्नाटक सीमावाद’[१२] या पुस्तकातून सीमावाद म्हणजे काय? सीमावादाचे स्वरूप, सीमावाद सोडविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे, भाषिक तत्त्वे, महाजन आयोग, राज्य पुनर्रचना आयोग, कर्नाटक सरकारची कन्नड सक्तीबाबतची परिपत्रके, नकाशे इत्यादीबाबतची माहिती दिली आहे. तर महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र–म्हैसूर–केरळ सीमावाद आयोगास सादर केलेल्या निवेदनात दार आयोग, जेव्हीपी समिती, राज्य पुनर्रचना आयोग, भाषा व संस्कृती यांच्यातील एकजिनसीपणा, महाराष्ट्र शासनाची कैफियत, म्हैसूरचा दृष्टिकोन तसेच बेळगाव जिल्ह्याची भौगोलिक, ऐतिहासिक पार्श्वभूमी, सीमाभागात होणारी साहित्य संमेलने, त्यातून होणारे ठराव इ. गोष्टींवर प्रकाश टाकला आहे..

गोऱ्हे निलम यांच्या ‘शिवधनुष्य’[१३] या पुस्तकामध्ये सीमाप्रश्नासंबंधातील शिवसेनेची भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली आहे. शिवसेनेची स्थापना १९६६ मध्ये झाली. तेव्हापासून ते आजपर्यंत सीमाप्रश्नासंदर्भात ज्या ज्या वेळी आंदोलने, मोर्चे काढले त्या त्या वेळी शिवसेना अग्रेसरच राहिली आहे. हे विविध दाखले देऊन स्पष्ट केले आहे. भाषावार प्रांतरचना कायदा १९५६ ला अस्तित्वात आला. त्यातूनच सीमाप्रश्न निर्माण झाला. महाजन आयोगाने या प्रांतरचनेच्या शिफारशी केल्या. त्या शिफारशी म्हणजे सीमावासीयांच्या काळजाला भेगा पाडणाऱ्या होत्या. त्या पूर्णपणे कर्नाटकधार्जिण्या होत्या. कारण त्या शिफारशी १९६१ च्या शिरगणतीचा आधार घेऊन मांडण्यात आल्या होत्या. वास्तविक १९५१ च्या शिरगणतीचा विचार करता सीमाभागातील सुमारे १ लाख २० हजार लोकसंख्येपैकी ६२ हजार लोक मराठी भाषिक होते. म्हणजेच मराठी भाषिकांची संख्या ५० टक्के, कन्नडीगांची २३ टक्के आणि अन्य भाषिकांची संख्या सुमारे २५ टक्के होती. बेळगाव शहर सर्व बाजूंनी मराठी भाषिक माणसांनीच वेढलेले होते. पण आयोगाने महाराष्ट्राच्या पाठीत खंजीर खुपसला. त्यामुळे महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले. आजही होत आहे. आताही सीमाबांधवांचे जीवन हे कष्टप्रद बनत आहे. कन्नडीगांकडून होणारे अन्याय, अत्याचार वाढतच आहेत इ. गोष्टींवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

तसेच 'असा लढा असे लढवय्ये'[१४] या पुस्तकामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास, महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी किंबहुना महाराष्ट्रासाठी जिवंत असेपर्यंत मी सेवा करीन म्हणणारे प्रबोधनकार ठाकरे, महाराष्ट्राचे बलदंड व्यक्तीमत्त्व आचार्य अत्रे, ज्यांनी सीमाप्रश्न जिवंत ठेवला, सीमाप्रश्नी ज्या महाजन आयोगाने अहवाल तयार केला त्या अहवालाची केलेली चिरफाड यातून दिसून येते. महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्न ज्याला आज ५५ वर्षे पूर्ण होत आहेत तरीही त्याबाबत ना निरगाठ ना उकल, साराबंदी लढा, लढ्याचे स्वरूप, लुईच्या अत्याचाराचा भीषण इतिहास, सीमालढ्यातील बेळगाव विद्यार्थी संघाची कामगिरी इ. गोष्टींवर प्रकाश टाकण्यात आला आहे. कोठारे अनिल यांच्या 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास' या पुस्तकामध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती, स्वतंत्र मुंबई राज्य, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना, जळगाव परिषद, अकोला करार, दार कमिशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दार कमिशनला केलेले निवेदन, इंदिरा गांधी आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ, शेतकरी कामगार पक्ष आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ, जेव्हीपी समिती, नागपूर करार, १९५३ चा राज्य पुनर्रचना आयोग इ. घटकांवर संशोधनात्मकदृष्ट्या प्रकाश टाकण्यात आला आहे.

'सनातन प्रभात'[१५] मध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमावादातून निर्माण झालेल्या समस्यांवर प्रकाश टाकला आहे. सीमाभाग हा वादग्रस्त प्रदेश असल्याने तेथे वीज, पाणी, रस्ते, शिक्षण आदी सुविधा पुरविण्याकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. तर कन्नड सक्तीमुळे तेथील तरूण निरूपयोगितेच्या तणावामुळे व्यसनाधिनतेकडे वळून त्यातच गुरफटत चालले आहेत. त्यांनी सीमाभागातील मराठी जनतेला त्यांच्या घटनात्मक अधिकारांपासूनही वंचित ठेवल्याने त्यांच्याच स्वतंत्र देशात त्यांना दुर्लक्षित जीवन जगावे लागत आहे. त्यामुळे भविष्यात नक्षलवादासारखी राष्ट्रास घातक समस्याही निर्माण होऊ शकते. त्यामुळे या वादावर तोडगा काढणे दोन्ही राज्यांच्या हिताचे ठरेल असे म्हटले आहे.

'युनिक फीचर्स'[१६] यामध्ये 'कात्रीतलं बेळगाव' या लेखात सीमाभागात मराठी भाषिकांची संख्या अधिक असून तेथील संस्कृती आजही जपण्याचा प्रयत्न मराठी भाषिक करतात हे विविध घटनांवरून स्पष्ट केले आहे. बेळगावचे चौक, रस्त्यांची, गल्ल्यांची नावे, मंदिरे, दुकानांवरील फलक, धार्मिक सण, समारंभ, सांस्कृतिक देवाणघेवाण, दरवर्षी सीमाभागात होत असणारी मराठी साहित्य संमेलने, मराठी वाचनालये, मराठी वृत्तपत्रे व त्यांचा खप या गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. तर अलिकडे १९८६ च्या कन्नडसक्तीमुळे शाळा, महाविद्यालये, खाजगी वा सरकारी कार्यालये यामध्ये कन्नडचा वापर, दुकानांचे फलक, बसवरील फलक कानडीत आहेत. त्यामुळे मराठी भाषिकांचे जीणे जरी हलाखीचे बनत असले तरी आजची नवीन पिढी कन्नड आत्मसात करत असल्याने मराठी–कन्नड सांस्कृतिक अनुबंध निर्माण होत असल्याचे म्हटले आहे.

'बेळगाव सीमाप्रश्न नेमका आहे तरी काय?'[१७] या लेखात कर्नाटक राज्यकारभार भाषा कायदा १९६३ नुसार कन्नड ही राज्यभाषा म्हणून जाहीर झाली असली तरी संविधानातील २९ व ३० कलमांनुसार ज्या जिल्ह्यात १५% पेक्षा जास्त लोक राज्यभाषेतर मातृभाषा असणारे आहेत, त्यांच्यासाठी पर्याय म्हणून त्यांच्या भाषेपैकी कोणत्याही भाषेची राज्यकारभार भाषा म्हणून तरतूद केली गेली नसल्याने सदर कायदा राज्यभाषा आणि कर्नाटक शासनाने त्या कायदयासंबंधी प्रकाशित केलेली परिपत्रके आणि आदेश हे सर्व भाषिक अल्पसंख्याकांच्या संदर्भात राष्ट्रीय धोरणांच्या विरूद्ध, घटनाविरूद्ध ठरतात. त्यामुळे आज शाळेमध्ये कन्नड भाषा शिकण्याची इच्छा नसणाऱ्या विद्यार्थ्यांना सक्तीने विषय देणे म्हणजे घटनेने देशाचे नागरीक म्हणून त्यांना बहाल केलेल्या व्यक्तिस्वातंत्र्यावरच गदा आणण्यासारखे आहे असे म्हटले आहे. त्यापुढे जाऊन गायकवाड यांनी आजही बेळगावच्या एकूण लोकसंख्येमध्ये ५४.७% मराठी, १५.८% उर्दू–मराठी आणि २३.८% कन्नड भाषिकांचा समावेश होतो. उर्दू–मराठी भाषिकांचा समावेश मराठी भाषिकांमध्ये केल्यास तो आकडा ७०% च्या आसपास जातो. तर बेळगावातील महानगरपालिकेकडे दप्तरातील नोंदीमध्ये ८०% दुकाने मराठी भाषिकांची आहेत, रस्ते, वाड्या, चौक यांची नावे मराठीच आहेत. शहरात ८ मराठी तर २ कन्नड दैनिके आहेत. असे असताना कर्नाटक सरकार बेळगाववरती आपला हक्क कोणत्या इराद्याने सांगू शकते असे म्हटले आहे.

वरीलप्रमाणे महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्नासंदर्भात अनेक संशोधकांनी तसेच साहित्यिक, पत्रकार, नेते इत्यादींनी यासंदर्भात आपली विविध मते मांडली आहेत. १९५६ पासून आजतागायत कर्नाटक सरकारकडून मराठी भाषिकांची होणारी ससेहोलपट, भाषिक अल्पसंख्याक असूनही त्याकडे कर्नाटकचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष, सीमाप्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र एकीकरण समितीची लोकशाही मार्गाने अनेक आंदोलने, सीमाभागातील भाषिक रचना, मराठी भाषिकांवर होणारे अन्याय, अत्याचार इत्यादींवर वस्तूनिष्ठ दृष्टिकोनातून प्रकाश टाकण्यात आल्याचे दिसून येते. मात्र एकूण कर्नाटक राज्यात अल्पसंख्याक म्हणून मराठी भाषिक जनता ही बेळगाव जिल्ह्यात अल्पसंख्याक नाही कारण बेळगाव, खानापूर, निपाणी, चिक्कोडी व अथणी या पाच तालुक्यात निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्या ही मराठी भाषिकांची असून आजपर्यंत सर्वच स्तरावर त्यांचे वर्चस्व दिसून येते. परंतु कर्नाटक सरकारने मराठी भाषिकांना अल्पसंख्याक ठरविले. परंतु अल्पसंख्याकांचे हक्क व अधिकार यांचे संवर्धन न करता या लोकशाही भारतात त्यांच्या हक्कांवर गदा आणून त्यांचे जीवनच उध्वस्त करण्याचा घाट चालविल्याचे दिसून येते. १९८६ च्या कन्नड सक्तीने तर सीमाभागातील मराठी भाषा, संस्कृती व अस्मिताच नष्ट करण्याचा जणू विडाच कर्नाटक सरकारने घेतल्याचे वरील मांडणीतून दिसून येते.  तर विविध विद्यापीठांतून वरील विषयासंदर्भात संशोधन करण्याबरोबरच अनेक विचारवंतानी पुस्तके, ग्रंथस्वरूपात या विषयावर प्रकाश टाकला आहे. तर साधना, लोकराज्य, प्रबोधन प्रकाशन ज्योती इ. सारख्या नियतकालिकांमधून, दैनिक वर्तमानपत्रातून तसेच संकेतस्थळांवरून मराठी भाषिकांच्या समस्यांबद्दल विविध अंगानी प्रकाश टाकण्यात आला आहे. उल्लेख करण्यासारखी बाब म्हणजे सीमाप्रश्नासंदर्भातील मुखपत्र म्हणून बेळगाव येथून प्रकाशित होणारे दैनिक तरूण भारत वर्तमानपत्र यामधून सीमाप्रश्नाच्या निर्मितीपासून ते आजतागायत घडलेल्या सर्व घटनांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

## ३.८ विषय निवड (Selection of Topic)

Mother tongue is the language of heart असे एस. टी. कोलरीज यांनी म्हटले आहे. यामध्येच मातृभाषेचे महत्त्व स्पष्ट होते. दोन मतांना एकत्रित आणण्याचे सामर्थ्य मातृभाषेत असते. यासाठी ज्यांची भाषा समान, त्यांना एकमेकांशी संपर्क साधणे, व्यवहार करणे सहज शक्य होते. भाषा एकमेकांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करते. विचारोक्ती, विचाराभिमुखता, विचार समजावून घेणे हे भाषेमुळेच शक्य होते. विचारांना चालना देण्याकरिता, विचार प्रगटनाकरिता आणि वैचारिक देवाणघेवाण आणि त्यामधून विकास साधण्यासाठी भाषा उपयोगी पडते. त्यामुळे भाषा हे सामाजिक आंतरव्यवहाराचे साधन आहे. भाषेचे महत्त्व विशद करताना श्री. रा. सी. सराफ यांनी म्हटले आहे, भाषा हे ती भाषा ज्या समाजात वापरली जाते त्या समाजातील सदस्यांचे परस्पर व्यवहाराचे साधन आहे. समान भाषेमुळे समाजाचे व्यवहार सुलभ होतात. समाजातील घटक एकमेकांशी संबंध ठेवू शकतात आणि विचारांची देवाणघेवाण होऊ शकते. शासनाची भाषा व समाजाची भाषा एक असल्यास जनतेला शासनाबद्दल आपुलकी वाटते. शासनाचा कारभार जनतेच्या सर्व घटकांना समजणे शक्य होते अणि शासनात जनतेचे प्रतिनिधी आल्यानंतर त्यांना प्रशासन करताना भाषेचे अडसर राहत नाहीत. एकमेकांशी संबंध ठेवणे ही जी समाजाची एक महत्त्वाची गरज आहे ती समान भाषेमुळे शक्य होते.[१८]

भाषेचे समाजजीवनामध्ये असलेले स्थान लक्षात घेऊनच भारतामध्ये ज्या अनेकविध भाषा बोलणारे लोकसमूह आहेत त्यांच्या विकासाचा प्रश्न त्या त्या संदर्भात तपासून पाहणे आवश्यक ठरते. यामधून एकच समान भाषा बोलणाऱ्या जनसमूहाचा एक विशिष्ट प्रांत तयार केल्यास विकासास चालना मिळेल हा विचार बलिष्ठ होत गेला. भारतामध्ये ब्रिटीशकाळात भाषावार प्रांतरचना व्हावी यासाठीच विचार मांडले जात होते. १९१२ च्या सभेत म्हणजेच काँग्रेसच्या अधिवेशनात मुंबई इलाक्यातून सिंधी भाषकांना वेगळे काढून त्यांचे वेगळे एक स्वतंत्र राज्य बनवावे अशी सूचना मांडली होती. त्याचबरोबर मुंबई प्रांतातून तेलगू भाषकांना वेगळे काढून त्यांचे वेगळे तेलगू भाषक राज्य करावे असेही सुचवले गेले. पण याचा निर्णय झाला नाही. सन १९२० मध्ये नागपूरात भरलेल्या राष्ट्रीय

सभेत पुन्हा भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा चर्चेला आला. साहजिकच स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व स्विकारून त्यानुसार प्रांताची नव्याने रचना करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली. १९२८ साली नेहरू समितीने सिंध प्रांताची शिफारस करताना एकभाषी प्रदेश व लोकेच्छेचा आधार घेतला होता. माँटेग्यू–चेम्सफोर्ड अहवालाने द्विदल शासन पद्धतीचा (१९१८) पाया घातला. या अहवालात विधीमंडळाचे कामकाज प्रादेशिक भाषेतून अधिक सुरळीतपणे करता येईल असे प्रतिपादन केले. १९३१ मध्ये भारत सरकारने नेमलेल्या 'ओडोनेल' समितीने भाषेबरोबर जनतेच्या इच्छेला प्राधान्य देऊन उडिया भाषिक प्रदेशाच्या ओरिसा प्रांताची शिफारस केली. जिल्हा परिषद समितीने १९४९ साली सादर केलेल्या आपल्या अहवालात या आयोगाने व्यक्त केलेल्या मतांना सर्वसाधारण संमती दर्शवली असली तरी जनतेच्या आग्रही भावनांची दखल घेतली आहे. स्वातंत्र्यानंतर लोकांमध्ये झालेली राजकीय जागृती व महत्त्वाच्या प्रादेशिक भाषांचे वाढते महत्त्व यांचे पर्यवसान हळूहळू भाषिक आधारावर काही विशिष्ट राज्यांच्या निर्मितीची मांडणी करण्यात आली. १९५२ साली आंध्र राज्याच्या मागणीसाठी श्री. पोट्टी श्रीरामूल्लू यांनी उपोषण करून देहत्याग केला. त्यामुळे सरकारचे धोरण भाषावार प्रांतरचनेला अनुकूल होऊन १ ऑक्टोबर १९५३ रोजी आंध्रप्रदेशची निर्मिती झाली.

भारत सरकारने १९५३ मध्ये राज्यांच्या पुनर्रचनेची तपासणी करण्यासाठी राज्य पुनर्रचना आयोगाची नियुक्ती केली. आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन १९५६ साली १४ राज्ये व ६ केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती केली. यामध्ये मराठी व गुजराथी भाषिकांच्या मुंबई द्विभाषिक राज्यांचा समावेश होता. १ मे १९६० रोजी मुंबई द्विभाषिक राज्यामधून महाराष्ट्र व गुजरात राज्ये निर्माण झाली. तरीही बेळगाव, कारवार, बिदर व गुलबर्गा जिल्ह्यातील १६ नगरे व ८६५ खेड्यांचा मराठी भाषिकांचा भूभाग कर्नाटकमध्ये राहिला. सर्वसाधारणपणे ३५ लाख लोकसंख्येच्या या भागातील जनतेने महाराष्ट्र राज्यामध्ये जाण्यासाठी लोकशाही मार्गाने विविध आंदोलने केली. १ नोव्हेंबर १९५६ रोजी म्हैसूर (कर्नाटक)राज्यात समाविष्ट झालेल्या या मराठी भाषिकांच्या सीमाभागात १९४६ साली महाराष्ट्र एकीकरण समितीची स्थापना झाली. या समितीच्या माध्यमातून सीमाभाग महाराष्ट्रात समाविष्ट करण्याच्या दृष्टीने मराठी भाषिकांनी वेळोवेळी सत्याग्रह, हरताळ, उपोषण, बंड इ. मार्गांचा अवलंब केला. तसेच मराठी भाषिकांनी स्थानिक स्वराज्य संस्थापासून ते

संसदेच्या निवडणुकापर्यंतच्या अनेक निवडणुका जिंकल्या व सीमाभाग महाराष्ट्रातच समाविष्ट व्हावा हे लोकशाही मार्गाने दाखवून दिले. गेली ५८ वर्षे हा सीमाप्रश्न सुटलेला नाही. मराठी भाषिकांची संस्कृती, रूढी, परंपरा, सामाजिक जडणघडण या बाबी कन्नडभाषा आणि कर्नाटक यांच्याशी एकजिनसीपणाने ठरू शकत नाहीत तर कर्नाटक शासन आपल्या कन्नड भाषेच्या प्रसारासाठी व अस्मितेसाठी वेगवेगळ्या मार्गाने कन्नड सक्ती करत आहे. आज सरकारी कार्यालये, पोलीस, कोर्टकचेरी, इलेक्ट्रीक विभाग, शाळा, महाविद्यालये, महसूल विभाग, दवाखाने, परिवहन विभाग इ. तून सर्व कागदपत्रे, फलक, नोटीशी या कन्नडमधूनच असल्याने या तमाम मराठी भाषिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. आज त्यांची अवस्था ''ना घर का ना घाट का'' अशी झाली आहे.

मी सीमालगत भागाजवळील रहिवासी असल्याने आणि सीमाभागातील लोकांशी वेगवेगळ्या कारणांनी आलेल्या संबंधामुळे या लोकांचे समस्याग्रस्त जीवन जवळून अनुभवत आहे. स्वत: मलासुद्धा या सीमाप्रश्नाची झळ पोहचतच आहे. त्यामुळे कर्नाटक सरकारकडून या मराठी भाषिकांवर होणारे अन्याय, त्यांना भेडसावणाऱ्या सामाजिक समस्या यांचा संशोधनात्मक अभ्यास करण्याची दृष्टी मला सतत जागृत करत आहे. म्हणून मी संशोधनासाठी या विषयाची निवड केली आहे.

## ३.९ सैद्धांतिक मांडणी

समाजशास्त्र हे सामाजिक संबंधाचे वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारे शास्त्र म्हणून ओळखले जात असले तरी सामाजिक संबंधाची संकल्पना ही अतिशय क्लिष्ट व गुंतागुंतीची आहे. या सामाजिक संबंधाचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचा अनेक विचारवंतांनी प्रयत्न केलेला आहे. मानवी विश्वात अनेक बऱ्यावाईट घटना घडत असून त्याचे अनेक बरेवाईट परिणाम मानवावर होत असतात. निसर्ग नियमांनुसार घडणाऱ्या घटना वा घडामोडींची सत्यता वा वास्तवता शोधून काढण्याचा प्रयत्न जसा अनेक शास्त्रज्ञांनी व संशोधकांनी केला आहे तसा मानवी जीवनात घडणाऱ्या घटना वा घडामोडी, समस्यांची वास्तवता शोधून काढून मानवी जीवन अधिक सुलभ, सुखी, समृद्ध

व संपन्न करण्याचा प्रयत्न अनेक सामाजिक विचारवंत, समाजशास्त्रज्ञ व मानववंशशास्त्रज्ञांनी केला आहे. त्यासाठी अनेक समाजशास्त्रीय सिद्धांतांचे प्रतिपादन केले आहे. अशा सिद्धांतनिर्मितीच्या प्रक्रियेत संशोधनाच्या पद्धती, तंत्रे, तथ्य संकलनाचे विविध मार्ग, तथ्य विश्लेषणाच्या पद्धती इ. मध्ये सुधारणा करून सामाजिक सत्य वा वास्तवतेचा आशय विशद करणारी अनेक विधाने मांडली जाऊ लागली. अशा प्रकारच्या विधानांना मिळून ढोबळमानाने सैद्धांतिक विधाने किंवा शास्त्रीय विधाने अशी संज्ञा दिली जाते.

सामाजिक घटना, घडामोडी वा समस्येसंदर्भात जी तथ्ये संकलित करतो ती अनुभवाधिष्ठित असली पाहिजेत. किंबहुना शास्त्रीय ज्ञानाचा उगम हा मानवाच्या सामाजिक विश्वातून होत असतो असे मत जे. ए. थॉमसन यांनी 'Introduction to Science' या ग्रंथात नमूद केलेले आहे.[१९] पण असे असले तरी सामाजिकशास्त्रात अनुभवाधिष्ठित ज्ञानाला तर्कशुद्धतेची, बुद्धिप्रामान्यतेची व वस्तुनिष्ठतेची जेव्हा जोड दिली जाते तेव्हांच शाश्वत ज्ञानाची मांडणी करता येते असे थॉमसन यांचे मत आहे.

मानवी सामाजिक जीवनातील घटना, घडामोडी, समस्या व सामाजिक परिस्थितीविषयी वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करून सामाजिक वास्तवतेचा शोध घेण्याचा प्रयत्न ऑगस्त कॉम्त यांनी १८ व्या शतकात केला. त्यांच्या मते एकाच प्रकारच्या व विविध प्रकारच्या घटना अथवा समस्या विविध ठिकाणी जरी घडत असल्या तरी त्यापाठीमागची कारणे, त्यांच्या परिणामकारकतेची तीव्रता प्रत्येक काळातल्या समाजव्यवस्थेत भिन्न भिन्न असलेली दिसून येतात. कारण देश, काल व परिस्थितीनुरूप घटनांच्या स्वरूपात वैविध्यता आढळते. त्यासाठी समाजशास्त्रज्ञ, विचारवंत यांनी त्या घटना, समस्येबाबतची खरीखरी माहिती संकलित करून त्याचे विश्लेषण करून त्याबाबत सामाजिक वास्तवता शोधणे आणि अचूक सिद्धांताची निर्मिती करणे यावर भर दिला आहे. मानवी जीवनात घडणाऱ्या अशा विभिन्न घटनांचे स्वरूप, त्यातील भिन्नता, तीव्रता, परिणामकारकता जाणून घेऊन त्यांचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रात विविध सिद्धांत मांडले आहेत. समाजशास्त्रज्ञ टॉलकॉट पार्सन्स यांनी ''Essays on Sociological Theory" या ग्रंथात

अनुभवाच्या आधारावर एखाद्या स्वतंत्र व तार्किक संकल्पनांची केलेली मांडणी म्हणजेच सिद्धांत होय.''[२०]

समाजशास्त्रीय सिद्धांताबाबत कोणाही समाजशास्त्रज्ञांचे, मानववंशशास्त्रज्ञांचे व विचारवंताचे एकमत नाही किंवा एखादा सिद्धांत विशिष्ट सामाजिक घटना व समस्येचे वास्तव अध्ययन करण्यास परिपूर्ण आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे सामाजिकशास्त्रातील घटना, समस्यांचे स्वरूप, क्लिष्टता विचारात घेऊन काल, परिस्थिती संदर्भात त्या त्या घटनेवर, अनुभवावर संशोधनाच्या आधारे वस्तुनिष्ठ अभ्यास जाणून घेण्याचा प्रयत्न अनेक पाश्चात्य व आधुनिक विचारवंतानी केलेला दिसून येतो.

प्रस्तुत अभ्यासविषय हा ''बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या'' या विषयाशी संबंधित असून यामध्ये १९५६ पासून बेळगाव जिल्ह्यातील बेळगाव, खानापूर, चिक्कोडी, अथणी व हुक्केरी या पाच तालुक्यातील मराठी बहुभाषिक लोकांना भेडसावणाऱ्या विविध सामाजिक समस्या व त्याचे मानवी समाजावर होणारे परिणाम यावर संशोधनात्मक प्रकाश टाकण्यात आला असून तेथील मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्यांबाबत वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यासाठी विविध सैद्धांतिक दृष्टिकोन मांडण्यात आले आहेत.

### ३.९.१ सामाजिक समस्याविषयक सैद्धांतिक दृष्टिकोन

समाजशास्त्रीय अध्ययनात सामाजिक समस्यांविषयीचा एकमेव दृष्टिकोन आढळत नाही. कारण सामाजिक समस्यांचे जटिल स्वरूप, गुंतागुंत, क्लिष्ट सामाजिक संबंध लक्षात घेता सर्वच समस्यांचे विश्लेषण एकाच सिद्धांताच्या आधारे करणे शक्य नाही. त्यामुळे अशा सामाजिक समस्यांचे अध्ययन करण्यासाठी विविध दृष्टिकोन मांडण्यात आले आहेत. ते पुढीलप्रमाणे –

### १. सामाजिक विघटनात्मक दृष्टिकोन

सामाजिक विघटनातूनच सामाजिक समस्या निर्माण होतात यावर हा दृष्टिकोन भर देतो. हा दृष्टिकोन सर्वप्रथम डब्ल्यू. आय. थॉमस व फ्लोरेन झॅनिकी यांनी (द पोलीश पिझंट इन युरोप ॲन्ड अमेरिका) मांडला. इ. स. १९ व्या व २० व्या शतकात लोकसंख्येचे स्थलांतर, नगरांची वाढ

आणि कारखाना उत्पादन पद्धतीचा प्रसार या तीन कारणांमुळे युरोप व अमेरिकेत परंपरागत अशा समाजरचनेमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून आले. त्याचा परिणाम विविध सामाजिक समस्या निर्माण झाल्या.

मानव समाज हा परिवर्तनशील आहे. कोणत्या ना कोणत्या करणांने समाजात परिवर्तन घडून येते.त्यामुहे परिवर्तन हे प्रत्येक समाजाचे अविभाज्य अंग आहे. परिवर्तनामुळे समाजातील रूढी, परंपरा, विश्वास, आचार–विचार, सवयी आणि गरजा भागविण्याच्या पद्धती यामध्ये बदल होत नसून समाजपरत्वे त्यामध्ये असमानता आढळते. याचा परिणाम समाजव्यवस्थेवर होतो. आणि त्यातूनच सामाजिक विघटन घडून येते. असे असले तरी कोणताही समाज पूर्णपणे विघटित नसतो तर त्या समाजात संघटनही असते. संघटन म्हणजे समाजाच्या विविध भागामध्ये आणि कार्यामध्ये समन्वय, सातत्य आणि सजगता असणे होय. यासाठी समाजामध्ये प्रभावी कार्य करत असलेली नियमनात्मक व्यवस्था असली पाहिजे. यावरून एलियट व मेरिल यांनी सामाजिक संघटन म्हणजे ‘सामाजिक संबंधातील सुसंवाद’ असे म्हटले आहे. यासाठी सामाजिक नियमनांची व्यवस्था ही अत्यंत महत्त्वाची मानली जाते. नियमनांचे आत्मसातीकरण प्रत्येक व्यक्तिच्या व्यक्तिमत्वात, समाजीकरणाद्वारे केले असले पाहिजेत. पण ज्यावेळेला सदोष समाजीकरण घडून येऊन, सामाजिक नियमनांच्या पालनांचे महत्त्व कमी होते अशावेळी निर्माण होणारी परिस्थिती ही सामाजिक विघटनास पोषक ठरते. यासंदर्भात थॉमस आणि झॅनिकी यांनी म्हटले आहे की, ‘व्यक्ती किंवा समूहाच्या वर्तनावर नियंत्रण प्रस्थापित करणारी नियंत्रणात्मक व्यवस्था कमकुवत होणे किंवा मोडकळीस येणे म्हणजेच सामाजिक विघटन घडून येणे होय.’[२१]

सामाजिक विघटन हे समाजाच्या स्थैर्याला आणि विकासाला हानीकारक ठरते. तसेच समाजाचे घटक असलेल्या व्यक्ती, समूह, संस्था, संघटना यांच्याही कार्यक्षमतेला घातक ठरते व संबंधित घटकांकडून नियमनारूप वर्तन घडून येत नाही. परिणामी त्यातून वैयक्तिक, कौटुंबिक आणि समुदाय विघटनासारख्या समस्या निर्माण होतात. समाज अस्थिर बनतो, कायदा सुव्यवस्था खिळखिळी बनते. लोकांचा सामाजिक नियमनांवरचा विश्वास उडतो. त्यामुळे अशी परिस्थिती वेळीच

बदलून समाजामध्ये नव्याने संघटन प्रस्थापित करून समाज कार्यप्रवण ठेवणे अत्यावश्यक असते. त्यासाठी सामाजिक नियमनांची कठोर अंमलबजावणी करणे, त्यासाठी अचूक मार्गदर्शन करणे आणि प्रत्येक घटकांचे समाजीकरण घडवून आणून समाजाच्या विविध भागात योग्य तो समन्वये साधला गेला पाहिजे असे उपाय विघटनवादी दृष्टिकोनाच्या आधारावर सुचविले जातात.

## २. सामाजिक विकृतिशास्त्रीय दृष्टिकोन

जीवसृष्टीच्या उत्पत्ती व विकासाचे स्पष्टीकरण करणाऱ्या या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताचा प्रभाव हर्बर्ट स्पेन्सरसारख्या सामाजिक विचारवंतांवर पडला. स्पेन्सरने ही कल्पना समाजाला लागू करून जीवाप्रमाणे समाजाचा विकासदेखील साधेपणाकडून गुंतागुंतीकडे होत जातो असे मांडले. जीवशरीरामध्ये जशी विकृती संभवते तशीच ती समाजशरीरामध्येही संभवते असे मांडले आहे. मानवी शरीराला एखाद्या रोगाने किंवा विकृतीने पछाडले तर संपूर्ण शरीर ज्याप्रमाणे अकार्यक्षम बनते तसेच समाजरूपी शरीरालाही एखाद्या समस्येच्या रोगाने पछाडले तर त्याचा विपरीत परिणाम संपूर्ण मानव समाजाच्या कार्यक्षमतेवर होतो. समाजाच्या कार्यात बिघाड निर्माण होऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडते. समाजाच्या विकासाला अडथळा ठरतो. यावरून 'सामाजिक समस्या म्हणजे मानवी समाजाला जडणाऱ्या विकृति अथवा रोग आहेत' असे या दृष्टिकोनाच्या पुरस्कर्त्यांचे मत आहे.

या दृष्टिकोनामध्ये दोन विचारप्रवाह असून पुरातन विकृतिवादयांच्या मते, सामाजिक समस्या या विकृत अथवा रोगी व्यक्तींमुळे निर्माण होतात. त्यामुळे अशा व्यक्तिंना समाजापासून वेगळे ठेवले पाहिजेत. कारण तेच सामाजिक समस्यांना जबाबदार आहेत असे मानतात. तर आधुनिक विकृतिवादयांच्या मते, एकंदर समाजातील सामाजिक संस्थांच विकृत असून त्याला समाजातील व्यक्ती बळी पडतात. म्हणजे व्यक्तीचा जन्म, व्यक्तीचे संपूर्ण समाजीकरण ज्या कुटुंब, विवाह, शिक्षण, धर्म, अर्थ, राज्य इ. सारख्या सामाजिक संस्थामार्फत होत असते त्या संस्थाच जर विकृत असतील, व्यक्तीचे सुयोग्य समाजीकरण घडवून आणण्यात कमी पडत असतील, त्यांना मूल्यशिक्षण, सामाजिक नियमनांचे महत्त्व शिकवत नसतील तर अशा व्यक्ती विकृत अथवा रोगी बनणार, यासाठी म्हणून

संस्थांनीच कार्यक्षम राहिले पाहिजेत आणि अशा विकृत सामाजिक परिस्थितीपासून समाजाला अलिप्त ठेवले पाहिजेत असे मत मांडले.

## ३. मूल्य संघर्ष दृष्टिकोन

मूल्य संघर्ष दृष्टिकोनाचा प्रवर्तक म्हणून लॉरेन्स फ्रँक यांचा उल्लेख केला आहे. तसेच या दृष्टिकोनाचे विश्लेषण कार्ल मार्क्स, कोझर, माल्टुंग, डऱ्हेनडार्फ, सी. राईट मिल इ. समाजशास्त्रज्ञांनीही केले आहे. तर फुल्लर आणि मेयर्स यांनी या दृष्टिकोनाआधारे सामाजिक समस्या का निर्माण होतात? याचे सविस्तर विश्लेषण केले आहे. तर वॉल्स, क्यूबर आणि हार्पर यांनी सामाजिक समस्यांच्या उत्पत्ती आणि विकासामध्ये मूल्य संघर्षाचे विशेष महत्त्व असल्याचे मत मांडले आहे.

मूल्य संघर्षाच्या सिद्धांतानुसार प्रत्येक समाजामध्ये मूल्यांचे जतन करण्यासाठी व्यक्तींचा कलह चालू असतो. त्यामध्ये प्रत्येक व्यक्ती आपल्या विरोधी इतर व्यक्ती, समूह आणि नियमने यांच्या विरूद्ध उठते. त्यांचे नामोहरण करणे, त्यांच्यावर मात करणे यासाठी प्रयत्न करते. त्यातून अव्यवस्था निर्माण होते. जी सामाजिक समस्या निमिर्तीला पोषक ठरते.

प्रत्येक समाजाची एक मूल्यव्यवस्था असते. ती मूल्यव्यवस्था त्या त्या समाजाचा आधार असते. सामाजिक मूल्यांसंदर्भात इलियट आणि मेरिल यांनी, ''ज्यांना काही अर्थ आहे आणि जीवनाच्या योजनेत ज्यांना महत्त्वपूर्ण मानले जाते असे सामाजिक हेतू सामाजिक मूल्ये होत.''[२२]

मानवी सामाजिक जीवनात मूल्यांना फार महत्त्व आहे. मूल्ये ही जीवनव्यापक असतात. प्रत्येक व्यक्तीने समाजाचा सदस्य या नात्याने मूल्ये आत्मसात करावी लागतात. पण सर्वच समाजात सर्वच मूल्ये समान नसतात तर ती समाजपरत्वे भिन्न असतात. परंतु एखाद्या समाजातील मूल्ये ही त्या समाजातील, सर्व घटकांनी स्वीकारणे व त्या पद्धतीने वागणे हे मूल्यसंघर्ष टाळत समाज एकात्म, संघटित ठेवण्यासाठी योग्य असते. परंतु मूल्यसंघर्षाची कारणे ही दोन भिन्न गटातील मूल्यव्यवस्था यात आहेत. आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक विविधता यामध्ये समूहाची मूल्ये परस्परविरोधी असल्याने त्यातील संघर्षामुळे समस्या निर्माण होतात असे हा सिद्धांत मांडतो.

मूल्यसंघर्षामध्ये स्वत:चे हित, कल्याण पाहिले जाते. मूल्यसंघर्षामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा एक संभाव्य परिणाम म्हणजे विविध समूहात एकमेकांच्या विरोधात शत्रुत्व भावना आणि अनादर वाढणे, आणि एखाद्या समाजात नागरी मूल्यसदृश्य परिस्थिती निर्माण होऊ शकते. तर दुसरा परिणाम म्हणजे जो समूह सर्वात शक्तीशाली असतो तो दुसऱ्या समूहावर पूर्ण प्रभुत्व प्रस्थापित करून आपली मूल्ये टिकवून ठेवण्यात यशस्वी होऊ शकतो. म्हणजेच आपल्या समूहाचे हितसंबंध अबाधित ठेवू शकतो. मूल्यसंघर्षामध्ये सामाजिक संबंध संघर्षात्मक बनले की तो विरोध जाणीवपूर्वक टिकवून धरला जातो. समूहा–समूहांतील संपर्क आणि स्वार्थासाठी चाललेली स्पर्धा यातून संघर्ष उद्‌भवतात. आणि अशा संघर्षाचे परिणाम व्यक्ती, समूह, संस्था, संघटना वा समाज यावर भयानक असतात. अशावेळी कोणती मूल्ये संघर्षामध्ये टिकून राहतील हे सांगता येत नाही. काहीवेळा उच्चप्रतीचे आदर्शही विरोधी मूल्यांच्या दडपणाखाली धुळीस मिळू शकतात. तर दुर्बल घटकांचा नाश होऊ शकतो. जाती–जातीतील संघर्ष, आर्थिक संघर्ष वा भाषिक संघर्ष इ. या पुरस्कर्त्यांच्या मते मूल्यसंघर्षातून मार्ग काढण्यासाठी दोन्ही बाजूनी स्वत:ची मूल्ये किंवा हितसंबंध काही प्रमाणात बाजूला सारून दोघांनाही मान्य असणारी मूल्ये स्वीकारून मतैक्य करणे, दोन्ही बाजूंनी देवाण–घेवाणीच्या मार्गाने तडजोड घडवून आणणे आणि अधिक बाजूने दुसऱ्या बाजूवर वर्चस्व स्थापन करून तिच्यावर आपली मूल्ये लादणे अशा अनेक व्यापक समस्यांचे व सामाजिक प्रक्रियांचे स्पष्टीकरण या दृष्टिकोनानुसार केले जाते.

### ४. **प्रमाणकशून्यता**

या दृष्टिकोनाचे विश्लेषण हेगेल आणि मार्क्स यांनी वेगवेगळ्या संदर्भात करण्याचा प्रयत्न केला असला तरी समाजशास्त्रात ही संकल्पना दृढ करण्याचे श्रेय इमाईल दुर्खीम यांना दयावे लागेल. दुर्खीम यांनी "The Suicide" या ग्रंथात ‘प्रमाणकशून्यता’ ही संकल्पना सर्वप्रथम मांडली. त्यानंतर या संकल्पनेचा वापर समाजशास्त्रीय अध्ययनात रॉबर्ट मर्टन, पार्सन्स यांनी केला आहे.

या दृष्टिकोनामध्ये दुर्खीम म्हणतो की, प्रमाणकशून्यतेचे कारण समाज आहे. कारण एक सामाजिक प्राणी म्हणून व्यक्तींच्या विविध आवश्यकतांची पूर्ती समाजाने केली पाहिजेत. ती जर होत नसेल तर व्यक्तींमध्ये निराशा, असंतोष, बदला घेण्याची भावना निर्माण होते आणि त्यातूनच समाजमान्य प्रमाणके, मूल्ये, आदर्श यांचा स्विकार करण्यास व्यक्ती नकार देते. त्यामुळे त्यांच्या वर्तनात विसंगती निर्माण होऊन आदर्श प्रमाणकांचा भंग होतो व प्रमाणकशून्यतेची स्थिती निर्माण होऊन ती स्थिती सामाजिक समस्या निर्मितीस कारणीभूत ठरते.

रॉबर्ट मर्टन यांनी 'Social Structure and Anomie' यामध्ये प्रमाणकशून्यता म्हणजे प्रमाणकांना लक्षात न घेता केलेले वर्तन असे म्हटले आहे. म्हणजे प्रत्येक समाजात प्रमाणके असतात. त्या प्रमाणकांनुसार प्रत्येक व्यक्तीने वर्तन केले पाहिजे याची प्रत्येकाला जाणीव असूनदेखील व्यक्ती प्रमाणकविरोधी वर्तन करत असेल तर त्यामुळे प्रमाणकशून्यता निर्माण होते. याचा परिणाम आत्महत्या, मद्यपान, भ्रष्टाचार इ. सारख्या सामाजिक समस्या निर्माण होतात.

समाजातील व्यक्तिंच्या आवश्यकतांची पूर्ती करण्यासाठी वा सांस्कृतिक साध्ये पूर्ण करण्यासाठी जर संस्थागत प्रमाणके अपुरी पडत असतील तर व्यक्ती इच्छित उद्दिष्टपूर्तीसाठी स्वत:च्या इच्छेनुसार वर्तन करतात. तेव्हा त्यांच्या हातून प्रमाणक व्यवस्थेचा पूर्णत: भंग होतो. त्यातूनच अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. असे या पुरस्कर्त्यांचे मत आहे तर रूबिंग्टन व बेईनबर्ग यांनीही ‘प्रमाणकशून्यतेचा दृष्टिकोन अनेक सामाजिक समस्यांना स्पष्ट करणारा आहे’ असे मत मांडले आहे.

### ५. लेबलिंग दृष्टिकोन

हा दृष्टिकोन १९६० नंतर विकसित झाला असून याचे श्रेय प्रामुख्याने हॉवर्ड बेकर यांना दिले जाते. त्याचबरोबर एडवीन लेमर्ट आणि एडविन श्यूर यांनीही या दृष्टिकोनाच्या विकासात महत्त्वाचे योगदान दिले आहे. हा दृष्टिकोन सामाजिक परिस्थितीच्या वस्तुनिष्ठतेऐवजी व्यक्तिनिष्ठेतेवर भर देणारा आहे. म्हणजेच प्रत्यक्ष वस्तुस्थिती विचारात न घेता एखाद्या व्यक्तिकडून एखाद्या परिस्थितीला ‘वाईट’ अथवा ‘अवांछनीय’ असे लेबल चिकटविले जाते. त्यामुळे ती परिस्थिती

सामाजिक समस्या बनते. एवढेच नव्हेतर एखाद्या व्यक्तिलासुद्धा असे लेबल चिकटविले जाते. त्यामुळे ती व्यक्ती समस्याग्रस्त होते.

एखादी विशिष्ट परिस्थिती ही मुळातच सामाजिक समस्या नसतानाही काही लोकांनी त्या परिस्थितीला चिकटविलेले ते लेबल असते. त्याचप्रमाणे व्यक्तीच्या मूळ वर्तनामुळे नव्हे तर त्यांना 'विचलनात्मक वर्तन करणाऱ्या व्यक्ती' असे लेबल चिकटविले जाऊन त्या व्यक्ती समस्याग्रस्त बनतात. असे लेबल म्हणजे शिक्काच असतो. असे लेबल चिकटविल्यामुळे संबंधित व्यक्तीवर काय परिणाम होतो हे जाणून घेण्यास या दृष्टिकोनाच्या पुरस्कर्त्यांना अधिक रस असतो. लेबल चिकटविले जाणे म्हणजे एक प्रकारचा 'सामाजिक कलंकच' लागणे होय. यामुळे व्यक्तीकडून विचलनात्मक जीवनमार्गच स्वीकारला जाण्याची शक्यता असते. त्याचबरोबर लेबल चिकटविले जाते तेव्हाचे आणि लेबल चिकटविल्यानंतरचे व्यक्तीचे वर्तन हे अनुक्रमे प्राथमिक विचलन आणि दुय्यम विचलन म्हणून ओळखले जाते. एकदा लेबल चिकटले की व्यक्तीचा तोच जीवनमार्ग बनून विचलनात्मक प्रवृत्तींची वाढ होत जाते. अशा व्यक्तींशी लोक तुटकपणे वा फटकून वागतात. त्यांना अलग पाडतात. त्यामुळे अशा व्यक्तींच्या 'स्व' संकल्पनेवरही प्रतिकूल परिणाम घडून येतात. जॉर्ज हर्बर्ट मीड यांनी 'Mind, Self & Society' या ग्रंथामध्ये विचार हा सामाजिक आणि उपयुक्ततावादी यांची प्रक्रिया असून दोन व्यक्तिंच्या समस्या सोडविण्याच्या चर्चेवरती आधारीत आहे.[२३] प्रामुख्याने मीडची 'स्व' ही मुख्य संकल्पना आहे. त्यांच्या मते, एखाद्याचे व्यक्तिमत्व हे स्व–जागृती आणि स्व–प्रतिमा यामधून विकसित होते. आपली प्रतिमाही आपल्याविषयी इतरांच्या प्रतिक्रिया काय आहेत यावरती अवलंबून असते किंवा तशी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न एखादी व्यक्ती करीत असते. तर फ्रँक टॅननबॉम यांना लेबल सिद्धांताचा जनक संबोधले जाते. त्यांच्या 'Crime & Community' या ग्रंथात सामाजिक आंतरक्रिया ही गुन्हेगारीमध्ये समाविष्ट आहे आणि तोच खऱ्या अर्थाने आधुनिक गुन्हेगारीचा मुख्य पाया आहे याचे वर्णन केले आहे. त्यांनी पहिल्यांदाच 'टॅगिंग' ची संकल्पना मांडून अपराधी तरूणांचा अभ्यास करताना त्यांना असे दिसून आले की, एखाद्याविषयी नकारात्मक शिक्का (लेबल) हा त्या व्यक्तीस कायमस्वरूपी अपराध करण्यास सतत गुंतवत असतो हा आंतरिक शिक्काच

त्या व्यक्तीच्या प्रतिमेचा/ओळखीचा एक भाग बनतो. त्याचा परिणाम विचलनात्मक वर्तनाचे प्रमाण वाढत जाऊन सामाजिक समस्या निर्माण होतात असे हा दृष्टिकोन सांगतो.

### ३.९.२ प्रस्तुत अध्ययनासाठी लेबलिंग दृष्टिकोनाची उपयुक्तता

'बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या' या अध्ययनामध्ये ग्रामीण मराठी भाषिकांना ज्या अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते आहे ते केवळ मराठी भाषिक म्हणून. लेबलिंग दृष्टिकोन पुरस्कर्त्यांच्या मतानुसार हा दृष्टिकोन वस्तुनिष्ठतेवर भर देणारा नसून व्यक्तिनिष्ठ स्वरूपाचा आहे. गेली ५८ वर्षे या भागातील मराठी भाषिक लोक महाराष्ट्र राज्यात जाण्यासाठी लोकशाही मार्गाने लढत आहेत. त्यासाठी सत्याग्रह, आंदोलने, मोर्चे इ. मार्गांचा अवलंब करताना दिसून येतात. पण कर्नाटक सरकारने या मराठी भाषिकांच्या भावनांचा, मतांचा, त्यांच्या हक्कांचा विचार न करता केवळ मराठी भाषिक म्हणून लेबल लावून त्यांना 'वाईट' अथवा 'अवांच्छनीय' संबोधले. एवढ्यावरच न थांबता त्यांच्यावर या ना त्या प्रकारे अन्याय, अत्याचार सुरु करून त्यांची मराठी भाषा, अस्मिता, मराठी संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. त्यांच्यावरती खोट्या केसेस दाखल करून त्यांना 'गुन्हेगार' म्हणून लेबल चिकटविले जात आहे.

कर्नाटक सरकारने आजपर्यंतच्या ५८ वर्षांच्या काळात मराठी भाषिकांवर या ना त्या कारणाने जे अन्याय, अत्याचार केलेत त्यामध्ये त्यांना अल्पसंख्याक म्हणून असलेले हक्क, अधिकारही हिरावून घेतलेत. तसेच प्राथमिक शाळेपासून कन्नडसक्ती, त्यांना हिंदी या राष्ट्रीय भाषेपासून वंचित ठेवले, त्यांच्या पाठ्यपुस्तकातून महाराष्ट्रीयन संस्कृतीची ओळख करून देणारा अभ्यासक्रम काढून टाकला, पुस्तकातील राष्ट्रगीतसुद्धा कन्नडमधून छापले गेले. त्याचे हक्काचे रेशनकार्ड तसेच जमिनीचे ७/१२, ८अ, डायरी उतारा इ. मालमत्तेसंबंधीच्या कागदपत्रांचे कानडीकरण केले तर स्थानिक स्वराज्य संस्थामधील कागदपत्रेही कन्नडमध्येच ठेवून बहुसंख्येने मराठी भाषिक असलेल्या या सीमाभागात कर्नाटक सरकारने आपल्या सत्ता, अधिकाराच्या जोरावर या मराठी अल्पसंख्याकांना वाईट ठरविले. १९५६ पासून आजपर्यंत विविध घटनांत मग तो 'काळा दिन' असू देत, येळ्ळूरचा साराबंदी लढा असू देत, महाजन अहवाल विरोधातील सत्याग्रह असू देत

वा १ जून १९८६ ची कन्नडसक्ती असू देत, लोकप्रतिनिधींवरील हल्ला असू देत, अशावेळी मराठी भाषिकांवरती असे लेबल चिकटवून त्यांना विविध गुन्ह्यांखाली अटक करण्यात आली. बेछूट गोळीबार करण्यात आले, लाथाबुक्क्यांनी, काठीने मारहाण करण्यात आली, त्यामध्ये अनेकांना हौतात्म्य पत्करावे लागले, अनेकजण कायमचे अधू झाले, तर अनेक माता–भगिनींना वैधव्य पत्करावे लागले, इतकेच नव्हेतर अनेक मुले लहानपणीच पोरकी झाली. त्यामुळे मराठी भाषिक जनता एवढ्या हालअपेष्टा सहन करूनही, कर्नाटक सरकारचे अन्याय, अत्याचार झेलत आजही आम्ही 'गुन्हेगार' नाही 'वाईट', 'अवांच्छनीय' नाही हे पटवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेच शाळा, महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतेवेळी केवळ मराठी भाषिक या शिक्क्यामुळे त्यांचा प्रवेश नाकारणे, नोकरीच्या ठिकाणी डावलणे, पदोन्नती न देणे, दवाखाना, पोलीस कचेरी इ. ठिकाणी त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे, त्याचबरोबर केवळ मराठी भाषिक म्हणून त्यांच्या जमिनी संपादन करणे इ. प्रकारचे अन्याय कर्नाटक सरकारकडून केवळ मराठी भाषिकांवरच केले जात आहेत. त्यामुळे याचा परिणाम मीडच्या मताप्रमाणे त्यांच्या 'स्व' संकल्पनेवर प्रतिकूल स्वरूपाचा होत असल्याचे दिसून येतो. तर त्यांच्यावरील या शिक्क्याचा परिणाम कर्नाटक सरकारकडून त्यांना मिळणाऱ्या हक्क, अधिकार व सवलतीपासून वंचित ठेवण्यात येत आहे. परिणामी संबंधित व्यक्तिंची ओळख ही त्यावरूनच ठरत असलेली दिसून येते. गेली ५८ वर्षे आम्ही केवळ लोकशाही मार्गाने लढत आहे ते केवळ आमच्या हक्काच्या मराठी महाराष्ट्र मातृभूमीत जाण्यासाठी. कारण १९५६ ला राज्यपुनर्रचना आयोगाने चुकीच्या पद्धतीने आमचा मराठी भाषिकांचा भूप्रदेश त्यावेळच्या म्हैसूर (कर्नाटक) राज्यात घातला व आमच्यावर अन्याय केला. तो अन्याय दूर करून आम्हा मराठी भाषिकांना महाराष्ट्रात समाविष्ट करून आम्हाला न्याय दयावा यासाठी आम्ही कोणताही अपराध केला नाही वा गुन्हा केला नाही. उलट आम्हालाच गुन्हेगार ठरविले आहे.

यावरून या अध्ययन क्षेत्रातील मराठी भाषिकांवरील लेबल जर असेच राहिले तर संबंधित घटकांकडून विचलनात्मक वर्तन घडून येऊन ती परिस्थिती सामाजिक समस्या निर्मितीस पोषक ठरेल. असे होऊ न देता समाजामध्ये संघटन प्रस्थापित होण्यासाठी कर्नाटक सरकार व मराठी

भाषिक यांच्यात तडजोड होऊन अल्पसंख्याक म्हणून त्यांचे असणारे हक्क, अधिकार यांचे संरक्षण झाले तर या मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्यांची तीव्रता कमी होण्यास मदत होईल.

## ३.१० संशोधनाचे महत्त्व

'बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या' या विषयावरील संशोधनातून सीमाप्रश्नाच्या लढ्याला अधिक बळकटी मिळण्यास मदत होणार आहे. आज कर्नाटक शासनाचे धोरण सीमाभागातील मराठी बांधवांना अन्यायकारक ठरत आहे. मराठी भाषिकांना अनेक आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इ. समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या सीमाप्रश्नाचे दूरगामी परिणाम येथील लहान बालकांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील आणि सर्वच थरातील घटकांना सोसावे लागत आहेत.

प्रस्तुत विषयावरील संशोधनाने सीमाभागातील मराठी भाषिकांना ज्या अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे त्या समस्यांवर संशोधनात्मक प्रकाश टाकल्याने त्या समस्यांची कारणमीमांसा व जनजागृती होण्यास मदत होणार आहे. या ग्रामीण मराठी भाषिकांच्या संस्कृतीविषयीची जवळीकता अभ्यासणे, मराठी लोकांची भाषिक अस्मिता जागवणे, संपूर्ण सीमाभागातील मराठी भाषिकांना एकत्र आणून या सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी कृती करणे, पावले उचलणे, तसेच महाराष्ट्र एकीकरण समिती जी या सीमाप्रश्नाच्या सोडवणुकीसाठी सतत प्रयत्नशील आहे, कर्नाटक शासनाच्या अन्यायी धोरणाला आंदोलने, निषेध, उपोषणे, रास्ता रोको इ. लोकशाही मार्गाने विरोध करते आहे या समितीला नव्याने बळकटी देण्यासाठी या संशोधनाची मदत होणार आहे.

तसेच सीमाप्रश्नावर अभ्यास करणारे संशोधक, तज्ज्ञ, विचारवंत, राजकीय नेते, मताधिकारी, संस्था, संघटना, शासन, विद्यार्थी व वाचक या सर्वांना या संशोधनाचा उपयोग होणार आहे.

## ३.११ संशोधनाची उद्दिष्ट्ये

कोणत्याही विषयावर संशोधन करताना त्या विषयावरील संशोधनात्मक उद्दिष्ट्ये समोर ठेवूनच संशोधन करावे लागते. संशोधनामध्ये उद्दिष्टांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. उद्दिष्ट्ये ही त्या संशोधनाचा केंद्रबिंदू असतो. उद्दिष्टाशिवाय संशोधनाची दिशा आणि मार्ग निश्चित होणार नाही. 'बेळगाव जिल्ह्यातील मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या' या विषयाच्या अनुषंगाने शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यासाठी पुढील उद्दिष्ट्ये मांडण्यात आली आहेत.

१. बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या जीवनाचा अभ्यास करणे.

२. ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.

३. कर्नाटक शासनाच्या धोरणांचा मराठी भाषिकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

४. ग्रामीण मराठी भाषिकांच्या राजकीय, सामाजिक प्रभावाचा अभ्यास करणे.

## ३.१२ संशोधनाची गृहितके

वैज्ञानिक अभ्यास पद्धतीतील एक अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजेच गृहितकृत्य होय. यालाच परिकल्पना, उपकल्पना, अभ्युपगम असेही म्हणतात. संशोधन समस्येबाबत प्राथमिक स्वरूपाचे पूर्वज्ञान व अनुभव संशोधनकर्त्याला असतो. त्याच्या आधारावर संशोधन समस्येच्या विविध पैलूंच्या संबंधात एक सामान्य अनुमान काढले जाते. याचाच अर्थ संशोधन समस्यांच्या संदर्भात उत्तरे किंवा अनुमान विषयाच्या स्वरूपात मांडले जाते. या संभाव्य उत्तरे व अनुमानामुळे संशोधनकर्ता आपले लक्ष काही निश्चित व आवश्यक तथ्यांवरच केंद्रित करतो. त्यामुळे संशोधनाला एक निश्चित दिशा प्राप्त होते. या संभाव्य उत्तरे किंवा अनुमानासच गृहितकृत्ये किंवा उपकल्पना असे म्हणतात. गृहितकृत्यामुळे संशोधनाला आवश्यक असणारी कोणती तथ्ये संकलित केली पाहिजेत याविषयीची निश्चितता प्राप्त होते. त्यामुळे संशोधनकर्ता इतरत्र भटकत नाही.

एफ. जे. मेक्गुइगन – दोन किंवा अधिक चलांच्या कार्यक्षम संबंधाचे परीक्षण योग्य विधान म्हणजे गृहीतकृत्य होय.[२४]

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहितके मांडली आहेत.

१. बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांना महाराष्ट्रीयन जीवनपद्धतीविषयी जवळीकता वाटते.

२. बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांना अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते.

३. कर्नाटक शासनाचे धोरण मराठी भाषिकांवर अन्यायकारक आहे.

४. बेळगाव जिल्ह्यातील मराठी भाषिकांचा प्रभाव स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आहे.

## ३.१३ संशोधन पद्धती

सामाजिक संशोधनात निवड केलेल्या विषयावर संशोधन करून वस्तुनिष्ठ माहिती संकलित करण्यासाठी योग्य संशोधन पद्धती निवडणे हे सर्वात कठीण काम असते. ही निवड अचूक व योग्यच करावी लागते. कारण हा प्रत्येक संशोधनाचा कणा असतो. त्यासाठी पुढील संशोधन पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे.

१. निरीक्षण पद्धती

२. अनुसूची

३. नमुना निवड

४. मुलाखत

५. सांख्यिकी पद्धती

## ३.१४ नमुना निवड

सामाजिक विज्ञानात लोकसंख्येच्या अध्ययनाच्या पॅरामेट्रीक पद्धती आणि नॉनपॅरामेट्रीक पद्धती या दोन पद्धती आहेत. पॅरामेट्रीक पद्धती म्हणजे ज्याद्वारे संपूर्ण समुह किंवा लोकसंख्या यांना परिक्षणाचे क्षेत्र मानून संशोधन व सर्वेक्षण केले जाते. तर नॉनपॅरामेट्रीक पद्धतीमध्ये संपूर्ण लोकसंख्येमधून एका विशिष्ट प्रातिनिधिक समुहाची निवड करून त्याचे अध्ययन केले जाते.

नॉनपॅरामेट्रीक पद्धतीद्वारे करण्यात आलेले अध्ययन सरळ, विश्वसनीय आणि कमी खर्चाचे असते. 'नमुना' हा या नॉनपॅरामेट्रीक पद्धतीचा आधार आहे. 'नमुना' हा 'विश्व' किंवा समग्रातून निवडण्यात आलेला भाग असतो.[२५] विश्व किंवा समग्रातील प्रत्येक घटकाचा अभ्यास न करता त्यातून काही विशिष्ट घटकांची प्रातिनिधिक स्वरूपात निवड केली आहे. ही निवड करताना विविधता ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. माहिती संकलन करताना वेगवेगळ्या समूहांचे प्रतिनिधित्व करणारे गट विचारात घेऊन माहिती संकलित केली आहे. संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करून विशिष्ट गटाद्वारे प्राप्त झालेले निष्कर्ष संपूर्ण समाजाला लागू केले जातात. यालाच नमुना निवड पद्धती असे म्हणतात. यामुळे संशोधकाचा वेळ, श्रम व पैसा यांची बचत होऊन निवडक घटकांशी पुरेसा वेळ देऊन सखोल व परिपूर्ण माहिती संकलित करतो.

खेडे हा घटक, भौगोलिक संलग्नता, सापेक्ष बहुमत आणि जनतेची इच्छा या तत्त्वांच्या आधारावर महाराष्ट्र शासनाने हक्क सांगितलेले कर्नाटक राज्यातील बेळगाव, कारवार, बिदर व गुलबर्गा या जिल्ह्यातील १६ नगरे व ८६५ खेडी यांची मागणी केली आहे. बेळगाव जिल्ह्यात एकूण १० तालुके असून संशोधन विषयाच्या अनुषंगाने मराठी बहुसंख्याक असलेले पाच तालुके निवडून प्रत्येक तालुक्यातून १० टक्के प्रमाणे मराठी भाषिक खेडी पुढीलप्रमाणे निवडण्यात आली आहेत.

**सारणी क्रमांक ३.१**

**निवडलेली खेडी**

| अ. नं. | निवडलेले तालुके | एकूण मराठी भाषिक खेडी | निवडलेली खेडी (साधा यादृच्छिक नमुना निवड १०% प्रमाणे) | निवडलेली घटक संख्या (सोयीस्कर असंभाव्यता नमुना निवड १०% प्रमाणे) |
|---|---|---|---|---|
| १ | खानापूर | २०४ | २१ | २१० |
| २ | बेळगाव | ६८ | ७ | ७० |
| ३ | चिक्कोडी | ३८ | ४ | ४० |
| ४ | हुक्केरी | १८ | २ | २० |
| ५ | अथणी | १० | १ | १० |
| | एकूण | ३३८ | ३५ | ३५० |

वरीलप्रमाणे साधा यादृच्छिक नमुना निवडीतील लॉटरी पद्धतीचा वापर करून एकूण ३३८ खेड्यांपैकी ३५ खेडी साधा यादृच्छिक नमुना निवडीच्या आधारे नमुना म्हणून निवडण्यात आली. निवडलेल्या प्रत्येक खेड्यातून सोयीस्कर असंभाव्यता नमुना निवडीच्या आधारे १० टक्के अशी एकूण ३५० घटक संख्या निवडून त्यांना प्रत्यक्ष भेटून त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून मुलाखत अनुसूची, निरीक्षण या प्राथमिक तंत्राचा वापर करून वस्तुनिष्ठ माहिती संकलित करण्यात आली. त्यासाठी काही (स्थिर) घटक माहितीचे आधार म्हणून निश्चित केले. त्यामध्ये गाव, तालुका, वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय, मासिक उत्पन्न इ.

नमुना म्हणून जी ३५ गावे/खेडी निवडण्यात आली ती १९५१ च्या जनगणनेनुसार तालुकानिहाय पुढीलप्रमाणे –

**सारणी क्रमांक ३.२**

**निवडलेली गावे**

| अ. नं. | तालुका | निवड केलेल्या गावाचे नांव | निवड केलेली घटक संख्या |
|---|---|---|---|
| १ | खानापूर | कापोली | १० |
| | | देवराई | १० |
| | | हलशी | १० |
| | | कुंभाडी | १० |
| | | संगरगाळी | १० |
| | | गोसे | १० |
| | | शिदोंळी | १० |
| | | नागरगाळी | १० |
| | | हलगा | १० |
| | | हलसाल | १० |
| | | पडलवाडी | १० |
| | | माचीगड | १० |

| अ. नं. | तालुका | निवड केलेल्या गावाचे नांव | निवड केलेली घटक संख्या |
|---|---|---|---|
| १ | खानापूर | कामतगा | १० |
| | | माईगुंजी | १० |
| | | तोराली | १० |
| | | इदलहोंड | १० |
| | | हलकर्णी | १० |
| | | गोडोली | १० |
| | | सिवोली | १० |
| | | बेकवाड | १० |
| | | हुबटगेरी | १० |
| | | **एकूण** | **२१०** |
| २ | बेळगाव | हंदिगनूर | १० |
| | | तुरमुरी | १० |
| | | हिंडलगा | १० |
| | | बेकिनकेरे | १० |
| | | मन्नूर | १० |
| | | सुळगा | १० |
| | | कंग्राळी | १० |
| | | **एकूण** | **७०** |
| ३ | चिक्कोडी | अकोल | १० |
| | | बेनाडी | १० |
| | | बुदिहाल | १० |
| | | हंचीनाल–के–सावगाव | १० |
| | | **एकूण** | **४०** |
| ४ | हुक्केरी | सलामवाडी | १० |
| | | शिप्पूर | १० |
| | | **एकूण** | **२०** |
| ५ | अथणी | उगारखुर्द | १० |
| | | **एकूण** | **१०** |

## ३.१५ पूर्वचाचणी

मुलाखत अनुसूचीद्वारे उत्तरदात्याकडून जी अनुसूची भरून घेतली आहे तिची पूर्वचाचणी बेळगाव तालुक्यातील बेकिनकेरे व हुक्केरी तालुक्यातील मोदगे या दोन गावातील २० लोकांकडून भरून घेतली. त्या चाचणीमध्ये आलेल्या अडचणी व उणिवा याबाबत मार्गदर्शक, तज्ज्ञ लोकांशी विचारविनिमय करून परिपूर्ण अशी नव्याने अनुसूची तयार करण्यात आली आणि निवडलेल्या घटकांकडून ती भरून घेण्यात आली.

## ३.१६ घटक निवड

''बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या'' या संशोधन विषयाला अनुसरून घटक निवडून माहिती संकलित करण्यासाठी मुलाखत अनुसूची या प्राथमिक तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे. त्यासाठी तालुका, वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय, मासिक उत्पन्न इ. निकषांच्या आधारे सोयीस्कर नमुना निवडीने माहिती संकलित केलेली आहे. यासाठी संशोधकाने मार्गदर्शकाच्या साहाय्याने पुढीलप्रमाणे घटक निवड केली आहे.

### १. वयोगट नमुना निवड

**सारणी क्रमांक ३.३**

**वयोगट नमुना निवड**

| अ. नं. | वयोगट | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १८ ते २५ | ५८ | १६.५७ |
| २ | २६ ते ३५ | ६४ | १८.२८ |
| ३ | ३६ ते ५० | ८६ | २४.५८ |
| ४ | ५१ ते ६५ | ९८ | २८.०० |
| ५ | ६६ ते पुढे | ४४ | १२.५७ |
| | एकूण | ३५० | १०० |

२. लिंग गट नमुना निवड

सारणी क्रमांक ३.४

लिंग गट नमुना निवड

| अ. नं. | लिंग | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पुरुष | २१० | ६० |
| २ | स्त्रिया | १४० | ४० |
| | एकूण | ३५० | १०० |

३. शिक्षण गट नमुना निवड

सारणी क्रमांक ३.५

शिक्षण गट नमुना निवड

| अ. नं. | शिक्षण गट | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | निरक्षर | ११ | ३.१५ |
| २ | प्राथमिक | ८३ | २३.७१ |
| ३ | माध्यमिक व उच्च माध्यमिक | १६७ | ४७.७२ |
| ४ | पदवी व पदव्युत्तर | ६३ | १८.०० |
| ५ | व्यावसायिक | २६ | ७.४२ |
| | एकूण | ३५० | १०० |

४. व्यवसाय गट नमुना निवड

सारणी क्रमांक ३.६

व्यवसाय गट नमुना निवड

| अ. नं. | व्यवसाय | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शेती | ९६ | २७.४२ |
| २ | नोकरी (सरकारी) | ६१ | १७.४२ |
| ३ | खाजगी नोकरी | ७३ | २०.८५ |
| ४ | धंदा | ३३ | ६.५७ |
| ५ | बेरोजगार | ८७ | २७.७४ |
| | एकूण | ३५० | १०० |

५. मासिकउत्पन्न गट नमुना निवड

सारणी क्रमांक ३.७

मासिकउत्पन्न गट नमुना निवड

| अ. नं. | मासिक उत्पन्न (रुपये) | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ३००० | ४० | ११.४२ |
| २ | ३००१ ते ६००० | १०२ | २९.१५ |
| ३ | ६००१ ते १२००० | ७२ | २०.५८ |
| ४ | १२००१ ते १८००० | ७८ | २२.२८ |
| ५ | १८००१ ते पुढे | ५८ | १६.५७ |
| | एकूण | ३५० | १०० |

## ३.१७ तथ्य संकलन

सामाजिक संशोधनात सामाजिक घटनांचे वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन केले जाते. वैज्ञानिक पद्धतीचे उद्दिष्ट्य कोणत्याही घटनेच्या बाबतीत सत्य शोधून काढणे हेच असते. सत्य शोधून काढण्यासाठी त्या घटनेशी संबंधित असलेल्या वास्तविक तथ्यांचे संकलन करणे आवश्यक असते. तथ्य संकलन ही वैज्ञानिक पद्धतीची पहिली व महत्त्वाची अट मानली जाते. कारण अभ्यास विषयासंबंधीचा निष्कर्ष अधिक वस्तुनिष्ठ व सामान्य होण्यासाठी तथ्यांचा आधार घ्यावाच लागतो. सामाजिक संशोधनात अनुभवजन्य तथ्ये संकलित करावी लागतात व त्यांच्याच आधारावर निष्कर्षांचे प्रतिपादन केले जाते. त्यासाठी उपयोगात आणली जाणारी सर्व साधने तांत्रिक असतात. सामाजिक संशोधनाचे यशापयश हे तथ्य संकलन साधनांच्या विश्वसनियतेवरसुद्धा अवलंबून असते. म्हणूनच तथ्य संकलन हे संशोधन कार्यातील एक महत्त्वाचे व प्राथमिक कार्य आहे.[२६]

ढोबळमानाने तथ्य संकलन पद्धतीचे दोन विभागात विभाजन केले जाते.

### ३.१७.१ प्राथमिक सामग्री

जेव्हा संशोधक हा संशोधनासाठी लागणारी माहिती संबंधित व्यक्तिंच्या मुलाखती घेऊन प्रश्नावलीच्या स्वरूपात प्राप्त करतो अशा माहितीस प्राथमिक स्त्रोताद्वारे माहितीचे संकलन असे म्हणतात. ही माहिती संशोधक मुलाखत, निरीक्षण, अनुसूची, प्रश्नावली या पद्धतीद्वारे प्राप्त करतो. संशोधकाने या स्त्रोताद्वारे संकलित केलेल्या माहितीस First hand information असेही म्हणतात. कारण ही माहिती संशोधक स्वत: संकलित करत असतो.[२७]

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुढील प्राथमिक सामग्रीच्या आधारे माहिती संकलित केली.

#### ३.१७.१.१ सहभागी निरीक्षण

अध्ययन क्षेत्रामध्ये सीमाबांधवाकडून होणारी मराठी साहित्य संमेलने, सीमा मेळावे, सीमा परिषदा, आंदोलने, मोर्चे, काळा दिन, रास्ता रोको इ. लढ्याबाबतची माहिती स्वत: सहभागी निरीक्षणाच्या माध्यमातून संकलित केली आहेत.

#### ३.१७.१.२ मुलाखत अनुसूची

संशोधन विषयासंदर्भात आवश्यक असणारी माहिती मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून अध्ययनक्षेत्रातील २१० पुरुष व १४० महिलांकडून स्वत: संशोधकाने संकलित केली आहे.

#### ३.१७.१.३ अनौपचारिक चर्चा

अध्ययन विषयाच्या अनुषंगाने संशाधकाला हवी असलेली माहिती संकलित करण्यासाठी अध्ययन विषयाशी संबंधित व्यक्ती, अधिकारी, नेते, माजी आमदार, माजी महापौर, महाराष्ट्र एकीकरण समितीचे पदाधिकारी इ. कडून संकलित करण्यात आली आहे.

#### ३.१७.१.४ असहभागी निरीक्षण

सीमाप्रश्नासंदर्भात वेळोवेळी झालेले मोर्चे, सत्याग्रह, सभा, संमेलने, मेळावे यामध्ये संशोधकाने असहभागी निरीक्षणाच्या माध्यमातून केलेल्या नोंदी.

### ३.१७.२ दुय्यम सामग्री (Secondary Sources)

संशोधनाची चौकट दुय्यम सामग्रीच्या आधारावरच केली जाते. दुय्यम तथ्ये ही इतर व्यक्ती, संस्थांनी पूर्वीच गोळा केलेली असून ती लिखित स्वरूपाची असतात. ही प्रकाशित व अप्रकाशित प्रलेख, अहवाल, सांख्यिकी, हस्तलिखिते, पत्रे, दैनंदिनी इ. पासून तथ्ये प्राप्त होतात.

दुय्यम तथ्यांचे प्रमुख दोन स्त्रोत आहेत. पहिला स्त्रोत म्हणजे व्यक्तिगत प्रलेख होय. यामध्ये स्वकथा, दैनंदिनी, पत्रे इ. चा समावेश होतो तर दुसरा स्त्रोत सार्वजनिक प्रलेख होय. यामध्ये रेकॉर्ड, पुस्तके, जनगणना अहवाल, विविध आयोग आणि समितीचे अहवाल, साप्ताहिके इ. चा अंतर्भाव होतो. लुंडबर्ग यांच्या मते, ''शिलालेख, स्तूप, उत्खननातून सापडलेले मानवी सापळे, भौतिक वस्तू इ. ऐतिहासिक स्त्रोतातून प्राप्त तथ्येदेखील द्वितीयक तथ्ये होत.''[२८]

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुढील दुय्यम सामग्रीच्या आधारे माहिती संकलित केली आहे.

#### ३.१७.२.१ व्यक्तिगत प्रलेख

यामध्ये अध्ययनविषयाशी संबंधित काही लोकांनी लिहिलेली आत्मचरित्रे, पत्रे इ. द्वारे माहिती संकलित केली आहे.

#### ३.१७.२.२ सार्वजनिक प्रलेख

यामध्ये शासकीय तसेच अशासकीय संस्थाकडील अहवाल, विविध आयोग आणि समित्यांचे अहवाल, पुस्तके, साप्ताहिके इ. मधून माहिती संकलित केली आहे.

तसेच या विषयाच्या अनुषंगाने पुढील ग्रंथालयांना भेटी देऊन आवश्यक माहिती संकलित केली आहे.

१. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

२. धारवाड विद्यापीठ ग्रंथालय, धारवाड, कर्नाटक

३. बॅ. खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

४. बॅ. जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, पुणे

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

६. डॉ. घाळी कॉलेज ग्रंथालय, गडहिंग्लज

७. दैनिक तरूण भारत ग्रंथालय, बेळगाव

८. सार्वजनिक वाचनालय, बेळगाव

## ३.१८ तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन

प्राथमिक व दुय्यम साधनसामग्रीच्या आधारे विविध व विपुल माहिती संशोधकाने मिळविलेली असते. परंतु विविध प्रकारची विपुल माहिती हाती आली म्हणजे अभ्यासविषयाचे स्वरूप स्पष्ट झाले असे नाही तर त्या माहितीवर लक्ष केंद्रीत करून, त्याची फेररचना करून त्या माहितीमध्ये एक व्यवस्थाबद्धता निर्माण करण्याची गरज असते. त्यांच्यातील परस्परसंबंध, संघटन व व्यवस्थीकरण केल्याशिवाय त्या विपुल व विविध प्रकारच्या माहितीचे अर्थबोधन होणे शक्य नाही. तसे केले नाहीतर त्या माहितीच्या ढिगाऱ्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. म्हणून केवळ तथ्यांची उपलब्धता म्हणजे शास्त्रीय संशोधनाची सांगता नसते. पण ही अशी अर्थपूर्ण अवस्था आहे की, अभ्यासकाद्वारे क्षणभर थांबून या सर्व माहितीत शिस्तबद्ध व्यवस्था निर्माण केली पाहिजे. या प्रक्रियेलाच तथ्यांचे विश्लेषण असे म्हणतात.[२९]

सामाजिक संशोधनात तथ्यांचे संकलन केल्यानंतर त्यांचे विश्लेषण व निर्वचन करणे आवश्यक आहे. जोपर्यंत तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन करीत नाही तोपर्यंत ती तथ्ये अर्थहीन असतात. परंतु विश्लेषण आणि निर्वचनानंतर तथ्यांना एक वेगळा अर्थ प्राप्त होतो. या संदर्भात जे. एच. पाईनकर यांच्या मते, ''ज्याप्रकारे एका घराची निर्मिती ही दगडापासून केली जाते त्याचप्रमाणे शास्त्राची निर्मिती ही तथ्यांपासून होते. केवळ दगडांच्या ढिगास घर म्हणता येत नाही. तसेच केवळ तथ्यांच्या संकलनामुळे शास्त्राची निर्मिती होत नाही. या विधानावरून स्पष्ट होते की, तथ्यांचे संकलन वस्तुनिष्ठ पद्धतीने केले असेल परंतु तथ्यांचे विश्लेषण केले नसेल तर त्या तथ्यांचे महत्त्व लक्षात येणार नाही.[३०]

'बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने बेळगाव जिल्ह्यातील बेळगाव, खानापूर, चिक्कोडी, हुक्केरी व अथणी या पाच तालुक्यातील एकूण २१० पुरुष व १४० स्त्रियांकडून मुलाखत अनुसूची, निरीक्षण या प्राथमिक तंत्रांचा वापर करून माहिती संकलित केली आहे. संकलित केलेली माहिती विखुरलेली व अस्ताव्यस्त स्वरूपात होती. या माहितीचा वापर संशोधनात जशास तसा करणे अवघड होते. त्यासाठी संशोधकाने या संकलित तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन केले.

### ३.१८.१ संकेतीकरण

पूर्वनिर्धारीत वर्ग वा प्रकारामध्ये समाविष्ट होणाऱ्या प्रत्येकास प्रतिक वा संकेत म्हणून एखादा अंक (१, ४) वा शब्द (अ, म) देणे म्हणजेच संकेतीकरण होय. वेगळ्या शब्दांमध्ये सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, सारणीकरणासाठी आवश्यक अशी वर्गीकरण प्रक्रिया म्हणजेच संकेतीकरण, मूळ स्वरूपात संकलित तथ्यांचे प्रतिकांमध्ये रूपांतर करण्याच्या प्रक्रियेसच संकेतीकरण म्हणतात.[३१] प्रश्नावली किंवा अनुसूचीद्वारे प्राप्त झालेल्या उत्तरांना अंक किंवा शब्दाच्या रूपात प्रतिके किंवा संकेत देण्याचे कार्य म्हणजे संकेतीकरण होय. तथ्यांच्या संकेतीकरणामुळे सारणीकरणाचे कार्य सोपे होते. संशोधकाने संशोधनासाठी संकलित केलेल्या माहितीला योग्य संकेतांक देणे आवश्यक असते. मुलाखत अनुसूचीच्या आधारे एकूण ३५० व्यक्तींकडून संकलित केलेल्या माहितीचे विविध संकेतामध्ये रूपांतर कले. अनुसूचीमध्ये प्रश्नांना पर्यायी उत्तरे (अ, ब, क, ड) या पद्धतीने देऊन उत्तरदात्याकडून अचूक उत्तरे घेऊन त्यावर (√) अशी खूण किंवा संकेत दिले. या संकेतीकरणाच्या प्रक्रियेमुळे सारणीकरणाचे कार्य सोपे झाले.

### ३.१८.२ वर्गीकरण

संशोधनासाठी संशोधक जी तथ्ये संकलित करतो ती अस्पष्ट, विस्तृत व अस्ताव्यस्त स्वरूपात असतात. अशा विस्तृत व विखुरलेल्या तथ्यांच्या आधारे विश्लेषण करणे कठीण कार्य असते. तथ्यांचे विश्लेषण करणे सुलभ व्हावे यासाठी अशा तथ्यांमधील समान किंवा असमान बाबी कोणत्या आहेत हे संशोधकाला निश्चित करावे लागते. म्हणजेच तथ्यांचे निश्चित प्रकार किंवा वर्ग

पाडण्यासाठी काही आधार निवडावे लागतात. त्यामुळे विखुरलेली तथ्ये एका निश्चित स्वरूपाच्या प्रकारात किंवा वर्गात स्पष्ट होऊ लागतात. तथ्यांचे निर्वचन सुलभतेने करण्यासाठी समजण्यायोग्य सारख्या आधारावर तथ्यांचे गट पाडण्याला 'वर्गीकरण' किंवा 'श्रेणीकरण' असे म्हणतात.[३२] यासाठी संशोधकाने वय, लिंग, व्यवसाय, शिक्षण, मासिक उत्पन्न या घटकांचा आधार घेऊन उपलब्ध तथ्यांचे एका निश्चित प्रकारात वा वर्गात वर्गीकरण केले आहे.

### ३.१८.३ सारणीयन

वर्गीकरण व सारणीयन या दोन्ही प्रक्रिया परस्परांना पूरक आहेत. उपलब्ध सामग्री उभ्या आडव्या ओळीत म्हणजेच कोष्टकात विशिष्ट गुणधर्मानुसार मांडणे आवश्यक असते. सेल्टिझ, जहोडा इ. नी संकेतीकरणास तथ्यांना श्रेणीबद्ध करण्याची एक तांत्रिक पद्धती म्हटले आहे. त्याचप्रमाणे सारणीकरणास सांख्यिकीय तथ्यांचे विश्लेषणाच्या दृष्टीने तयार केलेला यांत्रिकीकरणाचा एक भाग मानला आहे. सारणीकरणाचा उद्देश तथ्य सामग्रीला एक व्यवस्थित रूप देऊन संशोधन समस्येला अधिक स्पष्ट करणे हा आहे. सामाजिक संशोधनासाठी संकलित केलेल्या तथ्यांना किंवा आकडयांना सुव्यवस्थित व सरळ स्वरूपात प्रस्तुत करणे म्हणजेच सारणीकरण होय. सारणीद्वारे तथ्यांच्या वर्गीकरणानंतर त्या तथ्यांची अशा व्यवस्थित तऱ्हेने मांडणी करता येते की, ज्यामुळे तथ्यांचे महत्त्व व कार्य स्पष्ट होईल. यासंदर्भात डॉ. जे. सी. चतुर्वेदी यांनी, ''दोन दिशांनी वाचता येईल अशा रूपात काही ओळी आणि स्तंभात तथ्यांना एका क्रमबद्ध पद्धतीने व्यवस्थित करण्याच्या प्रक्रियेत सारणीकरण असे म्हणतात.''[३३]

## ३.१९ समारोप

संशोधकाने मुलाखत अनुसूचीच्या आधारे संकलित केलेल्या माहितीचे वय, लिंग, व्यवसाय, शिक्षण, मासिक उत्पन्न व तालुका या निकषांच्या आधारे वर्गीकरण करून त्याचे उभ्या आडव्या कोष्टकात सारणीकरण केले. त्यामुळे संशोधकास विषयासंबंधी अचूक आकडेवारी, सखोल व परिपूर्ण माहिती मिळण्यास मदत झाली. त्यासाठी संगणक प्रणालीचा वापर करून मिळविलेल्या माहितीचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून त्याआधारे निष्कर्ष, सूचना व शिफारशी मांडण्यात आल्या आहेत.

## संदर्भ सूची


१. खैरनार, दिलीप, प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी २००९, पृ. ३

२. बोधनकर सुधीर व अलोणी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, चतुर्थ आवृत्ती, जानेवारी २००७, पृ. ६, ७

३. HANSRAJ, Theory & Practice in Social Research, Surjeet Publications, Delhi, Third Revised Edition, 2002, p. 3

४. कायंदे–पाटील, गंगाधर वि., संशोधन पद्धती, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, चतुर्थ आवृत्ती, २५ डिसेंबर २००८, पृ. २.४, २.५

५. नाडगोंडे गुरुनाथ, सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, तिसरी आवृत्ती, सप्टेंबर २००९, पृ. ६१

६. खापरे, कऱ्याप्पा, ' लोकशाही समाजवादाचे राजकारण – श्री. एस. एम. जोशींच्या जीवन आणि कार्याचा चिकित्सक अभ्यास', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पीएच. डी. राज्यशास्त्र पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, जून २००२

७. कुलकर्णी, आर. आर., कर्नाटक राज्य पुर्नबांधणीतील प्रशासकीय समस्या, धारवाड विद्यापीठ, धारवाड, पीएच. डी. राज्यशास्त्र पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, ऑगस्ट १९७७

८. जोशी, मनोहर, शिवसेनेची निर्मिती, वाढ, स्वरूप, यशापयश आणि भारतीय राजकारणातील शिवसेनेचे भवितव्य यांचा विश्लेषणात्मक अभ्यास, मुंबई विद्यापीठाच्या कला शाखेतील राज्यशास्त्र विषयाच्या पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, २००९

९. नेसरकर, मनिषा, कन्नड–मराठी सांस्कृतिक अनुबंधाच्या अनुषंगाने सीमाभागातील मराठी साहित्याचा अभ्यास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर पीएच. डी. मराठी पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, डिसेंबर २००७

१०. पेंडसे, लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मयगृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, ५ मे २०१०

११. फडके, य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सातवा, मौज प्रकाशनगृह, गिरगांव, मुंबई, पहिली आवृत्ती १८ जून २००७

१२. Apte, Ram, Maharashtra-Karnataka Border Dispute, Kiran Thakur, Working President, M. E. S., Belgaum, First Edition, 2 October 2010

१३. गोऱ्हे, निलम, शिवधनुष्य, क्रांतिकारी प्रकाशन प्रा. लि., द्वारा झेलम जोशी, ६, वाशी, नवी मुंबई, प्रथम आवृत्ती, जुलै २००६

१४. चौगुले, एल. आर., असा लढा असे लढवय्ये, राज्ञी प्रकाशन, टिळकवाडी, बेळगाव, २७–४–२०००

१५. चेतन राजहंस, सनातन प्रभात दैनिक, http://www.sanatanprabhat.wordpress.com

१६. सोनवणे मनोहर, युनिक फिचर्स, http://uniquefeatures.com

१७. गायकवाड वैभव, बेळगाव सीमाप्रश्न नेमका आहे तरी काय?, http://www.vaibhavgaikwad.com/2010

१८. सराफ, रा. सी., भाषा, मातृभाषा आणि परभाषा, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७२, पृ. १८

१९. गजेंद्रगड, व्ही. एन. समकालीन समाजशास्त्रीय सिद्धांत, फडके प्रकाशन, ९५/४, ए वॉर्ड, दुधाळी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००१, पृ. २

२०. तत्रैव, पृ. ७

२१. U. I. Thomas & Florian Zananecki, The Polish Peasant in Europe & America, 1981,p. 2

२२. आगलावे, प्रदीप, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, जुलै २००९, पृ. १९

२३. http://en.wikipedia.org/wiki/Labeling Theory

२४. धुरी नीलम, संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, २००८, पृ. २९२

२५. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, २०१०, पृ. १८०

२६. कऱ्हाडे, बी. एम., सामाजिक संशोधन पद्धती, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती, जून २००९, पृ. २१०

२७. कऱ्हाडे, बी. एम., सामाजिक संशोधन पद्धती, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती, जुलै २००७, पृ. १७४

२८. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, २०१०, पृ. २१२

२९. कऱ्हाडे, बी. एम., सामाजिक संशोधन पद्धती, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती, जून २००९, पृ. २९९

३०. खैरनार दिलीप, प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी २००९, पृ. ३२५

३१. भांडारकर, पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, वसंत पिंपळापुरे, विद्या बुक्स, औरंगतुरा, औरंगाबाद, चौथी आवृत्ती, १९९९, पृ. ४२५

३२. बोधनकर सुधीर व अलोणी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, चतुर्थ आवृत्ती, जानेवारी २००७, पृ. २६८, २६९

३३. कऱ्हाडे, बी. एम., सामाजिक संशोधन पद्धती, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती, जून २००७, पृ. ४०१

प्रकरण चौथे

# मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या

## प्रकरण चौथे

# मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या


४.१ प्रस्तावना

४.२ भाषेचे महत्त्व

४.३ भाषातत्त्व

४.४ राष्ट्र

४.५ राष्ट्रवाद

४.६ भारतीय समाज

४.६.१ सामाजिक समस्या

४.६.२ सामाजिक समस्या वैशिष्ट्ये

४.७ महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्न व सामाजिक समस्या

४.७.१ अल्पसंख्याक

४.७.१.१ अल्पसंख्याक – घटनेतील तरतूद

४.७.१.२ भाषिक अल्पसंख्याकांबाबत राष्ट्रीय धोरण

४.७.१.३ कर्नाटक सरकारचा खोटारडेपणा

४.७.२ शैक्षणिक समस्या

४.७.२.१ शाळांमध्ये कन्नडसक्ती

४.७.२.२ एस. एस. एल. सी. बोर्डाचा भेदभाव

४.७.२.३ राष्ट्रीय भाषेपासून वंचित

४.७.२.४ शिक्षकांची कमतरता

४.७.२.५ मराठी भाषिक शिक्षकांची बदली

४.७.२.६ डी. एड. च्या विद्यार्थ्यांना नापास

४.७.३ नोकरीविषयक समस्या

४.७.३.१ सीमाभागातील एस. सी., एस. टी. दाखला महाराष्ट्रात रद्द

४.७.४ प्रशासकीय समस्या

४.७.४.१ कन्नडसक्तीचे दुष्परिणाम

४.७.४.२ सरकारी कार्यालयातही मराठी भाषेची गळचेपी

४.७.४.३ कानडी सक्तीमुळे खुंटणारा विकास आणि दैनंदिन व्यवहारातील अडचणी

४.७.५ राजकीय समस्या

४.७.५.१ लोकशाहीची मुस्कटदाबी

४.७.६ मराठी भाषिकांच्या जमिनी संपादन

४.७.६.१ सरकारच्या या धोरणावर न्यायालयाचेही ताशेरे

४.७.७ सांस्कृतिक गळचेपी

४.७.७.१ सीमाभागातील साहित्यिकांची उपेक्षा

४.७.८ सीमाभागात पोलीसी अत्याचार

४.७.८.१ सारबंदी आणि पोलीस

४.७.९ सीमाभाग विकासापासून वंचित

४.७.१० कन्नड संघटनांचा अतिरेक

४.७.११ मराठी भाषिकांच्या प्रतिक्रिया

४.७.१२ संशोधकाचे अनुभव

४.७.१२.१ संशोधकाजवळ आलेल्या प्रतिक्रिया

४.७.१३ मराठी भाषिकांचा निर्धार

४.७.१४ महाराष्ट्र–कर्नाटक सांस्कृतिक अनुबंध

४.७.१४.१ मराठी–कानडी संबंध

४.७.१४.२ महाराष्ट्र–कर्नाटक सांस्कृतिक देवाणघेवाण

४.८ समारोप

# प्रकरण चौथे

# मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या

## ४.१ प्रस्तावना

Mother tongue is the language of heart असे एस. टी. कोलरीज यांनी म्हटले आहे. यामध्येच मातृभाषेचे महत्त्व स्पष्ट होते. दोन मनांना एकत्रित आणण्याचे सामर्थ्य मातृभाषेत असते. यासाठी ज्यांची भाषा समान, त्यांना एकमेकांशी संपर्क साधणे, व्यवहार करणे सहजशक्य होते. भाषा एकमेकांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करते. आपले विचार, आपली भाषा ज्यांना कळते, त्यांना समजणे सहजशक्य असते. विचारोक्ती, विचाराभिमुखता, विचार समजावून घेणे हे भाषेमुळे शक्य होते. विचारांना चालना देण्याकरिता, विचारप्रगटनाकरिता आणि वैचारिक देवाणघेवाण आणि त्यामधून विकास साधण्यासाठी भाषा उपयोगी पडते. कारण, भाषा हे सामाजिक आंतरव्यवहाराचे साधन आहे.

भाषेचे महत्त्व विशद करताना श्री. रा. सी. सराफ यांनी म्हटले आहे, ''भाषा हे ती भाषा ज्या समाजात वापरली जाते, त्या समाजातील सदस्यांचे परस्पर व्यवहाराचे साधन आहे. समान भाषेमुळे समाजाचे व्यवहार सुलभ होतात. समाजातील घटक एकमेकांशी संबंध ठेवू शकतात आणि विचारांची देवाणघेवाण होऊ शकते. शासनाची भाषा आणि समाजाची भाषा एक असल्यास, जनतेला शासनाबद्दल आपुलकी वाटते. शासनाचा कारभार जनतेच्या सर्व घटकांना समजणे शक्य होते आणि शासनात जनतेचे प्रतिनिधी आल्यानंतर त्यांना प्रशासन करताना भाषेचे अडसर राहत नाहीत. एकमेकांशी संबंध ठेवणे ही जी समाजाची एक महत्त्वाची गरज आहे, ती समान भाषेमुळे शक्य होते.[१]

## ४.२ भाषेचे महत्त्व

सापिर (Sapir) ने भाषेच्या महत्त्वावर प्रकाश टाकताना लिहिले आहे की, मानवाचे सर्वात मोठे म्हणजे त्याची भाषा आहे. मानव केवळ भाषेमुळेच सभ्यता आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये आपले अस्तित्व टिकवून आहे. मानवाच्या प्रगतीचे कारण भाषाच आहे. भाषेमुळे व्यक्ती वा समूह आपले

ज्ञान, अनुभव, विचार आणि भावना दुसऱ्या व्यक्ती वा समूहापर्यंत पोहचवितो. विचारांच्या अशा आदान–प्रदानामुळेच समाज संघटित होऊन विकासाच्या दिशेने वाटचाल करीत असतो. काही अभ्यासकांच्या मते, भारतात एकूण १६५० भाषा आणि बोलीभाषा आहेत. तर एका भाषिक सर्वेक्षणानुसार देशात १८९ भाषा आणि ५४४ बोलीभाषा आहेत. भारतीय राज्यघटनेने एकूण १८ भाषांना प्रमुख भाषा म्हणून मान्यता दिली आहे. त्यामध्ये आसामी, बंगाली, हिंदी, उर्दू, मराठी, गुजराथी, पंजाबी, काश्मिरी, तेलगू, कन्नड, उडीया, तामिळ, मल्याळम्, संस्कृत, नेपाली, मणिपुरी, कोंकणी आणि सिंधी या भाषांचा समावेश आहे.

भाषेचे महत्त्व पुढील कार्यावरून स्पष्ट होण्यास मदत होईल.[२]

१. भाषा भावनात्मक एकात्मतेचा सर्वात महत्त्वपूर्ण आधार आहे.

२. भाषा सामाजिक अनुकुलनाचा एक महत्त्वपूर्ण आधार आहे. भाषेद्वारा एक व्यक्ती वा समूह एक दुसऱ्याच्या विचाराला समजून घेऊन अनुकुलन करीत असतात आणि आपल्या समस्येवर एकजुटीने उपाय शोधतात.

३. भाषा ही सामाजीकरणाचा आधार आहे.

४. भाषा अनेक पिढीच्या संचित अनुभव संबंधित असते. संस्कृतीला स्थिर रूप देणे आणि येणाऱ्या पिढीसाठी संस्कृतीचे हस्तांतरण करणे ही भाषेची महत्त्वाची भूमिका आहे.

५. भाषा व्यक्तीच्या प्रति समाजाच्या आकांक्षेला स्पष्ट करते.

६. भाषेमुळेच व्यक्तीला व्यावहारिक ज्ञानाची प्राप्ती होते.

७. वर्तमानकाळात भाषा हे जनमत तयार करण्याचे एक शक्तीशाली साधन आहे.

भाषेमुळेच अनेक व्यक्ती, समूह, संस्था, संघटना, मंडळे, समाज, देश यांना एकत्र आणणे, त्यांच्यात समायोजन साधणे, एकमेकांमध्ये सामंजस्य निर्माण करणे, सामूहिक सहकार्यातून समाजातील सामाजिक समस्यांचे आकलन करून घेऊन त्यावर प्रभावीरित्या मात करणे आणि

आपले पर्यायाने समाजाचे अस्तित्व टिकवून ठेवणे यासाठी भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे.

पण भारतीय समाजात 'राज्य पुनर्रचना आयोगा'नुसार एकभाषिक राज्यांची निर्मिती झाल्याने अनेक राज्ये, अनेक भाषा अस्तित्वात आल्या. त्याचा परिणाम भाषेमध्ये विविधता निर्माण होऊन तणावाची परिस्थिती निर्माण झाली. जी परिस्थिती एकूण समाजव्यवस्थेलाच घातक ठरली. भाषेमुळे राष्ट्रीय एकात्मता आणि बौद्धिक विकासामध्ये अडथळे निर्माण होण्यास सुरूवात झाली. १९६० मध्ये भाषेच्या आधारावरच गुजराती बोलणाऱ्यांना गुजरात आणि मराठी भाषिकांचा महाराष्ट्र वेगळा झाला. त्याचप्रमाणे पंजाबचे पंजाबी आणि हिंदी या दोन भाषिकांच्या आधारावर पंजाब आणि हरियाना अशी दोन राज्ये निर्माण झाली. आज अनेक राज्ये आपली भाषा श्रेष्ठ मानत आहेत. आपल्या मातृभाषेला अधिक महत्त्व देत आहेत. त्यामुळे त्या राज्यात असणाऱ्या इतर अल्पसंख्यांक लोकांना त्या भाषिक लोकांशी व्यवहार करणे कठीण जाते. किंबहुना आज राज्यपुनर्रचना आयोगानुसार बेळगाव, कारवार, निपाणी, भालकी, बिदर, संतपूर, खानापूर या सीमाभागातील मराठी भाषिकांचा समावेश ज्या कर्नाटक राज्यात केला आहे त्या राज्याची प्रमुख मातृभाषा कन्नड असून सीमाभागातील लोकांची भाषा मात्र मराठी आहे. ते अल्पसंख्याक बनले. परिणामी दोघांची भाषा वेगवेगळी असल्याने व्यवहार करणे, आचारविचारांची देवाणघेवाण करणे, आपले मत, भावना, प्रतिक्रिया व्यक्त करणे कठीण बनले. कर्नाटक सरकार आपल्या मातृभाषेला अधिक महत्त्व देऊन शासकीय, अशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, राज्य आणि केंद्र सरकारी कार्यालये यातून आपल्या कन्नड भाषेची सक्ती केल्याने सीमाभागातील असंख्य मराठी भाषिकांना जगणे अवघड झाले आहे. पर्यायाने भाषिक तणावाची परिस्थिती निर्माण करून त्याचा परिणाम संपूर्ण समाज वा राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येऊ पाहते आहे.

## ४.३ भाषातत्त्व

आज महाराष्ट्र हा भारतीय संघराज्याचा एक घटक आहे. गुजरात, पंजाब, उत्तरप्रदेश, बंगाल, आसाम, म्हैसूर, आंध्रप्रदेश याप्रमाणेच महाराष्ट्र हाही एक भारताचा प्रधान घटक आहे. आपल्या संघराज्याचे घटक असे हे जे चौदा प्रधान प्रदेश ते प्रामुख्याने भाषातत्त्वावर भिन्न झालेले

आहेत. गुजराथी, बंगाली, कन्नड, तामिळ इ. चौदा प्रमुख भाषा त्या त्या प्रदेशात बोलल्या जातात आणि एक प्रदेश दुसऱ्या प्रदेशापासून निराळा झाला आहे तो भाषेमुळेच होय. धर्म किंवा वंश या वर्गीकरणाच्या तत्त्वांचा येथे काही संबंध नाही. हे भेद त्या तत्त्वांवर केलेले नाहीत. भारतात भिन्न धर्मांचे व वंशाचे लोक आहेत, नाही असे नाही. पण बहुतेक सर्व प्रदेशात या सर्व धर्मांचे व वंशाचे लोक राहतात आणि ते त्या त्या प्रांताची भाषा बोलतात. तेव्हा प्रदेश विभागणी भाषातत्त्वावर झाली आहे हे उघड आहे. अर्थात महाराष्ट्राची ही भिन्नता याच तत्त्वावर प्रस्थापित झाली आहे. संयुक्त महाराष्ट्राची प्रस्थापना झाली त्यावेळी विदर्भ, मराठवाडा यांचा समावेश महाराष्ट्रात करण्यात आला तो तेथील लोक मराठी भाषिक आहेत म्हणूनच आणि आज बेळगाव, कारवार व गोवा यांचा समावेश महाराष्ट्रात करण्यात यावा असा महाराष्ट्रीयांचा आग्रह आहे, याचेही कारण हेच आहे. त्याला विरोध होत आहे. त्याची कारणे राजकीय आहेत, सांस्कृतिक नाहीत. तेव्हा मराठी भाषिकांचा प्रदेश म्हणूनच 'महाराष्ट्र' हा आज निराळा झाला आहे हे निर्विवाद आहे.[३]

पण मराठी भाषिकांची भूमी म्हणजे 'महाराष्ट्र' हे समीकरण निश्चित झाले ते साधारणत: इ. स. १२०० च्या सुमारास मराठी भाषेची उत्पत्ती विद्वानांच्या मते इ. स. ८००–१००० च्या सुमारास झाली. तिच्यातील 'विवेकसिंधू' हा पहिला ग्रंथ इ. स. ११८८ या साली निर्माण झाला आणि त्याचवेळी यादवांच्या साम्राज्याची स्थापना झाली. पुढील शंभर वर्षात महानुभाव पंथाचे अनेक ग्रंथ रचले गेले आणि १२९० च्या सुमारास ज्ञानेश्वरीचा अवतार झाला. म्हणजे साधारणपणे तेराव्या शतकात स्वतंत्र निराळी मातृभाषा यामुळे महाराष्ट्राची अस्मिता निश्चित झाली. तेव्हा इ. स. १२०० पासून या भूमीतील संस्कृती ती महाराष्ट्राची संस्कृती असे म्हणणे यथार्थ आहे.

स्वातंत्र्योत्तर भारतीय संघराज्यामध्ये राज्यांची निर्मिती करताना भाषेच्या आधारे करण्यात आली. राज्यांची निर्मिती एकाचवेळी न होता काल–काळ परिस्थितीनुसार होत गेली. भाषेच्या आधारावर राज्यांची निर्मिती होत असताना भौगोलिक सीमा आखल्या गेल्या. पण भाषेच्या आधारावर समाजाची विभागणी काटेकोरपणे कशी करणार म्हणजेच भौगोलिक सीमांची आखणी करताना भाषिक समाजाचा विचार करणे गरजेचे होते. त्यासाठी 'पाटसकर सूत्राचा' भौगोलिक

संलग्नता, खेडे हा घटक, सापेक्ष बहुसंख्या व जनतेची इच्छा याचा वापर होणे गरजेचे आहे. पण काही राज्यांची निर्मिती करताना या सूत्राकडे दुर्लक्ष झाले. परिणामी अनेक राज्यांमध्ये भाषिक वाद निर्माण झाले. मराठी भाषिकांचे 'महाराष्ट्र' व 'कन्नड' भाषिकांचे कर्नाटक या दोन राज्यांची निर्मिती भाषिक तत्त्वावर झाली असली तरी मराठी भाषिकांचा ८६५ खेडे व नगरांचा भूभाग कर्नाटक राज्यामध्ये राहिला. त्यामुळे या प्रदेशामधील लोकांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते आहे. भारतीय समाज हा जगातील एक प्राचीनतम समाज आहे. साऱ्या जगाने नवल करावे असा हा अद्‌भूतरम्य भारतीय समाज आहे. त्यात विविध प्रकारची विषमता व वैचित्र्य आहे. विविधता हे भारतीय समाजव्यवस्थेचे खास वैशिष्ट्य आहे. भारतीय समाजाचे गुणविशेष सांगताना म्हटले जाते की, ज्या देशात ज्ञानसूर्याचा किंवा उच्च व उदारचरित संस्कृतीचा प्रथम उदय झाला तो देश म्हणजे भारत. जेथे धर्म, त्याग व वैराग्य यांची त्रिवेणी अखंड वाहत होती तो देश म्हणजे भारत. जेथे विक्रम आणि वैराग्य हातात हात घालून नांदत होते तो देश म्हणजे भारत. जेथे योग आणि त्याग, ऐहिक आणि पारलौकिक ह्या द्वंद्वंत्वाचा सुंदर व समुचित संगम आढळून येतो तो देश म्हणजे भारत. म्हणूनच हा देश, हा समाज व ही संस्कृती कालचक्रांचे अनेक आघात सहन करून आजही उभी आहे.[४]

## ४.४ राष्ट्र

भाषा, धर्म, सांस्कृतिक जीवन, आर्थिक हितसंबंध, राजकीय आकांक्षा यापैकी एखाद्या किंवा अधिक कारणांनी भावनात्मकदृष्ट्या एकमेकांविषयी आत्मीयता वाटणारा एखादा मानवसमूह आपले वेगळेपण व्यक्त करतो.तेव्हा ते त्या समूहाचे 'राष्ट्र' असे संबोधण्यात येते. पण काहीवेळेला एखाद्या राष्ट्राच्या घडणीत अनेकदा अशा काही घटना घडत गेलेल्या असतात की, काही काळ ते राष्ट्र पूर्ण स्वरूपात उभे राहिल्यासारखे वाटते पण प्रत्यक्षात तसे नसते. कधी एखाद्या प्रदेशातील बहुसंख्य गट अल्पसंख्य गटाला आपल्या बळावर जखडून ठेवतो, तर कधी हे लहान गट स्वत:ची असहाय्यता व दुर्बलता लक्षात घेऊन त्या गटांच्या स्वाधीन होतात, विलीन होतात. तर काहीवेळा संधी आणि आत्मविश्वास निर्माण होतो आणि अंतर्गत राजकारणांमुळे किंवा जागतिक घडामोडींमुळे शक्यता

निर्माण होते, तेव्हा हे लहान गट आपली वेगळी अस्मिता आपले वेगळेपण यांचा आग्रह धरून वेगळे स्थान मागू लागतात. हे मुख्य गट समाजापासून अलग होऊन स्वतंत्र राष्ट्र निर्माण होण्याइतके निराळे नसतात. अशावेळी त्यांना 'राष्ट्रके' (Nationalities) असे म्हटले जाते. अशी राष्ट्रके बहुधा एखाद्या संयुक्त राज्यात बरोबरीच्या हक्काने राहणारे राष्ट्र म्हणून उदा. इ. स. १८६७ मधील ऑस्ट्रिया–हंगेरी या राज्यातील हंगेरी किंवा संघराज्यातील अनेक बाबतीत स्वायत्त असलेली राज्ये उदा. कॅनडाच्या संघराज्यातील फ्रेंच भाषिक विभाग, तसेच भारतीय संघराज्यातील महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात वगैरे राज्ये.[५]

भारतातील विविध राज्यांची रचना ही प्रामुख्याने भाषेच्या आधारावर झाली आहे. १९६० मध्ये भाषेच्या आधारावरच गुजराती बोलणाऱ्यांना गुजरात आणि मराठी भाषिकांचा महाराष्ट्र वेगळा झाला. त्याचबरोबर पंजाबचे पंजाबी आणि हिंदी या दोनभाषिकांच्या आधारावर पंजाब आणि हरियाणा अशी दोन राज्ये निर्माण झाली.

## ४.५ राष्ट्रवाद

समान धर्मश्रद्धा, एकच भाषा, समान जीवनपद्धती, समान आर्थिक समस्या किंवा समान संकट या वा अन्य कारणांनी माणसे एकत्र येतात, एक राहतात, एकत्र लढतात, एकत्र सोसतात आणि भोगतातही. यातून एका विशिष्ट गटात जी समानतेची आणि एकतेची भावना निर्माण होते तिलाच राष्ट्रीयत्व म्हटले जाते. स्वतःच्या समुहापुरती एकतेची, आपलेपणाची आणि अन्य समूहाबाबत वेगळेपणाची, दुराव्याची वृत्ती म्हणजेच राष्ट्रीयत्वाची भावना होय.

भारतात इंग्रजी राजवटीत पाश्चात्य विचारांनी पुढे प्रभावित झालेल्या नवशिक्षित समाजाने राष्ट्रवादी विचारांचा प्रसार करण्यासाठी अनेक उपक्रम सुरू करून इंग्रज राज्यकर्त्यांच्या विरोधात राजकीयदृष्ट्या भारतीय जनतेला संघटित करण्याचे कार्य सुरू केले. त्यातूनच भारतीय राष्ट्रवादाची बीजे रोवली गेली. याचा अर्थ भारतातील राष्ट्रवादाचा जन्म हा इंग्रजी राजवटीने राबविलेल्या वसाहतवादी धोरणाचा व काही प्रमाणात त्या धोरणाप्रती असलेल्या प्रतिक्रियेचा परिणाम होय. धर्म, जात, वंश, भाषा, प्रदेश, पंथ असा कोणताही भेदभाव न मानता आम्ही सारे भारतीय आहोत

या एकाच समान भावनेने भारतीयांनी ब्रिटीश साम्राज्यांशी संघर्ष केला. त्यामुळे भारतीयांत राष्ट्रीयत्वाची भावना प्रखर झाल्याने ब्रिटीशांना हा देश सोडून जावे लागले. त्यावेळी राष्ट्राभिमान, राष्ट्रसेवा, राष्ट्रप्रेम या भावनेने सारा देश एकात्म झाला होता. पण आज ६५ वर्षांच्या काळात राष्ट्रीय एकात्मता लोप पावत असलेली दिसून येते. याचे कारण या काळात राष्ट्रात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामध्ये भाषावाद, धर्मवाद, जातीयता, प्रदेशवाद इ. घटकांमुळे राष्ट्रीयत्वाची भावना कमी होत चालल्याने पंडित नेहरूनी एकदा असे म्हटले होते की, "I know there is India but I want to know where are the Indians."[6]

आज राष्ट्रीय एकात्मतेऐवजी राष्ट्रविघटनाची प्रवृत्ती जाणवते, सारा देश धार्मिक, जातीय, प्रादेशिक आणि भाषिक संघर्षाने होरपळून निघाला आहे. त्यातून प्रादेशिकवाद, सीमावाद, भाषावाद उफाळून येत आहे. त्यामध्ये पंजाब राज्याने स्वतंत्र खलिस्तान राज्याची मागणी केली, तर तामिळनाडू राज्याने 'स्वतंत्र ध्वज', 'स्वतंत्र राष्ट्रगीत' अशी मागणी केली. पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, कर्नाटक व तामिळनाडू या राज्यांनी अधिक स्वायत्तता व अधिकार हवेत अशी अपेक्षा केली तर महाराष्ट्र–कर्नाटक यांच्यातील सीमावाद उफाळून आला. त्यामुळे राज्याराज्यांमध्ये या ना त्या घटकांवरून वाद, मतभेद, तणाव निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मतेला धोका पोहचला आहे.

महाराष्ट्र–कर्नाटक या दोन राज्यांतील सीमावाद हा १९५६ पासून आजपर्यंत भिजत पडलेला असल्याने या प्रश्नावरून दोन्ही राज्यात सतत ताण, मतभेद निर्माण होत असून त्याचे अधिक दुष्परिणाम तेथे राहणाऱ्या बहुसंख्य मराठी भाषिकांना सोसावे लागत आहेत. मराठी भाषिक आपल्या हक्क, अधिकारासाठी लोकशाही मार्गाने लढत असताना वा न्याय मागत असतानादेखील कर्नाटक सरकार कायद्याचा आणि बळाचा वापर करून तेथील मराठी भाषा, मराठी संस्कृती व मराठी अस्मिता नष्ट करू पाहते आहे. त्यामुळे सीमाभागात सतत लाठीमार, दगडफेक, निदर्शने, गोळीबार, जाळपोळ इ. हिंसात्मक स्वरूपाच्या घटना घडत असून त्याचा परिणाम राज्याराज्यातील संबंध दुराव्याचे, संघर्षाचे बनत असून त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येऊ पाहते आहे.

## ४.६ भारतीय समाज

भारतीय समाजात वांशिक, भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक, जातीय, प्रांतिय, भौगोलिक इ. विविध प्रकारची विविधता आहे. म्हणून विविधता हे भारतीय समाजाचे खास वैशिष्ट्य आहे. त्याचप्रमाणे विविधतेत एकता हेदेखील प्रमुख वैशिष्ट्य आहे. डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी 'India : Social Structure' या ग्रंथामध्ये नमूद केले की, भारतीय समाज संरचना आणि सांस्कृतिकबंधाची एकता आणि विविधता ही दोन वैशिष्ट्ये आहेत.[७]

तर विविधतेमध्ये एकता या वैशिष्ट्याबद्दल हर्बर्ट रिस्ले (Herbart Rislay) यांनी लिहिले आहे की, ''भारतात सर्व धर्म, रीतिरिवाज आणि सामाजिक व भौतिक विभिन्नता असतानादेखील जीवनाची एक विशेष एकरूपता कन्याकुमारीपासून ते सिमल्यापर्यंत दिसून येते. वास्तवात भारताचे एक वेगळे चरित्र आणि व्यक्तित्व आहे. ज्याची अवहेलना केली जाऊ शकत नाही.'' त्याचबरोबर श्री. ई. एम. जाडे यांनी, ''विचार आणि जातीच्या अनेक तत्त्वांमध्ये समन्वय, विविधतामध्ये एकता निर्माण करण्याची भारतीयांची योग्यता आणि तत्परता ही मानव समाजास भारताची विशेष देणगी आहे.''[८]

भारतीय समाजाच्या एकतेसंदर्भात समाजशास्त्रज्ञ, विद्वानांनी वरीलप्रमाणे मांडलेली मते योग्यच असली तरीसुद्धा आज भारतात स्वसमूह श्रेष्ठतावाद जोपासत असून आपली भाषा, धर्म, जात, वंश, प्रांत श्रेष्ठ मानण्याची वृत्ती अनेक घटकांमध्ये किंबहुना राज्यांमध्ये बळावत असून त्याचा परिणाम भाषा–भाषांत, धर्मा–धर्मांत, प्रांता–प्रांतात झगडे, संघर्ष निर्माण होत असून त्याचे दुष्परिणाम एकूण समाजावर होत आहेत.

भारतीय समाज अनेक वंश, भाषा, धर्म, जाती, पंथ यासारख्या घटकांनी मिळून बनलेला असून प्रत्येक धर्म, जाती, पंथ तसेच भाषा यांचे पोटभाग पडलेले आहेत. या सांस्कृतिक भेदामुळे प्रत्येक व्यक्तीच्या आचारविचारात फरक आढळून येतो. राहणीमान, भाषा, जीवनविषयक तत्त्वज्ञान, मूल्ये, रूढी, परंपरा, देवदेवता इ. मध्ये फरक असल्याने प्रत्येक व्यक्ती आणि तिचा समाज केवळ

कारणपरत्वे दुसऱ्या व्यक्ती व त्यांच्या समाजाशी संबंध ठेवीत असतो. भारतीय समाजरचना विषमतेवर आधारीत असून कुटुंब, विवाह, मालमत्ता, व्यवसाय, स्थान, दर्जा आणि राजकारण इ. सर्व बाबी विषमतेवरच आधारीत आहेत. आज भारतामध्ये सामाजिक व आर्थिक विषमतेवर आधारीत अनेक लहानमोठे गट अस्तित्वात आहेत. जातीव्यवस्था, अस्पृश्यता, बलुतेदारी, दारिद्रय, बेकारी इ. भेद हे आर्थिक आणि सामाजिक विषमतेवर आधारीत आहेत. त्यामुळे समस्यांची तीव्रता वाढते आहे. प्रांत, भाषा, संस्कृती, राहणीमान, रूढी, परंपरा, जात, वंश, धर्म आणि पंथीय भिन्नता असल्याने भारतीय समाजात कोणत्याही समस्येमध्ये सारखेपणा दिसून येत नाही. भारतातील वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, धर्माचे प्राबल्य, जातीव्यवस्था, विषमता इ. बाबींमुळे भारतातील सामाजिक समस्या या जगातील समस्यांपेक्षाही वेगळ्या व वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

### ४.६.१ सामाजिक समस्या

रोजची वर्तमानपत्रे, सभा, लोकांच्या चर्चा, नभोवाणी, दूरदर्शन वगैरेतून नेहमीच सामाजिक समस्यांबाबत वाचतो, ऐकतो, चर्चा करू लागतो. सामाजिक समस्यांशिवाय कोणताही समाज नाही ही वस्तुस्थिती आहे. तसेच या समस्यांबाबत समाज उदासीन असतो असेही नाही तर त्यांच्या निराकरणासाठी कमीअधिक प्रमाणात तो समाज प्रयत्नशील असतो. त्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असते. या समस्यांच्या निराकरणावरच संपूर्ण समाजाचा विकास अवलंबून असतो.

'समस्या' या शब्दासाठी Problem हा शब्द वापरला जातो. Problem या शब्दाचा अर्थ असा की ज्याची सोडवणूक वा निराकरण केले पाहिजे.' (Anything thrown forward for solution) तर सामाजिक समस्या ही समाजातील बहुसंख्य व्यक्तींवर परिणाम करणारी परिस्थिती असते व ती अवांछनीय आहे असे मानले जाते. या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी काहीतरी उपाययोजना करावी असे वाटते.

**सामाजिक समस्या – व्याख्या**

**१. रूर्बिग्टन व वेईनबर्ग**

''सामाजिक समस्या म्हणजे समाजातील बहुसंख्य लोकांच्या मूल्यांशी विसंगत अशी आरोपित परिस्थिती की, ज्या परिस्थितीत बदल करण्यासाठी सामूहिक क्रियेची गरज आहे अशी सर्वांची मान्यता असते.''

A social problem is an alleged situation that is incompatible with the values of a significant number of people who agree that action is needed to alter the situation. - Rubigton & Weinberg

**२. हर्टन आणि लेस्ली**

''समाजातील बहुसंख्य लोकांना नकोशी वाटणारी आणि त्याबाबत सामूहिक सामाजिक कृतीद्वारे काही उपाययोजना करणे आवश्यक वाटते अशा परिस्थितीला सामाजिक समस्या असे म्हणतात.''[९]

A condition affecting significant number of people in ways considered undesirable about which it is felt that something can be done through collective social action. - Horton & Leslie

**४.६.२ सामाजिक समस्या – वैशिष्ट्ये**

१. सामाजिक समस्या समाजोद्भवित असतात.

२. सामाजिक समस्या ह्या समाजसापेक्ष असतात.

३. सामाजिक समस्या या बहुसंख्याकांचा दृष्टिकोन असतो.

४. सामाजिक समस्या या क्लेशदायक व त्रासदायक असतात.

५. सामाजिक समस्या या परस्परावलंबी असतात.

६. सामाजिक समस्या या प्रचलित समाजमूल्यांशी विसंगत असतात.

७. सामाजिक समस्या या परिवर्तनशील असतात.

८. सामाजिक समस्या सोडवणूकीसाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असते.

९. सामाजिक समस्या या सार्वत्रिक असतात.

१०. सामाजिक समस्या या व्यक्तिसापेक्ष असतात.

११. सामाजिक समस्या या कालसापेक्ष असतात.

१२. सामाजिक समस्या या प्रकट व अप्रकट अशा दोन्ही स्वरूपाच्या असतात.

## ४.५ महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्न व सामाजिक समस्या

१ मे १९६० रोजी मुंबई द्विभाषिक राज्यामधून महाराष्ट्र व गुजरात राज्ये निर्माण झाली तरीही बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर व गुलबर्गा जिल्ह्यातील १६ नगरे व ८६५ खेड्यांचा मराठी भाषिकांचा भूभाग कर्नाटकमध्ये राहिला. तेव्हापासून जवळपास ३५ लाख लोकसंख्येने महाराष्ट्रात जाण्यासाठी लोकशाही मार्गाने विविध आंदोलने, मोर्चे, उपोषणे, सत्याग्रह केले. अनेकांनी हौतात्म्य पत्करले. तरीपण हा भाग महाराष्ट्रात समाविष्ट न होता कर्नाटक व महाराष्ट्र या दोन राज्यांमधील सीमाप्रश्न दिवसेंदिवस अधिकच बिकट बनत चालला आहे. परिणामी कर्नाटक सरकार या सीमावासीयांवर या ना त्या प्रकारे अन्याय करीत आहे. सीमावासीय मराठी भाषिकांची संस्कृतीच नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे मराठी भाषिकांना शैक्षणिक, आर्थिक, नोकरीविषयक, राजकीय, प्रशासकीय इ. अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

जनतेच्या न्याय्य लढयाबाबत सातत्याने नकारात्मक धोरण असलेल्या 'टाईम्स ऑफ इंडिया' नेदेखील दि. १० नोव्हेंबर १९५८ च्या अग्रलेखात केंद्र सरकारला शालजोडीतला आहेर केलेला आहे. तो अग्रलेख म्हणतो, ''ज्या राष्ट्राने लोकशाहीवादी राज्यघटना निर्माण केली, राज्यांची भाषावार पुनर्रचना केली, एवढ्या खंडप्राय देशात निवडणुका घेण्याची तरतूद केली आणि योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचा उपक्रम सुरू केला, त्या राष्ट्राला फक्त काही हजार चौरस मैलांच्या वादग्रस्त सरहद्दीचा प्रश्न सोडविणे खरोखरच एवढे कठीण आहे काय? हा प्रश्न ज्या रीतीने भिजत आणि कुजत ठेवला गेला आहे त्यावरून अशा असंतोषाच्या गड्डयाबाबत नवी दिल्ली कमालीची उदासिन आहे या संशयाला पुष्टीच मिळते.[१०]

पं. महादेवशास्त्री जोशी यांनी सीमाप्रश्नाचे अगदी यथार्थ शब्दांमध्ये विवेचन केले आहे.

''महाराष्ट्राचे जे वाजवी आणि न्याय्य आहे, ते महाराष्ट्राला मिळालेच पाहिजे. महाराष्ट्राचा एक सलग अन् बहुसंख्य मराठी भूभाग कर्नाटक पोटाळून बसला आहे, तो महाराष्ट्रात परत आलाच पाहिजे ही मराठी लोकांची मागणी आहे. पण कर्नाटकाकडून अद्याप तिला योग्य तो प्रतिसाद मिळत नाही. मराठी मनाचे हे एक मर्मस्पर्शी दु:ख आहे. एकभाषी सलग भूभागातल्या लोकांनी एक प्रदेश, एक राज्य बनावे ही योजना आपण मान्य केली, ती राज्याराज्यात भेद वाढविण्यासाठी नसून सर्वांना विकासाची समान संधी मिळावी या सद्हेतूने केलेली आहे. भाषा आणि ऐतिहासिक आणि सामाजिक परंपरा हे संस्कृतीचे एक व्यावर्तक लक्षण आहे. कर्नाटकातील एक मोठा वर्ग जर आपली परंपरा पुरंदरदास, कनकदास, विलारण्य अन् बुक्क यांची न सांगता शिवाजी, रामदास आणि ज्ञानबा, तुकाराम यांची सांगत असेल तर कर्नाटकाने त्यांच्या त्या मार्गातली भिंत होऊ नये. आपल्या भाषाबांधवांशी समरस होण्यासाठी त्याला राजीखुषीने मार्ग मोकळा करून दयावा. विवेकशील कन्नड जनतेला तसे वाटत असेलही, पण एखाद्या प्रश्नात जेव्हा सत्तास्पर्धेचे राजकारण शिरते तेव्हा सोपे प्रश्नही बिकट होतात. सहज सुटू शकणारी सुरगाठ निरगाठ होऊन बसते. त्या प्रश्नाला नको असलेले भलतेच वळण लागते.[११]

### ४.६.१ अल्पसंख्याक

''एक वंश, एक भाषा, एक धर्म अगर सामाजिक व सांस्कृतिक विषमता अशा कारणांनी एकरूप असलेले व एकत्र राहणारे व यामुळे स्वदेशीय किंवा स्वराष्ट्रीय बहुसंख्य समाजापासून आपण भिन्न आहोत ही जाणीव ठेवणारे समूह म्हणजे अल्पसंख्यांक समाज होय.'' अनेक देशात असे समाज असणे किंवा निर्माण होणे शक्य आहे. तथापि, सामाजिक अगर राजकीय जीवनात एखाद्या अल्पसंख्य समाजाचे जे समूह दुर्बल असतात, त्यांना समान राजकीय किंवा इतर हक्कांच्या अभावी आपल्या विशिष्ट जीवन पद्धतीच्या संरक्षणासाठी व प्रगतीसाठी वेगळे राहणे आवश्यक आहे असे न्यायत: वाटत असते. अशा समाजांना आपल्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी सत्ताधारी गटाशी अनेकवेळा लढा दयावा लागत असल्याने रक्षणासाठी त्यांना नेहमीच सतर्क राहावे लागते. विशेषत: राजकीय पेचप्रसंग नेहमीच भेडसावत असतात व यातूनच त्यांचे सामाजिक प्रश्न निर्माण होताना

आढळतात.[१२]

१८ व्या शतकाच्या शेवटी लोकशाहीच्या विकासाबरोबरच अल्पसंख्याकांची समस्या एक महत्त्वपूर्ण राजकीय समस्या निर्माण झाली. प्रोफेसर हुमायूँ कबीर यांच्या मते, ''लोकशाही व्यवस्थेच्या अतिरिक्त अन्य व्यवस्थेमध्ये अल्पसंख्याकांचा कोणता प्रश्नच निर्माण होत नाही.'' लोकशाही ही एक अशी व्यवस्था आहे की, तिच्या अंतर्गत विविध प्रकारच्या अलपसंख्यांकांना ओळखले जाते आणि समान रूपात त्यांच्यासोबत व्यवहार करण्यास बाध्य केले जाते. लोकशाहीच्या क्षमतेची ओळख ही अल्पसंख्याकांच्या सोबतच्या समान किंवा सारख्या व्यवहारावर आधारीत असते. सर्वसत्तात्मक व्यवस्थेच्या अंतर्गत अल्पसंख्याकांचे कोणतेच स्थान नसते. त्यामुळेच अल्पसंख्याकांची समस्या ही लोकशाही व्यवस्थेची समस्या आहे.

Encyclopedia Britanica मध्ये अल्पसंख्याकांच्या संदर्भात विस्तृत विवरण करणारा लेख १९५३ मध्ये प्रकाशित झाला.

**व्याख्या**

१. इनसायक्लोपिडीया ब्रिटानिका – ''अल्पसंख्यांक एक समूहाच्या रूपात सामान्यपणे भाषा किंवा धार्मिक विश्वास आणि अनुभूती जी राजकीय सत्तेच्या अंतर्गत बहुसंख्याकांपेक्षा भिन्न असूनदेखील बांधला राहतो.''

2. Sociologist Louis Wirth defined a minority group as 'a group of people who, because of their physical or cultural characteristics are signled out from the others in the society in which they live for differential and unequal treatment, and who therefore regard themselves as objects of collective discrimination.'[13]

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अल्पसंख्याकांची संकल्पना स्पष्ट करताना म्हणाले की, 'अल्पसंख्याक' शब्द अल्पसंख्याकांच्या तांत्रिक तथ्यानांच प्रस्तुत करीत नाही तर अशा अल्पसंख्याकांनादेखील प्रस्तुत केले जाते की जे सांस्कृतिक आणि भाषिक दृष्टिकोनातूनसुद्धा अल्पसंख्याक आहेत.' अशा भाषिक अल्पसंख्याकांचे समूह की, ज्याची भाषा

ही राज्याच्या भाषेपेक्षा वेगळी असते किंवा जिल्हा वा तालुक्याच्या भाषेपेक्षा भिन्न असते. ब्रिटीश काळापासूनच भारतातील प्रांताच्या भाषेच्या आधारावर विभाजित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यपुनर्रचना आयोग २९ डिसेंबर १९५३ रोजी स्थापन करण्यात आला. या आयोगाने १९५५ मध्ये आपल्या अहवालात भाषिक आधारावर राज्यांच्या सीमा निर्धारीत करण्यात याव्यात यावर भर दिला. त्यानुसार १९५६ मध्ये भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्यात आली व भाषिक राज्य स्थापन करण्यात आले. त्यामुळेच भाषिक अल्पसंख्याकांच्या समस्या मोठ्या प्रमाणात कमी झाल्या असे वाटत असले तरी आजही ही समस्या कायम आहे.

राज्य पुनर्रचना आयोगानुसार एक भाषिक राज्य स्थापन करण्यात आल्याने कर्नाटक राज्यात मराठी या भाषिक अल्पसंख्याकांच्या समस्या निर्माण झाल्या. गेली ५८ वर्षे हे मराठी भाषिक अल्पसंख्याक अनेक समस्यांनी ग्रासले आहेत. बहुसंख्याक भाषिक घटकांकडून त्यांना सतत वेगळेपणाची जाणीव करून देणे, त्यांना हक्क आणि अधिकार यापासून वंचित ठेवणे, त्यांच्यावर दबाव, दहशत निर्माण करणे, त्यांच्या भाषा, संस्कृतीवर आक्रमण करणे इ. अनेक अन्याय आणि अत्याचार अल्पसंख्याकांवर केले जात आहेत.

केंद्राच्या भाषिक अल्पसंख्याक कायदयानुसार कोणत्याही जिल्ह्यात एखाद्या भाषेचे लोक १५% पेक्षा जास्त असतील तर त्यांची राज्यकारभार भाषा, कायदा आणि राज्य शासनाने काढलेली कागदपत्रासंबंधीची परिपत्रके, आदेश हे त्यांच्या भाषेत पुरविणे सक्तीचे असताना सीमाभागात त्या कायद्याचे पालन होताना दिसत नाही. (घटनेतील कलम १४, १६, १९, २९, ३०, ३४५, ३५० कलम) पावलोपावली इथल्या मराठी माणसाच्या घटनात्मक अधिकारांची पायमल्ली कानडी सरकार करत आहे.[१४]

कर्नाटक राज्यात मराठी भाषिक अल्पसंख्याक असले तरी सीमाभागात मराठी भाषिक नागरिकांची संख्या कन्नड भाषिकांपेक्षा कितीतरी अधिक आहे. कर्नाटक राज्यकारभार भाषा कायदा १९६३ नुसार कन्नड ही राज्यभाषा म्हणून जाहीर झाली असली तरी राष्ट्रीय भाषिक अल्पसंख्याक

धोरणानुसार ज्या जिल्ह्यात १५% पेक्षा जास्त लोक राज्यभाषेत्तर मातृभाषा असणारे आहेत, त्यांच्यासाठी पर्याय म्हणून त्यांच्या भाषेपैकी कोणत्याही भाषेची राज्यकारभार भाषा म्हणून तरतूद केली गेली नसल्याने सदर कायदा, राज्यभाषा आणि कर्नाटक शासनाने त्या कायद्यासंबंधी प्रकाशित केलेली परिपत्रके आणि आदेश हे सर्व भाषिक अल्पसंख्याकांच्या संदर्भात राष्ट्रीय धोरणांच्या विरूद्ध, घटनाविरूद्ध आणि म्हणूनच अनधिकृत व बेकायदा ठरतात. शाळेमध्ये कन्नड भाषा शिकण्याची इच्छा नसणाऱ्या विद्यार्थ्यांना सक्तीने विषय देणे म्हणजे घटनेने देशाचे नागरिक म्हणून त्यांना बहाल केलेल्या व्यक्तिस्वातंत्र्यावरच गदा आणण्यासारखे आहे.

### ४.६.१.१ अल्पसंख्याक – घटनेतील तरतूद

लोकशाही प्रक्रियेत बहुमत आणि बहुसंख्याक यांचे समीकरण जुळून अल्पसंख्याकांवर बहुसंख्याकांची हुकुमशाही प्रस्थापित होण्याची शक्यता असते. अल्पसंख्याकांच्या दृष्टीने धार्मिक स्वातंत्र्याइतकेच शैक्षणिक, सांस्कृतिक हक्क, त्यांची अस्मिता टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे व पूरक हक्क आहेत. समाजातील बहुसंख्याकांचा लोकशाही पद्धतीत पडणारा प्रभाव लक्षात घेता अल्पसंख्याकांच्या हक्कांचे जतन होणे राष्ट्रीय एकोप्याच्या दृष्टीने महत्त्वाचे होते याची जाणीव घटनाकारांना असल्याने भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारामध्ये कलम २९ व ३० यामध्ये त्याविषयीची तरतूद केली आहे.

**कलम २९**

१. भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वत:ची वेगळी भाषा, लिपी वा संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा हक्क असेल.

२. राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्य निधीतून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

**कलम ३०**

१. धर्म किंवा भाषा या निकषांनुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

[१][ (१) खंड (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे एखाद्या अल्पसंख्याक वर्गाने स्थापन केलेल्या व प्रशासलेल्या शैक्षणिक संस्थेची कोणतीही मालमत्ता सक्तीने संपादन करण्याची तरतूद करणारा कोणताही कायदा करताना राज्य अशा मालमत्तेच्या संपादनाबद्दल अशा कायदयाने निश्चित केलेल्या किंवा त्याखाली ठरवलेल्या रकमेमुळे, त्या खंडाखाली हमी दिलेला अधिकार निर्बंधित किंवा निराकृत होणार नाही, अशा प्रकारची ती रक्कम आहे, याबद्दल खात्री करून घेईल. ]

२. शैक्षणिक संस्थांना सहाय्य देताना राज्य, एखादी शैक्षणिक संस्था ही धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या एखाद्या वर्गाच्या व्यवस्थापनाखाली आहे, या कारणावरून तिला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.[१५]

अल्पसंख्याकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी केंद्र पातळीवर राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग व राज्यपातळीवर राज्य अल्पसंख्याक आयोग कार्यरत असून या आयोगाच्या माध्यमातून भाषिक, धार्मिक अल्पसंख्याकांचे अधिकार सुरक्षित ठेवले जातात. यासंदर्भात भारतीय राज्यघटनेच्या ३५० ख मध्ये तरतूद करण्यात आली आहे.

३५० ख १) भाषिक अल्पसंख्याक समाजाकरिता एक विशेष अधिकारी असेल व तो राष्ट्रपतीने नियुक्त करावयाचा असेल.

२) भाषिक अल्पसंख्याक समाजाकरिता या संविधानाखाली उपबंधित केलेल्या संरक्षण तरतुदीसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण करणे व राष्ट्रपती निर्देशित करील अशा कालांतरागणिक त्या बाबीसंबंधी राष्ट्रपतीला अहवाल देणे हे विशेष अधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल आणि राष्ट्रपती असे सर्व अहवाल संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर

[१] (''संविधान (चव्वेचाळीसावी सुधारणा) अधिनियम १९७८'' कलम ४ द्वारे खंड १ (क) घातला (२० जून १९७९) रोजी व तेव्हापासून )

ठेवण्याची आणि संबंधित राज्याच्या शासनाकडे पाठविण्याची तजवीज करील.

वरील तरतुदीनुसार राष्ट्रपतीना भाषिक अल्पसंख्याक समाजाकरिता आयोग नेमण्याचा अधिकार असेल. या आयोगात अध्यक्ष, उपाध्यक्ष व चार सदस्य असे एकूण सहा सदस्य समाविष्ट असतात..

**आयोगाची कार्ये**

१. केंद्र आणि राज्य शासनांतर्गत अल्पसंख्याकांच्या विकासाच्या वाटचालीचे मूल्यमापन करणे.

२. राज्यघटना आणि कायदेमंडळ व राज्य विधिमंडळाच्या कायद्यानुसार दिलेले अधिकार व हक्कांची अंमलबजावणी व पालन होते काय याची तपासणी करणे.

३. अल्पसंख्याकांना देण्यात आलेले अधिकार व हक्कांचे रक्षण यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे.

४. अल्पसंख्याकांचे संरक्षण आणि त्यांच्या हक्कासंदर्भात फिर्यादी, तक्रारी लक्षात घेऊन संबंधित अधिकारी व विभागाकडे तशी चौकशी व सूचना करणे.

५. अल्पसंख्याकांच्या विरोधात केलेले भेदभाव व त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या व त्यांची कारणे यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजनात्मक शिफारशी करणे.

६. अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक आणि सामाजिक, आर्थिक विकासाशी संबंधित प्रश्नांचे संशोधन व विश्लेषण करण्यासाठी अभ्यासाचे आयोजन करणे.

७. केंद्र किंवा राज्यशासनाकडून अल्पसंख्याकांची जनगणना केली जाते, तेव्हा त्यासंदर्भात योग्य सूचना करणे.

८. अल्पसंख्याकांच्या मुख्य समस्या किंवा विशिष्ट प्रश्नावर विशेष अहवाल केंद्र सरकारकडे पाठवणे.

९. केंद्र सरकारने हाती घेतलेल्या विशिष्ट उपक्रमांसंदर्भात अहवाल सादर करणे.

इ. कार्ये राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाला करावी लागतात.

### ४.६.१.२ भाषिक अल्पसंख्याकांबाबत राष्ट्रीय धोरण[१६]

केंद्रीय शैक्षणिक सल्लागार समिती आणि भारत सरकार यांनी ऑगस्ट १९४९ मध्ये शालेय शिक्षणमंत्र्यांच्या परिषदेमध्ये भाषिक अल्पसंख्याकांबाबत राष्ट्रीय धोरण तयार करण्यात आले. त्यामध्ये असा ठराव संमत करणेत आला की,

१. कनिष्ठ स्तरावरती विद्यार्थ्यांच्या सूचना आणि परीक्षांचे माध्यम हे त्यांच्या मातृभाषेतच असले पाहिजे. तसेच जर विद्यार्थ्यांची मातृभाषा आणि राज्यभाषा वेगळी असल्यास आणि त्या शाळेमध्ये कमीत कमी ४० विद्यार्थ्यांची भाषा राज्यभाषेपेक्षा वेगळी असेल व एका वर्गात अशा प्रकारचे कमीत कमी तीन विद्यार्थी असतील तर त्या विद्यार्थ्यांच्या मातृभाषेतूनच त्यांना शिक्षण देण्यासाठी एका स्वतंत्र शिक्षकाची नियुक्ती करणे बंधनकारक आहे.

२. तसेच कनिष्ठ स्तरावरती आणि इयत्ता तिसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना राज्यभाषेची ओळख करून देण्याची सक्ती करण्यात येऊ नये.

३. तसेच अशा विद्यार्थ्यांना मातृभाषेकडून राज्यभाषेकडे वळविताना कनिष्ठ स्तरानंतर दोन वर्षापर्यंत मातृभाषेतूनच परीक्षा देण्याची पर्यायी व्यवस्था करावी. त्यांना राज्यभाषेतूनच परीक्षा देण्याची सक्ती करू नये.

४. त्याचबरोबर माध्यमिक स्तरावर जर जास्तीत जास्त विद्यार्थी हे राज्यभाषेपेक्षा मातृभाषेतूनच शिक्षण घेणारे असतील आणि ती संख्या शाळा सुरू करण्यासाठी पुरेशी असेल तर त्या शाळांचे सूचनांचे माध्यम हे मातृभाषेतूनच असेल असा देखील ठराव संमत करणेत आला. अशाप्रकारच्या शाळा जर खाजगी संस्थेमार्फत सुरु करण्यात आल्या असतील तर त्या शाळा शासनाच्या नियमानुसार मान्यतेस आणि अनुदानास पात्र असतील असाही ठराव करण्यात आला आहे.

५. त्याचबरोबर एकूण विद्यार्थी संख्येच्या $^{१}/_{३}$ विद्यार्थी हे राज्यभाषेपेक्षा मातृभाषिक असतील तर जिल्हास्तरावरील आणि महानगरपालिकेच्या सर्व शाळांना हा नियम लागू राहील.

**प्राथमिक शिक्षण**

१९४९ च्या शिक्षणमंत्र्यांच्या परिषदेमध्ये संमत करण्यात आलेले वरील ठराव हे भारतीय संविधान कलम २१ (सातवी दुरूस्ती) ३५० (अ) नुसार प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत वरील सर्व नियम हे सर्व राज्यांना बंधनकारक असून ज्या राज्यांनी अद्यापि लागू केलेले नाहीत त्यांनाही ते बंधनकारक आहेत.

तसेच महानगरपालिका आणि तालुक्याच्या अखत्यारीत अल्पसंख्याक भाषिक हे १५ ते २०% जर असतील तर त्यांना सरकारी नोटीस आणि नियम हे त्यांच्या मातृभाषेतच देण्यात यावेत असे राज्यपुनर्रचना आयोगाने सूचित केलेले आहे.

भाषिक अल्पसंख्याकाबाबत राष्ट्रीय धोरणामध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाबाबत ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्या पाहता आज कर्नाटक सरकारकडून त्या तरतुदींचे उल्लंघन होत असल्याचे दिसते. बेळगाव, खानापूर, चिक्कोडी, हुक्केरी व अथणी या पाच सीमावर्ती तालुक्यांमध्ये जवळजवळ ६० टक्क्यांपेक्षा अधिक लोक मराठी भाषिक असून प्रत्येक गावामध्ये मराठी शाळा आहेत. मराठी शाळातून पुरेशी विद्यार्थी संख्या आहे. पण भाषिक अल्पसंख्याक धोरणानुसार कर्नाटक राज्याचा विचार करता मराठी भाषिक हे अल्पसंख्याक ठरतात. कर्नाटक सरकारने मराठी भाषिकांना अल्पसंख्याक ठरविले खरे पण घटनेने तरतुदी केल्याप्रमाणे त्यांची अंमलबजावणी कर्नाटक सरकारने केलेली दिसून येत नाही. वरील पाच तालुकयांचा विचार करता प्रत्येक गावात कर्नाटक सरकारने पुरेशी विद्यार्थी संख्या नसतानाही कन्नड शाळा सुरू केलेल्या आहेत. याबाबत मराठी भाषिकांचे दुमत नसून मराठी शाळांमध्ये कर्नाटक सरकारने राज्याच्या भाषेची सक्ती करू नये. राष्ट्रीय धोरणानुसार आज प्रत्येक गावात ६० ते ६५ टक्के मराठी भाषिक असताना त्यांच्या मराठी या मातृभाषेतूनच शिक्षण घेण्याची सोय असली पाहिजे. तसेच त्यांच्या परीक्षांचे माध्यमही मराठीच असले

पाहिजे. अगदी प्राथमिक स्तरावरील लहान मुलांना कन्नड भाषेची सक्ती करणे म्हणजे भाषिक अल्पसंख्याक असूनही त्यांचे हक्क, अधिकार हिरावून घेणे, त्यांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्यावर गदा आणणे होय. त्यांच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली करणे होय.

तसेच माध्यमिक स्तरावरसुद्धा वरील तालुक्यातील बहुतांशी खेड्यांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी हे मराठी भाषिकच असून अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतूनच शिक्षण दिले पाहिजे व त्यांचे परीक्षांचे माध्यम हे मराठीच असले पाहिजे. इतकेच नाहीतर महानगरपालिका आणि तालुक्याच्या अखत्यारीत अल्पसंख्याक भाषिक हे जर १५ ते २०% असतील तर त्यांना सरकारी नोटीस आणि पत्रके हे त्यांच्या मातृभाषेतूनच देण्यात यावेत असेही भाषिक अल्पसंख्याक आयोगाने सूचित केलेले असताना कर्नाटक सरकारने केवळ मराठी भाषाद्वेष या कारणास्तव स्थानिक ग्रामपंचायतीपासून ते तालुका पंचायत, जिल्हा पंचायत, पोलीस, कोर्टकचेऱ्या, महसूल विभाग, वीज, टेलिफोन, विमा, परिवहन इ. सरकारी कार्यालयातील सर्व कागदपत्रे कानडी भाषेतच ठेवून अल्पसंख्याकांच्या हक्कांची पायमल्ली केली आहे.

यासंदर्भात सीमावासीयांची संघटना म्हणून महाराष्ट्र एकीकरण समितीने वेळोवेळी याबाबत जिल्हाधिकारी, अल्पसंख्याक आयोगाकडे निवेदने केली आहेत. पण कर्नाटक सरकारने आपल्या मताशी ठाम राहून अधिक जोमाने मराठी भाषिकांची गळचेपी करण्याचे कारस्थान सुरू केले आहे.

### ४.६.१.३ कर्नाटक सरकारचा खोटारडेपणा

केंद्र सरकारने बेळगावला उप अल्पसंख्याक आयोगाची स्थापना केली आहे. गेली कित्येक वर्षे महाराष्ट्र एकीकरण समितीने मराठी व उर्दू भाषिकांना त्यांच्या भाषेतून सरकारी कागदपत्रे मिळावीत म्हणून अल्पसंख्याक आयोगाला अनेक निवेदने दिली. आयोगाने कायद्यानुसार कर्नाटकाला कार्यवाही करण्यास सांगितले. पण कर्नाटक सरकारने त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले. तीव्र संताप आणणारी बाब म्हणजे कर्नाटक सरकारने केंद्र सरकारच्या अल्पसंख्याक आयोगाला पत्र लिहिले आहे की, आम्ही पूर्वीपासून मराठी सीमाभागात सरकारी कागदपत्रे मराठीतून देत आहोत असे खोटे पत्र लिहून कायद्याचा भंग केला आहे. तसेच जुलै २०११ मध्ये मानवी हक्क आयोगाने कर्नाटक

सरकारला दिलेल्या नोटीसीला कर्नाटक सरकारने चक्क खोटे उत्तर देताना ''मराठी भाषिकांना त्यांच्या भाषेत कागदपत्रे दिली जातात असे लेखी सांगितले आहे.''

भाषिक अल्पसंख्याकाबाबतच्या राष्ट्रीय धोरणात ज्या घटनात्मक तरतुदी दिल्या आहेत त्यासुद्धा पाळल्या जात नाहीत. येथील मराठी भाषिकांच्या घटनात्मक अधिकारांची पायमल्ली होत असल्याने त्यांना भारतीय लोकशाही देशात असूनसुद्धा पारतंत्र्यात असल्यासारखे जीवन जगावे लागत आहे. या सीमाप्रदेशातील मराठी भाषा, संस्कृती नष्ट करून कन्नड भाषेचा प्रसार व प्रचार करण्यासाठी कर्नाटक सरकार विविध षडयंत्रे राबवित असल्यामुळे मराठी भाषिक आज पोरका झालेला आहे. त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्या समस्या पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या आहेत.

### ४.६.२ शैक्षणिक समस्या

१९५८ मध्ये म्हैसूर शासनाने चौथ्या इयत्तेपासून कन्नड सक्तीने शिकविण्याचे ठरविले तेव्हा या प्रदेशातील लोकांनी, ''येथील विद्यार्थ्यांचा कन्नड भाषेशी त्यांच्या पूर्वजांच्या काळापासून कधीच संबंध नव्हता'' असे अभिवेदन केले. १९६० मध्ये म्हैसूर शासनाने मराठी माध्यमातून शिकवणाऱ्या शिक्षकांची अध्यापनक्षमता आजमावण्याकरिता एका समितीची स्थापना केली होती. तथापि समितीच्या कोणत्याही सदस्याचा मराठीशी परिचय नव्हता. मराठी माध्यमातील प्रायोगिक पाठ मंडळाचे अध्यक्षही मराठी बोलू शकत नव्हते. अशा परिस्थितीत मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर दुष्परिणाम झाला. शाळांमधील मराठी माध्यम असलेले विभाग नष्ट करण्याचे व मराठी माध्यम असलेल्या शिक्षकांची संख्या कमी करण्याचे प्रयत्न करण्यात आले अशीही तक्रार करण्यात आली आहे. शासनाने मराठी शाळांना पुरवलेले तक्ते, नकाशे, प्रपत्रे इ. साहित्य कानडीत असल्यामुळे त्यांचा काहीही उपयोग नाही. शाळा उघडण्याच्यावेळी मराठी शाळांकरिता असलेली पाठ्यपुस्तके उपलब्ध करतात तर ती चार महिन्यांनी किंवा त्याहूनही अधिक कालावधीनंतर बाहेर पडतात. त्यामुळे शिक्षकांना अभ्यासक्रम पूर्ण करणे कठीण होते. मराठी शाळांची उपेक्षा होत असल्यामुळे पुष्कळसे पालक आपल्या पाल्यांना महाराष्ट्रातील किंवा हैद्राबादमधील शाळांत पाठवत आहेत.[१७]

### ४.६.२.१ शाळांमध्ये कन्नड सक्ती

१९८६ च्या कन्नडसक्तीमुळे मराठी माध्यमाच्या शाळेमध्ये कन्नड हा विषय सक्तीचा करण्यात आला आहे. पण सीमाभागातील लोकांची मातृभाषा मराठी असल्याने कन्नड विषय आत्मसात करणे अवघड जात आहे. तरीपण कर्नाटक सरकारच्या कन्नड सक्ती धोरणामुळे इयत्ता १ ली ते १० वीपर्यंत कन्नड विषय उत्तीर्ण होण्याचे बंधन आहे. त्यामुळे विद्यार्थी नाईलाजास्तव या विषयाची कशीतरी परीक्षा देतात आणि शिक्षण मंडळाच्या परोपकाराने चांगल्या मार्कानी उत्तीर्णही होतात. अशा विद्यार्थ्यांना आजही कन्नड भाषा व्यवस्थित लिहिता येत नाही वा बोलता येत नाही. पण आपली मातृभाषा असणाऱ्या मराठी विषयापेक्षा अधिक गुण कन्नड विषयाला पडतात. यामागचे कर्नाटक शिक्षण मंडळाचे कारस्थान म्हणजे सीमाभागातील एकाही विद्यार्थ्याला कन्नड विषयात अनुत्तीर्ण करायचे नाही, त्याला कन्नड भाषा लिहिता, बोलता येते हे दाखविण्याचा कर्नाटक सरकारचा खटाटोप असतो. तसेच कन्नड भाषेचा प्रसार करणे व सीमाभागात कन्नड भाषिक लोकसंख्या वाढविणे हाही सरकारचा उद्देश संशोधकाला मुलाखतीतून दिसून आला.

सुळगे येथील नेताजी हायस्कूलचे मुख्याध्यापक अशोक चौगुले सांगतात, मराठी भाषिक मुलांना कन्नड भाषेबद्दल आदर निर्माण करणे शिक्षकांना पराकाष्ठेचे काम आहे. विशेषकरून मराठी भागात जी मुले प्राथमिक शाळेत येतात त्यांना अजिबात कन्नड येत नाही. परिणामी विद्यार्थी कन्नड भाषा शिकण्यास उत्सुक नसतात. कन्नड भाषा येत नसल्याचा परिणाम ते विद्यार्थी कन्नड भाषेचा तिरस्कार करतात.

### ४.६.२.२ एस. एस. एल. सी. बोर्डाचा भेदभाव

सीमाभागातील कन्नड भाषिकांबरोबरच मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांवरही माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र (एस. एस. एल. सी.) बोर्डाकडून अन्याय होताना दिसून येतो. दहावी (एस. एस. एल. सी.) परीक्षेमध्ये विचारण्यात आलेल्या चुकीच्या प्रश्नांना ग्रेस मार्कांची (जादा गुण) भेट देताना कन्नड माध्यमासाठी सहा तर मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना केवळ दोन मार्क ग्रेस देण्याचा निर्णय अन्यायकारक ठरतो. तर विज्ञान विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये तीन प्रश्न हे पुस्तकबाह्य स्वरूपातील

होते. यामुळे मराठी भाषिक विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे देता आली नाहीत. याचा परिणाम त्यांना आपले गुण गमाविण्याची वेळ आली. पर्याय म्हणून तीन ग्रेस मार्क देण्यात आले तर अशाच प्रकारच्या चुका कन्नड माध्यमाच्या गणित विषयातही झाल्या होत्या. परंतु कन्नड विद्यार्थ्यांना सहा ग्रेस मार्क देण्यात आले. यावरून मराठी व कन्नड माध्यमाच्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षण बोर्डाकडूनही जाणिवपूर्वक भेदाभेद होत असल्याचे दिसून येते. यावरून कर्नाटक परीक्षा बोर्ड भाषेचे राजकारण करत असलेले दिसून येते. मराठी विद्यार्थ्यांना कमी गुण मिळाल्याने त्यांची पीछेहाट होत आहे.[१८]

### ४.६.२.३ राष्ट्रीय भाषेपासून वंचित

सीमाभागातील मराठी मातृभाषिक विद्यार्थी मराठी, इंग्रजी, कन्नड भाषा शिकतात. राज्यभाषेच्या (कन्नडच्या) सक्तीमुळे या विद्यार्थ्यांना पहिली ते दहावीपर्यंत हिंदी विषय शिकविला जात नाही. राष्ट्रीय पातळीवरील परीक्षांमध्ये हिंदी विषय नसल्यामुळे येथील विद्यार्थ्यांना संधी गमवावी लागते. कन्नड सक्तीच्या धोरणामुळे अनेक मराठी भाषिक पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये दाखल करत आहेत.

एकंदरीत कर्नाटक सरकारच्या धोरणामुळे सीमाभागात मराठी माध्यमाच्या शाळांची स्थिती हळूहळू बिकट होत आहे. अनेक ठिकाणी ज्या माध्यमिक शाळा आहेत त्यांना 'भाषिक अल्पसंख्याक' प्रमाणपत्र देण्यासही सरकार टाळाटाळ करीत आहे. अनेक माध्यमिक शाळांना सरकारचे अनुदान २०-२५ वर्षे मिळत नाही. परिणामी अनेक होतकरू मराठी भाषिक शिक्षकांचे आयुष्य पगार न घेताच संपून जाते.

शैक्षणिक वर्ष उलटले तरी मराठी माध्यमाची पाठ्यपुस्तके उपलब्ध करून दिली जात नाहीत. त्या पाठ्यपुस्तकांमध्ये किमान २० टक्के शब्द चुकीचे असतात. सरकारी मराठी शाळांच्या प्रश्नपत्रिकाही अगदी चुकीच्या निघतात. मराठी पाठ्यपुस्तकात एवढ्या चुका असतात की, असे चुकीचे मराठी शिकण्यापेक्षा न शिकलेले बरे असे म्हणायची वेळ येते. इयत्ता पहिलीच्या मराठीच्या पुस्तकावरच 'मराटी' असे छापण्यात आले आहे तर परिसर अध्ययन या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर 'परिसर अघय्यन' असे छापण्यात आले आहे तर मराठी पाठ्यपुस्तकामध्ये राष्ट्रगीत चक्क

कन्नड भाषेमधून छापले आहे.[१९] याचा परिणाम असा झाला की, मराठी लोकांनी आपली मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्यास सुरूवात केली. मराठी शाळांचे इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग अगदी दोन खोल्यांमध्ये भरतात. केंद्र सरकार एकीकडे राष्ट्रीय शिक्षा अभियान चालवते आणि कर्नाटक सरकार मात्र इकडे शिक्षणाची अशी कोंडी करते. राज्यात शिक्षण हक्क कायदा लागू झाल्यानंतर ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची घोषणा शिक्षण खात्याने केली आहे पण बेळगावात नानावाडी येथील मराठी शाळा रस्त्यावर भरविली जात असल्याचे चित्र दिसून येते. गेले वर्षभर ही शाळा एका खाजगी गॅरेजमध्ये चालविण्यात आली होती. हे पाहून स्थानिक नागरिकांनी व शाळा सुधारणा समितीने शाळा रस्त्यावरच भरविण्याचा निर्णय घेतला. बेळगाव येथे १९४२ मध्ये सुरु झालेल्या मराठी शाळा क्र. ३७ ची इमारत गेल्यावर्षी मूळ मालकाने ताब्यात घेतली. तेव्हापासून या शाळेच्या इमारतीचा प्रश्न कर्नाटक शासन दरबारी रेंगाळत असल्याचे दिसून येते. सदर शाळेमध्ये ४० विद्यार्थी व ३ शिक्षक असून विद्यार्थ्यांचे पालक व शिक्षक यांच्यापुढे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा पेच निर्माण झालेला दिसून येतो. शाळेतील सर्व मुले ही गरीब कुटुंबातील असून त्यांची शाळाच पोरकी झाल्याने विद्यार्थ्यांचे भविष्यही टांगणीला लागले आहे. यासंदर्भात ॲड. माधवराव चव्हाण व शाळा सुधारणा समिती सदस्यांनी जिल्हाधिकारी अन्बुकुमार यांची भेट घेऊन जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी मराठी द्वेषापोटी फक्त आश्वासनच दिले तर इतर अधिकाऱ्यांकडून कोणताच प्रतिसाद मिळाला नसल्याचे दिसून येते.[२०] परिणामी ॲड. चव्हाण यांनी शेवटी आपल्या घरातच शाळा भरविल्याचे संशोधकाला दिसून आले. वरील उदाहरणे ही प्रातिनिधिक स्वरूपाची असून सीमाभागातील अनेक खेडयांमध्ये मराठी शाळांची दुरावस्था झालेली असून त्याकडे कर्नाटक सरकारने साफ दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

### ४.६.२.४ शिक्षकांची कमतरता

कर्नाटक सरकारकडून सीमाभागातील मराठी शाळा बंद पाडण्याच्या कारस्थानाला गती देण्यात आलेली आहे. खानापूर तालुक्यात १९० ते २०० मराठी शिक्षकांची कमतरता असतानाही त्या जागा भरण्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे तालुक्यातील मराठी शाळाच बंद पडण्याची भिती आहे.

कर्नाटक शासनाने अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण कटकारस्थानाने मराठी बहुल असलेल्या कारवार व हल्याळ येथील शंभर टक्के मराठी असणाऱ्या शेकडो शाळा बंद पाडून कानडी शाळा सुरू ठेवल्या आहेत. शाळांमध्ये पुरेसे विद्यार्थी असतानाही एकशिक्षकी शाळा चालविण्यात येत आहेत. यात पहिली ते पाचवी, सहावी व सातवी वर्गांचा समावेश आहे तर काही शाळांमध्ये विद्यार्थी व इमारत आहे पण शिक्षकच नाहीत. शिवाय कमी पटसंख्या असणाऱ्या शाळा गोठवून त्यांचे नजिकच्या शाळेमध्ये विलिनीकरण चालू केलेले आहे. त्यामुळे मराठी शाळांचा बीमोड करण्याचा कुनियोजित कट आखण्यात येत आहे.

तसेच कर्नाटक सरकारने बेळगाव जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याची 'अतिथी' योजना सुरू करून प्रत्येक तालुक्यात शिक्षक भरती प्रक्रिया सुरू केली आहे. पण यामध्ये कन्नड शिक्षकांचा भरणा अधिक असून मराठी अतिथी शिक्षकांचा भरणा तुलनेने कमी करून एकप्रकारे मराठी शाळांवर गंडातर आणण्याचे धोरण सरकारने केले आहे. तर सीमाभागातील सर्वच मराठी शाळांचे मुख्याध्यापक जाणीवपूर्वक कानडी नेमण्यात आले आहेत.

### ४.६.२.५ मराठी भाषिक शिक्षकांची बदली

मराठी शाळा बंद पाडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न शिक्षण विभागाकडून होत आहे. मराठी शाळेमध्ये शिक्षक कमी करणे, असलेल्या शिक्षकांची बदली करणे की ज्यामुळे मराठी माध्यमांच्या मुलांची शैक्षणिक आबाळ व्हावी व शैक्षणिक नुकसानीच्या भितीने त्यांनी कन्नड माध्यमांचा स्वीकार करावा असा हेतू यापाठीमागे कर्नाटक सरकारचा आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे रयत गल्ली वडगाव येथे पंच कमिटीच्या इमारतीत १९५२ साली शामराव देसाई यांच्या

मार्गदर्शनाखाली शेतकरी व गरीब समाजाकडून सर्वसामान्य समाजाला शिक्षणाचा लाभ मिळावा या हेतूने शाळा सुरू केली. या शाळेतून हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन उच्च पदावर कार्य करीत आहेत. विद्यार्थ्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे कर्नाटक सरकारची वक्रदृष्टी या शाळेकडे वळली या शाळेतील शिक्षिकेची दुसरीकडे कामगारी बदली केली व मुख्याध्यापकांचीही बदली करण्याचे ठरविले. त्यामुळे शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारमय बनले.

गणतीच्या कामनिमित्त निवेदिता मुचंडी नावाची मराठी शिक्षिका महापालिकेत अधिकाऱ्याला माहिती विचारायला गेली असता अधिकाऱ्याने सदर शिक्षिकेचा अवमान तर केलाच शिवाय कन्नड शिकण्याची तंबीही दिली आणि अर्वाच्च शिवीगाळ केली. ही गोष्ट मराठी युवा आघाडीला कळताच त्यांनी सदर अधिकाऱ्याला महापालिकेत जावून गाठून त्यास जाब विचारला. शेवटी लिखित आणि जाहीर माफी मागायला भाग पाडले. कर्नाटक सरकार या ना त्या कारणाने सीमाभागातील मराठी भाषिक शिक्षकांना त्रास देत असते. त्यात सरकारी अधिकारीही मागे नाहीत, हेच यावरून दिसून येते.[२१]

सीमाभागात जिथे जिथे मराठी शिक्षकांसाठी प्रशिक्षण दिले जाते तेथे प्रत्यक्ष जेवण देतेवेळीसुद्धा मराठी भाषिक शिक्षकांना दुय्यम वागणूक दिली जाते तर काही वेळेला उपाशीही ठेवले जाते.

तसेच कर्नाटक सरकारने सीमाभागातील मराठी साहित्य संमेलनांनाही आता लक्ष्य करणे सुरू केले आहे. २६ डिसेंबर २०११ रोजी सांबरा मराठी साहित्य संमेलनात सीमाप्रश्नासंबंधी ठराव मांडण्यात आला. कर्नाटकच्या विरोधात हा ठराव असल्याचे कारण देत तालुका शिक्षणाधिकाऱ्याने संमेलनाचे आयोजक असलेल्या दिलीप चव्हाण यांना कारणे दाखवा नोटीस बजावली. दिलीप चव्हाण शिक्षक असल्यामुळे त्यांना अशा पद्धतीने लक्ष्य करण्याचा प्रयत्न झाला. गेली सहा वर्षे या संमेलनात सीमाप्रश्नाचा ठराव मांडण्यात येत होताच नोटीस मात्र यंदा पहिल्यांदाच देण्यात आली. यापूर्वी खरं तर संमेलनांवर कर्नाटकाच्या प्रशासनाची वक्रदृष्टी पडली नव्हती. याचा परिणाम असा झाला की उचगावच्या साहित्य संमेलनात सीमाप्रश्नाचा ठरावच मांडला गेला नाही. सीमाभागातील संमेलनात

मोठ्या प्रमाणात शिक्षक काम करतात ते कर्नाटक सरकारचे थेट नोकर असल्याने त्यांना लक्ष्य करणे सुरू केले. ही संमेलने म्हणजे सीमालढ्याची सांस्कृतिक आघाडीच आहे.

### ४.६.२.६ डी. एड. च्या विद्यार्थ्यांना नापास

बॅचलर ऑफ एज्युकेशन (बी. एड.), डिप्लोमा इन एज्युकेशन (डी. एड.) चे निकाल सलग तीन वर्षे १० टक्क्यांपेक्षा कमी लागल्यास कॉलेजची मान्यता रद्द करण्याची तरतूद आहे. या तरतुदीचा फायदा घेऊन सीमाभागातील मराठी माध्यमाची डी. एड. कॉलेज बंद करण्याचे कटकारस्थान कर्नाटक सरकारने चालविले आहे. शैक्षणिक वर्ष २००८–०९ मध्ये डी. एड. बोर्डाने मराठी माध्यमाच्या डी. एड. चा निकाल अत्यल्प लावून अनेक मराठी भाषिक विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक नापास केले. बिदर जिल्ह्यात असलेल्या ३८ अध्यापक विद्यालयातून सुमारे ४२११ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली पण मराठीद्वेषातून फक्त एकच विद्यार्थ्याला उत्तीर्ण करून ०.०२% एवढा निचांकी निकाल लावून बोर्डाने विक्रम केला.[२२]

### ४.६.३ नोकरीविषयक समस्या

मराठी भाषिकांना कानडी म्हैसूर राज्यात समाविष्ट केल्याने त्यांना अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड दयावे लागते. कन्नड भाषा अवगत नसल्याने मराठी भाषिकांना सरकारी नोकरीमध्ये घेत नाहीत. शिक्षण कन्नड माध्यमातून असल्यामुळे मराठी विद्यार्थी स्वाभाविकपणेच कन्नड विद्यार्थ्यांशी चढाओढ करू शकत नाहीत. रस्त्यांची नावे, खुणेचे खांब, नावांच्या पाट्या, मैलाचे दगड, विहित अर्जांचे नमुने, सूचना वगैरेसारख्या लहानसहान गोष्टीतही कन्नड भाषा वापरून ती भाषा त्यांच्यावर मुद्दाम लादण्यात येत आहे. फौजदारी आणि दिवाणी अशा प्रकारच्या खटल्यात मराठी लिपीत व भाषेत असलेला पुरावा विचाराधीन असतो. परंतु पुष्कळसे न्यायाधीश, दंडाधिकारी आणि इतर कर्मचारीवर्ग यांना मराठीचे अक्षरही माहीत नसते त्यामुळे पुरावा असूनसुद्धा न्याय मिळत नाही. तसेच विक्रीकर, आयकर आणि इतर कार्यालयांच्या बाबतीतही अशीच स्थिती आहे. डाक आणि तार विभागातही कन्नड भाषाच वापरली जाते.[२३]

सीमाभागातील बेळगाव, बिदर आणि गुलबर्गा जिल्ह्यात केवळ मराठी भाषिक गावेच्या गावेच आहेत असे नाही. तर या गावात मराठी संस्कृती आहे. छ. शिवरायांचे पुतळे गावोगावी आहेत. सीमाभागातील मराठी भाषिक जनतेच्या जीवनातून मराठीची वजावट करण्यासाठी आत्ताचे सरकारच नाहीतर यापूर्वीच्या सरकारानीही जाणीवपूर्वक अत्यंत उर्मठपणे मराठीची मुस्कटदाबी करणारे प्रयोग केले आहेत. मराठी भाषिकांच्या मुलांनी जबरदस्तीने कन्नड शिकलेच पाहिजे, कर्नाटक सरकारात नोकरी हवी असेल तर कन्नड आलेच पाहिजे अशी सक्ती करण्यात आली आहे. मराठी शाळांमध्ये शिकलेला तरूण आपल्या गुणवत्तेच्या बळावर कर्नाटक सरकारच्या नोकरीत गेला तरी त्याला कन्नडची परीक्षा उत्तीर्ण केल्याशिवाय पगारवाढ किंवा नोकरीत कायम केले जात नाही.

केदनूर, ता. बेळगाव येथील मराठी शाळेच्या क्रीडास्पर्धेच्या निमंत्रण पत्रिकेत अग्रस्थानी मराठी भाषा वापरली म्हणून तालुका क्रीडा अधिकाऱ्यांनी हिंडलगा शाळेच्या मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस बजावली. त्यामुळे अनेक मराठी शिक्षक तरूणांना अर्धवट नोकरी सोडावी लागते. पर्यायाने सीमाभागातील पालक आपल्या मुलाला कन्नड भाषेचे शिक्षण घेण्याची सक्ती करतो. त्यामुळे मराठी शाळा बंद होत चाललेल्या दिसून येतात.

### ४.६.३.१ सीमाभागातील एस. सी., एस. टी. दाखला महाराष्ट्रात रद्द

सीमाभागातील अपूर्वा गोखलेकडे कर्नाटकातील मागासवर्गाचे जात प्रमाणपत्र होते. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने तिचे प्रमाणपत्र रद्द केले. कारण तिच्या कुटुंबियांनी १९७२ मध्ये कर्नाटकातून महाराष्ट्रात स्थलांतर केले होते असा अहवाल पोलिसांनी दिला होता. नियमानुसार परराज्यातील मागासवर्गीयांना महाराष्ट्रात अनुसूचित जाती–जमातीचे लाभ मिळत नाहीत. त्यामुळे अपूर्वालाही ते लाभ नाकारण्यात आले. जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात तिने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. राज्यसरकारने १० जुलै २००८ रोजी जारी केलेल्या निर्णयानुसार (जीआर) कर्नाटकाच्या सीमाभागातील ८६५ गावांमधील मराठी भाषिकांना महाराष्ट्रातील रहिवाशांप्रमाणेच मानण्याचा सरकारचा निर्णय आहे. त्यामुळे त्या जीआरनुसार त्या गावांमधील मागासवर्गीयांनाही महाराष्ट्रात मागासवर्गीयांचा दर्जा मिळावा असे अर्जदाराचे म्हणणे होते.

जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने 'जीआर' विचारात घेऊन पुन्हा माझ्या जात प्रमाणपत्रावर निर्णय घ्यावा असेही तिचे म्हणणे होते. समितीला तिच्याबाबत पुन्हा निर्णय घेण्याचा आदेश खंडपीठाने काही महिन्यांपूर्वी दिला होता. समितीने प्रकरण पुन्हा ऐकून तिचे प्रमाणपत्र रद्द केले. मागासवर्गीयांच्या संदर्भात १० ऑगस्ट १९५० ची 'प्रेसिडेन्शिअल ऑर्डर' महत्त्वाची आहे. १० जुलै २००८ रोजीचा 'जीआर' महत्त्वाचा नाही असे मत व्यक्त करून समितीने वरील आदेश दिले. तो आदेश न्या. डॉ. धनजंय चंद्रचूड व न्या. अमजद सय्यद यांच्या खंडपीठाने वैध ठरविला. अनुसूचित जाती–जमातीच्या व्यक्तीचे वास्तव्य जेथे नसते तेथे मागासवर्गीयांचे लाभ त्यांना मिळणार नाहीत. त्यामुळे स्थलांतरीत मागासवर्गीयांना त्यांच्या मूळ राज्यातील मागासवर्गीयांचे फायदे नव्या राज्यात मिळणार नाहीत असे सर्वोच्च न्यायालयानेही काही प्रकरणात सांगितले असल्याचा दाखला देवून खंडपीठाने जात पडताळणीचा दाखला आणि अपूर्वाची याचिका फेटाळली.[२४] तसेच कर्नाटकात परिचारिकेचा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या अनेक विद्यार्थ्यांना महाराष्ट्रात शासकीय अध्यादेशाचे कारण पुढे करून सीईटी प्रवेश नाकारण्यात आला.

परराज्यात अभ्यासक्रम पूर्ण केलेले महाराष्ट्रात नोकरीसाठी पात्र नाहीत असा खुलासा प्रशासनाच्यावतीने करण्यात आला. त्यामुळे सीमाभागातील अनेक विद्यार्थ्यांवर अन्याय झालेला दिसून येतो. त्यांची अवस्था 'आई जेवू घालिना आणि बाप भीक मागू देईना' अशी झाली आहे. कर्नाटक रहिवासी दाखला नसल्याने नोकरी नाही तर महाराष्ट्रात दाखला असून पदवी कर्नाटकची त्यामुळे नोकरी नाही.

### ४.६.४ प्रशासकीय समस्या

प्रशासनात कन्नड भाषेची अंमलबजावणी या योजनेखाली जिल्हा पंचायत बेळगावला ९३१ पत्रे कन्नडमधून तर इतर भाषेमधून ३७ पत्रे आली. जिल्हा पंचायतने एकूण १०९५ पत्रे केवळ कन्नडमधूनच सरकारला व विविध संघ–संस्थांशी पत्रव्यवहार करताना पाठविली आहेत. अन्य भाषेतून म्हणजे इंग्रजीमध्येसुद्धा जून २०११ मध्ये एकही पत्र पाठविले नसल्याचे स्पष्ट होते. यावरून सीमाभागात मराठी भाषिकांची गळचेपी होतच असल्याचे निदर्शनास येते.

जिल्हा पंचायतच्या कर्नाटक विकास कार्यक्रम मासिक आढावा बैठकीमध्ये सरकारच्या विविध खात्यांना कन्नडमध्ये किती पत्रे आली, इतर भाषेमधून किती आली व त्या खात्यातर्फे कन्नडमधून किती व इतर भाषेमधून किती पत्रव्यवहार केला याचा जूनमधील संपूर्ण तपशील कला व संस्कृती खात्याने दिला आहे. अबकारी उपायुक्त बेळगाव यांना कन्नडमधून १०३४ तर इतर भाषेमधून ३७ पत्रे आलेली आहेत. अबकारी खात्याने ३९७ पत्रे कन्नडमधून लिहिलेली आहेत. केवळ एक पत्र त्यांनी इतर भाषेमधून लिहिलेले आहे. रेशीम उपकामगार आयुक्त, आयुर्वेद योग, नॅचरोपॅथी, होमिओपॅथी विभाग उपसंचालक, जिल्हा उद्योग केंद्र बेळगाव, महिला व बालकल्याण अधिकारी या पाच खात्यांच्या अधिकाऱ्यांनी किती पत्रे कन्नडमध्ये व इतर भाषेमधून पाठविली त्याचा तपशीलच दिलेला नाही.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बेळगाव यांना ७३६ पत्रे कन्नडमध्ये, इतर भाषेमधून २२ पत्रे आली तर सदर खात्यातर्फे ७६८ पत्रे कन्नडमधून तर इतर भाषेमधून ९४५ पत्रे पाठवून देण्यात आली आहेत. वार्ता खात्याला कन्नडमधून १३० पत्रे आली तर कन्नडमधून १५० पत्रे पाठविली आहेत. एकही पत्र इतर भाषेमधून लिहिण्यात आलेले नाही. यावरून वार्ता खात्याने कन्नडची अंमलबजावणी शंभर टक्के केल्याचे स्पष्ट होते. तर जिल्हा नोंदणी अधिकाऱ्यांनी १९८ पत्रे कन्नडमध्ये तर इतर भाषेतून ४५ पत्रे आली आहेत. १२५ पत्रे इतर भाषेमधून लिहिण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. यावरून कर्नाटक सरकार कानडी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यास व त्याची सक्ती करण्याची कोणतीही संधी सोडत नाही. त्यासाठी इतर भाषिक अल्पसंख्याकांची कोणतीही कदर त्यासाठी केली जात नाही.

### ४.६.४.१ कन्नड सक्तीचे दुष्परिणाम

मराठी भाषिकांच्या इच्छेविरूद्ध त्यांच्यावर कन्नड भाषेची सक्ती करून हळूहळू त्यांची लिपी, भाषा आणि संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकार करीत आहे. कन्नड भाषा शिकण्याची इच्छा नसणाऱ्या भाषिक अल्पसंख्याकांवर ती भाषा शिकण्याची सक्ती करणे, त्यांच्या व्यक्तीस्वातंत्र्यावर गदा आणण्यासारखे आहे. कर्नाटक सरकारच्या नूतन भाषा धोरणांनुसार कन्नड

भाषिक विद्यार्थी कन्नड, इंग्रजी किंवा हिंदी या भाषा शिकू शकतो. परंतु कन्नडेत्तर भाषिक विद्यार्थ्यांना मातृभाषा, इंग्रजी किंवा हिंदी व कन्नड अशा भाषा शिकाव्या लागतात. एखाद्याला त्याची मातृभाषा शिकायची असेल तर त्यावर कन्नड सक्ती तर आहेच, परंतु इंग्रजी किंवा हिंदी यापैकी एक भाषा सोडावी लागते. आणि समजा एखाद्याला या दोन्ही भाषा शिकायच्या असतील तर मातृभाषेतून शिक्षण सोडावे लागेल अशावेळी लिपी, भाषा, संस्कृती टिकविणे साहजिकच कठीण जाते. म्हणून हे शैक्षणिक धोरण कलम २९ द्वारे मिळालेल्या घटनात्मक मूलभूत हक्कांचे हरण करणारे आहे.

बेळगावमधील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी शहरातील नामफलक, सूचनाफलक चार भाषेत लावण्यात यावेत असा ठराव सर्वभाषिक नगरसेवकांनी महापालिका बैठकीत एकमताने पास केला. पण प्रशासनाने या ठरावाची अंमलबजावणी न करता फक्त कानडी भाषेतीलच फलक लावले जात आहेत. जनतेच्या भावनांचा आदर करून लोकप्रतिनिधींनी सभागृहात ठराव केला. पण मराठी द्वेषामुळे महानगरपालिकेतील प्रशासकीय अधिकारी त्याची अंमलबजावणी करत नाहीत.

जिल्हा ग्रंथालय, कृषी खात्याचे संयुक्त संचालक, जिल्हा सांख्यिकी अधिकारी, सहकार खात्याचे उपनिबंधक, भूगर्भ व खनिज, मत्स्य खाते, पशुवैद्यकीय खाते, जिल्हा शिक्षणाधिकारी, वन उपसंरक्षणाधिकारी, जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ, जिल्हा विमा अधिकारी इत्यादी खात्यांनी आपल्या पत्रव्यवहारांचा तपशील दिलेला नाही. तालुका पंचायतीचे इतिवृत्त व बैठकीच्या नोटीसा मराठी भाषेमध्ये देण्यात याव्यात अशी मागणी मराठी सभासदाकडून केली गेली. पण त्याकडे दुर्लक्ष केले गेले. मराठी भाषेमध्ये इतिवृत्त न दिल्यामुळे तालुका पंचायत सदस्यांना चर्चेमध्ये भाग घेण्यास अडथळा येतो. संगणक न मिळण्याचे कारण प्रशासनाकडून पुढे केले जाते. काहीवेळा अखेरच्या क्षणी इतिवृत्त मराठीतून देण्यात येते. त्यामध्ये अक्षम्य चुका असतात. त्यामुळे लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या सभासदांना बैठकीमध्ये भाग घेण्यास अडथळा येतो. याबाबतची खंत पंचायत सदस्य सुरेश राजूकर, रामचंद्र कुद्रेमनीकर, प्रताप कोळी, रमेश बेळगावकर, सिद्धाप्पा छत्रे, मारुती भरगाण्णाचे इ. नी व्यक्त केले.

सरकारी कार्यालयात मराठी भाषेतून दिलेले तक्रार अर्ज स्विकारले जात नाहीत, कारण कर्नाटक सरकारने सीमाभागात मराठी भाषाच ठेवायची नाही असे ठरविले आहे. पोलीस ठाणे, सरकारी व निमसरकारी कचेऱ्या, सार्वजनिक संस्था, स्थानिक संस्था येथे मराठी भाषेतून अर्ज केला तर कानडी अधिकारी तो अर्ज फेकून देतो किंवा फाडून टाकतो. कन्नड भाषेत अर्ज लिहा, अशी तंबी दिली जाते. त्यामुळे कर्नाटक सरकार व सरकारी अधिकारी यांनी सीमाभागातील मराठी लोकांचे जीणे मुश्किल केले आहे.[२५] त्याचप्रमाणे विविध क्षेत्रात नोकरीसाठी सीमावासीयांनी केलेले अर्ज हे जर मराठीत असतील तर ते अर्ज छाननीतून उडविले जातात. आणि जर इंग्रजीमध्ये केलेतर मुलाखतीवेळी तुझी मातृभाषा कोणती? तुझे शिक्षण कोणत्या भाषेतून झाले आहे? कन्नड येते का? सीमाभागातील आहेस का? असे अनेक प्रश्न विचारले जातात. आणि नोकरीपासून त्याला दूर ठेवतात. त्याचा परिणाम असे असंख्य सीमाभागातील तरूण उच्च शिक्षण वा नोकरीपासून वंचित राहतात व शेवटी पोटापाण्याचा प्रश्न वा कुटुंबाचा गाडा चालविण्यासाठी हलक्या प्रतीची कामे वा व्यवसाय करतात. त्यामध्ये गवंडीकाम, सेंट्रींग, मजूर, कामगार, वेटर, ड्रायव्हर, हमाल तसेच पानपट्टी, फौड्रीं, वेल्डिंग इ. छोटे मोठे व्यवसाय करताना दिसतात. याचा परिणाम अशा कुटुंबांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती दयनीय बनलेली दिसून येते बरेचसे बेकार युवक व्यसनांच्या आहारी जातात. तर दारिद्रयामुळे अनेक पालकांच्यासमोर मुलीच्या विवाहासाठी हुंड्याची समस्या निर्माण होते. अशा अनेक समस्यांमुळे कुटुंबाचे स्वास्थ्य बिघडते, त्यांचा परिणाम समाजाच्या ऱ्हासावर होतो.

### ४.६.४.२ सरकारी कार्यालयातही मराठी भाषेची गळचेपी

कर्नाटक शासनाचे कायदे, नियम किंवा परिपत्रके मराठी भाषिकांना मराठीतून उपलब्ध होत नाहीत. मालमत्तांचे दाखले (प्रॉपर्टी एक्स्ट्रॅक्ट), हक्कपत्रके (रेकॉर्ड ऑफ राईटस्), वीज बील, रेशनकार्ड, बस व रेल्वे आरक्षण फॉर्म्स, पोस्ट, बँका, सरकारी व स्थानिक स्वराज्य कार्यालयातील अर्ज, विद्यार्थ्यांना लागणारे अर्जांचे नमुने याशिवाय इतर कागदपत्रे मुद्दामहून कन्नडमध्ये छापली जातात. त्यामुळे मराठी भाषिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. कर्नाटक सरकारचा हा

तुघलकी कारभार लोकशाहीवर घाला घालणारा असून ही जुलमी राजवट इंग्रजांपेक्षाही अत्याचारी आहे. यासंदर्भात सीमालढ्याचे ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील म्हणतात, ''स्वातंत्र्यपूर्वकाळात ब्रिटीशांनी भारतीयांवर जेवढे अत्याचार केले, तितकेच अत्याचार सीमाभागातील मराठी भाषकांवर कर्नाटक सरकारने केले आहेत. सीमावासीयांवरील अन्याय पाहून आम्ही इंग्रजांच्या काळातच राहत आहोत.''[२६] भारताला स्वातंत्र्य मिळून जवळजवळ ६५ वर्षे उलटली तरीही सीमाभागातील मराठी भाषिक पारतंत्र्यात आहे. आजही त्याला असुरक्षिततेची भावना जाणवते आहे. रोजीरोटीचा प्रश्न त्याच्यासमोर उभा आहे. लोकशाही भारतामध्ये त्यांचे हक्क, अधिकारांची पायमल्ली झाली आहे. कर्नाटक सरकार त्यांचे भाषिक शोषण, पिळवणूक करत आहे. कर्नाटक सरकार गुलामाप्रमाणे वागणूक देत असून वेळोवेळी संधी मिळताच कसायाप्रमाणे झोडपून काढतो आहे. अशा प्रतिक्रिया संशोधकाजवळ अनेक मराठी भाषिकांनी व्यक्त केल्या.

### ४.६.४.३ कानडी सक्तीमुळे खुंटणारा विकास आणि दैनंदिन व्यवहारातील अडचणी

सर्वच कागदपत्रे म्हणजे मालमत्तेची कागदपत्रे, जन्म, मृत्यू नोंदणी, सातबारा उतारे, विविध शासकीय अर्ज, दुकानांवरील आणि बसवरील पाट्या कानडीत असल्यामुळे मराठी माणसाला सीमाभागात दैनंदिन व्यवहार करणे अवघड झाले आहे. अनेकवेळा सरकारचे नियम, कायदे समजत नसल्याने नियम, कायदे पाळले जात नाहीत. त्यामुळे नियम, कायदे पाळले न गेल्याने कारवाईचा बडगा उगारायलासुद्धा सरकार मागेपुढे पाहत नाही. सरकारच्या योजनासुद्धा येथील स्थानिक जनतेला कळत नाहीत. त्यामुळे येथील जनतेचा विकास होत नाही असे बऱ्याच जणांनी सांगितले. तर कन्नडसक्तीच्या अतिरेकाचे उदाहरण लक्षात घेतले तर येथील कन्नड लोक किती विद्वेषी आहेत ते कळून येईल. तर बेळगावच्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये 'तुम्ही कन्नड बोललात तर तुमच्याकडे त्वरील लक्ष दिले जाईल' असा फलकच लावला आहे.[२७] त्यामुळे इथल्या परिस्थितीविषयी भाष्य करताना एक सुशिक्षित गृहस्थ म्हणाले, महाराष्ट्राची साथ हवी हो. इथल्या मराठीची परिस्थिती बिकट आहे. सरकारने मुद्दाम लाचार करण्याचा विडा उचललाय, नोकऱ्या नाहीत, धंदे नाहीत, लग्न करायला घर व शेती विकतो, छोटा धंदा सुरू केला. पण सरकारी काम आले की सर्व ठप्प पडते. कारण

मराठी माणसांची फाईल टेबलावर फिरत राहते, पैसे घेतले जातात, छळ होतो, मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. सगळीकडे डावलले जाते. आवाजांनी व उच्चारांनी आम्ही मराठी आहे हे कळले की फक्त द्वेष पसरतो.

### ४.६.५ राजकीय समस्या

१९५७ पासून झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीने आपला प्रभाव दाखविला आहे. पण लोकशाही मार्गाने होणाऱ्या निवडणुकीमध्येही मराठी भाषिक उमेदवारांना त्रास करण्याचे धोरण कन्नडीगांनी अवलंबलेले दिसून येते. सन १९८५ मध्ये राजाभाऊ माने हे महाराष्ट्र एकीकरण समितीचे उमेदवार विधानसभेला उभे असताना त्यांच्या विरोधात तब्बल ३०१ उमेदवार उभे करून निवडणुकीसमोर पेचप्रसंग निर्माण केला होता. तरीही राजाभाऊ माने यांनी ३३,१३९ मते घेऊन विजय संपादन केला.

बेळगाव जिल्ह्यातील एकूण ४८५ ग्रामपंचायतीपैकी खानापूर, बेळगाव, हुक्केरी, चिक्कोडी व अथणी तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये मराठी भाषिकांचे पर्यायाने महाराष्ट्र एकीकरण समितीचे किंवा स्थानिक मराठी भाषिक आघाडीचे वर्चस्व आहे. अनेक मराठी भाषिकांचे ग्रामपंचायतीत बहुमत असतानाही अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडणुकीचे फॉर्म्स व इतर कागदपत्रे केवळ कन्नडमध्ये असल्याने मराठी भाषिक उमेदवारांचे नामनिर्देशन फॉर्म्स अपात्र होतात व कन्नड भाषिक उमेदवार तांत्रिक बाबींमुळे बिनविरोध निवडून येतो. केंद्र व राज्य निवडणूक आयोगाने मराठी भाषिकांना संपूर्ण निवडणुकीची कागदपत्रे मराठी भाषेतून दिली पाहिजेत असा आदेश काढला असतानाही कर्नाटक सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते.

मतदार याद्या तयार करणे, मतदार यादीत नाव दाखल करणे किंवा नाव कमी करण्यासाठी असणारे अर्ज निवडणूक आयोगाने फक्त कन्नड भाषेतच ठेवल्याने मराठी भाषिकांची अनेकवेळा गैरसोय होते. मतदारांच्या होणाऱ्या गैरसोयीबरोबरच मतदार यादी कन्नड भाषेतूनच प्रसिद्ध होत असल्याने मतदार यादीत नाव नसलेल्या नागरिकांना निवडणुकीवेळीच आपले मतदार यादीत नाव नसल्याचे समजते. त्यामुळे स्वतंत्र भारतातील लोकशाही प्रक्रियेतील अत्यंत मौल्यवान असणाऱ्या

मतदानाच्या हक्कापासून मराठी भाषिक वंचित राहतात. मतदार यादी कन्नडमध्ये असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांची किंवा विधानसभेची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या मराठी भाषिक उमेदवारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. तसेच त्यांना निवडणुकीची पूर्वतयारी व्यवस्थितपणे करता येत नाही. प्रत्यक्ष निवडणुकीवेळी इलेक्ट्रॉनिक यंत्रणेवरती असणारी उमेदवारांची नावे कानडी भाषेतच असल्याने मराठी भाषिकांना उमेदवारांच्या नावासमोरील निवडणूक चिन्ह पाहूनच मतदान करावे लागते. काहीवेळा निवडणुक चिन्हामध्ये समानता असल्यास मराठी भाषिकांना नीटपणे आपल्या मतदानाचा अधिकारही बजावता येत नाही. ही प्रक्रिया लोकशाहीसाठी अत्यंत मारक आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ग्रामपंचायत, तालुका पंचायत आणि जिल्हा पंचायतमध्ये मराठी भाषिकांचे वर्चस्व असल्याने तेथील सदस्यांकडून नोटीसा, इतिवृत्त आणि एकंदरीत कामकाज मराठी भाषेत देण्याची मागणी केली जाते. पण काहीवेळा मराठी भाषिकांचे वर्चस्व असणाऱ्या या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कन्नड भाषिक प्रशासकीय अधिकारी असल्याने किंवा तो जाणीवपूर्वक ठेवल्याने प्रशासन व सदस्यांमध्ये वारंवार संघर्ष निर्माण होतात. मराठी भाषिक सदस्य मराठी भाषेचा आग्रह धरतो तर प्रशासकीय अधिकारी राज्य सरकारचे आदेश दाखवतो. यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज व्यवस्थितपणे होत नाही. तसेच सभेचे इतिवृत्त मराठीमधून देण्यास प्रशासन डोळेझाक करते. सदस्यांच्या दबावामुळे जरी इतिवृत्त मराठीतून दिले तर त्यामध्ये अक्षम्य चुका असतात. या चुकांमुळे लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या सदस्यांना कामकाजामध्ये भाग घेण्यास अडथळा येतो.

### ४.६.५.१ लोकशाहीची मुस्कटदाबी

महाराष्ट्र–कर्नाटक सीमाभागामध्ये १९५७ सालापासून विधानसभेत महाराष्ट्र एकीकरण समितीचे वर्चस्व होते. त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थावर बहुतांशी मराठी भाषिकांचेच वर्चस्व असून ते कर्नाटक सरकारला डोळ्यात अंजन घालणारेच आहे. त्यामुळे कर्नाटक सरकार या संपूर्ण भागावर कन्नडिगांचेच वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न करत आहे. विधानसभेच्या

निवडणुकीत सीमाभागातून समितीचे ८ ते ९ आमदार निवडून येत असल्याने ही निवड केंद्राने लोकेच्छा प्रमाण मानून सीमाभागाचा समावेश महाराष्ट्रात करायचे ठरविले तर अडचणीचे ठरेल यादृष्टीने कर्नाटक सरकारने जेवढे विधानसभा मतदार संघ फोडता येतील तेवढे फोडले व समिती आमदारांना निवडणूक जिंकणे अवघड केले. कारवार मतदारसंघ फोडून हल्याळ मतदारसंघ वेगळा केला व त्याला मुदगोड हा संपूर्ण कानडी भाषिक तालुका जोडून हल्याळ मतदारसंघातून मराठी उमेदवार निवडून येण्याची शक्यता नष्ट केली. तर बेळगाव उत्तर व बेळगाव दक्षिण हे मतदारसंघ मोडून बागेवाडी हा मतदारसंघ मुद्दाम कानडी बनविला. भालकी १, भालकी २ व हलसद हे मतदारसंघ फोडले व मराठी उमेदवार निवडून आणणे अवघड केले. तर बेळगाव शहर मतदारसंघातून शहापूरच्या मराठी गल्ल्या वगळल्या व माळमारूती एक्स्टेशनमध्ये कानडी भाषिक हिडकल धरणग्रस्तांना आणून तो भाग बेळगाव शहरात समाविष्ट केला आणि मराठी भाषिकांच्या मतदारांची जाणीवपूर्वक विभागणी केली. इतकेच नव्हेतर जात, धर्मावर आधारीत कन्नड उमेदवार उभे करून मराठी उमेदवारांना धूळ चारायचा कर्नाटकातील सर्वच राजकीय पक्षांनी प्रयत्न केला. पण त्यामध्ये त्यांना पूर्ण यश आले नाही.

सर्व पर्याय संपल्यानंतर कर्नाटकातील राजकीय पक्षांनी मराठी भाषिक नेत्यांनाच हाताशी धरून त्यांना आमिष दाखवून महाराष्ट्र एकीकरण समितीमध्ये फूट पाडली आणि २००८ मध्ये विधानसभेच्या सर्व जागा कर्नाटकातील राजकीय पक्षांनीच खेचून घेतल्या. त्यामुळे सीमाभागात मराठी भाषिक बहुसंख्य असले तरी त्यांच्या भागाच्या/समाजाच्या समस्यांची सोडवणूक करणारा, विधानसभेमध्ये मराठी भाषिकांच्या व्यथा मांडणारा प्रतिनिधी नाही. त्याचा परिणाम कर्नाटकच्या सर्वोच्च सभागृहामध्ये मराठी भाषेचा, मराठी भाषिकांचा आवाज उमटत नाही..

### ४.६.६ मराठी भाषिकांच्या जमिनी संपादन

कर्नाटक सरकार मराठी भाषिक शेतकऱ्यांच्या जमिनी वेगवेगळ्या कारणास्तव संपादित करून मराठी भाषिकांवरील असंतोष प्रकट करत आहे. बेळगावच्या दक्षिण भागातील ३००० एकर पिकाऊ जमीन केआयडीबी (Karnataka Industrial Development Board) व बुडाकडून

(Belgaum Urban Development Authority) संपादित करण्यात येत आहे तर आंबेवाडी, (ता. जि. बेळगाव) येथील ७९० एकर शेतजमिनीच्या मालकांना गरज नसताना गृहनिर्माण महामंडळाने नोटिसा पाठविल्या. महाराष्ट्रात जशी सिडको, म्हाडा इ. महामंडळे आहेत तशीच कर्नाटकातसुद्धा आहेत. बुडा महामंडळाने बेळगाव परिसरातील जवळजवळ ७५० एकर मराठी माणसांची पिकाऊ शेतजमीन संपादित केली तेव्हा संबंधित शेतकऱ्यांनी व महाराष्ट्र एकीकरण समितीने महामंडळाच्या कार्यालयात जावून आपल्या व्यथा मांडल्या. पिकाऊ जमिनी, घरे बांधण्यासाठी घेत असाल तर आम्ही शेती कोठे करायची? शेतीशिवाय दुसरा आमचा उद्योग नाही वा नोकरी नाही अशा परिस्थितीत आमची पिकाऊ जमीन तुम्ही संपादित केली तर कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा? तसेच जनावरांचा वैरणीचा प्रश्न आम्ही कसा सोडवायचा? आमची शेतजमीन ही घरे बांधण्यास उपयुक्त नसून त्यामध्ये भात, ऊस, ज्वारी, भूईमूग, बटाटा इ. सह इतर पिके घेतली जातात. त्याचबरोबर शेतकऱ्यांनी कर्जे काढून स्वतःच्या मालकीत विहिरी, पंपसेटस् व पाईपलाईन्स घातलेल्या आहेत. पण या व्यथा पूर्वगृहदूषित कानडी अधिकाऱ्यांना व राज्यकर्त्यांना समजल्या नाहीत. सीमाभागामध्ये कन्नड वसाहती उभ्या करून तेथील मराठी टक्का कमी करून बेळगाववरती कानडी भाषिकांची पर्यायाने कर्नाटकाचीच पकड घट्ट करण्याचा कर्नाटक सरकारचा कुटील डाव असलेला दिसून येतो. बेळगाव तालुक्यात इतर ठिकाणी नापिक जमीन उपलब्ध असताना जाणिवपूर्वक मराठी भाषिक शेतकऱ्यांची पिकावू जमीन संपादन करून मराठी माणसाला आर्थिक विवंचनेत अडकवून भिकेकंगाल करण्याचे कटकारस्थान कर्नाटक सरकार करत आहे. यापूर्वी विधानसौध बांधण्यासाठी आणि इतर सरकारी प्रकल्पासाठी मराठी शेतकऱ्यांच्या जमिनी लक्ष्य करण्यात आल्या. बुडा आणि केआयडीबीतर्फे प्लॉट पाडून मराठी भाषिकांची जमीन काढून घेऊन बेळगाव बाहेरील कन्नडीगांना देत आहेत. याचे कारण म्हणजे बेळगावमधील मराठी टक्का कमी करणे होय.[२८]

बुडाकडूनसुद्धा अनेकवेळेला जमिनीचे खोटे नकाशे प्रसिद्ध केले जातात. खोटी आरक्षणे दाखविली जातात. तसेच ही सर्व कागदपत्रे कन्नडमधून असल्याने मराठी भाषिकांना समजत नाहीत. त्यामुळे मराठी भाषिकांना सांगतील त्या किंमतीला जमीन विकावी लागते न झाल्यास जबरदस्ती

करून काढून घेतली जाते. त्यासाठी बऱ्याचवेळेला राजकीय सत्तेचा दुरूपयोग केला जातो. रस्तारूंदीकरणामध्येही मराठी भाषिकांना एक न्याय व कन्नड भाषिकांना दुसरा न्याय असा पक्षपातीपणा केला जातो. मार्च २०११ मध्ये तीन दिवशीय अखिल भारतीय कन्नड साहित्य संमेलन बेळगावमध्ये घेण्यात आले. तीन दिवशीय संमेलनासाठी दोन ते तीन महिने बेळगाव शहर वेठीस धरले होते. तसेच शहर विकास योजना राबविण्यात आली. सुशोभिकरणाच्या नावाखाली शेकडो खोकीधारकांना रस्त्यावर आणले. रूंदीकरण मोहिमेत अनेकांची घरे व दुकाने गेली. त्यामध्ये प्रशासनाने मराठी माणसाला लक्ष्य केले. हालअपेष्ठा खावून, पै–पै पैसे जमवून सीमावर्ती खेड्यातील मुलांनी शहरांमध्ये टाकलेले धंदे–रोजगार प्रशासनाने उखडून टाकले. येळ्ळूर येथील शेती बासमती तांदळासाठी प्रसिद्ध आहे. सुपीक जमीन हे येळ्ळूरचे बलस्थान असून ही जमिन मराठी भाषिकांची आहे. सीमाप्रश्नामध्ये येळ्ळूर गावचे असलेले योगदान, महाराष्ट्राबद्दल असणारी येळ्ळूरची अस्मिता, गावामध्ये असणारे महाराष्ट्र हायस्कूल, महाराष्ट्र मैदान गावच्या वेशीतही असणारा 'महाराष्ट्र राज्याचा फलक' यामुळे कर्नाटक सरकारचा येळ्ळूरकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित व संकुचित झाला नसल्यास नवलच. येळ्ळूरच्या सुपिक जमिनीचे बलस्थान ओळखून कर्नाटक सरकारने जाणीवपूर्वक राज्य महामार्ग ओसाड जमिनीतून काढणे शक्य असतानाही सुपिक जमिनीतून काढण्याचे ठरविले आणि जेणेकरून येळ्ळूरकरांचे अर्थकारण कोलमडायचे हा डाव कर्नाटक सरकारने रचल्याचे दिसून येते.[२९]

### ४.६.६.१ सरकारच्या धोरणावर न्यायालयाचेही ताशेरे

बळजबरीने शेतकऱ्यांच्या पिकावू जमिनी या ना त्या योजनेच्या नावाने संपादन करणे म्हणजे तो एक घोटाळा ठरू शकतो, असे एका भूसंपादन खटल्यामध्ये न्यायालयाने आपले स्पष्ट मत मांडले आहे. कमकुवत घटकांवर बळजबरीने सत्तेचा वापर करून मराठी माणसाला आणखी गरीब करण्याचा हा प्रकार असल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे. कर्नाटक सरकारच्या भूमी संपादन धोरणाबाबत मात्र सर्वोच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले की, सरकारने स्थापन केलेल्या बेंगळूर, बेळगाव व इतर शहरांमध्ये स्थापन केलेली विकास प्राधिकरणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जमिनी लुटणाऱ्या संस्थाच,

त्यांचे उत्तम उदाहरण म्हणजे 'नाईस योजना' होय. कवडीमोलाने शेतजमिनी ताब्यात घ्यावयाच्या व एक एकराला काही लाख रूपये मोजायचे व याच जमिनीतील एका प्लॉटला तितकी रक्कम वसूल करायची. अशाप्रकारे अशा संस्थांनी कोट्यावधी रूपयांची उलाढाल सुरू ठेवल्याचे म्हटले आहे.[३०]

## ४.६.७ सांस्कृतिक गळचेपी

बेळगाव शहराची मराठी ओळख पुसण्यासाठी कर्नाटक सरकारने प्रत्येक ठिकाणी बेळगावचा नामांतराचा सपाटा सुरू केला आहे. सरकारी कार्यालयात मिळणारी कागदपत्रे, कार्यालयीन नामफलक, बसेसवरील फलक, रस्त्यावरील फलकावर बेळगावचे 'बेळगावी' असे नामांतर केले आहे. बेळगावच्या या नामांतराच्या विरोधात महाराष्ट्र एकीकरण समितीने भव्य मोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात असताना बेळगावचे नामांतर करणे न्यायालयाचा अवमान करणारे ठरू शकते. मात्र मराठी द्वेषाने पछाडलेल्या कर्नाटक सरकारने सीमाभागातील मराठी भाषा, संस्कृती नष्ट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असताना मराठी माध्यमिक पाठ्यपुस्तकामध्येही बेळगावचे 'बेळगावी' असे नामांतर करून मराठी द्वेष दाखवून दिला आहे.

सांगली, पुण्याप्रमाणेच बेळगाव हेही नाट्यवेडे शहर मानले जाते. इथल्या मराठी नाटकांची परंपरा सव्वाशे वर्षे जुनी असल्याचे सांगितले जाते. १९५६ साली बेळगावात मराठी नाट्य संमेलन झाले होते. याच संमेलनातून मराठी नाट्यपरिषदेचा जन्म झाला असे इथले जुने नाट्यप्रेमी सांगतात. पूर्वी मुंबई, पुण्यातून अनेक नाट्यसंस्था आवर्जून बेळगावात यायच्या. आता हे जवळपास थांबलेच आहे. अलिकडे 'जाणता राजा', 'शंभूराजे' आणि 'सिंहगर्जना' अशा मोजक्याच नाटकाचे प्रयोग बेळगावात झाले. त्याचे कारण बेळगावातले ज्येष्ठ पत्रकार अशोक याळगी सांगतात, ''कर्नाटक सरकारने राज्याबाहेरून येणाऱ्या नाट्यसंस्थांच्या बसगाड्यांवर प्रत्येक आसनामागे कर लावण्यास सुरूवात केली. कराचा हा बोजा परवडत नसल्याने मुंबई–पुण्याच्या नाट्यसंस्था आता इथे येण्याचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे इथले मराठी नाट्यरसिक जसे चांगल्या नाटकांना मुकले आहेत तसेच कानडीही. कारण इथल्या कानडी रसिकांचेही मराठी नाटकांवर तेवढेच प्रेम होते.''

सीमाभागातील चित्रपटगृहामध्ये मराठी चित्रपट आला की कर लावले जातात. मात्र कन्नड भाषिक  चित्रपटांना कर माफ असतात. त्यामुळे मराठी चित्रपट पाहणे आर्थिकदृष्ट्या महाग त्यामानाने कानडी चित्रपट स्वस्त.. दहा वर्षापूर्वी बेळगावमधील हंस, चित्रा, कपिल यासारख्या चित्रपटगृहामध्ये फक्त मराठीच चित्रपट लावले जायचे. त्याठिकाणी आज अपवाद वगळता कन्नड व हिंदी चित्रपटच प्रदर्शित होतात.

### ४.६.७.१ सीमाभागातील साहित्यिकांची उपेक्षा

गेली कित्येक वर्षे सीमाभागातील अनेक गावामध्ये मराठी साहित्य संमेलने भरविली जातात. बेळगाव येथे यापूर्वी १९२९, १९४६ व २००० साली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने भरविण्यात आली होती. तर उचगांव, कुद्रेमनी, बेळगुंदी, येळ्ळूर, कडोली, सांबरा, नंदगड, निलजी इ. मराठी भाषिक गावांमध्ये दरवर्षी ही मराठी साहित्य संमेलने भरविली जातात. या संमेलनांना भरभरून प्रतिसाद मिळतो. तसेच सीमाभागाला साहित्याचा वारसा आहे. अनेक साहित्यिकांनी विविध विषयांवर मत, विचार, अभिवृत्ती साहित्यामध्ये मांडले आहेत. पण सीमावर्ती भागातील एकाही साहित्यिकाला कर्नाटक सरकारने वा महाराष्ट्र सरकारने यथोचित गौरव वा सन्मान देवून गौरविल्याचे दिसून येत नाही. यावरून सीमाभागातील साहित्यिकांची परवडच झालेली दिसून येते.

डॉ. भीमराव गस्ती, महादेव मोरे, एल. आर. चौगले, इंदिरा संत, डॉ. अच्युत माने इ. साहित्यिकांनी आपल्या लेखनीद्वारे समाज घडविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु या सर्वांची उपेक्षाच झालेली दिसून येते.

### ४.६.८ सीमाभागात पोलीसी अत्याचार

गेली ५५–६० वर्षे कर्नाटक राज्याच्या पोलीसांनी बेळगाव आणि सीमाभागातल्या मराठी भाषिकांवर सातत्याने अत्याचार केले आहेत. वास्तविक कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची, सामान्य जनतेच्या जीविताचे रक्षण करण्याची घटनात्मक जबाबदारी राज्य सरकारच्या पोलीस विभागाची आहे.  मात्र हे खाकी वर्दीतील पोलीस सामान्य जनतेवरच अत्याचार आणि जुलुम करीत आहेत. मराठी भाषिकांनी आपल्या अन्यायाविरोधात ज्या ज्या वेळी लोकशाही मार्गाने मोर्चे, निदर्शने,

आंदोलने, सत्याग्रह, मेळावे, रास्ता रोको आयोजित केले त्या त्या वेळी या सरकारी पोलीसांनी त्यांच्यावर लाठीमार, बेछूट गोळीबार, खोट्या केसेस इ. द्वारे अन्यायाची परिसीमा गाठली आहे. पोलीसी अत्याचारात अनेकांची डोकी फुटली, रक्ताचे पाट वाहिले, हातपाय मोडून आज कित्येकजण अंथरूणावर पडले, माता–भगिनींना वैधव्य आले. तर कित्येकजण हुतात्मे झाले. बऱ्याचवेळेला मराठी भाषिक दुकानदारांना त्रास देवून लाठीहल्ला केलेला आहे. गाडीवरून जाणाऱ्या प्रवाशानांही विनाकारण गाडी अडवून केवळ मराठी भाषिक म्हणून त्रास देणे, कन्नडमध्ये शिव्या देणे आणि कागदपत्रे मागणे, पुरेशी कागदपत्रे देऊनही पैशाची मागणी करणे, न झाल्यास दंड आकारणे व केसेस करणे वा पोलीसी इंगा दाखविणे इ. प्रकार कर्नाटक पोलीस करताना दिसून येतात. एवढेच नाहीतर भर रस्त्यावर कायद्याचा राजरोसपणे मुडदा पाडणाऱ्या बेळगावच्या पोलीसांनी न झालेल्या खुनाबद्दल बारा मराठी भाषिकांवर भारतीय दंड विधानाच्या ३०२ कलमान्वये गुन्हे नोंदविण्याचा विक्रमच केला आहे.

आज बेळगावात अनेक ठिकाणी पोलीसांच्या छावणीचे चित्र पहावयास मिळत असून त्यांची करडी नजर केवळ मराठी भाषिकांवरतीच असलेली दिसून येते. सीमाभागात कोठेही सीमामेळावा असो, रास्ता रोको असो, सत्याग्रह, उपोषण, १ नोव्हेंबरचा 'काळा दिन' असो अशावेळी बेळगावमध्ये कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवला जातो. बेळगामध्ये कोठेही कोणत्याही कारणाने दंगल घडून आल्यास त्याचे परिणाम मराठी भाषिकांनाच भोगावे लागतात. याचे कारण बेळगाव पोलीस मराठी भाषिकांचाच पाठलाग करतात, मारझोड करतात, त्यांना अटक करून जनावराप्रमाणे मारहाण करतात. माजी महापौर श्री. मालोजी अष्टेकर यांनी संशोधकाला सांगितले की, ''बेळगाव पोलीसांनी प्रत्येकवेळा मराठी भाषिकांवर खोट्या केसेस दाखल केल्या आहेत. परंतु अद्याप त्यामधील एकही केस सत्यात उतरलेली नाही.'' यावरून सरकारी पोलीसांची अन्यायी, अत्याचारी वागणूक किती भयानक आहे हे यावरून दिसून येते.

दि. ४ डिसेंबर २०१२ रोजी मध्यरात्री येळ्ळूर येथे 'महाराष्ट्र राज्य येळ्ळूर' या मराठी अस्मितेचे प्रतीक मानल्या गेलेल्या फलकाची मोडतोड काही कन्नड वेदिकेच्या गुंडांनी केल्याचे दिसून आले. त्यावेळी कर्नाटक सरकारचे अधिवेशन व मराठी भाषिकांचा महासीमामेळावा या धर्तीवर चोख

पोलीस बंदोबस्त संपूर्ण बेळगाव शहर आणि येळ्ळूर येथे तैनात असताना ही घटना घडलीच कशी? हा प्रश्न अनेकांना पडल्यावाचून राहत नाही. पण याचे खरे कारण बेळगाव पोलीसांच्या आशिर्वादातूनच हे सर्व घडल्याचे दिसून येते.

### ४.६.८.१ साराबंदी आणि पोलीस

सीमाभागातील जवळपास १०० खेड्यांत महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेतृत्वाखाली ज्यावेळी सामुदायिकरित्या साराबंदी लढा यशस्वी करण्याचा निर्धार मराठी भाषिकांनी केला त्यावेळी हा लढा मोडीत काढून सारा वसुली करायचाच या हट्टाने पेटलेल्या कर्नाटक सरकारने पोलीस विभागाला जणू आदेशच सोडले अन् साराबंदी लढा मोडीत काढण्याचा विडाच पोलीसांनी हाती घेऊन सीमाभागात हाहाकारच माजवला. ब्रिटीश राजवटीत, परकी राजवटीत पोलीसांची झोटींगशाही, अमानुष व रानटी प्रकार घडलेल्या सर्वांना मागे टाकणारे जंगली, राक्षसी प्रकार येळ्ळूर येथे ८ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी १९६० या चार दिवसात घडले ते पोलीसांचे प्रकार मानवतेला काळीमा फासणारेच होते. त्यावेळचे डी.एस.पी. लुईस आणि त्यांच्या तुकडीने रस्तोरस्ती जनावरांना मारतात त्याप्रमाणे अनेक निरपराध नागरिकांना गुरांसारखे झोडपून काढले. येळ्ळूर गावाला छावणीचे स्वरूप देऊन नाकेबंदी केली. घराघरातील धान्य व वस्तू बेकायदेशीरपणे बाहेर काढल्या. त्यावेळी सर्व मराठी भाषिक एक होऊन त्यांच्या राक्षसी कृत्याला विरोध करण्याचा प्रयत्न करताच लुईससह सर्वच पोलीस खवळले आणि अश्रूधूराचा मारा करून दहशत माजवली. लाठ्यांनी मारहाण करण्यास सुरूवात केली. तरीपण मराठी भाषिक मागे हटला नाही म्हणून त्यांच्यावर गोळीबार केला. त्यामध्ये १२ जण गंभीर जखमी झाले. त्यांच्या हल्ल्यात बालकांपासून वृद्धांपर्यंत सर्वच स्त्री–पुरुष सापडले. पोलीसांनी ‘सारा भरा अन्यथा ठार मारू’ अशा धमक्या देऊन घरातील मिळेल ते साहित्य, धान्य, जनावरे जप्त करण्यास सुरूवात केली. त्यावेळी आडवे येणाऱ्यांना आडवे केले, स्त्रियांना तर वाट्टेल तसे बोलून त्यांच्या अब्रूचे धिंडवडे काढले. रस्त्यात, घरात, दुकानात, वसतिगृहात, देवघरात जेथे असतील तेथून लोकांना ओढून काढून बेफाम मारहाण करून म्हैसूर पोलीसांनी अन्यायाची परिसीमाच गाठली होती.[३१]

जेव्हा जेव्हा कर्नाटक सरकार मराठी माणसांवर अन्याय करते तेव्हा प्रत्येकवेळी महाराष्ट्र एकीकरण समिती तेथील मराठी बांधव लोकशाही पद्धतीने आंदोलन करते, मेळावे भरवते, मोर्चे काढते पण दरवेळी ही मराठी माणसांची आंदोलने कानडी पोलीस त्यांच्या दंडुक्याने मोडून काढतात. मग ते विजय मोरे प्रकरण असो किंवा बेळगावात विधानसभा अधिवेशन प्रकरण आणि आताचे केंद्राचे प्रतिज्ञापत्रक प्रकरण व भगवा दहन, बाळासाहेब ठाकरे यांची प्रतिकृती दहन प्रकरण, दरवेळी मराठी माणूस अशा गोष्टींचा निषेध करण्यासाठी आंदोलने करतो आणि प्रत्येकवेळी कानडी पोलीस त्या आंदोलकांवर बळाचा वापर करून त्यांच्यावर अमानुष लाठीचार्ज करतात. ते हेही बघत नाहीत की आपण ज्याला मारतोय तो अपंग कि वृद्ध, दिसेल त्याला बदडवून काढतात. शांतपणे आंदोलन करणाऱ्या मराठी आंदोलकांवर हाफ मर्डर, खून, राजद्रोह यासारखे गंभीर आणि खोटे गुन्हे दाखल करतात. बळजबरीने घरात घुसून मराठी भाषिकांना उचलतात व तुरूंगात डांबतात. ह्या दंडेलशाहीमुळे अनेक मराठी आंदोलकांना गंभीर जखमा झाल्या आहेत. काही आंदोलकांना तर गंभीर शस्त्रक्रियेलाही सामोरे जावे लागत आहे. त्यांच्या जखमा बघून हे पोलीस ब्रिटीश सरकारचे आहेत की काय? असा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही.

### ४.६.९ सीमाभाग विकासापासून वंचित

गेली ५५ ते ६० वर्षे सीमाप्रश्न भिजत पडलेला असून आज तो सर्वोच्च न्यायालयात आहे. त्यामुळे या सीमाभागावर महाराष्ट्र सरकार जसा आपला दावा सांगत आहे. त्याचप्रमाणे कर्नाटक सरकारही या भागावर आपलाच हक्क सांगून मराठी भाषिकांची पिळवणूक करीत आहे. सीमाभागातील बहुसंख्य जनता ही मराठी भाषिक असून त्यांची तीव्र इच्छा महाराष्ट्रात जाण्याची आहे हे अनेकवेळा स्थानिक ग्रामपंचायतीपासून ते विधानसभेच्या निवडणुकीतून दाखवून दिले आहे. तर अनेकवेळा मोर्चे, निदर्शने, उपोषणे, महामेळावे आयोजित करून 'रहेंगे तो महाराष्ट्र में, नही तो जेल में', 'बेळगाव आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे' अशा घोषणा देऊन कर्नाटक सरकारला वेळोवेळी मराठी भाषिकांनी चपराक दिलेली आहे. परिणामी या सीमाप्रश्नामुळे संबंधित भागाचा विकास पूर्णपणे खुंटलेला दिसून येतो. या सीमाभागाला आज हक्काचा वाली कोणीच नसून त्यांची अवस्था

'ना घर का, ना घाट का' अशी झालेली दिसते. कर्नाटक सरकारनेसुद्धा आपले सर्व उद्योग हुबळी–धारवाडकडे उभारून बेळगावकडे पाठ फिरविल्याचे दिसते. याचे कारण उद्या बेळगाव महाराष्ट्राला दयावं लागेल, मग त्याचा विकास आपण का करायचा.

तसेच मराठी भाषिकांनी छोटे मोठे व्यवसाय/उद्योग करायचे झाल्यास कर्नाटक सरकार त्यांना सहकार्य करीत नाही. व्यवसायासाठी लागणारी आवश्यक शासकीय कागदपत्रे संबंधित विभागाचे अधिकारी लवकर देत नाहीत. टाळाटाळ करतात वा पैशाची मागणी करतात. केवळ मराठीद्वेष म्हणून यासंदर्भात बेळगावमध्ये कामगारांच्या प्रश्नांवर काम करत असलेले दिलीप कामत म्हणाले, ''सीमाभागातल्या मराठी भाषिकांची कोंडी करण्याचा, कर्नाटक सरकारकडून जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातोय, याबद्दल दुमत असू शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. याला विरोध निश्चितच केला पाहिजे. त्यासाठी भाषिक अल्पसंख्याकांकरिता घटनेत असलेल्या तरतुदी अंमलात आणण्याचा आग्रह धरता येऊ शकतो. मात्र त्याऐवजी केवळ अन्यायाचा पाढा वाचला जात आहे. अस्मितेचे राजकारण खेळले जात आहे. परिणामी भाषांच्या भिंती उभ्या राहत आहेत. त्यामुळे इथले दोन्ही भाषा समुदाय परस्परांपासून दुरावण्याची भीती आहे.''[३२]

सीमाभागातील अनेक मुले कन्नडसक्तीमुळे शाळेत जात नाहीत, जरी शाळेला गेली तरी अर्धवट शाळा सोडण्याचे प्रमाण अधिक आहे तर बऱ्याच पालकांच्या मते मुलांना उच्च शिक्षण देणे परवडत नाही. त्यामुळे अशी मुले समाजातील उच्च पदव्यापासून वंचित राहतात. पर्यायाने उदरनिर्वाहासाठी गवंडी, सेंट्रींग, टेलर, फौंड्री, मजूर , कामगार, हमाल, ड्रायव्हर इ. सारखे हलक्या प्रतीचे व्यवसाय करावे लागतात. अशा तरूणांमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण अधिक वाढते. तर मुलींच्यादृष्टीने उच्च शिक्षण देणे पालकांना एकतर परवडत नाही आणि दुसरे म्हणजे सीमाभागातील खेड्यांत उच्च शिक्षणाच्या संधी नाहीत. त्यामुळे मुली बौद्धिकदृष्ट्या हुशार असूनसुद्धा त्यांना अर्धवट शाळा सोडावी लागते. तर पालकांना आपल्या मुलीला अपेक्षित वर शोधणे कमी शिक्षणामुळे आणि आर्थिक परिस्थितीमुळे शक्य होत नाही. त्यामुळे पालकांना घर, शेती गहाण ठेवून, कर्ज काढून मुलीचा विवाह करावा लागतो. त्यामुळे पालक कर्जबाजारी बनतो. आज संपूर्ण

सीमाभागातील परिस्थिती पाहता अज्ञान, अंधश्रद्धा, बेकारी, दारिद्रय, देवदासी, व्यसनाधिनता, कर्जबाजारी, हुंडा प्रथा इ. सामाजिक समस्यांनी ग्रासलेली आहे.

### ४.६.१० कन्नड संघटनांचा अतिरेक

कर्नाटक राज्याची मातृभाषा कन्नड असल्याने त्या भाषेच्या रक्षणासाठी आणि संवर्धनासाठी कर्नाटक रक्षण वेदिका नावाची संघटना कार्यरत आहे. ही संघटना राज्यात अल्पसंख्याक म्हणून गणल्या गेलेल्या मराठी भाषिक लोकांच्या विरोधात लढत असून मराठी भाषिक आपल्या हक्कांसाठी लोकशाही मार्गाने मोर्चे, आंदोलने, उपोषण, सत्याग्रह, रास्ता रोको, काळा दिन, सीमामेळावा इ. लढ्यावेळी ही कर्नाटक रक्षण वेदिका संघटना मराठी भाषिकांवर हल्ला करणे, मराठी लोकांच्या वाहनांची अडवणूक, लुबाडणूक करणे, महाराष्ट्रीयन नेत्यांच्या प्रतिमा जाळणे, निषेध करणे, मराठी भाषिकांचे प्रतीक असणारे फलक, मराठी फलक, ध्वज यावर काळे फासणे, लोकप्रतिनिधींवर हल्ला करणे, कार्यालयांची तोडफोड करणे इ. वर्तन प्रकार करून मराठीद्वेष काढत आहे. त्यामुळे सीमाभागातील लोकांचे जनजीवन विस्कळीत होऊन सामान्य लोकांच्या मनात असुरक्षितेची भावना निर्माण होत आहे.

२० मे २०१२ रोजी येळ्ळूर येथे महाराष्ट्र मैदानावर होणाऱ्या सीमा मेळाव्याची धास्ती घेतलेल्या कन्नड रक्षण वेदिकेच्या गुंडांनी पुणे–बेंगलोर महामार्गावर निपाणीजवळील तवंदी घाटात महाराष्ट्र बसवर हल्ला करून ती प्रवाशांसह जाळण्याचा प्रयत्न रविवारी दुपारी १२.३० वाजता केला. बसचालक व वाहक यांना अमानुष मारहाण केली. तसेच नांदेड आगाराची कोल्हापूर–बेळगाव ही बस निपाणी बसस्थानकातून प्रवासी घेऊन बेळगावच्या दिशेने मार्गस्थ झाली असता थोड्या अंतरावर तवंदी घाटात बस गेल्यावर त्या ठिकाणी आधीच दबा धरून बसलेल्या काही गुंडांनी रस्त्यावरच टायर्स जाळून बस पेटविण्याचा प्रयत्न केला. बसमधील प्रवाशांना दमदाटी केली. बसच्या काचा दगड, विटांनी फोडल्या. अर्थात त्यांच्यासोबत वृत्तवाहिनीचे पत्रकारही होते. हा पूर्वनियोजित कट होता असे मत एका प्रवाशाने व्यक्त केले.[३३].

१९५६ पासून दरवर्षी सीमाभागात १ नोव्हेंबर हा दिवस 'काळा दिन' म्हणून पाळण्यात येतो. या दिवशी मराठी भाषिक मोठ्या संख्येने सायकलफेरीत सहभागी होतात. युवक–युवती, लहान मुले आणि वृद्धही फेरीत काळे झेंडे, काळ्या फिती, काळ्या पोशाखानिशी सहभागी होतात. महाराष्ट्र एकीकरण समितीच्यावतीने हा दिवस 'काळा दिन' म्हणून पाळून सर्व व्यवहार बंद ठेवले जातात. दि. १ नोव्हेंबर २०११ रोजी शांततेने हा दिन पाळण्यात येत असतानाच कन्नड रक्षण वेदिकेचा तालुकाध्यक्ष बसनगौडा पाटील याने मंगसुळी (ता. अथणी) येथे शिवसेना व ओंकार सायकल मार्ट या मराठी फलकांना काळे फासले. दि. ५ नोव्हेंबर २००५ रोजी बेळगाव महानगरपालिकेचे महापौर विजय मोरे, आमदार बी. आय. पाटील आणि श्री. शिवाजी सुंठकर या तिघांना बेंगलोर येथे कन्नड वेदिका संघटनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या तोंडाला काळे फासून मारहाण केली. अंगावरील कपडे फाडून अमानवी कृत्य करून मराठी भाषिकांवरील रोष रानटी पद्धतीने प्रकट केला.

तर १ नोव्हेंबर २०११ च्या 'काळ्या दिनी' बेळगावच्या महापौर मंदा बाळेकुंद्री आणि उपमहापौर रेणू किल्लेकर हजारोंच्या संख्येने मराठी भाषिकांनी काढलेल्या सायकलफेरीत सहभागी झाल्याने कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी महानगरपालिकेत मागील बाजूने प्रवेश करून महापौरांच्या नामफलकाला काळे फासले. फलक उपसून टाकला, हातातील काठ्या व दगडांनी महापौर कक्षाच्या दरवाजाच्या काचा फोडल्या. टेबल–खुर्च्या उचलून टाकल्या. तसेच संगणक, टीव्ही आदींची नासधूस करून तेथे नंगानाच केला. महापालिकेवरील हा हल्ला म्हणजे ''लोकशाहीवरच केलेला हल्ला'' होता. अशा प्रकारे अनेकांनी या कृत्याचा निषेध केला.

त्याचबरोबर सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात असताना बेळगाव येथे नव्याने बांधण्यात आलेल्या विधानसौधमध्ये अधिवेशन भरविण्याचा घाट कर्नाटक सरकारने केल्याने त्या अधिवेशनाला प्रखर विरोध म्हणून महाराष्ट्र एकीकरण समितीने त्याचदिवशी बेळगाव येथे सीमावासीयांचा महासीमामेळावा घेऊन मराठी भाषिकांची एकजूट, ताकद, महाराष्ट्रात जाण्याची आजही असलेली तीव्र इच्छा प्रकट करण्यासाठी पाऊले उचलली. पण हे कर्नाटक रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांना खपले नाही. त्यामुळे या महामेळाव्याला गालबोट लावण्यासाठी येळ्ळूर गावच्या प्रवेशहद्दीत मराठी

भाषिकांची अस्मिता असणाऱ्या 'महाराष्ट्र राज्य येळ्ळूर' या नामफलकाची तोडफोड करून हा फलकच उध्वस्त करून सीमावासीय मराठी भाषिकांची अस्मिताच नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ही घटना समजताच सर्व येळ्ळूरवासी त्याच रात्री एकत्रित येऊन तेवढ्याच ताकदीने अवघ्या दोन तासात तो फलक 'जशास तसा' पुन्हा उभा करून कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांना आपल्या एकजुटीद्वारे प्रतिआव्हानच दिले. तसेच त्यांच्या कृत्याचा निषेध करून संबंधित कार्यकर्त्यांवर खटले दाखल करण्याची मागणी केली. गावातील वातावरण तणावपूर्ण बनले. मात्र या एकंदरीत घटनेमध्ये बेळगाव पोलीसांनी मात्र बघ्याचीच भूमिका घेतल्याचे दिसून आले. या घटनेला कारणीभूत असलेल्या कर्नाटक रक्षण वेदिकेला पोलीसांचा आतून पाठिंबाच असल्याचे जाणवले.[३४]

सीमाभागात कन्नड रक्षण वेदिकेचा मुजोरपणा दिवसेंदिवस वाढत चालला असून त्याला कानडी अधिकारीही साथ देत असल्याचे अनेकवेळा निदर्शनास आले आहे. केदनूर, ता. बेळगाव येथील मराठी शाळेचा शतकमहोत्सवी फलक कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी काढून त्यातून आपला मराठीद्वेष दाखवून दिला आहे.

### ४.६.११ मराठी भाषिकांच्या प्रतिक्रिया

केंद्रीय भाषिक अल्पसंख्याक आयोगाच्या शिफारशीनुसार फलक, इतिवृत्त, परिपत्रके, मालमत्तांचे उतारे, मराठी भाषेतून देण्यात यावेत अशी तक्रार मराठी भाषिकांनी मानवाधिकार आयोगाकडे केली होती. त्यानुसार मानवाधिकार आयोगाच्या आयुक्तांनी कर्नाटक सरकारच्या सचिवालयाला पत्र पाठवून मराठी भाषिकांच्या तक्रारी दूर करण्याची सूचना केली होती. पण सचिवालयाने या सूचना धुडकावून लावल्या. सर्व कार्यालयांतील परिपत्रके, बसवरील फलक, इतिवृत्त मराठी भाषेतूनच दिली जात असल्याचे पत्र पाठवून मराठी भाषिकांचा आरोप खोटा असल्याचे पत्र केंद्रीय मानवाधिकार आयोगाला दिले. वास्तविक भाषिक अल्पसंख्याक आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनाची असते. पण जिल्हाधिकाऱ्यांनीसुद्धा पक्षपातीपणा केला आहे. राजकीय नेत्यांच्या इशाऱ्यानुसार सर्व परिपत्रके कन्नडमधूनच काढली जात आहेत. त्यामुळे कर्नाटक सरकारविरोधी संताप व्यक्त करण्यासाठी

महाराष्ट्र एकीकरण समितीच्या माध्यमातून सीमाभागातील जनता रस्त्यावर उतरली आहे. तर अनेकांनी आपल्या बोलक्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्यामध्ये –

**१. मनोहर भावकू कंग्राळकर**

जन्म–मृत्यूचे दाखले, फॉर्म्स हे कन्नड भाषेतून असतात. त्यामुळे त्यामध्ये काय आहे तेच कळत नाही. त्यांच्या मते मराठी, इंग्रजी व कन्नड या तिन्ही भाषांमधून फॉर्म्स उपलब्ध झाल्यास कोणालाच, कोणतीच अडचण येणार नाही. पण कर्नाटक सरकारचा मराठीद्वेष मराठी भाषिकांवर अन्याय करून अग्निपरीक्षाच घेत आहे. वयाच्या ४० व्या वर्षी आम्हाला कन्नड शिकण्यासाठी पहिलीच्या वर्गात बसण्याची पाळी सरकारने आणली आहे अशी तिखट प्रतिक्रिया मनोहर कंग्राळकर यांनी दिली आहे.

**२. प्रमोद देसूरकर**

कर्नाटक जिल्हा प्रशासनाने भाषिक अल्पसंख्याक आयोगाच्या शिफारशीनुसार मराठी, इंग्रजी व कन्नड भाषेत कागदपत्रे, अर्ज, बसवरील नामफलक व सरकारी कार्यालयात मराठी फलक लावण्याची नितांत गरज असल्याचे मत व्यक्त केले.

**३. शांता आडाव**

'काहीच कळोस तयार न्हाय' – सिव्हील हॉस्पिटलमध्ये आपल्या सुनेला उपचाराकरिता घेऊन आलेल्या उचगांव येथील शांता आडाव यांना कन्नडचा गंध नाही. उचगांव हे गाव सीमेवर असल्याने त्यांना सिव्हील हॉस्पिटलशिवाय पर्याय नाही. कन्नड येत नसल्याने हॉस्पिटलमध्ये 'सगळंच कानडीत सांगत्यात कायच कळोस तयार न्हाय', 'आतं या वयात कानडी शिकोस, कुठे जातंलं सांगा', 'डॉक्टर, नर्स सगळीजण किलबिल करत्यात, काय सांगोल्यात तेच कळेना' अशी प्रतिक्रिया शांता आडाव यांनी दिली.

४.	मांगरीश देशपांडे

बेळगावची बाजारपेठ सीमाभागातील प्रसिद्ध बाजारपेठ असून गोवा, चंदगड, गडहिंग्लज, कोल्हापूर, सावंतवाडी, सांगली, संकेश्वर, निपाणी अशा बहुतांश मराठी भाषिकांची नाळ बेळगाव बाजारपेठेशी जुळली आहे. वारंवार ते बेळगावला येत असतात पण सीमाभागात प्रवेश करताच रस्त्यावर कानडी फलक दिसतात. त्यामुळे आम्हा व्यावसायिकांचीही अडचण होते. फलक कानडीत असल्याने कोणता रस्ता कोठे जातो तेच कळत नाही, चौकाचे नाव कळत नाही. त्यामुळे मनस्ताप होतो.

वरील प्रतिक्रियाबरोबरच अध्ययनक्षेत्रात प्रत्यक्ष संशोधकाने भेट देऊन संबंधित घटकांकडून माहिती संकलित केली. त्यावेळी सीमाप्रश्नाशी संबंधित नेते, माजी आमदार, माजी महापौर तसेच सर्वसामान्य नागरिक यांच्याकडून संशोधकाला आलेल्या प्रतिक्रिया याठिकाणी व्यक्त केल्या आहेत. त्यामध्ये –

### ४.६.१२ संशोधकाचे अनुभव

दि. १ जून २०१२ रोजी संशोधन अभ्यासक्षेत्रातील महिलेशी बातचीत करताना असा अनुभव संशोधकाला आला की, महिलेचे शिक्षण ४ थी पर्यंत मराठी भाषेतून झाले होते. एके दिवशी नंदगड येथे तिच्या नातलगामध्ये एक व्यक्ती मरण पावली होती. त्यामुळे मयताला जाण्यासाठी ती गोवावेसमध्ये (बेळगाव) आली आणि कर्नाटक परिवहन मंडळाच्या बसमधून प्रवास करण्यास निघाली. गाडीत प्रवाशी जास्त असल्याने कंडक्टर त्या महिलेचे तिकीट काढेपर्यंत गाडी पोहचली होती कुसमळीला. त्यावेळी कंडक्टर तिच्यावर ओरडला आणि गाडी नंदगडला नाही जांबोटीला जात आहे असे म्हणून कुसमळी येथे सोडून दिले. सकाळी ८.०० वाजता घराबाहेर पडलेली महिला दुपारी ४.०० वाजता मयताच्या ठिकाणी गेली, तोपर्यंत सर्व अंत्यविधी झालेला होता. हे केवळ कन्नड भाषेत गाडीचे फलक असल्यामुळेच झाले.

दि. २८ मे २०१२ रोजी संशोधक खानापूर तालुक्यातील नागरगोळी या खेड्यात माहिती संकलित करण्यासाठी गेला असताना तेथे काही घटकांची अनुसूची मुलाखत भरून घेत असताना तेथे दुसऱ्या कोणत्या कामासाठी कर्नाटकी पोलीस आले. आम्ही जेथे माहिती घेत होतो त्याठिकाणी येऊन कन्नडमध्येच काय चालले आहे? असे विचारत होते. तेव्हा आम्हाला कन्नड भाषा समजली नाही. परंतु आमच्याजवळ एक १० वर्षाचा मुलगा म्हणाला की काय चालले आहे? असे विचारतात. तेव्हा संशोधक या नात्याने मी हिंदीमध्ये उत्तर दिले, मी या विषयावर संशोधन करत असून माहिती गोळा करत आहे. तेव्हा ते मला म्हणाले तुम्ही कोठून आलात? हाच विषय तुम्ही का निवडला? कन्नड भाषिक नव्हते का? असे म्हणून त्या गावातून माहिती गोळा करण्यास मज्जाव केला.

संशोधन विषयाशी संबंधित दुय्यम साधनसामग्रीचा वापर करून माहिती गोळा करण्यासाठी बेळगाव महानगरपालिका, तालुका पंचायत आणि जिल्हा पंचायत या ठिकाणी गेल्यानंतर संशोधकाला प्रामुख्याने भाषेची अडचण आली. संबंधित अधिकारी कन्नडमधूनच बोलू लागले. त्यामध्ये माझा संशोधन विषय मराठी भाषिकांशी संबंधित असल्याने माहिती मिळण्यास दिरंगाई लागली. बऱ्याच वेळेला संबंधित कार्यालयातून माहिती संकलित करण्यासाठी संशोधकाला आपल्यासोबत कन्नड भाषेचे पूर्ण ज्ञान असणारी व्यक्ती घेऊन जावे लागते.

सीमाभागातील काही मराठी शाळा, हायस्कूलमधून अनुसूची भरून घेत असताना संबंधित शिक्षकांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली. याचे कारण कर्नाटक सरकारचे आम्ही नोकर असल्याने खरी माहिती दिल्यास भविष्यात आमच्यावर कारवाई होईल. पण सीमाभागातील सर्वसामान्य शेतकऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी, तरूणवर्गाने कोणाचेही दडपण वा भीती न बाळगता मनमोकळेपणाने संशोधकाला माहिती देऊन सहकार्य केले.

महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्नावर आजमितीस तुरळक स्वरूपात संशोधन झाल्याने संशोधकाला विषयाशी संबंधित पूर्वाभ्यास, लेख, शोधनिबंध यांचा वापर करणे अडचणीचे ठरले.

#### ४.६.१२.१ संशोधकाजवळ आलेल्या प्रतिक्रिया

**१. श्री. सुरेश राजूकर – तालुका पंचायत समिती सदस्य, तुरमुरी (दि. २८/५/२०१२)**

यांनी स्वत:चा अनुभव संशोधकाला सांगितला. सरकारी नोकरीत असताना कामाच्या ठिकाणी मंत्र्याचा फोन आला तेव्हा मी त्यांच्याशी मराठीत बोललो. त्यावेळी मंत्री माझ्यावर ओरडले आणि कन्नडमधून बोला असे ठणकावले. मात्र मी कन्नड येत नाही असे सांगितल्यावर लागलीच मला नोकरीवरून काढून टाकण्यात आले.

**२. सौ. मीना मुतकेकर – चेअरमन, कंग्राळी–अलतगा ग्रामपंचायत, ता. बेळगाव (दि. ५/२/२०१२)**

आज कर्नाटक सरकारने सगळीकडेच कानडीकरण केलेले आहे. त्यामुळे शाळा, महाविद्यालय, पोलीस, कोर्टकचेरीमध्ये गेल्यावर तेथील अधिकारी वा कर्मचारी मराठी येत नसेल तर बाहेर व्हा? असे ठणकावून सांगतात. तसेच मराठी भाषिक आंदोलने, उपोषण, मेळावे, काळादिन यामध्ये सहभागी झाल्यास त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारतात. यासंदर्भात त्या म्हणाल्या, १ नोव्हेंबर यादिवशी सीमाभागात काळादिन पाळला जातो. मात्र त्याचदिवशी कर्नाटक सरकार 'राज्यारोहण दिन' मोठ्या धामधुमीने साजरा करते. त्यादिवशी सर्व कन्नड अधिकारी व कर्मचाऱ्यांना कर्नाटक सरकार सुट्टी जाहीर करते. मात्र मराठी भाषिक कर्मचाऱ्यांना कामावर बोलावते, तसेच केवळ मराठी भाषिक म्हणून त्यांना पदोन्नती, सेवासुविधा नाकारत असते.

**३. श्री. शाहू नांगनूरकर, शिक्षक, कापोली हायस्कूल, ता. खानापूर (दि. ७/२/२०१२)**

कर्नाटक सरकारने आजरोजी शाळेमधील सर्व कागदपत्रे कन्नडमधूनच ठेवण्याची सक्ती केली आहे. आमचे हायस्कूल मराठी माध्यमाचे असूनसुद्धा सर्व कागदपत्रे, नोटीसी, पत्रव्यवहार इ. कन्नडमध्येच ठेवावेत व तसे अहवाल वरिष्ठ कार्यालयात पाठवून देण्याची सक्ती केली आहे. कन्नडसक्तीमुळे येथील विद्यार्थ्यांना हिंदी या राष्ट्रभाषेला मुकावे लागते तर कन्नड विषय अवघड जात असल्याने विद्यार्थ्यांची या विषयाला ना असते. तरीपण हे विद्यार्थी आपल्या मातृभाषेच्या मराठी विषयास नापास होतात आणि कन्नड विषयात मात्र अधिक गुण घेऊन पास होतात यामागचे उघड

गुपित मात्र अद्याप समजलेले नाही.

## ४. श्री. सुरेश नाळकर, माडेगुंजी, ता. खानापूर (दि. ८/२/२०१२)

यांनी आपल्या मुलांना कन्नड विषयात प्रथम श्रेणीत पास मात्र घरात कन्नड लिहिता, वाचता येत नाही, का? असा प्रश्न करून पुढे म्हणाले की, कन्नड विषयात सर्व विद्यार्थ्यांना पास करण्याची सक्ती कर्नाटक सरकारने केली आहे. कारण कन्नड भाषेचा प्रसार करणे, विद्यार्थ्यांच्या मनात कन्नड भाषेविषयी आवड निर्माण करणे व पर्यायाने मराठी भाषेचे खच्चीकरण करणे हा कट आहे. त्यामुळे मुलांना कन्नड शिकूनही लिहिता, वाचता येत नसल्याने आम्हा सीमावासियांची अवस्था 'आंधळं दळतंय, अन् कुत्र पीठ खातंय' अशी झालेली दिसून येते.

## ५. सौ. विद्या विठ्ठल पाटील, माणिकवाडी, ता. खानापूर (दि. २३/२/२०१२)

यांच्याशी संशोधक बातचीत करताना त्यांनी सांगितले की, आम्ही सीमावासीय कायम दरिद्रीच. आम्ही 'ना महाराष्ट्रात – ना कर्नाटकात' आमच्यासाठी कोणीही वाली नाही. आम्हा मराठी लोकांना विकासाचे मार्गच माहित नाहीत. आमचं नशीब मुलांवर अवलंबून. पण मुलांना शिकवावं, त्यांना आमच्यासारखं कष्टप्राय जीवन येऊ नये, शिक्षण देऊन मोठ्ठं करावं म्हटलं तर भाषा आड आली. भाषेमुळे नोकरी नाही आणि नोकरी नसल्याने कुटुंबाचा पोटापाण्याचा प्रश्न समोर आला? मुलं बेकारीमुळे व्यसनी बनू लागलीत. तसेच गावात आजही बस (एस.टी.) येत नाही. वीज, पाणी, रस्ते याकडे कर्नाटक सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. केवळ मराठी भाषिक म्हणून. आता तुम्हीच सांगा आम्ही मराठी भाषिक ही चूक कोणाची? कोणी शिक्षा भोगायची? अगदी भावनावश होऊन आपल्या समस्यांचा पाढा त्या वाचत होत्या.

## ६. डॉ. गीता किणीकर, प्राथमिक आरोग्य केंद्र, बेळंकी, ता. हुक्केरी (दि. १७/१०/२०१२)

त्या म्हणाल्या, सीमाभागात आजही बहुतांश लोक हे मराठीच बोलतात. किंबहुना आम्हाला मराठी येत असल्याने रूग्णांशी विचारपूस करणे सोपे जाते, बहुतांशी पेशंट हेसुद्धा चांगले मराठी बोलतात. उलट कन्नडला प्रतिसाद देत नाहीत. पुढे त्या म्हणाल्या, हा भाग अजूनही मागास, अविकसित असून बहुतांशी लोकसंख्या दरिद्री आहे. त्यामुळे लोक व्यसनी आहेत, तंबाखू, बिडी,

सिगारेट, दारू इ. व्यसनांच्या आहारी गेलेत. त्यामुळे उच्च शिक्षणाचे प्रमाण कमी असून आरोग्याकडे म्हणावे तसे लक्ष देत नाहीत. त्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर व एकंदरीत त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर होतो.

**७. श्री. बाबू भावकाना पाटील, मोदगे, ता. हुक्केरी (दि. १०/१०/२०१२)**

सीमाप्रश्नासाठी सातत्याने झगडणारे निष्ठावंत कार्यकर्ते, प्रत्येक मोर्चात, सत्याग्रहात, आंदोलनात सहभागी असतात. त्यांच्या मते, मोदगे गाव ९०% मराठी भाषिकांचे आहे. येथे मराठी शाळा व हायस्कूल असून पुरेशी विद्यार्थी संख्या आहे. पण कर्नाटक सरकारने कन्नडसक्तीतून गावात कन्नड शाळा काढली. पण पुरेसे विद्यार्थी नाहीत. आज अपुरी विद्यार्थीसंख्या असूनही कन्नड शाळेत पुरेशा सुविधा आहेत, मात्र मराठी शाळेत नाहीत. हा कर्नाटक सरकारचा भाषाद्वेष आहे तर मराठी हायस्कूल असून त्यालाही कर्नाटक सरकारची आर्थिक मदत नाही. वेळोवेळी मागणी करूनदेखील आम्हाला रिकाम्या हातानेच परतावे लागते. मात्र महाराष्ट्र सरकारने आमच्या हायस्कूलच्या इमारत बांधकामासाठी आर्थिक मदत देऊन सीमावासियांच्या पाठीशी उभे असल्याचे दाखवून दिले आहे. ते पुढे म्हणाले आमची पिढी सीमाप्रश्नासाठी लढून संपली तरीही हा प्रश्न सुटलेला नाही, हे असंच राहिले तर आमच्या मुलांची, नातवंडांची काय अवस्था होणार? असे भाविक उद्‌गार काढले आहेत.

**८. श्री. गणपती अमृत शिरोडकर, शिवठाण, ता. चिक्कोडी (दि. २६/१/२०१२)**

त्यांच्या मते, राज्य पुनर्रचना आयोगामुळे आम्हाला शिक्षा भोगावी लागते. केवळ मराठी भाषिक म्हणून नोकरी मिळत नाही, जर मिळालीच तर हलक्या प्रतीची, तेथेही वरिष्ठ कन्नड अधिकाऱ्यांकडून शोषण, पिळवणूक, सतत अन्याय, अत्याचार. त्यामुळे मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. पदोपदी अपमान सहन करून घ्यावा लागतो. तर कन्नड येत नसल्याने बऱ्याचवेळा आपलीच कागदपत्रे आपल्याला समजत नाहीत. त्यामुळे सीमाभागात राहून कर्नाटक सरकारची नोकरी करणे म्हणजे 'भीक नको पण कुत्रा आवर' अशी अवस्था झालेली दिसून येते.

९. **श्री. लक्ष्मण धनाजी बेळगावकर, धामणे, ता. बेळगाव (दि. ५/११/२०११)**

स्वत: पदवीपर्यंत शिक्षण असूनही मला माझ्या घराची, शेताची, तसेच वीज, पाणी याबाबतची कागदपत्रे वाचता येत नाहीत हे दुर्दैव. त्यामुळे अशिक्षित माणसांप्रमाणे दुसऱ्यावर विसंबून रहावे लागते. तसेच या महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्नामुळे गावातील वातावरण तणावपूर्ण बनते. मराठी–कन्नड भाषिक यांच्यात सामंजस्य निर्माण होत नाही. विशेषत: निवडणुकीच्या काळात मराठी भाषिकांची संघटना म्हणून महाराष्ट्र एकीकरण समिती व कर्नाटकचे इतर पक्ष परस्परविरोधी निवडणुका लढवताना हा संघर्ष पहायला मिळतो. त्यामुळे गावची शांतता भंग पावते. त्याचा परिणाम एकूण समाजव्यवस्थेवर होतो.

१०. **सौ. एस. एम. कवडे, शिक्षिका, लोकूर, ता. अथणी (दि. २९/५/२०१२)**

यांच्याशी संशोधकाने बातचीत केल्यानंतर त्या म्हणाल्या, आम्ही मराठी भाषिक, पण आम्हाला कन्नड येते. शाळेत दोन्ही भाषिक मुले आहेत. आम्ही सर्वांना समान वागणूक देतो. माझे स्वत:चे मत सांगावयाचे झाल्यास त्या म्हणाल्या, आम्ही कर्नाटकातच राहणार, कारण आम्हाला कधी दुजाभावाची वागणूक मिळालेली नाही. शिवाय कर्नाटकात विद्यार्थ्यांना मोफत पास, वह्यापुस्तके, शिष्यवृत्त्या, सायकली वाटप इ. सुविधा मिळतात असे परखड मत मांडून एकप्रकारचे आम्ही सीमावासीय नसून कर्नाटकचेच अधिकृत रहिवाशी असल्याचे दाखवून दिले.

११. **श्री. आप्पय्या मारूती नाईक, कोट, ता. हुक्केरी (दि. १३/१०/२०११)**

ते म्हणाले की, आम्हाला कर्नाटकातच रहायला आवडते. कारण कर्नाटक सरकारच्या सोयीसवलती जास्त आहेत. यापेक्षा महाराष्ट्रात अधिक चांगले काय असणार? मुलगी जन्मल्यास तिच्या नावावर कायम ठेव, शस्त्रक्रिया मोफत, शिक्षण मोफत, सायकल मोफत, बस पास, शिष्यवृत्त्या तसेच शेतकऱ्यांना लाईट बील कमी, मोटर बील मोफत, गरिबांना रेशन स्वस्त, वृद्ध, विधवा, अपंग इ. निराधार घटकांसाठी कर्नाटक सरकारच्या विशेष योजना आहेत. पण एक मात्र की, कर्नाटक सरकारने मराठी–कन्नड दोघांनाही समान वागणूक दयावी. आमच्याच गावात शासनमान्य ग्रंथालय आहे, मात्र त्यामधील सर्व पुस्तके ही कानडीच आहेत. अशावेळी मराठी भाषिकांवर अन्याय

होतो.

## १२. कु. कल्लाप्पा सटवाप्पा शिरोडकर, विद्यार्थी, ता. चिक्कोडी (दि. २१/५/२०१२)

संशोधकाला हा विद्यार्थी आपले अनुभव अगदी पोटतिडकीने सांगत होता. तो म्हणाला, सीमाप्रश्नाचा कंटाळा आलाय? वैताग आलाय? कारण आम्हा विद्यार्थ्यांना हा नाहक त्रास. शाळेत शिक्षकांकडून, तपासणी अधिकाऱ्यांकडून तसेच कर्नाटक व महाराष्ट्र सरकारकडूनही त्रास होतो. त्यामुळे आम्हालाच समजेना, ''आमचा बाप कोण?'' कर्नाटक की महाराष्ट्र? कोणाकडे आम्ही हात पसरायचे. पालक म्हणतात आम्ही महाराष्ट्राचेच, पण शाळेत गुरूजन म्हणतात, आम्ही कर्नाटकाचे. वर्गात मराठीचा शिक्षक म्हणतो, मराठी श्रेष्ठ!, तर कन्नडच्या तासाला कन्नड शिक्षक म्हणतो, कन्नड भाषा श्रेष्ठ!, तर तिकडे इंग्रजीचा शिक्षक म्हणतो जागतिक भाषा म्हणून इंग्रजी श्रेष्ठ! त्यामुळे आम्हा विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रमावस्था निर्माण झाली आहे

## १३. श्री. सतिश लक्ष्मण बोंगाळे, शिंपी, मण्णूर, ता. बेळगाव (दि. ९/१२/२०११)

व्यवसायाने शिंपी असलेल्या या तरूणाने १० वी नंतर शिक्षण अर्धवट सोडून या व्यवसायाकडे वळला. ते म्हणाले, गेली ५५–६० वर्षे हा सीमाभाग जेव्हा अधिक गरज होती तेव्हा महाराष्ट्रात गेला नाही तर मग आता जावून काय उपयोग? आता आम्ही येथे पूर्णपणे स्थिर आहोत. आमची घरे, जमीन, गुंतवणूक या सर्व बाबी कर्नाटकामध्ये आहेत. ज्यावेळेला कन्नड सक्ती झाली तेव्हा सर्व कागदपत्रांचे भाषांतर मराठीचे कन्नडमध्ये करण्यात आले, तेव्हा मराठी भाषिकांना फार त्रास झाला. अनेक समस्यांना सामोरे जावे लागले आणि आता जर पुन्हा महाराष्ट्रात जायचे म्हटले तर पुन्हा कन्नडचे मराठी भाषेत रूपांतर करावे लागणार, हेच उद्योग आम्ही करायचे का? आता तर आम्हाला थोडी का होईना कन्नड भाषा लिहायला, वाचायला व बोलायला येते. मग येथेच रहायचे. तसेच कर्नाटकात अनेक योजनांचा लाभ घेता येतो, विद्यार्थ्यांना पास, सायकल, शिष्यवृत्त्या, वह्यापुस्तके इ. तर शेतकऱ्यांना वीज मोफत, वृद्ध, अपंग, विधवांना दरमहा पेन्शन, दारिद्रयरेषेखालील लोकांना धान्य योजना इ. मिळत असताना महाराष्ट्रात कशाला? असे स्पष्ट मत मांडून पुढे म्हणाले, मात्र आम्हाला महाराष्ट्रीयन संस्कृती आवडते. त्या संस्कृतीचा प्रभाव आजही

आमच्यावर आहे. आम्ही आजही घरी, समाजात मराठीच बोलतो. दसरा, दिवाळी, शिवजयंती, गणपती उत्सव उत्साहाने राबवतो. त्यामुळे आमच्या दृष्टीने हा प्रश्न निकामी झाल्याचे वाटते.

## १४. श्री. रामचंद्र ईश्वर पाटील, माडेगुंजी, खानापूर (दि. २८/१/२०१२)

या मराठी भाषिक कार्यकर्त्याने सीमाप्रश्नाबाबत आणि कर्नाटक सरकारच्या अन्यायी वागणुकीबाबत सीमाभागातील महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांनाच दोषी ठरवले आहे. त्यांच्या मते, सीमाप्रश्न चिघळण्याचे काम या स्वार्थी राजकीय नेत्यांनी केले आहे. सत्ताधारी बनण्यासाठी म्हणून सर्वसामान्यांच्या हिताचा विचार न करता सीमाभागातील मराठी सामान्य माणसांचा वाट्टेल तसा उपयोग करून घेतला. सामान्य कार्यकर्ते मोठ्या आशेने सकाळी घरातून भाजी–भाकरी बांधून घेऊन या मोर्चे, सत्याग्रह, आंदोलनामध्ये सहभागी होतात. पण हे राजकीय नेते मात्र मी मोठा? की तू मोठा? यासाठी एकमेकांपासून वेगळे होत राहिले. त्यातूनच महाराष्ट्र एकीकरण समितीची अनेक छकले होऊन आज जवळपास सीमाभागात अठरा समित्या असलेल्या दिसून येतात. आणि या विसंगतीचा फायदा कर्नाटक सरकार घेत आहे. त्यामुळे कर्नाटक सरकारला दोष देण्यापेक्षा या मराठी राजकीय नेत्यानांच दोष देणे योग्य ठरेल असे परखड मत मांडले. पुढे ते म्हणाले की, या सीमाप्रश्नामुळे आमचे तर नुकसान झालेच पण मुलांचे होऊ नये यासाठी मुलांना शिक्षणासाठी महाराष्ट्रातच ठेवले आहे.

## १५. श्री. एकनाथ केसरकर, शिप्पूर, ता. हुक्केरी (दि. २/६/२०१२)

कर्नाटकात मराठी भाषिकांना गौण स्थान आहे. शाळा, महाविद्यालय प्रवेशावेळी, नोकरीमध्ये, पदोन्नतीवेळी, व्यवसायाच्या ठिकाणी, खाजगी वा सरकारी कार्यालयात, दवाखान्यात इ. ठिकाणी प्रथम कन्नड भाषिकांना प्राधान्य देऊन मराठीद्वेष काढला जातो. त्यामुळे आम्ही कर्नाटकात राहत असलो तरी आमची संस्कृती महाराष्ट्राचीच. महाराष्ट्रातच आम्ही आज नोकऱ्या करतो. गडहिंग्लज, कागल, मिरज, कोल्हापूर, पुणे, मुंबई इ. शहरांमध्ये कमी शिक्षणामुळे हलक्या प्रतीच्या नोकऱ्या वा व्यवसाय करून उदरनिर्वाह चालवतो. त्यामुळे आमचा विकास खुंटला आहे. यातून बाहेर पडायचे असेल तर त्यासाठी लवकरात लवकर सीमाप्रश्नाचा निकाल लागून महाराष्ट्रात जाता आले

पाहिजे. महाराष्ट्रीयन संस्कृतीविषयी आम्हाला अधिक जवळीकता आहे.

१६. **श्री. वाय. व्ही. पाटील, शिक्षक, कंग्राळी, ता. बेळगाव (दि. ५/६/२०१२)**

राजकीय नेत्यांनीच सीमाप्रश्नाचे भांडवल केले आहे. याचे परिणाम राजकीय नेत्यांना भोगावे लागत नसून सर्वसामान्य मराठी भाषिकांनाच सोसावे लागतात. कारण कोणत्याही कार्यालयात गेल्यास राजकीय नेत्यांची कामे पटकन होतात. हाल होतात ते सर्वसामान्य लोकांचेच. यामुळे कर्नाटक सरकारच्या अन्याय–अत्याचाराचे भक्ष्य येथील सामान्य माणूस, विद्यार्थी, कामगारच होतो. त्यामुळे ही परिस्थिती अशीच राहिल्यास मराठी भाषिकांना भविष्यात अनेक संकटांना सामोरे जावे लागेल. आज सीमाभागातील अनेक तरूण नोकरी व्यवसायासाठी महाराष्ट्रात जातात. छोटे मोठे व्यवसाय त्यामध्ये गवंडी, सेंट्रींग, फरशी फिटींग, रंगकाम इ. करून आपला चरितार्थ चालवितात. तर आम्ही महाराष्ट्रातच नोकरी करत असून आमच्या मुलांना महाराष्ट्रातच शिक्षण देणार याचे कारण आम्हाला महाराष्ट्रीयन संस्कृतीचा रास्त अभिमान आहे. आमचे पूर्वज, नातलग सर्व महाराष्ट्रीयनच. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाची आम्ही फार वाट पाहात नाही कारण आम्ही तन, मन, धन याने महाराष्ट्रीयच असल्याचे सांगितले.

वरीलप्रमाणे विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या प्रतिक्रियांवरून असे दिसून आले की, बहुतांशी लोकांचा महाराष्ट्रीयन संस्कृतीशी जवळचा संबंध आहे. तसेच कर्नाटक सरकारचे धोरण मराठी भाषिकांवर अन्यायकारक आहे. राज्य पुनर्रचना आयोगाने केलेल्या चुकीची शिक्षा आम्हाला भोगावी लागत आहे. बहुतांशी लोक सीमाभागातील मराठी भाषिकच आहेत. तसेच कर्नाटक सरकारने अल्पसंख्याक म्हणून त्यांना ज्या सेवासुविधा पुरविल्या पाहिजेत त्या पुरविल्या जात नसल्याने सीमावासीयांची अवस्था 'ना घर का, ना घाट का' अशी झालेली दिसून येते.

### ४.६.१३ मराठी भाषिकांचा निर्धार

गेली ५५ ते ६० वर्षे भिजत पडलेला महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्न लोकशाही मार्गाने अनेक प्रयत्न करूनही सुटलेला नाही. किंबहुना तो सोडविण्यासाठी कर्नाटक सरकार, महाराष्ट्र सरकार वा केंद्र सरकारकडून अपेक्षित प्रयत्न झालेले दिसत नाहीत. त्यामुळे शेवटी महाराष्ट्र एकीकरण समितीने

महाराष्ट्र सरकारमार्फत उच्चाधिकार समितीच्या मार्गदर्शनाखाली सर्वोच्च न्यालयालयात या प्रश्नाबाबत याचिका दाखल करून सीमावासीय जनता न्यायालयाच्या निकालाकडे डोळे लावून बसली आहे. पण तोपर्यंत सीमाभागातील मराठी भाषिकांना कर्नाटक सरकारच्या हुकुमशाहीला सामोरे जावेच लागत आहे. त्यांच्या अन्यायाचे भक्ष्य बनावे लागत आहे. या अन्यायाला कंटाळून अनेक संघटनांनी तसेच महाराष्ट्र एकीकरण समितीनेही सीमाप्रश्न सुटेपर्यंत हा संपूर्ण सीमाभाग केंद्रशासित प्रदेश करावा याची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे तर काही मराठी भाषिक कार्यकर्त्यांनी सीमाप्रश्न लवकरात लवकर सुटावा यासाठी विविध प्रकारे निर्धार केला आहे. त्यामध्ये –

**१. श्री. राम शिंदोळकर**

१९५६ पासून प्रत्येक आंदोलनात सहभाग घेतला. प्रत्येक लढ्यात पोलीसांच्या लाठ्या खाल्ल्या, त्याच्या वेदना अजूनही त्यांना सहन कराव्या लागतात. असे निष्ठावंत कार्यकर्ते, त्यांनी ''सीमाप्रश्न सुटेपर्यंत दाढी करणार नाही अशी माझी प्रतिज्ञा आहे, आज ना उद्या हा प्रश्न सुटेल अशी आशा वाटते. तसे घडेल तेव्हा आयुष्य सार्थकी लागेल.'' असा निर्धार केला आहे. याबाबतचा आपला निर्धार संकेतस्थळावर दिला आहे.

**२. श्री. मधु कणबर्गीकर (बेळगाव)**

वयाच्या ११ व्या वर्षापासून सीमाभागात सक्रीय, बऱ्याच वेळेला जीवावर उदार होऊन लढ्यामध्ये झोकून दिले. सीमाप्रश्नासंदर्भात ज्या ज्या वेळी लढे, आंदोलने, मोर्चे, नेत्यांच्या सभा आयोजित केल्या त्या त्या वेळी नेत्यांना सीमाप्रश्नासंदर्भात वैयक्तिक पातळीवर व्यासपीठावरच अडविले. खुद्द तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची बेळगाव येथील सभा बंद पाडली. त्यावेळी पोलीसांनी मारबडव केली. तर संयुक्त महाराष्ट्र चौकात ज्यावेळी सभा बोलाविली त्यावेळी कणबर्गीकर यांनी जाहीरसभेत आपले प्रतिज्ञापत्र केले, ''जोपर्यंत सीमाप्रश्न सुटत नाही, तोपर्यंत मी पायात चप्पल घालणार नाही.''

अशी प्रतिज्ञा करून आजपावेतो ते अंमलबजावणी करताना दिसतात. असा हा निष्ठावान कार्यकर्ता १९८६ च्या कन्नडसक्तीवेळी पोलीसांच्या हाती लागून हिंडलगा येथे अटक करण्यात आली. पोलीसांकडून मारबडव करण्यात आली. तर नेहरूंच्या सभेवेळी कणबर्गीकर यांनी त्यांची सभा मध्येच बंद पाडून सीमाप्रश्नाबाबत आपले म्हणणे ऐकून घ्यायला भाग पाडले. त्यावेळी पोलीसांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारले, तुडविले, तोंड दाबले, फरफटत नेले, एवढेच नव्हेतर तोंडात चप्पल कोंबण्यात आली नंतर अटक केली. तर शंकरराव चव्हाण यांना सीमाप्रश्नाबाबत स्वत:च्या रक्ताने पत्र लिहून पाठविले होते. तर बॅ. अंतुले मुख्यमंत्री असताना अंगठा कापून रक्ताचा टिळा लावला होता. इतकी धग या सामान्य व गरीब कार्यकर्त्यांमध्ये होती व आजही आहे हे त्यांच्या ओघवत्या चेहऱ्यावरून संशोधकाला जाणवत होते. यावेळी डोळ्यांतून दु:खाश्रूंनासुद्धा वाट मोकळी करून देत होते.

**३. माजी आमदार व्ही. वाय. चव्हाण (खानापूर)**

खानापूर गावचे महाराष्ट्र एकीकरण समितीचे नेते यांनी १ नोव्हेंबर १९८५ रोजी काळ्या दिनाच्या सभेत जाहीर घोषणा केली की, ''सीमाप्रश्न १ मे १९८६ च्या आत सुटला नाहीतर दि. १ मे १९८६ रोजी हुतात्मा चौक, मुंबई येथे आत्मदहन करणार.'' अशी घोषणा केली व संपूर्ण सीमाभागात खळबळ माजली. त्यावेळी मा. एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, बाळासाहेब ठाकरे, शरदजी पवार या सर्वांनी चव्हाणसाहेबांना पत्रे पाठवून आम्ही आता सीमाप्रश्न सोडविण्याची जबाबदारी घेतली आहे त्यामुळे आपण आपला आत्मदहनाचा निर्णय मागे घेऊन आम्हाला संधी दयावी अशी विनंती करण्यात आल्याने चव्हाणसाहेबांनी विनंतीस मान देऊन आत्मदहनाचा निर्णय त्यावेळी मागे न घेता तहकूब केला.

त्यानंतर मा. चव्हाणसाहेबांनी खानापूर तालुक्यातून महाराष्ट्र एकीकरण समितीच्या झेंड्याखाली सर्व कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव उमेदवारी अर्ज दाखला केला. त्यावेळी त्यांनी असे लेखी दिले की, ''मी आमदार झाल्यावर तीन वर्षात सीमाप्रश्न सुटला नाहीतर मी हुतात्मा चौक, मुंबई येथे आत्मदहन करीन.'' त्याप्रमाणे त्यांनी ठरल्याप्रमाणे दि. १७ जानेवारी १९९३ रोजी हुतात्मा

दिनादिवशीच आत्मदहन करण्याचा निर्णय घेऊन अज्ञातवासात निघून गेले व त्यादिवशी सकाळी ठीक ११ वाजता गोवा बसने शिवस्मारकाच्या समोरच हजार फूट अंतरावर वेशांतर केलेल्या अवस्थेत आपला निर्णय पूर्णत्वास नेण्यासाठी उतरले. तेव्हा काही कार्यकर्त्यांनी त्यांना ओळखले व त्यांच्याकडील पेट्रोल कॅन, लायटर आदी साहित्य हिसकावून घेतले. त्यावेळी जवळपास पाच हजार लोकांचा जमाव जमला होता. तर पोलीसी तैनात कडेकोट बंदोबस्त होता. हा स्वत:चा अनुभव चव्हाणसाहेबांनी वयाच्या ८५ व्या वर्षी संशोधकाजवळ सांगितला आहे.

### ४.६.१४ महाराष्ट्र–कर्नाटक सांस्कृतिक अनुबंध

अलिकडेच कालवश झालेले संशोधक शं. बा. जोशी यांनी 'मऱ्हाटी संस्कृती काही समस्या' या आपल्या ग्रंथात मरहट्टे आणि कानडी हे प्राचीनकाळी एकच लोक होते असे दाखवून दिले आहे. मराठ्यांची पूर्वपरंपरा वेदकाळातील यदुजनांपर्यंत पोहोचते. कर्नाटकीयांचा तुर्वसूंशी घनिष्ठ संबंध असलेला दिसतो. हे यदू आणि तुर्वसू जरी वेगवेगळ्या टोळ्यांतले असले तरी या टोळ्या अगदी जवळकीच्या नात्याने जोडलेल्या होत्या. शिवाय या प्रदेशांवर राज्य करणारे राष्ट्रकूट घराणे यादववंशीय होते. म्हैसूरचे आजचे राजघराणे यदुवंशीय आहे आणि शिवाजी महाराजांचे मातुल घराणेदेखील जाधव म्हणजे यादववंशीय होते. अनेक वर्षे आज आपण ज्यांना महाराष्ट्र आणि कर्नाटक म्हणतो त्यांच्यावर एकच राजघराणे राज्य करीत होते. ''पैठणचे सातवाहन, बदामीचे चालुक्य, मलखेडचे राष्ट्रकूट आणि कल्याणचे चालुकय या चारही राजवटीत मराठीने आपले स्वतंत्र घर मांडले नव्हते. कर्नाटकीयांच्या राजवटीत ती कानडी जवळच वाढत गेली.[३५]

शं. बा. जोशी यांच्या वर निर्देशिलेल्या पुस्तकातील या उताऱ्यावरून मराठी व कानडी भाषांचे व भाषकांचे संबंध किती घनिष्ठ होते ते स्पष्ट होते.

### ४.६.१४.१ मराठी–कानडी संबंध

कानडी आणि मराठी अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या लोकांचा व्यवहार हजारो वर्षांपासून एकमेकांत गुंतलेला आहे. दोन्ही भाषांतील म्हणी, शब्द वगैरेंचे मर्म व औचित्य कळण्यास परस्परांचे साहित्य आणि परंपरा यांच्या अभ्यासाचीच गरज आहे. पण ते करत असताना एकेकट्याचा

स्वतंत्र अभ्यास न करता दोहोंचाही परस्पर अभ्यास करणे आवश्यक ठरेल. कर्नाटकाची उत्तर सीमा तीच महाराष्ट्राची दक्षिण सीमा. या सीमारेषेवरच या दोन देशांच्या जुळेपणाची तोंडओळख होते. या सीमेवर नरसोबावाडी, गाणगापूर, औदुंबर, कुरूगड्डी तसेच विठ्ठलक्षेत्र पंढरपूर, सिद्धरामक्षेत्र सोलापूर, भवानीक्षेत्र तुळजापूर, मंगळवेढे, गोकर्ण, कोल्हापूर, बाहुबली इ. धार्मिक, सांस्कृतिक स्थळे आहेत. या स्थळांचे भक्त हे महाराष्ट्र व कर्नाटकातील मराठी व कानडी भाविकच आहेत.

मराठ्यांची कित्येक कुलदैवते कर्नाटकात आहेत आणि आज महाराष्ट्रात जमा झालेल्या क्षेत्रांतील देवतांचे भक्त कर्नाटकात नांदत आहेत. मराठ्यांच्या शहाण्णव कुळींचा इतिहास कर्नाटकात शोधावा लागेल व म्हैसूरमधील काही देशस्थ म्हणविणारे घरी एकजातीची मराठी बोलतात आणि दक्षिण महाराष्ट्रातील माध्यदेशस्थ बहुतेक कानडी बोलणाराच असतो.

तसेच 'चांमुडराये करवियतें' या मराठीतील प्रथम वाक्याबद्दल महाराष्ट्रीय साहित्यिक फार अभिमान बाळगत असतात. तो चामुंडराय कर्नाटकातील मोठा गद्य ग्रंथकार आहे, असामान्य शूरांचा अग्रणी आहे आणि असामान्य, उन्नत, भव्य व सुंदर अशा गोमटेश्वर मूर्तीचा प्रतिष्ठापक आहे.[३६]

### ४.६.१५.२ महाराष्ट्र–कर्नाटक सांस्कृतिक देवाणघेवाण

भारतीय संघराज्याच्या स्थापनेपासून १९७३ पर्यंत म्हैसूर राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कन्नड मुलुखाला १ नोव्हेंबर १९७३ पासून कर्नाटक नाव मिळाले. या प्रांतांची भाषा कन्नड असली तरी हिंदी–मराठी भाषा बोलणारे अनेक लोक इथे आहेत. महाराष्ट्राचा कन्नडशी ऋणानुबंध तर आहेच, पण धार्मिक–राजकीय क्षेत्रांतही या दोन घटकराज्यांत विशेष जवळीक आढळते. सतराव्या शतकात बंगळुरास शहाजीराजे भोसल्यांचे मराठी बाण्याचे राज्य होते तर पंढरपूरचे विठ्ठल मंदिर होयसक विष्णुवर्धन (इ. स. ११०८ ते इ. स. ११५२) या कन्नड राजाने बांधले आहे ही दोन उदाहरणे मराठी–कानडी संबंध सांगण्यास पुरेशी आहेत. पंढरीचा विठोबा हा तर कानडी मुलुखातून आणलेला. जसा तो वारकरी पंथाचे कुलदैवत आहे तसाच तो अनेक कन्नडीगांचे उपास्य दैवत आहे. नागपंचमी, श्रावणी शुक्रवार, नवरात्र, दसरा हे कर्नाटकात साजरे होणारे सण मराठी रीतीभातीने होतात. एवढेच नव्हेतर आपली आदित्यराणूबाई हीच कन्नडीगांची ज्येष्ठा लक्ष्मी

होय. या दोन संस्कृतीत घनिष्ठ संबंध आढळतो.[३७]

भाषावार प्रांतरचनेनंतरचा 'महाराष्ट्र' आज आपल्या डोळ्यांसमोर आहे. भाषेच्या सीमारेषा फार व्यापक आणि तेवढ्याच पुसट असतात. कर्नाटकातील बेळगाव, गुलबर्ग्यापर्यंत जशी अजूनही मराठी भाषा बोलली जाते तशीच उदगीर, लातूरपर्यंत कन्नड भाषाही बोलली जाते. नदयांचे काठ आणि पर्वतांच्या रांगा राज्याची भौगोलिक मर्यादा ठरवू शकत असल्या तरी भाषेची मर्यादा ठरवू शकत नाहीत. म्हणून आजचा महाराष्ट्र डोळ्यांसमोर ठेवून बाराव्या शतकातील कर्नाटक आणि महाराष्ट्र आजच्यापेक्षा वेगळा होता. कानडी राज्यकर्त्यांनी आजच्या महाराष्ट्रातील काही भागात सत्ताविस्तार केला होता तर मराठी राज्यकर्त्यांनी आजच्या कर्नाटकात सत्ता निर्माण केली होती. त्यामुळे दोन्ही प्रांतात राजकीय आणि सांस्कृतिक देवाणघेवाण मोठ्या प्रमाणात चालू होती. महाराष्ट्र आणि कर्नाटक ही शतकानुशतके शेजारी राज्ये आहेत. जेव्हा देशाच्या सीमाच निश्चित नव्हत्या तेव्हापासून या दोन राज्यांच्या संस्कृतीमध्ये देवाणघेवाण सुरू आहे..

मराठी–कन्नड भावैक्य संमेलनासाठी उद्घाटक म्हणून कर्नाटकचे पाटबंधारे व सांस्कृतिक मंत्री गोविंद करजोक यांना सीमाप्रश्नाबाबत पत्रकारांनी छेडले असता ते म्हणाले, 'देशातील छोटी राज्ये ठरवताना भाषावार प्रांतरचना झाली. त्याचवेळी महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या सीमा ठरणे गरजेचे होते. परंतु तसे झाले नाही. तरीही दोन्ही राज्यांतील कन्नड आणि मराठी माणसे गुण्यागोविंदाने नांदत आहेत. संस्कृतीचे आदानप्रदान सुरू आहे. पण अलिकडेच राजकीय हेतूने प्रेरित सीमावाद पुन्हा डोके काढत आहे. त्याला कारण फक्त राजकारणच आहे हे आम्हाला माहित आहे. त्या राजकारणापोटी कुठल्या भाषेचा द्वेष करणे किती योग्य आहे?' पुढे ते म्हणाले, देशाची अखंडता टिकवण्यासाठी साऱ्या भाषा, प्रदेशांचा सन्मान करावाच लागेल, अन्यथा या देशाचे तुकडे होतील. महाराष्ट्र सरकारचे आम्ही कौतुक करतो. गेल्या काही वर्षापासून या राज्यात बसवेश्वर जयंती साजरी करण्यात येते. ते पाहून आम्ही कर्नाटकात शिवाजी महाराजांची जयंती सुरू केली. अशा पद्धतीने संस्कृतीचे आदानप्रदान व्हायलाच पाहिजे. एकमेकांच्या भाषांचा सन्मान झालाच पाहिजे हीच आमची भूमिका आहे.

महाराष्ट्र आणि कर्नाटक शेजारी असल्याने दोन्ही प्रदेशात रक्तसंबंधाने जुळलेली माणसे आहेत. त्यामुळे दोन्ही प्रदेशांप्रती दोघांच्याही भावना आहेत. त्या अधिक दृढ झाल्यास सीमाप्रश्न येणारच नाही असेही मत मांडले.

तर महाराष्ट्राचे दुग्धविकासमंत्री मधुकरराव चव्हाण यांनी प्रत्येकाला आपल्या भाषेत शिकण्याचा, लिहिण्याचा, बोलण्याचा अधिकार आहे. सलोख्याचे वातावरण निर्माण करून भाषावृद्धीचे काम हाती घेतल्यास सीमावाद राहणार नाही. कर्नाटक आणि महाराष्ट्राला ऐक्याचे प्रतिक बनवू. बंगळूरच्या कन्नड प्राधिकार संस्थेच्यावतीने आयोजित मराठी–कन्नड भाषा भावैक्य संमेलनासाठी दोघेही एका व्यासपीठावर आले होते. संमेलनाला दोन्ही प्रांतातून सुमारे दीड हजार कन्नड–मराठी भाषक आले होते. पहिले स्वागतगीत कन्नडमधून झाले. त्यानंतर लगेच 'जयोस्तुते जयोस्तुते' हे गीत मराठी भाषेतून सादर करण्यात आले.

मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यात चांगले मोलाचे असे पुष्कळ आहे आणि त्याचा स्वीकार केल्यामुळे आपली भाषा, साहित्य व संस्कृती समृद्ध होत आहेत असे कानडी भाषकांना मनापासून वाटू लागले तर कर्नाटकातील मराठी भाषकांविषयी त्यांना अधिक आत्मियता वाटू लागेल. कर्नाटकात जे मराठी भाषक असतील त्यांच्या भाषेच्या, साहित्याच्या व संस्कृतीच्या विकासाला ते विरोध करणार नाहीत. उलट उत्तेजन देतील आणि कर्नाटकातले मराठी भाषकदेखील कानडीचा अभ्यास राजीखुषीने करू लागतील. अशीच परिस्थिती कानडीच्या बाबतीत महाराष्ट्रात होईल. कर्नाटकात राहून आपली अस्मिता पुसली जात नाही असे मराठी भाषकांना वाटले व तशीच भावना महाराष्ट्राविषयी कानडी भाषकांची झाली तर सीमाप्रश्नावरून जी कटुता निर्माण झाली आहे ती कमी होईल आणि मग तो सोडवणे सुलभ होईल. कदाचित तो सोडविण्याची आवश्यकताच राहणार नाही.

बेळगावबाबत सांगायचे झाल्यास मराठी असूनही कानडीचं वळण असलेली आणि कानडी असूनही मराठीचं वळण असलेले अनेक लोक बेळगावात आहेत. येथील मराठी व कानडी समुदायांचे परस्परांशी संबंध हे पूर्वापार चांगले आहेत. या दोन्ही भाषिकांमध्ये कधी भाषिक संघर्ष नाही.

यासंदर्भात काटकर म्हणतात, या दोन समुदायामध्ये आपण फरकच करू शकत नाही. दोन्ही समुदायांचे सण, उत्सव, दैवते समान आहेत. दोघांचीही राहणी, आचारविचार, मते थोडक्यात संस्कृती बहुतांशी समानच आहे. तर धार्मिक देवळे, देवतांची नावे, सण, जत्रा, उत्सव हे सरमिसळच आहेत. याबाबत के. एल. ई. कॉलेजात शिकणाऱ्या सुमा पाटील व बेबी गवंडी म्हणाल्या की, ''आम्ही कानडी आहोत पण आषाढी एकादशी, गणपती, दसरा, दिवाळी सगळेच सण आम्ही साजरे करतो. जसे महाराष्ट्रात साजरे करतात तसेच इथेही साजरे करतो.''[३८]

त्याचप्रमाणे नातेसंबंधाबाबत सामाजिक कार्यकर्ते दिलीप कामत यांनी सांगितले की, त्यांच्या दोन मामेबहिणींचे नवरे कानडी आहेत. त्यांची मुले आईशी बोलताना मराठीत बोलतात तर वडिलांशी बोलताना कानडीत बोलतात. तर दुसरे गृहस्थ म्हणाले, ''माझी एक सून साताऱ्याकडची आहे, ती मराठी बोलते, दुसरी सून दावणगिरीकडची आहे, ती कानडीत बोलते. त्यामुळे आम्ही जेव्हा 'मराठी' सूनेच्या घरी जातो, तेव्हा मराठीत बोलतो आणि 'कानडी' सूनेकडे जातो तेव्हा कानडीत बोलतो. असे असताना भाषेच्या बाबतीत अशी लवचिकता असूनही हा प्रदेश गेल्या पंचावन्न साठ वर्षांपासून भाषिक अस्मितेच्या कात्रीत सापडला आहे.

खरंतर आजही बेळगावमध्ये दोन्ही भाषिक गुण्यागोविंदाने एकत्र नांदताना दिसतात. संशोधकाने आपल्या अध्ययन विषयासाठी निवड केलेल्या बेळगाव, खानापूर, चिक्कोडी, हुक्केरी व अथणी या तालुक्यात बहुतांशी मराठी भाषिकांची संख्या जास्त असल्याने तेथील लोकांची संस्कृती ही मराठी वा महाराष्ट्रीयन आहे. गेली ५५ ते ६० वर्षे आपल्या हक्काच्या महाराष्ट्रात जाण्यासाठी या ना त्या लोकशाही मार्गाने प्रयत्न करताहेत. त्यासाठी त्यांनी कधी कन्नड भाषिकांशी वैर धरलेले नाही, कन्नड संस्कृतीशी राग धरला नाही. तर त्या भाषिक अल्पसंख्याक आयोगाने केलेल्या तरतुदीनुसार कर्नाटक सरकारने आमचे हक्क, अधिकार अबाधित ठेवले पाहिजेत. अल्पसंख्याक म्हणून आम्हाला सुविधा दिल्या पाहिजेत. शाळेत, महाविद्यालयात, सरकारी वा खाजगी कार्यालयात, दवाखाने, रेल्वे, वीज इ. कार्यालयातून आमच्या मातृभाषेतून कागदपत्रे मिळाली पाहिजेत. थोडक्यात आमच्यावरील अन्याय, अत्याचार थांबले पाहिजेत. पण कर्नाटक सरकार आमच्या हक्कांवरती गदा आणत आहे.

आम्ही लोकशाही मार्गाने लढत असताना आम्हा मराठी भाषिकांवर लाठीमार करणे, केसेस दाखल करणे, प्रसंगी गोळीबार करणे इ. मार्गांचा अवलंब करून अन्यायाची परिसीमा गाठत असल्याने आम्ही मराठी भाषिक एकजुटीने या सरकारच्या कृत्याला विरोध करीत आहोत. त्यामुळे आमचा विरोध हा कन्नड भाषिकांशी नसून कर्नाटक सरकारशी आहे.

## ४.८ समारोप

महाराष्ट्र–कर्नाटक सीमावादातून भाषिक समस्या निर्माण होऊन मराठी भाषिकांनी महाराष्ट्रामध्ये जाण्यासाठी लोकशाही मार्गाने लढा सुरू केला. त्यामुळे सीमाभागात मराठी भाषिकांनी संघटीत शक्तीच्या जोरावर आपले मराठीपण जपत ग्रामपंचायत निवडणुकांपासून ते विधानसभेच्या निवडणुकीपर्यंत अनेक निवडणुका लढविल्या व जिंकल्या. कर्नाटक सरकार मराठी भाषिकांच्या संघटीत शक्तीला विरोध करण्यासाठी पोलीसांकरवी दडपशाही सुरू ठेवली. कर्नाटक सरकारच्या कन्नड सक्ती धोरणामुळे मराठी भाषिक जनतेमध्ये असंतोष पसरला. एस. टी. फलक कानडीत, सरकारी कामकाजाचे कानडीकरण यामुळे मराठी भाषिक हळूहळू सरकारच्या धोरणांपासून दूर जाऊ लागला. कारण मराठी भाषिकांच्या समस्या कर्नाटक सरकारने भाषिक हट्टाहासामुळे जाणून घेतल्या नाहीत. तसेच कानडी भाषेतील सरकारचे धोरण मराठी भाषिकांना समजले नाही. त्यामुळे सरकार व मराठी भाषिकांमध्ये दरी वाढत गेली व त्यातून अनेक सामाजिक समस्या निर्माण होत गेल्या. वास्तविकरित्या सीमाभागातील मराठी भाषिक व कन्नड भाषिक यांच्यामध्ये अपवाद वगळता संघर्ष, तंटे भाषिक कारणावरून झाले नाहीत किंवा त्यांच्यात दैनंदिन व्यवहारावेळी भाषिक ताणतणाव नाही. काही सरकारधार्जिण्या कन्नड संघटना मराठी भाषिक संस्कृतीवरती, मराठी फलकावरती अतिरेकीपणा करताना आढळतात. त्यातून भाषिक संघर्ष निर्माण होतो. सीमाभागामध्ये संघर्ष हा दोन भाषिकांमधला नसून कर्नाटक सरकार व मराठी भाषिकामधला आहे. कोणत्याही राजकीय पक्षाचे सरकार कर्नाटकमध्ये सत्तेवर आले तरी ते अधिक प्रभावीपणे कानडीसक्तीचे धोरण सीमाभागामध्ये अवलंबते. त्यातून आपली भाषा, संस्कृती नष्ट होईल या भीतीने मराठी भाषिक त्याला संघटीतपणे विरोध करतात.

## संदर्भ सूची


१. सराफ, रा. सी., भाषा, मातृभाषा आणि परभाषा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७२, पृ. १८

२. काळे खंडेरावजी, भारतीय समाज : संरचना आणि परिवर्तन, संस्कार प्रकाशन, प्रिंट–पॅफ बि. फॉर्म प्रा. लि., लातूर, प्रथमावृत्ती, २००५, पृ. ४९

३. सहस्त्रबुद्धे, पु. ग., महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००३, पृ. ५

४. कऱ्हाडे, बी. एम., भारतीय समाज : प्रश्न आणि वास्तव, पिंपळापुरे अॅन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पृ. १८२

५. गर्गे, स. मा., समाजविज्ञान मंडळ, 'ज्ञानेश' १२०५, शिवाजीनगर, पुणे, खंड ४, पृ. २०५

६. पाटील, बी. बी., भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. ३१६

7. Shriniwas, M. N., India : Social Structure, Hindustan Publishing Corporation, New Delhi, 1986, p. 1

८. आगलावे प्रदीप, भारतीय समाज : संरचना आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, २००८, पृ. ६९

९. कऱ्हाडे, बी. एम. भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जून, २००९, पृ. ५

10. http:.//mpsc-iod.blogspot.com/2011/12

११. जोशी पं. महादेवशास्त्री, 'कर्नाटक' ज्ञानराज प्रकाशन, पुणे, पृ. १२, १३

१२. गंदेवार, एस. एन., भारतीय समाज वादातीत विषय आणि समस्या, विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृ. ७५

13. http:.//minority group - wikipedia, the free encyclopedia

14. हावळ पियुष, http:.//it.it.facebook.com.2012

१५. भारताचे संविधान, भारत सरकार विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय, (७ जानेवारी २००४ पर्यंत फेरबदल केल्याप्रमाणे) , कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, सहावी आवृत्ती, पृ. ११

16. Apte Ram, Maharashtra-Karnataka Border Dispute, Kiran Thakur Working President, M. E.S, Belgaum City Unit, Belgaum, 2 October 2010, p. 109-112

१७. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र–म्हैसूर–केरळ सीमावाद आयोगास सादर केलेले महाराष्ट्र–म्हैसूर सीमावादविषयक निवेदन, १९६७, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, पृ.१५९–१६०

१८. दैनिक तरूण भारत, बेळगाव, शनिवार २५ एप्रिल २०१२

19. http:.//divyamarathi.com

२०. दैनिक सकाळ, कोल्हापूर शनिवार २ जून २०१२

२१. संग्राम, सीमाभागात ब्रिटीशराज – सीमालढा विशेष, असा आहे सीमाप्रश्न, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती कार्यालय, मुंबई, वर्ष १ ले, अंक ११, फेब्रुवारी २०१२, पृ. २९

२२. दैनिक सकाळ, कोल्हापूर, मंगळवार २३ ऑक्टोबर २००९

२३. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र–म्हैसूर–केरळ सीमावाद आयोगास सादर केलेले महाराष्ट्र–म्हैसूर सीमावादविषयक निवेदन, १९६७, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, पृ. ११५

२४. दैनिक तरूण भारत, बेळगाव, रविवार २० मे २०१२

२५. दैनिक तरूण भारत, बेळगाव, ७ डिसेंबर २०१२

२६. पुण्यनगरी, संमिश्र कोल्हापूर, रविवार २५ डिसेंबर २०११

२७. तत्रैव

२८. दैनिक तरूण भारत, बेळगाव, शनिवार, २४ डिसेंबर २०११

२९. संग्राम, सीमाभागात ब्रिटीशराज – सीमालढा विशेष, असा आहे सीमाप्रश्न, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती कार्यालय, मुंबई, वर्ष १ ले, अंक ११, फेब्रुवारी २०१२, पृ. २१

३०. दैनिक तरूण भारत, बेळगाव, मंगळवार २९ नोव्हेंबर २०११

३१. दैनिक तरूण भारत, बेळगाव, साराबंदी लढ्यातील केंद्रबिंदू येळ्ळूरच, विशेष पुरवणी,

३२. सोनवणे मनोहर, कात्रीतलं बेळगाव, http:.//uniquefeatures.in/unique

३३. दैनिक तरूण भारत, बेळगाव, रविवार २० मे २०१२

३४. दैनिक तरूण भारत, बेळगाव, ७ डिसेंबर २०१२

३५. तोरो, अ. रा. (संपादक), महाराष्ट्र–कर्नाटक सांस्कृतिक अनुबंध, अरूण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २६ ऑक्टोबर २००१, पृ. १४३

३६. तत्रैव, पृ. ७८

३७. दीक्षित दुर्गा, महाराष्ट्र संस्कृतिकोष, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, ३ जुलै, २००९, पृ. ६

३८. सोनवणे मनोहर, कात्रीतलं बेळगाव, http:.//uniquefeatures.in/unique

प्रकरण पाचवे

# माहिती संकलन व विश्लेषण

# प्रकरण पाचवे

# माहिती संकलन व विश्लेषण

५.१ प्रस्तावना

५.२ समारोप

## प्रकरण पाचवे

# माहिती संकलन व विश्लेषण

### ५.१ प्रस्तावना

सामाजिक संशोधनात तथ्यांचे संकलन केल्यानंतर त्यांचे विश्लेषण व निर्वचन करावे लागते. जोपर्यंत तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन संशोधक करीत नाही तोपर्यंत ती तथ्ये कच्च्या स्वरूपात व अर्थहीन असतात. परंतु विश्लेषण व निरूपनानंतर त्यांना एक वेगळा अर्थ प्राप्त होतो. ज्युल्स हेन्री पोईनकर म्हणतात की, ''ज्याप्रमाणे दगडाच्या साहाय्याने घर तयार होते त्याचप्रमाणे तथ्यांमुळे विज्ञान उभे राहते. पण ज्याप्रमाणे दगडांचा ढीग म्हणजे घर नव्हे त्याचप्रमाणे केवळ तथ्य संकलन म्हणजे विज्ञान नव्हे.'' यावरून तथ्यांचे संकलन वस्तुनिष्ठ पद्धतीने केले असेल, परंतु तथ्यांचे विश्लेषण जर केले नसेल तर त्या तथ्यांचे महत्त्व लक्षात येणार नाही.

श्रीमती पॉलिन यंग यांच्या मते, विश्लेषणामुळेच तथ्यांचा महत्त्वपूर्ण अर्थ स्पष्ट होतो. त्यांनी लिहिले की, ''सामाजिक विश्लेषकांची अशी मान्यता आहे की, संकलित तथ्यांच्या पाठीमागे स्वत: तथ्यांपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण आणि व्यक्त होणारी एक आणखी गोष्ट आहे जर या व्यवस्थित तथ्यांना संपूर्ण तथ्यांशी संबोधित केले तर त्यांचा एक महत्त्वपूर्ण सामान्य अर्थ लक्षात येतो.'' म्हणून तथ्यांवर संस्करण करून त्यांना व्यवस्थित क्रमात ठेवून, त्यांचे विश्लेषण व निर्वचन केले जाते.

'बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या' या विषयावर माहिती संकलित केल्यानंतर त्या माहितीचे वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय, मासिक उत्पन्न आणि तालुका या निकषांआधारे वर्गीकरण करून त्याची उभ्या–आडव्या कोष्टकात मांडणी केली आणि संख्याशास्त्रीय पद्धतीच्या आधारे सारणीयन करून त्या तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. ते पुढीलप्रमाणे –

### १. भाषा आत्मसात

१ नोव्हेंबर १९५६ पासून मराठी भाषिकांचा सीमाभाग म्हैसूर (कर्नाटक) राज्यात समाविष्ट झाला तेव्हापासून आणि विशेषत: १९८६ पासून कर्नाटक सरकारने कन्नड सक्ती केली आहे.


त्यामुळे प्रत्येक गावात मराठीबरोबरच कन्नड शाळाही असल्याचे संशोधकाला आढळले. सीमाभागातील मराठी भाषिकांनी किती प्रमाणात मराठी व कन्नड भाषा आत्मसात केली त्याची माहिती वय या निकषाच्या आधारे पुढीलप्रमाणे –

**सारणी क्रमांक ५.१**

**भाषा आत्मसात**

| वयोगट | १८ ते २५ वर्षे | २६ ते ३५ वर्षे | ३६ ते ५० वर्षे | ५१ ते ६५ वर्षे | ६६ वर्षे ते पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | २२ (३७.९४) | ३६ (५६.२५) | ६१ (७०.९३) | ८९ (९०.८२) | ४४ (१००) | २५२ (७२) |
| मराठी व कन्नड | ३६ (६२.०६) | २८ (४३.७५) | २५ (२९.०७) | ९ (९.१८) | ० (०) | ९८ (२८) |
| एकूण | ५८ (१००) | ६४ (१००) | ८६ (१००) | ९८ (१००) | ४४ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून सीमाभागात राहणाऱ्या मराठी भाषिकांमध्ये सर्वात जास्त मराठी भाषा आत्मसात करणाऱ्यांचे प्रमाण ५१ ते ६५ या वयोगटामध्ये असून त्याचे शेकडा प्रमाण ९०.८२

आहे. त्यानंतर अनुक्रमे ३६ ते ५० वर्षे वयोगटाचे प्रमाण ७०.९३ व ६६ वर्षे ते पुढे वयोगटाचे शेकडा प्रमाण १०० इतके असून सर्वात कमी प्रमाण १८ ते २५ वर्षे वयोगटाचे असून त्याचे शेकडा प्रमाण ३७.९४ आहे तर मराठी व कन्नड या दोन्ही भाषा आत्मसात करणाऱ्या गटामध्ये सर्वात अधिक १८ ते २५ वयोगटात असून त्याचे शेकडा प्रमाण ६२.०६ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे २६ ते ३५ व ३६ ते ५० वर्षे या वयोगटांचे शेकडा प्रमाण ४३.७५ व २९.०७ इतके आहे तर ६६ वर्षे ते पुढे वयोगट यातील एकाही घटकाने कन्नड भाषा आत्मसात केलेली नाही.

यावरून सीमाभागात मराठी भाषा आत्मसात करणाऱ्या घटकांचे एकूण शेकडा प्रमाण ७२ इतके आहे तर मराठी व कन्नड भाषा आत्मसात करणाऱ्यांमध्ये सर्वात जास्त प्रमाण १८ ते २५ वयोगटातील घटकांचे असून ते शेकडा ६२.०६ इतके आहे. याचे कारण १९८६ पासून कन्नड सक्ती असल्याने शाळेमध्ये कन्नड विषय आत्मसात करण्यात येत आहे.

## २. घरामधील बोलीभाषा


सीमाभागातील मराठी भाषिक कुटुंबामध्ये बोलली जाणारी भाषा कोणती याचे तालुका या निकषाच्या आधारे पुढील सारणीमध्ये विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**सारणी क्रमांक ५.२**

**घरामधील बोलीभाषा**

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | १९८ (९४.२८) | ५७ (८१.४२) | २५ (६२.५०) | १३ (६५) | ६ (६०) | २९९ (८५.४३) |
| मराठी व कन्नड | १२ (५.७२) | १३ (१८.५८) | १५ (३७.५०) | ७ (३५) | ४ (४०) | ५१ (१४.५७) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून सीमाभागातील पाच तालुक्यातील कुटुंबातील बोलीभाषा ही मराठी असून त्यामध्ये सर्वात अधिक खानापूर तालुका असून त्याचे शेकडा प्रमाण ९४.२८ आहे. त्यानंतर अनुक्रमे बेळगाव व हुक्केरी तालुक्यात शेकडा प्रमाण ८१.४२ व ६५ इतके आहे तर सर्वात कमी प्रमाण हे अथणी तालुक्यात असून ते शेकडा ६० इतके आहे. तसेच घरातील बोलीभाषा म्हणून मराठी व कन्नड या भाषेचा वापर करण्याचे शेकडा प्रमाण फक्त १४.५७ इतके आहे.

यावरून सीमाभागामध्ये मातृभाषा म्हणून मराठी भाषा बोलणाऱ्यांचे एकूण शेकडा प्रमाण ८५.४३ इतके आहे. याचे कारण म्हणजे हा संपूर्ण भाग मराठी भाषेचा बालेकिल्ला आहे. राज्यपुनर्रचना आयोगाने भाषावार पुनर्रचना करताना खेडे हा घटक, भौगोलिक सलगता, सापेक्ष बहुमत व जनतेची इच्छा ही चार तत्त्वे विचारात न घेता लोकांच्या इच्छेविरूद्ध हा भाग कर्नाटक राज्यात समाविष्ट केला आहे. पण मराठी भाषेविषयी लोकांना अभिमान असल्याने घरामध्ये मराठी भाषाच बोलली जाते.

### ३. गावाचे भाषिक प्रमाण

सीमाभागातील प्रत्येक गावामध्ये आज मराठी व कन्नड भाषिक लोक राहत असून दोन्हींपैकी कोणत्या भाषेचे लोक अधिक प्रमाणात राहतात हे तालुकानिहाय पुढील सारणीमध्ये मांडले आहे.

## सारणी क्रमांक ५.३

## गावाचे भाषिक प्रमाण

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | २०२ (९६.१९) | ६६ (९४.२८) | ३६ (९०) | १७ (८५) | ७ (७०) | ३२९ (९४) |
| कन्नड | ८ (३.८१) | ४ (५.७२) | ४ (१०) | ३ (१५) | ३ (३०) | २१ (६) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून सीमाभागातील मराठी भाषिक लोकसंख्येचे प्रमाण हे खानापूर तालुक्यात अधिक असून त्याचे शेकडा प्रमाण ९६.१९ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे बेळगाव व चिक्कोडी तालुक्यामध्ये शेकडा प्रमाण ९४.२८ व ९० इतके आहे तर सर्वात कमी मराठी भाषिक लोकसंख्येचे प्रमाण अथणी तालुक्यात असून ते शेकडा ७० इतके आहे. कन्नड भाषिकांचे सीमाभागातील गावामध्ये एकूण शेकडा प्रमाण ६ इतकेच आहे.

यावरून सीमाभागातील गावामध्ये मराठी भाषिकांचे प्राबल्य असून तेथे शेकडा सरासरी ९४ इतके मराठी भाषिक लोक राहतात.

## ४. वृत्तपत्रासंदर्भातील माहिती


सीमाभागातील लोक दैनंदिन वृत्तपत्रे घरामध्ये घेतात का हे पाहण्यासाठी शिक्षण या निकषाआधारे संकलित केलेली माहिती पुढील सारणीमध्ये मांडली आहे.

**सारणी क्रमांक ५.४**

**वृत्तपत्रासंदर्भातील माहिती**

| शिक्षण | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक व उच्च माध्यमिक | पदवी व पदव्युत्तर | व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ५<br>(४५.४५) | ५६<br>(६७.४६) | ९७<br>(५८.०८) | ४३<br>(६८.२५) | १९<br>(७३.०७) | २२०<br>(६२.८५) |
| नाही | ६<br>(५४.५५) | २७<br>(३२.५४) | ७०<br>(४१.९२) | २०<br>(३१.७५) | ७<br>(२६.९३) | १३०<br>(३७.१५) |
| एकूण | ११<br>(१००) | ८३<br>(१००) | १६७<br>(१००) | ६३<br>(१००) | २६<br>(१००) | ३५०<br>(१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात



वरील सारणीवरून सीमाभागातील लोक दैनंदिन वर्तमानपत्रे घेण्यामध्ये सर्वात अधिक प्रमाण हे व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या घटकांचे असून ते शेकडा ७३.०७ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे पदवी व पदव्युत्तर घटकांचे शेकडा प्रमाण ६८.२५ तर प्राथमिक शिक्षण घेतलेल्या घटकांचे वृत्तपत्रे घेण्याचे शेकडा प्रमाण ६७.४६ इतके आहे. सर्वात कमी प्रमाण निरक्षर घटकांचे असून ते शेकडा ४५.४५ इतके आहे.

यावरून सीमाभागातील लोकांचे दैनिक वृत्तपत्रे घेणाऱ्यांचे सरासरी शेकडा प्रमाण ६२.८५ इतके आहे. त्याचबरोबर दैनिक वृत्तपत्रे घरामध्ये दररोज न घेणाऱ्यांचे सरासरी शेकडा प्रमाण ३७.१५ इतके आहे.

संशोधकाने वृत्तपत्रांच्या आधारे सीमाप्रश्नासंदर्भातील माहिती जनतेपर्यंत पोहोचते का याविषयीचा अभ्यास केला आहे.

**५. वृत्तपत्राची भाषा**


**सीमाभागातील लोक दैनिक वृत्तपत्रे कोणत्या भाषेतील घेतात याविषयीची माहिती**

संशोधकाने सारणी क्रमांक ४ मध्ये वृत्तपत्रे घेणाऱ्यांबाबत माहिती मांडली आहे. यामध्ये एकूण २२० लोक वृत्तपत्रे घेत असून ते कोणत्या माध्यमाची वृत्तपत्रे घेतात याविषयीची माहिती पुढील सारणीमध्ये मांडली आहे.

**सारणी क्रमांक ५.५**

**वृत्तपत्राची भाषा**

| वृत्तपत्रे | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| मराठी | १८९ | ८६ |
| कन्नड | ९ | ४ |
| मराठी व कन्नड | १८ | ८ |
| इतर | ४ | २ |
| एकूण | २२० | १०० |




सीमाभागामध्ये मराठी वृत्तपत्रे घेणाऱ्यांचे शेकडा प्रमाण ८६ इतके असून फक्त कन्नड वृत्तपत्रे घेणाऱ्यांचे शेकडा प्रमाण ४ इतके आहे तर मराठी व कन्नड या दोन्ही भाषेतील वृत्तपत्रे घेणाऱ्यांचे शेकडा प्रमाण ८ असून इतर वृत्तपत्रांमध्ये प्रामुख्याने इंग्रजी भाषेतील दैनिके घेणारे असून त्याचे शेकडा प्रमाण फक्त २ इतके आहे.

सीमाभागातील वृत्तपत्रे घेणाऱ्यांचे शेकडा प्रमाण ८६ हे या भागामध्ये मराठी भाषिकांचे असणारे वर्चस्व अधोरेखित करणारे असून मराठी व कन्नड वृत्तपत्र घेणाऱ्यांचे शेकडा प्रमाण ८ इतके असले तरी यापाठीमागचे कारण कर्नाटक शासनाच्या शासकीय जाहिराती त्याचबरोबर शिक्षण, नोकरी, व्यवसाय मार्गदर्शन इ. पाहण्यासाठी असल्याचे जाणवते.


## ६. सीमाप्रश्नासंदर्भात माहिती देणारी मराठी वृत्तपत्रे

सीमाभागातील लोक कोणत्या भाषेची दैनिक वृत्तपत्रे घेतात याबाबतची मांडणी सारणी क्रमांक ५ मध्ये केली असून त्या सारणीच्या आधारे एकूण १८९ लोक मराठी भाषिक वृत्तपत्रे घेणारे असून या मराठी वृत्तपत्रापैकी कोणत्या दैनिकाचा प्रभाव सीमाप्रश्नाच्या माहितीसंदर्भात अधिक आहे याविषयीची माहिती सारणी क्रमांक ५.६ मध्ये मांडली आहे.

### सारणी क्रमांक ५.६

### सीमाप्रश्नासंदर्भात माहिती देणारी मराठी वृत्तपत्रे

| मराठी वृत्तपत्रे | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| दैनिक तरूण भारत | १०२ | ५३.९६ |
| दैनिक सकाळ | २५ | १३.२३ |
| दैनिक पुढारी | २४ | १२.६९ |
| दैनिक लोकमत | १८ | ९.५३ |
| इतर | २१० | १०.५९ |




सीमाप्रश्नासंदर्भात माहिती लोकांच्यापर्यंत पोहोचविण्याचे काम अनुक्रमे पुढीलप्रमाणे वृत्तपत्रे करतात. दैनिक तरूण भारत शेकडा ५३.९६, दैनिक सकाळ शेकडा १३.२३, दैनिक पुढारी शेकडा १२.६९, दैनिक लोकमत शेकडा ९.५३ व इतर दैनिके आणि नियतकालिके यांचा वाटा शेकडा १०.५९ इतका आहे.

सीमाभागामध्ये दैनिक तरूण भारत हे सीमाभागाचे मुखपत्र म्हणून प्रसिद्ध असून मेळावे, आंदोलने, साहित्य संमेलने, कर्नाटक सरकारचे अन्यायी धोरण इ. प्रसंगी है दैनिक सीमाप्रश्नासंदर्भात विशेष पुरवणी काढते. त्यामुळे सीमाप्रश्नाची माहिती लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत होते. अलिकडच्या काळात दैनिक सकाळ, दैनिक पुढारी व दैनिक लोकमत या दैनिकांनीही सीमाभागातील मराठी वाचकांपर्यंत माहिती पोहोचविण्याचे काम करत आहेत तर इतर मध्ये सीमाभागातील विशेषत: बेळगावमधून प्रसिद्ध होणारी दैनिके व नियतकालिके यांचा समावेश असून यामध्ये प्रामुख्याने दैनिक रणझुंझार, दैनिक वार्ता इ. आहेत.

### ७. नातेसंबंध


धार्मिक सण, समारंभ, विवाह यावेळी मराठी भाषिक व्यवसाय, नोकरी, आर्थिक स्थिती, शिक्षण यापेक्षा केवळ मराठी भाषा या घटकाचा विचार करून नातेसंबंधाला प्राधान्य देतात की नाही? हे तालुकानिहाय पुढील सारणीमध्ये मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.७**

**नातेसंबंध**

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | १९६ (९३.३३) | ५२ (७५.७१) | २३ (५७.५०) | १३ (६५) | ६ (६०) | २९१ (८३.१४) |
| नाही | १४ (६.६७) | १७ (२४.२९) | १७ (४२.५०) | ७ (३५) | ४ (४०) | ५९ (१६.८६) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून सीमाभागातील मराठी भाषिक धार्मिक सण, समारंभ, नातेसंबंध हे मराठी भाषिकांशी प्रस्थापित करण्यामध्ये सर्वाधिक संख्या खानापूर तालुकयात असून त्याचे शेकडा प्रमाण ९३.३३ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे बेळगाव तालुका शेकडा ७५.७१ तर हुक्केरी तालुक्यामध्ये हे प्रमाण शेकडा ६५ इतके आहे. सर्वात कमी प्रमाण चिक्कोडी तालुक्यामध्ये असून ते शेकडा ५७.५० इतके आहे.

यावरून सर्वच तालुक्यातील लोकांचे मराठी भाषिकांशी नातेसंबंध जोडण्याचे सरासरी शेकडा प्रमाण ८३.१४ असलेले दिसून येते. तर सरासरी शेकडा १६.८६ लोक नातेसंबंध जोडताना भाषेपेक्षा आर्थिक स्थिती, शिक्षण, व्यवसाय, नोकरी या बाबींना महत्त्व देतात.

नातेसंबंध जोडताना विशेषत: विवाह करताना सीमाभागातील मराठी भाषिक लोक चंदगड, गडहिंग्लज, आजरा, कागल या कोल्हापूर जिल्ह्यातील सीमालगत तालुक्यामध्ये आपले नातेसंबंध जोडतात.

## ८. निमंत्रण पत्रिका


सीमाभागातील मराठी भाषिक विवाह समारंभासाठी निमंत्रण पत्रिका कोणत्या भाषेतून छापून घेतात हे मासिक उत्पन्न या निकषाच्याआधारे पुढील सारणीमध्ये मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.८**

**निमंत्रण पत्रिका**

| मासिक उत्पन्न | रु. ३००० पर्यंत | रु. ३००१ ते ६००० पर्यंत | रु. ६००१ ते १२००० पर्यंत | रु. १२००१ ते १८००० पर्यंत | रु. १८००१ ते पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | ३८ (९५) | ९८ (९६) | ६६ (९१.६६) | ६८ (८७.१७) | ४७ (८१.०३) | ३५१ (९०.५१) |
| मराठी व कन्नड | २ (५) | ४ (४) | ६ (८.३४) | १० (१२.८३) | ११ (१८.९७) | ३३ (९.४३) |
| एकूण | ४० (१००) | १०२ (१००) | ७२ (१००) | ७८ (१००) | ५८ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून सीमाभागातील लोक निमंत्रण पत्रिका मराठी भाषेमध्ये छापणाऱ्यांचे मासिक उत्पन्न हे रु. ३००१ ते रु. ६००० या गटातील असून त्याचे शेकडा प्रमाण ९६ इतके

आहे. त्यानंतर अनुक्रमे मासिक उत्पन्न रु. ३००० पर्यंत असलेल्यांचे शेकडा प्रमाण ९५ इतके आहे व रु. ६००१ ते रु. १२००० मासिक उत्पन्न गटातील घटकांचे शेकडा प्रमाण ९१.६६ इतके आहे. मराठी भाषेमध्ये निमंत्रण पत्रिका छापणाऱ्यांचे सर्वात कमी प्रमाण मासिक उत्पन्न रु. १८००० चे पुढे असणाऱ्यांचे असून ते शेकडा ८१.०३ इतके आहे. याचे कारण या गटाचे मासिक उत्पन्न जास्त असल्याने मराठी व कन्नड अशा दोन्ही भाषेमध्ये निमंत्रण पत्रिका काढत असतात.

सीमाभागात फक्त मराठी भाषेतून लग्नपत्रिका छापून घेण्याचे शेकडा प्रमाण ९०.५७ इतके आहे तर मराठी व कन्नड अशा दोन्ही भाषेतून लग्नपत्रिका छापण्याचे प्रमाण शेकडा ९.४३ इतके आहे. कारण नातेसंबंध जोडताना भाषेचा विचार केला जातो. त्याचा परिणाम लग्नपत्रिका छपाईवर जाणवतो.

तसेच मराठी भाषिक लोकांच्या निमंत्रण पत्रिकेवरती गणपती व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा वापर केला जातो.

## ९. लग्नकार्यातील विधी


महाराष्ट्र–कर्नाटक सीमाभागातील मराठी भाषिक लग्नकार्यातील विधी कोणत्या भाषेतून करतात हे शिक्षण या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.९**

**लग्नकार्यातील विधी**

| शिक्षण | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक व उच्च माध्यमिक | पदवी व पदव्युत्तर | व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | ९ (८१.८२) | ७२ (८६.७४) | १५० (८९.८२) | ५० (७९.३६) | १७ (६५.३८) | २९८ (८५.१५) |
| मराठी व कन्नड | २ (१८.१८) | ११ (१३.२६) | १७ (१०.१८) | १३ (२०.६४) | ९ (३४.६२) | ५२ (१४.८५) |
| एकूण | ११ (१००) | ८३ (१००) | १६७ (१००) | ६३ (१००) | २६ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून सीमाभागातील मराठी भाषिक लग्नकार्यातील धार्मिक विधी मराठी भाषेमध्येच करणाऱ्यांचे अधिकाधिक प्रमाण हे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या घटकांमध्ये असून ते शेकडा ८९.८२ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे प्राथमिक शिक्षण घेतलेल्या घटकांचे शेकडा प्रमाण ८६.७४ आहे व निरक्षर घटकांचे शेकडा प्रमाण ८१.८२ इतके आहे. सर्वात कमी प्रमाणात मराठी भाषेमध्ये लग्नकार्यातील धार्मिक विधी करणाऱ्यांची संख्या ही व्यावसायिक गटाची असून त्याचे शेकडा प्रमाण ६५.३८ इतके आहे. याचे कारण हा गट व्यावसायिक कारणांमुळे नातेसंबंध जोडताना भाषेचा विचार करत नाही.

एकूण आकडेवारीचा विचार करता लग्नकार्यातील विधी मराठी भाषेमध्ये करणाऱ्यांचे सरासरी शेकडा प्रमाण ८५.१५ असून मराठी व कन्नड या दोन्ही भाषेतून लग्नकार्यातील विधी होण्याचे शेकडा प्रमाण १४.८५ इतके आहे.

## १०. सार्वजनिक कार्यक्रमामध्ये भाषेचा प्रभाव


सीमाभागातील गावामध्ये सार्वजनिक कार्यक्रम वा धार्मिक कार्यक्रमामध्ये कोणत्या भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो हे तालुका या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

## सारणी क्रमांक ५.१०

## सार्वजनिक कार्यक्रमामध्ये भाषेचा प्रभाव

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | १९८ (९४.२८) | ६५ (९२.८६) | ३४ (८५) | १७ (८५) | ८ (८०) | ३२२ (९२) |
| कन्नड | १२ (५.७२) | ५ (७.१४) | ६ (१५) | ३ (१५) | २ (२०) | २८ (८) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून सीमाभागातील गावामध्ये सार्वजनिक कार्यक्रम वा धार्मिक कार्यक्रमामध्ये अधिकाधिक प्रभाव हा मराठी भाषेचा असून त्याचे प्रमाण खानापूर तालुक्यात अधिक असून ते शेकडा ९४.२८ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे बेळगाव तालुकयाचे शेकडा प्रमाण ९२.८६ तर चिक्कोडी व हुक्केरी तालुक्यामध्ये मराठी भाषेचाच प्रभाव असून त्याचे शेकडा प्रमाण ८५ इतके आहे. तर वरील तुलनेत सर्वात कमी प्रमाण हे अथणी तालुक्यातील असून ते शेकडा ८० इतके आहे. याचे कारण कन्नड भाषेचा प्रभाव या तालुक्यातील मराठी भाषिक गावाभोवती आहे.

यावरून असे दिसून येते की, सीमाभागातील गावामध्ये सार्वजनिक कार्यक्रमामध्ये मराठी भाषेचेच वर्चस्व असून एकूण शेकडा प्रमाण ९२ इतके आहे.

### ११. सार्वजनिक कार्यक्रमामध्ये भाषिक भेदभाव


सीमाभागातील गावामध्ये आयोजित सार्वजनिक कार्यक्रम वा सण, उत्सव यामध्ये मराठी व कन्नड भाषिक लोकांमध्ये भाषिक भेदभाव दिसून येतो का हे तालुका या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.११**

**सार्वजनिक कार्यक्रमामध्ये भाषिक भेदभाव**

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ३ (१.४३) | ४ (५.७२) | ६ (१.१५) | १ (५) | १ (५) | १५ (४.२८) |
| नाही | २०७ (९८.५७) | ६६ (९४.२८) | ३४ (८५) | १९ (९५) | ९ (९५) | ३३५ (९५.७२) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात



वरील सारणीवरून सीमाभागातील गावामध्ये आयोजित सार्वजनिक कार्यक्रम वा धार्मिक सण, उत्सव यावेळी भाषिक भेदभाव दिसून न येण्याचे सर्वात जास्त प्रमाण खानापूर तालुकयात असून त्याचे शेकडा प्रमाण ९८.५७ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे बेळगाव तालुक्यात असून ते शेकडा ९४.२८ इतके आहे व हुक्केरी आणि अथणी तालुक्याचे शेकडा प्रमाण ९५ तर सर्वात कमी प्रमाण हे चिक्कोडी तालुक्यात असून ते शेकडा ८५ इतके आहे.

सीमाभागामध्ये मराठी भाषिकांचे वर्चस्व असल्यामुळे गावातील सार्वजनिक कार्यक्रम वा धार्मिक सण, उत्सव यामध्ये मराठी भाषिकांचे वर्चस्व दिसून येते. कन्नड भाषिक लोक सीमाभागात अल्पसंख्याक असल्याने ते मराठी भाषिकांना सार्वजनिक कार्यात विरोध करत नाहीत. त्यामुळे सीमाभागात गावपातळीवर भाषिक संघर्ष नाही.


**१२. भाषेच्या आधारावर तंटे**

**सारणी क्रमांक ५.१२**

**भाषेच्या आधारावर तंटे**

| लिंग | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| पुरुष | ९<br>(४.२९) | २०१<br>(९५.७१) | २१०<br>(१००) |
| स्त्रिया | २१<br>(१५) | ११९<br>(८५) | २१०<br>(१००) |
| एकूण | ३०<br>(८.५८) | ३२०<br>(९१.४२) | ३५०<br>(१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




सीमाभागामध्ये मराठी भाषिक लोक महाराष्ट्रामध्ये जाण्यासाठी गेली ५८ वर्षे वेगवेगळ्या मार्गाने कर्नाटक सरकारशी संघर्ष करत आहेत. पण या लढ्याचा परिणाम गावागावामध्ये रहाणाऱ्या मराठी व कन्नड भाषिकांमध्ये तंटे–संघर्ष निर्माण होण्यामध्ये होत नाही. संशोधकाचा भाषेच्या आधारावर संघर्ष–तंटे होतात का याविषयीचा निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे. सीमाभागामध्ये भाषेच्या आधारावर गावामध्ये संघर्ष होण्याचे प्रमाण अत्यल्प म्हणजे ८.५८ टक्के इतके आहे. याचा अर्थ मराठी भाषिकांचा संघर्ष हा स्थानिक कन्नड भाषिक जनतेशी नसून कर्नाटक सरकारशी आहे.

## १३. तरूण मंडळे व भाषिक मुद्दा


सीमाभागातील मराठी बहुभाषिक तालुक्यातील खेड्यामध्ये तरूण मंडळे/महिला मंडळे आहेत का? व ती स्थापन करताना भाषिक मुद्दा विचारात घेतला जातो का? हे तालुका या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

### सारणी क्रमांक ५.१३

### तरूण मंडळे व भाषिक मुद्दा

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ७ (३.३४) | ५ (७.१४) | ३ (७.५०) | २ (१०) | १ (१०) | १८ (५.१६) |
| नाही | २०३ (९६.६६) | ६५ (९२.८६) | ३७ (९२.५०) | १८ (९०) | ९ (९०) | ३३२ (९४.८५) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून दिसून येते की, सीमाभागातील गावामध्ये तरूण मंडळे, महिला मंडळे असून ती स्थापन करताना भाषिक मुद्दा विचारात घेतला जात नाही. भाषिक मुद्दा विचारात न घेता ही मंडळे स्थापन करण्याचे सर्वाधिक प्रमाण खानापूर तालुक्यात असून ते शेकडा ९६.६६ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे बेळगाव, चिक्कोडी या तालुक्याचे शेकडा प्रमाण ९२.८६ व ९२.५० इतके आहे तर हुक्केरी व अथणी तालुक्यातील शेकडा प्रमाण ९० इतके आहे.

सीमाभागामध्ये तरूण मंडळे/महिला मंडळे इत्यादी स्थापन करताना भाषिक मुद्दा विचारात न घेण्याचे सरासरी शेकडा प्रमाण ९४.८५ इतके आहे. संशोधकाने भाषिक मुद्दयावर तरूण मंडळे/महिला मंडळे स्थापन न होण्यामागील कारणांचा शोध घेतला असता त्याचे कारण म्हणजे या भागामध्ये भाषिक संघर्ष नाही असे दिसून आले.

### १४. महाराष्ट्रीयन संस्कृतीविषयी जवळीकता


सीमाभागातील लोकांना महाराष्ट्रीयन संस्कृतीविषयी जवळीकता वाटते का हे शिक्षण या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.१४**

**महाराष्ट्रीयन संस्कृतीविषयी जवळीकता**

| शिक्षण | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक व उच्च माध्यमिक | पदवी व पदव्युत्तर | व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ९ (८१.८२) | ७९ (९५.९८) | १४३ (८५.६२) | ४९ (७७.७७) | १७ (६५.३८) | २८७ (८४.८६) |
| नाही | २ (१८.१८) | ४ (४.०२) | २४ (१४.३८) | १४ (३३.३३) | ९ (३४.६२) | ५३ (१५.१४) |
| एकूण | ११ (१००) | ८३ (१००) | १६७ (१००) | ६३ (१००) | २६ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील लोकांना महाराष्ट्रीयन संस्कृतीविषयी जवळीकता वाटणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक हे प्राथमिक शिक्षण घेतलेल्या घटकांचे असून ते शेकडा ९५.९८ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले व निरक्षर असलेल्या घटकांचे असून अनुक्रमे ते शेकडा ८५.६२ व ८१.८२ इतके आहे. तर सर्वात कमी प्रमाण हे व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या घटकांचे असून ते शेकडा ६५.३८ इतके आहे.

महाराष्ट्रीय संस्कृतीविषयी जवळीकता वाटणाऱ्यांचे एकूण शेकडा प्रमाण ८४.८६ इतके आहे. याचे कारण या भागातील लोकांना शिवाजी महाराजांच्याविषयी अत्यंत आदर व प्रेम आहे. तसेच धार्मिक चालीरीती, प्रथा, परंपरा इत्यादी बाबींवर महाराष्ट्रीयन प्रथा, परंपरांचा प्रभाव जाणवतो. तर सीमाभाग कर्नाटकात जाऊन ५८ वर्षे होऊनही फक्त शेकडा १५.१४ इतके प्रमाण महाराष्ट्रीयन संस्कृतीविषयी जवळीकता नसणाऱ्या घटकांचे आहे.

## १५. मराठी साहित्य संमेलनातील सहभाग


सीमाभागात होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनामध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण वय या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.१५**

**मराठी साहित्य संमेलनातील सहभाग**

| वयोगट | १८ ते २५ वर्षे | २६ ते ३५ वर्षे | ३६ ते ५० वर्षे | ५१ ते ६५ वर्षे | ६६ वर्षे ते पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ३२ (५५.१७) | ४२ (६५.६३) | ५८ (६७.४४) | ३९ (३९.७९) | १२ (२७.२८) | १८३ (५२.२८) |
| नाही | २६ (४४.८३) | २२ (३४.३७) | २८ (३२.५६) | ५९ (६०.२१) | ३२ (७२.७२) | १६७ (४७.७२) |
| एकूण | ५८ (१००) | ६४ (१००) | ८६ (१००) | ९८ (१००) | ४४ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागात होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनामध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण सर्वात जास्त ३६ ते ५० या वयोगटातील व्यक्तींचे असून त्याचे शेकडा प्रमाण ६७.४४ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे २६ ते ३५ वयोगट व १८ ते २५ वयोगटातील व्यक्तींचा सहभाग असून त्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ६५.६३ व ५५.१७ इतके आहे.

तर सर्वात कमी प्रमाण हे ६६ वर्षे ते पुढील वयोगटातील व्यक्तींचे असून ते शेकडा २७.२८ इतके आहे. याचे कारण या वयोगटातील लोकांना वयामुळे इच्छा असूनही मराठी साहित्य संमेलनामध्ये सहभागी होता येत नसल्याची खंत अनेकांनी संशोधकाजवळ व्यक्त केली.

सीमाभागात होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनामध्ये सहभागी होणाऱ्या घटकांचे एकूण शेकडा प्रमाण ५२.२८ इतके आहे. १९२९, १९४८ व २००० साली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने झाली असून त्या परंपरेवरती सीमाभागातील ग्रामीण भागामध्ये विशेषत: कडोली, उचगाव, येळ्ळूर, कुद्रेमनी इत्यादी गावांमध्ये मराठी साहित्य संमेलने दरवर्षी होत असून त्यांनी साहित्य व भाषिक वारसा जपला आहे.

## १६. सीमाप्रश्नासंदर्भात माहिती


सीमाभागातील मराठी भाषिक लोकांपैकी किती लोकांना सीमाप्रश्नासंदर्भात माहिती आहे हे तालुका या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.१६**

**सीमाप्रश्नासंदर्भात माहिती**

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | २०५ (९७.९१) | ६७ (९५.७२) | ३७ (९२.५०) | १८ (९०) | ८ (८०) | ३३५ (९५.७१) |
| नाही | ५ (२.३९) | ३ (४.२८) | ३ (७.५०) | २ (१०) | २ (२०) | १५ (४.२९) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात



आलेख क्रमांक ५.१६
सीमाप्रश्नासंदर्भात माहिती

वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील मराठी भाषिक लोकांपैकी सीमाप्रश्नासंदर्भात अधिक माहिती खानापूर तालुक्यातील लोकांना असून त्याचे शेकडा प्रमाण ९७.९१ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे बेळगाव व चिक्कोडी तालुक्यातील लोकांना असून त्याचे शेकडा प्रमाण ९५.७२ व ९२.५० इतके आहे तर सर्वात कमी माहिती अथणी तालुक्यातील लोकांना असून त्याचे शेकडा प्रमाण ८० इतके आहे. याचे कारण अथणी तालुक्यामध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीचा प्रभाव नाही.

सीमाप्रश्नासंदर्भात माहिती असणाऱ्या घटकांचे सर्वाधिक शेकडा प्रमाण ९५.७१ इतके आहे. त्यामुळे वेळोवेळी होणाऱ्या आंदोलने, मोर्चे, निदर्शने, रास्ता रोको, सत्याग्रह इ. मध्ये अनेकांनी सक्रिय सहभाग घेतला आहे तर फक्त शेकडा ४.२९ लोकांना सीमाप्रश्नासंदर्भात माहिती नाही.

### १७. गावच्या विकासासाठी भाषिक लोक एकत्र


गावच्या विकासासाठी सीमाभागातील सर्व भाषिक लोक एकत्र येतात की नाही हे मासिक उत्पन्न या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

### सारणी क्रमांक ५.१७

### गावच्या विकासासाठी भाषिक लोक एकत्र

| मासिक उत्पन्न | रु. ३००० पर्यंत | रु. ३००१ ते ६००० पर्यंत | रु. ६००१ ते १२००० पर्यंत | रु. १२००१ ते १८००० पर्यंत | रु. १८००१ ते पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ३८ (९५) | ९८ (९६.०८) | ७० (९७.२२) | ७१ (९१.०२) | ५२ (८९.६६) | ३२९ (९४) |
| नाही | २ (५) | ४ (३.९२) | २ (२.७८) | ७ (८.९८) | ६ (१०.३४) | २१ (६) |
| एकूण | ४० (१००) | १०२ (१००) | ७२ (१००) | ७८ (१००) | ५८ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, गावाच्या विकासासाठी सीमाभागातील सर्व भाषिक लोक एकत्र येण्याचे सर्वाधिक प्रमाण मासिक उत्पन्न रु. ६००१ ते १२००० या गटातील व्यक्तींचे असून त्याचे शेकडा प्रमाण ९७.२२ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे मासिक उत्पन्न रु. ३००१ ते ६००० व रु. ३००० पर्यंत उत्पन्न असणाऱ्या लोकांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ९६.०८ व ९५

इतके आहे. तर मासिक उत्पन्न रु. १२००१ ते १८००० व रु. १८००१ ते पुढे या उत्पन्न गटातील व्यक्तींचे शेकडा प्रमाण ९१.०२ व ८९.६६ इतके आहे तर फक्त शेकडा ६ लोक गावाच्या विकासासाठी एकत्र येत नाहीत.

यावरून सीमाभागातील सर्व भाषिक गावाच्या विकासासाठी भाषिक भेदभाव विसरून एकत्र येतात. त्याचे शेकडा प्रमाण ९४ इतके आहे. याचे कारण आजही मराठी व कन्नड भाषिक यांच्यात भाषिक संघर्ष नसून मराठी भाषिक आपल्या हक्कांसाठी कर्नाटक सरकारशी लढा देताना दिसून येतात. तसेच कन्नड भाषिक लोक मराठी भाषिकांना गावाच्या विकासाला विरोध करत नाहीत.

## १८. गावातील संस्थांमधील कागदपत्रांची भाषा


सीमाभागातील गावांमध्ये असणाऱ्या स्थानिक संस्था, ग्रामपंचायत यामधील कागदपत्रे कोणत्या भाषेतून आहेत हे शिक्षण या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.१८**

**गावातील संस्थांमधील कागदपत्रांची भाषा**

| शिक्षण | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक व उच्च माध्यमिक | पदवी व पदव्युत्तर | व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| कन्नड | १० (९०.९०) | ७९ (९५.९८) | १५८ (९४.६२) | ५९ (९३.६५) | २६ (१००) | ३३२ (९४.८५) |
| मराठी व कन्नड | १ (९.१०) | ४ (४.८२) | ९ (५.३८) | ४ (६.३५) | ० (०) | १८ (५.१५) |
| एकूण | ११ (१००) | ८३ (१००) | १६७ (१००) | ६३ (१००) | २६ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील गावामध्ये असणाऱ्या स्थानिक संस्था, ग्रामपंचायत यामधील कागदपत्रांची भाषा ही कन्नड असून त्याचे शेकडा प्रमाण ९४.८५ इतके आहे. तर मराठी व कन्नड अशा दोन्ही भाषेमध्ये कागदपत्रे असणाऱ्या घटकांचे शेकडा प्रमाण फक्त ५.१५ इतके आहे. १९८६ च्या कन्नड सक्ती धोरणानुसार जन्म नोंद, मृत्यू नोंद, घरफाळा उतारे इ. कन्नड भाषेतच आहेत. मराठी भाषेतून कोणतीच कागदपत्रे उपलब्ध नाहीत. यावरून कर्नाटक सरकारचे भाषाविषयक धोरण अधोरेखित होते. या धोरणामुळेच मराठी भाषिक लोकांच्यावरती अन्याय होत आहे.

## १९. शेतीशी संबंधित कागदपत्रांची भाषा


सीमाभागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून शेतीशी संबंधित कागदपत्रांची भाषा कोणती आहे हे व्यवसाय या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

### सारणी क्रमांक ५.१९

### शेतीशी संबंधित कागदपत्रांची भाषा

| व्यवसाय | शेती | सरकारी नोकरी | स्वत:चा धंदा | खाजगी नोकरी | बेरोजगार | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी व कन्नड | ० (०) | ० (०) | ० (०) | ० (०) | ० (०) | ० (०) |
| कन्नड | ९६ (१००) | ६१ (१००) | ३३ (१००) | ७३ (१००) | ८७ (१००) | ३५० (१००) |
| एकूण | ९६ (१००) | ६१ (१००) | ३३ (१००) | ७३ (१००) | ८७ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील सर्वच कागदपत्रे कन्नड भाषेतूनच उपलब्ध असून याचे शेकडा प्रमाण १०० इतके आहे तर मराठी व कन्नड भाषेतून कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत.

सीमाभागातील लोकांची शेती संबंधित मूळ कागदपत्रे ही मराठी भाषेत असतानाही कर्नाटक सरकारने कन्नड सक्तीच्या धोरणामुळे सर्व मूळ कागदपत्रांचे कानडी भाषेत रूपांतर केले आहे. त्यामुळे सध्या कोणतीही कागदपत्रे मराठी भाषेत उपलब्ध नाहीत. तसेच मूळ मराठी कागदपत्रांचे कन्नडमध्ये रूपांतर करताना अनेक चुका झाल्या आहेत. मराठी भाषिकांना कन्नड भाषा येत नसल्याने त्या चुका समजत नाहीत. पर्यायाने त्यातून अनेक वाद, संघर्ष व न्यायालयीन बाबी तयार झाल्या आहेत. जमिनींचे व्यवहार करताना बऱ्याचवेळी फसवणुकीचे प्रकारही घडत आहेत.

## २०. सीमाप्रश्नासंदर्भातील लढ्यातील सहभाग


सीमाप्रश्न सुटावा यासाठी मराठी भाषिक वेळोवेळी मोर्चे, निदर्शने, हरताळ, मेळावे आयोजित करतात. त्यामध्ये आपला सहभाग आहे की नाही हे वय या निकषाच्या आधारे पुढील सारणीमध्ये मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.२०**

**सीमाप्रश्नासंदर्भातील लढ्यातील सहभाग**

| वयोगट | १८ ते २५ वर्षे | २६ ते ३५ वर्षे | ३६ ते ५० वर्षे | ५१ ते ६५ वर्षे | ६६ वर्षे ते पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ३२ (५५.१७) | ४१ (६४.०६) | ७५ (८७.२०) | ८७ (८८.७७) | ३९ (८८.६३) | २७४ (७८.२८) |
| नाही | २६ (४४.८३) | २३ (३५.९४) | ११ (१२.८०) | ११ (११.२३) | ५ (११.३७) | ७६ (२१.७२) |
| एकूण | ५८ (१००) | ६४ (१००) | ८६ (१००) | ९८ (१००) | ४४ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाप्रश्नासंदर्भात वेळोवेळी मोर्चे, निदर्शने, आंदोलने, हरताळ, मेळावे यामध्ये मराठी भाषिकांचा सहभाग सर्वात अधिक ५१ ते ६५ या वयोगटातील व्यक्तींचा असून त्याचे शेकडा प्रमाण ८८.७७ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे वयोगट ६६ ते पुढे व ३६ ते ५० या वयोगटाचे शेकडा प्रमाण ८८.६३ व ८७.२० इतके आहे तर सर्वात कमी सहभाग असणाऱ्या घटकांमध्ये १८ ते २५ हा वयोगट असून त्याचे शेकडा प्रमाण ५५.१७ इतके आहे. याचे कारण १९८६ च्या कन्नड सक्ती धोरणामुळे प्रत्येक गावात मराठी शाळेत कन्नड विषय सक्तीचा केला आहे. त्याचबरोबर स्वतंत्र कन्नड शाळांची उभारणीसुद्धा कर्नाटक सरकारने केली आहे. त्यामुळे १८ ते २५ या वयोगटाला सीमाप्रश्नासंदर्भाची तीव्रता अधिक जाणवत नसल्याचे दिसून येते.

## २१. वारकरी संप्रदाय


सीमाभागातील गावामध्ये वारकरी संप्रदाय आहे की नाही हे दर्शविण्यासाठी लिंग या निकषाआधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

### सारणी क्रमांक ५.२१

### वारकरी संप्रदाय

| लिंग | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| पुरुष | २१०<br>(६०) | ०<br>(०) | २०१<br>(६०) |
| स्त्रिया | १४०<br>(४०) | ०<br>(०) | १४०<br>(४०) |
| एकूण | ३५०<br>(१००) | ०<br>(०) | ३५०<br>(१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील सर्वच गावामध्ये वारकरी संप्रदाय असून त्याचे एकूण सरासरी शेकडा प्रमाण १०० इतके आहे. या भागातील मराठी भाषिक स्त्री–पुरुष दरवर्षी आषाढी एकादशीला पंढरपूरला जातात. तसेच भजन, कीर्तन, पारायण वारकरी संप्रदाय मराठी भाषेतून पार पाडले जातात. सीमाभागातील मराठी भाषिकांची विठूरायावर जास्त भक्ती असल्याने बहुतांश गावामध्ये विठ्ठल–रूक्मिणीची छोटी–मोठी मंदिरे असल्याचे संशोधकाला दिसून आले.

## २२.	शाळेचे माध्यम


सीमाभागातील बहुतांश गावामध्ये फक्त मराठी माध्यमाच्या शाळा होत्या. परंतु १९८६ च्या कन्नड सक्ती धोरणामुळे आज प्रत्येक गावात मराठीबरोबरच कन्नड शाळाही कर्नाटक सरकारने सुरू केल्या आहेत. त्याचे प्रमाण अभ्यासण्यासाठी तालुका या निकषाआधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक ५.२२**

**शाळेचे माध्यम**

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| फक्त मराठी | ९५ (४५.२३) | २५ (३५.७२) | १३ (३२.५०) | ७ (३५) | २ (२०) | १४२ (४०.५८) |
| फक्त कन्नड | ० (०) | ० (०) | ० (०) | ० (०) | ० (०) | ० (०) |
| मराठी व कन्नड | ११५ (५४.७७) | ४५ (६४.२८) | २७ (६७.५०) | १३ (६५) | ८ (८०) | २०८ (५९.४२) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात



वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील मराठी भाषिक गावामध्ये मराठी शाळा सर्वच गावामध्ये असून फक्त मराठी माध्यमाच्या शाळा असल्याचे शेकडा सरासरी प्रमाण ४०.५८ इतके आहे. यामध्ये सर्वात अधिक शेकडा प्रमाण अनुक्रमे खानापूर तालुका ४५.२३, बेळगाव तालुका ३५.७२, हुक्केरी तालुका ३५ तर अथणी तालुक्यामध्ये शेकडा प्रमाण २० आहे. मराठी भाषिक गावामध्ये फक्त कन्नड शाळा असणारे एकही गाव नाही. पण कर्नाटक सरकारच्या कन्नड सक्ती धोरणामुळे मराठी भाषिक गावामध्ये कन्नड माध्यमाच्या शाळा काढल्या जात आहेत. सरासरी शेकडा ५९.४२ गावामध्ये मराठी व कन्नड माध्यमाच्या शाळा आहेत. दोन–चार कन्नड माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठीही कर्नाटक सरकारने कन्नड शाळा सुरू केल्या असून त्याचे सरासरी शेकडा प्रमाण ५९.४२ आहे. यामध्ये सर्वाधिक प्रमाण अथणी तालुक्यात असून त्याचे शेकडा प्रमाण ८० इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे चिक्कोडी ६७.५०, हुक्केरी ६५, बेळगाव ६४.२८ व खानापूर ५४.७७ इतके आहे.

## २३. मुलांच्या शाळेचे माध्यम


मराठी भाषिक पालक आपल्या मुलांना कोणत्या माध्यमाच्या शाळेत शिक्षण देतात हे शिक्षण या निकषाआधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक ५.२३**

**मुलांच्या शाळेचे माध्यम**

| शिक्षण | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक व उच्च माध्यमिक | पदवी व पदव्युत्तर | व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | ११ (१००) | ७६ (९१.५६) | १४२ (८५.०२) | ४९ (७७.७७) | १० (३८.४६) | २८८ (८२.२८) |
| कन्नड | ० (०) | ० (०) | १४ (८.३८) | ५ (७.९३) | ३ (११.५४) | २२ (६.२८) |
| इंग्रजी | ० (०) | ७ (८.४४) | ११ (६.६०) | ९ (१४.३०) | १३ (५०) | ४० (११.४४) |
| एकूण | ११ (१००) | ८३ (१००) | १६७ (१००) | ६३ (१००) | २६ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील मराठी भाषिक पालक आपल्या मुलांना मराठी या मातृभाषेतूनच शिक्षण देत असून त्याचे सर्वाधिक प्रमाण निरक्षर घटकांचे असून त्याचे शेकडा प्रमाण १०० इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे प्राथमिक आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक घटकांची असून त्याचे शेकडा प्रमाण ९१.५६ आणि ८५.०२ इतके आहे तर सर्वात कमी प्रमाण व्यावसायिक गटातील घटकांचे असून त्याचे शेकडा प्रमाण ३८.४६ इतके आहे. याचे कारण व्यावसायिक गटातील घटकांचे मासिक उत्पन्न अधिक असल्याने असे पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देत आहेत तर कन्नड माध्यमाचे शिक्षण देणाऱ्या घटकांचे एकूण शेकडा प्रमाण फक्त ६.२८ इतके आहे.

यावरून असे दिसून येते की, सीमाभागातील पालक आजही आपल्या मुलांना मराठी माध्यमाचेच शिक्षण देत असून त्याचे एकूण शेकडा प्रमाण ८२.२८ इतके आहे.

## २४. शैक्षणिक सोयी सवलती


सीमाभागातील मराठी माध्यमाचे शिक्षण घेणाऱ्या मुलांना शासनाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक सोयी, सवलतीबाबत मराठी मुलांच्याकडे दुर्लक्ष होते का? हे व्यवसाय या निकषाआधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक ५.२४**

**शैक्षणिक सोयी सवलती**

| व्यवसाय | शेती | सरकारी नोकरी | स्वत:चा धंदा | खाजगी नोकरी | बेरोजगार | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ७२ (७५) | ४३ (७०.४९) | २३ (६९.७०) | ६१ (८३.५६) | ५२ (५९.७७) | २३१ (६६) |
| नाही | २४ (२५) | १८ (२९.५१) | १० (३०.३०) | १२ (१६.४४) | ३५ (४०.२३) | ११९ (३४) |
| एकूण | ९६ (१००) | ६१ (१००) | ३३ (१००) | ७३ (१००) | ८७ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात



वरील सारणीवरून असे दिसून येते की, शासनाकडून मराठी माध्यमाचे शिक्षण घेणाऱ्या मुलांना मिळणाऱ्या शैक्षणिक सोयी, सवलतीबाबत अधिक दुर्लक्ष होते असे सर्वाधिक प्रमाण खाजगी नोकरी करणाऱ्या घटकांचे असून त्याचे शेकडा प्रमाण ८३.५६ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे शेती व सरकारी नोकरी करणाऱ्या घटकांचे शेकडा प्रमाण ७५ व ७०.४९ इतके आहे तर सर्वात कमी प्रमाण बेरोजगार घटकांचे असून त्याचे शेकडा प्रमाण ५९.७७ इतके आहे तर शेकडा ३४ लोकांना कर्नाटक शासनाचे शैक्षणिक सोयी–सुविधाबाबतचे धोरण योग्य वाटते.

यावरून असे दिसून येते की, शेकडा ६६ लोकांना कर्नाटक शासनाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक सोयी–सवलतीबाबत मराठी भाषिक मुलांच्याकडे दुर्लक्ष होते. यावरून कर्नाटक शासनाचा मराठी माध्यमाच्या शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा संकुचित आहे हे दिसून येते.

## २५. मुलींचे उच्च शिक्षण


सीमाभागातील मराठी भाषिक कुटुंबातील मुली उच्च शिक्षण घेतात की नाही हे मासिक उत्पन्न या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.२५**

**मुलींचे उच्च शिक्षण**

| मासिक उत्पन्न | रु. ३००० पर्यंत | रु. ३००१ ते ६००० पर्यंत | रु. ६००१ ते १२००० पर्यंत | रु. १२००१ ते १८००० पर्यंत | रु. १८००१ ते पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ४ (१०) | १९ (१८.६२) | ३० (४१.६६) | ३३ (४२.३१) | २८ (४८.२८) | ११४ (३२.५७) |
| नाही | ३६ (९०) | ८३ (८१.३८) | ४२ (५८.३४) | ४५ (५७.६९) | ३० (५१.७२) | २३६ (६७.४३) |
| एकूण | ४० (१००) | १०२ (१००) | ७२ (१००) | ७८ (१००) | ५८ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील मराठी भाषिक कुटुंबातील मुलींचे उच्च शिक्षण घेण्याचे शेकडा प्रमाण ३२.५७ इतके असून त्यामध्ये रु. १८००० ते पुढे या गटातील घटकांचे शेकडा प्रमाण ४८.२८ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे मासिक उत्पन्न रु. १२००१ ते १८०००, रु. ६००१ ते १२०००, रु. ३००१ ते ६००० व रु. ३००० पर्यंत गटांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ४२.३१, ४१.६६, १८.६२ व १० इतके आहे.

यावरून शेकडा प्रमाण ६७.४३ मुली उच्च शिक्षणापासून वंचित आहेत. याचे कारण म्हणजे कर्नाटकमध्ये उच्च शिक्षणाच्या वाढलेल्या फी, कन्नडसक्तीचे धोरण व इंग्रजी भाषेतील शिक्षण हे आहे. त्यामुळे सीमाभागातील मुले/मुली उच्च शिक्षणासाठी महाराष्ट्रातील सीमावर्ती भागातील महाविद्यालयांचा आधार घेतात. त्यामध्ये निपाणीजवळील अर्जुननगर येथील देवचंद महाविद्यालय हे आहे.

## २६. पुरेसा शिक्षक वर्ग


सीमाभागातील मराठी माध्यमाच्या शाळेमध्ये पुरेसा शिक्षकवर्ग उपलब्ध आहे का? हे अभ्यासण्यासाठी तालुका या निकषाआधारे पुढील सारणी मांडण्यात आली आहे.

### सारणी क्रमांक ५.२६

### पुरेसा शिक्षक वर्ग

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | २३ (१०.९५) | १३ (१८.५८) | १७ (४२.५०) | ८ (४०) | ५ (५०) | ८६ (२४.५८) |
| नाही | १८७ (८९.०५) | ५७ (८१.४२) | २३ (५७.५०) | १२ (६०) | ५ (५०) | २६४ (७५.४२) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पुरेसा शिक्षकवर्ग उपलब्ध नसतो याचे सर्वाधिक प्रमाण खानापूर तालुक्यात असून त्याचे शेकडा प्रमाण ८९.०५ इतके आहे. तसेच बेळगाव, हुक्केरी व चिक्कोडी तालुक्यात पुरेसा शिक्षकवर्ग नसल्याचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ८१.४२, ६० व ५७.५० इतके असून सरासरी शेकडा ७५.४२ मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये पुरेसा शिक्षकवर्ग उपलब्ध नाही.

मराठी भाषिकांचा प्रभाव असणाऱ्या भागामध्ये कर्नाटक सरकार जाणीवपूर्वक मराठी शिक्षकांच्या नेमणूकीकडे दुर्लक्ष करते असे मत संशोधकाजवळ अनुसूची भरून घेत असताना अनेकांनी व्यक्त केले.

वरील सारणीतील निष्कर्षावरून व संशोधकाला आलेल्या अनुभवावरून कर्नाटक सरकारचे मराठी भाषाविषयक धोरण संकुचित असून मराठी शाळांकडे दुर्लक्ष करणारे आहे.

## २७. पुरेशी विद्यार्थी संख्या


सीमाभागातील मराठी माध्यमाच्या शाळेमध्ये पुरेशी विद्यार्थी संख्या आहे का? हे तालुका या निकषाआधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक ५.२७**

**पुरेशी विद्यार्थी संख्या**

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | १५२<br>(७२.३८) | ४०<br>(५७.१४) | २२<br>(५५) | ११<br>(५५) | ५<br>(५०) | २३०<br>(६७.७२) |
| नाही | ५८<br>(२७.६२) | ३०<br>(४२.८६) | १८<br>(४५) | ९<br>(४५) | ५<br>(५०) | १२०<br>(३४.२८) |
| एकूण | २१०<br>(१००) | ७०<br>(१००) | ४०<br>(१००) | २०<br>(१००) | १०<br>(१००) | ३५०<br>(१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, मराठी माध्यमाच्या शाळेमध्ये पुरेशी विद्यार्थी संख्या असण्याचे प्रमाण खानापूर तालुक्यामध्ये असून त्याचे शेकडा प्रमाण ७२.३८ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे बेळगाव आणि चिक्कोडी व हुक्केरी तालुकयामध्ये शेकडा प्रमाण ५७.१४ आणि ५५ इतके आहे तर अथणी तालुक्यामध्ये शेकडा प्रमाण ५० आहे. तसेच पुरेशी विद्यार्थी संख्या नसणाऱ्या घटकांचे एकूण शेकडा प्रमाण ३४.२८ इतके आहे.

सीमाभागातील मराठी माध्यमाच्या शाळेमध्ये पुरेशी विद्यार्थी संख्या असण्याचे एकूण शेकडा प्रमाण ६७.७२ इतके आहे. परंतु हे प्रमाण कमी कमी होत असल्याचे दिसून आले. याचे कारण म्हणजे अलिकडे इंग्रजी शाळांचा प्रभाव वाढत आहे. सीमाभागात विशेषत: बेळगाव शहरात अनेक नामवंत इंग्रजी शाळा असून सीमाभागातील अनेक मराठी भाषिक तसेच कन्नड भाषिकही आपली मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळांना घालत आहेत. त्यामुळे अपुऱ्या विद्यार्थ्यांचा प्रश्न आज मराठी शाळांबरोबरच कन्नड शाळांनाही जाणवत आहे. याचाच एक भाग म्हणून प्रा. आनंद मेणसे यांनी सीमाभागात 'मराठी वाचवा, मराठी जगवा' अभियान सुरू केले आहे.

## २८. महाराष्ट्र संस्कृती

कर्नाटक राज्य शिक्षण मंडळाने महाराष्ट्रीयन संस्कृतीची ओळख करून देण्याकरिता मराठी


पाठ्यपुस्तकामध्ये महाराष्ट्र संस्कृतीचे धडे समाविष्ट केले आहेत का? हे वय या निकषाच्याआधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक ५.२८**

**महाराष्ट्र संस्कृती**

| वयोगट | १८ ते २५ वर्षे | २६ ते ३५ वर्षे | ३६ ते ५० वर्षे | ५१ ते ६५ वर्षे | ६६ वर्षे ते पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ११ (१८.९६) | १३ (२०.३२) | ३८ (४४.१८) | ४७ (४७.९६) | २१ (४७.७२) | १३० (३७.१४) |
| नाही | ४७ (८१.०४) | ५१ (७९.६८) | ४८ (५५.८२) | ५१ (५२.०४) | २३ (५२.२८) | २२० (६२.८६) |
| एकूण | ५८ (१००) | ६४ (१००) | ८६ (१००) | ९८ (१००) | ४४ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, कर्नाटक राज्य शिक्षण मंडळाने मराठी पाठ्यपुस्तकामध्ये महाराष्ट्रीयन संस्कृतीची ओळख होण्याकरिता महाराष्ट्रीयन संस्कृतीचे धडे समाविष्ट

केले नाहीत असे सर्वाधिक प्रमाण १८ ते २५ या वयोगटातील घटकांचे असून त्याचे शेकडा प्रमाण ८१.०४ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे २६ ते ३५ व ३६ ते ५० या वयोगटाचे शेकडा प्रमाण ७९.६८ व ५५.८२ इतके आहे तर सर्वात कमी प्रमाण वयोगट ५१ ते ६५ या घटकाचे असून त्याचे शेकडा प्रमाण ५२.०४ इतके आहे. तसेच महाराष्ट्रीयन संस्कृतीचे धडे अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत अशा घटकांचे एकूण शेकडा प्रमाण ३७.१४ इतकेआहे.

यावरून असे दिसून येते की, सुरूवातीच्या काळात मराठी पाठ्यपुस्तकामध्ये मराठी भाषा, संस्कृती, शिवरायांचा इतिहास, लेणी इ. चा समावेश असायचा पण आता कर्नाटक सरकार हळूहळू मराठी भाषा, संस्कृती मराठी पाठ्यपुस्तकातूनही नष्ट करत असल्याचे यावरून दिसून येते.

## २९. कर्नाटक सरकारचे धोरण


मराठी भाषिकांच्या शिक्षणाविषयी कर्नाटक सरकारचे धोरण सकारात्मक आहे का? हे शिक्षण या निकषाआधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक ५.२९**

**कर्नाटक सरकारचे धोरण**

| शिक्षण | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक व उच्च माध्यमिक | पदवी व पदव्युत्तर | व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| सकारात्मक | १ (९.०९) | १३ (१५.६७) | ५५ (३२.९३) | २७ (४२.८५) | ९ (३४.६१) | १०५ (३०) |
| नकारात्मक | १० (९०.९१) | ७० (८४.३३) | ११२ (६७.०७) | ३६ (५७.१५) | १७ (६५.३९) | २४५ (७०) |
| एकूण | ११ (१००) | ८३ (१००) | १६७ (१००) | ६३ (१००) | २६ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, मराठी भाषिकांच्या शिक्षणाविषयी कर्नाटक सरकारचे धोरण नकारात्मक वाटण्यामध्ये निरक्षर लोकांचे प्रमाण अधिक असून त्याचे शेकडा प्रमाण ९०.९१ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे प्राथमिक आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक घटकांचे शेकडा प्रमाण ८४.३३ आणि ६७.०७ इतके आहे तर वरील तुलनेत कर्नाटक सरकारचे धोरण कमी प्रमाणात नकारात्मक वाटण्यामध्ये पदवी व पदव्युत्तर घटकांचे असून त्याचे शेकडा प्रमाण ५७.१५ इतके आहे. तसेच हे धोरण सकारात्मक आहे असे मत असणाऱ्या घटकांचे एकूण सरासरी शेकडा प्रमाण ३० इतके आहे.

यावरून एकूण सरासरी शेकडा ७० घटकांना कर्नाटक सरकारचे धोरण मराठी भाषिकांच्या शिक्षणाविषयी नकारात्मक असल्याचे दिसून येते.

### ३०. शाळा इमारत बांधकाम व दुरूस्ती


सीमाभागातील मराठी माध्यमाच्या शाळेच्या इमारत बांधकाम व दुरूस्तीबाबत कर्नाटक सरकारची भूमिका सकारात्मक आहे का? हे तालुका या निकषाआधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

## सारणी क्रमांक ५.३०

## शाळा इमारत बांधकाम व दुरूस्ती

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| सकारात्मक | ९७ (४६.१९) | २६ (३७.१४) | २२ (५५) | ९ (४५) | ८ (८०) | १६२ (४६.२८) |
| नकारात्मक | ११३ (५३.८१) | ४४ (६२.८६) | १८ (४५) | ११ (५५) | २ (२०) | १८८ (५३.७२) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील मराठी शाळा या जुन्या असून त्यांच्या दुरूस्ती व नवीन बांधकामाबाबत कर्नाटक सरकारची भूमिका नकारात्मक असून त्याचे सर्वाधिक प्रमाण बेळगाव तालुक्यात जाणवत असून ते शेकडा ६२.८६ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे हुक्केरी व खानापूर तालुका असून त्यांचे शेकडा प्रमाण ५५ व ५३.८१ इतके आहे तर सर्वात कमी नकारात्मक भूमिकेचे प्रमाण अथणी तालुकयात असून त्याचे शेकडा प्रमाण २० इतके आहे. कर्नाटक सरकारचे धोरण सकारात्मक आहे अशा घटकांचे एकूण शेकडा प्रमाण ४६.२८ इतके आहे.

यावरून मराठी माध्यमाच्या शाळेच्या इमारत बांधकाम व दुरूस्तीकडे कर्नाटक सरकारचा दृष्टिकोन नकारात्मक असून त्याचे सरासरी शेकडा प्रमाण ५३.७२ इतके आहे. आज अनेक मराठी शाळा जीर्ण व मोडकळीला आलेल्या संशोधकाच्या पाहणीमध्ये आढळून आले. उदा. कंग्राळी बुद्रुक येथील मराठी शाळेची इमारत, नानावाडीतील शाळेची इमारतच नसल्याने गॅरेजमध्ये शाळा भरते.

## ३१. सीमाभागातील शाळांसाठी महाराष्ट्र सरकारचे आर्थिक सहाय्य


सीमाभागातील मराठी माध्यमाच्या शाळांना महाराष्ट्र शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळते की नाही हे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक ५.३१**

**सीमाभागातील शाळांसाठी महाराष्ट्र सरकारचे आर्थिक सहाय्य**

| प्रतिसाद | संख्या |
|---|---|
| होय | ४० (११.४२) |
| नाही | ३१० (८८.५८) |
| एकूण | ३५०(१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात



यावरून असे दिसून येते की, महाराष्ट्र शासनाकडूनही सीमाभागातील मराठी माध्यमाच्या शाळांना आर्थिक सहाय्य मिळत नसून त्याचे शेकडा प्रमाण ८८.५८ इतके आहे तर आर्थिक सहाय्य मिळत असणाऱ्या शाळांचे शेकडा प्रमाण फक्त ११.४२ इतके आहे.

सीमाभागातील खाजगी मराठी माध्यमाच्या शाळांना काही अंशी मदत देण्याचे धोरण` महाराष्ट्र सरकारने जाहीर केले आहे. पण ही मदत तुटपुंजी असून सरकारच्या खर्चातून चालणाऱ्या प्राथमिक शाळांना कायदयाच्या अडचणीमुळे महाराष्ट्र सरकार मदत करू शकत नाही. पर्यायाने सीमाभागातील मराठी माध्यमांच्या शाळांना मूलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे. कारण कर्नाटक सरकार जाणीवपूर्वक मराठी माध्यमांच्या शाळांना वेगवेगळ्या सोयीसुविधा पुरविण्यास टाळाटाळ करते.

## ३२. कन्नड विषयाची सक्ती


मराठी माध्यमाच्या शाळेत कन्नड विषयाची सक्ती केली आहे का? हे पाहण्यासाठी लिंग या निकषाआधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक ५.३२**

**कन्नड विषयाची सक्ती**

| लिंग | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| होय | २१०<br>(१००) | १४०<br>(१००) | ३५०<br>(१००) |
| नाही | ०<br>(०) | ०<br>(०) | ०<br>(०) |
| एकूण | २१०<br>(१००) | १४०<br>(१००) | ३५०<br>(१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, कर्नाटक सरकारच्या १९८६ च्या कन्नड सक्ती धोरणानुसार सीमाभागातील सर्व मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये १०० टक्के कन्नड विषय सक्तीचा केल्याचे दिसून आले. इतकेच नव्हेतर सीमाभागातील प्रत्येक गावामध्ये आज स्वतंत्र कन्नड माध्यमाच्या शाळा सुरू केल्या आहेत.

## ३३. मराठी माध्यमाची पाठ्यपुस्तके


सीमाभागातील मराठी शाळांमध्ये मराठी माध्यमाची पाठ्यपुस्तके शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला उपलब्ध होतात की नाही हे अभ्यासण्यासाठी शिक्षण या निकषाआधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

सारणी क्रमांक ५.३३

मराठी माध्यमाची पाठ्यपुस्तके

| शिक्षण | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक व उच्च माध्यमिक | पदवी व पदव्युत्तर | व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | २ (१८.१८) | ३४ (४०.९६) | ५९ (३५.३३) | २८ (४४.४४) | १२ (४६.१६) | १३५ (३८.५८) |
| नाही | ९ (८१.८२) | ४९ (५९.०४) | १०८ (६४.६७) | ३५ (५५.५६) | १४ (५३.८४) | २१५ (६१.४२) |
| एकूण | ११ (१००) | ८३ (१००) | १६७ (१००) | ६३ (१००) | २६ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील मराठी शाळांमध्ये मराठी पाठ्यपुस्तके शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला उपलब्ध होत नाहीत असे म्हणणाऱ्या घटकांमध्ये निरक्षर घटक अधिक असून त्याचे शेकडा प्रमाण ८१.८२ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे माध्यमिक व उच्च माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षण घेतलेल्या घटकांचे प्रमाण असून ते अनुक्रमे शेकडा ६४.६७ व

५९.०४ इतके आहे तर सर्वात कमी प्रमाण हे व्यावसायिक गटातील घटकांचे असून ते शेकडा ५३.८४ इतके आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला मराठी माध्यमाची पाठ्यपुस्तके उपलब्ध होतात असे म्हणणाऱ्या घटकांचे एकूण शेकडा प्रमाण ३८.५८ इतके आहे.

यावरून असे दिसून येते की, सीमाभागातील मराठी शाळांमध्ये मराठी माध्यमाची पाठ्यपुस्तके शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला कर्नाटक सरकारकडून केवळ मराठी भाषाद्वेष म्हणून वेळेत उपलब्ध केली जात नाहीत.

## ३४. स्थानिक निवडणुकीत भाषिक मुद्द्याचा प्रभाव


स्थानिक निवडणुकीत उमेदवाराकडून भाषिक मुद्द्याला महत्त्व दिले जाते की नाही हे दर्शविण्यासाठी लिंग या निकषाआधारे पुढील सारणीची मांडणी केली आहे.

**सारणी क्रमांक ५.३४**

**स्थानिक निवडणुकीत भाषिक मुद्द्याचा प्रभाव**

| लिंग | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| होय | १८१ (८६.१९) | ११७ (८३.५८) | २९८ (८५.१४) |
| नाही | २९ (१३.८१) | २३ (१६.४२) | ५२ (१४.८६) |
| एकूण | २१० (१००) | १४० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागात स्थानिक निवडणुकीत उमेदवाराकडून भाषिक मुद्दयाला प्राधान्य देणाऱ्या घटकांचे सर्वाधिक प्रमाण पुरुषांचे असून त्याचे शेकडा प्रमाण ८६.१९ इतके आहे. तर स्त्रियांची संख्या शेकडा ८३.५८ इतकी आहे. त्याचबरोबर भाषिक मुद्दयाला महत्त्व दिले जात नाही. अशा घटकांची पुरुष संख्या शेकडा १३.८१ इतकी आहे तर स्त्रियांची संख्या १६.४२ इतकी आहे.

स्थानिक निवडणुकीत उमेदवाराकडून भाषिक मुद्दयाला प्राधान्य दिले जाते अशा घटकाचे सर्वाधिक शेकडा प्रमाण ८५.१४ इतके आहे.

यावरून बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिक राजकारणामध्ये भाषेचा प्रभाव असून विशेषत: महाराष्ट्र एकीकरण समितीसारख्या संघटना फक्त भाषिक घटकाला महत्त्व देतात.

## ३५. राजकीय पक्ष/संघटना – भाषिक वापर


कोणता राजकीय पक्ष/संघटना निवडणुकीच्यावेळी भाषिक मुद्दयाचा आधार घेतो याबाबतची माहिती पुढील सारणीत मांडण्यात आली आहे.

**सारणी क्रमांक ५.३५**

**राजकीय पक्ष/संघटना – भाषिक वापर**

| पक्ष | होय | नाही |
|---|---|---|
| काँग्रेस | ० (०) | ३५० (१००) |
| भाजप | ० (०) | ३५० (१००) |
| निधर्मी जनता दल | ० (०) | ३५० (१००) |
| महाराष्ट्र एकीकरण समिती | ३५० (१००) | ० (०) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, कर्नाटकमधील काँग्रेस, भाजप व निधर्मी जनता दल हे प्रमुख राजकीय पक्ष निवडणुकीमध्ये भाषिक मुद्दयाचा वापर करत नाहीत. भाषिक मुद्दयावरती महाराष्ट्र एकीकरण समितीने सीमाभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकापासून लोकसभेच्या निवडणूका लढविल्या असून त्यामध्ये यशही संपादन केले आहे.

काँग्रेस, भाजपा व निधर्मी जनता दल हे राजकीय पक्ष निवडणुकीमध्ये भाषिक मुद्दयांचा जाहीररित्या पुरस्कार करत नसले तरी मराठी भाषिकांची मते मिळविण्यासाठी अनेक प्रलोभने मराठी भाषिकांना दाखविली जातात. तसेच पक्षाची उमेदवारी देताना पक्षश्रेष्ठी भाषिक मुद्दा विचारात घेत असतात.

## ३६. स्थानिक संस्थांमधील भाषिक प्रभाव


सीमाभागातील गावांमध्ये स्थानिक संस्थांमध्ये कोणत्या भाषिक गटाचे प्राबल्य अधिक आहे हे दर्शविण्यासाठी तालुका या निकषाच्या आधारे पुढील सारणी मांडण्यात आली आहे.

**सारणी क्रमांक ५.३६**

**स्थानिक संस्थांमधील भाषिक प्रभाव**

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | २०२ (९६.१९) | ६५ (९२.८५) | २९ (७२.५०) | १४ (७०) | ७ (७०) | ३१७ (९०.५७) |
| कन्नड | ० (०) | ० (०) | ० (०) | ० (०) | ० (०) | ० (०) |
| मराठी व कन्नड | ८ (३.८१) | ५ (७.१५) | ११ (२७.५०) | ६ (३०) | ३ (३०) | ३३ (९.४३) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील गावांमध्ये कार्यरत असणाऱ्या स्थानिक संस्थांमध्ये मराठी भाषिक गटाचे वर्चस्व खानापूर तालुक्यात सर्वाधिक असून त्याचे शेकडा प्रमाण ९६.१९ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे बेळगाव व चिक्कोडी तालुक्यामध्ये शेकडा प्रमाण ९२.८५ व ७२.५० इतके आहे. तर सर्वात कमी प्रमाण हुक्केरी व अथणी तालुक्यात असून त्याचे शेकडा प्रमाण ७० व ७० इतके आहे. मराठी व कन्नड अशा दोन्ही भाषिकांचे स्थानिक संस्थांमध्ये प्राबल्य असण्याचे एकूण शेकडा प्रमाण फक्त ९.४३ इतकेच आहे.

सीमाप्रश्न ५८ वर्षे रेंगाळत असतानाही सीमाभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांतील निवडणुकांमध्ये मराठी भाषिकांचे प्राबल्य अधिक असून त्याचे शेकडा प्रमाण ९०.५७ इतके आहे.

## ३७. स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सहकार्य


मराठी भाषिक लोकांना स्थानिक स्वराज संस्थांकडून पुरेसे सहकार्य मिळते की नाही हे दर्शविण्यासाठी व्यवसाय या निकषाच्या आधारे पुढील सारणी मांडली आहे.

### सारणी क्रमांक ५.३७

### स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सहकार्य

| व्यवसाय | शेती | सरकारी नोकरी | स्वत:चा धंदा | खाजगी नोकरी | बेरोजगार | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ५५<br>(५७.२९) | ४२<br>(६८.८६) | २३<br>(६९.७०) | ३४<br>(४६.५८) | ४०<br>(४५.९७) | १९४<br>(५५.४२) |
| नाही | ४१<br>(४२.७१) | १९<br>(३१.१४) | १०<br>(३०.३०) | ३९<br>(५३.४२) | ४७<br>(५४.०३) | १५६<br>(४४.५८) |
| एकूण | ९६<br>(१००) | ६१<br>(१००) | ३३<br>(१००) | ७३<br>(१००) | ८७<br>(१००) | ३५०<br>(१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील मराठी भाषिक लोकांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून पुरेसे सहकार्य मिळते अशा घटकांची सर्वाधिक संख्या ही स्वत:चा धंदा असणाऱ्या घटकांची असून त्याचे शेकडा प्रमाण ६९.७० इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे सरकारी नोकरी व शेती व्यवसाय करणाऱ्या घटकांचे शेकडा प्रमाण ६८.८६ व ५७.२९ इतके आहे तर

सर्वात कमी प्रमाण हे बेरोजगार घटकांचे असून ते शेकडा ४५.९७ इतके आहे. मराठी भाषिकांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून पुरेसे सहकार्य मिळत नाही अशा घटकांचे शेकडा प्रमाण ४४.५८ इतके आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मराठी भाषिकांना पुरेसे सहकार्य मिळण्याचे सरासरी शेकडा प्रमाण ५५.४२ इतके आहे. याचे कारण स्थानिक संस्थामध्ये मराठी भाषिकांचे वर्चस्व आहे.

## ३८. पक्ष प्रचारासाठी भाषा

विधीमंडळाच्या/लोकसभेच्या निवडणूक प्रचारासाठी उमेदवार वा पक्षाकडून प्रचारासाठी कोणती भाषा अधिक प्रमाणात वापरली जाते हे लिंग या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.३८**

**पक्ष प्रचारासाठी भाषा**

| **लिंग** | **पुरुष** | **स्त्रिया** | **एकूण** |
|---|---|---|---|
| मराठी | १९३<br>(९१.९०) | १११<br>(७९.२८) | ३०४<br>(८६.८६) |
| कन्नड | ०<br>(०) | ०<br>(०) | ०<br>(०) |
| मराठी व कन्नड | १७<br>(८.१०) | २९<br>(२०.७२) | ४६<br>(१३.१४) |
| एकूण | २१०<br>(१००) | १४०<br>(१००) | ३५०<br>(१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, विधीमंडळाच्या/लोकसभेच्या प्रचारासाठी उमेदवार वा पक्षाकडून प्रचारासाठी पुरुषांकडून मिळालेल्या माहितीवरून मराठी भाषेचाच अधिक वापर केला जात असून त्याचे शेकडा प्रमाण ९१.९० इतके आहे तर स्त्रियांकडून मिळालेल्या माहितीवरून शेकडा प्रमाण ७९.२८ इतके आहे.

यावरून सीमाभागात विधीमंडळ/लोकसभेच्या निवडणूक प्रचारासाठी मराठी भाषेचाच वापर अधिक असून त्याचे शेकडा प्रमाण ८६.८६ इतके आहे तर मराठी व कन्नड या दोन्ही भाषेतून प्रचाराचे शेकडा प्रमाण १३.१४ इतके आहे आणि कन्नड भाषेतून एकही पक्ष प्रचार करीत नाही.

निवडणुकीच्या काळामध्ये सर्वच राजकीय पक्षाकडून सरासरी शेकडा ८६.८६ इतका मराठीतून होणारा प्रचार या भागातील मराठी भाषिकांचे वर्चस्व सिद्ध करणारा आहे.

## ३९. मराठी भाषिक संघटना


सीमाभागातील बहुसंख्याक मराठी भाषिक असलेल्या लोकांची स्वतंत्र संघटना आहे की नाही हे दर्शविण्यासाठी तालुका या निकषाच्या आधारे माहिती पुढील सारणीत मांडली आहे.

## सारणी क्रमांक ५.३९

## मराठी भाषिक संघटना

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | १६१ (७६.६६) | ६३ (९०) | २१ (५२.५०) | १ (५) | १ (१०) | २४७ (७०.५८) |
| नाही | ४९ (२३.३४) | ७ (१०) | १९ (४७.५०) | १९ (९५) | ९ (९०) | १०३ (२९.४२) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागात मराठी भाषिक लोकांची स्वतंत्र संघटना आहे अशा घटकांची सर्वाधिक संख्या बेळगाव तालुक्यात असून त्याचे शेकडा प्रमाण ९० इतके आहे. त्यानंतर खानापूर व चिक्कोडी या तालुक्यात अनुक्रमे शेकडा प्रमाण ७६.६६ व ५२.५० इतके आहे तर सर्वात कमी प्रमाण अथणी व हुक्केरी तालुक्यात असून त्याचे शेकडा प्रमाण

अनुक्रमे १० व ५ इतके आहे. मराठी भाषिकांची स्वतंत्र संघटना नाही अशा घटकांचे एकूण शेकडा प्रमाण २९.४२ इतके आहे.

मराठी भाषिकांची स्वतंत्र संघटना म्हणून महाराष्ट्र एकीकरण समितीचे अस्तित्व हे खानापूर व बेळगाव तालुक्यात अधिक असून त्याचे एकूण शेकडा प्रमाण ७०.५८ इतके आहे.

मराठी भाषिकांची स्वतंत्र संघटना या प्रश्नावर काहीवेळा उत्तरदात्यांनी एकापेक्षा जास्त गट असल्याचे मत व्यक्त केले. याचे प्रमाण बेळगाव तालुक्यात अधिक असून बेळगाव तालुक्यातील महाराष्ट्र एकीकरण समिती एका संघटनेपेक्षा अधिक गटात विभागली आहे. याचा परिणाम महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कामकाजावर पर्यायाने मराठी भाषिकांच्या एकजुटीवर होताना दिसतो.

## ४०. सरकारी कार्यक्रमातील सहभाग


सीमाभागातील मराठी भाषिक पदाधिकारी व नेत्यांना कर्नाटक सरकारच्या कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेतले जाते का? याबाबतचे निष्कर्ष तालुका या घटकाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहेत.

**सारणी क्रमांक ५.४०**

**सरकारी कार्यक्रमातील सहभाग**

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ४९ (२३.३४) | २५ (३५.७२) | १४ (३५) | ५ (२५) | २ (२०) | ९५ (२७.१४) |
| नाही | १६१ (७६.६६) | ४५ (६४.२८) | २६ (६५) | १५ (७५) | ८ (८०) | २५५ (७२.८६) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




कर्नाटक सरकारच्यावतीने आयोजित केल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमांना, बैठकींना विशेषत: सांस्कृतिक कार्यक्रम, आढावा बैठक, शांतता व सुव्यवस्था बैठक, नियोजन बैठक इत्यादी मराठी भाषिकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांना किंवा मराठी भाषिक पदाधिकाऱ्यांना सहभागी करून न घेण्याचे तालुकावार शेकडा प्रमाण अथणी ८०, खानापूर ७६.६६, हुक्केरी ७५, चिक्कोडी ६५, बेळगाव ६४.२८ इतके असून त्याचे सरासरी शेकडा प्रमाण ७२.८६ इतके आहे.

यावरून कर्नाटक सरकारचा मराठी भाषिकांच्याविषयी असणारा संकुचित दृष्टीकोन समजून येतो.

## ४१. कर्नाटक सरकारचे मराठी भाषाविषयक धोरण


सीमाभागातील मराठी भाषिकासंदर्भात कर्नाटक सरकारचे धोरण अन्यायकारक आहे का? हे वय या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.४१**

**कर्नाटक सरकारचे मराठी भाषाविषयक धोरण**

| वयोगट | १८ ते २५ वर्षे | २६ ते ३५ वर्षे | ३६ ते ५० वर्षे | ५१ ते ६५ वर्षे | ६६ वर्षे ते पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ३० (५१.७३) | ५२ (८१.२६) | ७९ (९१.८६) | ९५ (९६.९४) | ३४ (७७.२७) | २९० (८२.८५) |
| नाही | २८ (४८.२७) | १२ (१८.७४) | ७ (८.१३) | ३ (३.०६) | १० (२२.७३) | ६० (१७.१५) |
| एकूण | ५८ (१००) | ६४ (१००) | ८६ (१००) | ९८ (१००) | ४४ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील मराठी भाषिकासंदर्भात कर्नाटक सरकारचे धोरण अन्यायकारक असल्याचे सर्वाधिक ५१ ते ६५ वर्षे या वयोगटातील लोकांना वाटत असून त्याचे शेकडा प्रमाण ९६.९४ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे ३६ ते ५० वर्षे व २६ ते ३५ वर्षे वयोगटातील लोकांना तसे वाटते. त्याचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ९१.८६ व ८१.२६ इतके आहे.

सर्वात कमी प्रमाण १८ ते २५ वर्षे वयोगटातील लोकांचे असून त्याचे शेकडा प्रमाण ५१.७३ इतके आहे.

यावरून असे निदर्शनास येते की, सीमाभागातील मराठी भाषिकासंदर्भात कर्नाटक सरकारचे धोरण अन्यायकारक असून त्याचे शेकडा प्रमाण ८२.८५ इतके आहे.

सीमाभागातील चळवळ ऐन जोरात असताना ५१ ते ६५ या वयोगटातील पिढीने साराबंदी, कर्नाटक सरकारची कन्नडसक्ती, पोलीसांचा लाठीहल्ला, खोटे खटले दाखल इ. बाबींना सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे वयोगट जसा वाढत जाईल तसे कर्नाटक सरकारचे धोरण अन्यायकारक वाटण्याचे प्रमाण वाढल्याचे जाणवते.

## ४२. कर्नाटक सरकारचा दृष्टिकोन


सीमाभागातील मराठी भाषिक पदाधिकारी/नेत्यांकडे पाहण्याचा कर्नाटक सरकारचा दृष्टिकोन कसा आहे हे शिक्षण या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक ५.४२**

**कर्नाटक सरकारचा दृष्टिकोन**

| शिक्षण | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक व उच्च माध्यमिक | पदवी व पदव्युत्तर | व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| सकारात्मक | ३ (२७.२७) | २३ (२७.७२) | २४ (१४.३७) | ११ (१७.४७) | ११ (४२.३०) | ७३ (२०.८५) |
| नकारात्मक | ८ (७२.७३) | ६० (७२.२८) | १४३ (८५.६३) | ५२ (८२.५३) | १५ (५७.७०) | २७७ (७९.१५) |
| एकूण | ११ (१००) | ८३ (१००) | १६७ (१००) | ६३ (१००) | २६ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागातील मराठी भाषिक पदाधिकारी/नेत्यांकडे पाहण्याचा कर्नाटक सरकारचा दृष्टिकोन नकारात्मक असून सर्वाधिक माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातील घटकांच्या मते शेकडा प्रमाण ८५.६३ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे पदवी व पदव्युत्तर आणि प्राथमिक शिक्षण घेतलेल्या घटकांचे प्रमाण ८२.५३ व ७२.२८ इतके आहे. तर सर्वात कमी प्रमाण व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या घटकांचे असून त्यांचे शेकडा प्रमाण ५७.७० इतके आहे. तसेच कर्नाटक सरकारचा मराठी भाषिक पदाधिकारी/नेत्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक आहे अशा घटकांचे एकूण शेकडा प्रमाण २०.८५ इतके आहे.

यावरून असे दिसून येते की, सीमाभागातील मराठी भाषिक पदाधिकारी/नेत्यांकडे पाहण्याचा कर्नाटक सरकारचा दृष्टिकोन हा नकारात्मक असून याचे शेकडा प्रमाण ७९.१५ इतके आहे. याचा पुरावा म्हणजे २००५ मध्ये बेळगावचे महापौर विजय मोरे यांना बेंगलोरमध्ये काळे फासण्यात येऊन बेळगाव महापालिका बरखास्त करण्यात आली.

## ४३. बेळगाव महानगरपालिका बरखास्तीकरण


कर्नाटक सरकारने बेळगाव महानगरपालिकेची बरखास्ती मराठी द्वेषातूनच केली आहे का? हे शिक्षण या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

### सारणी क्रमांक ५.४३

### बेळगाव महानगरपालिका बरखास्तीकरण

| शिक्षण | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक व उच्च माध्यमिक | पदवी व पदव्युत्तर | व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ७ (६३.६३) | ६४ (७७.१०) | १३३ (७९.६४) | ५१ (८०.९५) | १९ (७३.०७) | २७४ (७८.२८) |
| नाही | ४ (३६.३७) | १९ (२२.९०) | ३४ (२०.३६) | १२ (१९.०५) | ७ (२६.९३) | ७६ (२१.७२) |
| एकूण | ११ (१००) | ८३ (१००) | १६७ (१००) | ६३ (१००) | २६ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून बेळगाव महानगरपालिका २००५ व २०११ मध्ये कर्नाटक सरकारने बरखास्तीकरण केले त्यापाठीमागे केवळ मराठी द्वेष हेच एकमेव कारण आहे असे पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या घटकांचे मत असून त्याचे शेकडा प्रमाण ८०.९५ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे

माध्यमिक व उच्च माध्यमिक ७९.६४, प्राथमिक ७७.१० व व्यावसायिक गटाचे ७३.०७ इतके प्रमाण दिसून येत असून एकूण सरासरी शेकडा प्रमाण ७८.२८ इतके आहे. तर मराठी द्वेषातून बेळगाव महानगरपालिका बरखास्तीकरण केले नसल्याचे एकूण सरासरी शेकडा २१.७२ घटकांचे मत आहे.

यावरून लोकशाही पद्धतीने जनतेने निवडून दिलेल्या महानगरपालिकेच्या प्रतिनिधींचे हक्क कर्नाटक सरकारने पायदळी तुडवून महानगरपालिकाच बरखास्त करून मराठी भाषिकांवरील संताप व्यक्त केल्याचे दिसून येते.

## ४४. सीमालढ्यामध्ये महिलांचा सहभाग


सीमाप्रश्नासंबंधी वेळोवेळी होणाऱ्या मोर्चे, उपोषणे, सत्याग्रह, मेळावे इ. लढ्यामध्ये महिलांच्या सहभागाविषयीची माहिती लिंग या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडली आहे.

**सारणी क्रमांक ५.४४**

**सीमालढ्यामध्ये महिलांचा सहभाग**

| लिंग | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| होय | ९३<br>(४४.२९) | ५९<br>(४२.१५) | १५२<br>(४३.४२) |
| नाही | ११७<br>(५५.७१) | ८१<br>(५७.८५) | १९८<br>(५६.५८) |
| एकूण | २१०<br>(१००) | १४०<br>(१००) | ३५०<br>(१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाप्रश्नासंदर्भात मोर्चे, सत्याग्रह, मेळावे, आंदोलने इ. लढ्यामध्ये महिलांचा सहभाग नसतो असे शेकडा प्रमाण ५७.८५ स्त्रियांना वाटते. तसेच शेकडा ५५.७१ पुरुषांनीही असेच मत नोंदविले आहे. याचे एकत्रित शेकडा प्रमाण ५६.५८ इतके आहे तर सीमाप्रश्नाच्या लढ्यामध्ये स्त्रियांचा सहभाग असतो असे शेकडा ४३.४२ स्त्री–पुरुषांना वाटते.

एकंदरीत सीमाप्रश्नाच्या लढ्यामध्ये स्त्रियांचा सहभाग कमी असला तरी (शेकडा ४३.४२) तो दुर्लक्षित करण्यासारखा नाही. तसेच तो अत्यल्पही नाही. सीमाप्रश्नाच्या अनेक मेळाव्यामध्ये स्त्रियांनी उत्स्फूर्त सहभाग अनेकवेळा दाखविला आहे.

## ४५. भाषिक मुद्दा


निवडणुकीवेळी भाषिक मुद्दा कितपत प्रमाणात विचारात घेतला जातो हे वय या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

## सारणी क्रमांक ५.४५

## भाषिक मुद्दा

| वयोगट | १८ ते २५ वर्षे | २६ ते ३५ वर्षे | ३६ ते ५० वर्षे | ५१ ते ६५ वर्षे | ६६ वर्षे ते पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | २५ (४३.१०) | ४१ (६४.०६) | ७० (८१.३९) | ७७ (७८.५७) | २५ (५६.८१) | २३८ (६८) |
| नाही | ३३ (५६.९०) | २३ (३५.९४) | १६ (१८.६१) | २१ (२१.४३) | १९ (४३.१९) | ११२ (३२) |
| एकूण | ५८ (१००) | ६४ (१००) | ८६ (१००) | ९८ (१००) | ४४ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, सीमाभागात निवडणुकीवेळी मतदान करताना भाषिक मुद्दा विचारात घेऊन मतदान करणाऱ्या घटकामध्ये ३६ ते ५० वर्षे या वयोगटाचे प्रमाण सर्वाधिक असून ते शेकडा ८१.३९ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे ५१ ते ६५ वर्षे व २६ ते ३५ वर्षे या वयोगटाचे शेकडा प्रमाण ७८.५७ व ६४.०६ इतके आहे तर सर्वात कमी प्रमाण १८ ते २५ वर्षे या वयोगटातील घटकांचे असून ते शेकडा ४३.१० इतके आहे. तसेच भाषिक मुद्दा विचारात न

घेता मतदान करणाऱ्या घटकांचे शेकडा प्रमाण ३२ इतके आहे.

यावरून असे लक्षात येते की, सीमाभागात निवडणुकीवेळी मराठी भाषिक मतदान करताना भाषिक मुद्दा विचारात घेऊनच उमेदवाराला मतदान करतात. याचे एकूण शेकडा प्रमाण ६८ इतके आहे. याचे कारण भाषिक मुद्दयावरच महाराष्ट्र एकीकरण समितीने निवडणुका लढविल्या आणि जिंकल्याही आहेत.

## ४६. महाराष्ट्रात जाण्याची मानसिकता


गेली ५६ वर्षे सीमाप्रश्न भिजत पडलेला असताना आज सीमाभागातील मराठी भाषिकांची किती प्रमाणात महाराष्ट्रात जाण्याची मानसिकता आहे हे वय या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक ५.४६**

**महाराष्ट्रात जाण्याची मानसिकता**

| वयोगट | १८ ते २५ वर्षे | २६ ते ३५ वर्षे | ३६ ते ५० वर्षे | ५१ ते ६५ वर्षे | ६६ वर्षे ते पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ४७ (८१.०३) | ५३ (८२.८२) | ७६ (८८.३७) | ८८ (८९.७९) | ४१ (९३.१९) | ३०६ (८७.४२) |
| नाही | ११ (१८.९७) | ११ (१७.१८) | १० (११.६३) | १० (१०.२१) | ३ (६.८१) | ४४ (१२.५८) |
| एकूण | ५८ (१००) | ६४ (१००) | ८६ (१००) | ९८ (१००) | ४४ (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, गेली ५६ वर्षे सीमाप्रश्न सुटलेला नाही. सध्या हा प्रश्न न्यायालयात असून न्यायालयाचा निकाल लागल्यास महाराष्ट्रात जाण्याची मानसिकता ही सर्वाधिक वयोगट ६६ वर्षे ते पुढे या घटकांची असून त्याचे शेकडा प्रमाण ९३.१९ इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे ५१ ते ६५ व ३६ ते ५० वर्षे या वयोगटाचे प्रमाण असून ते शेकडा ८९.७९ व ८८.३७ इतके आहे. तर सर्वात कमी प्रमाण १८ ते २५ वर्षे या वयोगटातील घटकांचे असून ते शेकडा ८१.०३ इतके आहे. याचे कारण म्हणजे या वयोगटातील मुलांना शाळेत कन्नड सक्ती आहे. तसेच बेळगाव शहराशी संपर्क वाढल्याने त्यांना पुढील शिक्षणाच्या संधी उपलब्ध होत आहेत.

यावरून असे दिसून येते की, आजही सीमाप्रश्न सुटला तर महाराष्ट्रात जाण्याची मानसिकता सर्वात जास्त घटकांची असून त्याचे शेकडा प्रमाण ८७.४२ इतके आहे.

## ४७. पोलीस स्टेशनमध्ये भाषिक समस्या जाणवते का?


मराठी भाषिकांना भांडण–तंटे–बखेडे याबाबत पोलीस स्टेशनमध्ये भाषिक समस्या जाणवतात का? हे लिंग या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

### सारणी क्रमांक ५.४७

### पोलीस स्टेशनमध्ये भाषिक समस्या जाणवते का?

| लिंग | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| पुरुष | १५५ (७३.८०) | ५५ (२६.२०) | २१० (६०) |
| स्त्री | ८७ (६२.१४) | ५३ (३७.८६) | १४० (४०) |
| एकूण | २४२ (६९.१४) | १०८ (३०.८६) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात




वरील सारणीवरून असे दिसून येते की, पोलीस स्टेशनमध्ये मराठी भाषिकांना अनेक भाषिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्याचे प्रमाण पुरुषांच्या मते शेकडा ७३.८० इतके तर स्त्रियांच्या मते ६२.१४ इतके आहे. पोलीस तंटे, बखेडे, तक्रार इत्यादीच्यावेळी जबाब नोंदवून घेताना कन्नड भाषेतून बोलतात व कन्नड भाषेतून नोंद करतात. त्यामुळे मराठी भाषिकांना न्याय मिळत नाही. तसेच मराठी भाषिकांच्या सत्याग्रह, आंदोलने इत्यादीवेळी अनेक खोटेनाटे खटले पोलीसांनी दाखल केले आहेत.

एकंदरीत शेकडा ६९.१४ मराठी भाषिक लोकांना पोलीसी कामकाजामध्ये भाषिक समस्यांना सामोरे जावे लागते.

**४८. महसूल विभागात भाषिक समस्या जाणवतात का?**


सीमाभागातील मराठी भाषिकांना महसूलविषयक कामकाजामध्ये भाषिक समस्या जाणवतात का हे तालुका या निकषाच्या आधारे पुढील सारणीत मांडले आहे.

**सारणी क्रमांक ५.४८**

**महसूल विभागात भाषिक समस्या जाणवतात का?**

| तालुका | खानापूर | बेळगाव | चिक्कोडी | हुक्केरी | अथणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | १८१ (८६.२०) | ५१ (७२.८६) | २३ (५७.५०) | ११ (५५) | २ (२०) | २६८ (७६.५८) |
| नाही | २९ (१३.८०) | १९ (२७.१४) | १७ (४२.५०) | ९ (४५) | ८ (८०) | ८२ (२३.४२) |
| एकूण | २१० (१००) | ७० (१००) | ४० (१००) | २० (१००) | १० (१००) | ३५० (१००) |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात



वरील सारणीवरून असे दिसून येते की, महसूलविषयक कामकाजामध्ये अनेक प्रकारच्या भाषिक समस्यांना सामोरे जावे लागते. शेतीविषयक ७/१२, ८ अ, फेरफार नोंदी, बोजा नोंदी कन्नड भाषेतून असल्याने मराठी भाषिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. सीमाभागातील सर्वच तालुक्यातील मराठी भाषिकांना ही समस्या जाणवत असून त्याचे शेकडा प्रमाण खानापूर ८६.२०, बेळगाव ७२.८६, चिक्कोडी ५७.५०, हुक्केरी ५५ व अथणी २० असे असून एकूण सरासरी शेकडा प्रमाण ७६.५८ इतके आहे. तर महसूलविषयक कामकाजामध्ये भाषिक समस्या जाणवत नाहीत अशा घटकांचे एकूण शेकडा प्रमाण २३.४२ इतके आहे.

## ५.२ समारोप

वरीलप्रमाणे ''बेळगाव जिल्हयातील मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या'' या विषयाशी संबंधित घटकांकडून वस्तुनिष्ठ माहिती संकलित करून त्या माहितीचे वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय, तालुका व मासिक उत्पन्न या निकषांच्या आधारे वर्गीकरण करून त्याचे उभ्या–आडव्या कोष्टकात सारणीयन केले. त्यामुळे प्रत्येक निकषाची वस्तुनिष्ठ माहिती जाणून घेणे शक्य झाले. तसेच यातून ग्रामीण मराठी भाषिकांना भेडसावत असणाऱ्या सामाजिक समस्यांचा शोध घेणे सोपे झाले असून त्याआधारे वस्तुनिष्ठ निष्कर्ष व काही सूचना, शिफारशी करणे संशोधकाला शक्य झाले.

प्रकरण सहावे

# निष्कर्ष, सूचना व शिफारशी

## प्रकरण सहावे

# निष्कर्ष, सूचना व शिफारशी

६.१ प्रस्तावना

६.२ निष्कर्ष

६.३ सूचना व शिफारशी

## प्रकरण सहावे

# निष्कर्ष, सूचना व शिफारशी

## ६.१ प्रस्तावना

''बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या'' या विषयाचे संशोधन करण्यासाठी सीमाभागातील मराठी भाषिकांकडून मुलाखत अनुसूचीद्वारे माहिती संकलित केली. प्रकरण पाचमध्ये मुलाखत अनुसूचीद्वारे संकलित केलेल्या माहितीचे संख्याशास्त्रीयदृष्ट्या विश्लेषण केले आहे. त्यानुसार मराठी भाषिकांच्या समस्येसंदर्भात अनेक घटकांशी औपचारिक, अनौपचारिक चर्चा करून सीमालढ्याशी संबंधित नेत्यांच्या मुलाखती घेऊन त्याचबरोबर द्वितीय साधनसामग्रीच्या आधारे आणि सीमावर्ती भागामध्ये माहिती संकलनासाठी फिरत असताना प्राथमिक तंत्राद्वारे काही घटकांकडून माहिती संकलित केली आहे. या सर्वांद्वारे सीमाभागातील मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्येबाबत वस्तुनिष्ठपणे संशोधन केले असून त्याचे महत्त्वपूर्ण निष्कर्ष पुढीलप्रमाणे काढले आहेत.

## ६.२ निष्कर्ष

१. सीमाभागातील स्थानिक स्वराज्यसंस्था (महानगरपालिका, पंचायत समिती, ग्राम पंचायत इ.) यांनी महाराष्ट्रात जाण्याचे ठराव केले म्हणून संबंधित संस्था बरखास्त करण्याचे धोरण सरकारने आखून दोनवेळा बेळगाव महापालिका बरखास्त केली.

२. बेळगावच्या नामांतरास केंद्राने परवानगी दिलेली नसतानाही 'बेळगावी' असे नामांतर करून सरकारी कामकाजात 'बेळगावी' असा उल्लेख आहे.

३. कर्नाटक सरकारने बेळगावात विधानसौध बांधले आहे तेही दूरदृष्टीने एका बाजूला विधानसौधच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयामध्ये कर्नाटकची बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर मराठी लोकांच्यावरती वर्चस्व आणि त्यांची मानसिकता डळमळीत करण्याचा हा डाव आहे. पण त्याचबरोबर भविष्यात महाराष्ट्राच्या बाजूने निकाल लागला तर पंचाईत नको म्हणून सीमेबाहेर विधीमंडळ बांधले आहे.

४. सध्या कर्नाटकच्या विधानसौधमध्ये मराठी भाषिकांचे प्रतिनिधीत्व नसण्यामागे महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांमधील आणि गटांमधील वाद हा मराठी भाषिकांची मते विभागण्यास कारणीभूत ठरला आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीमध्ये गट–तट असल्याने या वादात पडून नुकसान करून घेण्यापेक्षा सत्तेचा मार्ग स्वीकारणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे.

५. कर्नाटकचे राजकीय पक्ष वेगवेगळी आमिषे, प्रलोभने दाखवून मराठी नेत्यांना व मराठी भाषिकांना आपलेसे करत आहेत.

६. सीमाभागातील मराठी भाषिकांचे आर्थिक, सांस्कृतिक खच्चीकरण करण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकारकडून केला जात आहे.

७. सीमाभागात मातृभाषा म्हणून मराठी भाषा बोलणाऱ्यांचे शेकडा प्रमाण ८५.४३ इतके आहे.

८. सीमाभागातील गावामध्ये मराठी भाषिकांचेच प्राबल्य असून शेकडा ९४ इतके मराठी भाषिक लोक सीमाभागात राहतात.

९. सीमाभागामध्ये सीमाप्रश्नासंदर्भात जनजागृतीचे काम अनेक वर्तमानपत्रे प्रभावीपणे करीत असून मेळावे, आंदोलने, साहित्य संमेलने कर्नाटक सरकारचे अन्यायी धोरण इ. बाबत मराठी वृत्तपत्रांनी वेळोवेळी ठळक प्रसिद्धी दिली आहे. त्यामध्ये दैनिक तरूण भारत हे सीमाभागाचे मुखपत्र म्हणून प्रसिद्ध आहे.

१०. नातेसंबंध जोडताना मराठी भाषिक आर्थिक स्थिती, व्यवसाय, शिक्षण, नोकरी इ. पेक्षा भाषेला अधिक महत्त्व देण्याचे प्रमाण शेकडा ८३.१४ इतके असून सीमावर्तीय मराठी भाषिक लोक चंदगड, गडहिंग्लज, आजरा व कागल या कोल्हापूर जिल्ह्यातील सीमालगत तालुक्यामध्ये आपले नातेसंबंध जोडण्यास महत्त्व देतात.

११. मराठी भाषिक लोक निमंत्रणपत्रिका (वास्तुशांती, वाढदिवस, मुंज, जत्रा, विवाह इ.) काढताना फक्त मराठी भाषेतूनच काढण्याचे प्रमाण शेकडा ९०.५७ इतके आहे. आणि या पत्रिकेवरती महाराष्ट्रीयन संस्कृतीची छाप असलेली जाणवते. गणपती, छ. शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचा वापर पत्रिकेवरती केला जातो.

१२. संशोधकाला असे आढळून आले की, सीमाभागातील मराठी भाषिक गावामध्ये छ. शिवाजी महाराजांची प्रतिमा तसेच घरामध्येही छोट्या आकाराच्या प्रतिमा असलेल्या दिसून आल्या. तसेच शिवजयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.

१३. सीमाभागातील लग्नकार्यातील विधी मराठी भाषेमध्ये करणाऱ्यांचे सरासरी शेकडा प्रमाण ८५.१५ इतके आहे.

१४. संशोधकाला असे निदर्शनास आले की, सीमाभागातील मराठी भाषिक गावामध्ये होणारे सार्वजनिक कार्यक्रम (गणपती, दसरा, दिवाळी, शिवजयंती, नवरात्र इ.) मध्ये मराठी भाषेचाच प्रभाव जास्त असून त्याचे शेकडा प्रमाण ९२ इतके आहे.

१५. गेली ५६ वर्षे कर्नाटकात डांबल्या गेलेल्या मराठी भाषिक लोकांना आजही महाराष्ट्रीयन संस्कृतीविषयी जवळीकता असून त्याचे शेकडा प्रमाण ८४.८६ इतके आहे.

१६. सीमाभागात दरवर्षी होणाऱ्या मराठी ग्रामीण साहित्य संमेलने विशेषत: उचगाव, येळ्ळूर, कुद्रेमनी, कडोली इ. मध्ये सहभागी होणाऱ्या मराठी भाषिकांचे एकूण शेकडा प्रमाण ५२.२८ इतके आहे.

१७. सीमाभागातील गावामध्ये जरी मराठी व कन्नड भाषेचे लोक राहात असले तरी गावच्या विकासासाठी दोन्ही भाषिक लोक भाषिक भेदभाव विसरून एकत्र येतात. यावरून सीमाभागात भाषिक संघर्ष नसून कर्नाटक सरकारच्या अन्यायी धोरणाला मराठी भाषिकांचा विरोध आहे हे दिसून येते.

१८. १९८६ च्या कन्नड सक्ती धोरणानुसार गावातील संस्थांमधील कागदपत्रे विशेषत: जन्म नोंद, मृत्यू नोंद, घरफाळा उतारे इ. कन्नड भाषेतूनच असून त्याचे शेकडा प्रमाण ९४.८५ इतके आहे. यावरून कर्नाटक सरकारचे भाषाविषयक धोरण किती अन्यायी आहे हे अधोरेखित होते.

१९. शेतीसंबंधित सर्व सरकारी कागदपत्रे कन्नड भाषेतूनच उपलब्ध असून वास्तविकरित्या सीमाभागातील लोकांची शेतीशी संबंधित मूळ कागदपत्रे मराठी भाषेत असतानाही कर्नाटक सरकारने मूळ मराठी भाषेतील कागदपत्रांचे कानडीत रूपांतर केले आहे. रूपांतर करताना त्यामध्ये अनेक चुका झाल्या. त्या मराठी भाषिकांना अवगत झाल्या नाहीत. पर्यायाने त्यातून अनेक वाद, संघर्ष, न्यायालयीन बाबी निर्माण झाल्या. काहीवेळा जमिनीचे व्यवहार करतानाही भाषिक समस्येमुळे फसवणुकीचे प्रकार घडल्याचे दिसून आले.

२०. सीमाप्रश्नासंदर्भात निघणारे मोर्चे, निदर्शने, हरताळ, आंदोलने इ. मध्ये मराठी भाषिकांचा सहभाग हा सर्वच वयोगटातील लोकांचा असून त्याचे प्रमाण शेकडा ७८.२८ इतके असून त्यामध्ये सर्वाधिक प्रमाण वयोगट ५१ वर्षावरील लोकांचे आहे.

२१. सीमाभागातील सर्वच गावामध्ये वारकरी संप्रदाय असून दरवर्षी हे भाविक आषाढी, कार्तिकी, प्रबोधिनी एकादशी इ. एकादशीला पंढरपूरला विठूरायाच्या दर्शनासाठी जातात. तसेच भजन, कीर्तन, पारायण इ. वारकरी संप्रदाय मराठी भाषेतूनच पार पाडले जातात.

२२. कर्नाटक सरकारच्या कन्नड सक्ती धोरणाचा परिपाक म्हणजे सर्वच मराठी भाषिक गावामध्ये कन्नड माध्यमाच्या शाळा काढल्या जात आहेत. सुरूवातीला फक्त मराठी शाळा असणाऱ्या गावामध्ये आज कन्नड शाळा असून त्याचे सरासरी शेकडा प्रमाण ५९.४२ आहे.

२३. सीमाभागातील मराठी भाषिक आपल्या मुलांना आजही मराठी माध्यमाचे शिक्षण देणाऱ्यांचे प्रमाण शेकडा ८२.२८ इतके आहे तर इंग्रजी शिक्षण घेण्याचा प्रभाव ग्रामीण भागात दिसून येत असून त्याचे शेकडा प्रमाण ११.४४ इतके आहे तर कन्नड माध्यमांच्या शाळांमुळे शेकडा ६.२८ कन्नड भाषिक शिक्षण घेत आहेत.

२४. कर्नाटक सरकार मराठी माध्यमाचे शिक्षण घेणाऱ्या मुलांना मिळणाऱ्या शैक्षणिक सोयी सवलतीबाबत दुर्लक्ष करते.

२५. सीमाभागात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींचे सरासरी प्रमाण शेकडा ३२.५१ इतके असून त्याला प्रामुख्याने कर्नाटकमध्ये उच्च शिक्षणाच्या वाढलेल्या फी, कन्नडसक्तीचे धोरण, इंग्रजी भाषेतील शिक्षण, वाहतूक, दळणवळणाच्या सुविधांचा अभाव या बाबी कारणीभूत आहेत.

२६. सीमाभागातील मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये कर्नाटक सरकार जाणीवपूर्वक पुरेशा शिक्षकवर्गाची नेमणूक करत नाही.

२७. मराठी माध्यमाच्या पाठ्यपुस्तकामध्ये महाराष्ट्रीयन संस्कृतीची पुरेशी ओळख जाणीवपूर्वक कर्नाटक सरकारने समाविष्ट केलेली नाही.

२८. मराठी माध्यमाच्या शाळेच्या इमारत बांधकाम, दुरूस्ती, परिसर स्वच्छता इ. बाबत कर्नाटक सरकारचा दृष्टिकोन नकारात्मक आहे.

२९. सीमाभागात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये भाषिक मुद्दयाला प्राधान्य दिले जाते. विशेषत: महाराष्ट्र एकीकरण समितीसारखी संघटना फक्त भाषिक मुद्दयावरती निवडणुका लढविते.

३०. कर्नाटकमध्ये काँग्रेस, भाजपा, निधर्मी जनता दल इ. सर्वच राजकीय पक्ष सीमालढ्याला विरोध करतात. पण निवडणुकीवेळी आपल्या पक्षाचा प्रचार मराठी भाषेतच करतात व मराठी भाषिकांची मते मिळविण्यासाठी उमेदवारी देत असताना भाषिक मुद्दा विचारात घेतात.

३१. सीमाभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मराठी भाषिकांचे प्राबल्य असून त्याचे शेकडा प्रमाण ९०.५७ इतके आहे.

३२. सीमाभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मराठी भाषिकांचे प्राबल्य असल्यामुळे कर्नाटक सरकारचा स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक आहे. त्याचा परिणाम बहुसंख्य मराठी भाषिक गावांचा विकास खुंटला आहे.

३३. सीमाभागातील मराठी भाषिकांचे आजही महाराष्ट्रामध्ये जाण्याच्या मानसिकतेचे शेकडा प्रमाण ८७.४२ इतके आहे.

३४. पोलीस, कोर्टकचेरीच्या कामकाजामध्ये मराठी भाषिकांना कन्नड भाषा अवगत नसल्याने अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

३५. मराठी भाषिकांना महसूलविषयक कामकाजामध्ये ७/१२, ८ अ, फेरफार, बोजा नोंद, खरेदी–विक्री व्यवहार इ. बाबींमध्ये कन्नड भाषा अवगत नसल्याने अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

३६. सीमाप्रश्नासंदर्भातील आंदोलने, सत्याग्रह, मोर्चे, उपोषण इ. वेळी मराठी भाषिक लोकांना कर्नाटक पोलीस जाणीवपूर्वक वेगवेगळ्या कलमांतर्गत खोट्या तक्रारी दाखल करून त्रास देतात.

३७. मराठी भाषेतून शिक्षण घेतल्यामुळे सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांना शासकीय नोकरीत स्थान नाही. त्यामुळे सीमाभागात बेकारीची समस्या निर्माण झाली आहे.

३८. सीमाभागातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांना कर्नाटक शिक्षण संस्था जाणीवपूर्वक नापास करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना अर्धवट शिक्षण सोडून टेलर, गवंडीकाम, फरशी फिटींग, इलेक्ट्रीक, रिक्षा ड्रायव्हर इ. दुय्यम प्रतीच्या व्यवसायाकडे वळावे लागत आहे.

३९. सीमाभागातील मराठी युवकांना दुय्यम प्रतीचे व्यवसाय करावे लागत असल्याने त्यांच्यामध्ये मद्यपान, जुगार, मटका इ. व्यसनांच्या सवयी जडलेल्या दिसून येतात.

## ६.३ सूचना व शिफारशी

''बेळगाव जिल्ह्यातील ग्रामीण मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या'' या विषयावर वैज्ञानिक पद्धतीने संशोधन करून वस्तुनिष्ठ निष्कर्ष संशोधकाने काढले आहेत. त्यासाठी प्राथमिक आणि द्वितीय साधनसामग्रीचा अवलंब करून खरीखुरी माहिती वेगवेगळ्या घटकांकडून संकलित केली. त्या माहितीचे विविध निकषांच्या आधारे वर्गीकरण करून संख्याशास्त्रीयदृष्ट्या त्याची विविध

सारणीमध्ये मांडणी करून त्या सारणींचे विश्लेषण केले आणि त्याआधारे वास्तव असे निष्कर्ष मांडले. तरीपण एक संशोधक म्हणून या विषयावर अभ्यास केल्यानंतर काही सूचना व शिफारशी कराव्या वाटल्या त्या पुढीलप्रमाणे –

१. महाराष्ट्रामध्ये शिक्षणासाठी येऊ इच्छिणाऱ्या सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांना स्थलांतर दाखल्याची (मायग्रेशन सर्टिफिकेटची) असलेली अट रद्द करावी.

२. शैक्षणिक संस्थांमधील, गाड्यांवरील फलक हे मराठी व कन्नड अशा दोन्ही भाषेतून असावेत..

३. महसूल विभागातील सर्व कागदपत्रे मराठी व कन्नड भाषेतून असावीत.

४. महाराष्ट्र सरकारच्यावतीने सीमाभागातील मराठी भाषिक तरूण मंडळे, वाचनालये, शैक्षणिक संस्था यांना भरीव आर्थिक मदत देण्यात यावी.

५. सीमाभागातील मराठी ग्रामीण साहित्य संमेलनांना महाराष्ट्र सरकारकडून भरीव आर्थिक मदत करण्यात यावी. जेणेकरून ग्रामीण साहित्य संमेलनांना चालना मिळून मराठी भाषा व संस्कृतीचे संवर्धन होईल..

६. सीमाभागातील मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने सीमाभागासाठी मंत्रालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करून त्याचा प्रमुख आय. ए. एस. दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करून सीमाभागातील समस्यांचे निराकरण करावे..

७. सीमाप्रश्नाचा निकाल लागेपर्यंत सीमाभाग भाग केंद्रशासित करावा.

८. सीमाभागातील दर्जेदार मराठी खेळाडूंना महाराष्ट्र व कर्नाटक सरकारकडून आर्थिक मदत करण्यात यावी.

९. कर्नाटक सरकारने मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पुरेसा शिक्षकवर्ग नेमावा.

१०. महाराष्ट्र सरकारने व महाराष्ट्र एकीकरण समितीने सीमालढयासंदर्भात अद्ययावत माहिती देणारे संकेतस्थळ (Website) सुरू करावे. ज्यामुळे सीमालढ्याचा इतिहास, मराठी भाषिकांची गळचेपी व त्यांचा लढा इ. बाबतची परिपूर्ण माहिती मराठी, कन्नड व इंग्रजी भाषेतून दिल्यास राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरून सीमालढ्याला पाठबळ मिळेल.

११. मराठी भाषिकांवरती होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी राष्ट्रीय व राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे तक्रार करण्यासाठी स्वतंत्र कक्षामार्फत प्रयत्न करावेत.

१२. सीमाप्रश्नावर आधारित महाराष्ट्र सरकारने माहितीपट काढावा.

१३. महाराष्ट्र सरकारने इयत्ता १० वी पर्यंतच्या क्रमिक पाठ्यपुस्तकांमध्ये सीमालढ्यावरील लेख, पाठ, कविता सामील कराव्यात. जेणेकरून नवीन पिढीला ही माहिती होण्यास मदत होईल.

१४. कर्नाटक सरकारने इयत्ता १० वी पर्यंतच्या क्रमिक पाठ्यपुस्तकांमध्ये महाराष्ट्रीय भाषा, संस्कृतीविषयीच्या अभ्यासक्रमाचा समावेश करावा.

१५. मराठी साहित्यिकांनी सीमालढ्यावर कथा, लेख, कादंबऱ्या, कविता, नाटक लिहून समाजजागृतीचे काम करावे. जेणेकरून सीमाग्रस्त भागाकडे प्रसारमाध्यमांचा आणि प्रशासनाचा दृष्टिक्षेप बदलण्यास मदत होईल.

१६. कर्नाटक सरकारने मराठी भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचे व अधिकारांचे भारतीय राज्यघटनेतील तरतुदीप्रमाणे रक्षण करावे.

१७. कर्नाटक सरकारने सीमाभागातील गावामध्ये वीज, पाणी, रस्ते इ. विकासात्मक योजना राबवाव्यात.

१८. मराठी माध्यमाच्या शाळा बांधकाम, दुरूस्ती याकडे कर्नाटक सरकारने सकारात्मक दृष्टीने पहावे.

१९. मराठी भाषिक म्हणून कर्नाटक पोलीसांनी ज्या खोट्या केसेस दाखल केलेल्या आहेत त्या काढून घ्याव्यात. तसेच पोलीसांकडून भाषिक दृष्टीकोनातून होणारा छळ थांबवावा..

२०. कर्नाटक सरकार व विकास प्राधिकरणांकडून (बुडा, केआयडीबी) मराठी भाषिकांच्या जमिनी जबरदस्तीने संपादन करण्यात येऊ नयेत.

२१. सीमालढ्यातील गोळीबाबरात जखमी झालेल्या मराठी भाषिकांना महाराष्ट्र सरकारकडून आर्थिक मदत मिळावी. तसेच हुतात्म्यांच्या वारसांना भरीव स्वरूपाची मदत देण्यात यावी.

२२. सीमाभागातील मराठी भाषिकांच्या सामाजिक समस्यांचे निराकरण होण्यासाठी कर्नाटक सरकारने सीमाभागात छोटे–मोठे उद्योग, व्यवसाय उभा करावेत.

२३. पोस्ट, रेल्वे, बँका, विमा इ. केंद्रीय कार्यालयातील कागदपत्रांची भाषा मराठी व कन्नड असावी.

# संदर्भ ग्रंथसूची

# संदर्भ ग्रंथ सूची

## अ) मराठी संदर्भ ग्रंथ


१. अत्रे, प्रल्हाद केशव, झालाच पाहिजे, मुंबई, द्वितीयावृत्ती, १५ ऑगस्ट २००८

२. अत्रे आचार्य (आत्मवृत्त), कऱ्हेचे पाणी, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, सातवी आवृत्ती, १ एप्रिल २००९

३. आगलावे प्रदीप, भारतीय समाज : संरचना व परिवर्तन, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, २००८

४. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, २०१०

५. आगलावे प्रदीप, भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१०

६. आंबेडकर बाबासाहेब यांचे भाषावार प्रांतरचनेवर विचार, रघुवंशी प्रकाशन, पुणे,

७. कऱ्हाडे, बी. एम., शास्त्रीय संशोधन पद्धती व सांख्यिकी, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती, जुलै, २००७

८. कऱ्हाडे, बी. एम., सामाजिक संशोधन पद्धती, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती, जून २००९

९. कायंदे–पाटील, गंगाधर वि., संशोधन पद्धती, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, चतुर्थ आवृत्ती, २५ डिसेंबर २००८

१०. कायंदे–पाटील, गंगाधर, वि., शेतीचे अर्थशास्त्र, कृषी अर्थशास्त्र, शेतीचे अर्थशास्त्र : सिद्धांत आणि धोरण, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, ५ जानेवारी २००७

११. काळे, वि. र., आचार्य अत्रे, महाराष्ट्राचे बलदंड व्यक्तिमत्त्व, वसंत बुक स्टॉल, मुंबई, पहिली आवृत्ती, २८ जानेवारी २००९

१२. काळे खंडेरावजी, भारतीय समाज : संरचना आणि परिवर्तन, संस्कार प्रकाशन, प्रिंट–मॅफ बि. फॉर्म प्रा. लि., लातूर, प्रथमावृत्ती, २००५

१३. कुलकर्णी भीमराव (संपादक), अस्मिता महाराष्ट्राची, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९७१

१४. के सागर, अस्सा हा महाराष्ट्र २००९, के सागर पब्लिकेशन्स, पुणे, नववी आवृत्ती, ऑगस्ट २००८

१५. कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, शशिकांत पिंपळापुरे, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, जून २००९

१६. खैरनार, दिलीप, प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी २००९

१७. खांदवे एकनाथ, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, आरती प्रकाशन, कर्जत, जि. अहमदनगर, दुसरी आवृत्ती, २२ सप्टेंबर २०१०

१८. खतीब, के. ए., महाराष्ट्राचा भूगोल, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, सुधारीत चौथी आवृत्ती २०१०

१९. गजेंद्रगड, व्ही. एन., भारतीय समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, सप्टेंबर १९९३

२०. गंदेवार, एस. एन., भारतीय समाज वादातीत विषय आणि समस्या, विद्याभारती प्रकाशन, लातूर

२१. गाबा, ओ. पी., (मूळ लेखक) जाधव तुकाराम (मराठी अनुवाद), ॲन इन्ट्रडक्शन टू पोलिटिकल थिअरी, राजनितीशास्त्र परिषद, के सागर पब्लिकेशन्स, पुणे, पहिली आवृत्ती, २०१०

२२. गोऱ्हे नीलम, शिवधनुष्य, क्रांतिकारी प्रकाशन प्रा. लि., नवी मुंबई, प्रथम आवृत्ती, जुलै २००६

२३. गोऱ्हे नीलम, विधान परिषद व माझे कामकाज, पद्मा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २६ जानेवारी २००८

२४. चंद्र सतिश (मूळ लेखक) पारधी, मा. ह., देशपांडे, व. तु., मार्डीकर, म. मो. (अनुवादक) , मध्ययुगीन भारत, के सागर पब्लिकेशन्स, पुणे, दुसरी आवृत्ती, २०१०

२५. चावरे दिलीप, महाराष्ट्राचा लेखाजोखा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, ९ ऑगस्ट २००९

२६. चौगुले, एल. आर., असा लढा असे लढवय्ये, राज्ञी प्रकाशन, टिळकवाडी–बेळगाव, २७/४/२०००

२७. जैन अशोक, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शेट्टी प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर १९९८

२८. जाधव तुकाराम (संपादक), वार्षिकी २०११ महाराष्ट्र 'द युनिक ॲकॅडमी', पुणे, २०११

२९. जोशी–पाटील मंजुषा, पाटील संभाजी, महाराष्ट्रातील राजकीय व्यक्तिमत्त्वे, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी २०१०

३०. जोशी, बी. आर., सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांतांचा कोश – राज्यशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, जानेवारी २००७

३१. जोशी, एस. एम., सीमा सत्याग्रह आणि राष्ट्रीय एकात्मता, साधना प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १ ऑगस्ट १९८६

३२. जोशी पं. महादेवशास्त्री, 'कर्नाटक' ज्ञानराज प्रकाशन, पुणे

३३. जिल्हा पंचायत बेळगाव, बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या २०१०–११, बेळगाव जिल्हा संख्या संग्रहन अधिकारी, जिल्हा पंचायत बेळगाव

३४. झामरे, जी. एन., भारतीय अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर २०१०

३५. दर्डा राजेंद्र, गव्हाणे सुधीर, पाटील प्रताप, भंडारे यशवंत (संपादक) , सहकारी साखर उद्योगाची ४ दशके, जयदत्त प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, जानेवारी १९९६

३६. देवरे, पी. डी., विसपूते, एस. एम., निकुंभ, डी. एस., भारतीय लोकशाही गणराज्य, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१०

३७. ठाकूर योगेंद्र, शिवसेना – समज गैरसमज, आमोद प्रकाशन, बोरिवली (पू) मुंबई, नवीन आवृत्ती, ११ नोव्हेंबर २०११

३८. नांदेडकर, व. गो., भारतीय राज्यघटना आणि राज्यव्यवहार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, सप्टेंबर २०११

३९. पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास (संपादक) , सत्तासंघर्ष, समकालिन प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, ६ डिसेंबर २००७

४०. प्रधान, ग. प्र., भारतीय राजकारणाचे दोन पैलू लोकशाही आणि समाजवाद, साधना प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २ ऑक्टोबर २००८

४१. पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मयगृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, ५ मे २०१०

४२. पै, नाथ, लोकशाहीची आराधना, साधना प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १८ जानेवारी १९९६

४३. पाटील, आर. आर., उज्ज्वल महाराष्ट्रासाठी, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, ऑक्टोबर २००८

४४. पाटील, बी. बी., महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २०११

४५. पाटील, एस. वाय. (संपादक), ॲड. व्ही. एस. पाटील – व्यक्ती आणि कार्य, भाई व्ही. एस. पाटील जन्मशताब्दी समिती, बेळगाव, पहिली आवृत्ती, ९ ऑगस्ट २००३

४६. पाटील, व्ही. बी., महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, 'के'सागर पब्लिकेशन्स, पुणे, दुसरी आवृत्ती, २००६

४७. फडके, य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड पाचवा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १५ एप्रिल १९९७

४८. फडके, य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सहावा १९४८–१९६०, मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई, पहिली आवृत्ती, १८ जून २००७

४९. फडके, य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड आठवा संयुक्त महाराष्ट्र समितीचा उदय आणि अस्त : १९५६–१९६३, मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई, पहिली आवृत्ती, १८ जून २००७

५०. फडके, य. दि., अध्यक्षीय भाषण, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, ७३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बेळगाव, २८ एप्रिल २०००

५१. फडके, य. दि., श्री. केशवराव जेधे, श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १२ नोव्हेंबर १९८२

५२. बाचल, वि. मा., गोळवलकर, स. म., वराडकर, र. घ., क्षीरसागर, व्ही. एस. (संपादक) , भारतीय राजकीय विचारवंत, अनिरूद्ध पब्लिशिंग हाऊस, पुणे, तिसरी आवृत्ती, २००९

५३. बोधनकर सुधीर व अलोणी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, चतुर्थ आवृत्ती, जानेवारी २००७

५४. भोसले, द. ता., लोकसंस्कृती : बंध–अनुबंध, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १ जानेवारी २०१०

५५. बेळगाव सहकार दर्शन, मराठी शब्द सोहळा, दिवाळी विशेषांक, बेळगाव

५६. भांडारकर, पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, वसंत पिंपळापुरे, विद्या बुक्स, औरंगपूरा, औरंगाबाद, चौथी आवृत्ती, १९९९

५७. भारताचे संविधान, भारत सरकार विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय, (७ जानेवारी २००४ पर्यंत फेरबदल केल्याप्रमाणे) , कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, सहावी आवृत्ती , २००६

५८. मठकर जयानंद, महाराष्ट्राचे शिल्पकार बॅ. नाथ पै, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, दादर, मुंबई, द्वितीय आवृत्ती, सप्टेंबर २००८

५९. महाराव ज्ञानेश, उठावा महाराष्ट्र देश, पुष्प प्रकाशन लि., पुणे, प्रथमावृत्ती, १ नोव्हेंबर २००१

६०. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र–म्हैसूर–केरळ सीमावाद आयोगास सादर केलेले महाराष्ट्र–म्हैसूर सीमावादविषयक निवेदन, १९६७, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

६१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मकसी–१००७/प्र.क्र.३६/ फा.३६, मंत्रालय, मुंबई, ११ जुलै २००८

६२. मांगले महेश, लढा संयुक्त महाराष्ट्राचा, सौ. श्रीयोगी महेश मांगले, पुणे, प्रथमावृत्ती, २००३ .

६३. मेणसे कृष्णा, असा घडलो असा लढलो, लोकवाङ्मयगृह, मुंबई, पहिली आवृत्ती, १९ ऑक्टोबर २००३

६४. मेहता, जे. एल. (मूळ लेखक) देशपांडे, व. तु. (अनुवादक) , मध्ययुगीन भारताचा बृहत् इतिहास, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, दुसरी आवृत्ती, २ ऑक्टोबर २००७

६५. मेहंदळे विश्वास, यशवंतराव ते अशोकराव, अनुबंध प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, ३० ऑक्टोबर २०१०

६६. मेहंदळे विश्वास, आपले पंतप्रधान, अनुबंध प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, दि. ३/९/२००८

६७. तोरो, अ. रा. (संपादक), महाराष्ट्र–कर्नाटक सांस्कृतिक अनुबंध, अरूण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २६ ऑक्टोबर २००१

६८. देव, शं. दा. (प्रकाशक), संयुक्त महाराष्ट्राची माहिती, संयुक्त महाराष्ट्र परिषद प्रकाशन, १९४८

६९. वाघ रामनाथ, युगप्रवर्तक यशवंतराव, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर, प्रथमावृत्ती, मे २००७

७०. देशपांडे मीना, हुतात्मा, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे(प.), प्रथमावृत्ती, महाराष्ट्र दिन, १ मे २०१० सुवर्णमहोत्सवी वर्ष

७१. देशपांडे, वसंत वासुदेव, महाराष्ट्राची सुवर्णगाथा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, २८ फेब्रुवारी २०११

७२. दीक्षित दुर्गा, महाराष्ट्र संस्कृतिकोष, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, ३ जुलै, २००९

७३. दर्डा राजेंद्र, गव्हाणे सुधीर, पाटील प्रताप, भंडारे यशवंत, सहकारी साखर उद्योगाची चार दशके, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, जानेवारी १९९६

७४. धुरी नीलम, संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, २००८

७५. नाडगोंडे गुरूनाथ, सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, तिसरी आवृत्ती, सप्टेंबर २००९

७६. राऊत गणेश व राऊत ज्योती, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, इ. स. १८१८ ते १९६०, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, चौथी आवृत्ती, डिसेंबर २००९

७७. राजहंस, बा. ण., संयुक्त महाराष्ट्र राष्ट्रीय ऐक्य आणि लोकशाही, चिटणीस प्रजा सोशॉलिस्ट पार्टी, महाराष्ट्र, प्रथमावृत्ती, १९५८

७८. राठी शुभांगी, महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय विकास, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगपूरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९८

७९. लेले, रा. के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००४

८०. वाघमारे, जनार्दन, आजचे शिक्षण : स्वप्न आणि वास्तव, सुरेश एजन्सी, पुणे–२, पहिली आवृत्ती, २६ जानेवारी १९९३

८१. संत, दु. का., संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग, पुणे विद्यार्थीगृह प्रकाशनासाठी, पुणे, द्वितीयावृत्ती, जुलै, १९८८

८२. सराफ, रा. सी., भाषा, मातृभाषा आणि परभाषा, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७२

८३. सहस्त्रबुद्धे, पु. ग., महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००३

८४. सोनवणे मनोहर, कात्रीतलं बेळगाव, www.uniquefeatures.com.in

८५. साठे, मधुसुदन, भारताच्या आर्थिक समस्या, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २००८

८६. साने रविकिरण, लढा संयुक्त महाराष्ट्राचा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर २००९

८७. हावळ पियुष, it.it.facebook.com.2012

## ब) इंग्रजी संदर्भ ग्रंथ

1. Apte Ram, Maharashtra-Karnataka Border Dispute, Kiran Thakur Working President, M. E.S, Belgaum City Unit, Belgaum, 2 October 2010

2. Bajpai, S. R., Methods of Social Survey & Research, Kitab Ghar, Kanpur, Seventh Edition, 1976

3. Bhandare, Vasant R., Maharashtra-Karnataka Border Dispute Politics of Manipulation, Kirti Prakashan, Sion, Bombay

4. Good, V. J. & Hatt, P. K. , Methods in Social Research, Surjeet Publications, Delhi, Third Revised Edition, 2002

5. Gupta, D. C., Indian National Movement & Constitutional Development, Vikas Publishing House Pvt. Ltd., New Delhi, Third Edition, 1976

६. Government of India, India 2009, A Reference Journal compiled by Research, Reference & Training Division, Ministry of Information & Boradcasting, Government of India

७. Hansraj, Theory & Practice in Social Research, Surjeet Publications, Delhi, Third Revised Edition, 2002

८. Kamath, Suryanath U., Gazzetter of India, Karnataka State, Belgaum District, Government of Karnataka Publication, 1987

9. Shriniwas, M. N., India : Social Structure, Hindustan Publishing Corporation, New Delhi

10. Young, P. V., Scientific Social Survey & Research, Prentice Hall of India Private Limited, New Delhi, 1973

**क) वृत्तपत्रे**

१. दैनिक तरूण भारत, बेळगाव

२. दैनिक सकाळ, बेळगाव

३. दैनिक पुढारी, बेळगाव

४. दैनिक लोकमत, कोल्हापूर

५. दैनिक लोकसत्ता, मुंबई

६. पुण्यनगरी, कोल्हापूर

## ड) माहितीपुस्तिका

१. बेळगाव सहकार दर्शन, मराठी शब्द सोहळा, १० वा वर्धापन दिन, दिवाळी विशेषांक

२. यह कहानी नहीं हकीकत है, महाराष्ट्र–कर्नाटक सीमा विवाद, सूचना एवं जनसम्पर्क महासंचालनायल, महाराष्ट्र शासन, जुलाई १९८६

३. भरारी – बदलत्या विश्वातील विज्ञान आणि तंत्रज्ञान, २९ वे कोल्हापूर जिल्हा विज्ञान प्रदर्शन स्मरणिका, ६, ७ व ८ जानेवारी २००४

४. एक किरण एक जीवन... जेष्ठ संपादक संकल्पक श्री. किरण ठाकूर

५. माजी आमदार श्री. व्ही. वाय. चव्हाण अमृतमहोत्सव गौरव विशेषांक

६. बेळगाव जिल्ह्याची लोकसंख्या–२०१०–११

७. बेळगाव जिल्हा संख्या संग्रहन अधिकारी, जिल्हा पंचायत बेळगाव

८. वेणुनाद, स्मरणिका, ४३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बेळगाव, २८ एप्रिल २०००

## इ) नियतकालिक

१. लोकराज्य (मासिक)

२. साधना (साप्ताहिक)

3. प्रबोधन प्रकाशन ज्योती (मासिक)

४. महाराष्ट्र साहित्य पत्रिका (त्रैमासिक)

५. संग्राम (मासिक)

## ई) अप्रकाशित एम. फिल. आणि पीएच. डी. प्रबंध


१. काळे रंगनाथ बाळासाहेब, ''संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सोलापूरचा सहभाग'' शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, एम. फिल. (राज्यशास्त्र) पदवीसाठी सादर केलेला लघुप्रबंध, १९९१

२. खापरे कन्याप्पा शिवाप्पा, ''लोकशाही समाजवादाचे राजकारण – श्री. एस. एम. जोशींच्या जीवन आणि कार्याचा चिकित्सक अभ्यास'', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पीएच. डी. (राज्यशास्त्र) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, २००२

३. पाटील विष्णू राणबा, ''राष्ट्रवीर वृत्तपत्राचे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील जनजागृतीचे कार्य (सन १९२१ ते १९७७)'', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पीएच. डी. (इतिहास) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, २०११

४. नेसरकर मनिषा सुबराव, ''कन्नड–मराठी सांस्कृतिक अनुबंधाच्या अनुषंगाने सीमाभागातील मराठी साहित्याचा अभ्यास'', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पीएच. डी. (मराठी) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, २००७

५. जोशी मनोहर ग., ''शिवसेनेची निर्मिती, वाढ, स्वरूप, यशापयश आणि भारतीय राजकारणातील शिवसेनेचे भवितव्य यांचा विश्लेषणात्मक अभ्यास'', मुंबई विद्यापीठ, मुंबई, पीएच. डी. (राज्यशास्त्र) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, २०११

६. Kulkarni R. R., "Administrative Problems of Reorganized Karnataka State", Ph. D. Thesis in Political Science in Dharwad University, Dharwad, 1977

## उ) संकेतस्थळ


1. website divyamarathi.com

2. website-minority group - wikipedia, the free encyclopedia

३. www.advantagekarnataka.com

४. www.belgaum.nic.in

5. www.belgaum.wikipedia

6. mpsc-iod.blogspot.com/2011/12

७. http://satarkar.wordpress.com भाषावार प्रांतरचनेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाग–३

# परिशिष्टे

# परिशिष्ट – १

## महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक

**महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवरील नियुक्तीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १० जुलै २००८**

**<u>परिपत्रक</u>**

महाराष्ट्र- कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नियुक्ती देण्यासंदर्भात सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-३०९ खालील परंतुका अन्वये प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार तयार करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमांच्या प्रारुपामध्ये महाराष्ट्र राज्यात किमान वास्तव्याची अट अंतर्भूत करण्यात आलेली नाही. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून देण्यात येणाऱ्या जाहिरातीमध्येही अशा प्रकारची अट विहित केलेली नसते. त्यामुळे महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना संबंधित पदांच्या सेवा भरती नियमातील सर्व अटींची पूर्तता ते करीत असल्यास, त्यांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नियुक्तीसाठी अर्ज करण्यास व त्यांची गुणानुक्रमे निवड होत असल्यास महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नेमणूकीस ते पात्र रहातील. सदर उमेदवारांनी सेवा प्रवेश नियमातील इतर सर्व अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

२. ज्या पदांच्या सेवा प्रवेश नियमामध्ये महाराष्ट्रात सतत १५ वर्षे वास्तव्याची अट विहित करण्यात आली असेल त्या पदांसाठी अर्ज करतांना त्यांचे महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्य आहे किंवा नाही या अटींची छाननी करतांना त्यांचे सदर ८६५ गावातील १५ वर्षाचे वास्तव्य विचारात घेण्यात यावे. त्यासाठी संबंधित मराठी भाषिक उमेदवारांनी ते महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या ८६५ गावातीलच रहिवासी असल्याबाबतचा त्यांच्या वास्तव्याचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

(कृ.मा.प.)

ROTA /H-1248(500-7-2008)-1

३. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या ८६५ गावांची यादी सोबत जोडली आहे.

४. सदर परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग सेवा उप विभाग कार्यासन-१२ यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००८०७१०१२३३०३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( प्र.मा.माळवदकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
सर्व आयुक्त, महानगर पालिका,
सर्व मुख्य अधिकारी, नगर पालिका,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई / औरंगाबाद,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
सर्व शासकीय महामंडळे / उपक्रम,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र - १, मुंबई
सहसंचालक, लेखा व कोषागारे (संगणक शाखा), मुंबई
सर्व निवासी उप जिल्हाधिकारी,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
निवड नस्ती.

H-1248 -1a

**महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवरील नियुक्तीबाबतचे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६, दिनांक १० जुलै, २००८ सोबतची ८६५ गावांची यादी.**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र - कर्नाटक सीमावर्ती क्षेत्रातील हक्क सांगितलेल्या**
**<u>कर्नाटक राज्यातील 865 गावांची यादी</u>**

| अ.क्र. 1. | जिल्हा 2. | तालुका 3. | | गावांची संख्या 4. | एकूण गावांची संख्या 5. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **बेळगाव** | अथणी | Athni | 9 | |
| 2 | | बेळगांव | Belgaum | 100 | |
| 3 | | खानापूर | Khanapur | 206 | |
| 4 | | चिकोडी | Chikodi | 48 | |
| 5 | | हुक्केरी | Hukkeri | 22 | |
| **एकूण** | | **5** | | | **385** |
| | | | | | |
| 1 | **कारवार** | कारवार तालुका | Karwar Taluka | 50 | |
| 2 | | सुपा | Supa | 126 | |
| 3 | | हल्याळ | Halyal | 123 | |
| **एकूण** | | **3** | | | **299** |
| | | | | | |
| 1 | **बिदर** | संतपूर (औराद) | Santpur (Aurad) | 81 | |
| 2 | | भालकी Bhalki (55) + | बसवकल्याण Basavkalyan (8) | 63 | |
| 3 | | हुमनाबाद तालुका | Humnabad Taluka | 30 | |
| 4 | | आळंद | Aland | 7 | |
| **एकूण** | | **4** | | | **181** |
| | | | | | **865** |

जिल्हा :- वेळगांव
तालुका :- अथणी

| अ.क्र. | गावांचे नांव (मराठी) | गावांचे नांव (इंग्रजी) | अ.क्र. | गावांचे नांव (मराठी) | गावांचे नांव (इंग्रजी) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | लोकूर | Lokur | 6 | वामनाल | Bamnal |
| 2 | मंगसुली | Mangsuli | 7 | जंबगी | Jambagi |
| 3 | शिरुर | Shirur | 8 | अरलीहट्टी | Arlihatti |
| 4 | पांडेगाव | Pandegaon | 9 | उगारखुर्द | Ugar Kd |
| 5 | संबार्गी | Sambargi | एकूण | 9 | 9 |

जिल्हा :- वेळगांव
तालुका :- वेळगांव

| अ.क्र. | गावांचे नांव (मराठी) | गावांचे नांव (इंग्रजी) | अ.क्र. | गावांचे नांव (मराठी) | गावांचे नांव (इंग्रजी) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वेळगाव (ग्रामीण) खेडे जुणे | Belgaom ( Rural) | 51 | वोकनूर | Boknur |
| 2 | माधवपूर | Madhavpur | 52 | मंडोळी | Manboli |
| 3 | अनगोळ | Angol | 53 | वेलमुंदी | Belmundi |
| 4 | यल्लूर | Yallur | 54 | सोनोली | Sonoli |
| 5 | वडगांव | Wadgaon | 55 | येळेबैल | Yalebail |
| 6 | हालगा | Halaga | 56 | राकसकोप | Rakaskop |
| 7 | निलजी | Nilgi | 57 | बीजगर्नी | Bijagarni |
| 8 | कुचडी | Kuchdi | 58 | मच्छे | Macche |
| 9 | कणबर्गी | Kanabargi | 59 | मजगांव | Majagaon |
| 10 | कलखांब | Kalakhamb | 60 | धामने (एस.) वेळगांव | Dhamne (s) Belgaum |
| 11 | कग्रांळी बी.के. | Kangrali B.K. | 61 | सुळगा (यक्कूर) | Sulaga (Yakkur) |
| 12 | कग्रांळी केएच. | Kangrali KH | 62 | नंदीहक्की | Nanddihakki |
| 13 | गौंडवाड | Goundwad | 63 | देसूर | Desur |
| 14 | मर्नहोळ | Maranhol | 64 | नागेनहट्टी | Nagenhatti |
| 15 | होनगा | Honage | 65 | राजहंसगड | Rajahansgad |
| 16 | भरम्यान हट्टी | Bharmyanhatti | 66 | मासगोंडहट्टी | Masgondhatti |
| 17 | केदनूर | Kednur | 67 | झाडशहापूर | Zadshahapur |
| 18 | बंवरगे | Bamberge | 68 | नावगे | Navage |
| 19 | हंदिगनूर | Handignur | 69 | कुट्टलवाडी | Kuttalwadi |
| 20 | म्हाळेनहट्टी | Mahalenhatti | 70 | हंगरगे | Hangarge |
| 21 | चलवेनहट्टी | Chalvenhatti | 71 | किणये | Kinaye |
| 22 | कुरिहाळ बी.के. | Kurihal B.K. | 72 | धामने एस. बैलूर | Dhamne S. Bailur |
| 23 | कुरिहाळ के.एच. | Kurihal K.H. | 73 | कर्ले | karle |
| 24 | वोडकेनहट्टी | Bodakenahatti | 74 | बहादूरवाडी | Bahadurwadi |
| 25 | कट्टणभावी | Kattanbhavi | 75 | वडस इनाम | Badas Inam |
| 26 | कडोली | Kadoli | 76 | वेळवट्टी | Belvatti |
| 27 | वंदिहोळी | Bhandiholi | 77 | वाकमूर | Bakamur |
| 28 | मुतगा | Mutaga | 78 | संतीवस्तवाड | Santibastwad |
| 29 | सांवरा | Sambra | 79 | रणकुंडये | Ranakundye |
| 30 | खणगांव के.एच. | Khangaon kh | 80 | वाघवडे | Waghwade |
| 31 | चंदगड | Chandaged | 81 | सोमनाईकहट्टी | Somanaikahatti |
| 32 | अष्टे | Ashte | 82 | जैतनमाळ | Jaitanmal |
| 33 | मुचंडी | Muchandi | 83 | सुसगोंडहट्टी | Susgondahatti |
| 34 | वसरीकट्टी | Basarikatti | 84 | तमनाईकहट्टी | Tamanaikahatti |
| 35 | उंचगाव | Uchagaon | 85 | काकती | kakti |
| 36 | गोजगे | Gojage | 86 | यमनापूर | Yamanapur |
| 37 | वेकिनकेरे | Bekinkere | 87 | कोंडसकोप | Kondasakop |
| 38 | आंबेवाडी | Ambewadi | 88 | शगमहट्टी | Shagamahatti |
| 39 | आगसगे | Agasge | 89 | मास्तमर्डी | Mastamardi |
| 40 | मण्णूर | Mannur | 90 | तारीहाळ | Tarihal |
| 41 | तुरमुरी (चिरमुरी-1) | Turamari (Chirmuri-1) | 91 | कोळीकोप | Kolikop |
| 42 | वाची | Bachi | 92 | शेरीयादवाड | Sheriyadwad |
| 43 | सुळगां (उचगांव) | Sulaga (uchgaon) | 93 | येरमाळे | Yeramale |
| 44 | हिंडलगा | Hindalga | 94 | इदलहोंड | Idalhond |
| 45 | कल्लेहोळ | kallehol | 95 | शिद्दनभावी | shiddanbhavi |
| 46 | कुद्रेमनी | kudremani | 96 | बस्तवाड | Bastwad |
| 47 | अतवाड | Atwad | 97 | अलारवाड | Alarwad |
| 48 | अलतगे | Alatge | 98 | शिंदोळी | shindholi |
| 49 | वेनकनहळ्ळी | Benakanhalli | 99 | कमकारहट्टी | Kamkarhatti |
| 50 | सावगाव | Savagaon | 100 | वेळगांव शहर | Belgaum town Group |
| | | | एकूण | 100 | 100 |

**जिल्हा :- बेळगांव**

**तालुका :- खानापूर**

| अ.क्र. | गावांची नावे | | अ.क्र. | गावांची नावे | |
|---|---|---|---|---|---|
| | (मराठी) | (इंग्रजी) | | (मराठी) | (इंग्रजी) |
| 1 | खानापूर | Khanapur | 104 | घोसे बुद्रुक | Ghose (BK) |
| 2 | नंदगड कसबा | Nandgad Kasaba | 105 | घोसे खुर्द | Ghose (KH) |
| 3 | जैनकोप | Jainkop | 106 | घार्ली | Gharli |
| 4 | लोकोळी | Lokoli | 107 | गवाळी | Gavali |
| 5 | सन्नहोसूर | Sannahosur | 108 | हेमाडगे | Hemadge |
| 6 | तोपिनकट्टी | Topinkatti | 109 | जांबेगाळी | Jambegali |
| 7 | अल्लेहोळ | Allihol | 110 | जांबोटी | Jamboti |
| 8 | बाचोळी | Bacholi | 111 | जामगांव | Jamgaon |
| 9 | बालगी | Balogi | 112 | कबनाळी | Kabanali |
| 10 | बलीकोडाल | Balikodal | 113 | कलगिरी | Kalageri |
| 11 | बंकीबसरीकट्टी | Banikbarikatti | 114 | कालाकोप | Kalakopp |
| 12 | बरगांव | Baragaon | 115 | कालमनी | Kalmani |
| 13 | बेकवाड | Bekwad | 116 | कलनाईकवाडी | Kalnaikhatti |
| 14 | भंडारगाली | Bhandargali | 117 | कल्याळी | Kalyali |
| 15 | भुत्तेवाडी | Bhutewadi | 118 | कामतगे | Kamtege |
| 16 | चन्नेवाडी | Channewadi | 119 | कांजळे | Kanjale |
| 17 | चापगांव | Chapgaon | 120 | कनकुंबी | Kana Kumbi |
| 18 | दोड्डहोसूर | Doddahosur | 121 | कापोली के चापोली | Kapoli-K-Chapoli |
| 19 | हाडलगी | Hadalgi | 122 | कापोली के गुंजी | Kapoli-K-Gunji |
| 20 | हलकर्णी | Halkarni | 123 | करंजवाड | Karanjwad |
| 21 | हलशी | Halshi | 124 | किरपोली | Kirapoli |
| 22 | हर्सेलकोप | Harsel-Kop | 125 | किरावळे (के गुंजी) | Kiswale-K-Gunji |
| 23 | हत्तरगुंजी | Hattargangi | 126 | कोडागई | Kodagai |
| 24 | हेब्बाळ | Habbal | 127 | कोंगळे | Kongale |
| 25 | जळगा | Jalaga | 128 | कुंभार्डे | Kumbarde |
| 26 | झुंजवाड के गोदिहळी | Junjawad -k- Godihalti | 129 | लोंढा | Londa |
| 27 | झुंजवाड के नंदगड | Junjawad -k-Nandgad | 130 | माचाळी | Machali |
| 28 | दोड्डेबैल | Doddebail | 131 | मळवी | Malavi |
| 29 | करलगी | Karalgi | 132 | मांजर पै | Mangarpeai |
| 30 | खैरवाड | Khairwad | 133 | मोहिसेत | Mohiset |
| 31 | खेमेवाडी | Khemewadi | 134 | मुगावडे | Mugawade |
| 32 | कुप्पटगिरी | Kupattageri | 135 | मुंडेवाडपिंपळे | Mundewad Pimple |
| 33 | नंदगड - मौजे | Nandgad Mouze | 136 | नागरगाळी | Nagargalli |
| 34 | नंजिनकोडल | Nanjinkodal | 137 | निलावडे | Nilawade |
| 36 | रामगुरवाडी | Ramgurwadi | 138 | नेरसे | Nerase |
| 36 | रुमेवाडी | Rumewadi | 139 | ओलमणी | Olmani |
| 37 | सागरी | Sagri | 140 | पोसेकोप | Posekopp |
| 38 | शिवोली | Sivoli | 141 | पोटोली | Potoli |
| 39 | वंकेबैल | Vankebail | 142 | संतनाळी | Santanali |
| 40 | यडोगा | Yadoga | 143 | शिंदोळी बुद्रुक | Sindoli B K |
| 41 | अल्लेळी कांसोळी | Alloli Kansoli | 144 | शिंदोळी खुर्द | Sindoli Khurd |
| 42 | आंबेवाडी | Ambewadi | 145 | शिरोली | Siroli |
| 43 | अंबिलकोप | Ambilkop | 146 | सितावडे | Sithawade |
| 44 | अनागडी | Anagadi | 147 | शिवठाण | Shivathan |
| 45 | भालके खुर्द | Bhalake- Khurad | 148 | सोमसेत | Somaset |
| 46 | भिष्टेनहट्टी | Bhistenhatti | 149 | सुळेगाळी | Sulegali |
| 47 | विजगर्णी | Bijagarni | 150 | सुवातवाडी | Suwatwadi |
| 48 | बिंबेगाटी | Bimbegati | 151 | तळावडे | Talwade |
| 49 | चेनकेबैल | Chanakebail | 152 | तारवाड | Tarwad |
| 50 | ढोकेगाळी | Dhokgali | 153 | तावरकट्टी | Tavarkatti |
| 51 | गंगवाळी | Gangawali | 154 | तेरेगाळी | Teregali |
| 52 | घोटगाळी | Ghotagalli | 155 | वरखड पाटे | Warkhadpatye |
| 53 | गोदगिरी | Godageri | 156 | वाटरे | Watre |
| 54 | गोधोळी | Godholi | 157 | आमगाव | Amgaon |
| 55 | गुंडोळी | Gundoli | 158 | चिगुळे | Chigule |
| 56 | गुंडपी | Gandape | 159 | चिखले | Chikhale |
| 57 | गुंजी | Gunji | 160 | चोरला | Chorla |
| 58 | हलगे | Halage | 161 | देगांव | Deogaon |
| 59 | हलसाल | Halsal | 162 | गोल्याळी | Golyali |
| 60 | हर्सनवाडी | Harasanwadi | 163 | देवसे | Davase |
| 61 | हुरुरी | Hururi | 164 | होल्डा | Holda |
| 62 | हत्तरवाड | Hattarwad | 165 | हळंद | Huland |
| 63 | जंगमहट्टी | Jangamhatti | 166 | केळिल | Kelil |
| 64 | जळगे | Jalage | 167 | मेंडील | Mendil |
| 65 | करजगी | Karajgi | 168 | पारवड | Parwad |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 66 | करंबळ | Karambal | 169 | पास्टोली | Pastoli |
| 67 | करंजाळ | Karanjal | 170 | भिमगड (तनाली उर्फ) | Bhimgad -alias Tandi |
| 68 | कौदंल | Kavandal | 171 | देवाचीहट्टी | Devachihatti |
| 69 | किरहलशी | Kirhalashi | 172 | हबनहट्टी | Hebanhatti |
| 70 | कुमारतनवाडी | Kumaratwadi | 173 | तोऱ्याळी | Torali |
| 71 | माणिकवाडी | Manikwadi | 174 | अंबोली | Amboli |
| 72 | मणतुर्गे | Manaturge | 175 | आमटे | Amate |
| 73 | मास्केनहट्टी | Maskenhatti | 176 | अंकले | Ankale |
| 74 | मेंढेगाळी | Mendegali | 177 | देवराई | Devarai |
| 75 | मेरडा | Merda | 178 | डुक्करवाडी | Dukarwadi |
| 76 | मोदेकोप | Modekoppa | 179 | घोडेदुर्ग | Ghodedurga |
| 77 | मुदगनुर | Mudaganur | 180 | होनकल | Honakal |
| 78 | नायकाल | Naikal | 181 | कवळे | Kavale |
| 79 | नावगे | Navagi | 182 | मळवाड | Malwad |
| 80 | पडलवाडी | Padalwadi | 183 | मुडेवाडी | Mudewadi |
| 81 | पूर | Pur | 184 | नागुर्डी | Nagurade |
| 82 | संगरगाळी | Sungargali | 185 | आसोगा | Asoga |
| 83 | सावरगाळी | Savargali | 186 | मन्सापूर | Manasapur |
| 84 | शेडेगाळी | Shedegali | 187 | मोरब | Morab |
| 85 | शिंदोळी | Sindoli | 188 | कोकाटी | Kokati |
| 86 | सिंपेवाडी | Simpewadi | 189 | बेटगेरी | Betagrri |
| 87 | सोनेहट्टी | Sonehatti | 190 | तिर्थकुंडे | Thirthkunde |
| 88 | शिवोली | Shivoli | 191 | सोनारवाडी | Sonarwadi |
| 89 | ओतोळी | Otoli | 192 | बैल्लूर | Bailur |
| 90 | अबनाळी | Abanali | 193 | कुसमळी | Kusamali |
| 91 | अडाळी | Adali | 194 | उचवडे | Uchawade |
| 92 | अक्राळी | Akrali | 195 | निट्टूर | Nittur |
| 93 | अवरालबैल | Awaral Bail | 196 | काटगाळी | Katagali |
| 94 | बालगुंद | Balgund | 197 | गणेबैल | Ganebail |
| 95 | बामणकोप | Bamankop | 198 | निडगल | Nidgol |
| 96 | बस्तवाड | Bastwad | 199 | इदलहोंड | Idalhond |
| 97 | बेटणे | Betane | 200 | गर्लगुंजी | Garalgunji |
| 98 | भुत्तेवाडी | Bhutewadi | 201 | सिंगीनकोप | Singenkop |
| 99 | बुडसे | Budse | 202 | मांजरपै | Manjarpai |
| 100 | चापोली | Chapoli | 203 | अंबिलकोप | Amblikop |
| 101 | चिंचेवाडी | Chinchewadi | 204 | जुंजवाड | Junjwad |
| 102 | दारोळी | Daroli | 205 | डीगेगाळी | Digegadai |
| 103 | डोंगरगाव | Dongergaon | 206 | मालके बुद्रुक | Bhalake -(B.K.) |
| | | | एकूण | 206 | 206 |

**जिल्हा :- बेळगांव**

**तालुका :- चिकोडी**

| अ.क्र. | गावांची नावे | | अ.क्र. | गावांची नावे | |
|---|---|---|---|---|---|
| | (मराठी) | (इंग्रजी) | | (मराठी) | (इंग्रजी) |
| 1 | अडी | Adi | 25 | यरनाळ | Yarnal |
| 2 | अकोळ | Akol | 26 | बुदलमुख | Budalmukh |
| 3 | बारवाड | Barwad | 27 | कुन्नुर | Kunnur |
| 4 | बेनाडी | Benadi | 28 | मानकापूर | Manakpur |
| 5 | भिवशी | Bhivashi | 29 | पांगिरे (अ) | Pangeri (A) |
| 6 | हंचिनाळ | Hanchinal | 30 | तवंदी | Tawandi |
| 7 | जत्राट | Jatrat | 31 | पांगिरे (बी) | Pangire (B) |
| 8 | बुधिहाळ | Budhahal | 32 | पटटनकुडी | Patankudi |
| 9 | कस्नाळ | Kasnal | 33 | चिकलव्हाल | Chikhalwhal |
| 10 | कोडनी | Kodni | 34 | पिरवाडी | Peerwadi |
| 11 | कुर्लि | Kurli | 35 | नागंनूर | Nangnur |
| 12 | लखानपूर | Lakhanapur | 36 | यमगर्णी | Yamagarni |
| 13 | मंगुर | Mangur | 37 | रामपूर | Rampur |
| 14 | निपाणी (अमलझर) | Nipani ( Amalzar) | 38 | वल्कि | Walki |
| 15 | पडलिहल | Padalihal | 39 | खडकलाट | Khadaklat |
| 16 | सौंदलगा | Saundalga | 40 | नवलीहाळ | Navalihal |
| 17 | सिदनॉल | Shidnal | 41 | शिरागांव | Shiragaon |
| 18 | भाटनागनूर | Bhatnagnur | 42 | गिरगांव | Girgaon |
| 19 | गोंदूकुप्पी | Gondpiappi | 43 | गवाण | Gavan |
| 20 | हदनाळ | Hadnal | 44 | कोंगनोळी | Konagnolli |
| 21 | मत्तीवडे | Mativade | 45 | ममदापूर केलाट | Mamdapur Kelat |
| 22 | शेंदूर | Shendur | 46 | हुन्नरगी | Hunnargi |
| 23 | शिरगुप्पी | Shirguppi | 47 | कारदगा | Karadga |
| 24 | सुळगांव | Suligaon | 48 | निप्पाणी (एम) | Nipani (M) |
| | | | एकूण | 48 | 48 |

7

**जिल्हा :- बेळगांव**

**तालुका :- हुक्केरी**

| अ.क्र. | गावांचे नांव | | अ.क्र. | गावांचे नांव | |
|---|---|---|---|---|---|
| | (मराठी) | (इंग्रजी) | | (मराठी) | (इंग्रजी) |
| 1 | भैरापूर | Bhairapur | 12 | रामेवाडी | Ramewadi |
| 2 | बुगटेअलूर | Bugte Alur | 13 | बेल्लेंके | Bellanke |
| 3 | हडाल्गे | Hadalge | 14 | घोंडगट्टी | Dhondgatti |
| 4 | हिटणी | Hittani | 15 | सलामवाडी | Salamwadi |
| 5 | नागनूर के सोलापूर | Naganur - k-Solopur | 16 | शेट्टीहल्ली | Shettahalli |
| 6 | राशिंग | Rashing | 17 | शिपूर | Shipur |
| 7 | शेकिनहोसूर | Shekinhosur | 18 | मलिवाडे | Maliwade |
| 8 | दड्डी | Daddi | 19 | नागनूर के दड्डी | Nagnur-k-Daddi |
| 9 | खवनेवाडी | Khavanewade | 20 | बिद्रेवाडी | Bidrewadi |
| 10 | कोट | Kot | 21 | अत्याळ | Attihal |
| 11 | मोडगे | Modage | 22 | अल्याल | Aldhal |
| | | | एकूण | 22 | 22 |

**जिल्हा :- कारवार**

**तालुका :- कारवार**

| अ.क्र. | गावांचे नांव | | अ.क्र. | गावांचे नांव | |
|---|---|---|---|---|---|
| | (मराठी) | (इंग्रजी) | | (मराठी) | (इंग्रजी) |
| 1 | वाड | Baad | 26 | गोयर | Goyar |
| 2 | नंदनगड्डे | Nandangadde | 27 | लांदे | Lande |
| 3 | सुनकेरी | Sunkeri | 28 | कामेरगाव | Kamergaon |
| 4 | कथीनकोन | Kathinkon | 29 | गोटेगलि | Gotegali |
| 5 | माखेरी | Makheri | 30 | बालेमाने | Balemane |
| 6 | शिरवाड | Shirwad | 31 | काद्रा | Kadra |
| 7 | कडवाड | Kadwad | 32 | हनकोनजूग | Hankon joog |
| 8 | किन्नार | kinnar | 33 | हलगे जुग | Halge joog |
| 9 | सिद्दार | Siddar | 34 | बोलशिट्टा | Bolshitta |
| 10 | वैलवाडा | Wailwada | 35 | घडसाय | Ghadsai |
| 11 | देवलमक्की | Devalmakki | 36 | उल्गे | Ulge |
| 12 | नैतिसावर | Naitisavar | 37 | कटार | Katar |
| 13 | कनसगेरी | Kanasgeri | 38 | केरवाडी | Kerwadi |
| 14 | अरव | Arav | 39 | काडिये | Kadiye |
| 15 | होसाळी | Hosali | 40 | मल्लपुर | Mallapur |
| 16 | मुडगेरी | Mudgari | 41 | वीर्गी | Virgi |
| 17 | अंगडी | Angadi | 42 | कुचेगर | Kuchegar |
| 18 | कोलगे | Kolge | 43 | हर्तुगा | Hartuga |
| 19 | गाधेवाडा | Madhewada | 44 | कैगा | Kaiga |
| 20 | सव्होतवाडा (सावंतवाडा) | Savantwada | 45 | देवकार | Davkar |
| 21 | होटेगाली | Hotegali | 46 | कारवार | Karwar |
| 22 | हंकोन | Hankon | 47 | चिटकुला (15अे) | Chikkula (15 A) |
| 23 | गोपशिट्टा | Gopshitta | 48 | चिटकुला (15 बी) | Chikkula (15 B) |
| 24 | मेनगीनि | Maingini | 49 | माजाली (15 अे) | Majali (15 A) |
| 25 | भैरे | Bnaire | 50 | मजली (15 बी) | Majali (15 B) |
| | | | एकूण | 50 | 50 |

**जिल्हा :- कारवार**

**तालुका :- सुपा**

| अ.क्र. | गावांचे नांव | | अ.क्र. | गावांचे नांव | |
|---|---|---|---|---|---|
| | (मराठी) | (इंग्रजी) | | (गराठी) | (इंग्रजी) |
| 1 | पालडे | Palade | 64 | गावेगली | Gavegali |
| 2 | रंगरुक | Rangarook | 65 | संगवे | Sangwe |
| 3 | अखेटी | Akheti | 66 | आमगाव | Amagaon |
| 4 | वर्लेवाडी | Varlewadi | 67 | बिरोदे | Birode |
| 5 | अन्मोद | Anmod | 68 | चापखंड | Chapkhand |
| 6 | आताली | Atali | 69 | जोइदा | Joida |
| 7 | इवोली | Ivoli | 70 | तिनईखंड | Tinaikhand |
| 8 | कुवेशी | Kuveshi | 71 | गंगोदा | Gangoda |
| 9 | निन्नुर | Ninnur | 72 | कल्साई | Kalsai |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 10 | बाजारकुमंग | Bajarkumang | 73 | देरिये | Deriye |
| 11 | शिर्गुरी | Shirguri | 74 | काटेली | Kateli |
| 12 | कवर्ळे | Kevarle | 75 | कुंडाल | Kundal |
| 13 | चांदवाडी | Chandwadi | 76 | बाडपोली | Badpoli |
| 14 | विलायेदाबे | Vilayedabe | 77 | आनशी | Anshi |
| 15 | टिटवली | Titwali | 78 | आंबोल्लि | Ambolli |
| 16 | बोरेगली | Boregali | 79 | तुलसगेरी | Tulasgiri |
| 17 | आसू | Asu | 80 | मोरज कुंबोले | Miraj Kumbole |
| 18 | शिंदोली | Shindoli | 81 | माळंबे | Malambe |
| 19 | कासार्ले | Kasarle | 82 | तिंबोलि | Timboli |
| 20 | विरजोले | Viranjole | 83 | कासारवाडी | Kasarwadi |
| 21 | वतले | Vatle | 84 | डोनशेट | Donshet |
| 22 | करंबाल | Karambal | 85 | पुशेल्लि | Pushelli |
| 23 | देवुली (तिनई) | Devuli (Tinai) | 86 | बामनवाडी | Bamanwadi |
| 24 | पयासवाडी | Payaswadi | 87 | वैनी | Valni |
| 25 | कलम्बुली | Kalambuli | 88 | वरांडे | Varande |
| 26 | कुंगीनी | Kungini | 89 | भांभर्डे | Bhamarde |
| 27 | अवेध फोफलवाडी | Aveda-Phophalwadi | 90 | अव्हेदा | Aveda |
| 28 | बांदोडे | Bandode | 91 | कोनाडपे | Konadape |
| 29 | पिसोसे | Pisose | 92 | बडगोंड | Badagund |
| 30 | विराळ | Viral | 93 | विर्खोल | Virkhol |
| 31 | कोनशेट | Konshet | 94 | आंबेल्लि | Ambelli |
| 32 | दुर्ग | Durg | 95 | असुलि | Asuli |
| 33 | घवने | Ghavane | 96 | करंजोडा | Karanjoda |
| 34 | कामरे | Kamre | 97 | तेराली | Terale |
| 35 | चाफळी | Chaphali | 98 | जामगलि | Jamgali |
| 36 | बोरी | Bori | 99 | आसनगाव | Asangaon |
| 37 | वाडे (वोड ) | Vade | 100 | कुक्रा-कुरवाडे | Kukra-Kurwade |
| 38 | वेलिप- कुंबेळी | Velip-Kumbeli | 101 | पाटे | Pate |
| 39 | अमशेट | Amshet | 102 | नागोडा | Nagoda |
| 40 | कुंडालगांव | Kundalgaon | 103 | कोहली | Kohali |
| 41 | वैजागांव | Vaijagaon | 104 | विरंपाली | Virampali |
| 42 | शिगारगाव | Shingargaon | 105 | आमर्डे | Amarde |
| 43 | उसोदा | Usoda | 106 | फनसोली | Phansoli |
| 44 | जगलबेट | Jagalbet | 107 | विरनोलि | Virnoli |
| 45 | कांब्राल | Kambral | 108 | सामजोयडा | Samjoida |
| 46 | दुर्गी | Durgi | 109 | चापोली (ओ) | Chapoli (A) |
| 47 | अडनगांव | Adangaon | 110 | नार्गे | Nagre |
| 48 | कुरांडी | Kurandi | 111 | देवल्लि (जोयडा) | Devalli (Joida) |
| 49 | कोनाडा | Konada | 112 | चापोली (के) | Chapoli (K) |
| 50 | मवलिंगे | Mavalinge | 113 | कुंबेलि | Kumbelli |
| 51 | कोनाडा (सुपाजवळ) | Konada (Near Supa) | 114 | घोडशेट | Ghodshet |
| 52 | सुपा | Supa | 115 | काटेल | Katel |
| 53 | दिग्गी | Diggi | 116 | इराल अवली (जलवाडी) | Iral-Awali (Jhalawali) |
| 54 | सुलवाली | Sulwali | 117 | नुज्जे | Nujji |
| 55 | फणसखुर्द | Phanaskhand | 118 | निगंदि | Nigundi |
| 56 | कुकडाळी | Kukdali | 119 | बिडोली | Bidoli |
| 57 | हातखंबा | Hatkhamba | 120 | चाफेर | Chapher |
| 58 | डोंगरवाडा | Dongarwada | 121 | वडकळ | Vadkal |
| 59 | मैसोडा | Maisoda | 122 | उल्व्ही | Ulvi |
| 60 | पांजेली | Panjeli | 123 | गुंड | Gund |
| 61 | अडूली | Adulli | 124 | चिंचखंड | Chinchkhand |
| 62 | बापेली | Bapeli | 125 | अवरलि | Avurli |
| 63 | प्रधानी | Pradhani | 126 | नंदिगड्डे | Nandigadde |
| | | | एकूण | 126 | 126 |

जिल्हा :- कारवार

तालुका :- हल्याळ

| अ.क्र. | गावांचे नांव (मराठी) | गावांचे नांव (इंग्रजी) | अ.क्र. | गावांचे नांव (मराठी) | गावांचे नांव (इंग्रजी) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अलोळ्ळी | Alolli | 63 | बलशेट्टीकोप | Balshettikop |
| 2 | कळसापूर (भीराड) | Kalsapur | 64 | मालवाडी | Malwadi |
| 3 | केरवाड | Kerwad | 65 | बडाशिरगुर | Badashirgur |
| 4 | मागवाड | Magwad | 66 | छोटा कानशिरडा | Chotakanshirda |
| 5 | अंगोळ्ळी | Angolli | 67 | मालवाड | Malwad |
| 6 | मुत्तलमुरी | Muttalmuri | 68 | ठाकरबसापूर | Thakarbasapur |
| 7 | सटनाली | Satnalli | 69 | कालभावी | Kalbhavi |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | मुंडकी | Mundki | 70 | दोनशिरगुर | Donshirgur |
| 9 | अर्लवाड | Arlwad | 71 | बोमनहळ्ळी | Bommanahalli |
| 10 | होमनल्लि | Homnalli | 72 | कुलगी | Kulgi |
| 11 | माडनाल्लि | Madnalli | 73 | भागवती | Bhagawati |
| 12 | दुसगी | Dusgi | 74 | अड्डीगेरा | Addigera |
| 13 | हंसवाड | Hunswad | 75 | जामगा | Gamaga |
| 14 | मालवाड | Malwad | 76 | भिमनाळी | Bhimnalli |
| 15 | पाला | Pala | 77 | बेगूर | Begur |
| 16 | आंबोडगा | Ambodga | 78 | तट्टिगेरी | Tattigere |
| 17 | मंगळवाड | Mangalwad | 79 | माविनकोप | Mavinkop |
| 18 | बिद्रोळी | Bidrolli | 80 | माचापूर | Machapur |
| 19 | यडोगा | Yedoga | 81 | जातगे होसूर | Jatge Hosur |
| 20 | हरवळी | Harwalli | 82 | अडके होसूर | Adke-Hosur |
| 21 | रामापूर | Ramapur | 83 | होसूर | Hosur |
| 22 | मोडलगिरी | Modalgari | 84 | दोडकोप | Dodkop |
| 23 | जावाळी | Jawalli | 85 | निलवानी | Nilwani |
| 24 | सातमनी | Satmani | 86 | बुक्कनकोप | Bukkankop |
| 25 | तिम्मापूर | Timmapur | 87 | हंपेहल्लि | Hampehalli |
| 26 | बलोगा | Baloga | 88 | कावलवाड | kawalwad |
| 27 | चन्नापूर | Channapur | 89 | बासवळ्ळी | Baswalli |
| 28 | निरलगी | Niralgi | 90 | नंदिगड्डे | Nandigadde |
| 29 | बाबलिकोप | Bablikop | 91 | जानगे | Janage |
| 30 | हलशी | Halshi | 92 | खुर्द- कांचनळ्ळी | Khurd Kanchanalli |
| 31 | केसरोळी | Kesrolli | 93 | मुर्कवाड | Murkwad |
| 32 | डोमगिरी | Domgeri | 94 | मुगदकोप | Mugadkop |
| 33 | आजगाव | Ajagaon | 95 | जाटगे | Jutge |
| 34 | अगसलकट्टा | Agsalkatt | 96 | चिंगीनकोप | Chinginkop |
| 35 | कुरिगड्डे | Kurigadde | 97 | अजमिनहाळ | Ajminhal |
| 36 | शिद्दापूर | Siddhapur | 98 | सांबरणी | Sambarani |
| 37 | कर्लकट्टा | Kurikatta | 99 | गुंडोल्लि | Gundolli |
| 38 | क्याटनगेरी | Kyatangeri | 100 | तिप्पीनगेरी | Tippangeri |
| 39 | गार्डोली | Gardolli | 101 | कलगीनकोप | Kalginkop |
| 40 | गडगिरी | Gadgeri | 102 | पूर | pur |
| 41 | कलगिनहट्टी | Kalginhatti | 103 | कुंबरकोप | Kumbarkop |
| 42 | केसरोडगा | Kesrodga | 104 | अरशिनगेरी | Arashingeri |
| 43 | शिंगलगेरी | Shingalgeri | 105 | मालवाडी | Malwadi |
| 44 | हंद्लि | Handli | 106 | चिवालगेरी | Chibalgeri |
| 45 | गोबराल | Gobral | 107 | गोलेहळ्ळी | Golehalli |
| 46 | अजगर्णी | Ajagarni | 108 | खामदळ्ळी | Khamdalli |
| 47 | बेडार शिरगुर | Bedarshirgur | 109 | गुत्तीबैल | Guttibail |
| 48 | विटनाल | Vitnal | 110 | तेगनळ्ळी | Tegnalli |
| 49 | हरेगलि | Haregali | 111 | भनसगेरी | Bhanasgeri |
| 50 | आंबेवाडी | Ambewadi | 112 | बुझुरकांचनहळ्ळी | Buzurkanchanalli |
| 51 | अलुर | Alur | 113 | टाटवाणी | Tatwani |
| 52 | तटगेरी | Tatgeri | 114 | नागशेट्टीकोप | Nagsettikop |
| 53 | केरवाड | Karawad | 115 | अमनकोप | Amankop |
| 54 | कुंबारकोप | Kumbarkop | 116 | जोगनकोप | Jogankop |
| 55 | करिआमपाली | Kariampali | 117 | घडियाळ | Ghadiyal |
| 56 | बडकन जोहिर्डा | Badkanjohirda | 118 | डोंगरीकोप | Dongrikop |
| 57 | हर्नोडा | Harnoda | 119 | गुलेडकोप | Guledkop |
| 58 | होसकुंबारकोप | Hoskumbarkop | 120 | बेलवाल्गी | Belwalgi |
| 59 | मैनाल | Mainal | 121 | मुंडेवाड | Mundewad |
| 60 | रायपट्टन | Rayapattan | 122 | हल्याळ (एम) | Haiyal (M) |
| 61 | चिमनाली | Chimnalli | 123 | दांडेली | Dandeli |
| 62 | नरनाली | Narnalli | एकूण | 123 | 123 |

## जिल्हा - बिदर
### तालुका :- औराद (संतपूर)

| अ.क्र. | गावांचे नांव | | अ.क्र. | गावांचे नांव | |
|---|---|---|---|---|---|
| | (मराठी) | (इंग्रजी) | | (मराठी) | (इंग्रजी) |
| 1 | औराद (बु.) | Aurad (B) | 42 | तपशाळ | Tapshal |
| 2 | ओनमरपल्ली | Uanmarpalli | 43 | बोंथी | Bonthi |
| 3 | दुदूकनाळ | Dudknal | 44 | दरेगांव (वस्तीहीन) | Daregaon |
| 4 | एकंबा | Ekamba | 45 | लिंगी | Lingi |
| 5 | बादलगांव | Badalgaon | 46 | मुखेड | Mukhed |
| 6 | गणेशपूर | Ganeshpur | 47 | खटगांव | Khatgaon |
| 7 | खंदीकेरी | Khandikeri | 48 | मदनूर | Mandnoor |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | मुंगनाळ | Mungnal | 49 | मुरुग (खुर्द) | Murug (K) |
| 9 | महाडोनगाव | Mahadongaon | 50 | रामपूर | Rampur |
| 10 | हंगरगा (बु.) | Hungraga (B) Hangara | 51 | होळसमनदर | Holsamander |
| 11 | बोराल | Boral | 52 | बसनाळ | Basnal |
| 12 | हुल्याळ | Hulyal | 53 | डिग्गी | Diggi |
| 13 | जमालपूर | Jamalpur | 54 | सावली | Sawli |
| 14 | हस्सीकेरा (हलसिकारा) | Hassikera | 55 | कोटग्याळ | Kotgial |
| 15 | गोंडगांव | Goundgaon | 56 | खेडा | Khed |
| 16 | कोरेकल | Korekal | 57 | हुलसूर | Hulsoor |
| 17 | बावलगाव | Bawalgaon | 58 | चांदेश्वर | Chandashwar |
| 18 | सावरगाव | Sawargaon | 59 | बालूर | Baloor |
| 19 | लिंगाडहल्ली | Lingadhalli | 60 | कळगापूर | Kalgapur |
| 20 | बेम्रा | Bemra | 61 | होरांडी | Horandi |
| 21 | चांदोरी | Chandori | 62 | सोनाळा | Sonala |
| 22 | तोरणा | Torna | 63 | माळेगाव | Malegaon |
| 23 | मुथखेड | Muthkhed | 64 | नारायणपूर | Narayanpur |
| 24 | होकर्णा | Hokarna | 65 | हिप्पळगाव | Hippalgaon |
| 25 | खेर्डा (बी.जी.) | Kharda (B.G.) | 66 | निडोदा | Nidoda |
| 26 | दापकाचोर | Dapkachor | 67 | हाल्लाळी | Hallali |
| 27 | चिखली उदगीर | Chikli Udgir | 68 | बालाड (बु.) | Balad (B.h.) |
| 28 | अकनापूर | Aknapur | 69 | बालाड (खु) | Balad (K.h.) |
| 29 | गंगनबीड | Gangnbeed | 70 | रक्षयाल (बु.) | Rakshayal (B.h.) |
| 30 | गणेशपूर, उदगीर | Ganeshpur Udgir | 71 | रक्षयाल (खु.) | Rakshayal (K.h.) |
| 31 | वांगनगेरा उर्फ वांजरखेड | Wangangera (Wangarkhed) | 72 | बेडकुंडा | Bedkunda |
| 32 | भंडारकुमठा | Bhandar Kumtha | 73 | ठाना कुसनूर | Thana Kusnoor |
| 33 | मुर्कि | Murki | 74 | संगम | Sangam |
| 34 | हंदिखेरा | Handikera | 75 | नंदी बिजलगाव | Nandibijalgaon |
| 35 | चिमेगाव | Chimegaon | 76 | कमालनगर | Kamalnagar |
| 36 | डोंगरगाव (नित्तुर) | Dongargaon(Nittur) | 77 | बेलकुनीभोपालगड | Belkunibhopalgad |
| 37 | संगनाळ | Sangnal | 78 | भवानीबिजलगाव | Bhvanibijalgaon |
| 38 | करक्याळ | Karkyal | 79 | मुधोळ (खु.) | Mudhol (Kh) |
| 39 | डोनगाव (म) | Dongaon (M) | 80 | मुधोळ (बु.) | Mudhol (B.) |
| 40 | हाक्याल | Hakial | 81 | कोरयाळ | Koryal |
| 41 | रेन्डीयाल | Rendiayal | एकूण | 81 | 81 |

## जिल्हा - बिदर
## तालुका :- भालकी

| अ.क्र. | गावांचे नांव (मराठी) | (इंग्रजी) | अ.क्र. | गावांचे नांव (मराठी) | (इंग्रजी) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कासार तुगांव | Kasar- Tugaon | 33 | जामखंडी | Jamkandi |
| 2 | शिवणी | Shivani | 34 | वांजरखेडा | Wanjerkheda |
| 3 | लखनगाव | Laknangaon | 35 | कोंगली | Kongli |
| 4 | काकनाळ | Kaknal | 36 | मेहकर | Mehkar |
| 5 | अत्तनुर | Attncor (Hatnur) | 37 | नारद संगम | Narad Sangam |
| 6 | सोमपूर | Sompur | 38 | बोळेगाव | Bolegaon |
| 7 | तलवाडा (मराठा) तळेवाडी | Talwada (Maratha) | 39 | श्रीमाळी | Shrimlai |
| 8 | भाटसांगवी (थामग्याळ) | Bhatsangvi (Thamgyal) | 40 | तुगांव (हालशी) | Tugaon (Halshi) |
| 9 | मेथी-मेळकुंदा | Methi Melkunda | 41 | आळवई | Alwai |
| 10 | तैलगांव | Tailgaon | 42 | गुंजरगा | Gunjarga |
| 11 | भातांब्रा | Bhatambra | 43 | अट्टरगा | Attarga |
| 12 | कोरुर | Korur | 44 | माणीकेश्वर | Manikeshawar |
| 13 | गोर चिंचोली | Goor Chincholi | 45 | डोंणगापूर | Dongapur |
| 14 | कोटगिरा | Kotgira | 46 | आळंदी | Aalandi |
| 15 # | गुथी | Guthi | 47 | हचीकामंठ | Hachikamanth |
| 16 # | गडिगोंडगाव | Gadigondgaon | 48 | कळसदाल | Kalasdal |
| 17 | कुंटेगाव | Kuntegaon | 49 | जयगांव | Jaigaon |
| 18 | लाधा | Ladha | 50 | सिदापूर | Sidapur |
| 19 | इंचूर | Inchur | 51 | गणेशपूर | Ganeshpur |
| 20 | खुदावंदपूर | Khudavandepur | 52 | अहेमदाबाद | Ahemadabad |
| 21 | हालशी (ल) | Halshi (L) | 53 | केरुर | Kerur |
| 22 | जिरगियाल | Jeergiyal | 54 | हलहळी | Halhali |
| 23 | वागलगांव | Wagalgaon | 55 | हुनजी (आळंदी) | Hungi (Aalandi) |
| 24 | सायगांव | Saigaon | 56 | वळसंग | Walsang |
| 25 # | सोलदबका | Soldabka | 57 | एकलासपूर | Aeklaspur |
| 26 | केसरजवळगा | Kesarjawalga | 58 | आंबेसांगवी | Ambesangvi |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 27 | कादलाबाद | Kadlabad | 59 | समशेदपूर | Samshedpur |
| 28 # | हुलसूर | Hulsur | 60 | हुप्पला | Hupla |
| 29 # | देवूनाल | Deunal | 61 | निडेबण | Nideban |
| 30 # | मिरखाल | Mirkhal | 62 | गुबीयाळ | Gubiyal |
| 31 # | कोटमाल | Kotmal | 63 | भालकी | Bhalki |
| **32 #** | मचनाल | Machnal | **एकूण** | **63** | **63** |

**चिन्हांकित गावांचा सध्याचा तालुका**

# : बसवकल्याण तालूका

## जिल्हा - बिदर
## तालुका :- हुमनाबाद

| अ.क्र. | गावांचे नांव | | अ.क्र. | गावांचे नांव | |
|---|---|---|---|---|---|
| | (मराठी) | (इंग्रजी) | | (मराठी) | (इंग्रजी) |
| 1 # | लडवंती | Ladawanti | 16 # | पर्तापूर | Parwatpur |
| 2 @ | धमुरी | Dhamori | 17 # | निळकंठ | Nilakanth |
| 3 @ | एकंबा | Ekamba | 18 # | उर्कि | Urki |
| 4 @ | गदलेगांव | Gadlegaon | 19 # | तळभोग | Talbhag |
| 5 # | रामतिर्थ | Ramatirth | 20 @ | जाजनमुगळी | Jagenmugali |
| 6 @ | शिर्गर | Sirgur | 21 @ | घोटाळ | Ghotala |
| 7 @ | शिरुरी | Siroori | 22 # | चांडकापूर | Chandkpur |
| 8 # | भोसगा | Bhosaga | 23 # | उमापूर | Umapur |
| 9 * | भकनाळ | Bhaknal | 24 # | लाहेश्वर | Laheshwar |
| 10 * | वडरर्गा | Wadderga | 25 # | मोरखंडी | Morakhand |
| 11 @ | उजळंब | Vijlam | 26 # | रामतीर्थ | Ramathirth |
| 12 @ | मन्नाळी | Manhalli | 27 # | अलगुड | Algood |
| 13 * | चिट्टाकलदेव | Chittakal | 28 # | गदलेगौर | Gadlegaur |
| 14 @ | होन्नाळी | Honahalli | 29 # | कमलेवाडी | Kamlewadi |
| 15 # | हंद्राळ | Handriyal | 30 * | साहेब-जवळगा | Sarajawalrga |
| | | | एकूण | 30 | 30 |

**चिन्हांकित गावांचा सध्याचा तालुका**

@ : हमुणाबाद तालुका

# : वसवकल्याण तालूका।

* : आळंद तालुका, जिल्हा-गुलबर्गा.

## जिल्हा - गुलबर्गा
## तालुका :- आळंद

| अ.क्र. | गावांचे नांव | |
|---|---|---|
| | (मराठी) | (इंग्रजी) |
| 1 | जामगांव ( खंडाळा) | Jamagaon (Khandala) |
| 2 | तडोला | Tadola |
| 3 | सिरुर (गदलेगांव) | Sirur (Gadlegaon) |
| 4 | गदलेगाव | Gadlegaon |
| 5 | आलंगा | Alanga |
| 6 | तुगांव | Tugaon |
| 7 | नंदगुर | Nandgur |
| **एकूण** | 7 | 7 |

परिशिष्ट – २

कर्नाटक शासनाची परिपत्रके

## ANNEXURE 24.

ENGLISH TRANSLATION OF ORIGINAL KANNADA NOTIFICATION PUBLISHED

by Govt. of Karnataka.

No. Bel / Gkk / Admn /Al/
Office Of the Gen. Manager,
/VV/123/K Dev./95-96.
Dist. Industries Centre,
Udambaug, Belgaum.
Dt.28 11-1995.

Patrika - Prakatan ( Press - Notification )

**Sub.:All boards of Industries in the Dist. should be displayed in Kannada-Regarding.**

**Ref.:Letter of Joint Director (AEP) Industries and Commerce Directorate, Bangalore. No.EPC-EO-P-IA-95-96. Dt. 21-11-95.**

**A meeting of Committee of Ministers arranged by Kannada Abhivridhi Pradhikar (Kannada Development Board) on 8-11-1995 has decided that all the name and address boards of all Industrial and Commercial Units in Karnataka State should be displayed permanently only in Kannada. Strict action should be taken against those who commit breach of the above order.**

Sd/-
General Manager,
Dist. Industries Centre,

## ANNEXURE 25.

## ENGLISH TRANSLATION OF LETTER ISSUED BY ASSISTANT REGISTRAT OF CO-OPERATIVE SOCIETIES, BELGAUM.

**No.AR9: RSR:Kannada 98-99** **Office of the Assistant Registrar of Co-operative Societies, Belgaum**
**Date: 9-9-1998**

**To**

**President/Secretary,**

Subject: Implementation of Kannada in administration.

Reference: Letter of the Dy. Registrar of Co-operative Societies dated 28-5-1998.

Respected Sir,

It has come to the notice, that the registers, documents and the correspondence has been maintained in languages other than the Kannada language. You are directed to maintain all the records only in Kannada as the said languages has been the State Official Language.

From 1-10-98 you are strictly required to maintain all the records only in Kannada and shall make the correspondence in Kannada only.

Sd/- 9-9-98

Asstt. Registrar, Co-operative Societies.

**Copy to 1. Manager, Belgaum Dist. Co-op. Societies Union Ltd., Belgaum.**

## ANNEXURE 26.

GOVERNMENT OF KARNATAKA

No. PUE/EXM-B/SCR/COMB/80-81

Office of the Director of
Pre-University Education,
Examination Wing,
Palace Road, Bangalore.
Dated:23/10/1980.

To, All the Principals of Composite Colleges,
Independent Junior Colleges and Upgraded
Higher Secondary Schools in the State

Sir,

Sub.: **Combination restriction in Pre-University Education to be effected from the academic year 1981-82.**

The Board of Pre-University Education at its meeting held on 25th September 1980, has decided that the combinations of the Pre-University Education shall be restricted from the Academic year 1981-82, in order to bri... about uniformity in the selection of combinations and also to minimize the number of days of Examinations. This will also facilitate in the easy mobility of candidates from one district to another. A list of combinations in Science, Arts, Commerce and Language groups are enclosed for the information of all the Principals (Statement – A). Further, it was also been decided that no Language shall be offered under Part-II henceforth, and certain restrictions are imposed in the selection of language under Part-I.

I am forwarding two pro formas which may kindly be completed and sent to the personal address of Shri Shoav Hasan, Section Officer, Pre-University Education, Examination Wing, Palace Road, Bangalore-1. Proforma B indicates the combinations introduced in the college other than the combinations proposed to be restricted by the Pre-University Education Board from the Academic year 1981-82. In case there is no inconsistency in the combinations offered at present by the college and the one given in the Statement-A, then a nil statement may be sent in Pro forma -B.

Pro forma -C should be sent in respect of all the combinations introduced in the college indicating the strength in each group(Science, Arts and Commerce separately).

As a directory has to be prepared on the above lines, I request you kindly to send the Pro forma-B and C within a month from the date of receipt of this letter but not later than 1st December 1980.

Yours faithfully,

Sd/-
For Director,
Pre-University Education.

## ANNEXURE 27.

Office of the Dy. Director of Public Instruction, Belgaum.

No. Ed-2156-KBS-9-85-86. Dt. 29-4-1986.

Sub.: **Implementation of Kannada as Administrative Language in all Depts. And Institutions.**

Ref.:-1) A. S. letter No.E1 and others 1, 86-87 Dt. 16-4-1986. Shri Adin Chowdhary, Commissioner, D.P.I., Bangalore.

2) Letter from Ed.157.RRC V N:85 Dt. 19-12-1985. Asst. Secretary, Education Dept.

**The mother tongue of Karnataka is Kannada. I am very happy to inform you that Kannada is being implemented as Administrative language of the State, that is why I am writing this letter.**

Orders have been issued to implement Kannada at all levels. The implementation from Public Instruction is more important, so your all correspondence should be in Kannada. The Dept. of Public Instruction should set an example in implementation of Kannada.

It has come to the notice that the Headmasters of certain High Schools are not implementing the use of Kannada in the administration, this is more of regret to express. I will not tolerate henceforth if negligence shown to Kannada and the use of English continued. It has to be observed that henceforth all your salary bills should be in Kannada only. Salary bills in English will not be accepted and considered. All your correspondence should be in Kannada only.

Sd/-

For Deputy Director of Public Instruction

Copy to,

1) The Principals of Govt. Junior Colleges and non Govt. Institutions.

2) The Headmasters of Govt. High Schools and private Institutions.

3) The Asst. Education Officer to take necessary action.

Copy communicated to :- 1) Commissioner for Public Instruction, Bangalore. 2) Jt. Director of Public Instruction, Belgaum Divn., Belgaum. 3) Dy. Commissioner Belgaum, Dist. Belgaum. 4) Asst. Director Dept. of Kannada and Culture, Belgaum.

## ANNEXURE 28.

GOVERNMENT OF KARANATAKA

No.DCE.17-MMS-SV-2.87-88

Office of the

Directorate of Collegiate Education
Bangalore.

Date : 3-2-88

CIRCULAR

Sub:-Implementation of Kannada in all correspondence at all levels of administration.

Ref.:-1) Circular from Directorate Even No.dtd.15-4-86 and 19-5-86.

2) President, Kannada Kavalu Samiti's semi Govt. letter No. 261-86-8 dt. 7.5.86 and 172-87 dt. 28-2-87, 424-87-88 dt.7:11-1-88.

3) Hon'ble Chief Minister's letter No. DPAR/29-kol 87 dt. 4-2-87

With reference to the above cited subject matter and circulars [ref.(2) & (3)] above it is to inform you that, as noticed by the Directorate that, some Govt. and aided Colleges are not using Kannada in their correspondence with the Directorate. It is therefore, requested to use Kannada in all correspondence. The letters received in English will not be considered. Hence it is here by ordered that all the Principals and officials of all colleges should use Kannada in all correspondence with due trust, sincerity and honesty. I hope you will cooperate in implementing Governments strategy of language without fail.

Sd/-

Directorate of Collegiate Education

## ANNEXURE 29.

ENGLISH TRANSLATION OF ORIGINAL LETTER IN KANNADA

KARNATAKA UNIVERSITY DHARWAD

K.U.DAD/88/9510. Dt. Sept. 1988.

To

The Principal,

Bhaurao Kakatakar College, Camp, BELGAUM.

Sub:-Use of Kannada in Concerned and Affiliated Colleges.

Sir,

With reference to the above subject and as per orders of the chancellor you are hereby informed that even though your College is recognized as a Linguistic Minority College, that does not mean that you should not correspond in Kannada. An institution receiving grants from the State Govt., shall not function against the policy of the State.

Hence in future, Kannada shall be used in administration of the College.

Sd/-

Registrar.

Author's Note :

**Summaries of many such Notifications/ Orders may kindly be seen. The same are produced in para No. 127 of the main text.**

## ANNEXURE 30.

EXTRACT OF THE RELEVENT PORTION OF SUBJECT No.6 OF THE PROCEEDING SHEET OF THE 5TH MEETING OF THE BELGAUM ZILLA PARISHD HELD ON 31/10/1991

5th Meeting

**Proceedings of the Ordinary Meeting of Belgaum Zilla Parishad held on 31-10-1991 at 2 P.M. in the meting Hall of Zilla Parishad, Belgaum.**

Members Present : 68

Members absent : 31

**At the outset the Adhyaksh welcomed all the Members and Officers Present in the meeting.**

**Relevant subject of the Proceeding**

SUBJECT No. 6:- Any other subject with permission of the Adhyaksh.

1) Implementation of Govt. order No.DPAR.26.LML.90 dtd.16-11-90 in regard to publishing important Govt. notices and Rules in the minority languages

(Proposed by Shri M.K.Kinayekar, member)

Shri M.K.Kinayekar, member, while speaking, told that it was assured in the previous meeting that the matter will be studied and efforts will be made to implement it within 8 days. But it has again been told that further clarification has been sought from Govt. Advocate. But it is not proper to seek legal opinion, when Govt. orders are clear.

Intervening, Shri V.S.Gani, member stressed upon the member to speak in Kannada and clarify the subject.

Continuing, Shri M.K.Kineyekar, demanded why action has not be taken to enforce the Govt. Orders in regard to implementation of minority languages.

Taking part in the discussion Shriyuths Y.K.Belgaonkar, U.P.Topinkatti, R.C.Modagekar members and Shri B.I.Patil, V.Y.Chavan, M.L.A.s also stressed to adopt minority language as per direction of Government.

Shri D.Y.Waddar, member also requested to use minority language in Chikodi taluka as it is a border areas.

At the end, The Adhyaksh informed the action will be taken to implement Govt. Order No.DPAR.26.LML.90 dtd.16-11-90 in the District.

(Action: Administration Section, Z.P. Belgaum)

| | |
|---|---|
| Sd/- | Sd/- |
| CHIEF SECRETARY, | ADHYAKSH, |
| ZILLA PARISHAD, | ZILLA PARISHAD, |
| BELGAUM. | BELGAUM. |

TRUE COPY

Sd/-

Council Secretary,

Zilla Parishad, Belgaum.

Adv. Ram M. Apte 

## ANNEXURE 31.

ENGLISH TRANSLATION OF THE REPRESENTATION IN MARATHI.

Date : 7-11-1995

To,

The Divl. Commissiner,

Belgaum.

Sir,

**The meeting dated 04/09/1995 of the Taluka Panchyat Samiti was prorogued with a demand to furnish all the circulars and other documents in Marathi in pursuance of the provisions of L.M.Act 1981. You have issued orders to the Exicutive Officer of the Taluka Panchyat Samiti to stay the proceedings of the above noted meeting and directed to conduct the administration only in Kannada language.**

M.L.A Shri B.I.Patil (M.L.A.) on 22/09/1995 raised the issue in the Assembly. The Law Minister Shri Nanayya replied to the said question that orders had been issued to the effect that all the circulars and the documents of the Govt. should be furnished in the language of the minority holding its population more than 15%.

Therefore in accordance with the said orders of the Govt. and our demand all circulars and other documents should be furnished in Marathi language along with Kannada and accordingly arrangements may be made.

**If our demand is not conceded with within 15 days we all members would resort to agitation.**

**The true copies of the relevant Govt. Orders and the**

**written reply given in the Assembly are enclosed herewith.**

Yours,
Sd/-
Sou.Suman V.Redekar
President,
Belgaum Taluka Panchayat.
Sd/-
Shri Bhaganna M. Sanadi
Vice-President,
Belgaum Taluka Panchayat.

**Copy to:-**

1. Chief Executive Officer, Zilla Parishad, Belgaum.
2. Minority Commission, Belgaum.
3. Sub-Divisional Officer, Belgaum.
4. Chief Executive Officer, Taluka Panchyat, Belgaum.

## ANNEXURE 32.

KARANATAKA ACT No. 30 OF 1981

**(First published in the Extraordinary Karnataka Gazette on the Twentieth day of April, 1981)**

**THE KARANATAKA LOCAL AUTHORITIES**

**(OFFICIAL LANGUAGE) ACT, 1981.**

**(Received the assent of the Governor on the Fifteenth day of April, 1981)**

An Act to provide the adoption of Kannada as the language to be used for official purposes by all the local

authorities within the State of Karnataka.

Whereas by Karnataka Act 26 of 1983, Kannada was declared as the Official Language of the State;

Whereas by Notification No. DPAR 29 POL 79, dated 4th March, 1980, the Government of Karnataka notified that Kannada shall be used for all official purposes by all State Government Offices throughout the State;

Whereas it is expedient to provide for the use of Kannada for all Official purposes by the local authorities in the State;

Be it enacted by the Karnataka State Legislature in the Thirty - second Year of the Republic of India as follows:-

1. SHORT TITLE :- This Act may called as the Karnataka Local Authorities (Official Language) Act, 1981.

2. KANNADA To be the official language of all the Local Authorities :- The official language of all the local authorities in the State of Karnataka shall be Kannada : Provided that

(a) The English language may be used in communications,-

(i) addressed to the Central Government offices, Offices of other State Government and the Accountant General;


(ii) related to the orders made under any law which are subject to appeal or revision by any authority;


(iii) addressed to courts other than moffusil courts;


**(iv) Where the English Language cannot be dispensed with due to administrative reasons, or where such communications are purely technical and**

## परिशिष्ट – ३

## सीमाभागातील भौगोलिक प्रदेश दर्शविणारे नकाशे




मानचित्र-२
बेलगांव शहर
व
आसपास का मराठी-भाषी क्षेत्र
बेलगांव
बेंदीहोली
गणिनहल
चंदगड
कानगांव खु.
मुचंडी
कनबर्गी
कालरवांब
अष्टे
मरिहल
निलजी
सम्बरा
मुतगा
बेलगांव शहर क्षेत्र
ग्रामीण बेलगांव
कुडची
शेरीयाव्दाल
शहापुर
माधवपुर
बासरिकट्टी
राकसकोप
जैतनमाल
वडगांव
अंगोल
हलगी
तरिहल
माजगांव
पिरनवाडी
धामणे
कोलीकोप
तामणरवोट्टी
सिद्दनबारी
नगरहाल
संकीनहकनकोप
जनकट्टी
सूची
महाजन आयोग व्दारा निर्धारित सीमा रेखा
बेलगांव, शहापुर नगरपालिका व लश्कर क्षेत्र
४६·३% मराठी-भाषी
२६·७% कनड़-भाषी
२७% अन्य-उर्दू, गुजराथी, तामिल आदि
६0 प्रतिशत व उससे अधिक मराठी-भाषी जनसंख्या वाले गांव
५0 से ६0 प्रतिशत के बीच में मराठी-भाषी जनसंख्या वाले गांव
मराठी व कनड़-भाषिक जनसंख्या (४९·३ प्रतिशत)
बेलगांव ग्रामीण क्षेत्र
४१·२ % मराठी-भाषी
१८·८ % कनड़-भाषी
माधवपुर
४८% मराठी-भाषी (१९५१ में ५२%)
४८·६% कनड़-भाषी
उजाड़ / बस्तीहीन गांव
मानचित्र, जनसंख्या आकड़े व प्रतिशत महाजन आयोगकी रपटसे लिए गये है.
प्रतिशत विशेषरूप से ध्यानमें आये इसलिए रंग में दिया गया है.


मानचित्र ३
महाराष्ट्र (कोल्हापुर जिला)
खानापुर
सुपे
कर्नाटक को वनसंपत्ति मिल सके इसलिये महाराष्ट्र को न दिये जाने वाले मराठी भाषी प्रदेश
मराठी भाषी जनसंख्या वाले गांव
८०% से अधिक
७०% से ८०% के दरम्यान
५०% से ७०% के दरम्यान
५०% प्रतिशतसे कम
उजड़
खानापुर गांव
३२
२
४
२
९
सुपे गांव
४७
६
७
९
-

## परिशिष्ट – ४

## संशोधनाला अनुसरून घेण्यात आलेली छायाचित्रे



माजी महापौर श्री. मालोजी अष्टेकर यांचेकडून लिखित माहिती घेताना संशोधक



मा. श्री. टी. के. पाटील शहर अध्यक्ष, महाराष्ट्र एकीकरण समिती, बेळगाव यांच्याशी अनौपचारिक चर्चा करताना संशोधक



माजी आमदार श्री. बी. आय. पाटील यांच्याशी अनौपचारिक चर्चा करताना संशोधक



मा. कॉम्रेड कृष्णा मेणसे, बेळगाव यांच्याशी अनौपचारिक चर्चा करताना संशोधक



माजी आमदार श्री. वसंत पाटील, गर्लगुंजी–खानापूर, अध्यक्ष, मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समिती, यांच्याशी अनौपचारिक चर्चा करताना संशोधक



माजी आमदार श्री. दिगंबर पाटील, यांच्याशी अनौपचारिक चर्चा करताना संशोधक



कंग्राळी ग्रामपंचायत सरपंच सौ. गिता पाटील यांच्याकडून मुलाखत अनुसूची भरून घेताना संशोधक



प्रशासकीय अधिकारी ग्रामसेवक सलामवाडी, ता. हुक्केरी यांच्याशी चर्चा करताना संशोधक



बेळगाव तालुका महाराष्ट्र एकीकरण समिती अध्यक्ष मा. श्री. निंगोजी हुद्दार यांच्याशी अनौपचारिक चर्चा करताना संशोधक



प्राथमिक आरोग्य केंद्र, बेळंकी येथील डॉ. गीता किणीकर यांच्याशी अनौपचारिक चर्चा करताना संशोधक



सीमाप्रश्न सुटेपर्यंत 'पायात चप्पल घालणार नाही' असा निर्धार करणारे कार्यकर्ते श्री. मधु कणबर्गीकर यांच्याशी अनौपचारिक चर्चा करताना संशोधक



बेळंकी, ता. हुक्केरी येथील शेतकऱ्यांकडून मुलाखत अनुसूची भरून घेताना संशोधक

# सीमालढ्यातील प्रासंगिक छायाचित्रे




संयुक्त महाराष्ट्र सत्याग्रहातील पहिली तुकडी मा. श्री. निंगोजी हुद्दारसमवेत





बेळगाव तालुका महाराष्ट्र एकीकरण समिती जमीन संपादन विरोधात आंबेवाडी शेतकऱ्यांचा चाबुक मोर्चा




मौजे येळ्ळूर येथील मराठी अस्मितेचे प्रतिक असणारा 'महाराष्ट्र राज्य येळ्ळूर' फलक



काळ्या दिनाच्या मूक मोर्चावर कर्नाटक पोलीसांचा लाठीमार होतो.



मराठी लोकांना नेहमीच पोलीसांच्या लाठ्या खाव्या लागतात.



दरवाजे तोडून मराठी घरात घुसून पोलीस स्त्रियांनाही अमानुष मारहाण करतात.



मराठी लोकांच्या शांततामय आंदोलनासही अशा कर्नाटकी काठ्या पडतात.




सीमालढ्यातील एका सभेत बाळासाहेब ठाकरे, आण्णासाहेब पाटील, मनोहर जोशी आणि एन. डी. पाटील.




बेळगाव महापालिका बरखास्तीनंतर रस्त्यावर उतरलेला मराठी जनसागर.



बेळगावचे महापौर विजय मोरे यांना बेंगलोर येथे अपमानीत केलेला तो क्षण.



मारुन मारुन काठी मोडली पण, मराठी व्देष संपलाच नाही.



मराठी नेत्यांची अशी अवहेलना नेहमीच होते.

# परिशिष्ट – ५

## अनौपचारिक मुलाखती नावे

### संशोधकाने संशोधन विषयाशी संबंधित माहितीसंकलनासाठी अनौपचारिक चर्चा केलेल्या व्यक्तिंची नावे

१. कॉम्रेड श्री. कृष्णा मेणसे, बेळगाव

२. मा. श्री. वसंत पाटील, माजी आमदार व अध्यक्ष महाराष्ट्र एकीकरण समिती, बेळगाव

३. मा. श्री. दिगंबर पाटील, माजी आमदार, महाराष्ट्र एकीकरण समिती

४. मा. श्री. मनोहर किणीकर, माजी आमदार व कार्याध्यक्ष, मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समिती

५. मा. श्री. बी. आय. पाटील, माजी आमदार व अध्यक्ष, उचगाव विभाग, महाराष्ट्र एकीकरण समिती

६. मा. श्री. व्ही. वाय. चव्हाण, माजी आमदार, महाराष्ट्र एकीकरण समिती

७. मा. श्री. मालोजी अष्टेकर, माजी महापौर, बेळगाव महानगरपालिका मा. श्री. विजय मोरे, माजी महापौर, बेळगाव महानगरपालिका

८. मा. श्री. जगदिश कुंटे, व्यवस्थापक, दैनिक तरूण भारत, बेळगाव

९. मा. श्री. निंगोजी हुद्दार, नेते, महाराष्ट्र एकीकरण समिती

१०. मा. श्री. टी. के. पाटील, अध्यक्ष, शहर, महाराष्ट्र एकीकरण समिती

११. मा. प्रा. आनंद मेणसे, जी. एस. एस. कॉलेज, बेळगाव

१२. मा. श्री. मधु कणबर्गीकर, बेळगाव

१३. मा. श्री. सुरेश राजुरकर, तालुका पंचायत समिती सदस्य, बेळगाव

१४. मा. श्री. रामचंद्र कुद्रेमनीकर, तालुका पंचायत सदस्य, बेळगाव

१५. मा. श्री. जयराम मिरजकर, महाराष्ट्र एकीकरण समिती नेते निपाणी

१६. मा. श्री. विठ्ठल ल. कडगावकर, व्यवस्थापक, सार्वजनिक वाचलनायल, बेळगाव

१७. मा. श्री. मोहन पावसे, हिंडलगा

१८. मा. श्री. यल्लाप्पा व्ही. पाटील, कंग्राळी

१९. मा. श्री. विठ्ठल एम. पाटील, हिंडलगा

# परिशिष्ट – ६

## मुलाखत अनुसूची

## मुलाखत अनुसूची (**Schedule**)

१. नाव व पत्ता –

- वय –

अ) १८ ते २५ ब) २६ ते ३५ क) ३६ ते ५० ड) ५१ ते ६५ इ) ६६ ते पुढे

- लिंग –
- जात –
- धर्म –
- मातृभाषा –
- जन्मस्थळ –
- शिक्षण –

अ) निरक्षर ब) प्राथमिक क) माध्य. व उच्च माध्यमिक

ड) पदवी व पदव्युत्तर इ) व्यावसायिक

- व्यवसाय

अ) शती ब) सरकारी नोकरी क) धंदा ड) बेरोजगार इ) खाजगी नोकरी

- कुंटूबाचे सरासरी मासिक उत्पन्न किती रूपये?

अ) ३००० पर्यंत ब) ३००१ते ६००० क) ६००१ते १२०००

ड) १२००१ते १८००० इ) १८००१ते पुढे

२. आपल्याला कोणकोणत्या भाषा अवगत आहेत?

अ) मराठी ब) कन्नड क) मराठी व कन्नड ड) मराठी, कन्नड व हिंदी

इ) मराठी, कन्नड, हिंदी व इंगजी

३. घरामध्ये कोणती भाषा बोलता?

अ) मराठी ब) कन्नड क) मराठी व कन्नड ड) मराठी,कन्नड व हिंदी

इ) मराठी, कन्नड, हिंदी व इंगजी

४. गावामध्ये कोणत्या भाषेचे लोक अधिक आहेत?

अ) मराठी ब) कन्नड

५. घरामध्ये वृत्तपत्रे घेता का? होय/नाही

६. घेत असल्यास कोणत्या भाषेची?

अ) मराठी ब) कन्नड क) मराठी व कन्नड ड) इतर

७. सीमाप्रष्नासंदर्भात माहिती देणारे प्रभावी मराठी वृत्तपत्र कोणते?

अ) दै. तरुण भारत ब) दै. पुढारी क) दै. सकाळ ड) दै. लोकमत इ) इतर

८. नातेसंबंध जोडताना तुम्ही भाषेचा विचार करता का? होय/नाही.

९. निमंत्रणपत्रिका कोणत्या भाषेतून छापून घेता?

अ) मराठी ब) कन्नड क) मराठी व कन्नड ड) इतर

१०. लग्न कार्यातील विधी कोणत्या भाषेतून पार पाडता?

अ) मराठी ब) कन्नड क) मराठी व कन्नड ड) इतर

११. गावातील सार्वजनिक कार्यक्रमामध्ये कोणत्या भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो.

अ) मराठी ब) कन्नड क) मराठी व कन्नड ड) इतर

१२. गावामध्ये सार्वजनिक कार्यक्रमामध्ये भाषिक गटामध्ये भेदभाव दिसून येतो का? होय/नाही

१३. गावामध्ये भाषेच्या आधारावर तंटे/बखेडे निर्माण होतात का? होय/नाही

१४. गावामध्ये तरुण मंडळे/महिला मंडळे/बचत गट आहेत का? होय/नाही

१५. असल्यास ती स्थापन करताना भाषिक मुद्दा विचारात घेतला जातो का? होय/नाही

१६. महाराष्ट्रीयन संस्कृतीविषयी जवळीकता वाटते का? होय/नाही

१७. गावामध्ये/बाहेरगावी मराठी साहित्य समेलनामध्ये आपण सहभागी होता का? होय/नाही

१८. सीमाप्रष्नासंदर्भात आपल्याला काही माहिती आहे का? होय/नाही

१९. गावच्या विकासासाठी सर्व भाषिक लोक एकत्र येतात का? होय/नाही

२०. गावातील संस्थामधील कागदपत्रे कोणत्या भाषेतून असतात?

अ) मराठी ब) कन्नड क) मराठी व कन्नड ड) इंग्रजी व कन्नड

२१. शेतीशी संबधित कागदपत्रांची भाषा कोणती आहे?

अ) मराठी ब) कन्नड क) मराठी व कन्नड ड) इंग्रजी व कन्नड

२२. सीमाप्रष्नासंदर्भात वेळोवेळी होणाऱ्या मोर्चे, निदर्षने, हरताळ, मेळावे इत्यादी लोकषाही मार्गाने होणाऱ्या लढ्याात आपण सहभागी होता का? होय/नाही

२३. गावात वारकरी संप्रदाय आहे का? होय/नाही

२४. गावामध्ये कोणत्या माध्यमाच्या षाळा आहेत?

अ) मराठी ब) कन्नड क) मराठी व कन्नड ड) मराठी व इंग्रजी

इ) कन्नड व इंग्रजी ई) मराठी–कन्नड व इंग्रजी

२५. आपल्या मुलांना कोणत्या माध्यमाचे शिक्षण देता?

अ) मराठी ब) कन्नड क) मराठी व कन्नड ड) मराठी व इंग्रजी

इ) कन्नड व इंग्रजी ई) मराठी–कन्नड व इंग्रजी

२६. शासनाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक सोयी–सवलतीबाबत मराठी माध्यमाच्या मुलांच्याकडे दुर्लक्ष होते का? होय/नाही.

२७. सीमाभागातील मराठी भाषिक कुटुंबातील मुली उच्च शिक्षण घेतात का? होय/नाही.
२८. सद्यास्थितीत मराठी माध्यमाच्या षाळेमध्ये पुरेसा षिक्षक वर्ग आहे का? होय/नाही.
२९. मराठी माध्यमाच्या षाळेत पुरेषी विद्यार्थी संख्या आहे का? होय/नाही.
३०. मराठी पाठ्यापुस्तकामध्ये महाराष्ट्र संस्कृती विषयी माहिती मिळते का? होय/नाही.
३१. मराठी भाषिकांच्या षिक्षणाविषयी कर्नाटक सरकारचे धोरण कसे आहे?
सकारात्मक/नकारात्मक
३२. मराठी माध्यमाच्या षाळेच्या नवीन इमारत बांधकाम व देखभाल दुरुस्तीबाबत कर्नाटक सरकारची भूमिका कषी आहे? सकारात्मक/नकारात्मक
३३. सीमाभागातील शाळांसाठी महाराष्ट्र सरकारचे आर्थिक सहायय मिळते का? होय/नाही
३४. मराठी माध्यमाच्या शाळेत कन्नड विषयाची सक्ती केली जाते का? होय/नाही
३५. मराठी माध्यमाची पाठ्यपुस्तके षैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला उपलब्ध होतात का?
होय/नाही.
३६. स्थानिक निवडणूकांमध्ये भाषिक मुद्दा प्रभावी ठरतो का? होय/नाही
३७. कोणता राजकीय पक्ष/संघटना निवडणूकीवेळी भाषिक मुद्याचा आधार घेतो?
अ) कॉग्रेस ब) भाजप क) निधर्मी जनता दल
ड) महाराष्ट्र एकिकरण समिती इ) इतर
३८. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कोणत्या भाषिक गटाचे प्राबल्य आहे?
अ) मराठी ब) कन्नड क) मराठी व कन्नड ड) इतर
३९. मराठी भाषिकांना स्थानिक स्वराज्य संस्थाकडून पुरेसे सहकार्य मिळते का? होय/नाही
४०. निवडणूकीवेळी राजकीय पक्ष प्रचारासाठी जाहिरातबाजी कोणत्या भाषेतून करतात?
अ) मराठी ब) कन्नड क) मराठी व कन्नड ड) इतर
४१. मराठी भाषिकांची स्वतत्र संघटना आहे का? होय/नाही
४२. सरकारी कार्यक्रमामध्ये मराठी भाषिक पदाधिकारी/नेते यांना सहभागी करून घेतले जाते का? होय/नाही
४३. कर्नाटक सरकारचे धोरण मराठी भाषिकांच्यावरती अन्याय कारक आहे का? होय/नाही
४४. मराठी भाषिक पदाधिकारी/नेत्यांकडे पाहण्याचा कर्नाटक सरकारचा दृष्टीकोण कसा आहे?
सकारात्मक/नकारात्मक
४५. कर्नाटक सरकारने बेळगाव महानगरपालिकेची बरखास्ती मराठी देषातून केली आहे असे वाटते का? होय/नाही.
४६. सीमा लढयामध्ये महिलांचा सहभाग असतो का? होय/नाही.
४७. विधीमंडळाच्या/लोकसभेच्या निवडणूका वेळी भाषिक मुद्याला प्राधान्य दिले जाते का?
होय/नाही
४८. पोलीस, कोर्ट–कचेरीमध्ये भाषिक समस्या जाणवते का? होय/नाही
४९. महसूल विभागात भाषिक समस्या जाणवतात का? होय/नाही
५०. आजरोजी तुमची महाराष्ट्रात जाण्याची मानसिकता आहे का? होय/नाही

५१. मराठी भाषिक म्हणून तुम्हाला कोणकोणत्या अडचणीना सामोरे जावे लागते?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

५२. नोकरी मिळविताना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

मराठी भाषिक म्हणून तुम्हाला कोणत्या राजकीय समस्या भेडसावतात?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

५३. मराठी भाषिक म्हणून तुम्हाला कोणत्या प्रशासकीय समस्या भेडसावतात?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**दिनांक :**

**ठिकाण :** **माहिती देणाऱ्याचे नांव व सही**